केसरींतील निवडक निबंध

पहिलें पुस्तक


म.ग्रं.सं. ठाणे
विषय :... निबंध
सं. क्र. : 98

आर्यभूषण छापखाना, पुणें

सन १९३७] [किंमत दोन रुपये

केसरींतील निवडक निबंध

पहिलें पुस्तक


मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
ग्र. सं. ५५१८२

संपादक :

कै. गोपाळ गणेश आगरकर, एम. ए.

REFBK-005572

किंमत दोन रुपये

१९३७

पहिली आवृत्ति १८८७
दुसरी आवृत्ति १९३७

मुद्रक व प्रकाशक—
श्री. अनंत विनायक पटवर्धन,
आर्यभूषण छापखाना,
९१५।१ मांबुर्डा पेठ, पुणें नं. ४.

दुसऱ्या आवृत्तीचे प्रास्ताविक दोन शब्द



'केसरी' पत्र हें न्यू इंग्लिश स्कूल या संस्थेच्या चालकांनीं इसवी सन १८८१ सालीं कै. गोपाळरावजी आगरकर यांच्या संपादकत्वाखालीं सुरूं केल्यावर त्यांतील लेखांनीं महाराष्ट्रांत खळबळ उडवून दिली होती व कोल्हापूर खटल्यांत कै. गोपाळराव आगरकर व कै. लोकमान्य टिळक यांना शिक्षा झाल्यावर तर 'केसरी' व 'मराठा' या पत्रांचें नांव देशांत सर्वतोमुखीं झालें होतें व त्याचा परिणाम त्यांतील लेख लोकांना फिरून वाचावयास मिळावेत अशी लोकांमध्यें इच्छा उत्पन्न होण्यांत व ती प्रसार पावण्यांत झाला होता. तेव्हां 'केसरी' पत्रांतील निवडक लेखांचें पुनर्मुद्रण करण्यांत यावें, अशी मागणी साहजिकपणें लोकांकडून जी करण्यांत आली, तिचा उल्लेख या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत साहजिकपणें करण्यांत आला आहे. या प्रस्तावनेंत संपादकांनीं या 'निबंध-संग्रहा'च्या दोन्ही भागांबद्दलच्या सूचना वाचकांनीं करावयाच्या असल्यास कराव्यात व त्यांचा विचार दुसरी आवृत्ति काढण्याचा योगायोग आल्यास करण्यांत येईल, असेंहि सदर प्रस्तावनेंत नमूद करण्यांत आलेलें आहे. परंतु सदर **केसरींतील निवडक निबंध** या पुस्तकाच्या पहिल्या भागाची दुसरी आवृत्ति काढण्याचा योग आज चाळीस वर्षांनंतर येत आहे; तेव्हां प्रथम आवृत्तीच्या प्रकाशनानंतर वाचकांनीं सदर पुस्तकांबद्दल त्यांच्या तेव्हांच्या संपादकांकडे ज्या सूचना पाठविल्या असतील त्या आतां उपलब्ध नसल्यामुळें त्यांचा विचार करणें आज शक्य राहिलेलें नाहीं. अशा परिस्थितींत ही सदर पुस्तकाची दुसरी आवृत्ति प्रसिद्ध होत आहे.

मुंबई विश्वविद्यालयानें या **केसरींतील निवडक निबंध** या पुस्तकाच्या दोन भागांपैकीं पहिला भाग कांहीं परीक्षांकरितां नेमला असल्यामुळें या भागाच्या पुनर्मुद्रणाचा हा योग आला आहे याबद्दल प्रकाशक मुंबई विश्वविद्यालयाच्या अधिकाऱ्यांचा आभारी आहे. **केसरी** पत्राच्या सुरुवातीच्या वेळीं न्यू इंग्लिश स्कूलचे विद्वान् चालक सदर पत्रांत लेख लिहित असत; त्यांचें तें लिखाण आजच्या नव्या पिढीचे हातीं पडणें अवश्यक आहे. सबब या **निवडक निबंधांचा** दुसरा भागहि मुंबई विश्वविद्यालयाच्या अधिकाऱ्यांनीं कांहीं दुसऱ्या परीक्षांकरतां नेमल्यास त्याच्या पुनर्मुद्रणाचें कार्य सहजीं साधणार आहे. या आमच्या सूचनेचा योग्य विचार अधिकाऱ्यांकडून होईल अशी आम्हांस आशा आहे.

आर्यभूषण छापखाना कचेरी,
६२६ शनवार पेठ, पुणें.
ता. १ नोव्हेंबर १९३७

प्रकाशक

प्रस्तावना.

अलीकडे लोकांत ज्ञानाचा प्रसार करण्याचीं जीं साधनें उपलब्ध झालीं आहेत, त्यांच्या अग्रस्थानीं वर्तमानपत्र ठेवण्यास कांहीं हरकत नाहीं, असें आम्हांस वाटतें. या साधनाच्या नांवानें जेवढ्या अर्थांचा निर्देश होतो, तेवढीच गोष्ट त्यांत येत असती, म्हणजे त्याचें इतकें प्रस्थ माजलें नसतें! आज त्याला जें इतकें वजन आलें आहे तें त्यांत येणाऱ्या मजकुराच्या बहुविधत्वामुळें आलें आहे. वर्तमानपत्रांत कोणती गोष्ट घालावी आणि कोणती घालूं नये, असा आतां निर्बंध राहिलेला नाहीं. **लंडन टाइम्ससारख्या** एखाद्या प्रसिद्ध पत्राचें फाईल चाळलें असतां त्यांतून डोंबाऱ्याच्या बटव्याप्रमाणें पाहिजे ती चीज काढतां येणार आहे! रामबाण औषधें, युरोपांतील खबर, राजकीय भाषणें, पत्रकर्त्यांचे निबंध, स्वतःच्या बातमीदारांकडून आलेली ऐर्लंडांतील दंग्याची हकीकत, बाजारभाव, वेधशालेंत घेतलेलें हवेंतील फेरफारांचें टिप्पण, काडीमोड वगैरे करून देणाऱ्या कोर्टांतील खटल्यांचे बीभत्स रपोट, पटकीविषयीं जर्मन प्रोफेसरांनीं केलेला नवीन शोध, रिपनच्या बिशपचें व्याख्यान, सूर्यावरील ठिपक्यांविषयीं टिंडालचे विचार, व "पाहिजेत," "विमा" वगैरे नाना तऱ्हेच्या सदराखालीं येणाऱ्या अनंत जाहिराती अशा अनेक विषयांच्या खिचडीमुळें वर्तमानपत्रास जी विचित्र बहुविधता आली आहे, तीमुळें त्यांत बऱ्याबाईट मजकुराची एकच भेसळ होऊन जाते, व जे लेख पुनः पुनः वाचण्यासारखे असतात, त्यांसही फालतू मंडळीबरोबर अर्धचंद्र मिळून कपट्यांची टोपली पहावी लागते! परंतु अशा रीतीनें स्थाईक राहण्यासारख्या लेखांचा उपमर्द करणें म्हणजे ज्ञानप्रसार करणें हा जो वर्तमानपत्रें प्रसिद्ध करण्याचा मूळ हेतु तो सफल होत नाहीं, असें दिसून येऊं लागल्याबरोबर, त्यांतील नेहमीं वाचण्यासारख्या लेखांची पुनरावृत्ति काढून ते पुस्तक रूपानें प्रसिद्ध करण्याची चाल पडली. इंग्रजींत ॲडिसन वगैरेचे जे निबंध सध्यां पुस्तक रूपानें आमचे दृष्टीस पडतात, ते एकदां तत्कालीन वर्तमानपत्रांत येऊन गेले होते. मासिक किंवा त्रैमासिक पुस्तकांत येणाऱ्या निबंधांच्या संबंधानेंही अशा प्रकारची व्यवस्था करण्यांत येऊं लागली आहे. हा पाश्चात्य रिवाज ज्यांस माहीत आहे अशा, व केसरींतील कांहीं निबंध पुनः

पुनः वाचण्यासारखे आहेत असें ज्यांस वाटत आहे, अशा आमच्या कित्येक मित्रांनीं ते फिरून छापून पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याबद्दल आमच्या पाठीमागें पुष्कळ वर्षें टुमणें लाविलें होतें! पण आम्हीं आजपर्यंत त्याच्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. आम्हांस असें वाटे कीं आमचे हे हितचिंतक असल्यामुळें यांनीं हा आग्रह धरिला आहे. पण पुढें कांहींनीं असें साफ लिहिलें कीं, "ज्या अर्थी शास्त्रीबोवांसारख्यांच्या हातचे निबंध आम्हांस किंवा आमच्या पुढल्या पिढीस वाचण्यास मिळण्याचा संभव नाहीं, त्या अर्थीं या आमच्या महाराष्ट्र ॲंडिसनच्या व त्याच्या साथ्यांच्या हातून केसरीरूप स्पेक्टेटरांत जे चांगले चांगले निबंध आले असतील ते तुम्हीं तरी फिरून छापून काढा, नाहीं तर आम्हांस तरी ते छापण्याची परवानगी द्या. पण ते तुमचे तुम्हीं छापावे, हें विशेष योग्य आहे; कारण तें काम तुमच्या हातून थोड्या खर्चानें व स्वल्प आयासानें होण्याजोगें असल्यामुळें त्यांत वाचकांचा फायदा होण्याचा संभव आहे." याप्रमाणें कित्येकांकडून निकडीचीं पत्रें आल्यामुळें **केसरींतील निवडक निबंध** छापण्याचा निश्चय करून त्यांचें पहिलें पुस्तक आज वाचकजनांस आम्ही विनयपूर्वक सादर करीत आहों. यांत ज्या निबंधांची निवड केली आहे ती सर्वांस पसंत पडेलच असें आम्हांस खात्रीनें सांगवत नाहीं. कित्येकांस कांहीं घालण्यासारखे निबंध घातले नाहींत व कांहीं न घालण्यासारखे घातले आहेत, असें वाटण्याचा संभव आहे. तथापि यासंबंधानें आम्हीं आपल्याकडून होईल तितकी काळजी घेतली आहे. एकदां असें वाटलें होतें कीं, या साऱ्या निबंधांची छाटाछाट व दुरुस्ती करून, व हे एकदां वर्तमानपत्रांत आले होते असा भास होणार नाहीं, असें रूप त्यांस देऊन, मग छापावे. पण त्यावर कित्येकांचें असें म्हणणें पडलें कीं अशा प्रकारचें रूपांतर केल्यानें, त्यांची मूळची लज्जत नाहींशी होते; इतकेंच नाहीं, तर मूळ लेखकाचा भाग किती व प्रकाशकाचा भाग किती, याचा निश्चय करतां न आल्यामुळें गोंधळ होतो. सबब निदान पहिल्या आवृत्तींत तरी ते जसेच्या तसेच छापावे. पाहिजे तर पुढल्या आवृत्तींत ते सुधारावे. हा सल्ला बरा वाटल्यामुळें प्रस्तुत आवृत्तींत **निवडक निबंधांच्या** स्वरूपांत म्हणण्यासारखा कोणताही फेरफार केलेला नाहीं! फक्त अशा पुस्तकाचा उपोद्घात "वाचना"वरील निबंधानें केला असतां बरें होईल, असें वाटल्यावरून त्या विषयावर एक नवीन निबंध घातला आहे. वादग्रस्त विषयावरील कांहीं निबंधही याच कारणाकरितां

जसेच्या तसेच या पुस्तकांत घेतले आहेत. दुसरें पुस्तक छापत आहे. तेंही लवकर प्रसिद्ध होईल. या दोनही पुस्तकांच्या संबंधानें कोणास कांहीं सूचना करावयाच्या असल्यास त्यांनीं त्या मेहेरबानी करून आम्हांस कळवाव्या, म्हणजे आम्ही त्यांची दुसरी आवृत्ति काढतांना अवश्य विचार करूं.

महाराष्ट्र भाषेंत राजकीय, सामाजिक, इत्यादि विषयांवर तरुण वाचकांच्या हातांत टाकण्यासारखीं पुस्तकें मुळींच झालेलीं नाहींत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ही उणीव अंशतः तरी दूर करावी या हेतूनें या **निवडक निबंधांची** ही आवृत्ति काढली आहे, व प्रत्येक बुभुक्षित वाचकास तिची निदान एक प्रत तरी स्वतःच्या संग्रहीं ठेवतां येऊन, द्रौपदीच्या स्थालीप्रमाणें तिचा उपयोग करतां यावा, यासाठीं तिची किंमत खर्चाचे मानानें बेताचीच ठेविली आहे.

पुणें, ता. २० माहे सप्टेंबर सन १८८७

अनुक्रमणिका

विषय.	पृष्ठ.
उपोद्घात–वाचन	१
आमच्या निकृष्ट स्थितीस कारण कोण !	११
हिंदुस्थानापासून इंग्लंडास फायदे	१४
आम्ही आमच्या दारिद्र्यांतून कशानें सुटूं !	२१
गुरु गोविंद	३६
दत्तकाची अवश्यकता ...	४८
व्यापाराखेरीज तरणोपाय नाहीं	७५
आयर्लंडाकडे पाहून तरी जागे व्हा.	८३
हिंदुस्थानावर रशिया स्वारी करणार काय !	८७
इंग्लंडाशिवाय आम्हांस गति नाहीं.	१०६
दागिन्यांचा सोस	११२
एकत्र राहणें चांगलें का ! ...	११९
अनुकरण	१२४
अर्थशास्त्रदृष्ट्या बालविवाहाचा विचार	१४७
भोजनगृह	१५३
युरोपियन आणि नेटिव यांचें अन्योन्य संघट्टन	१५६
मराठमोळा	१८१
मराठमोळ्याची पुरवणी ...	१८७
सासुरवास	१८९
दारूबाजी	१९४
इंग्रजी विद्या व आमची सामाजिक स्थिति	१९७
हिंदुस्थानदेश बुडाला, हो, ठार बुडाला	२१४
स्त्रीशिक्षणावर शेवटचे दोन शब्द	२१९
माधवबागेंतलि सभेवरील आक्षेप	२२४
आतां कसें !...	२२७
सास्वांस नोटीस	२४०
वर्तमानपत्रें	२४५
शेक्सपिअर, भवभूति, कालिदास	२४८
नाटकें करावीं कीं करूं नये !	२५१
कवि, काव्य, काव्यरति ...	२६६
बडोद्याचे सयाजीरावमहाराज यांस दोन उपदेशपर शब्द	२७६
आपलें वैद्यक	२८०
रसायन क्रिया	२९२
मुद्रण–स्वातंत्र्य	३०२
कै. विष्णु कृष्ण चिपळोणकर	३१६
मन आणि मेंदू	३२२
सृष्ट्यवलोकन	३२९

केसरींतिल निवडक निबंध

पहिलें पुस्तक

उपोद्घात—वाचन

गुरुमुख, वाचन, विचार, अवलोकन, वाद इत्यादि ज्ञानसंपादनाचीं अनेक द्वारें आहेत. त्यांपैकीं वाचन हें अत्यंत महत्त्वाचें आहे. 'गुरु' शब्दांत अर्थात् सर्व वडिल माणसांचा समावेश केला पाहिजे. बाल्यावस्थेंत गृह आणि शाला हीं दोन ज्ञानसंपादनाचीं स्थानें होत. घरीं मातापितरांनीं व इतर वडिल माणसांनीं शिक्षण द्यावयाचें; शाळेंत शिक्षकानें द्यावयाचें. विद्यार्थी जसजसा मोठा होत जातो, तसतशी त्याला गुरुमुखाची मदत कमी पडूं लागते. आणि खरोखरीच ज्यांना मुलांच्या कल्याणाची इच्छा असेल त्यांनीं त्यांना फार वेळ भरवून घेण्याची संवय लावूं नये. मनुष्यास मानसिक श्रमाचा जात्या कंटाळा आहे; कारण, मानसिक श्रम शारिरि श्रमापेक्षां अवघड आहे. मनाला एकदां दुसऱ्यापासून मदत घेण्याची खोड लागली, म्हणजे त्याचें स्वावलंबन अगदीं सुटतें. व्यवहारांत घडोघडीं अडचणी येणार. प्रत्येक घटकेस सल्ला देण्यास भेटणारा गुरु कोठून मिळणार ! मनाची लोखंडासारखी स्थिति आहे. लोखंड वहिवाटींत नसलें म्हणजे त्याला तांबेरा येऊन तें कुचकामाचें होतें. पण जर त्याच्यावर नित्य घर्षण घडत असलें तर तें सतेज राहून फार दिवस टिकतें. ज्याच्या मनाला श्रम करण्याची संवय लागलेली नाहीं, त्याचें मन लोखंडाप्रमाणें गंजून जाऊन कोणत्याही कामास निरुपयोगी होतें. वस्तऱ्याला जसा दगड, तशा बुद्धीला अडचणी आहेत. अडचणीच्या दगडावर बुद्धि लाविल्यानें ती अत्यंत तीव्र होते. जेव्हां तेव्हां गुरुमुखाची अपेक्षा केल्यानें हें घर्षण घडत नाहीं, व बुद्धीला मांद्य येतें. सबब, विद्यार्थ्यांच्या शिक्षणास गुरुमुखांतून अगदीं अपरिहार्य असेल तेवढेंच साहाय्य व्हावें. कित्येक श्रीमंत लोक आपल्या मुलांस शिकविण्यासाठीं खाजगी

शिक्षक ठेवीत असतात. शाळेंतले शिक्षक अगदींच नादान असले, किंवा मुलांकडून वर्गांच्या मागें राहिलेली कांहीं बाकी मिळवून घ्यावयाची असली, किंवा त्यांच्याकडून एखाद्या इयत्तेवरून उडी मारावयाची असली, तर असें करणें बरोबर आहे. तसें नसेल तर मात्र घरच्या शिक्षकापासून मुलांचा अखेरीस तोटा होतो असा आमचा समज आहे. मुलांची स्वतः विचार करण्याची संवय मोडते. ग्रीक लोक शिक्षकाच्या कामाची तुलना नेहमीं सुईणीच्या कामाशीं करीत. साक्रेटिसाचें असें म्हणणें असे कीं जसा कुशींत गर्भ तसे विचार साऱ्यांच्या डोक्यांत आहेतच. शिक्षकानें सुईणीप्रमाणें त्यांचा बहिरागम मात्र आपल्या चातुर्यानें सुखावह करावयाचा. जसे हस्तपादादि अवयव व नेत्रकर्णादि इंद्रियें अभ्यासानें सुदृढ व चंचल होतात, त्याप्रमाणें अभ्यासानें बुद्धिही सुदृढ व चंचल होते. बैलाचा खांदा, घोड्याची छाती, गाढवाची पाठ, व येडक्याचें शिंग–हीं उपयोगानें किती मजबुत होतात, हें सर्वांच्या पहाण्यांत आहे. पेहलवानांचीं छाताडें, पोटऱ्या, व दंड, डांक घेऊन पळणारांचा दम व पाय, निशाण मारणारांचे हात व डोळे, मराठी कारकुनाची मांडी आणि पाठीचा कणा, गवयाचा कान, बजवय्याचीं बोटें, आणि बोलणाराची जीभ याप्रमाणें ज्याला ज्या धंद्यांत जो अवयव किंवा इंद्रिय विशेष वापरावें लागतें, त्याचा तो अवयव किंवा तें इंद्रिय इतरांपेक्षां बळकट होतें. जशी शरीराची तशीच बुद्धीचीही गोष्ट आहे. अष्टावधान्यांचें स्मरण वाढलेलें असतें. कादंबरीकार व कवि होईल तितकी कल्पना वाढवितात. तत्त्ववेत्त्यांस अनुमानप्रमाणांची विचक्षणा करण्याची संवय लागलेली असते. सारांश काय कीं शरीराच्या अवयवांप्रमाणें मनाचे अवयवही अभ्यासानें आणि उपयोगानें मजबूत आणि चंचल होतात; यासाठीं ज्या शिक्षणपद्धतीनें विद्यार्थ्यांस ते वारंवार उपयोगांत आणावे लागतील अशी पद्धति योजणें फार हितावह आहे. विद्यार्थ्यांच्या एका अवस्थेंत गुरुमुखाचें साहाय्य अत्यंत आवश्यक आहे. पण त्याची आवश्यकता जितकी लवकर कमी होईल तितकें बरें.

गुरुमुखाशिवाय ज्ञानसंपादनाचीं चार साधनें आहेत, त्यांपैकीं विचार, अवलोकन आणि वाचन हीं ज्याचीं त्याच्या स्वाधीन असूं शकण्यासारखीं आहेत. श्रवणा एक वाद राहिला, तो दुसरा कोणी तरी तोडीचा मिळाल्याशिवाय नीट होत नाहीं.

श्रेष्ठाशीं संवाद करण्यापासून नवीन ज्ञान प्राप्त होतें, समाशीं करण्यापासून संशयनिवृत्ति होते, व कनिष्ठाशीं करण्यापासून संपादिलेलें ज्ञान सुव्यवस्थित होतें. कुस्त्यांपासून मुलांच्या शरीरावर जो परिणाम होतो तो चांगल्या वादापासून बुद्धीवर होतो. कुस्तीप्रमाणें वादानें बुद्धीच्या सर्व अंगांचा आळस झडून त्यांस चलाखी येते. कुस्त्यांप्रमाणें वादापासून चांगले परिणाम नेहमीं व्हावे. पण कुस्त्यांत चुरस एखादेवेळीं, व वादांत दुराग्रह बहुशः असल्यामुळें, तसें घडत नाहीं. यासाठीं ज्या प्रसंगीं योग्य प्रतिस्पर्धी मिळेल त्या प्रसंगींच वादास उभें रहावें. संतापजनक दुराग्रहाचा वाद होईल तितका टाळावा.

अवलोकनांत सर्व प्रकारच्या इंद्रियानुभवांचा समावेश होतो. हे अनुभव मनुष्य बुद्ध्या घेतो; किंवा त्यास ते सहज प्राप्त होतात. संसारांत पडलेल्या मनुष्यास निरनिराळ्या स्वभावाचे लोक भेटणें, पदार्थांचें सेवन करूं लागलें असतां त्यांचे धर्म समजून येणें वगैरे सहज अनुभव होत. भूगर्भ, वनस्पति, वैद्यक, रसायन इत्यादि विषयांत येणाऱ्या पदार्थांचे धर्म जाणण्यासाठीं शास्त्रशोधक जे प्रयोग करितात, त्यांपासून त्यांना येणाऱ्या अनुभवांस बुद्ध्या घेतलेले अनुभव म्हणत येईल. हे अनुभव अत्यंत शांतपणानें व काळजीनें घ्यावे लागतात.

इंद्रियद्वारां प्राप्त झालेल्या अनुभवांवरून कार्यकारणादिकांचा जो निश्चय त्यास विचार असें म्हणतात. भलत्याच कार्याचा भलत्याच कारणाशीं संबंध लावून देणें म्हणजे विचार करण्यांत चुकणें. विचारांत प्रमाद होऊं न देतां बिनचूक विचार करावा कसा हा विषय अत्यंत गूढ आहे, याचा मानसशास्त्रांतील न्याय-संज्ञक शाखेंत समावेश होतो.

आतांपर्यंत ज्ञानसंपादनाच्या पांच साधनांपैकीं गुरुमुख, वाद, अवलोकन, व विचार या चोहोंचें स्वल्प दिग्दर्शन केलें. वास्तविक पहातां वाचनावरील निबंधांत त्यांचा इतका उल्लेख करायाला नको होता. परंतु यांचा वाचनाशीं अत्यंत निकट संबंध असल्यामुळें, व प्रस्तुत पुस्तकांत विषयविभागांपेक्षां विषयज्ञान करून देण्यावर विशेष कटाक्ष असल्यामुळें विषयांतराबद्दल येणारा दोष पत्करून गुरुमुख, वाद, अवलोकन, व विचार, या चार ज्ञानसाधनांविषयीं थोडेंसें लिहिलें. आतां निबंधाचा मुख्य विषय जें वाचन त्याकडे वळूं.

वाचनाचे दोन प्रकार आहेत; एक दुसऱ्यासाठीं व एक स्वतःसाठीं. आपण जें वाचतों तें आपलें आपण लिहिलेलें असेल किंवा दुसऱ्यांनीं लिहिलेलें असेल.

कोणतेंही पुस्तक किंवा लेख वाचण्यासाठीं हातांत घेण्यांत दोन हेतु असतात; माहिती किंवा करमणूक. पुस्तकें ज्या प्रकारचीं असतील त्या प्रकारचा परिणाम तीं वाचणारांच्या मनावर होईल. वाईट पुस्तकें वाचण्यापेक्षां कांहीं न करणें बरें; कारण कांहीं न करण्यानें मनाला निदान कोणताही वाईट नाद तरी लागत नाहीं. ज्यांनीं वाचनाचे पवाडे गाइले आहेत त्यांनीं ते चांगल्या वाचनाचे गाइले आहेत. या निबंधांतही वाचनाविषयीं जे दोन शब्द लिहिले आहेत, ते चांगल्या वाचनाविषयीं लिहिले आहेत. पुस्तकें एक प्रकारचे मित्र आहेत. कुमित्रांच्या संगतीप्रमाणें दूष्य पुस्तकांच्या वाचनापासून दुर्गुण जडतात. म्हणून कुमित्रांप्रमाणें दूष्य पुस्तकांचा सहवास टाळला पाहिजे.

बहुश्रुत सन्मित्राच्या सहवासापासून होणारे बहुतेक फायदे चांगल्या वाचनापासून होऊन, शिवाय त्या सहवासापासून न होणारे असेही अनेक फायदे होतात. ज्ञानाच्या ज्या चार साधनांविषयीं वर थोडासा उल्लेख केला आहे तीं सर्वांस प्राप्य असतील किंवा नसतील. वाचन मात्र स्वल्प खर्चानें किंवा थोड्याशा अंगमेहनतीनें सर्वांस प्राप्त होण्यासारखें आहे. विद्वान् गुरु भेटेल किंवा न भेटेल, संवाद करण्यासारखा मित्र प्राप्य असेल किंवा नसेल, स्वतंत्रपणें बिनचूक विचार करतां येण्यासारखें शिक्षण मिळालें असेल किंवा नसेल, सहज घेतां येणारे किंवा बुद्ध्या घ्यावे लागणारे अनुभव घेऊन पहाण्याच्या सोई असतील किंवा नसतील, वाचनाची मात्र तशी स्थिति नाहीं. मुद्रणकला भरभराटसि आल्यापासून हें ज्ञानसाधन अत्यंत सुगम झालें आहे; किंबहुना कांहीं स्थितींत ज्ञान करून घेण्यास दुसरें कोणतेंही साधन उपयोगी पडतच नाहीं. कोणत्याही विद्वानाला कोणत्याही विषयावरील आपले विचार सर्व ठिकाणीं स्वतः हजर राहून स्वमुखानें सांगतां येणें अशक्य आहे. पण तेच त्यानें लिहून काढले, व पुस्तकरूपानें प्रसिद्ध केले, तर त्यांच्यापासून पाहिजे त्याला फायदा करून घेतां येणार आहे. विचारांना ग्रंथग्रथित करणें म्हणजे त्यांस जड स्वरूप देऊन अमरत्व आणण्यासारखें आहे. त्यांना जड स्वरूप आल्यानें ते आपल्या जनकापासून पाहिजे त्याच्या हातांत जाऊं शकतात. त्यांना अमरत्व आल्यानें मनुष्यांच्या प्रत्येक पिढीस त्यांच्यापासून फायदे करून घेतां येतात. व्यासवाल्मीकादि महाकवि आपले विचार लिहून न ठेवते, तर 'महाभारत' आणि 'रामायण' यांच्यापासून हिंदु लोकांना आज हजारों वर्षें जें ज्ञान व जी करमणूक होत आहे

ती कोठून होती ? या महापुराणांप्रमाणेंच एतद्देशीय इतर ग्रंथांची व परदेशीय ग्रंथांची गोष्ट आहे. पुस्तकद्वारा पाश्चिमात्य एका इंग्रजी भाषेंतील ज्ञानभांडार आम्हांस खुलें झाल्यामुळें आम्हांस केवढा फायदा होत आहे ? परकीय अमलापासून होणाऱ्या अनंत यातनांचा या एका फायद्यापासून विसर पडून भावी स्वातंत्र्याची आणि सुखाची आशा आम्हांस उत्पन्न होत नाहीं काय ? अलीकडील पाश्चिमात्य भाषांत इंग्रजी भाषा व इंग्रज लोक पहिल्या वर्गांत असल्यामुळें त्यांनीं त्या भाषेंत भाषांतराच्या साहाय्यानें इतर सर्व सुधारलेल्या भाषांतील उत्कृष्ट उत्कृष्ट विचारांचा संग्रह केला आहे, व प्रतिदिवशीं करीत आहेत; व ह्या एका भाषेंतील ग्रंथ आम्हांस वाचनास मिळूं लागल्यामुळें युरोपांत फार प्राचीन कालापासून आजकालपर्यंत झालेल्या विद्वानांपैकीं ज्यांनीं आपले विचार लिहून ठेविले आहेत त्यांपैकीं निदान उत्तम उत्तमांचीं तरी इंग्रजी भाषांतरें आम्ही पैसा खर्च करण्यास तयार असलों तर आम्हांस वाचण्यास सांपडणार आहेत. सारांश काय कीं महान् महान् तत्त्ववेत्ते, इतिहासकार, शास्त्रज्ञ, व कवि आपापले विचार पुस्तकरूप नौकेंत घालून न ठेवते, तर ते कालमहार्णवांत कधींच बुडून जाते, व त्यांचा यत्किंचित्ही मागमूस आम्हांस न लागता. पण त्यांनीं तसें केलें नाहीं, यामुळें विचाररूप मालानें भरलेल्या या ग्रंथनौका पाहिजे त्याला हव्या त्या किनाऱ्यावर उतरून घेऊन त्यांतील मालास हात घालतां येतो.

गुरुमुखापासून होणारा फायदा विद्यार्थ्यांस फार झालें तर शाळेंत किंवा विद्यालयांत करून घेतां येतो. एकदां शाळा सुटली, किंवा विद्यालयीन पदवी प्राप्त झाली म्हणजे गुरूला सोडून व्यवहारांत पडावें लागतें. व्यवहार पाठीमागें लागला म्हणजे ज्ञानसंपादनास पुस्तकांशिवाय दुसरें साधन रहात नाहीं. शिकलेल्या लोकांपैकीं शेंकडा पंचाण्णवांना नोकरींत किंवा उद्योगांत पडल्यावर वाचनाची इच्छा मुळींच रहात नाहीं, असें आमच्या सध्याच्या स्थितीवरून दिसतें. शाळेंत किंवा विद्यालयांत जे मानसिक श्रम करावयाचे ते नोकरी किंवा धंदा मिळण्यासाठीं. तो मिळाला म्हणजे अभ्यासाचें सार्थक झालें, व पुढें तो करण्याची गरज राहिली नाहीं, अशी पुष्कळांची समजूत असते. शाळेंत किंवा विद्यालयांत संपादिलेल्या भांडवलावर जन्मभर व्यापार करणारे असे अनेक लोक आहेत. यांना मानसिक श्रमाचा स्वाभाविकपणें फार कंटाळा असतो. धंद्यांत जाणाऱ्या

वेळाशिवाय जर त्यांना थोडीबहुत फुरसत सांपडत असली तर ते ती सोंगट्या, गंजिफा, किंवा बुद्धिबळें खेळण्यांत, पुनः पुनः तंबाखू चोळण्यांत किंवा विड्या फुंकण्यांत, वेडेवांकडे हेल ओढीत बसण्यांत किंवा एखाद्या वाद्यावर उगीच तुण तुण करण्यांत घालवितात. कित्येकांची मजल याच्यापुढेंही जाते. कोणी गाण्याचे शोकी बनतात, कोणी बाहेरख्याली निघतात, कोणाला बाटलीच्या अमलांत गुंग होऊन पडण्याचा व आपलें हसें करून घेण्याचा नाद लागतो. असल्या दुर्व्यसनांनीं आपल्या अब्रूची, पैशाची व शरीराची खराबी करून घेऊन शेवटीं अकालिक मृत्यूच्या जबड्यांत पडणारे व बायकापोरांस उघडीं पाडणारे विचारशून्य पढत मूर्ख प्रत्येक देशांत असतात. दुर्दैवानें तशांची संख्या या देशांत वाढत चालली आहे, ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट होय. या लोकांस असें कळत नाहीं कीं व्यसनापासून होणाऱ्या यत्किंचित् सुखासाठीं त्यांना आपलें अतोनात नुकसान करून घ्यावें लागतें. ज्यांना सुदैवानें लहानपणा-पासून वाचनाची गोडी लागलेली असते, व जे प्रपंचांत पडले तरी फुरसूत सांपडेल तेव्हां कांहीं तरी वाचीत असतात, अशांची स्थिति वरील व्यसनी लोकांच्या स्थितीहून फार निराळी असते. विषयी लोकांप्रमाणें यांनाही आपल्या विषयापासून सुखप्राप्ति होते. भेद इतकाच कीं यांचें सुख दुर्व्यस-न्यांच्या सुखाप्रमाणें अब्रूची, शरीराची, व पैशाची माती करणारें नसतें. चांगलीं चांगलीं पुस्तकें व वर्तमानपत्रें नित्य वाचीत असल्यानें ज्ञानाची एक-सारखी वृद्धि होत असते, व त्याचा व्यवहारांत उपयोग होत असतो. मनुष्याला पोटासाठीं जो एक धंदा करावयाचा असतो त्याच्याशिवाय इतर गोष्टींचें ज्ञान त्यानें संपादिलें असतां तें त्याला मुळींच उपयोगीं पडणार नाहीं कीं काय? जे कोणी असें समजत असतील ते मोठा प्रमाद करितात, असें म्हणण्यास हरकत नाहीं. नित्याच्या धंद्याशिवाय इतर गोष्टींचें ज्ञान संपाद-ण्यांत कोणतेंही नुकसान नाहीं; पण तसें न करण्यांत मात्र फार नुकसान आहे. प्रपंचांत प्रतिदिवशीं लहानमोठ्या शेंकडों अडचणी येतात; त्यांचा परिहार कसा करावा हें ठाऊक नसलें तर किती पंचाईत पडते! कुटुंबांत आलें कोणाला पडसें कीं चालला वैद्याचे किंवा डाक्तरांचे घरीं! पडली कांहीं भानगड कीं लागला वकिलाच्या घरीं खेटे घालायला! आलें कांहीं सार्वजनिक काम कीं गेला भांबावून! ज्याला पूर्ववयांत थोडेंबहुत शिक्षण मिळालें आहे त्याची अशी

दैन्यावस्था कां असावी ? जो कोणी उपयुक्त वाचनाची संवय नेहमीं सुरू ठेवील त्याला लहानसान अडचणींतून बाहेर पडण्याबद्दल कोणत्याही प्रकारचा खर्च पडणार नाहीं इतकेंच नाहीं तर अशा अडचणींतून पार कसें पडावें हें चांगलें माहीत असल्यामुळें त्याला त्यांची पर्वा वाटेनाशी होईल.

संसारांत वारंवार येणाऱ्या अडचणींतून पार पडण्यास वाचनापासून सहाय्य होतें, हा वाचनापासून होणारा अगदीं हलक्या प्रतीचा फायदा आहे. ज्यांना जिवंतपणीं आपणास हे मागल्या पिढीचे असें म्हणवून घ्यावयाचें नसेल त्यांनीं वाचनाची संवय नेहमीं जागृत ठेविली पाहिजे. जगांत प्रतिवर्षी नवीन कल्पना, नवीन शोध, नवीन युक्त्या निघून जुन्या कल्पना, जुने शोध, व जुन्या युक्त्या एका पाठीमागून एक मागें पडत आहेत. जे शाळेंत किंवा विद्यालयांत संपादिलेल्या ज्ञानासच चिकटून रहातात, व व्यवहारांत पडल्यावर वाचनाची संवय ठेवीत नाहींत, त्यांना आपल्या जुनेपणाबद्दल आपला उपहास करून घ्यावा लागतो. शिक्षक, वैद्य, कारागिरि, नोकर–यांपैकीं ज्यांनीं वाचनाची संवय ठेविलेली नसते, त्यांना त्यांच्या त्यांच्या धंद्यांत झालेल्या सुधारणा न कळल्यापासून होणारें नुकसान सोसावें लागतें इतकेंच नाहीं, तर ज्या तरुण लोकांचा आणि त्यांचा समागम होतो, त्यांत त्यांची थट्टा होऊं लागते. ठळक ठळक गोष्टींची चालू तारखेपर्यंत काय हालहवाल आहे हें माहीत नसणें म्हणजे एकोणिसाव्या शतकांत जन्मास येऊन आठराव्या शतकांतल्या मनुष्याप्रमाणें वागणें होय.

कदाचित् पूर्वीच्या युगांत वाचनाची येवढी प्रौढी नव्हती असें मानिलें तरी चालेल. पण आतां मात्र वाचनाशिवाय चालावयाचें नाहीं. पूर्वी राज्यसत्ता राजांच्या किंवा त्यांच्या मंत्र्यांच्या हातांत असे. राज्यपद वंशपरंपरेनें प्राप्त होत असे. कायदे करणें, परराष्ट्राशीं लढाई किंवा तह करणें, कोणताही प्रचंड खर्च करणें–वगैरे गोष्टींत पूर्वीचे अनियंत्रित राजे किंवा त्यांचे प्रधान लोकांचा सल्ला घेत नसत, व त्यांची इच्छा काय आहे, हें जाणण्याची पर्वा करीत नसत. पण आतां तें मन्वंतर अगदीं बदलत चाललें. राजांची सत्ता कमी होऊन लोकांची सत्ता वाढत चालली; कायदे करण्याचें काम लोकांवर किंवा त्यांनीं निवडलेल्या प्रतिनिधींवर पडूं लागलें; लढायांची व तहांची जबाबदारी लोकांवर पडूं लागली; कोणताही प्रचंड खर्च करावा किंवा न करावा, याचा निकाल त्यांच्या

तव्यतीवर अवलंबून राहूं लागला. अशा दिवसांत चहूंकडे वस्तुस्थिति कशी आहे हें त्यांना ठाऊक नसेल तर त्यांच्या हातून मोठमोठे प्रमाद होण्याचा संभव आहे. लोकांस राजसत्ता प्राप्त होण्यास ज्याप्रमाणें बऱ्याच अंशीं त्यांचें ज्ञान कारण झालें, त्याप्रमाणें त्यांच्याकडे नी रहाण्यास व तिच्यापासून त्यांना आपला अधिकाधिक फायदा करून घेतां येण्यास त्यांच्यांतील ज्ञानप्रसारच साधन होणार आहे. शेंकडा नव्याण्णव लोकांना अल्प शिक्षण मिळालें न मिळालें तों धंद्यांत पडावें लागतें. एकदां ते धंद्यांत पडले, आणि कांहीं वाचीतनासे झाले, तर त्यांच्या हातून आपापल्या वांट्याची राज्यप्रकरणीं कामगिरी नीट कशी बजावली जाणार ? इंग्लंडांतील न्हावी, परीट, तेली, तांबट यांच्या टेबलावरसुद्धां नित्याचीं एकदोन वर्तमानपत्रें व कपाटांत दहापांच पुस्तकें पडलेलीं असतात, म्हणून सांगतात. यावरून काय होतें कीं, तिकडील धंदेवालेसुद्धां राज्यप्रकरणीं चळवळी कशा चालल्या आहेत हें लक्ष लावून पहात असतात, व त्यासंबंधानें आपआपसांत वाद करून त्यांवर आपलीं मतें ठरवून ठेवितात. यामुळें जेव्हां पार्लमेंटांत कांहीं वादग्रस्त प्रश्न निघतो आणि प्रधानांत व प्रतिनिधींत विरोध उत्पन्न होऊन त्याविषयीं लोकांचें मत काय हें पहाण्याचें ठरतें, तेव्हां त्यांना भांबावल्यासारखें न होतां शांतपणें आपला अभिप्राय देतां येतो. ज्या लोकांना राजकीय सत्ता आपल्या हातांत रहावी, व राजाच्या, श्रीमंतांच्या, किंवा लढवय्यांच्या हातांत न जाऊन त्यांना आपणांवर जुलूम करतां येऊं नये, असें वाटत असेल त्यांनीं होईल तितक्या ज्ञानाचा संग्रह केला पाहिजे. हा संग्रह करण्याचें प्रधान साधन वाचन आहे.

केवळ व्यक्तीच्याच दृष्टीनें पाहिलें तर व्यवहार आणि राज्यप्रकरण यासंबंधानें मनुष्यास वाचनापासून जे लाभ होतात म्हणून वर सांगितलें, त्याहीपेक्षां आणखी एक विशेष महत्त्वाचा लाभ त्याला त्यापासून करून घेतां येतो. संसारांत मनुष्यावर प्रसंगोपात्त मोठमोठीं अरिष्टें गुदरतात. कोणाचा एकुलता एक कर्ता मुलगा आकस्मात् मरण पावतो; कोणाची रूपवती, सुशील व प्रेम करणारी बायको मरते; कोणाचे एकाएकी सारे पैसे बुडतात; कोणाला भयंकर अपघात होऊन आमरण व्यंगता येते; कोणाला एखादा महारोग जडतो; अशा प्रकारचें अरिष्ट कोसळलें, आणि मनाला त्याचा विसर पाडण्यास कांहीं नसलें म्हणजे मनुष्याला पराकाष्ठेचें दुःख होऊन कधीं कधीं तो वेडा देखील होतो. अशा

प्रसंगीं विपद्ग्रस्ताला जर वाचतां येत असले, व चांगल्या पुस्तकांची अनुकूलता असली, तर दुःखाच्या पहिल्या उत्कट लाटेचा लय झाल्यावर त्याला तीं पुस्तकें वाचण्यापासून पुष्कळ समाधान करून घेतां येईल. अशा वेळीं विशेषतः धर्म पुस्तकें आधार देण्यास फारच उपयोगीं पडतात. जड वस्तु नश्वर आहेत, आत्मा अविनाशी आहे, ज्यांचा मृत्युलोकांत एकाएकीं संबंध तुटला त्यांची भेट यापेक्षां चांगल्या जगांत पुनः होऊन चिरकाल तत्समागमसुख मिळेल, जन्मास आलेल्यांची मरण हें प्रकृतिच आहे, प्रत्येकाला आज नाहीं उद्यां मृण्मय शरीर ठेवावयाचेंच आहे, ज्यांना या जगांत विनाकारण विपत्ति भोगावी लागते त्यांना परमेश्वर स्वर्गांत सुख देतो; सर्व शक्तिमान्, सर्वज्ञ, न्यायी, व दयाळू परमेश्वराच्या इच्छामात्रेंकरून सर्व गोष्टी घडत असतात, त्याच्या सत्तेपुढें कोणाचा इलाज नाहीं. तो ठेवील त्या स्थितींत संतोषानें राहिलें पाहिजे. या व अशा प्रकारच्या धर्मांतर्गत अनेक विचारांनीं मनास धैर्य येऊन दुःखास उतार पडतो, व थोड्या दिवसांत मनुष्य उल्हासानें पुनः नित्य कृत्यांस लागतो. तात्पर्य, ज्याला एकदां चांगल्या वाचनाचा नाद लागला त्याच्या करमणुकीला सीमा नाहीं. ज्याला आपला काळ सोडून भूतकाळांत किंवा भविष्यकाळांत प्रवेश करावयाचा असेल, ज्याला पृथ्वीवर आजपर्यंत कोणत्याही देशांत झालेले मोठमोठे साधु, तत्त्ववेत्ते, कवि, व नाटककार यांचा समागम करून, ज्ञानामृताचें सेवन करावयाचें असेल, ज्याला निरनिराळ्या देशांत, निरनिराळ्या काळांत कोणकोणत्या प्रकारचे लोक होते, ते कशा प्रकारचे पेहराव करीत, त्यांची राज्यपद्धति कोणच्या प्रकारची असे, त्यांच्या धर्मकल्पना कशा होत्या, ते कोणते खेळ खेळत, ते न्याय कसा करीत, ते व्यापार कोणता व कसा चालवीत, त्यांच्यामध्यें धर्मक्रांति व राज्यक्रांति होण्यास काय कारणें झालीं, नंतर त्यांच्या स्थितींत कोणकोणते फेरफार झाले, ऐन संकटाचे प्रसंगीं मोठमोठे पुरुष कसे वागले, कोणाच्या बुद्धिसामर्थ्यानें जगावर केवढे उपकार झाले; अनीति, भित्रेपणा, यादवी इत्यादि दोषांनीं कोणतीं राष्ट्रें लयास गेलीं; उद्योग, न्याय, धर्मपरायणता, व एकी इत्यादि गुणांनीं कोणतीं राष्ट्रें उदयास आलीं–इत्यादि गोष्टी समजून घ्यावयाच्या असतील त्याला त्या समजण्यास वाचनाखेरीज दुसरें साधन नाहीं. तसेंच, वाचकास वर्तमानाचा विसर पाडून तो ज्या युगाचा किंवा देशाचा इतिहास वाचीत असेल त्या युगांत व त्या देशांतच आपण आहों कीं काय

असा भास त्याच्या वृत्तीवर क्षणभर उत्पन्न करून त्याला अनंत आनंद व ज्ञान देण्याचें सामर्थ्य वाचनाशिवाय दुसऱ्या कशाच्या अंगीं आहे? नित्य नित्य मोठमोठ्या पुरुषांचीं चरित्रें वाचण्यांत आल्यानें मनास तत्कालीन समाधान व ज्ञान होतें इतकेंच नाहीं, तर नकळत मनुष्याच्या स्वभावावर व वर्तनावरही तसल्या वाचनाचा परिणाम घडूं लागतो. ज्याप्रमाणें जगमान्य पुरुष वागले त्याप्रमाणें आपण वागावें, ते बोलले त्याप्रमाणें आपण बोलावें, व ते ज्या प्रकारच्या विचारांत गुंग होऊन रहात, त्या प्रकारच्या विचारांत आपणही गुंग होऊन रहावें असें वाटूं लागतें. मोठ्याचें अनुकरण करण्याची इच्छा एकवार झाली, व दिवसें-दिवस ती दृढ होत चालली, म्हणजे वर्तनावर तिचा परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं. एका लॅटिन कवीनें या ज्ञानसाधनाचा महिमा मोठ्या चातुर्यानें एका वाक्यांत वर्णिला आहे. तो म्हणतो कीं " वाचन मनुष्याचें वर्तन सुधारतें, व त्याला रानटीपणांत राहूं देत नाहीं. "

वर वाचनाचे प्रकार सांगतांना मनुष्य कधीं स्वतःसाठीं व कधीं दुसऱ्यासाठीं वाचतो, असें म्हटलें आहे. दुसऱ्यासाठीं स्वतः किंवा दुसऱ्यांनीं लिहिलेले लेख कसे वाचावे, या विषयाचें उद्घाटन या निबंधांत येऊं शकत नाहीं. तो विषय " वक्तृत्व " या सदराखालीं येतो.

ग्रं. वि. सं. ८९६
ता. १।८।३८
टा. गे.

आमच्या निकृष्ट स्थितीस कारण कोण ?

'आपलाच दाम खोटा आणि दुसऱ्यास बोल काय म्हणून!' ही जी म्हण आहे ती अक्षरशः खरी आहे. 'मला अमुक मनुष्यानें त्रास दिला, तो फार लुच्चा आहे;' 'अमक्याशीं माझें वैर आहे त्यास तोच कारण आहे;' अशा प्रकारचे उद्गार पुष्कळदां मनुष्याच्या तोंडांतून निघतात. आतां बारीक दृष्टीनें वरील प्रकारच्या गोष्टींचा विचार केला असतां सहज ध्यानांत येईल कीं, हें मनुष्याचें म्हणणें पुष्कळ अंशीं एकतर्फी असतें. कारण मनुष्यमात्राचा साधारण धर्मच आहे कीं, आपली चूक अगोदर आपल्या ध्यानांत येणें कठीण; तशांत अभिमान आणि अज्ञान यांचें पूर्ण प्राबल्य झालें म्हणजे तर मनुष्याच्या मनाचा पक्का ग्रह होऊन जातो कीं, आपण जें जें करतों तें अगदीं यथायोग्य, व आपणास लोक जो दोष देतात तो केवळ मिथ्या होय. प्रस्तुत लेखाच्या मथळ्यावर जे शब्द आहेत, तसल्या प्रकारचे विचार हल्लीं आपल्या लोकांत चोहोंकडे चालू आहेत. आम्हांस निकृष्ट दशा कां आली, तिचें निवारण होण्यास काय उपाय योजावे वगैरे प्रकारच्या गोष्टी बहुतकरून सर्व लोकांच्या मनांत घोळत आहेत. व एकंदरीनें हा प्रकार सांप्रतकाळीं तर अत्यंत इष्ट होय. वरील गोष्टींची जीं अनेक अंगेंउपांगें आहेत त्या सर्वांचा आज आम्ही विचार करीत नाहीं, तर फक्त प्रकृत निबंधाचे नांवाप्रमाणें एकाच गोष्टीचा विचार येथें करणें आहे.

आम्हांस आज हा विचार सुचण्यास कारण आमच्या बडोद्याच्या बातमीदाराच्या पत्रांत तेथें नुकाच गायकवाडसरकारच्या ४०० तोफांचा जो नाश झाला त्याविषयीं जो उल्लेख होता, तो होय. यासंबंधानें आम्हांस असें वाटत होतें कीं, एतद्देशीय राजेरजवाडे हे इंग्रजसरकारचे अंकित झाल्यापासून त्यांचे सैन्य व लढाऊ सामान वगैरे होईल तितकें कमी करण्याचा जो क्रम चालला आहे त्यांतलाच हा वरील प्रकार असावा. परंतु सदर्हू बातमीदाराचा मजकूर वाचून आमचा हा समज केवळ चुकीचा आहे अशी आमची खात्री झाली. ह्या तोफांचा नाश करण्यांत इंग्रजसरकारचें कोणत्याही प्रकारें अंग नसून या अप्रशस्त कृत्यास कारणीभूत तेथलें प्रधानमंडळ हेंच सर्व प्रकारें आहे. इतकेंच नव्हे, तर तेथचे गव्हर्नर जनरलचे एजंट मि. मेलव्हिल् यांनीं उलटी सर माधवराव

यांची हें कृत्य न होऊं देण्याविषयीं कानउघडणी केली होती असें म्हणतात ! हें ऐकून आमचे वाचक तोंडांत बोटच घालून राहतील यांत संशय नाहीं. आम्हांस तर या गोष्टीविषयीं परम आश्चर्य आणि खेद वाटतो. सर्व लोकांची जी आजपर्यंत समजूत असेल–निदान आमची तरी होती–कीं, सर माधवराव हे पोक्त बुद्धीचे, समदृष्टि आणि स्वदेशाहितचिंतक असे राजकारणी पुरुष आहेत, तीं ही गोष्ट ऐकून, समूळ नाहींशी होईल यांत तिळप्रायही संदेह नाहीं. असो; या कृत्यामुळें गायकवाडसरकारचें हल्लींच्या स्थितींत मोठेंसें नुकसान झालें नाहीं असें कोणास वाटेल; कां कीं, त्या सरकारास आतां कोठें लढाई वगैरे तर करणें नाहींच; तेव्हां ह्या तोफा होत्या आणि नव्हत्या सारख्याच. परंतु ही केवळ भ्रांति आहे. ह्या तोफांच्या नाशापासून त्या सरकारचें फारच नुकसान झालें आहे. सर्वांस ठाऊकच आहे कीं, गायकवाडांचें राज्य एके ठिकाणीं सलग नसून अनेक ठिकाणीं पसरलेलें आहे. त्यांत कित्येक ठिकाणचे लोक रानटी, दंगेखोर व लुटारू आहेत, आणि त्यांनीं पूर्वी अनेक वेळां दंगे व लुटी केल्या आहेत. त्या इतक्या कीं, एकदां तर इंग्रजसरकारासही त्या कामांत हात घालावा लागला; एक सुभाही ह्या सदोदित चालणाऱ्या दंग्यामुळें यांनीं आपले ताब्यांत घेण्याचा विचार केला होता. तेव्हां सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, या तोफांच्या अस्तित्वापासून त्या लोकांस चांगला धाक होता तो आतां अगदीं नाहींसा झालायेवढेंच नव्हे, तर अशी एक चमत्कारिक गोष्ट झाली कीं, ज्या लोकांच्या मनांत त्या तोफा सलत होत्या त्यांच्या समक्ष त्यांचे तुकडे तुकडे करून टाकिले !

वरील हकीकतीवरून आपणांस पुष्कळ बोध घेण्यासारख्या गोष्टी कळून येतात. नेहमीं लोकांची जी एकसारखी हाकाटी ऐकूं येते कीं, काय करावें आमचें राज्य गेलें, आम्ही पराधीन झालों, परकी लोक आम्हांस त्रास देतात, आमची सर्व संपत्ति परदेशांत चालली आहे, एवंच सर्व प्रकारें आम्हांस विपन्नदशा आली आहे ! पण या सर्व विपत्तींचा विचार केला तर त्या आपणांस ग्रासण्यास आपणच पुष्कळ अंशीं कारण आहों हें लक्ष्यांत आल्यावांचून राहणार नाहीं. आमच्यापैकींच कित्येक आपमतलबी आणि आपलपोटे लोकांनीं आपल्या पोटाची भर करण्याकरितां बंड फितूर केलें, म्हणूनच विशेषतः आम्हांस परवशता प्राप्त झाली नाहीं काय ? आपला देश भिकारी होण्याचें कारण तरी आमचेंच औदासीन्य आणि स्वदेशकल्याणाविषयीं अनास्था हींच एका प्रकारें नव्हत काय ? याचें एक ठळठळीत उदाहरण देशी कपडयाचें घ्या. परदेशांतून येणाऱ्या कापडावरील जकात सरकारनें माफ केली, यामुळें इकडील गिरणीवाल्यांचें नुकसान

होत आहे. तें न होण्यास इकडील लोकांनीं स्वदेशी कापड वापरण्याचा निश्चय केला तर लाखों रुपये तन्निमित्त परदेशांत जात आहेत ते बंद होणार नाहींत काय ? पण त्याविषयीं स्वदेशहितार्थ तनमनधन अर्पिणाऱ्या अशा कै. गणेश वासुदेव जोशांसारख्या पुरुषांनीं जंग जंग पछाडले, पण त्याचा कितपत उपयोग झाला ? त्याचप्रमाणें सरकारी कामगार साहेब वगैरे जे लोक असतात, त्यांपासून पुष्कळ वेळां विनाकारण लोकांस त्रास व नुकसान सोसावें लागतें; ह्याही गोष्टीस आमचेच लोक पुष्कळ प्रकारें कसें कारण होतात हें पुढील उदाहरणावरून लक्ष्यांत येईल. सन १८७२ सालीं धुऱ्याची नवी पेठ नदीस महापूर आल्यामुळें वाहून गेली, त्यावेळीं लोकांस घरें बांधण्यास म्युनिसिपालिटीनें थोडथोडे रुपये दिले, तेव्हां ज्याचें ज्या प्रमाणानें नुकसान झालें असेल त्याप्रमाणें त्यास थोडीफार मदत देण्याकरितां चौकशी चालली असतां कलेक्टरसाहेबांस त्यासंबंधीं माहिती देण्याकरितां तेथें एक बडे नेटिव कामगार होते. त्यांनीं साहेबांस म्हणावें, "खावंद, याचें घर पडायालाच झालें होतें. याचें कांहीं नुकसान झालें नाहीं." " हा आपलें घर मोडून नुकतेंच दुसरे ठिकाणीं बांधणार होता, याला कांहींएक देण्याचें कारण नाहीं." कां वरील शिफारस खाशी आहे कीं नाहीं ? आणि ती कशाकरितां ?—निवळ साहेबांची मर्जी संपादण्याकरितां ! मग 'आधींच उल्हास आणि त्यांत फाल्गुन मास ! ' जितका कमी खर्च होईल तेवढें साहेबांस इष्टच, व त्यांत प्रत्यक्ष नेटिवांची शिफारस; मग काय विचारावयाचें आहे ! तर मनुष्यानें आपल्या दुःखाकरितां दुसऱ्यास दोष देण्यापूर्वी अगोदरच आपलीं कर्में धड आहेत काय हें पहावें, आणि मग दुसऱ्यास दोष द्यावा. बडोद्याच्या तोफांचा नाश करण्यास इंग्रजसरकारनें हुकूम दिला होता असें दिसत नाहीं. तर मागें सांगितलेलें कृत्य कां घडलें असा सहजच प्रश्न निघतो; आणि त्याचें उत्तर हेंच कीं, केवळ 'मायबाप' सरकारास आवडण्याकरितांच हें कृत्य झालें असावें, आतां ही गोष्ट कदाचित् सरकारास मनांतून आवडेल, कारण या देशांतील लोकांस सोईसोईनें अगदीं हतवीर्य करण्याचा त्यांचा हेतुच आहे. पण बुद्ध्या आपणच आपल्या पायावर धोंडा पाडून घेणें म्हणजे मोठ्याच समंजसतेचा प्रकार समजला पाहिजे ! सर माधवराव यांच्या शहाणपणाविषयीं आम्हांस पुष्कळ आशा होती. ज्या संस्थानाचा जीर्णोद्धार करण्याकरितां यांस सरकारनें मुद्दाम इकडे आणिलें, तें काम एकीकडे राहून पुढें गायकवाडसरकारचे जेणेंकरून हात बांधले जातील अशीं कृत्यें या राजकार्यधुरंधर एतद्देशीय पुरुषानें बरींच केलीं आहेत. यांचा विचार आम्ही लौकरच करूं.

आम्हांस वाटलें होतें त्यापेक्षां हा लेख बराच लांबला, सबब आज येथेंच पुरें करितों. पुढें आणखी एकादे प्रसंगीं याबद्दल ज्यास्ती विचार करण्याचा आमचा मानस आहे.

[वर्ष १, अंक १६]

हिंदुस्थानापासून इंग्लंडास फायदे

अलीकडे इंग्लंडदेशांत परोपकारी लोकांचा एक वर्ग निघाला आहे, त्यांचें म्हणणें काय कीं, हिंदुस्थानापासून आम्हांला फार त्रास होतो; हिंदुस्थानचें राज्य चालविण्यासाठीं आम्हांला पदरमोड करावी लागते. हिंदुस्थानचें राज्य आमच्या ताब्यांत असल्यापासून आम्हांस नफा तर कांहीं होतच नाही; उलट एखादा दुष्काळ पडला, किंवा लढाई सुरू झाली म्हणजे इंग्लंडाहून हिंदुस्थानास पैसे पाठवावे लागतात. हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं व सुरक्षितपणासाठीं आमच्या शूर शिपायांना आपले प्राण खर्ची घालावे लागतात. जसा एखाद्याचा एखादा अवयव रोगानें सडून कुजला असला म्हणजे त्याच्या सर्व शरीराला वेदना होत असतात, त्याप्रमाणें बादशाही राणीच्या विस्तृत राज्यकायेचा हिंदुस्थान हा रुग्ण अवयव होय; या एकट्यामुळें सर्व राज्यशरीराला पीडा सोसावी लागते. यासाठीं कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, हा अवयव अगदीं समूळ छाटून टाकावा, म्हणजे इंग्लंड सुखी होईल. वर लिहिलें आहे यांत काडीची देखील अतिशयोक्ति नाहीं, कोणास संशय असल्यास आम्ही अस्सल इंग्रजी उतारेसुद्धां देऊं. आतां वरील सर्व म्हणणें दांभिकपणाचें आहे, हें सिद्ध करणें फारसें कठिण आहे असें नाहीं. परमेशकृपेनें भरतखंडाचें प्रभुत्व आपल्या परम न्यायी व दयाळू सरकाराकडे आल्यानें आमचे जे अनेक फायदे होत आहेत, ते निर्विवाद आहेत, व ते आम्ही संतोषानें कबूल करितों, व याकरितांच प्रजेचें पुत्रवत् पालन करणाऱ्या इंग्रज-सरकारच्या चिरकालत्वाविषयीं आम्ही इतकी काळजी करितों; तरी इंग्लंडला या प्रचंड हिंदुस्थान देशाचें राज्य अंगाखालीं घालण्यास सांपडल्यानें कांहींच फायदा होत नाहीं, ही गोष्ट आम्ही कधींही कबूल करणार नाहीं.

पहिल्या प्रथम व्यापाराच्या संबंधानें विचार करूं. इंग्रज प्रथम हिंदुस्थानांत आले ते व्यापारासाठीं. पुढें त्यांनीं व्यापारीपणा सोडून राजेपणा पत्करिला, तो तोटा सोसून कशाकरितां पत्करिला असता ? बरें पण राजेपणा पत्करिला म्हणून व्यापार कांहीं कमी झाला आहे कीं काय ! असें कसें होईल ! पूर्वी हिंदुस्थानांतील राज्यांशीं ने. ना. कंपनीला फार बेतानें वागावें लागत असे. व्यापाराच्या संबंधानें कोणताही तह वगैरे करावयाचा झाला तरी नेटिव राजांच्या लौकाप्रमाणें

व तबियतीनुसार होत असे. त्यावेळेस आतांप्रमाणें कोठें स्थिति होती! आतां राजसत्ता हातीं असल्यामुळें त्यांना तह वगैरे करायाला लावण्याची मुळींच पंचाईत पडत नाहीं. ठीकच आहे. ज्यांच्याकडे सार्वभौमत्वाचा अधिकार, त्यांना आपले इष्ट हेतु, राज्यसंबंधीं, धर्मसंबंधीं, व्यवहारसंबंधीं, किंवा व्यापारासंबंधीं तडीस नेण्यास येवढा देखील त्रास पडूं नये यांत कांहीं आश्चर्य नाहीं. अफू झाली, मीठ झालें, अशा प्रकारच्या उत्पन्नाच्या बाबतींत ज्यांच्याकडे सार्वभौमत्वाचा अधिकार, व ज्यांच्या शिरावर सगळ्या हिंदुस्थानाच्या बऱ्यावाइटाची जबाबदारी त्यांनीं बुद्‌बळांतील नामधारी राजांच्या हक्कांकडे फारसें लक्ष देणें जरूर आहे असें आम्हांस वाटत नाहीं. असें जर न केलें तर छत्तीस कोटींचा माल आणि सात कोटींची धातु, असा एकंदर त्रेचाळीस कोटींचा व्यापार हिंदुस्थानाशीं कसा चालू राहील! हिंदुस्थानाचें राज्य ताब्यांत असल्यामुळें सगळ्या आशिया खंडाच्या व्यापाराचें नाक हातांत सांपडलें जाऊन इंग्लंडचा जो फायदा होत आहे, त्यामुळें हिंदुस्थानाशीं असलेल्या व्यापारापासून होणारा फायदा कांहींच नाहीं. जर हिंदुस्थान देश इंग्लंडाच्या ताब्यांत नसतां, किंवा येथील राज्य फ्रेंच लोकांकडे असतें, तर अरबस्थान, इराण, ब्रह्मदेश, चीन, जपान, फिलिपीबेटें, यांशीं असलेल्या व्यापारांत युरोपांतील इतर राष्ट्रांपेक्षां प्रस्तुत इंग्रजांचें जें अधिक वर्चस्व आहे, तें तसेंच असतें कीं नाहीं, याचा मोठा संशय आहे. आशिया खंडाच्या मध्यभागीं हिंदुस्थानांत आपलें ठाणें देऊन आपल्या करामतीनें आणि पराक्रमानें इंग्रजांनीं पूर्व गोलार्ध व्यापून टाकला आहे. इंग्लंडाचा अमेरिकेशीं, आस्ट्रोलिआशीं, किंवा युरोपांतील देशांशीं व्यापार नाहीं असें नाहीं, पण आशियाखंडाशीं विशेष. कारण राजा नको नको म्हणत असतां विषाच्या पेट्या बळजोरीनें लादून घेणारे युरोपीय देश नव्हत! सुमारें एका शतकापूर्वी इंग्लंडानें व्यापाराच्या अशाच निमित्तानें जेव्हां चाऊम्याऊ लावण्यास आरंभ केला, तेव्हां युनायटेड स्टेटस् यांनीं कसा हात दाखविला, हें येथें सांगत बसण्याची आवश्यकता नाहीं. सारांश इतकें सांगणें बस आहे कीं, व्यापाराच्या संबंधानें हिंदुस्थानचें राज्य असल्यापासून इंग्रज लोकांचा कोणत्याही प्रकारचा तोटा होत नाहीं.

दुसरा विचार राष्ट्रीय आणि इतर कर्जाचा. इंग्लंडामध्यें विपुल पैसा आहे, व त्याबद्दल इंग्रज लोकांस जितकें व्याज पडावेसें वाटतें, तितकें पडत नाहीं; म्हणून ते आपलीं भांडवलें दुसऱ्या देशांस व्याजानें देतात. त्याप्रमाणें इंग्लंडांतील

व्यापाऱ्यांनीं व इंग्लंडच्या सरकारी ब्यांकेनें देखील हिंदुस्थानसरकारला पुष्कळ पैसे दिले आहेत. हिंदुस्थानसरकारला येथलें व इंग्लंडांतलें मिळून १३७८६८०४३० रु. राष्ट्रीय कर्ज आहे, याच्या व्याजाबद्दल आम्हांला प्रतिवर्षी ४९५४०२१० रु. द्यावे लागतात. आणि पांचपन्नास वर्षांचें व्याज एके ठिकाणीं केलें तर व्याजाची रक्कम मुद्दल भांडवलायेवढी होते, हें आमच्या समंजस वाचकांच्या ध्यानांत आल्याशिवाय राहणार नाहीं. हें येवढें अचाट कर्ज सरकारनें कशासाठीं काढलें, याचें दिग्दर्शन दुसऱ्या एका निबंधांत केलें आहे, सबब तें येथें सांगत नाहीं. असो; यावरून वाचकांच्या हें ध्यानांत येईल कीं, हिंदुस्थानदेश इंग्लंडाच्या ताब्यांत असल्यामुळें इंग्लंडांत जे पैसेवाले लोक आहेत, त्यांना हिंदुस्थानसरकारसारखें ऐपतदार कुळ कर्ज देण्यास सांपडतें, त्यामुळें मुद्दल बुडण्याची भीति न राहतां बिनबाकी व्याज प्रतिवर्षीं वेळच्यावेळीं पदरांत पडतें, हा व्यापारदृष्ट्या कांहीं हलका नफा नाहीं. पैसे शुद्ध व्याजानें लावण्याच्या संबंधानें हें झालें. व्यापार किंवा उद्योग करणाऱ्या इंग्रजी मंडळ्यांनाही अशाच प्रकारचा फायदा होतो. हिंदुस्थानांत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं आगगाडी हवी असली, किंवा तारायंत्र पाहिजे असलें, अथवा एखादे ठिकाणीं कोळसे किंवा दुसरे कांहीं खनिज पदार्थ आहेत असें समजण्यांत आलें, तर त्यांच्या खाणी उकरून धातु तयार करावयाच्या असल्या तर तीं कामें येथल्यायेथें भांडवल उभें करून करण्याची कोण मारामार पडते ! पण आमचे इंग्लंडचे व्यापारी अशा उद्योगाला भांडवल घेऊन सदा तयार ! ! आमच्या देशांत सध्यां चालूं असलेल्या आगगाडयांचे वगैरे कारखाने इंग्रजी भांडवलावरच जोपताहेत. तर इंग्लिश पैसेवाले हिंदुस्थान-सरकारला व्याजानें पैसे देतात इतकेंच नाहीं, तर इंग्लिश व्यापारी मोठमोठ्या कंपन्या (मंडळ्या) करून आमच्या लोकांच्या हातून स्वतंत्रपणें कधींही न चालणारे असे धाडसाचे व हिमतीचे कारखाने बेमालूम आमच्या देशांत चालवितांहेत, व त्यामुळें आमचें आणि आपलेंहि हित साधीत आहेत. याप्रमाणें हिंदुस्थानदेश इंग्रज लोकांच्या ताब्यांत असल्यानें त्यांना जे फायदे होतात त्यांपैकीं, तिघांची येथें थोडी फोड केली, ती लक्ष्यांत सहज रहावी म्हणून तिचा सारांश खालीं थोडक्यांत देतों.

१ हिंदुस्थानदेश इंग्रज लोकांच्या अमलांत असल्यामुळें त्यांना फायदेशीर असा व्यापार हिंदुस्थानशींच करतां येतो एवढेंच नाहीं, तर या देशाचा कबजा त्यांच्याकडे असल्यामुळें सर्व आशियाखंडावर त्यांची छाप बसून पूर्व गोलार्धाचा बहुतेक व्यापार त्यांनींच आटोपला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

२ भांडवल फार झाल्यामुळें ज्याला इंग्लंडांत अगदीं हलकें व्याज येतें, तें भांडवल हिंदुस्थानसरकारास कर्जाऊ देतां आल्यामुळें बुडण्याची भीति न राहून चांगलें व्याज नेमल्या वेळीं मिळतें.

३ इंग्लंडांतील व्यापार करणाऱ्या मंडळ्यांना येथें फायदेशीर कारखाने घालण्यास सांपडतें. व पुष्कळ बाबतींत अमुक एक नफा पाडून देण्याची जबाबदारी सरकारनें आपल्याच अंगावर घेतली असल्यामुळें मंडळ्यांचें काम बिनबूड आणि निर्धास्त चालतें.

हिंदुस्थानचें राज्य इंग्लंडच्या ताब्यांत असल्याकारणानें त्याला व्यापाराच्या संबंधानें कोणते कोणते ठळक फायदे होतात, हें दुसऱ्या एका निबंधांत दाखविलेंच आहे. यांत दुसऱ्या एका संबंधानें विचार करावयाचा. राज्यशास्त्राचीं जीं तत्त्वें आहेत, त्यांत एक मुख्य तत्त्व असें आहे कीं, एका देशानें दुसऱ्या देशाचा पराजय करून तेथील राज्य काबीज केलें असतां, काबीज केलेल्या देशांतील लोकांच्या कित्येक गुणांचा ऱ्हास होतो, व काबीज करणाऱ्या देशाच्या लोकांमध्यें कित्येक नवे गुण येतात, किंवा असलेलेच दृढ होतात. एका देशावर दुसऱ्या देशाचा अम्मल असल्यानें जो देश परक्या देशाच्या अमलाखालीं असतो, त्या देशास, स्वतंत्र असतां ज्या गुणांचा वारंवार उपयोग पडतो, त्या गुणांचा परतंत्र्यावस्थेंत मुळींच उपयोग पडत नाहीं. परकी राजाच्या हातांत शस्त्रें देऊन टाकल्यावर शस्त्रांचा उपयोग खुंटला. आजूबाजूंच्या राष्ट्रांशीं सङ्ग्रामसलत करण्याचें काम परकी राजा आणि त्याचे अनुयायी यांच्या हातांत गेल्यामुळें प्रतिनिधित्वाच्या गुणाचा लोप होतो. देशांतल्या देशांत कायदे वगैरे करून देण्याचें काम परकी लोकांनीं आपल्याच अंगावर घेतल्यामुळें प्रजेच्या सुखदुःखाचा विचार करून कायदे करण्याची बुद्धि नाहींशी होते. कोणतेंही धाडसाचें, कल्पनेचें किंवा चातुर्याचें काम करण्यास उत्तेजन नसल्यामुळें तशीं कामें अगोदर होत नाहींत, व झालींच तर राजाश्रय नसल्यामुळें निरंतर चालत नाहींत. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राच्या अमलांत निरंतर राहणें ही स्वभावविपरीत स्थिति आहे इतकेंच नाहीं, तर अशी स्थिति फार वेळ कोठें टिकल्याचें इतिहासांत पाहण्यांत नाहीं. आजपर्यंत राज्यांच्या ज्या उलथापालथी आणि घडामोडी झाल्या आहेत, त्यांवरून असा एक साधारण नियम दिसतो कीं, रानटी राष्ट्रानें सुधारलेल्या राष्ट्रावर स्वारी करून सुधारलेलें राष्ट्र पराभूत केलें, तर थोडयाच काळांत सुधारलेले लोकच

आपलें सामर्थ्य एकत्र करून रानटी लोकांस हुसकून लावितात, किंवा रानटी लोक सुधारलेल्या लोकांच्या सान्निध्यामुळें शहाणे होऊन त्यांच्यांत मिळून जातात, व सर्वांचेंच एक राष्ट्र बनतें. असा मिलाफ झाला असतां, सुधारलेल्या राष्ट्राच्या मूळच्या ज्या रीतिभाती किंवा आचार-विचार असतात तेच चालू राहातात. रानटी लोकांच्या मिश्रणानें थोडाबहुत फरक झाला तर होतो. फार सुधारलेल्या राष्ट्रानें एकाद्या रानटी लोकांवर स्वारी करून त्यांस जिंकिलें असतां त्याचेही परिणाम कांहीं निराळे होतात. सुधारलेल्या लोकांची संख्या फार असली म्हणजे रानटी लोकांचें त्यांच्यापुढें कांहीं चालत नाहीं. सुधारलेले लोक थोडे असल्यास एकादे वेळेस असें होतें कीं, ते सगळेच रानटी लोकांकडून गट्टम केले जातात, व त्यांचा त्यांच्यावर कांहींएक पगडा न बसतां ते रानटीच्या रानटीच राहतात, व बेताबातानें सुधारतात तेव्हां सुधारतात. पण सुधारलेल्या लोकांपुढें रानटी लोकांची संख्या जेव्हां कमी पडते, तेव्हां मात्र बिचारे रानटी लोक अजीबात नाहींसे होऊन त्यांचा मागमूस देखील रहात नाहीं असें कधीं कधीं होतें. यावरून इतकें दिसून येईल कीं, एका राष्ट्राचा अंमल अगदी भिन्न अशा दुसऱ्या राष्ट्रावर निरंतर चालणें ही गोष्ट मनुष्यमनोधर्मांविरुद्ध आहे. एका राष्ट्राचा दुसऱ्या राष्ट्रावरून अंमल निघण्यास जिंकिलेल्या राष्ट्राचें शहाणपण कारण होतें. "जरि उकिरड्यांत पडला, मळला, न हिरा तथापि सामान्य" त्याप्रमाणें बुद्धिमत्त्व कांहीं केल्यानें दबून रहावयाचें नाहीं, तें आपलें पुढें यावयाचेंच. आणि शहाणपणाच्या पाठिमागें सर्व गोष्टी येतात. लोक शहाणे होऊं लागले व त्यांना आपलें हिताहित कळूं लागलें म्हणजे त्यांना धैर्य येतें, कल्पना येते, संपत्ति मिळूं लागते व अखेरीस स्वातंत्र्यही मिळतें. सर्व मोठेपणाचा पाया शहाणपण हें होय. जोंपर्यंत जिंकिलेल्या लोकांस शहाणपण येऊं लागलें नाहीं; तोंपर्यंत त्यांच्या हातून कांहींएक, व्हावयाचें नाहीं. जिंकिलेल्या लोकांचे वर सांगितल्याप्रमाणें कल्पना, चातुर्य, शौर्यादि गुण नाहींसे होतात, इतकेंच नाहीं, तर त्यांच्या अंगीं उलट कांहीं दुर्गुण जडतात; यास त्यांचा उपाय नाहीं. साधारण व्यवहारांत अशी म्हण आहे कीं, "सेवा धर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः" एका मनुष्याला दुसऱ्या मनुष्याची सेवा करून त्याची मनधरणी करणें इतकें दुरापस्त आहे, व त्याबद्दल नाहीं नाहीं त्या लबाड्या कराव्या लागतात, तर एका सगळ्या राष्ट्रानें दुसऱ्या सगळ्या राष्ट्राची किंवा त्यांतील कांहीं लोकांची सेवा करणें किती कठीण असेल ? थोड्या-

साठीं खोटें बोलणें, वरिष्ठाची मर्जी संपादण्यासाठीं तोंडपुजेपणा करणें, हांजी हाजी करणें, कोणी थोडें चांपल्याबरोबर मान खालीं घालणें, सारांश भित्रेपणा, खोटेपणा, ओपाळपणा, खोटी स्तुति, वृथानिंदा, हेवा, खुनशीपणा, चिरडखोरपणा, वगैरे गुण जिंकलेल्या लोकांचे अंगीं तेव्हांच जडतात. आणि हाच परिणाम इंग्रज लोकांच्या राज्यामुळें आमच्या प्रकृतींत झाला आहे, हें कोणीही कबूल करील. याच्या उलट इंग्लंडची स्थिति झाली आहे. हिंदुस्थाना येवढें अफाट राज्य पूर्वी दुसऱ्या कोणच्याच राष्ट्राच्या ताब्यांत आलें नव्हतें. इंग्लंडचें हिंदुस्थानावरचें राज्य इतिहासदृष्ट्या अगदीं अद्वितीय आहे. पूर्वी ग्रीक आणि रोमन लोकांनीं, व त्यांच्या पाठीमागून जर्मन आणि फ्रेंच लोकांनीं मोठमोठीं राज्यें कमाविलीं; परंतु हिंदुस्थान इंग्रज लोकांच्या हातांत ज्या रीतीनें आलें आहे, व ते या विस्तीर्ण मुलुखाचें राज्य ज्या तऱ्हेनें चालविताहेत, अशा प्रकारचा राज्याचा विलक्षण ग्रह, किंवा अशा प्रकारची राजशैली, पूर्वी कोणत्याही राष्ट्रानें प्रदर्शित केली नाहीं. येवढें राज्य ताब्यांत असल्यानें इंग्रज लोकांच्या प्रकृतीवर जे परिणाम घडत आहेत, व त्यांना युरोपिय इतर राष्ट्रांमध्यें जें वजन आलें आहे, याचें खरोखर मान साधारण बुद्धीच्या मनुष्याच्यानें होणार नाहीं. दोन तीन कोटी लोकांकडे अनेक धर्मांच्या, अनेक वर्णांच्या, अनेक चालींच्या, अनेक भाषा बोलणाऱ्या, दूर अंतरावर असणाऱ्या, पंचवीस कोटी लोकांचें राज्य असल्यानें, त्या तीन कोटींपैकीं प्रत्येकास केवढा अभिमान, व केवढी थोरवी वाटत असेल ? यःकश्चित् मनुष्याला दोन चार चाकर माणसें पगार देऊन पदरीं ठेवण्याचें सामर्थ्य आलें तर केवढी प्रतिष्ठा वाटते ! मग पंचवीस कोटी प्रजेच्या वित्तावर व जीवित्वावर ज्यांस हरएक प्रकारचा हक्क आला आहे, त्या तीन कोटी लोकांच्या मनाची काय स्थिति सांगावी ? आपल्या पराक्रमाचें, कर्तृत्वाचें, शहाणपणाचें, शौर्याचें त्यांस केवढें कौतुक वाटत असेल ? हिंदुस्थान हातून कधींही सुटूं द्यावयाचें नाहीं, असें बहुतेक इंग्रजांस वाटत नसेल काय ? व हा विचार मनांत आल्याबरोबर त्यांचें रक्त तापूं लागत नसेल काय ?

एकदां लार्ड बिकान्स फील्ड याणें असें म्हणून दाखविल्याचें आम्हांस स्मरतें कीं, प्रसंग पडल्यास आम्ही ग्रेटब्रिटन सोडूं, पण हिंदुस्थान सोडणार नाही ! ! याला म्हणावा अभिमान. येवढा अभिमान इंग्रज लोकांच्या अंगीं येण्यास कारण हिंदुस्थानचें राज्य त्यांच्याकडे असल्यानें त्यांचें त्यापासून अगणित हित होत

आहे, हेंच नव्हें काय ? तसेंच येवढें अफाट राज्य चालविण्यास साधारण बुद्धि असून चालायाचें नाहीं. येवढ्यावरून हिंदुस्थानचें राज्य, इंग्रजलोकांच्या बुद्धीची वृद्धि होण्याला व तिच्या ठायीं कल्पशक्ति आणि तैक्ष्ण्य हे गुण येण्याला किती उपयोगीं पडत असेल बरें ! येवढ्या राज्याचें बाह्य आणि अन्तर शत्रूपासून संरक्षण करणें अंगावर असल्यानें त्यांच्या शौर्यगुणाला केवढें उत्तेजन मिळत असेल ! युरोपांतील एकाद्या देशाशीं तुंबळ युद्ध सुरू झाल्यास प्रसंगीं हिंदुस्थानचा सगळा खजिना, हिंदुस्थानांतले, व मांडलिक राजांचे, सारे शिपाई आणि घोडेस्वार, हीं आपलींच आहेत अशी खात्री असल्यानें इंग्रजलोकांस रात्रंदिवस केवढें समाधान वाटत असेल ! किंबहुना बसलों तर अशा लाखों गोष्टी दाखवितां येतील.

[वर्ष १ अंक २५।२६]

आम्ही आमच्या दारिद्र्यांतून कशानें सुटूं ?

पूर्वीं पूर्वीं युरोपांतले पाद्री लोक इकडे प्रवास करून तिकडे परत गेले म्हणजे अशा गप्पा ताशीत की, अहो, हिंदुस्थान म्हणजे काय केवळ सुवर्णभूमि; कांचनकण तेथील रस्त्यावरील धुळींत सांपडतात. तेथील घरांच्या भिंतींत आणि दरांसमोरील ओट्यांत हिरेमाणकें बसविलेलीं असतात; त्यांचें अन्न चंदनी लांकडांवर पचतें, आणि त्यांच्या अंगाला रेशमाखेरीज दुसरा कपडा लागत नाहीं. हें सत्ययुग कधीं झालें असेल कोण जाणें; निदान आतां त्याच्या अगदीं उलट स्थिति आहे, हें कोणास पढवायाला पाहिजे असें नाहीं. हिंदुस्थानच्या भरभराटीबद्दल कोणी केवढ्याही बाडा ठोकल्या, किंवा सव्वा सव्वा हात व्याख्यानें झोडलीं, तरी बटाटे खाऊन उपजीविका करणाऱ्या ऐरिश लोकांपेक्षां देखील आम्ही शतपट भिकारी आहों, असें आम्हीच काय, पण आमच्या राज्यकर्त्यांपैकी जे जे निष्पक्षपाती आहेत, ते ते ही गोष्ट प्रांजलपणें कबूल करितात. परवांच (१८८२) मद्रासचे गव्हरनर मि. ग्रांटडफ यांनीं एके प्रसंगीं असें म्हणून दाखविलें आहे कीं, हिंदुस्थानच्या लोकांपैकीं एकपंचमांश लोक अन्नावांचून मृत्युपंथास लागलेले आहेत. इकडून तिकडे गेलेल्या मि. डिगबी नांवाच्या एका सदय व आमच्या देशाची कळकळ बाळगणाऱ्या सद्गृहस्थानें " इंग्लिश लोकांच्या विचारार्ह हिंदुस्थानसंबंधीं प्रश्न " म्हणून एक छोटें पुस्तक छापून प्रसिद्ध केलें आहे, त्यांत हिंदु लोकांच्या दरिद्रावस्थेची अशी खाशी तसबीर काढिली आहे कीं, ती पाहून एखाद्या पाषाणाला सुद्धां द्रव आल्यावांचून राहणार नाहीं. त्या पुस्तकांत एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, " नेटिव राजे प्रजेला चाबकाखालीं झोडीत, पण आम्हीं (इंग्रजबहादरांनीं) त्यांच्या अंगाला विंचवाच्या नांग्या लाविल्या आहेत. " अशी आमची दैन्यावस्था कशानें झाली, व तीतून मुक्त होण्यास कांहीं तरणोपाय आहे कीं नाहीं याचा विचार आमचा आम्हींच न केल्यास आमची उत्तरोत्तर काय दशा होईल हें कळत नाहीं. नेटिव राजांच्या जुलमाचा, अन्यायाचा, व क्रूरपणाचा अंमल जाऊन दयावंत सुधारलेल्या इंग्रज सरकारची जिकडे तिकडे स्थापना झाली, व आगगाडया, तारायंत्रें वगैरे सुधार-

णेचीं बाह्य चिन्हें सर्व देशभर झळकूं लागलीं, न्यायाचीं कोडतें, लष्करी फौजा, पोलिसांच्या पार्ट्या तमाम जेथें तेथें लागून गेल्या, असें असतां आमच्या दारिद्र्याची रड कशासाठीं ? प्रतिवर्षीं इतकी संपत्ति उत्पन्न होते ती जाते कोणीकडे ? आमचें उपकारी सरकार तर येथल्या येथें राखून तिची समृद्धि करण्यासाठीं आमच्यावर राज्य करीत आहे; तर मग आम्ही दरिद्री कसे ? ' कसे ' हें सिद्ध करायाला नको, कारण तसे ' आहां ' याचा प्रत्यक्ष अनुभव आहे. तसे कशानें झालां याचा शोध लावून त्याच्या प्रतीकारार्थ काय उपाय करावा याचा विचार करून तो अंमलांत आणण्याविषयीं खटपट केली पाहिजे. कोणत्याही देशाला दारिद्र्य येणें म्हणजे त्यांतील संपत्ति नाहींशी होऊन त्यांतील लोकांस खाण्यापिण्याची आणि वस्त्रपात्राची मारामारी पडणें. या मारामारीला तीन कारणें असतात. एक तर देशांतले लोक सुस्त, निरुद्योगी व अज्ञान असल्यामुळें त्यांच्याकडून मुळीच, किंवा व्हावी तितकी संपत्ति उत्पन्न होत नाहीं. दुसरें कदाचित् ते ती उत्पन्न करीत असतील; पण ती कोणी तरी काढून नेत असेल. तिसरें ते जितकी उत्पन्न करतात, तिच्यापेक्षां तिचा व्यय करणारे अधिक निपजत असतील. यांपैकीं एक किंवा दोन, किंवा तिन्हीं कारणें ज्या ठिकाणीं आपला प्रभाव गाजवीत असतील त्या ठिकाणीं दारिद्र्य कसें ठेवलेलें. आमच्या भाग्यशाली भरतखंडांत तिन्हीं कारणें पूर्ण वास करीत आहेत, यामुळें दारिद्र्य येथें कसें सार्वभौम राज्य करीत आहे ! आम्हांकडून व्हावें तितकें उत्पन्न होत नाहीं, झालेल्याचा बराच भाग बाहेर जातो, आणि प्रतिवर्षीं उत्पन्न करणाऱ्यांच्या संख्येपेक्षां तें मटकावणाऱ्यांची संख्या झपाट्यानें वाढत चालली आहे, हें स्वानुभवावरून जो विचार करील त्यास, व तसें ज्याच्यानें होत नाहीं, तो दादाभाईसारख्यांनीं कित्येक वर्षें परिश्रम करून मिळविलेली माहिती वाचण्याची तसदी घेईल तर त्याला त्या रीतीनें, तेव्हांच लक्षांत येण्याजोगें आहे. आज पहिल्या कारणाचा थोडा खुलासेवार विचार करावयाचा आहे; बाकीचीं कारणें मागाहून घेऊं. आमच्या हातून व्हावी तितकी संपत्ति उत्पन्न होत नाहीं. संपत्ति म्हणजे ज्यास त्याच्या उपयोगीपणामुळें किंमत येते तो वस्तुसमुच्चय. या व्याख्येप्रमाणें स्वच्छ हवा जीवित्वास अत्युपयोगी खरी, पण ती ज्या ठिकाणीं मुभा मिळते त्या ठिकाणीं ती संपत्तीच्या वर्गांखालीं पडत नाहीं. बंडावरच्या हवेला किंमत नाहीं, पण घाटींत बसवून पाण्यांत काम करण्यासाठीं सोडलेल्या मनुष्यास जी हवा दिली जात असते,

तिच्याबद्दल बरीच किंमत द्यावी लागते. येवढ्या पाल्हाळानें 'संपत्ति' शब्दाचें खरें स्वरूप आमच्या वाचकांच्या ध्यानांत येईल. पुढें ही गोष्ट ध्यानांत आणावयाची कीं सर्व संपत्तीची आदिजननी भूमि होय. जगांत ज्याला ज्याला म्हणून किंमत आहे त्याची त्याची उत्पत्ति जमिनीपासून. वस्त्र घ्या, भांडें घ्या, दागिना घ्या, पाहिजे तर तुमचीं शरीरें घ्या, सर्वांचे मूळ घटकावयव जमिनींत असलेल्या द्रव्यांनीं झालेले असतात. जमिनींतून काढलेल्या ओबडधोबड द्रव्यावर मनुष्य आपल्या कौशल्याचा ठसा देऊं लागला कीं, लागली त्याची किंमत चढायाला. उदाहरणार्थ कापूस घ्या; शेतांतून घरीं येऊन त्याचे गठ्ठे बनले कीं त्याची किंमत फिरली. गठ्ठेपणा कां फुकट येतो ? हेच गठ्ठे चिपळुणास किंवा मुंबईस दाखल झाले कीं, गडीमजुरी व गाडभिाडें बसलेंच त्यांच्या उरावर. मुंबईपर्यंत उगाच बरें येतील ? मुरारजीच्या गिरणींत प्रवेश होऊन याच गठ्ठ्यांना तन्त्वाकृति आली कीं किंमत निराळी; तेंच सूत मागावर पडून त्याचें वस्त्र बनलें कीं झालें निराळ्या मोलाचें याप्रमाणें आमच्या तुक्या पाटलाच्या शेतांतील शेरभर कापूस शहरांतील मोठमोठ्या कारखान्यांत निरनिराळीं रूपांतरें घेऊन सरतेशेवटीं मोठा किंमतवान होऊन बसतो ! कधी कधीं त्याला त्याच्या मूळ किमतीपेक्षां शंभरपट अधिक किंमत येते ! ! साधारणतः जमिनींतून काढलेल्या जड द्रव्याची किंमत फार थोडी असते; त्यावर कौशल्यबोवा आपलें अधिष्ठान जों जों अधिक करतात तों तों त्याची किंमत जारी होत जाते. रानांत तोडून टाकलेल्या शिश्वीच्या ओंढ्याची किंमत कोणीकडे; व त्याच ओंढ्याला तासून तासून त्यावर नकशी चढविलेल्या सुरूच्या खांबाची किंमत कोणीकडे ! याचप्रमाणें सर्व प्रकारच्या धातूंची स्थिति होय. सारांश, मूळ द्रव्यास थोडी बहुत किंमत असून, व कित्येक बाबतींत मुळींच नसून देखील, जसजशी त्याजवर मनुष्याच्या कौशल्याची झांक पडत जाते, तसतशी त्याची किंमत वाढते हें सिद्ध झालें. तेव्हां अर्थात् ज्या देशांत मूळद्रव्यें विपुल असून त्यांवर कौशल्याचे शिक्के मारण्याचें कामही झपाट्यानें चालत असेल त्या देशांत विशेष संपत्ति असणार हेंही लक्षांत येण्याजोगें आहे. इंग्लंड देशांतलीं विपुल द्रव्यें म्हणाल तर लोखंड आणि कोळसे ! पण कलाकौशल्याच्या जोरावर तो देश आज बहुतेकांस संपत्तींत मागें हटवीत आहे. आणि आम्ही ! अं ! ! सर्व द्रव्यें भरतखण्डांत विपुल असून अखेरीस ठणठणपाळ ते ठणठणपाळ ! ! इंग्लंडाचा ज्या कलाकौशल्यानें येवढा अभ्युदय झाला, त्याच्याच अभावामुळें ही

आमची भिकार स्थिति. केवळ धान्यपिकवू आणि रानतोडू कोणतेंही राष्ट्र संपत्तिवान् असूं शकणार नाहीं. खेडयाच्या नांगऱ्याच्या आणि शहरच्या घडयाळवाल्याच्या स्थितींत जें अंतर असतें, तेंच अंतर अशा प्रकारच्या राष्ट्रांत आणि कलाकौशल्याचीं कामें करणाऱ्या राष्ट्रांत सतत राहील. करितां ज्या देशाला भिकारपणांतून आपला पाय सोडवायाचा असेल त्यानें मूळद्रव्यें पुष्कळ उत्पन्न केलीं पाहिजेत इतकेंच नाहीं, तर कलाकौशल्याचीही वृद्धि केली पाहिजे. मूळद्रव्यांची उत्पत्ति अधिक होण्यास खाणींचा शोध आणि शेतकींची सुधारणा हे उपाय केले पाहिजेत. पण आमच्या येथें उत्पन्न होत आहेत येवढयाच द्रव्यांवर आम्हीं चतुराई केली तर इतके अन्नाला महाग होणार नाहीं. "असं कां ! सगळं खरं ! " " आम्हांला शिकवील कोण ? " अशा विवंचनेंत आपण नेहमीं राहिलों तर मग थोडयाच वर्षांत जिकडे तिकडे आनंदीआनंद होईल ! यासाठीं या भरतभूमींत जे जन्मास आले आहेत, व ज्यांचें तिच्यावर उपजीवन चाललें आहे, त्यांनीं पुण्याच्या सार्वजनिक सभेसारख्या विचारी मंडळीनें कलाकौशल्याच्या प्रसारासाठीं विचार करून शोधून काढलेल्या उपायास अमलांत आणण्यासाठीं होईल तितकी मदत करावी; हें योग्य आहे. या कामासाठीं इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया, अमेरिका वगैरे देशांत आपले लोक पाठवून तिकडून यांत्रिक कलेंत निष्णात करून आणावेत अशी या सभेची सूचना आहे, तिचा विशेष विचार पुढल्या निबंधांत करूं.

मूळ द्रव्यापेक्षां कलाकौशल्यानें त्याच्या अंगीं आणिलेल्या उपयोगीपणामुळें व मनोहारिपणामुळें त्याला अधिक किंमत येते, हें मागल्या निबंधांत सिद्ध करून दाखविलें आहे. आपण कापूस पांघरीत नाहीं, किंवा झाडेंच्या झाडें भिंतींत घसवीत नाहीं. मूळ द्रव्य मनुष्याच्या उपयोगास लागण्यापूर्वी त्याला थोडा बहुत कौशल्याचा हात लागलाच पाहिजे. आमच्याकडे कापूस पिकतो; पण आमचे अंगीं कलाकौशल्य नसल्याकारणानें त्याच्यापासून व्हावा तसा आमचा फायदा होत नाहीं. त्याच कापसावर कलाकौशल्याच्या सामर्थ्यानें इंग्लंडदेश प्रतिवर्षी केवढी कमाई करतो ? याचप्रमाणें हरएक बाबतींत आमची नादान स्थिति आहे. आम्हीं खंडीच्या खंडी मूलद्रव्यें उत्पन्न करावीं, दुसऱ्या राष्ट्रांनीं जहाजें भरभरून न्यावीं, आणि त्यांवर कुशलतेची करामत करून तीं पुनः आम्हांकडे विकण्यास आणावीं, व हवेतसे पैसे मिळवावे, ही केवढी दुःखाची गोष्ट होय !

आमच्या देशांतला कापूस बाहेर जाऊन इंग्रजी कोष्ट्यांची दिवाळी व्हावी, आणि आमच्या कोष्ट्यांनीं टांचा घांशीत उपाशी मरावें, हें आम्हांस लाजिरवाणें नाहीं काय ? ज्या कोणाला आम्हांमध्यें कलाकौशल्याचा अभाव किती झाला आहे, याची खरी कल्पना येण्याची इच्छा असेल, त्यानें एकाद्या बोहऱ्याच्या किंवा कापडवाल्याच्या दुकानांत विक्री चालली असते तिकडे घटकाभर पहात राहावें; म्हणजे तेवढ्या थोड्या अवकाशांत विकलेल्या जिनसांपैकीं हिंदुस्थानांत किती केलेल्या असतात, व बाहेर देशांतून किती आलेल्या असतात, हें समजणार आहे. बाहेर देशांत यांत्रिक कला जबरदस्तपणें फैलावल्यामुळें तिच्यापुढें आमचें हातकाम रद्द पडलें; कारण यांत्रिक कामाची सफाई आणि जलदी हातकामास कोठून येणार ? मनुष्य बाजारांत गेला म्हणजे त्याचें सर्व लक्ष सवंगपणावर असतें. हा घरचा माल, हा परकी देशचा माल; घरचा माल थोडी अधिक किंमत देऊन घेतला तरी पैसा देशांतल्या देशांत राहून घरच्या मजुरदारांना मजुरी मिळते, बाहेरचा सुबक व सवंग असला तरी तितके पैसे बाहेर देशांत जाऊन घरची मजूरमंडळी उपाशी मरते, वगैरे गोष्टी बाजारांत जाऊन खरेदी करणा-राला सुचत नाहींत. असले बारीक विचार आधीं पुष्कळांस ठाऊक नसतात, शिवाय 'तुरुतदान महापुण्य' अशी पैशासंबंधानें बहुतेकांची स्थिति असते. आज जितके पैसे कमी खर्च करावे लागतील तितकें बरें ! पदराला झीज लावून घेऊन देशकल्याणाचा विचार करणारे विरळा ! आतां साधारण लोक अशा तऱ्हेनें वागतात हेंच ठीक आहे. कारण एक तर ते पराकाष्ठेचे गरीब असतात; यासाठीं जितका कमी पैसा खर्च करावा लागेल तितका करावयाचा असा त्यांचा स्वाभाविक निश्चय झालेला असतो. दुसरें, अर्थशास्त्राच्या तत्त्वांची त्यांना माहिती नसते. तिसरें, दुसऱ्या देशांतून आलेला माल सवंग मिळत असतां आपल्या देशांतला म्हणून महाग माल विकत घेत बसणें, हें देशाचें खरें हित करणें नव्हे. कोणत्याही देशांत केवळ लोकांकडूनच परका माल न घेण्याबद्दल व घरचा माल घेण्याबद्दल कट होऊन एकसारखा तो कित्येक वर्षें टिकल्याचें आमच्या ऐकण्यांत नाहीं, व असें कधीं काळीं होईल, असा संभव आम्हांस दिसत नाहीं. कित्येकदां असें होतें कीं, सरकारच्याच मनांत आल्यामुळें बाहेर देशच्या मालास आंत येण्याची अजीबात बंदी होते; व ही दहा पांच वर्षें राहिली म्हणजे घरच्या मालास उत्तेजन येऊन घरचा कामधंदा पुढें सरसावतो,

आणि मग ती बंदी काढून घेतली तरी तेवढ्या कालांत दुसऱ्या देशाशीं बरोबरी करण्यास घरचे कसबी लोक तयार होतात. पण जोंपर्यंत इंग्रज लोक आमच्यावर राज्य करीताहेत, तोंपर्यंत अशा प्रकारें बाहेरच्या मालास आंत येण्याची बंदी होण्याची वार्ता कशाला पाहिजे ? असें केलें तर शेंकडों इंग्लिश व्यापाऱ्यांची काय अवस्था होईल ? व्यापारांत शत्रूंला हटविण्याचा खरा उपाय म्हटला म्हणजे माल अशा तऱ्हेनें उत्पन्न करावयाचा कीं, तो शत्रूंपेक्षां सवंग दरानें विकतां यावा. असें होण्यास जेथें मूलद्रव्यें उत्पन्न होतात, तेथल्या तेथें त्यांना पुढचीं रूपांतरें होऊन त्यांच्या उपयोगाच्या चिजा बनल्या पाहिजेत. आपल्या देशांतील चटशारे व्यापारी बाहेरच्या देशांनीं, मुख्यत्वेंकरून इंग्लंडानें, तयार केलेल्या जिनसा विकणारे दुकानदार आहेत; वास्तविक पाहतां 'व्यापारी' ही संज्ञा त्यांना शोभत देखील नाहीं. इंग्लंडचा माल येथें विकावा, त्याचे पैसे त्यांस पाठवून द्यावे, व विक्रीच्या श्रमाबद्दल दोन पैसे पोटाला घ्यावे, अशी आमच्या व्यापाऱ्यांची खरी स्थिति आहे. साऱ्या देशाच्या देशांतील व्यापारी लोकांनीं परक्या मालाचा विक्रय करणारे निवळ दुकानदार बनावें, ही केवढी शोचनीय गोष्ट होय ! ! असा प्रकार आमच्या देशांत आणखी कांहीं वर्षें चालला तर येथील माणसें एकमेकाला खाऊं लागतील यांत काडीचा संशय नाहीं. यासाठीं हा शुद्ध दुकानदारपणा सोडून येथल्या येथें माल उत्पन्न करण्याकडे आमचें लक्ष लागल्यास कांहीं धडगत होण्याचा संभव आहे. व याच हेतूनें येथील सार्वजनिक सभेनें एका चांगल्या उपायाची योजना केली आहे ती येणेंप्रमाणें:—

१ जात किंवा धर्म यांची अट न सांगतां प्रतिवर्षीं दहा तरुण नेटिव विद्यार्थ्यांना इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया, आणि अमेरिका या देशांस पाठवावें. पाठविणारांच्या विचाराप्रमाणें त्यांनीं तेथें गेल्यावर तीन वर्षेंपर्यंत तेथल्या भाषेचा अभ्यास करून ग्रंथावलोकन करावें, व निरनिराळ्या कलांची आणि कारखान्यांची माहिती करून घ्यावी.

२ असा अजमास आहे कीं, या कामासाठीं दरवर्षीं प्रत्येक विद्यार्थ्यांच्या पाठीमागें तीन हजार रुपये पाहिजेत. येवढ्यांत जाण्याचा खर्च, वाटखर्च, भोजनखर्च आणि शिक्षणखर्च हे सर्व भागतील असा सुमार दिसतो.

३ अशी उमेद आहे कीं, बडोदें, ग्वालेर, इंदूर, हैद्राबाद, म्हैसूर, त्रावणकोर, नेपाल, काश्मीर, जेपूर आणि पतिआला वगैरे पहिल्या प्रतीचीं नेटिव संस्थानें

प्रतिवर्षी पांच सहा हजार रुपये खर्च करून अशा प्रकारचे एक किंवा दोन विद्यार्थी इंग्लंडांत धाडतील, व हा क्रम निदान पंधरा वर्षें चालवितील, तर हीं व्यवस्था कोठपर्यंत निभते, हें चांगलें कळून येईल. पंधरा वर्षांच्या अंतीं हर-एक व्यापारांत आणि धंद्यांत निष्णात झालेले, व संस्थानसंबंधीं पाहिजे त्या खात्यांत काम करण्यास योग्य असें दीडशें जवान बांड सुमारें पांच लक्ष रुपयांच्या खर्चानें देशांत तयार होऊन येतील. या रीतीनें एकवार केलेला खर्च आपल्या आपण भरून निघेल, व पुढल्या विद्यार्थ्यांच्या उपयोगास लावितां येईल; निदान या तऱ्हेनें फायदा होतो, असें कळून आलें म्हणजे लोक आपण होऊन असे विद्यार्थी पाठवूं लागतील.

४ ज्या अर्थी या कृत्यास सर्वच राजे लोक आश्रय देतील अशी सभेच्या व्यवस्थापक मंडळीची खात्री नाहीं, त्या अर्थी कसें तरी करून दरवर्षी दहा तरुण विद्यार्थ्यांची रवानगी करतां यावी, यासाठीं मुंबईचे शेटसावकार व बंगाल्याचे जमीनदार या देशकल्याणाच्या कामाला मनोभावें द्रव्याची मदत करतील अशी आशा आहे.

५ धंदा शिकत असतां विद्यार्थ्यांस पुरविलेला पैसा अगाऊ उसनवार असा समजावयाचा. विद्यार्थी परत येऊन त्यांचे हातपाय कोठें बरेचसे चालूं लागले म्हणजे अगदीं हलक्या व्याजासकट हप्तेबंदीनें तो परत द्यावयाचा. असें केल्यानें प्रत्येक वर्षी थोडी थोडी रक्कम परत येऊन पंधरा वर्षांच्या अखेरीस बहुतेक मूळचें भांडवल उभें राहील, व यापुढें मदत करणाऱ्या संस्थानांस किंवा शेटसावकारांस त्रास देण्याची जरूरी पडणार नाहीं.

६ ज्या त्या संस्थानानें आपापल्या आवडीप्रमाणें आपले विद्यार्थी निवडून काढावे; व आपणास योग्य वाटेल त्या देशांत आपल्या संस्थानास जरूर असेल तो धंदा शिकण्यास त्यांस पाठवावें. विद्यार्थ्यांनींही हा करार कबूल केला पाहिजे.

७ प्रत्येक विद्यार्थ्यास परत आल्यानंतर ज्या संस्थानानें किंवा व्यक्तीनें त्याचा खर्च चालविला असेल; त्याच्या खालीं त्या त्या धंद्याला अनुसरून तीनपासून पांच वर्षेपर्यंत सांगितलेली नोकरी उभयतांमध्यें ठरेल त्या अटींवर करावी लागेल.

हीं सात कलमें फार विचार करण्याजोगीं आहेत. व याप्रमाणें लोकांनीं योग घडवून आणल्यास या विपन्न देशाला सुईटांचणीसाठीं किंवा कागदशाईसाठीं

दुसऱ्या देशाच्या तोंडाकडे पहावें लागणार नाहीं. पूर्वी एकदां सरकारी नऊ पगारी विद्यार्थ्यांच्या जागा करून इकडचे लोक तिकडे धाडावयाचे, व कलाकौशल्यांत तयार करून त्यांना इकडे आणावयाचे, असा बूट निघाला होता; पण तो मधल्यामधेंच विरघळला. आतां फिरून तो उपस्थित होण्याची आशा राहिली नाहीं. आशियाखंडांतील चीन, जपान यासारखीं जुन्या पंथाचीं पण स्वराज्याखालीं असणारीं राष्ट्रें अलीकडे जागीं होऊन आपापल्या ठिकाणीं पाश्चिमात्य सुधारणेचा प्रसार होण्याविषयीं हरएक प्रकारची खटपट करीत आहेत; यूरोपांत आणि अमेरिकेंत शिक्ून तयार झालेले विद्यार्थी प्रत्येक वर्षी या देशांस परत येऊन नवे नवे कारखाने घालीत आहेत, व यामुळें या देशांचें अवर्णनीय हित होत आहे. इकडे आमची दशा कोण दीनवाणी होत चालली आहे ती पहा ! आमचे परके प्रभु आपल्या घरच्या व्यापाराची बढती असावी या हेतूनें आमच्या व्यापारांस उत्तेजन देत नाहींत इतकेंच नाहीं, तर उलट ते खचतील कसे, याचा उपाय करितात. उत्पन्न कांहीं नसतां प्रजावृद्धि झपाट्यानें चालली आहे; पीक करण्याजोगी जमिन सरत आली; आकारणीचा बोजा डोकें वर काढूं देत नाहीं; थोडी सुधारणा करून पीक वाढविल्यास तीस वर्षांनीं मोजणी अक्कावाई आल्या कीं साऱ्या श्रमाचें वाटोळें ! अशा विपत्तींत कारखान्याखेरीज लोकांस कोण हात देणार ! देशास लागणाऱ्या वस्तु उत्पन्न करण्याचे कारखाने येथल्या येथें निघाले पाहिजेत, व ते चालविण्यासाठीं प्रथम परक्या देशाहून लोक तयार करवून आणिले पाहिजेत. ते एकदां तयार होऊन आले म्हणजे येवढ्या तेवढ्या गोष्टीसाठीं यूरोपीअन लोकांचे आर्जव करावे लागणार नाहींत. इतकेंच नाहीं, तर आपलेच लोक आपल्या कारखान्यांत काम करूं लागले म्हणजे खर्च कमी होऊं लागेल व त्यामुळें कारखाने सुरळीत चालतील, आणि व्यापारसंबंधीं चढाओढींत ते दुसऱ्या देशांस हटवूं शकतील. याशिवाय दुसरा मोठा एक फायदा होणार आहे तो हा कीं, एकदां आपले लोक तयार होऊन आले, म्हणजे ते इतर लोकांस आपल्या धंद्याचें ज्ञान देतील. असें झाल्यानें यांत्रिक कलांचें ज्ञान येथें उत्तरोत्तर पसरत जाईल. व आतां जी आम्हांस अन्नान्न दशा आली तींतून आम्ही पार पडूं. भावी संततीचें सुखदुःख आम्हांवर अवलंबून आहे; आम्ही वाईट रीतीनें वागलों, आणि सार्वजनिक कल्याणाचा कांहीं एक विचार केला नाहीं, व उंबरांतील किडयांप्रमाणें स्वार्थपरायणच होऊन राहिलों तर तिला निरंतर विपत्ति काढावी

लागेल; पण तसें न करितां आपण जर कारखाने काढिले, आणि कलाकौशल्याचें जोरदार झाड लाविलें, तर आम्हांस व आमच्या संततीस पुढेंमागें सुखाचा दिवस येण्याचा संभव आहे.

मागल्या दोन निबंधांत कलाकौशल्य हें संपत्तीच्या वृद्धीस कसें कारणीभूत होतें, व त्याचा प्रसार आमच्या देशांत झाला नसल्यामुळें आमचें कसें नुकसान होत आहे हें सिद्ध करून दाखविलें. आतां इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका वगैरे देशांपेक्षां आम्ही कितीपट गरीब आहों, हें त्या त्या देशांतील लोकसंख्या, शहरें, आंत येणारा माल, व बाहेर जाणारा माल यांचे आंकडे वाचकांच्या डोळ्यापुढें मांडल्याखेरीज नीट लक्षांत येणार नाहीं, असें वाटल्यावरून कांहीं पुस्तकांवरून खालीं दिलेलीं कोष्टकें तयार केलीं आहेत, त्यांकडे नजर फेंकली असतां आमच्या दारिद्र्याची खरी कल्पना वाचकांच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं.

	एकंदर लोकसंख्या.	एक लक्षावरचीं शहरें.
हिंदुस्थान	१९,१०,९६,६०३	१६
विलायत	३,१४,८३,७००	११
फ्रान्स	३,६९,०५,७८८	९
अमेरिका	५,०१,५२,५५९	२०

	*बाहेर जाणारा माल.		*आंत येणारा माल.
हिंदुस्थान	६,०९,३७,५१३		३,६५,६६,१९४
विलायत	१९,१५,३१,७५८	घर.	३६,२९,९१,८७५
	५,७२,५४,६०६	बा.	
फ्रान्स	१२,६५,२३,६००		१८,३७,९३,८४०
अमेरिका	१६,७१,२६,७४९		१३,३५,९०,६६०

	*वसूल.	*खर्च.
हिंदुस्थान	६,५१,९९,६९२	६,३१,६३,३५६
विलायत	७,०३,५७,०७९	७,३१,९७,८८४
फ्रान्स	१२,५२,२९,०११	१२,५२,१९,७६९
अमेरिका	६,६८,०३,३२२	५,३५,२८,५९१

* वरील सर्व अंक पौंडांत आहेत; त्यांना दहांनीं गुणिलें म्हणजे रुपये होतात.

प्रथम पहिल्या कोष्टकाकडे पहा. त्यावरून असें दिसून येईल कीं, हिंदुस्थानची लोकसंख्या इंग्लंडपेक्षां सहापट, फ्रान्सपेक्षां पांचपट आणि अमेरिकेपेक्षां चारपट जास्त आहे.

इतक्या लोकसंख्येला हिंदुस्थानांत इंग्लंडाशीं तोलून पाहतां १२६ शहरें, फ्रान्सशीं तोलून पाहतां ८० शहरें पाहिजे होतीं. पण एकलक्षावरच्या लोकसंख्येचीं काय तीं १६ शहरें आमच्या देशांत आहेत. यावरून आमच्या देशांत व्यापारधंद्याची, आणि कलाकौशल्याच्या कारखान्यांची किती मंदी आहे, हें सहज ध्यानांत येण्याजोगें आहे. कारण जों जों यांत्रिक कलांचा प्रसार होत जातो, आणि निरनिराळे कारखाने निघत जातात, तों तों शहरवस्ती वाढत जाते, ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. जोंपर्यंत लोक शेतींत गुंतून राहिले आहेत, तोंपर्यंत त्यांना शहरांत येण्याची गरज काय ? इतर देशांत शेतींत फायदा होईनासा झाला, आणि इतर धंद्यापेक्षां मजुरी कमी मिळूं लागली कीं, लोक शेती सोडून देऊन शहरांत येऊन एकाद्या कारखान्यांत पोटाची सोय करितात पण आमच्या येथें कारखान्यांचा अभाव असल्यामुळें लोकांना शेतीवरच डोकें देऊन रहावें लागतें. हिंदुस्थानांत एक लक्षावर लोकसंख्येचीं फक्त १६ शहरें असल्यामुळें, येथें शहरवस्ती फार थोडी आहे, व व्यापारधंदा चांगला चालत नाहीं, आणि तो न चालल्यामुळें व्हावी तितकी संपत्ति प्रतिवर्षी उत्पन्न होत नाहीं, हें एका प्रकारानें सिद्ध झालें.

आतां दुसऱ्या कोष्टकाकडे पहा. त्यावरून असें दिसून येईल कीं, हिंदुस्थानांतून प्रतिवर्षी प्रत्येक मनुष्याच्या मागें ३॥· साडे तीन रु० माल बाहेर जातो; विलायतेहून साठ किंवा ऐशीं रुपयांचा जातो; फ्रान्समधून ३५ रुपयांचा जातो; आणि अमेरिकेंतून ३३ रुपयांचा जातो. माल जितका जितका अधिक बाहेर जाईल तितका तितका तो घरीं उत्पन्न होतो, व त्या मानानें लोकांस अधिकाधिक काम मिळतें हें स्पष्टच आहे. जो माल बाहेर जातो त्याच्या मोबदला त्याच्या किंमतीचा माल बाहेरून देशांत येऊन लोकांत वंटला जातो, हेंही उघडच आहे. आमच्या देशांतून बाहेर जाणारा माल थोडा असल्यामळें बाहेरून तरी देशांत फार कोठून येणार ! हिंदुस्थानांत प्रतिवर्षी प्रत्येक मनुष्याच्या मागें सरासरी २ रुपयांचा माल येतो; विलायतेंत ११५ रुपयांचा येतो; फ्रान्स देशांत ५० रुपयांचा येतो; आणि अमेरिकेंत २७ रुपयांचा येतो. यावरून माल बाहेर

धाडण्यांत किंवा आंत आणण्यांत हिंदुस्थानाची केवढी निकृष्ट स्थिति आहे, हें कोणाच्याही लक्षांत येण्याजोगें आहे. बरें आम्ही जितका माल बाहेर पाठवितों, तितक्याबद्दल आम्हांस जेवढ्याचा तेवढा परत मिळत असेल असें कोणास वाटत असल्यास ती मोठी चूक आहे. कारण बाहेर जाणाऱ्या मालाचा बराच भाग खण्डणीच्या रूपानें इंग्लंडास जातो, त्याच्याबद्दल एक कवडी देखील आम्हांस मोबदला मिळत नाहीं. त्याप्रमाणेंच बाहेरून आंत येणाऱ्या मालाचा बराच भाग येथें असलेल्या साहेब लोकांच्या कामीं लागतो त्यामुळें त्याचा थोडाच भाग नेटिव लोकांच्या वांट्यास येतो. यावरून आम्ही जरी फक्त तीन किंवा साडेतीन रुपयांचा माल बाहेर पाठवून दोन रुपयांचाच देशांत आणितों, तरी तेवढा देखील आमचा आमच्या पदरांत न पडल्यामुळें आम्हांस सदा दैन्य काढावें लागतें यांत नवल तें कोणतें !

आतां तिसऱ्या कोष्टकाकडे वळा. त्यावरून असें दिसून येईल कीं, स्थूल-मानानें प्रतिवर्षी प्रत्येक मनुष्याच्या मागें हिंदुस्थानांत ३ रुपये सरकारला दिले जातात; इंग्लंडांत २२॥ रु. दिले जातात; फ्रान्स देशांत ३४ रु. दिले जातात; व अमेरिकेंत १३ रुपये दिले जातात. सरकारास सार्वजनिक कामांकरितां लोकांची कमी अधिक कर देण्याची शक्ति त्यांच्या वार्षिक उत्पन्नावर अवलंबून असते; येथें उत्पन्नच कमी, तर सरकारदेणें तरी अधिक कोठून असणार ! जे देश स्वतंत्र आहेत, त्या देशांतील सरकारी जमाखर्चांत समीकरण असतें; म्हणजे प्रजेकडून जितका कर घेतला जातो तितका सगळा प्रजेच्या कल्याणाकडे लाविला जातो. पण आमच्या हिंदुस्थान देशाची गोष्ट अगदीं निराळी आहे. आम्ही परकी लोकांच्या ताब्यांत असल्यामुळें आम्ही जो कर देतों, त्याचा निदान निम्मा भाग आमच्या कल्याणाकडे मुळीच लागत नाहीं. तो आमच्या परकी राज्यकर्त्यांच्या खर्चीं पडून जातो, त्यामुळें त्यापासून आम्हांस बिलकूल फायदा होत नाहीं. फ्रान्स देशांत प्रत्येक मनुष्य प्रतिवर्षी ३४ रुपये कर देतो हें खरें; पण ३४ च्या चवतीस सरकार त्याच्याच हिताकडे लावतें. पण तसें आमच्या येथें होत नाहीं. आमच्या खिशांतून तीन रुपये मनुष्याच्या पाठीमागें जातात, पण त्याबद्दल आमचा दीड रुपयाचा तरी फायदा होत असेल कीं नाहीं याचा संशय आहे. ठोकळ मानानें हिंदुस्थानाचा वसूल पन्नास कोटी धरिला तरी त्यांतील अर्धी रक्कम म्हणजे पंचवीस कोटी रुपये

आम्ही दरसाल आज सुमारें पाऊणशें वर्षें परक्या देशांत पाठवीत आहों, ही गोष्ट लक्षांत आणिली तर हिंदुस्थान देश अशा भिकार दशेस कां आला आहे, आणि त्यांतील लोकांस अशी अन्नान्नगत कां झाली आहे, या शंकेचा उलगडा तेव्हांच होणार आहे. ७५×२५=१८७५ इतके कोटी किंवा १,८,७५,००,००,००० एक खर्व, आठ अब्ज, पंचाहत्तर कोटी एवढ्या रकमेस निदान देश ठार बुडाला याचा कोण संशय घेईल? गिझनीच्या महंमदानें, तैमूरलंगानें, किंवा नादीरशहानें केलेली लूट या रकमेच्या पासंगाला तरी टिकेल काय? याशिवाय कंपनीच्या अडत्यांनीं व नौकरांनीं, क्लाइव व वारेन हेस्टिंग्ससारख्या खाबूंनीं, किती रक्कम लांचविली असेल ती ईश्वर जाणे! यांखेरीज आणखी पुष्कळ तऱ्हांनीं हिंदुस्थानच्या संपत्तीस झिरपणी लागून राहिली आहे, व तिचा सर्व प्रवाह इंग्लंडगामी आहे; यामुळें आंग्लभूमि कांचनमय होऊन आर्यावर्त मृण्मय झालें यांत नवल तें कोणतें? असो वर जे आंकडे दिले आहेत त्यांवरून असें दिसतें कीं, आमचा देश इंग्लंडापेक्षां चौदापट, फ्रान्सपेक्षां वीसपट, आणि अमेरिकेपेक्षां नऊपट गरीब आहे. या गरिबींतून सुटण्यास सध्यां व्यापाराशिवाय दुसरें साधन दिसत नाहीं.

मागल्या निबंधांत दोन तीन कोष्टकें दिलीं, व त्यांतील आंकड्यांची परस्परांशीं तुलना करून दाखविली; तीवरून फ्रान्स, इंग्लंड, आणि अमेरिका या देशांपेक्षां हिंदुस्थान हा किती गरीब देश आहे हें वाचकांच्या पूर्णपणें लक्षांत आलेंच असेल. आणखी एकवार तोच मुद्दा प्रमाणांतरांनीं सिद्ध करून दाखवितों.

गेल्या महिन्याच्या २३ तारखेस मांचेस्टर येथील व्यापाऱ्यांनीं इंडिआचे सेक्रेटरी लार्ड हार्टिंग्टन् यांस एक मानपत्र दिलें, त्यांतील तात्पर्यार्थ असा होता कीं, विलायतचा बाहेर देशाला प्रतिवर्षीं एकंदर दोन अब्ज तेवीस कोटींचा माल जातो, त्यापैकीं तीस कोटींचा माल हिंदुस्थानाला जातो. इंग्लंडांतून प्रतिवर्षीं पंचाहत्तर कोटींचें कापड बाहेर जातें, त्यापैकीं एकवीस कोटींचें हिंदुस्थानास जातें. सीलोन वगैरे ठिकाणांखेरीज शुद्ध हिंदुस्थानांतून तीस कोटींचा माल इंग्लंडास येतो. यावरून इंग्लंडाच्या अनेक गिऱ्हाइकांपेक्षां हिंदुस्थानच्या व्यापारवृद्धीकडे आणि भरभराटीकडे इंग्लंडाला विशेष लक्ष दिलें पाहिजे, कारण हिंदुस्थानांत जर चांगलें उत्पन्न झालें नाहीं तर इंग्लंडच्या व्यापारास मोठा धक्का बसणार आहे. यासाठीं हिंदुस्थानांत जिकडे तिकडे आगगाड्या,

कालवे, कापसाची सुधारलेली लागवड, वगैरे साधनांच्या साहाय्यानें हिंदुस्थानची व्यापारवृद्धि झाली पाहिजे. सरते शेवटीं मार्जारसाधू मांचेस्टरकर व्यापारी मंडळी हरिदासाच्या कथेप्रमाणें आपल्या मूळ पदावर आली. मानपत्राच्या शेवटीं लार्ड हार्टिंग्टन् यांस त्यांनीं अशी प्रार्थना केली आहे कीं, इंग्लंडाहून हिंदुस्थानांत येणाऱ्या मालावर अद्यापि जी थोडीशी जकात राहिली आहे, ती एकदम उडविली पाहिजे. ती असल्यानें हिंदु लोकांना कपडा महाग पडून त्यांचें फार नुकसान होतें. यासाठीं सेक्रेटरी साहेबांनीं संधि सांपडल्याबरोबर ही जकात माफ करण्याची योजना करावी. असलें बकध्यान आम्हांस कळत नाहीं असें नाहीं. पण कळून त्याच्यापासून कांहीं फायदा होत नाहीं. कारण ज्ञान आणि सत्ता हीं एकत्र वास करीत असलीं म्हणजे ज्ञान हें अगदीं पंगु पडतें. आणि सत्तेचा खरा वाटाड्या म्हटला म्हणजे ज्ञान होय. तो बरोबर नसला म्हणजे ती हवी तिकडे भकते, आणि पायांखालीं पाहिजे त्याला हवेंतसें चिरडते. कित्येकदां ही सत्ता जाणून बुजून अज्ञानाचें वेड घेते. हिंदुस्थान देश दुष्काळानें पीडला असतां आमच्या लिटन बहादरानें दिल्लीचा बडा तमाशा करविला, उदीमपट्टी बसवून प्रतिवर्षीं न्यायान्यायानें दीड कोटी रुपये दुष्काळनिवारणार्थ जमा करण्याचें थोतांड करून पंचवीस तीस कोटी रुपये अफगाणिस्थानच्या खळींत नेऊन ओतले, लोक गडबड करतील म्हणून त्यांचीं हत्यारें हिसकून घेतलीं, व ओरडतील म्हणून त्यांचीं मुसकुटें आवळून टाकिलीं, व मांचेस्टर आणि ल्यांक्याशायर येथील व्यापाऱ्यांची तुंबडी भरावी, यासाठीं इंग्लंडाहून हिंदुस्थानांत येणाऱ्या कपड्यावरील बहुतेक जकात उठविली, व त्यामुळें खजिन्यांत जें जंगी भगदाड पडलें तें भरून काढण्यासाठीं मिठाचा सारा व्यापार नेटिव राजेरजवाड्यांस जागच्या जागीं हांका मारीत बसण्यास लावून आपल्या हातीं घेतला इतकेंच नाहीं, तर कित्येक प्रांतांत मिठावरचा कर कमी करण्याचा आंव घालून तें सगळ्या हिंदुस्थानभर महाग करून टाकिलें! अशा मनुष्यानें हिंदुस्थानावर पाठ फिरविली तेव्हां त्याची कोणीं पर्वा केली नाहीं यांत नवल तें कोणतें ? ज्याप्रमाणें कामातुराला भय आणि लज्जा हीं नाहींत, त्याप्रमाणें सत्तांधाला लोकांची गरीबी आणि विपत्ति हीं दिसत नाहींत. सारांश आमची आतां अशी स्थिति झाली आहे कीं, आमच्या सरकारला आमची दया येऊन त्यानें त्यांनींच

आमचें कांहीं बरें करण्याचें मनांत आणल्यास तें होतें. आम्ही म्हणजे अमुक एक गोष्ट अशा अशा तऱ्हेनें आम्हांस पाहिजे किंवा नको, असें पदर पसरून मागितलें असतां आम्हांस म्हणजे ती त्या रीतीनें प्राप्त होईल यांचें नांवच नको. इंग्लंडांतील राजपक्ष आणि प्रजापक्ष यांचा झगडा सुरू होऊन एखाद्या पक्षाची सरशी झाली म्हणजे मग त्या पक्षाच्या विचारांप्रमाणें हिंदुस्थानच्या राजकार-स्थानचें अत्यंत चंचल चक्र फिरावयाचें. लिबरल पार्टी म्हणजे प्रजापक्ष पुढें सर-सावला म्हणजे आमच्या कल्याणाकडे आमच्या सरकारचें थोडें लक्ष वळतें, व तो मागसला आणि कान्सरव्हेटिव्ह म्हणजे राजपक्षानें डोकें वर काढलें कीं, दुःखाचे ढग हिंदुस्थानावर येऊं लागतात. सारांश आमचें चांगलें वाईट करणें सर्वथैव आमच्या राज्यकर्त्यांच्या हातांत जाऊन पडलें आहे; आमचा त्यांत कांहीं एक हात नाहीं हें उघड आहे. इंग्लंडांत जे कोणी भूतदयावान् आहेत, त्यांचा राज-कारस्थानांत प्रवेश होऊन राज्यसूत्रें त्यांच्या हातांत येतात, तेव्हां त्यांच्या स्वेच्छेनें, आणि त्यांना फुरसत सांपडेल त्याप्रमाणें, ते आपली सदय नजर आम्हांकडे फिरंवितात हें उघड आहे. पण ही स्थिति चांगली नाहीं. ही चालेल तोंपर्यंत आम्हांस अनुकूळ अशाच गोष्टी आमच्या राज्यकर्त्यांच्या हातून होतील असें नाही. इंग्लंडांतील राजपक्ष आणि प्रजापक्ष यांच्या भांडणावर आमचें कपाळ अवलंबून राहणें अगदीं अप्रशस्त होय. या सर्व गोष्टी हिंदुस्थानां-तील लोकांस नीटपणें समजल्या पाहिजेत; व आज नाहीं उद्यां, हिंदुस्थानच्या राजकारस्थानांत त्यांचा हात शिरकला पाहिजे; व हिंदुस्थानासाठीं जे कायदे-कानू व्हावयाचे, ते हिंदू लोकांच्या विचारानें हिंदूंनीं निवडलेल्या कायदे करणाऱ्या मंडळीकडून झाले पाहिजेत. सारांश हिंदुस्थानच्या राज्यप्रकरणाचा संबंध इंग्लंड-च्या राज्यप्रकरणापासून जितका तुटेल तितका तोडवून हिंदुस्थानचा राज्य-कारभार आमच्या राज्यकर्त्यांस आमच्या विचारानें इतकेंच नाहीं, पण बहुतेक अंशीं आमचा आमच्याकडून चालविला पाहिजे. असें जर त्यांनीं न केलें, व हिंदुस्थानच्या लोकांनीं मागेंपुढें त्यांना तसें करण्यास न लाविलें, तर हिंदू लोकांची काय स्थिति होईल, हें आज सांगवत नाहीं. यासंबंधानें आज इतका पालहाळ करण्याचें कारण असें कीं, मांचेस्टर येथील व्यापारी मंडळीनें दिलेल्या मानपत्रास उत्तर देतांना, लार्ड हार्डिंग्टन् यांनीं या विषयाचा उल्लेख करून असें म्हणून दाखविलें कीं, लढाई, तह वगैरे मोठमोठ्या प्रकरणांच्या-

संबंधानें इंग्लंडांतील पक्षांतराप्रमाणें हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत बदल होणारच. बाकी आंतील व्यवस्थेच्या बारीकसारीक गोष्टींवर या पक्षांतराचा परिणाम पाहिजे तर न होऊं देतां येईल. यासंबंधानें आज रोजीं आम्हीं आपले विचार थोडक्यांत वर कळविले आहेत. पुढें प्रसंगानुसार ते खुलासेवार कळविण्यांत येतील. आतां व्यापारासंबंधानें त्याच मानपत्रावर उत्तर देतांना लार्ड हार्टिंग्टन् काय म्हणाले हें सांगतों. मांचेस्टरच्या लोकांनीं व्यापाराचे आंकडे जे दाखविले ते तिरकस रीतीनें दाखविले. त्यांचें खरें प्रतिबिंब त्यांनीं बेतानें लपवून ठेविलें, तें हार्टिंग्टन् साहेबांनीं उघड केलें. तें असें. पर्वांच्या मोजबातीप्रमाणें हिंदुस्थानची एकंदर लोकसंख्या पंचवीस कोटि वसि लक्ष होय. प्रतिवर्षी हिंदुस्थानदेश एकंदर चौऱ्याहत्तर कोटींचा माल बाहेर पाठवितो. व पन्नास कोटींचा माल घरीं आणितो. या दोन रकमांची बेरीज घेतां हिंदुस्थानच्या बाहेरच्या व्यापाराची किंमत एक अब्ज चोवीस कोटी चौऱ्याशीं लक्ष होते. आतां या आंकडयांची तुलना इंग्लंडच्या आंकडयांशीं करूं. इंग्लंडची लोकसंख्या तीन कोटी सत्तेचाळीस लक्ष नव्वद हजार आहे. इंग्लंडचा बाहेरचा प्रतिवर्षीचा व्यापार सहा अब्ज सत्याण्णव कोटींचा आहे. या मानानें इंग्लंडचा प्रतिवर्षी, प्रत्येक मनुष्यामागें, २०२ रु० ६ आ० ६ पैचा बाहेरचा व्यापार होतो. व हिंदुस्थानचा ४ रु० १४ आ० ९ पैचा होतो. आतां वाचकहो, २०२, किंवा ढोबळ्या हिशोबाच्या रीतीनें वरचे बारीक सारीक आंकडे सोडून देतां, २०० आणि ४ यांचें प्रमाण तुम्हीच ताडून पहा, आणि मग हिंदुस्थानला कंगालता कां आली, याची शंका आम्हांस विचारा. इंग्लंडाची प्रतिवर्षी परक्या देशाशीं होणारी देवघेव आमच्या देवघेवीपेक्षां पन्नास पट मोठी असल्यावर आम्ही दारिद्र्यांत कां पोहतों आहों, याचें कारण स्वल्प समजुतीच्या देखील मनुष्याला समजणें कठीण पडेल, असें आम्हांस वाटत नाहीं. खेरीज प्रतिवर्षी आमचा चवऱ्याहत्तर कोटींचा जो माल बाहेर जातो, त्यापैकीं निव्वळ सतरा कोटींबद्दल आम्हांस एक कार्डी देखील परत मिळत नाहीं. याचें कारण असें कीं, परकी लोक आमच्यावर राज्य करीत असल्यामुळें त्यांच्या खर्चासाठीं एक प्रकारची सतरा कोटींची वार्षिक खंडणीच आम्हांस द्यावी लागते, असें मानण्यास हरकत नाहीं. हीं दैन्यावस्थेचीं खरीं कारणें लोकांच्या अंतःकरणांत उत्तम रीतीनें बिंबून जाऊन व्यापारधंदा नेटानें चालविण्यासाठीं ते एकदिलानें हातपाय हालवूं लागतील तो सुदिन म्हणावयाचा. तो येईपर्यंत केसरीला अशाच कोरड्या आरोळ्या ठोकीत फिरलें पाहिजे.

[वर्ष २ अंक १, २, ३, ४.]

गुरु गोविंद

अठराशें ऐशीं सालांत प्रसिद्ध राजकार्यधुरंधर डाक्टर हन्टर हे इंग्रजांच्या हिंदुस्थानांतील शैलीच्या गुणांचीं पारायणें इंग्लंडांत करीत असतां, पाण्डित गुरु गोविंद यांनीं लंडनांतील 'स्टेट्समन' या नांवाच्या मासिक पुस्तकाला एक पत्र लिहिलें; त्यांत डाक्टर हन्टर यांच्या पोकळ पांडित्याचें दोषाविष्करण करून इंग्रज लोकांविषयीं नेटिवांचें मत काय आहे तें सांगितलें आहे. एकंदरींत तें पत्र समग्र वाचण्यासारखें आहे; परंतु फार लांब असल्यामुळें सगळ्याचें भाषांतर येथें देतां येत नाहीं, म्हणून त्यांतील गोषवारा देतों.

डाक्टर हन्टर यांच्या भाषणांतील पहिला दोष हा कीं, इंग्रजी अमलाची गाथा गात असतां, हिंदू लोकांना त्या अंमलाबद्दल केवढी जबरदस्त किंमत द्यावी लागत आहे, व केवढें नुकसान करून घ्यावें लागत आहे, याचा त्यांनीं मुळींच विचार केला नाहीं. अगदीं नवशिक्या हिशोबी घेतला तरी तो देखील जमाखर्च करतांना जमेची बाजू अजीबात सोडून देईल असें होणार नाहीं. डाक्टर हन्टर यांनीं इंग्रजांना हिंदुस्थानचें राज्य करण्याबद्दल पडणारा त्रास, व त्यापासून हिंदु लोकांना होणारा फायदा हीं मात्र दाखविलीं आहेत. त्यांच्या हिशेबांत जमेकडची बाजू अगदीं कोरी राहिली आहे. हिंदुस्थानांतून प्रतिवर्षीं कोट्यावधी रुपये इंग्लंडास जाऊन तेथील लोकांचा हरएक प्रकारें नफा करीत आहेत, याचा कोठेंच उल्लेख नाहीं. वास्तविक पहातां खरा हिशेब करणारा कोणी भेटेल तर दिलेलीं अभिवचनें न पाळल्याची, कर्तव्यें न बजावल्याची, आणि केलेल्या चाकरीबद्दल वेतन न दिल्याची, बरीच बाकी इंग्लंडाकडे निघेल, हें उघड आहे. इंग्रज लोकांच्या अंमलापासून होणाऱ्या फायद्यासाठीं हिंदुस्थानाला जें नुकसान करून घ्यावें लागत आहे, असें नुकसान आजपर्यंत कोणत्याही राष्ट्राला कधीं करून घ्यावें लागलें नाहीं. तेव्हां मुख्य प्रश्न असा आहे कीं, हिंदुस्थानाला परकीय अंमलापासून जो तोटा करून घ्यावा लागत आहे, त्याच्या समतोल त्या अंमलापासून त्याचा नफा होत आहे कीं नाहीं; आणि इंग्रज लोक आपल्या हिंदू प्रजेपासून जेवढा पैसा उकळतात,

त्याच्या भारंभार तिची सुधारणा करितात किंवा नाहीं ! असें जर आहे तर परकीय अंमलाबद्दल हिंदुस्थानाला काय नुकसान करून घ्यावें लागतें, व केवढी किंमत द्यावी लागते, हें पाहूं. इंग्रजांच्या अंमलांमुळें आमचें सर्वांत मोठें जें नुकसान झालें आहे तें हें कीं, पृथ्वींतील राजकीय राष्ट्रमालेंतून या भरतखंडाचें समग्र निर्मूलन होऊन, शिवाय परकीय अंमलाचें अत्यंत दुर्धर जूं त्याला आपल्या मानेवर घ्यावें लागलें आहे. या उगीच बोलण्याच्या गोष्टी नव्हत. जो कोणी हिंदुस्थानांत जाऊन तेथील लोकांच्या दारिद्र्याकडे आणि दुर्दशेकडे पाहील, त्याच्या त्या अक्षरशः प्रत्ययास आल्यावांचून राहणार नाहींत. हुद्याच्या आणि मिळकतीच्या सर्व जागा आगंतुकांनीं आटपल्यामुळें, घरच्या मंडळीला मोळके आणि पाणके बनावें लागलें आहे. देशांतला कामधंदा ठार बुडाला, कारागिरी नाहींशी झाली, व प्रतिदिवशीं अति अवश्य लागणाऱ्या वस्तूंसाठीं परक्यांच्या तोंडाकडे पाहण्याची पाळी आली आहे. व्यापार दुसऱ्याचे हातांत गेला, त्याबरोबर वित्त आणि संपत्ति संपादण्याचीं साधनेंही गेलीं. येवढ्यानेंच दैवदुर्विलासाची पूर्णता झाली असें नाहीं; होमचार्जीस (इंग्लंडांत हिंदुस्थानासाठीं जो खर्च होतो तो) वगैरेंच्या संबंधानें प्रतिवर्षीं वीस कोटी रुपये पिळून काढले जात असल्यामुळें, लोकांच्या अंगांत बिलकुल त्राण नाहींसें होऊन, अवर्षण पडलें कीं अन्नान्न करून काळाच्या जबड्यांत पडण्याखेरीज त्यांस मार्ग राहत नाही. येवढ्यानेंच त्यांच्या विपत्तीचा पेला कांठोकांठ भरून येता तरी बरें होतें; पण तसें कोठून होणार ! त्यांच्या दुःखावर शब्दमाराचे डाग देण्यांत येतात. इंग्रज लोक हिंदुस्थानच्या लोकांना त्यांच्या देशांत जितक्या वाईट रीतीनें वागवितात, तितक्या वाईट रीतीनें कोणत्याही परराष्ट्रीयाला आशियाखडांतील कोणताही देश वागवीत नाहीं. आणि येवढें नुकसान करून घेण्याबद्दल इंग्लंडापासून हिंदुस्थानाला काय नफा होतो म्हणाल, तर परराष्ट्रांच्या भीतीचें निवारण, व देशांतल्या देशांत शांतता आणि आगगाडया ! यांपैकीं पहिल्याविषयीं फारसें लिहिण्याची जरूरी नाहीं. परराष्ट्रांची भीति इंग्रजांनींच नाहींशी केली असें नाहीं. कारण आम्हांस भय तें असणार कोणाचें ! अर्थात् वायव्येकडून स्वाऱ्या करणाऱ्या घुळबुळ्या आणि घालमेल्या अफगाण लोकांचें; पण इंग्रज येण्यापूर्वीच शीक लोकांनीं त्यांची चांगली कणीक तिंबली होती; यासाठीं इंग्रजांनीं या बाबतींत

आपल्या प्रचंड सैन्यानिशीं म्हणण्यासारखा एखादा पुरुषार्थ केला आहे असें नाहीं. खरें पाहिलें तर पूर्वीपेक्षां अफगाण्यांची किंवा रुसांची आतांच अधिक भीति आहे. रशिया आपलें पाऊल मध्यआशियांत घुसवूं लागल्यामुळें, त्या ठिकाणच्या सर्व लोकांचें चित्त रशियाला मागें हटविण्याकडे लागलें आहे, व हिंदुस्थानावर स्वारी करण्याचा विचार त्यांच्या स्वप्नांत देखील येईनासा झाला आहे. सारांश, पंजाब घेतल्यापासून बाहेरच्या राष्ट्रांचें भय मुळींच राहिलेलें नाहीं, असें मानण्यास हरकत नाहीं. परंतु अफगाण लोकांना आणि मध्य-आशियांतील दुसऱ्या लोकांना हिंदुस्थानावर स्वाऱ्या करतां येत आहेत, असें मानिलें तरी त्यांची काय प्रतिष्ठा ? शंभर वर्षांच्या अवधींत त्यांनीं मारहाण आणि लुटालूट करून नेलेल्या पंधरावीस कोटींपासून होणारें नुकसान कोणिकडे, आणि आमच्या राज्यकर्त्यांच्या प्रतिसांवत्सरिक वीस कोटींच्या तुंबडीपासून होणारें नुकसान कोणीकडे ? व अशानें हिंदुस्थानाला इंग्रजांच्या साम्राज्य-छत्राखालीं राहून फायदा तो कोणता, आणि त्यांनीं अभिमान तरी कशासाठीं मानावयाचा ? हिंदुस्थानचें वित्तरुधिर होमचार्जीस वगैरे जळवा लावून समूळ चिटण्यासाठीं कीं काय ? बाकीच्या दोन मुद्यांचा विचार डाक्टर हन्टर यांनीं ज्या रीतीनें करावा, त्या रीतीनें केला नाहीं, ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट होय. या विषयावर त्यांनीं जीं व्याख्यानें दिलीं, तीं राज्यदृष्ट्या न देतां व्यापारदृष्ट्या दिलीं, याबद्दल त्यांना जितका दोष द्यावा तितका थोडाच. राजकारणदृष्ट्या या प्रश्नाचा विचार करितां असें वाटतें कीं, जेणेंकरून एका राष्ट्राला बाकीच्या राष्ट्रांच्या योग्यतेस चढतां येत नाहीं, जेणेंकरून तेथील लोकांत स्वाभिमान उत्पन्न होत नाहीं, जेणेंकरून त्यांना स्वराज्य करण्याची योग्यता येत नाहीं, व जेणेंकरून प्राणरक्षण अधिकाधिक सुखावह करून घेतां येत नाहीं, ती गोष्ट त्या राष्ट्राच्या काडीच्याही हिताची नाहीं, हें उघड आहे. तेव्हां इंग्रज लोकांचा या देशांत अंमल बसल्यापासून तो योग्यतेनें आणि मोठेपणानें दुसऱ्या राष्ट्रांशीं पूर्वीपेक्षां अधिक जवळ येऊन भिडला आहे कीं काय, व येथील लोकांस आपलें प्राणरक्षण पूर्वीपेक्षां अधिक सुलभ रीतीनें करितां येऊं लागलें आहे कीं काय, या दोन गोष्टींच्या निर्णयावर आमच्या पाश्चात्य प्रभूंच्या राज्याविषयीं चांगलें किंवा वाईट मत देणें अवलंबून आहे.

कोणतेंही राष्ट्र स्वराज्याखालीं असण्यास लायक आहे हें कशावरून समजावयाचें ? अर्थात् तेथील लोकांना प्रसंगीं स्वसंरक्षण करण्याचें जें सामर्थ्य

असेल त्यावरून. या दृष्टीनें पाहतां इंग्रजांचें राज्य येथें स्थापित झाल्यापासून आमच्या अंगीं जें दौर्बल्य आलें आहे असें पूर्वी कधींच आलें नव्हतें. लोकसंख्येपैकीं शेंकडा नव्याण्णवांना अगदीं हलक्या प्रकारचीं देखील हत्यारें वापरण्याची परवानगी नाहीं. हत्यारांची गोष्ट अशी आहे कीं ज्याला तीं नेहमीं वापरण्याचा अभ्यास असतो, त्यालाच तीं प्रसंगीं उपयोगीं पडतात. हिंदु लोकांच्या हिताहिताकडे लक्ष न देतां स्वार्थावर दृष्टि ठेवून इंग्रजांनीं सगळें राष्ट्र निःशस्त्र करून टाकलें आहे, व उत्तम आणि मध्यम कुलांतील लोकांस फौजेंत ठेवूं नये, असा निर्बंध केला आहे; यामुळें असल्या आपमतलबी कारस्थानाचा जो स्वाभाविक परिणाम व्हावयाचा तो होऊं लागला आहे. बहुतेक लोकांच्या अंगचें त्राण नाहींसें होऊन सगळा आपला लुल्यांचा बाजार झाला आहे, व शस्त्र कसें धरावें हें एकाला देखील कळत नाहीं. सरदार लोक, व सुखवस्तू लोक यांचा देशाच्या राज्यकारभारांत म्हणण्यासारखा हात नाहीं, यामुळें त्यांना कांहीं एक काम नाहींसें होऊन त्यांच्या वित्ताचा आणि बुद्धीचा व्यय व्यसनाकडे चालला आहे. पुढें मागें एखादें प्रचंड अरिष्ट येऊन रोमन लोकांना ब्रिटनांतून जसा मोर्चा फिरवावा लागला, त्याप्रमाणें हिंदुस्थानांतून सैन्यें काढून घेण्याची इंग्लंडाला जर पाळी आली, तर त्याला असें समाधान वाटेल कीं, शाबास माझी! ज्याप्रमाणें रोमन लोकांनीं ब्रिटनाची दुर्दशा केली, त्याप्रमाणें मीही हिंदुस्थानाला जेरजेर करून पुन्या दैन्यावस्थेंत सोडीत आहें! गृहसंबंधीं स्वस्थता आणि शांति हीं श्रेयस्कर होत; पण केव्हां? राष्ट्रीय अभिमानाची लोकांत निरंतर वृद्धि करणाऱ्या राज्यव्यवस्थेपासून तीं प्राप्त झालीं असतील तेव्हां! शांतता ही अत्यंत इष्ट गोष्ट खरी; पण तिच्यासाठीं एखादे वेळेस लोक वाजवीपेक्षां फाजील किंमत देऊन बसतात. इंग्रजांच्या अमलांत आमची तीच दशा झाली आहे. मोंगलाई बादशाहीचा ऱ्हास होऊन अखेरीस तिचा मोड झाल्यावर हिंदुस्थानांत जी बंडाळी माजली, व जिचें तर्तरीत चित्र डाक्तर हन्टर यांनीं काढिलें आहे, ती इंग्लंडांत 'गुलाबांच्या' लढाया चालल्या असतां, किंवा पहिला चार्लस आणि पार्लमेंट यांचा मोठा झगडा चालला असतां, जी बंडाळी माजली होती, तिच्यापेक्षां कांहीं वाईट नव्हती. आणि असें जरी होतें तरी कोणीही खरा देशाभिमानी इंग्रज असें म्हणूं शकेल काय, कीं त्यावेळच्या त्या बंडाळीच्या स्थितींत राहण्यापेक्षां आतां ज्या प्रकारच्या शांततेचा आणि स्वास्थ्याचा हिंदुस्थान देश

उपभोग घेत आहे, त्या प्रकारची शांतता आणि त्या प्रकारचें स्वास्थ्य आमच्या देशांत त्यावेळेस ज्या मारामाऱ्या आणि जो रक्तस्राव चालला होता, त्यांच्या-ऐवजीं तें आम्हीं खुषीनें पत्करलें असतें ! आतां इंग्रज लोकांना कोणीं जर असा प्रश्न केला कीं हिंदू लोकांना पुढें मागें आपलें राज्य चालवितां यावें, याबद्दल तुम्हीं कोणत्या कोणत्या उपायांची योजना केली आहे ! राज्यकलेंत त्यांची बुद्धि प्रगल्भ होण्यास काय केलें आहेत ! व लोकांना राज्यकारभारांत कितीसें घेतलें आहेत ! आमच्या कमनशीबामुळें " कांहीं नाहीं, मुळींच नाहीं " असेंच स्पष्ट उत्तर देण्याखेरीज त्यांना दुसरा मार्ग नाहीं. इतर मानसिक शक्तींप्रमाणें राज्यकलानैपुण्य हें नेहमीं राबत्यानें व अभ्यासानें साध्य होणारें आहे. म्हणून ज्या अमलांत घरच्या लोकांकडून जबाबदारीचीं आणि विश्वासाचीं सगळीं कामें काढून घेतलीं असतात, त्या अमलामुळें कालांतरानें लोकांची राज्यकर्तबगारी लयास जाते; व पृथ्वीच्या पाठीवर असा परिणाम कोठें झाला नसल्यास तो अद्भुत चमत्काराचाच प्रकार समजला पाहिजे. अगोदर इंग्रज लोक हिंदुस्थानचें जें राज्य करीत आहेत त्याबद्दल नेटिव लोकांना काडीची देखील आस्था किंवा कळकळ नाहीं; आणि तशांत आज-पर्यंत जीं कौन्सिलें झालीं त्यांची साधारण मामूल वहिवाट अशी दिसते कीं, होईल तितकें करून आपल्या कृत्यांवर नेटिव लोकांस टीका किंवा वाद करण्यास उत्तेजन मिळूं द्यावयाचें नाहीं. ज्या अर्थीं सरकारच्या कायदेकानूंवर किंवा राज्यपद्धतीवर कांहीं परिणाम होईल अशा रीतीनें दरें वाईट म्हणण्याचा अधिकार नेटिव लोकांकडे उरलाच नाहीं, त्या अर्थीं ते त्यांबद्दल पक्के उदासीन बनले आहेत, यांत नवल तें कोणतें ! डाक्तर हन्टर यांनीं आपल्या भाषणांत म्युनिसिपालिट्यांविषयीं उल्लेख केला होता; पण त्यांच्या धिप्पाड कोंगांत कांहीं हंशील नाहीं, हें सर्व हिंदुस्थानाला ठाऊक आहे. इंग्रज सरकारच्या कृत्यांवर टीका करण्यास प्रवृत्त होणारे म्हटले म्हणजे आमच्या इकडे शिकून तयार झालेले नवीन लोक; हे आमचे सरकाराला न जुमानतां, व त्यांच्या आवडण्यानावडण्या-कडे न पाहतां, आपला तडाका चालवितात ! इंग्रजांच्या राज्यापासून हिंदू लोकांस झालेल्या फायद्यांचा जो गुणपाठ डाक्तर हन्टर यांनीं इंग्रजी श्रोत्यांपुढें केला, त्यांतला खरा फायदा म्हणजे विद्यादानाचा; पण तो तरी आम्हांस अत्यंत हितावह होईल अशा रीतीनें आमचे राज्यकर्ते आम्हांस मिळूं देत नाहींत. हिंदू

लोकांना युरोपियन लोकांचा वेदांतविचार, किंवा इंग्लंडची कविता, नको आहे; तर सर्व युरोपियन लोकांस सांप्रतच्या मोठेपणास चढविणारी व्यावहारिक शास्त्रांची माहिती पाहिजे; पण ती सरकार जाणूनबुजून लोकांस प्राप्त होऊं देत नाहीं. स्थूल दृष्ट्या विचार करितां असें दिसून येईल कीं, जेव्हां जेव्हां शास्त्रीय किंवा व्यवहारकलाभिज्ञ लोकांची गरज पडते, तेव्हां तेव्हां आमच्या येथें शाळाखातें नाहींच, असें समजून हिंदुस्थानाला इंग्लंडाच्या तोंडाकडे पहावें लागतें ! सारांश काय कीं, ब्रिटिश लोकांच्या सर्व कारभारांत सूक्ष्मदृष्टीच्या मनुष्याला प्रत्येक कृत्यांत दिसून येणारें एक वळण आहे, तें हें कीं, राज्यकार-स्थान, विद्यादान, किंवा दुसरी कोणती पाहिजे ती बाब घ्या, हरएक उपायानें हिंदुस्थानाला इंग्लंडावर अवलंबून रहावें लागून तें निरंतर पंगूच्या पंगू राहील, असें करावयाचें यामुळें जी विद्या दिली जात आहे, तिच्यापासून " बंगाली बाबू " निष्पन्न होत आहेत, आणि ते तसे निघत आहेत याला सरकारच कारण असून त्यांच्या नांवानें वर्तमानपत्रांत किंवा नाटकगृहाच्या रंगभूमीवर व्यर्थ डंका चाललेला असतो.

आतां आणखी एका मुद्याचा विचार करावयाचा राहिला आहे, तो हा कीं, इंग्रजांच्या अंमलामुळें हिंदू लोकांना चरितार्थ चालविण्याचे कष्ट पूर्वीपेक्षां कमी पडूं लागले आहेत कीं काय ? या प्रश्नाचें उत्तर देण्यास फार दूर जावयास नलगे. हिंदुस्थानांत ब्रिटिश लोकांचें निशाण फडकूं लागल्यापासून हिंदुस्थानास जें दारिद्र्य आणि जी विपत्ति आली आहे, अशी पूर्वी कधींच कोणाच्या पाहण्यांत आली नसेल. ज्यांच्यावर हजारों गरीब लोकांचीं पोटें भरत, अशीं पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेलीं श्रीमंत घराणीं निरंस्त झालीं. त्यांचीं अनाथ मुलेंबाळें भिकेच्या वाटेस लागल्यामुळें, त्यांच्या पूर्वीच्या चाकरमाणसांना आपल्या धन्यांचे दुःसह हाल पाहून रडत बसण्याची पाळी आली आहे. काम-काज करून उदरनिर्वाह करणाऱ्यांच्या दारिद्र्यावस्थेची तर कमाल झाली आहे. कुडी आणि प्राण यांची ताडातोड होऊं न देण्यापुरता देखील धंदा त्यांना मिळत नाहीं. वास्तविक पाहतां कोणत्याही देशांतील प्रजेच्या स्थितीवरून तेथील सरकार कसें काय आहे, याचा निश्चय करणें प्रशस्त असेल तर, हिंदू लोकांची अत्यंत दैन्यावस्था ज्यानें पाहिली असेल, तो हिंदुस्थानांत इंग्रज लोकांचा अंमल झाला, हीं गोष्ट बरी झाली, असें कधींही मानणार नाहीं. आपल्या

भाषणांत डाक्तरसाहेबांनीं या देशांत इंग्रजांनीं जिकडे तिकडे सुरू केलेल्या आगगाड्यांची मोठी फुशारकी मिरविली आहे; पण या गाड्या सुरू करण्याचा मुख्य उद्देश असा कीं, सरकारला हवें तितकें सैन्य उशीर न लागतां पाहिजे त्या ठिकाणीं धाडतां यावें. हिंदुस्थानांतील रयतेचा तर या गाडीविषयीं असा समज आहे कीं, ही एक जबरदस्त कोळसेखाऊ राक्षसी आहे, व इच्या मदतीनें एक व्यापारी राष्ट्र ऐन दुष्काळाच्या दिवसांत आमच्या येथील धान्य अन्नान्न करणाऱ्या लोकांस मिळूं न देतां बाहेर घेऊन जातें ! 'रोहिलखंडांतील' लोक दुष्काळामुळें जर्जर झाले असतां, "औद आणि रोहीलखंड गाडीनें" लाखों टन धान्य बाहेर देशास जात होतें, या गोष्टीची ज्यांना आठवण असेल, त्यांना वरील लिहिणें अतिशयोक्तीचें आहे कीं काय, हें कळून आल्याखेरीज राहणार नाहीं. हिंदुस्थानांत बाहेरून जो माल येतो, व तेथून जो बाहेर जातो, त्यावरून या देशाच्या भरभराटीच्या खऱ्या स्वरूपाचा निश्चय करितां येत नाहीं; कारण या मालाचा बराच मोठा भाग परकीयांचीं घरें भरतो, व त्यांच्यापासून आम्हांला एका कवडीची देखील प्राप्ति होत नाहीं. तात्पर्य काय कीं, बाहेरून पुष्कळ माल येत असून व बाहेर पुष्कळ जात असून तसेंच, नित्याच्या उपजीविकेला लागणाऱ्या वस्तूंची किंमत दुप्पट झाली असून,—त्याच प्रमाणानें संपत्ति आणि प्राप्ति हीं जोडण्याचीं साधनें जेथें कमी झालीं आहेत, अशी शोचनीय व तऱ्हेवाईक स्थिति हिंदुस्थानांतच काय ती दिसून येते ! इंग्रज लोकांच्या अंमलासंबंधानें कित्येक प्रश्न, निष्पक्षपाती तिऱ्हाइतांचें मत घेण्याजोगे आहेत; पण डाक्तर हन्टर यांनीं जाणूनबुजून त्यांचा उल्लेख केला नाहीं. ब्रिटिश लोकांच्या राज्यामुळें हिंदुस्थानच्या लोकांस सुख आणि संपत्ति हीं आलीं आहेत काय ? ते पूर्वीं होते त्यापेक्षां आतां बरे आहेत काय ? पूर्वीपेक्षां यंत्रकलेचा प्रसार अधिक होऊन लोक अधिक पैसा कमावीत आहेत काय ? डाक्तर हन्टर यांच्या सर्व पांडित्यांत या प्रश्नांचें समाधान होण्यासारखें उत्तर कोठेंही सांपडत नाहीं. ते ब्रिटिश राज्याची प्रतिष्ठा काय मिरवितात, कीं त्याच्या योगानें हिंदुस्थानांत जिकडे तिकडे भले गुल्लाम पोलीस लागून गेलें आहे ! हाडें घुसळून काढणारा सारा सरकार कर्से नेमल्या तारखेस टिच्चून घेतें ! आणि जागोजागीं ढब्बू आणि प्रतिष्ठाखोर मालचाट्यांची कशी लेन लागून राहिली आहे ! आः हा ! या सर्व फुशारकी मारण्या-

जोग्याच गोष्टी असतील ! ! कुळांना नुसता खाण्यापुरता वांटा देऊन बाकीचें सर्व उत्पन्न आपणच लाटणारा जमीनदार ज्या प्रकारच्या सुधारणा आपल्या देशांत करतो, त्या प्रकारच्या सुधारणा आमच्या इंग्रज बहादरांनीं येथें केल्या आहेत, व अशाच प्रकारच्या सुधारणांबद्दल डाक्तर हन्टर यांनीं इंग्रजी श्रोत्यांपुढें हिंदुस्थान सरकारची शेखी मिरविली. तथापि ही गोष्ट हमेष ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, बाहेरून नोक झोक केला म्हणून अंतर्यामीं शांति होईल, असा अर्थ नाहीं. बाहेरच्या ऐटीनें देशांतल्या लोकांची खरी सुधारणा होत नाहीं, त्याप्रमाणें देशाला वरून शोभा देणाऱ्या गोष्टी केल्या म्हणून त्याची तात्त्विक सुधारणा झाली असेंहि नाहीं. हिंदुस्थानांत असे कोट्यावधि दैवहत लोक आहेत कीं ज्यांना दररोज दोन जेवणें मिळण्याची मारामार पडते; व कांहीं तर असें आहेत कीं, त्यांना एक दिवसाआड एक जेवण करून शरीर कसें तरी चालतें ठेवावें लागतें ! यांतल्या यांत जे बरे म्हणून सांगितले, त्यांपैकीं शेंकडा ७५ ना आपल्याच हातांनीं आपल्याच शेतांत उत्पन्न केलेल्या गव्हाला किंवा भाताला वर्षाच्यावर्षांत हात लाविता येत नाहीं; त्यांचें नित्याचें अन्न म्हटलें म्हणजे जें पिकविण्यास श्रम नाहींत, व ज्याला बाजारांत कोणी पुसत नाहीं, असलें एखादें नाचण्यासारखें बिनचव व नीरस धान्य असावयाचें ! अशा प्रकारच्या धान्यांत शक्ति वाढविण्याचा गुण फारच थोडा असतो, व हें खाल्ल्यानें शरीराला एखादा व्याधि जडण्याचा संभव असतो.

मला असें वाटतें कीं, या आमच्या दुःखाची दाद लागण्यास एक उपाय आहे; तो हा कीं, कांहीं तरी खटपटीनें ही गोष्ट इंग्लंडच्या लोकांच्या नजरेपुढें आली पाहिजे; आणि यासंबंधानें सगळ्या हिंदुस्थानचें एक मत आहे. इंग्लिश लोकांच्या इतिहासाकडे पाहिलें म्हणजे त्यावरून एक गोष्ट दिसून येते ती ही कीं, ज्या त्या ठिकाणीं मनुष्य जातीची सुधारणा करण्याचे कामांत या राष्ट्राचें सदा पुढें पाऊल असतें; आणि याचा जो लौकिक झाला आहे तो परवां कैं० झालेल्या मुख्य मंत्र्यांच्या किंवा त्यांच्या छंदाप्रमाणें वागणाऱ्या पार्लमेंटाच्या मूर्खपणाच्या कल्पनांनीं किंवा लहरींनीं डळमळणारा नाहीं. असें जर आहे, तर परमेश्वरकृपेनें ज्या हिंदुस्थानचा आणि इंग्लंडचा इतका निकट संबंध झाला आहे, त्या हिंदुस्थानाविषयीं इतर देशांप्रमाणें इंग्लंड आपली नेहमींची निरिच्छता आणि न्यायबुद्धि दाखविण्यांत अंतर करणार नाहीं असें मानणें म्हणजे भल-

ह्याच गोष्टीची अपेक्षा करण्यासारखें आहे, असें वाटत नाहीं. तथापि हा हेतु तडीस जाण्यासाठीं एक गोष्ट करणें अगदीं जरूर आहे, ती ही कीं, नेटिव लोकांचें जें म्हणणें असेल तें सगळें इंग्लंडच्या लोकांना कळलें पाहिजे. इंग्लंडापासून विभक्त होण्याची हिंदुस्थानाला इच्छा नाहीं; कारण तसें झाल्यानें दोघांच्या कल्याणासही मोठा धक्का बसणार आहे. अलीकडे दोघांचा एकजीव झाल्यानें तुटातुट होणें अगदीं इष्ट नाहीं; आणि नवीन शिकलेल्या मंडळींत जो वादविवाद चालतो, त्यांत एक गोष्ट गृहीत घेतलेली असते ती ही कीं, हिंदुस्थानार्चा आणि इंग्लंडाची फुटाफुट होणें ही अशक्य गोष्ट आहे. हिंदुस्थानांतील बहुतेक तरुण विद्वानांचा आणि इंग्रजसरकारचा ज्या गोष्टींविषयीं, नेहमीं मतभेद पडतो, व जिच्यामुळें सरकाराला त्यांचें बोलणें कडू वाटतें, ती गोष्ट आज तें कबूल करीत नाहीं, तरी पुढें मागें ती त्यास कबूल करावी लागणारच. गेल्या वीस वर्षांतील फेरफारांवरून हिंदुस्थानचा, अमेरिकेंतील कानडा देशाप्रमाणें राजकीय वसाहत (कौन कालनी) बनण्याचा कल होत आहे असें दिसूं लागलें आहे; परंतु आमच्या सरकारच्या तर मनांत असें आहे कीं, आम्ही आतां ज्या प्रकारच्या निराश्रित आणि परावलंबी स्थितींत आहों, त्याच स्थितींत आम्हांला मारून मुटकून ठेवावयाचें; या दैन्य स्थितीच्या बाहेर म्हणून पडूं द्यावयाचें नाहीं. यासंबंधानें पार्लमेंट सभेंत कांहीं कायदाकानू पसार होईपर्यंत हिंदुस्थानांत कोणत्याही प्रकारचा दंगा होणार नाहीं, अशा प्रकारचा बंदोबस्त सरकारला ठेविला पाहिजे. तसा बंदोबस्त सध्यां तेथें नाहीं आहे. इंग्रजसरकार बाहेरून असें दाखवितें कीं हिंदू लोकांसारख्या भिकार, निस्त्राण, आणि जरत्करु लोकांच्या हातून आमचें काय व्हायचें आहे ! वरून अशी धीटपणाची ऐट करून आपल्यावर येणाऱ्या धोक्याच्या खऱ्या कारणावर सरकार पांघरूण घालतें हें नीट नाहीं. हिंदुस्थानचे सांगाडेवजा बुभुक्षित लोक शुद्ध मेपपाचें आहेत हें कबूल; पण असलींच मेपपाचें दुष्काळांतून डोकीं वर काढत आहेत नाहींत तों त्यांच्यावर भक्कम कर लादल्यानें त्रासून जाऊन सरकारास भीति उत्पन्न करण्याजोगें अचाटकृत्य करण्याच्या भरीस एकादे वेळेस पडतील. पृथ्वीच्या पाठीवरील सगळ्या लोकांत हिंदू लोक पराकाष्ठेचे थोबाडवाईक आणि कायद्याला भिणारे असे आहेत. पण मनुष्य कितीही सोशिक झाला तरी त्याच्या सोशिकपणाला कोठें तरी सीमा ही आहेच.

पृथ्वीवरील सर्व लोकांपेक्षां हिंदू लोक नम्र आणि कायद्याला भिणारे खरे, परंतु जॉबच्या देखील सहनशीलतेला कांहीं सीमा आहे. आणि इंग्लंडच्या लोकांना हें पक्कें ठाऊक असूं दे कीं, लार्ड लिटनच्या कारकीर्दीत हिंदू लोकांस जी विपत्ति भोगावी लागली, व त्यांनीं जे हाल काढले, त्यांवरून मनुष्याच्या सोशिकपणाची बहुतेक परमावधि येऊन ठेपली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. गेल्या नवंबर आणि डिसेंबर महिन्यांत (१८८१) आग्रा आणि त्याचे सभोंवतालचा प्रदेश, यांतील लोकांचा कडक तापानें फडशा उडत असतां, आमच्या मायाळू सरकारनें बहुतेक हमाल लोक वेठीस धरिले आणि थंडीनें किंवा पठाणांच्या कट्यारीनें प्राणास मुकतील, याचा विचार न करितां त्यांना लढाईच्या जागीं पाठविलें. आग्रा शहरच्या पाण्याचा पुरवठा सर्वांशीं या लोकांच्या उद्योगावर अवलंबून आहे; असें असतां पितृवत् प्रजेचें पालन करणाऱ्या सरकारानें या क्षीण आणि मरणोन्मुख लोकांस असें सांगितलें कीं, पाण्याचा विचार तुमचा तुम्ही पाहून घ्या, आमच्या हातून कांहीं एक होणें नाहीं. अशा रीतीनें राज्यकर्ते आणि प्रजा यांच्यामध्यें परस्परांविषयीं प्रीति वाढण्याचा फारच थोडा संभव आहे. आणि फोलासाठीं दाणा घालवून आपण आंतबट्ट्याचा व्यापार करितों आहों, असें आज कित्येक दिवस पुष्कळांच्या नजरेस येऊन चुकलें आहे. मी सत्य स्मरून सांगतों कीं, हिंदू लोकांच्या मनांत जबरदस्त विचारक्रांति चालली आहे, आणि मोठें वादळ होण्यापूर्वी जशी थोडा वेळ चहूंकडे शांतता असते, त्याप्रमाणें दक्षिणेंतील दंगे आणि रंपा येथील बंड यांणीं सूचित केलेल्या प्रचंड तुफानाची प्रस्तुत स्वस्थता ही पुरोगामिनी होय. वासुदेव बळवंत फडके नांवाचा दक्षिणेंतील दरवडेखोर सर्वत्र प्रसिद्ध आहे. यावर सरकारनें राजद्रोहाचा आरोप ठेविल्यामुळें देशाच्या कल्याणासाठीं प्राणत्याग करण्यास सिद्ध झाल्याचा याचा जिकडे तिकडे लौकिक झाला. हा वासुदेव पुण्याच्या रस्त्यांतून तुरुंगाकडे जात असतां लोकांनीं "वासुदेव बळवंत की जय" असा गजर केला. ही गोष्ट फार महत्त्वाची नाहीं. तथापि येवढ्यावरून सरकारनें लोकांचें अंतरंग ताडावें, आणि संभाळून असावें. नेटिव वर्तमानपत्रें जे उद्गार काढितात, ते त्यांचीं मुस्कटें आवळल्यानें निघायाचे राहातात, असा अर्थ नाहीं. देशाच्या राज्यस्थितींत सध्यां पराकाष्ठेची चलबिचल होऊन गेली आहे, व तिची थावराथावर होण्यास कोणी फारच उदार मनाचा मनुष्य पाहिजे. नेटिव लोकांपैकीं पुढें सरसावलेल्या मंड-

ळींचें असें म्हणणें आहे कीं, पार्लमेंट सभेंत, तसेंच कायदे कौन्सिलांत लोकांनीं निवडलेले मुखत्यार असावेत, व हिंदु लोकांचा राज्यकारभारांत बराच हात असावा. धंदेवाल्यांचें असें म्हणणें आहे कीं, कराचा बोजा कमी होऊन आपल्या श्रमास आणि मालास उत्तेजन मिळावें. या नेमस्त आणि वाजवी मागण्या सरकारनें आम्ही कबूल करीत नाहीं असें म्हटलें कीं, विद्वान् आणि धंदेवाले यांचा एकोपा होईल; व असल्या एकोप्यानें होणाऱ्या परिणामाचें स्वरूप माझ्या डोळ्यांपुढें आलें म्हणजे माझ्या अंतःकरणांत धडकी भरते. लोक निःशस्त्र आहेत. व आपल्याशीं भल्लें मोठें सैन्य आहे, अशा ऐटीवर सरकारनें निवांत राहूं नये. लोक कोणत्या वेळेस काय करितात, याचा पत्ता लागत नाहीं. यासाठीं सरकारानें मोठ्या सावधगिरीनें राहिलें पाहिजे. १७८९ च्या जुलई महिन्याच्या १४ व्या तारखेस पारीस येथील निःशस्त्र लोकांनीं दारूखाना लुटून त्यांतील हत्यारें लांबविलीं. त्यामुळें एका दिवसांत सगळें शहर हत्यारबंद झालें, व राजाच्या पक्षाकडील मोठमोठ्या पट्ट्यांची जागच्या जागीं गाळण होऊन गेली! एका शतकानें त्याच ऐतिहासिक प्रकाराची पुनरावृत्ति झाली तर कांहीं नवल नाहीं. सध्यांची नेटिव लोकांची भिकार स्थिति तशीच राहिली, तर हिंदुस्थानसरकारनें पुढच्या दुष्काळांत चांगली खबरदारी ठेवावी, असें त्यास माझें सुचविणें आहे. तथापि लोकांचीं मनें अशा रीतीनें बेफाम होऊं दिल्यानें या देशांतील लोकांवर जो भयंकर प्रसंग गुदरणार आहे, तो इंग्लंडांतील लोकांना टाळतां येण्यासारखा आहे. इंग्लंडचे लोक आमची दाद लावतील, अशा आशेनें सगळ्या हिंदुस्थानचे डोळे इंग्लंडकडे लागले आहेत. व नवीन पार्लमेंट कोणत्या तऱ्हेची भरते, याची त्यांना मोठी काळजी पडली आहे. एका व्हाइसरायाच्या मनांत आपलें नांव गाजविण्याची कल्पना आली कीं, केली परदेशावर स्वारी; अथवा शैलशिखरावर बसून नाटकें करणाऱ्या राज्यकर्त्यां मंडळीला वाटलें कीं, सर्व देश छानछूक दिसला पाहिजे कीं, सोडले त्या प्रकारचे हुकूम—असले ढंग करण्याला आमच्या देशांत आतां त्राण उरलें नाहीं. ल्यांक्यास्टर येथील लोकांना आपल्या पक्षाकडे वश करून घेण्यासाठीं गेल्या प्रधानमंडळानें हिंदुस्थानाला ठार बुडविलें. आद्याच्या बाहेर खर्च जाऊं न देतां लोकांची स्थिति सुधारण्यासाठीं परिश्रम करणारें, व "शास्त्रीय सीमा" काबीज करण्याच्या वायफळ कल्पनातरंगास न भुलणारें, असें हिंदुस्थानाला प्रस्तुतकालीं सरकार पाहिजे

आहे; हा कार्यभाग कोणाच्या हातून उरकेल, हें इंग्लंडांतील लोकांनीं आधींच ठरवून टाकिलें आहे. पण इंग्लिश लोकांना जर हिंदुस्थानचें राज्य पाहिजे असेल, तर त्यांनीं निरंतर असें ध्यानांत वागविलें पाहिजे कीं, फार लोभ धरल्यानें, किंवा मनमानेल त्या प्रकारची राज्यपद्धत घातल्यानें, आपला हेतु तडीस जावयाचा नाहीं. म्हणून हिंदुस्थानच्या कोट्यावधि मुक्या लोकांच्या तर्फेनें न्यायी व सदय ब्रिटिश लोकांना माझें हात जोडून असें मागणें आहे कीं, वर सांगितलेल्या गोष्टींचा आपण चांगला विचार करा. आणि तसें न कराल आणि माझें बोलणें तिरस्काराल तर हतभाग्य फ्रान्सेस्कानें म्हटल्याप्रमाणें:--

"तुमची भयंकर दशा होईल, व त्याहूनही भयंकर तुमची दुष्कीर्ति होईल."

गुरुगोविंद या सदराखालीं आलेले चार लेख ज्या पत्रावरून लिहिले गेले आहेत, तें पत्र १८८० मध्यें गुरुगोविंद यांनीं लंडनच्या स्टेट्समन नांवाच्या मासिक पुस्तकांत छापविलें होतें, हें मागें सांगितलेंच आहे. त्या वेळेस करडया लिटनशाहीचा नुकताच लय झाला होता, व पुढें कोणत्या प्रकारचा गव्हरनर जनरल येणार याचा बिलकुल अजमास नव्हता. गेल्या दोन वर्षांत मोठेच फेरफार झाले आहेत. लार्ड बीकन्सफील्ड परलोकवासी झाले; मि. ग्लाडस्टन हे मुख्य मंत्रीपदारूढ झाले; लार्ड रिपन यांना हिंदुस्थानचे प्रतिनिधि नेमिलें. अशा अनेक महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या. विशेषेंकरून लार्ड रिपनसाहेब हिंदुस्थानांत आल्यानें वरील पत्रांतील बहुतेक असंतोषाचीं कारणें नाहींशीं झालीं; अफगाणिस्थानाशीं लढाई बंद केली, खजिन्याची नीट व्यवस्था लाविली; हत्यारांच्या कायद्यांत फेरफार केला, वर्तमानपत्रांस फिरून स्वातंत्र्य दिलें, मिठावरचा कर कमी केला, देशी मालाला उत्तेजन देण्यासाठीं अनेक ठराव काढिले, राजसत्ताविभागाचा विचार सुरू आहे, लोकशिक्षणाचा विचार करण्यासाठीं कमिशन बसलें आहे; व हिंदू लोकांस राज्य करण्याचें शहाणपण देण्यासाठी, "स्थानिक स्वराज्याची" वाटाघाट सुरू आहे, व परमेश्वरकृपेनें लार्ड रिपन साहेबांचीं येथें पूर्ण पांच वर्षें गेल्यास आम्हां हतभाग्य लोकांस बरेच अधिकार मिळतील, व आणखी पांच पंचवीस वर्षें सरकाराविरुद्ध कुरकुर करण्यास कांहीं-एक कारण राहाणार नाहीं, असें दिसतें.

[वर्ष २ अंक २१-२३-२४-२५]

दत्तकाची अवश्यकता

मागें 'न्हाणवली' वर लिहितांना आम्हीं असें लिहिलें होतें कीं, आमच्यांत धर्माच्या नांवावर पुष्कळ निरर्थक व अहितकारक चाली आल्या आहेत. मुसलमानी राज्यांत धर्मशास्त्राचा बराच लोप होऊन, त्यानंतर स्वभावतःच ब्राह्मणी राज्यांत त्यास फाजील महत्त्व प्राप्त झाल्यामुळें, मूळ धर्मग्रंथांत ज्या संस्कारांचें किंवा चालींचें विशेष प्राबल्य नव्हतें, ज्या तत्कालीन लोक धर्मदृष्ट्या आवश्यक, अनित्य किंवा वैकल्पिक मानीत असत, ते संस्कार किंवा त्या चाली आमच्या अज्ञानानें व फाजील भक्तीनें प्रचारांत येऊन " शास्त्रात् रूढिर्बलीयसी " या न्यायानें आज आमच्या हाडांस खिळून राहिल्या आहेत. अशा रीतीभातीसंबंधानें शांतपणानें विचार करण्यास किती लोक आज तयार आहेत, याचा प्रत्यय आमच्या वाचकांस मागेंच येऊन चुकला आहे. तथापि अशा गोष्टीबद्दल चर्चा कोणीं तरी प्रथमतः सुरू केली पाहिजे, हें मनांत आणून आज शिरोलेखांत नमूद केलेल्या संस्काराविषयीं दोन शब्द लिहिण्याचें आम्हीं योजिलें आहे. गर्भाधानसंस्कार शास्त्रदृष्ट्या अनवश्यक आहे, याबद्दल आतां मेषस्वभावांच्या किंवा दुराग्रही, कांहीं लोकांवांचून कोणास संशय राहिला असेल, असें वाटत नाहीं. तथापि व्यवहारदृष्ट्या सदर संस्कारावर निरर्थकता व ग्राम्यता, या दोन दोषांखेरीज (हे दोष लहान आहेत असें नाहीं) दुसरा कोणताही आरोप ठेवितां येत नाहीं. पण दत्तक संस्काराचा प्रकार याहून फारच निराळा आहे. धर्मदृष्ट्या पुत्राचे अभावीं त्याचें काम करण्यास अनेक उपाय असतां, त्यांपैकीं हा ' आक्टिंग ' पुत्राचाच उपाय प्रचारांत आल्यामुळें, कित्येक लोकांच्या कष्टार्जित द्रव्याचा अपव्यय होऊन, आज आपल्या देशाचें कोट्यावधि रुपयांचें नुकसान होत आहे. यावरून असें कोणीं समजूं नये कीं, ज्या वेळेस हा प्रघात सर्वत्र सुरू झाला, त्या वेळेस व्यवहारदृष्ट्या त्याची कांहींच जरूर नव्हती. कोणत्याही राष्ट्राचा इतिहास ज्यानें अगदीं वरवर वाचिला असेल, त्यास खुद्दां असें कळून येईल कीं, धर्मांत न सांगितलेला, म्हणजे शुद्ध व्यावहारिक किंवा अर्धवट धर्मोक्त प्रघात, एखाद्या काळीं प्रचारांत येण्यास त्या त्या वेळची स्थिति

बरीच कारणीभूत असते. पण एकदां कांहीं कारणांनीं एखादी गोष्ट प्रचारांत आली, म्हणजे कालांतरानें तीं कारणें नाहींशीं झालीं तरीही तो प्रचार सोडवत नाहीं. मनुष्याच्या मनाची प्रवृत्ति स्वभावतःच होतील तितके कमी श्रम करण्याकडे असल्यामुळें, एखादा चालू प्रघात आपल्यास किती हितकारक आहे, व त्याचे जागीं दुसरा एखादा प्रघात सुरू केल्यास त्यापासून आपणांस काय काय फायदे किंवा तोटे होतील, याचा पूर्ण विचार करण्यास जे मानसिक श्रम लागतात, ते करण्यास फारच थोडे लोक तयार असतात. व या थोड्यांपैकींही, विचारांतीं एखादा नवा प्रघात पूर्वींपेक्षां हितकारक ठरल्यावरही,—

'पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि काव्यं नवमित्यवद्यम्'

असें म्हणून तो नवीन प्रघात अमलांत आणणारा एखादा सांपडल्यास विरळा! सुधारणेस जेवढे म्हणून अडथळे आले आहेत तेवढे याच कारणामुळें होत. तथापि मनुष्याच्या मनाच्या या स्वाभाविक प्रवृत्तीपासून कांहींच फायदा होत नाहीं असें म्हणतां येत नाहीं. अशी प्रवृत्ति नसती तर प्रतिदिवशीं हजारों नवे फेरफार होऊन समाजाचें तारूं कोणीकडे भडकलें असतें तें सांगवत नाहीं. शिवाय विचार केल्यावांचून 'जुनी' म्हणूनच एखाद्या रितीभातीस चिकटून रहाण्याची जरी मनुष्याची प्रवृत्ति असली, तथापि त्याच्यांत विचारशक्तीचें प्राबल्य असल्यामुळें हळूहळू कांहीं जुन्या रीती वाईट अशी त्याची खात्री करण्यास कठिण पडत नाहीं. असें नसतें तर आज ज्या शेंकडों नवीन रीति प्रचारांत येत आहेत त्या कधींही आल्या नसत्या. असो; एवढी प्रस्तावना करण्याचें कारण इतकेंच कीं, शिरोलेखांत सांगितलेल्या विषयाच्या संबंधानें चर्चा करतेवेळीं तरी (अमलांत आणण्याची गोष्ट निराळी) हा प्रघात आज बरेच दिवस सुरू आहे. यापेक्षां जास्त कांहीं आहे कीं काय, याचा विचार प्रत्येकानें शांतपणें करावा. आमच्या मतें तर हा संस्कार धर्माप्रमाणें अवश्यक नसून, तो ज्यावेळीं प्रचारांत आला, त्यावेळीं त्यापासून जे फायदे होत होते, त्यांपैकीं हल्लीं एकही फायदा होत नसून, उलट त्याच्या शतपट नुकसान होत आहे. ह्यापैकीं पहिला भाग धर्मशास्त्राचा, व दुसरा केवळ अर्थशास्त्राचाच आहे, असें म्हटलें असतां चालेल. दत्तकसंस्कार धर्मदृष्ट्या अनवश्यक ठरल्यावर, मग त्यापासून व्यवहारांत काय काय तोटे होतात, हें सांगण्यास व समजण्यास ठीक पडेल; करितां प्रथमतः धर्मशास्त्रदृष्ट्या, याचा विचार करून, नंतर त्याच्या व्यावहारिक

स्वरूपाकडे वळण्याचा आमचा इरादा आहे. शिवाय असें केल्यानें धर्मसंस्कारांचा व्यवहारदृष्ट्या एकदम विचार झाल्यास वृथाधर्माभिमान्यांची जी फुकट काव कावे होते, तीही बंद पडेल. धर्मसंबंधानें केवळ युक्तीनें विचार करण्याचा प्रघात कोणत्याही देशांत अजून पूर्णपणें पटला नाहीं, तथापि "स्वधर्मे निधनं श्रेयः" या गीतावाक्यास मान डोलविणाऱ्या, व कणाद, शाक्य व वेदान्त या मतांचा एकाच जातीखालीं समावेश करणाऱ्या लोकांमध्यें तो जितका असावा तितका नाहीं याचें आश्चर्य वाटतें. आम्हांस आज जी उपोद्घातांत एवढी जागा अडवावी लागली त्याचें तरी बीज हेंच. असो, लिहितां लिहितां हा लेख बराच लांबल्यामुळें आज दत्तकसंस्काराच्या ज्या भागाविषयीं आम्हीं लिहिण्याचें योजिलें होतें, तो तसाच राहिला; करितां पुढील खेपेस या संस्काराच्या अवश्यकतेसंबंधानें धर्मशास्त्रकारांचें काय म्हणणें आहे तें, व एकंदर धर्मदृष्ट्या या संस्कारास किती महत्त्व येतें तें, सांगून, नंतर त्यांत अर्थशास्त्राचे संबंधानें जे दोन चार मोठ्या महत्त्वाचे विचारार्ह मुद्दे आहेत त्यांजकडे वळूं. या विषयावरील सर्व विचार एका निबंधांत नाहींत हें वरील प्रस्तावावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल.

मागील अंकीं असल्या विषयाचे संबंधानें लोकांच्या साधारण समजुती कशा प्रकारच्या असतात, व त्या सोडण्यास ते कितपत तयार असतात, वगैरे गोष्टींचें निरूपण केलें. आतां मागें सांगितल्याप्रमाणें या विषयाच्या पहिल्या भागाकडे, म्हणजे धर्मदृष्ट्या या संस्काराची कितपत जरूर आहे, या मुद्याकडे वळूं.

धर्मशास्त्रावरील जुने ग्रंथ पाहिले तर असें दिसून येईल कीं, फार प्राचीन काळीं दत्तकाचा प्रघात हल्लीं आहे तितक्या जारीनें सुरू नव्हता; किंबहुना त्यास मुळींच महत्त्व नव्हतें, असें म्हटलें असतां चालेल. दत्तकावर हल्लीं जेवढे म्हणून उपलब्ध ग्रंथ आहेत तेवढ्या सगळ्यांतून दत्तकसंस्काराचें मूळ म्हणून, जीं वचनें दिलीं आहेत, तीं सर्व स्मृतिग्रंथांतून घेतलीं आहेत. आतां येवढ्यावरून स्मृतिकारांपूर्वी दत्तकसंस्कार नव्हता असें अनुमान करितां येत नाहीं हें खरें; तथापि स्मृतिकारांपूर्वी या संस्कारास विशेष महत्त्व नव्हतें, असें म्हणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. वेदांतून "नापुत्रस्य लोकोऽस्ति," "पुत्रेण लोकान् जयति," "एष वा अनृणो यः पुत्री" वगैरे 'पुत्रानें स्वर्गप्राप्ति होते,' 'पुत्रानें पितरांचें ऋण फिटतें,' इत्यादि अर्थांचीं वाक्यें सांपडतात. परंतु मनु, याज्ञवल्क्य वगैरे

स्मृतींतून 'अमक्यानें दत्तक घ्यावा,' 'अमक्यानें घेऊं नये,' 'एकच मुलगा असल्यास दत्तक देऊं नये' वगैरे जे नियम आढळतात, ते वेदांत दिले नाहींत. शिवाय स्मृतिकारांनीं नापसंत केले असते, असे दत्तक झाल्याचीं उदाहरणेंही वेदांत सांपडतात. विश्वामित्रानें आपले शंभर पुत्र हयात असतांही शुनःशेपास आपला पुत्र केल्याची कथा ऋग्वेदांत आहे, व यजुर्वेदांत अत्रि ऋषीनें आपले सर्व मुलगे और्वऋषीस दिल्याचें सांगितलें आहे.* सदरहू दोन्हीं उदाहरणें मन्वादि शास्त्रकारांच्या मतें अशास्त्र आहेत. मग आमच्या बादशाहिणीच्या नामदार कोर्टांत खटला येता, तर त्याचा वेस्ट्राप ऋषींनीं काय निकाल केला असता, हें सांगावयास नकोच! कलियुगांत औरस पुत्राची जागा भरण्यास दत्तकाखेरीज जसा दुसरा उपाय नाहीं, तशी पूर्वी स्थिति नव्हती. धर्मग्रंथांतून औरस पुत्रासुद्धां एकंदर बारा¶ प्रकारचे पुत्र सांगितले आहेत, व कलियुगापूर्वी ते सर्व प्रचारांत असत; त्यामुळें हल्लीं इतकी पूर्वी दत्तकावरच झोड पडत नसे, हें स्वाभाविकच आहे. वेदांत तरी दत्तकाचें विशेष प्राबल्य नसण्याचें मुख्य कारण हेंच असावें, असें आम्हांस वाटतें. वेदांत स्वर्गप्राप्तीचे पुत्रोत्पत्ती-खेरीज दुसरे जे पुष्कळ उपाय आहेत त्यांजवर, व संततीच पाहिजे असें वाटल्यास वर सांगितलेल्या बारा पुत्रांपैकीं एखाद्यावर, तत्कालीन लोक निर्वाह करीत असत. पुढें दिरापासून पुत्रोत्पत्ति करून घेण्याची लाज वाटल्यानें म्हणा अगर सदर प्रघात कलियुगांत चालू राहिल्यास घोर पातकें होतील या भीतीनें म्हणा, क्षेत्रजादि पुत्रांचा प्रचार जेव्हां बंद झाला तेव्हां आमच्या दत्तोचाचें प्रस्थ

---

* रावसा. मंडलिककृत इंग्रजी हिंदुधर्मशास्त्र पहा. या ग्रंथांत या प्रकरणाचा चांगला विचार केला आहे. रावसाहेबांच्या मतें हा संस्कार खरोखर अनवश्यक असून त्यास हल्लीं उगीच अवश्यक मानितात. या निबंधांतील बराच भाग सदरील ग्रंथांतून घेतला आहे.

¶ ते बारा पुत्र हेः—

औरसो धर्मपत्नीजस्तत्समः **पुत्रिकासुतः**। **क्षैत्रजः** क्षेत्रजातस्तु सगोत्रेणेतरेण वा ॥
गृहे प्रच्छन्न उत्पन्नो **गूढजस्तु** सुतः स्मृतः। **कानीनः** कन्यकाजातो मातामहसुतो मतः ॥
अक्षतायां क्षतायां वा जातः **पौनर्भवस्तथा**। दद्यान्माता पिता वा यं स पुत्रो **दत्तको** भवेत् ॥
क्रीतस्तु ताभ्यां विक्रीतः **कृत्रिमः** स्यात्स्वयंकृतः ॥
दत्तात्मा तु **स्वयंदत्तो** गर्भे विन्नः **सहोढजः**। उत्सृष्टो गृह्यते यस्तु **सोपविद्धो** भवेत्सुतः

यांपैकीं दत्तक व औरस खेरीज कलियुगांत इतर वर्ज्य केले आहेत. आपल्या दृष्टीनें आतां ते अगदीं रानटी व ग्राम्य दिसतात.

सहजच माजत चालले, व दत्तक देण्याघेण्याच्या कायद्याचीं कलमें पास होऊं लागलीं. हीं कलमें स्मृतिग्रंथांतूनच पहिल्यानदां आढळतात; यावरून हा फेर-फार स्मृतिकालींच थोडा थोडा अमलांत येत चालला असावा असें अनुमान होतें. तथापि स्मृतिकारांस पूर्वीच्या द्वादश पुत्रांचा विसर पडला नव्हता, हें खालीं लिहिलेल्या वचनावरून ध्यानांत येईल. परंतु कालांतरानें तेंही जाऊन अलीकडे तर दत्तकाखेरीज स्वर्गाचे दरवाजे खुलेच होत नाहींत, असा, लोकांचा समज होऊन बसला आहे! वरील हकीकतीवरून हा समज किती यथार्थ आहे याची थोडीबहुत कल्पना वाचकांस आलीच असेल. परंतु याची विशेष फोड होणें इष्ट होय; करितां त्याच्या खुलासेवार विचारास लागूं.

वेदांत यासंबंधानें उदाहरणें आहेत, पण नियम नाहींत, हें मागें सांगितलेंच आहे. यावरून वेदकालीं दत्तकाचें महात्म्य नव्हतें असें होतें. मनुस्मृतींत दत्तक कां घ्यावा, यास दोन कारणें सांगितलीं आहेत, तीं अशीं:—

अपुत्रेण सुतः कार्यो यादृक्तादृक्प्रयत्नतः।
पिंडोदकक्रियाहेतोर्नामसंकीर्तनाय च॥

अर्थ—पिंडोदक देण्यासाठीं, व नांव घेण्याकरितां निपुत्रिकानें कसेंही करून मुलगा (दत्तक वगैरे) करावा—यांत मनूनें दत्तक घेण्यास दोन कारणें दिलीं आहेत. एक श्राद्ध, क्रिया वगैरे करणें, व दुसरें नांव चालविणें; पैकीं पहिलें कारण धर्मविषयक असून, दुसरें निवळ व्यावहारिक आहे हें कोणाच्याही लक्षांत येईल. इंग्रजी कोर्टांप्रमाणें धर्म व व्यवहार यांची स्मृतिकारांनीं निखालस फारकत करून दिली नव्हती, हें आम्हीं मागें अनेक वेळां सांगितलेंच आहे. कोणतीही स्मृति घेतली तरी नींत भाऊबंदांचे तंटे, चोरी व मारामारी यांस शिक्षा, राजधर्म, श्राद्ध, मुंज, लग्न, वगैरे धर्म, व व्यवहारसंबंधीं सर्व गोष्टी यांचा समावेश केलेला असतो; व तदनुरूपच वरील श्लोकांतही मनूनें दोनही हेतु एकाच ठिकाणीं दिले आहेत. या दोनही कारणांचा आजच्याच अंकांत विचार व्हावयाचा नाहीं; करितां व्यावहारिक हेतु—म्हणजे नांव चालविणें याचा विचार पुढलि खेपेवर टाकून पहिल्याच कारणाचा आज विचार करूं. दत्तक घेतल्यानें आपलें श्राद्ध, क्रिया वगैरे करण्यास आपण एक अधिकारी करून ठेवितों, व पुत्रप्राप्तीपासून जें स्वर्ग-सुख तेंही आपणास प्राप्त होतें, हें जरी सर्वथैव खरें आहे, असें मानिलें, तरी तेवढ्यावरूनच स्वर्गप्राप्तीस व पिंडोदक देण्यास दत्तकाखेरीज उपायच नाहीं,

असा सिद्धांत करितां येत नाहीं. दत्तकानें अमुक एक कार्य होतें असें जरी मानिलें, तरी तेवढ्यानेंच तें कार्य दत्तकावांचून होत नाहीं, असा अर्थ निघत नाहीं. जेथें जेथें धूर असतो तेथें तेथें अग्नि असतो, हें वाक्य जरी खरें आहे, तरी त्याच्या उलट म्हणजे जेथें अग्नि तेथें धूर हें वाक्य खरें नाहीं. पण इतकेंही दूर जावयास नको. पुत्राचें (मग तो दत्तक असो का औरस असो) तोंड पाहिल्याखेरीज जर स्वर्ग मिळत नाहीं, तर जगद्गुरु शंकराचार्यांची वाट काय ? तुकारामबुवा कुठें आहेत ? व वामन पंडितांच्या 'अजित नाम घडो भलत्या मिषें' या सूत्राचें काय करावयाचें ? ह्या गोष्टी मनांत आणल्या म्हणजे पुत्रोत्पादन हा स्वर्गप्राप्तीच्या अनेक मार्गांपैकीं एक मार्ग आहे, येवढेंच मात्र म्हणावें लागेल व वास्तविक प्रकारही असाच आहे. आमच्या शास्त्रकारांनीं स्वर्गाची वाट अगदीं सुलभ करून ठेविली आहे. दान, तीर्थयात्रा, पुराणश्रवण, ब्रह्मचर्य, योगाभ्यास, संन्यास, वेद म्हणणें व शिकविणें, एखादी पाणपोय, धर्मशाळा, मठ किंवा देवालय बांधणें, भगवन्नामकीर्तन व श्रवण वगैरे पुष्कळ गोष्टी पुत्रोत्पादनाप्रमाणेंच स्वर्गप्राप्तिकारक आहेत, असें श्रुतिस्मृतिपुराणग्रंथांचें* साधारण मत आहे. सगळ्या अठरा पुराणांचें सार "परोपकारः पुण्याय" या वाक्यांत कोंदलें आहे. असें असतां दत्तकांत विशेष काय ? कोणी असें म्हणतील कीं, वर सांगितलेले उपाय संकटसमयीं आहेत; त्यास उत्तर हेंच कीं, दत्तविधानही आपत्कालींच सांगितलें आहे.† एतावता निष्पन्न काय होतें कीं, औरस पुत्र नसल्यास स्वर्गप्राप्तीसाठीं दत्तकपुत्र घेण्याची जरूर नाहीं. तें काम पुष्कळ इतर उपायांनीं होण्याजोगें आहे. मग आपल्यास आपल्या (दत्तक) पुत्राकडूनच

---

* धर्मग्रंथांतून या अर्थाचीं पुष्कळ वचनें आहेत, पैकीं कांहीं येथें देतोः—ऋग्वेद १०,१४, ८ यांत 'संगच्छस्वपितृभिः सं यमेनेष्टापूर्तेन परमे व्योमन्' म्हणजे धर्मशाळा वगैरे बांधल्यानें स्वर्गप्राप्ति होते असें दिलें आहे. याज्ञवल्क्यस्मृतींत 'तेनाग्निहोत्रिणो यांति स्वर्गकामा दिवं प्रति। ये च दानपराः सम्यगष्टाभिश्च गुणैर्युताः। तेपि तेनैव मार्गेण सत्यव्रतपरायणः' अशीं अनेक वचनें आहेत. दुसरें 'न्यायागतधनस्तत्त्वज्ञाननिष्ठोतिथिप्रियः श्राद्धकृत्सत्यवादी च गृहस्थोपि च मुच्यते' स्कांद पुराणांत-'कृत्वा मठं प्रयत्नेन शयनासनसंयुतं। पुण्यकाले द्विजेभ्यो वा यतिभ्यो वा निवेदयेत्। सर्वान् कामानवाप्नोति निष्कामो मोक्षमाप्नुयात्। असें स्पष्ट आहे. यावरून वाचकांच्या दुसरें असेंहि लक्षांत येईल की, वरील वचनांत दत्तकाच्या अभावीं हे उपाय आहेत असें कोठेंहि सांगितलें नाहीं. वस्तुतः दत्तकाहूनही स्वर्गप्राप्तीचे हे अधिक श्रेयस्कर मार्ग आहेत.

† मनुः--"माता पिता वा दद्यातां यमद्भिः पुत्रमापदि"

स्वर्गप्राप्ति झाली पाहिजे, या आग्रहास दुराग्रहापेक्षां दुसरें कांहीं म्हणतां येणार नाहीं. दत्तकावरील ग्रंथकाराचेंही मत त्याचप्रमाणें आहे. दत्तकमंजरीकारांनीं तर 'पुत्रप्रतिनिधिः काम्य एव' म्हणजे दत्तक वस्तुतः अनवश्यक आहे, असा स्पष्ट शास्त्रार्थ दिला आहे. अमुक एक मनुष्याचे हातूनच मला स्वर्गप्राप्ति झाली पाहिजे, याखेरीज यांत कांहीं मतलब नाहीं, असेंही आणखी त्यांनीं सांगितलें आहे. सारांश शास्त्रदृष्ट्या स्वर्गप्राप्तीस दत्तकाची जरूर मुळींच नाहीं, मग दुराग्रह व रूढि काय म्हणतील तें म्हणोत.

धर्मसंबंधीं दुसरा मुद्दा पिंडोदकदानाचा. याही संबंधें आमचें मत वरील-प्रमाणेंच आहे. आधीं स्वर्गप्राप्ति झाल्यावर श्राद्धादिकांची जरूरच नाहीं; तथापि मुलगा नसल्यास भाऊ, पुतणे, बायको, इतर आप्त वगैरे पुष्कळ श्राद्धाधिकारी सांगितले आहेत, व दत्तक न घेतल्यानें म्हणजे कांहीं अडतें, असा मुळींच प्रकार नाहीं. "मलमेतन्मुनष्याणां द्रविणं परिकीर्तितं । ऋषिभिस्तस्य निर्दिष्टा निष्कृतिः पावनी परा । आदेहपतनात्तस्य कुर्यात्सर्वौर्ध्वदेहिकं" असें जो जो मृताचें धन घेईल त्याच्या पाठीमागें शास्त्रकारांनीं लचांड लावून दिलें आहे. बरें इतकेंही असून आपल्या पाठीमागें कोणी आपलें श्राद्ध करील कीं नाहीं, याचा आपणास संशय असल्यास आपल्या हयातींतच आपली क्रिया व श्राद्ध आगाऊ करून घेण्याचा अधिकार स्मृतिकारांनीं आपणांस दिला आहे; तो इतका कीं, पुत्रादि वारस असतांहि सदर कार्यभाग आपणांस आधींच उरकून घेतां येतो! अशा श्राद्धास जीवच्छ्राद्ध म्हणतात, व हें आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांच्या ऐकण्यांत असेलच. धर्मशास्त्राची एवढी सोय असतां, मरतां मरतां दत्तक घेण्याची एवढी ओढ कां बरें असावी! बरें तो तरी मनमोकळें करून घेतात काय! नाहीं; तर, परलोकाचें प्रस्थान ठेवणाऱ्याची पत्नी हयात असेपर्यंत असा करार कीं, दत्तकानें इस्टेटीची कांहीं गडबड करूं नये! 'गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः।' दुसरें काय!

वर दत्तकपुत्र घेण्यास मनुस्मृतींतील जीं दोन कारणें सांगितलीं, त्यांपैकीं पहिल्याचा विचार केला. त्याच श्लोकांत सांगितलेलें जें दुसरें कारण म्हणजे— "नामसंकीर्तन" तें तरी कितपत यथार्थ आहे तें पाहूं. परंतु तत्पूर्वी वाचकांस एवढें कळविणें इष्ट आहे, कीं गेल्या खेपेस ज्याप्रमाणें एका हेतूचें आम्हीं अयथार्थत्व दाखविलें, त्याप्रमाणें या दुसऱ्या हेतूचाही धर्माशीं कांहीं एक संबंध नसून,

तो फक्त व्यावहारिक आहे. हा लोक सोडून गेल्यानंतर, परलोकांत प्रत्येक मनुष्याची संस्था नीट व्हावी, हें प्रत्येक धर्माचें बीज होय; मग आवडीच्या किंवा मताच्या वैचित्र्यामुळें त्यांत पाहिजे तेवढे प्रकार होवोत. धर्मग्रंथांचा मूळ हेतु हा असल्यामुळें, त्यांतून मध्यें मध्यें इहलोकच्या सुखप्राप्तिबद्दल जे नियम दिले असतात, ते धर्माच्या प्रधान अंगांत गणितां येत नाहींत. व एकदां कोणतीही गोष्ट व्यावहारिक ठरली म्हणजे तिला धर्माच्या पांघरुणानें जी मातब्बरी प्राप्त होते, तीस ती मुकत्ये; मग ती गोष्ट कितीही महत्त्वाची असो. परलोकांत आपल्यास "रिझर्व्ह" जागा मिळावी, म्हणोन इहलोकीं कांहीं लोक आपल्या शरीराचे काय काय हाल करून घेतात, हें ज्याणें प्रत्यक्ष पाहिलें असेल, त्यास वरील वाक्यांचें यथार्थत्व बरोबर कळून येईल. धर्म व व्यवहार ह्यांमध्यें इतका भेद स्वभावतःच असतो, व त्या दृष्टीनें पाहिलें, तर दत्तक घेण्याचा पहिला हेतु धर्मरीत्या अनवश्यक ठरल्यावर नांव चालविण्याच्या दुसऱ्या हेतूस महत्त्व देणें किंवा न देणें, हें प्रत्येकाच्या मर्जीवर आहे. धर्माज्ञेच्याबाहेर पडल्यावर, पिनल कोडाच्या हद्दींत येईपर्यंत, प्रत्येक मनुष्य अगदीं स्वतंत्र आहे. व हल्लींच्या काळांत समाजनियमांचें बंधन शिथिल झाल्यामुळें तर, ही स्वतंत्रता अलीकडे विशेष प्रबल, व कांहीं गोष्टींत तर अगदीं उच्छृंखल झालेली नजरेस येते. पण आज त्या गोष्टींचा आपणास विचार कर्तव्य नाहीं. सारांश, एखादी गोष्ट निवळ व्यावहारिक ठरली म्हणजे तिची अवश्यकता कमी होण्यास तेवढेंच कारण बस्स होतें, व हाच नियम वरील दत्तकाच्या हेतूसही लागू आहे. "नामसंकीर्तन" (नांव चालविणें) ही एक धर्मांतील बाब नसल्यामुळेंच तिचें अवश्यकत्व प्रथमतः कमी झालें; व त्यांत कांहीं हंशील आहे, असें ज्यास वाटत असेल, त्याखेरीज दुसरा कोणताही मनुष्य तेवढ्याच कारणानें दत्तक घेण्यास राजी होणार नाहीं. करितां मनूनें सांगितलेल्या वरील व्यावहारिक हेतूंत कांहीं हंशील आहे कीं काय, याचा विचार करूं.

आतां पहिल्यानें येवढी गोष्ट कबूल केली पाहिजे, कीं आपलें नांव आपल्या पाठीमागें चिरकाल रहावें, अशी प्रत्येक मनुष्यास अगदीं स्वभावतःच इच्छा असते. एका इंग्रजी ग्रंथकारानें तर वरील इच्छेची व अमरत्वाची सांगड घालून दिली आहे, व याज्ञवल्क्यस्मृतींत वरील मनुस्मृतींतल्या श्लोकाच्या अर्थाचा जो श्लोक आहे, यांतीलही आशय त्याचप्रमाणें आहे. "लोकानंत्यं

दिवः प्राप्तिः पुत्रपौत्रप्रपौत्रकैः " म्हणजे मुलगा, नातू व पणतू यांणीं इहलोकीं आनंत्य (निरंतर नांव रहाणें) व स्वर्गप्राप्ति होते असें त्या स्मृतींत वाक्य आहे. सर्व मनुष्यें जर अमर असतीं, तर पुत्राची जरूर कोणास कदाचित् वाटली नसती. पण मृत्यु हा सर्वांस साधारण असून, आपणांस हें जग कधींना कधीं तरी सोडून गेलें पाहिजे, तेव्हां शरीर, रूप, बांधा, व बुद्धि यांत अगदीं आपणासारखा (बहुतेक मुलगे वरील गोष्टींत आपल्या वाडिलांप्रमाणेंच असतात) असा एक पुत्ररूप आपला प्रतिनिधि जगांत ठेवून त्याच्याद्वारें आपलें स्मरण जगांत चिरकाल ठेवावें, ही इच्छा मनुष्यांत सहजच उद्भवली. " आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि " या नीतिवाक्याचें जें मूळ आहे, त्यानेंच मेल्यावरही आपलेपणाचें रक्षण करण्याकरितां, पुत्राची अवश्यकता सिद्ध होते. तशांत ज्यावेळीं मनुष्य जातीची स्थिति अगदीं बाल्यावस्थेत होती, त्यावेळीं तर पुत्रोत्पादनाची इच्छा विशेष बळकट होण्याचा जास्त संभव होता. मनुष्यजातीची पहिली सुधारलेली अवस्था म्हणजे कुटुंबावस्था होय. कंदमूलांदिकांवर निर्वाह करून वनचर श्वापदांप्रमाणें हवें तिकडे भडकावें, ही आपली अगदीं पहिली स्थिति होय. अद्यापिही आफ्रिकेच्या व अमेरिकेच्या रानांतून असलीं कांहीं मनुष्यें आढळतात. यानंतरची स्थिति म्हटली म्हणजे, उदरनिर्वाहाकरितां कंदमूलादिकांवर अवलंबून न राहतां, गाई, म्हशी, वगैरे दुभतीं जनावरें बाळगून त्यांस चारा मिळेल तिकडे सहकुटुंब त्यांच्या पाठोपाठ हिंडत जाणें ही होय. या कालीं शेतकीची युक्ति निघून गांव वसलें नव्हतें. कुटुंबांतील मुख्य पुरुष इतर माणसांवर त्याकालीं अगदीं राजाप्रमाणें अंमल चालवीत असे, व कुटुंबाचें सर्व ओझें त्या एकट्याच्या माथीं पडत असे. आतां आपण असा विचार करूं, कीं अशा काळीं एखाद्या कुटुंबांतील मुख्य पुरुष जर एकाएकीं निपुत्रिक मरण पावला, तर त्याच्या कुटुंबाची स्थिति काय होईल ? बिचाऱ्यांस कोणीहि त्राता न राहून रानावनांत हिंडावें लागेल ! आपल्या पाठीमागें आपलें नांव चालविण्याची इच्छा राहूं द्या; पण आपल्या कुटुंबाचें पोषण करण्यास तरी आपल्या पाठीमागें कोणी पाहिजे, अशी स्वाभाविकच इच्छा नाहीं का होणार ? मग त्यांत नांव चालविण्याच्या इच्छेची भर पडल्यावर काय विचारायाचें ? आपल्या वैदिक ऋषींची सामाजिक स्थिति बहुधा वर लिहिल्याप्रमाणेंच होती. हें मनांत आलें म्हणजे " कुचबी करना और लडका बनाना, " अशी जी त्यांची उत्कट इच्छा असे तिचें बीज आपणास कळून येईल ! जसजशी मनुष्यजातीची

स्थिति सुधारत चालली, अनेक कुटुंबें एका ठिकाणीं राहूं लागून गांव वसलें, व एका कुटुंबांतील माणसांनीं दुसऱ्या कुटुंबांतील माणसांस त्रास दिल्यास, त्याचा निर्णय पंचांच्या मार्फत होऊं लागला, तसतसा कुटुंबांत मुख्य नसला तरी, त्यांची व्यवस्था साधारणपणें बरी राहील असा भरंवसा प्रत्येकास वाटूं लागला. तथापि आपलें नांव चिरकाल राहण्याचे पुत्रोत्पादनाखेरीज दुसरे उपाय नव्हते. सर्वांनीं मिळून जामिनीची लागवड करून त्यावर एकोप्यानें राहून निर्वाह करावा, यापेक्षां या स्थितींत मनुष्याचा दुसरा कांहीं हेतु नव्हता. धाडस, पराक्रम, विद्या, कवित्व, औदार्य वगैरे ज्या गुणांनीं, परशुराम, राम, कृष्ण, कर्ण, व्यास, कालिदास वगैरे प्राचीन मंडळी, व तुकाराम, मोरोपंत, बाजीराव, नाना फडणवीस, सर जमशेटजी जीजीभाई वगैरे आर्वाचीन मंडळी अजरामर झाली, ते गुण त्याकाळीं मनुष्यांत आले नव्हते म्हणा, किंवा आले असूनही त्यांचा विकास होण्यास त्यावेळची सामाजिक स्थिति अनुकूल नव्हती म्हणा; कसेंही असो. मनुष्यजातीच्या पूर्वावस्थेंत नांव चालविण्यास ज्याप्रमाणें पुत्राची जरूर असे, तशी आतां राहिली नाहीं, हें अगदीं उघड आहे. शिवाजीचें स्मरण आपणांस राहण्यास संभाजी कारण झालें काय ? किंवा नाना फडणवीसांच्या कुटुंबानें त्यांच्या मागें दत्तक घेतल्यामुळेंच त्यांचें नांव इतिहासांत आलें काय ? बंडांतील नाना खेरीज करून किती दत्तकांनीं तरवार गाजविली आहे ? लहानपणापासून एखाद्या मुलास आपल्या देखरेखीखालीं ठेवून त्याच्यांत आपल्या कुलाचा अभिमान, शौर्य वगैरे गुण दृष्टोत्पत्तीस येऊं लागल्यावर, मग त्यास दत्तक घेतला असतां, तो दत्तक आपल्या घराण्याचें नांव कांहीं तरी चालवील. पण असा दत्तक आपणांपैकीं किती लोक घेतात ? आधीं मरेपर्यंत पुत्र होण्याची आशा सुटत नाहीं; बरें, तितकेंही करून एखाद्यानें दत्तक घेण्याचें योजलें, तर आपल्या पाठीमागें दत्तक मुलगा आपल्या बायकोस कसें वागवील, याची भीति मनांत उभी राहते ! दत्तक घेणारा जिवंत असतांच, दत्तक मुलानें इस्टेटीचा वांटा मागितल्याचीं उदाहरणें आपणांत बरींच आढळतात. मग सपिंडी होण्यापूर्वीच आईचें व दत्तक मुलाचें जामदारखान्याच्या किल्ल्यांसंबंधीं भांडण झाल्यास काय नवल ? बोलून चालून बिछान्यावर मरणोन्मुख पडलें असतां, एखादा उपरी पोर धरून आणून स्वर्गाचे दरवाजे मोकळे करून घेतल्याचें सुख मानून घ्यावयाचें ? मग अशा पोरानें आपलें नांव राखण्यापेक्षां बुडविल्यास आश्चर्य तें कोणतें ? नांव राखण्याचे दुसरे कांहीं

मार्गच नव्हते, त्या वेळची गोष्ट निराळी होती. पण हल्लीं आपलें नांव कायम ठेवण्यास वर सांगितलेले पुष्कळ मार्ग असतां, असल्या वेडगळ मार्गानें जाण्यांत अर्थ कोणता ? आपलें व आपल्या कुलाचें नांव व इस्टेट एखाद्या उपरी पोराच्या हवालीं करून, तो आपलें नांव राखील या आशेवर वसण्यापेक्षां एखादें धर्मकृत्य करून तद्द्वारा आपलें नांव लोकांत ठेवून, स्वार्थ व परमार्थ एकाच कार्मीं साधत असतांही, केवळ गतानुगतिक न्यायानें आपण आपल्या नांवास व इस्टेटीस मुकत आहों, हें अगदीं स्वल्प विचारांतीं देखील साधारण बुद्धीच्या मनुष्यास समजण्याजोगें आहे. तथापि पूर्वापार चालत आलेल्या चालीचा आपल्या मनावर एवढा बळकट ग्रह असतो, कीं आपणांस अगदीं सामान्य गोष्टी देखील दिसत नाहींत ! असो; लेख बराच लांबला, करितां दत्तकाचा प्रचार सोडून, त्याऐवजीं वर सांगितलेले मार्ग प्रचारांत आल्यास देशाचें काय हित होईल, याचा विचार पुढील खेपेस करूं. फार प्राचीन काळा-प्रमाणें हल्लीं नांव चालविण्यास दत्तकाची जरूर नाहीं, इतकें वरील विवेचना-वरून सध्यां वाचकांच्या नजरेस आलें असतां पुरें आहे.

कोणी असें म्हणतील कीं, तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें स्वर्गप्राप्तीकरितां जरी दत्तकाची जरूर नाहीं असें मानिलें, आपली क्रिया आपण आटपून घेतली, व वंशाचें नांव चालविण्याकरितां इस्टेट धर्मादायास लावून दिली, तथापि पुत्रत्व म्हणून जें कांहीं आहे त्याची तृप्ति कशानें करावी ? प्रत्येक मनुष्याचें आपल्या बायकोवर किंवा पुत्रावर जें प्रेम असतें, तें त्यांच्या केवळ उपयोगावरच नसतें; मग वरील प्रेमास विषयभूत असा एखादा प्रतिनिधि त्यानें पाहिल्यास, त्यास आपण कां म्हणून दोष ठेवावा ? भूक, तहान, वगैरे शारीरविकारांचे ज्याप्रमाणें अन्न, जल वगैरे विषय आहेत, त्याचप्रमाणें मानसिक विकारांचेही विषय असतात, व पुत्रप्रेम हा त्यांमधील एक असल्यामुळें, औरस पुत्र नसल्यास त्याची जागा अन्योपायांनीं भरून काढणें जरूर आहे.

वरील शंका प्रथमदर्शनीं अगदीं अनिवार्यशी दिसते; पण जरा नीट नजर दिली म्हणजे त्यांतील छिद्रें आपणांस दिसूं लागतात. शरीर ज्या द्रव्यांनीं घडलें आहे, तीं शरिरांतून पुनः आपल्या पूर्व स्थितींत रोज जात असतात. एखादा मनुष्य एक मैलभर चालला तर त्याच्या स्नायूंचा थोडाबहुत व्यय हा व्हावयाचा, व

हाच प्रकार बोलणें, हंसणें, ऐकणें, वगैरे हरएक क्रियेविषयीं समजावयाचा. दर मिनिटास किंवा पळासही आपल्या शरीरांतील कांहीं द्रव्यांचा व्यय होतच असतो. शरीर कायम टेवणें असल्यास, तो आपल्यास भरून काढिला पाहिजे. शरीरास असा व्यय नसता, तर कोणासही भूक व तहान लागतीना, व सर्व मनुष्यें अमर राहिलीं असतीं. सारांश भूक व तहान जीं आपण अगदीं साहजिक समजतों, तीं वरील घडामोडीवर अवलंबून असतात. त्यांचा व इतर मनोविकारांचा उगाच संबंध जोडण्यांत हांशील नाहीं. आपल्या पुत्रावर आपण जें प्रेम करितों, त्यास व्यक्त म्हणजे ज्यांचा उपयोग ढळढळीत नजरेस येतो अशा कारणांखेरीज दुसरीं अनेक कारणें असतात, हें आम्हांस अगदीं मान्य आहे. सहवास, आपलेपणाचा अभिमान, किंवा दोघांचीं शरीरें एकाच हाडा-मांसाचीं असल्यामुळें, समान द्रव्यांमध्यें असणारें साहजिक आकर्षण वगैरे कांहीं म्हटलें, तरी त्या प्रेमाचें पूर्ण कारण कळेलसें वाटत नाहीं. तथापि तेवढ्यानेंच वरील आक्षेप कसा सिद्ध होतो, हें आम्हांस कळत नाहीं. पिता-पुत्रांस जोडणारा संबंध वाचेस जरी अदृश्य असला तथापि, यासंबंधाचें अस्तित्व किंवा अभाव, दोहोंपैकीं एकाच ठिकाणीं कसा कल्पावयाचा ? लोह-चुंबक लोहाकर्षण करितो हें खरें; तथापि हा गुण लोखंडाचा का लोहचुंबकाचा, व तो अन्यनिरपेक्ष असूं शकेल, कीं नाहीं, वगैरे प्रश्न ज्याप्रमाणें वायफळ आहेत, त्याचप्रमाणें पुत्रप्रेमासंबंधीं वरील प्रश्न होय. बापाचें पोटच्या मुलावर प्रेम असतें, तथापि तें मुलाखेरीज व्यक्त व्हावयाचें नाहीं. तत्पूर्वी तें प्रेम असतें, याचा अर्थच आम्हांस समजत नाही. तात्पर्य मनुष्यास मुलगा झाला म्हणजे त्याच्यावर त्याची प्रीति जडते, परंतु ही प्रीति पुत्रेच्छेस कारण होत नाहीं. शिवाय औरस पुत्रापासून जें समाधान व सुख होतें, तितकें दत्तकापासून कधींही होत नाहीं, व होणार नाहीं. अगदीं तान्हें मूल घेऊन जरी आपण वाढविलें, व पुढें दत्तकही घेतलें, तथापि तें लोकाचें आहे, ही कल्पना मनांतून निघत नाहीं, व सुख पुष्कळ अंशीं कल्पनेवरच असतें; तेव्हां या नजरेनें पाहिलें तरी दत्तक गौणच पडतो. उघडच आहे. पोटच्या गोळ्यावरील प्रेम कोठें, व उगीच लावा-लावीचें कोठें !

सारांश प्रेमाकरतां कोणीही प्रथमतः दत्तक घेत नाहींत. आतां ज्याप्रमाणें औरस पुत्र असतां तुम्ही ' नांव चालविण्याचे ' मागील अंकीं सांगितलेले उपाय

करा असें कोणी म्हणत नाहीं, त्याचप्रमाणें एखाद्या मनुष्यास तसा पुत्र नसतां जर त्याचें प्रेम एखाद्या मुलावर जडून तो त्याच्या हाताखालीं लहानपणापासून वाढला असला, त्या दोघांचें अगदीं ऐक्य बनून गेलें असलें, तर अशास दत्तक घेऊं नये हें म्हणणेंही रास्त होणार नाहीं. त्याची सोय त्या मनुष्यानें केलीच पाहिजे. परंतु मरेपर्यंत मुलगा होण्याची वाट पाहून, मरणसमयीं गतानुगतिक-न्यायानें त्यानें किंवा पुढें त्याच्या पत्नीनें, आपलें घरदार एखाद्या पोराच्या स्वाधीन करणें, यास मूर्खपणाखेरीज काय म्हणावें, हें आम्हांस समजत नाहीं. त्या पोराचा तरी त्या इस्टेटीवर काय हक्क ? मालकाची इच्छा म्हणून कोणी म्हणेल, तर त्यास समाजाचा असा प्रश्न आहे, कीं मालकानें तरी ती आपली म्हणून हवीतशी उधळावी काय ? प्रत्येक मनुष्याचे मालमत्तेवर आमचा कांहींच हक्क नसावा काय ? असो; या प्रश्नांचीं उत्तरें आज देत बसल्यास आणखी दोन चार कालम लागतील, करितां तूर्त येथेंच मुक्काम करितों.

दत्तक घेण्यास व्यवहाररीत्या कोणत्याही तऱ्हेची अवश्यकता नाहीं, असें जरी मानिलें, तथापि त्यावर आणखी एक असा आक्षेप निघणार आहे कीं, ज्याअर्थीं प्रत्येक मनुष्यास आपण संपादिलेल्या धनाचा वाटेल तसा उपभोग घेण्याचा पूर्ण अधिकार आहे, व तो तें वाटेल त्यास देऊं शकेल, त्याअर्थीं त्या मनुष्यानें दत्तक घेतला, असें मानण्यापेक्षां त्यानें आपली इस्टेट आपणास वाटेल त्यास दिली, असें मानावें, म्हणजे दत्तकाची अवश्यकता आहे कीं नाहीं, हा प्रश्न मुळींच निष्पन्न होत नाहीं. दत्तक धर्मदृष्ट्या अवश्यक असो अगर नसो, आम्हीं आपल्या मालमिळकतीचा मालक त्यास करणार, व ज्यापेक्षां आमच्या द्रव्यावर आमचें पूर्ण स्वत्व आहे, त्यापेक्षां असें करण्यास आम्हांस दुसऱ्या कोणत्याही कारणाची अपेक्षा नाहीं.

वरील आक्षेपास उत्तर देण्यापूर्वी त्यांतील प्रधान सिद्धांताची, म्हणजे आपण संपादिलेल्या द्रव्याची हवी तशी विल्हेवाट करण्याचा, प्रत्येक मनुष्यास अधिकार आहे, या वाक्याची थोडी विशेष फोड करणें जरूर आहे. 'अधिकार' किंवा 'हक्क' हे शब्द जरा संदिग्ध असल्यामुळें, त्यांचा दुहसबी उपयोग होऊन, वाक्यांत उत्पन्न झालेली संदिग्धता एकदम लक्षांत येत नाहीं. एखादी गोष्ट करण्याचा आपणास 'अधिकार' आहे असें म्हटलें, म्हणजे प्रथमतः अशी कल्पना

मनांत येते, कीं आपण ती गोष्ट करूं लागल्यास कायदेशीर रीतीनें आपणास कोणाच्यानेंही अटकाव करवणार नाहीं व ही कल्पना मनांत आली, म्हणजे सहजच त्याबरोबर दुसरीही अशी कल्पना मनांत येते, कीं जर ही गोष्ट करण्यास कायदेशीर हरकत नाहीं, तर मग दुसरी कोणतीही हरकत राहिली नसून, ती गोष्ट करणें आपल्या खुषीवर आहे, व त्यासंबंधानें आपणास कोणीं कांहीं बोलूं नये. पण थोडा विचार केला असतां, वरील दोन कल्पनांची जी सांगड घालून दिली आहे, तींत कितपत तथ्यांश आहे, हें तेव्हांच लक्षांत येण्याजोगें आहे. वरील प्रमेयांत मुख्य चूक म्हटली, म्हणजे मनुष्याच्या व्यवहारास कायद्याखेरिज दुसरें कांहीं बंधन नाहीं, असें मानणें ही होय. वस्तुतः पहातां कायद्याचें बंधन अगदीं अपुरतें आहे, व त्यास जर इतर बंधनाचें साहाय्य नसतें, तर आपले सामाजिक व्यवहार हल्लीं चालले आहेत, तसे सुरळीत चालले नसते. असें पहा कीं, कोणीही मनुष्यानें आपला पैसा रंडीबाजींत किंवा दारूबाजींत उडवूं नये, असा कोठेंही कायदा असल्याचें आपले ऐकिवांत नाहीं, व कायदेशीर रीतीनें पाहतां प्रत्येक मनुष्यास आपला पैसा या दुर्व्यसनांत घालण्याचा पूर्ण अधिकार आहे. तथापि तेवढ्यावरून ती गोष्ट निंद्य नाहीं, असें कोणीही मनुष्य म्हणणार नाहीं. व एखाद्यानें सभेंत किंवा वर्तमानपत्रांत या विषयाची चर्चा केल्यास तीही अप्रयोजक म्हणतां येणार नाहीं. कायद्याचा उद्देश एवढाच असतो, कीं कोणाही मनुष्यानें दुसऱ्याचे हक्कास प्रतिबंधक अशी गोष्ट करूं नये. यापेक्षां जास्त नियम कायद्यांत घालतां येत नाहींत. तथापि इतर व्यवहारांस मुळींच नियम नाहीं असें समजूं नये. महाभारतांत एके ठिकाणीं म्हटलें आहेः—

यमदंडभयात्केचित्पापाः पापं न कुर्वते
राजदंडभयात्केचित्परस्परभयादपि ।

म्हणजे कांहीं गोष्टी धर्माच्या भीतीनें, कांहीं कायद्याच्या भीतीनें, व कांहीं लोकभीतीस्तव आपण करीत नाहीं. सकाळीं स्नान करावें, चांगलें अन्न खावें, दुर्व्यसनांत पैशाचा अपव्यय करूं नये, वगैरे गोष्टींस नियामक लोकलज्जाच होय. लोकांत एखादी गोष्ट वाईट मानली गेली, म्हणजे कायद्यानें जरी ती गोष्ट करण्यास परवानगी असली, तरी ती करण्यास कोणीही धजावत नाहीं. इतकें 'परस्पर भय' (लोकलज्जा किंवा अब्रू) यांचें बंधन असतें. म्हणून कोणतीही चाल प्रचारांत आणण्यापूर्वी, किंवा त्यासंबंधानें कायदा करण्यापूर्वी, लोकमत

फिरविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. कायदा हा लोकमताचा पूरक असल्या-कारणानें, जर त्यास लोकमताचें पाठबळ नसेल, तर त्याचा कांहीं एक उपयोग होत नाहीं, व हाच सर्वसाधारण सिद्धांत दत्तकासही लागू आहे. जोंपर्यंत दत्तक घेतल्यानें मनुष्य आपल्या द्रव्याचा दुरुपयोग करितो, असा लोकांचा समज झाला नाहीं, तोंपर्यंत ही चाल कधींही बंद पडणार नाहीं. कायदेशीर रीतीनें मनुष्यास आपलें द्रव्य कोणासहि देण्याचा अधिकार असो, तथापि जर तो मनुष्य आपल्या द्रव्याचा दुरुपयोग करील तर 'परस्परभया 'नें असा प्रकार बंद करण्याचा लोकांस पूर्ण अधिकार आहे व तो अधिकार 'दारूबाजी' 'रंडीबाजी' वगैरे गोष्टींत आपण प्रत्यहीं बजावीत आहों, कायद्याच्या दृष्टीनें पाहिलें, तर कोणाही मनुष्यास आपलें द्रव्य समुद्रांत टाकण्यास कांही प्रत्यवाय नाहीं, मग तसें लोक कां करीत नाहींत ? उघडच आहे, कीं ह्यास लोक पैशाचा दुरुपयोग समजतात. व एखादे राजेश्री जर घरांतील सर्व इस्टेट समुद्रांत टाकण्यास निघाले, तर त्यांचे आप्तवर्ग त्यांस इस्पितळाचा मार्ग दाखवितील ! आरंभीं सांगितलेल्या दत्तका-वरील आक्षेपाचा विचारही आम्ही वरील दृष्टीनेंच करणार आहों; म्हणजे जरी प्रत्येक मनुष्यास आपली इस्टेट हवी त्यास देण्याचा अधिकार असला, तरी मरतेसमयीं दत्तक घेऊन त्यास आपली इस्टेट दिल्यानें त्याच्या पैशाचा दुरुप-योग होतो कीं नाहीं ! होत असल्यास जरी कायदेशीर अधिकार असला, तरी इतर पुष्कळ दुर्व्यसनांप्रमाणेंच ही चाल टाकाऊ मानली पाहिजे. सारांश, धर्म-दृष्ट्या व व्यवहारदृष्ट्या, किंवा स्वर्गप्राप्तीसाठीं, व नांव चालविण्यासाठीं, दत्तकाची जरूर नाहीं, असें ठरल्यावर त्याच्या ग्राह्याग्राह्यतेचा विचार त्यास इस्टेट दिल्यानें काय उपयोग होतो, यावर अवलंबून रहाणार. करितां तो उपयोग कितपत होतो तें पाहूं.

अर्थशास्त्राची किंवा इतिहासाची ज्यास अगदीं साधारण ओळख आहे, त्यास ही गोष्ट माहीत असेल, कीं अगदीं रानटी स्थितींत द्रव्याचा संचय कोणीच करीत नसत. संचय केला असतां, तो आपल्याजवळ राहून आपणास हवा तेव्हां उपयोगीं पडेल, अशी त्या वेळेस कोणाचीही खात्री नव्हती. पुढें जसजशी लोक-स्थिति सुधारून गांव, शहरें, देश वगैरे व्यवस्था होऊं लागली, तसतसा प्रत्येक मनुष्याचा स्वकष्टार्जित द्रव्यावरील हक्क लोकांनीं कबूल केला, व तेव्हांपासून संचय करण्याची इच्छा बळावत चालली. द्रव्यसंचयाचा वरील गोष्टीशीं इतका

निकट संबंध आहे, कीं ज्या देशांत मालमिळकतींचें संरक्षण करण्याचे कायदे जारी अमलांत आहेत, तेथें ही इच्छा अगदीं कळसास गेली आहे. आपल्या जन्मापासून आपणास दुसऱ्या सामाजिक स्थितीचा अनुभव नसल्यामुळें, सामाजिक नियमामुळें, आपणास द्रव्यसंचय करितां येतो, ही गोष्ट आपले सहज लक्षांत येत नाहीं. तथापि विचारांतीं ती खरी आहे, असें लक्षांत आल्याखेरीज राहणार नाहीं. चोरी, लबाडी वगैरे अपराध जर लोकमतानें शिक्षेस पात्र नसते, तर हल्लीं प्रमाणें द्रव्यसंचय करण्याची कोणीं खटपट केली असती काय ? नाहीं; मग समाजाच्या मदतीखेरीज जर आपणास द्रव्यसंचय करितां आला नसता, तर समाजाचा त्या द्रव्यावर कांहींच हक्क असूं नये काय ? द्रव्यसंचय हें सुखप्राप्तीचें एक साधन आहे. एरव्हीं त्यास स्वतः कांहीं किंमत नाहीं, हें मनांत आणिलें असतां विनाकारण द्रव्यसंचयाचा दुरुपयोग 'परस्परभयानें' बंद करण्याचा हक्क समाजास नाहीं, असें कसें म्हणतां येणार ? द्रव्यसंचय करण्यास ज्या अर्थीं समाजनियम कारण आहेत, त्या अर्थीं कोणींही द्रव्यसंचय केला, तरी त्याचा व्यय चांगल्या कामाकडे करणें, हें त्याचें कर्तव्य आहे. ज्यास आपण जन्म दिला, व ज्यास लहानपणापासून एका विशेष गृहस्थितींत राहण्याची संवय लावून दिली, त्यास मरते वेळीं आपली इस्टेट देऊन त्या स्थितींत त्यास राहतां येण्याची सोय करून देणें, हें आपलें कर्तव्य आहे. तथापि आपणांस पुत्र नसतां व आपण कोणाचें कांहीं लागत नसतां; अगदीं मरतेवेळीं आपली सर्व इस्टेट, धर्माची व व्यवहाराची कांहीं एक नड नसतां, ज्या मनुष्यास ती मिळण्याची आशा नाही, अशा मनुष्यास देण्यानें ज्या समाजाचे योगानें आपणास द्रव्यसंचय करितां आला, त्याचें आपण कांहींच नुकसान करीत नाही काय ? स्वकष्टार्जित द्रव्याचा जन्मभर यथास्थित उपयोग घेतल्यावर, मरणसमयीं विनाकारण समाजापैकीं एकाच मनुष्यास तें देण्याचा आपणांस कोठून अधिकार आला ? आपल्या पाठीमागें आपल्या द्रव्यावर कोणाचाच विशेष हक्क नसल्यास, द्रव्यानें साध्य जी सुखप्राप्ति, ती जितकी जास्त होईल, तितकी आपणांस केली पाहिजे. आपणाजवळ पुष्कळ द्रव्य असल्यास तितकें सगळें पुत्रास द्यावें कीं नाहीं, याचाही विचारच आहे. तथापि तें जरी तूर्त बाजूस ठेविलें, तरी दत्तक घेऊन त्यास आपली इस्टेट देण्यास उपयुक्ततेच्या, धर्माच्या, किंवा व्यवहाराच्या दृष्टीनें कांहींच प्रमाण सांपडत नाहीं. ज्या लोकांत दत्तकाचा प्रघात नाहीं, त्यांत कशी काय व्यवस्था करितात वगैरे गोष्टी आज सांगावयाच्या होत्या, परंतु लेख लांबल्यामुळें त्या पुढील खेपेवर सोंपवितों.

फिरविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. कायदा हा लोकमताचा पूरक असल्या-कारणानें, जर त्यास लोकमताचें पाठबळ नसेल, तर त्याचा कांहीं एक उपयोग होत नाहीं, व हाच सर्वसाधारण सिद्धांत दत्तकासही लागू आहे. जोंपर्यंत दत्तक घेतल्यानें मनुष्य आपल्या द्रव्याचा दुरुपयोग करितो, असा लोकांचा समज झाला नाहीं, तोंपर्यंत ही चाल कधींही बंद पडणार नाहीं. कायदेशीर रीतीनें मनुष्यास आपलें द्रव्य कोणासहि देण्याचा अधिकार असो, तथापि जर तो मनुष्य आपल्या द्रव्याचा दुरुपयोग करील तर 'परस्परभया'नें असा प्रकार बंद करण्याचा लोकांस पूर्ण अधिकार आहे व तो अधिकार 'दारूबाजी' 'रंडीबाजी' वगैरे गोष्टींत आपण प्रत्यहीं बजावित आहों, कायद्याच्या दृष्टीनें पाहिलें, तर कोणाही मनुष्यास आपलें द्रव्य समुद्रांत टाकण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं, मग तसें लोक कां करीत नाहींत ? उघडच आहे, कीं त्यास लोक पैशाचा दुरुपयोग समजतात. व एखादे राजेश्री जर घरांतील सर्व इस्टेट समुद्रांत टाकण्यास निघाले, तर त्यांचे आप्तवर्ग त्यांस इस्पितळाचा मार्ग दाखवितील ! आरंभीं मांगितलेल्या दत्तका-वरील आक्षेपाचा विचारही आम्ही वरील दृष्टीनेंच करणार आहों; म्हणजे जरी प्रत्येक मनुष्यास आपली इस्टेट हवी त्यास देण्याचा अधिकार असला, तरी मरतेसमयीं दत्तक घेऊन त्यास आपली इस्टेट दिल्यानें त्याच्या पैशाचा दुरुप-योग होतो कीं नाहीं ? होत असल्यास जरी कायदेशीर अधिकार असला, तरी इतर पुष्कळ दुर्व्यसनांप्रमाणेंच ही चाल टाकाऊ मानली पाहिजे. सारांश, धर्म-दृष्ट्या व व्यवहारदृष्ट्या, किंवा स्वर्गप्राप्तीसाठीं, व नांव चालविण्यासाठीं, दत्तकाची जरूर नाहीं, असें ठरल्यावर त्याच्या ग्राह्याग्राह्यतेचा विचार त्यास इस्टेट दिल्यानें काय उपयोग होतो, यावर अवलंबून रहाणार. करितां तो उपयोग कितपत होतो तें पाहूं.

अर्थशास्त्राची किंवा इतिहासाची ज्यास अगदीं साधारण ओळख आहे, त्यास ही गोष्ट माहीत असेल, कीं अगदीं रानटी स्थितींत द्रव्याचा संचय कोणीच करीत नसत. संचय केला असतां, तो आपल्याजवळ राहून आपणास हवा तेव्हां उपयोगीं पडेल, अशी त्या वेळेस कोणाचीही खात्री नव्हती. पुढें जसजशी लोक-स्थिति सुधारून गांव, शहरें, देश वगैरे व्यवस्था होऊं लागली, तसतसा प्रत्येक मनुष्याचा स्वकष्टार्जित द्रव्यावरील हक्क लोकांनीं कबूल केला, व तेव्हांपासून संचय करण्याची इच्छा बळावत चालली. द्रव्यसंचयाचा वरील गोष्टींशीं इतका

निकट संबंध आहे, कीं ज्या देशांत मालमिळकतींचें संरक्षण करण्याचे कायदे जारी अमलांत आहेत, तेथें ही इच्छा अगदीं कळसास गेली आहे. आपल्या जन्मापासून आपणास दुसऱ्या सामाजिक स्थितीचा अनुभव नसल्यामुळें, सामाजिक नियमामुळें, आपणास द्रव्यसंचय करितां येतो, ही गोष्ट आपले सहज लक्षांत येत नाहीं. तथापि विचारांतीं ती खरी आहे, असें लक्षांत आल्याखेरीज राहणार नाहीं. चोरी, लबाडी वगैरे अपराध जर लोकमतानें शिक्षेस पात्र नसते, तर हल्लीं प्रमाणें द्रव्यसंचय करण्याची कोणीं खटपट केली असती काय ? नाहीं; मग समाजाच्या मदतीखेरीज जर आपणास द्रव्यसंचय करितां आला नसता, तर समाजाचा त्या द्रव्यावर कांहींच हक्क असूं नये काय ? द्रव्यसंचय हें सुखप्राप्तीचें एक साधन आहे. एरव्हीं त्यास स्वतः कांहीं किंमत नाहीं, हें मनांत आणिलें असतां विनाकारण द्रव्यसंचयाचा दुरुपयोग 'परस्परभयानें' बंद करण्याचा हक्क समाजास नाहीं, असें कसें म्हणतां येणार ? द्रव्यसंचय करण्यास ज्या अर्थीं समाजनियम कारण आहेत, त्या अर्थीं कोणींही द्रव्यसंचय केला, तरी त्याचा व्यय चांगल्या कामाकडे करणें, हें त्याचें कर्तव्य आहे. ज्यास आपण जन्म दिला, व ज्यास लहानपणापासून एका विशेष गृहस्थितींत राहण्याची संवय लावून दिली, त्यास मरते वेळीं आपली इस्टेट देऊन त्या स्थितींत त्यास राहतां येण्याची सोय करून देणें, हें आपलें कर्तव्य आहे. तथापि आपणांस पुत्र नसतां व आपण कोणाचें कांहीं लागत नसतां; अगदीं मरतेवेळीं आपली सर्व इस्टेट, धर्माची व व्यवहाराची कांहीं एक नड नसतां, ज्या मनुष्यास ती मिळण्याची आशा नाही, अशा मनुष्यास देण्यानें ज्या समाजाचे योगानें आपणास द्रव्यसंचय करितां आला, त्याचें आपण कांहींच नुकसान करीत नाही काय ? स्वकष्टार्जित द्रव्याचा जन्मभर यथास्थित उपयोग घेतल्यावर, मरणसमयीं विनाकारण समाजापैकीं एकाच मनुष्यास तें देण्याचा आपणांस कोठून अधिकार आला ? आपल्या पाठीमागें आपल्या द्रव्यावर कोणाचाच विशेष हक्क नसल्यास, द्रव्यानें साध्य जी सुखप्राप्ति, ती जितकी जास्त होईल, तितकी आपणांस केली पाहिजे. आपणाजवळ पुष्कळ द्रव्य असल्यास तितकें सगळें पुत्रास द्यावें कीं नाहीं, याचाही विचारच आहे. तथापि तें जरी तूर्त बाजूस ठेविलें, तरी दत्तक घेऊन त्यास आपली इस्टेट देण्यास उपयुक्ततेच्या, धर्माच्या, किंवा व्यवहाराच्या दृष्टीनें कांहींच प्रमाण सांपडत नाहीं. ज्या लोकांत दत्तकाचा प्रघात नाहीं, त्यांत कशी काय व्यवस्था करितात वगैरे गोष्टी आज सांगावयाच्या होत्या, परंतु लेख लांबल्यामुळें त्या पुढील खेपेवर सोंपवितों.

अर्थशास्त्रदृष्ट्या प्रत्येक मनुष्याचा आपल्या स्वकष्टार्जित द्रव्यावरही, आम्ही सामान्यतः मानतों त्यापेक्षां फारच कमी हक्क आहे. द्रव्यसंचय सुखप्राप्तीसाठीं असल्यामुळें, तो एका व्यक्तीनें केला असो, किंवा समाजानें केला असो, त्याचा योग्य कामीं व्यय व्हावा, यांतच व्यक्तीचें व समाजाचें हित आहे. "वसुधैव कुटुंबकम्" या उदार दृष्टीनें पाहिलें असतां समाजाची अति उत्कर्षावस्था म्हटली म्हणजे व्यक्तिमात्रास सारखें काम व सारखें सुख असावें, ही होय. व असें होण्यास सुखप्राप्तीचें साधन जें द्रव्य तें समाजांत एकतर सारखें वांटून गेलें पाहिजे, किंवा एकत्र असल्यास समाजाच्या सामायिक ताब्यांत असावें. एन्हवीं सर्वांस सारखें सुख कधीं प्राप्त होणार नाहीं. वरील विचार मनांत येऊनच कांहीं इंग्रजी व फ्रेंच अर्थशास्त्रवेत्त्यांनीं समाजांत द्रव्यसंचयाची अविभक्तावस्था पसंत करून, त्याप्रमाणें समाजरचनेंत फेरफार करण्याबद्दल शिफारस केली आहे. त्यांच्या मतें समाजांतील सर्व मनुष्यांनीं एका अविभक्त कुटुंबाप्रमाणें राहून आपल्या योग्यतेप्रमाणें सारखें काम करावें, व त्यापासून होणारा जो द्रव्यसंचय तो सर्वांची सामायिक प्राप्ति समजून, सर्वत्रांस सारखें सुख प्राप्त होईल, अशी तजवीज ठेवावी. एकीकडे समाजांतील हजारों लोकांस सकाळपासून संध्याकाळपर्यंत काबाडकष्ट करून पोटभर भाकर देखील मिळत नाहीं, व दुसरीकडे आजापणजांनीं तरवार गाजवून हजारों लोकांस यमलोक दाखविला, म्हणून कांहीं लोकांस कवडीचाही श्रम न करतां, सगळ्या आयुष्यभर चैन भोगण्यास सांपडते, हें मनांत आलें म्हणजे वरील अर्थशास्त्रज्ञ ऋषींच्या वचनास मान डोलविल्याखेरीज राहवत नाहीं! तथापि समाजाचा पूर्वीचा इतिहास व मनुष्याच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति, हीं मनांत आलीं म्हणजे ही सत्ययुगांतील स्थिति आपणांस कधीं तरी लाभेल किंवा नाहीं, याचाच विचार पडतो. कुटुंबांतील किंवा समाजांतील अविभक्तावस्था, हा प्रकृत विषय नसल्यामुळें, त्यावरील सर्व आक्षेप येथें देतां येत नाहींत. तरी प्रस्तुत प्रकरणीं येवढें सांगणें जरूर आहे, कीं कुटुंबाची व समाजाची अविभक्तावस्था ज्या देशांत मोडली आहे, त्यांतच इतर देशांपेक्षां द्रव्यसंचय अधिक झाला आहे. आपण मिळविलेल्या द्रव्यानें समाजाचें हित होऊन त्यांत आपलेंही हित होणार, अशा विचारानें द्रव्यसंचय करण्याकडे मनुष्याची प्रवृत्ति स्वभावतःच होत नाहीं. 'मी' व 'माझें' ह्या शब्दांचा जितका परिणाम

मनुष्याच्या मनावर होतो, तितका ' सामाजिक ' किंवा ' सार्वजनिक ' शब्दांचा होत नाहीं. " कोण कोणाचें ? आपण गेलों म्हणजे जग बुडालें " असेंच म्हणणारे बहुतेक लोक असतात व हें समजूनच प्रत्येक मनुष्यानें मिळविलेल्या द्रव्यावर त्याचें पूर्ण स्वत्व शास्त्रकारांनीं कबूल केलें आहे. आतां प्रत्येक मनुष्यास असा अधिकार मिळाल्यानें, एकाजवळ लाखों रुपयांची इस्टेट, व दुसरा अगदीं कफल्लक, अशी स्थिति होते, पण सामाजिक हित जोंपर्यंत प्रत्येकास पूर्णपणें कळत नाहीं, तोंपर्यंत अर्थशास्त्रज्ञसाधूंच्या मताप्रमाणें समाजरचना करून काय उपयोग ? अशी रचना केल्यानें उगीच दुसऱ्याकरितां आपण काय म्हणून काम करावें, असें मनांत येऊन कोणींच कांहीं करूं नये, यापेक्षां ज्या समाजरचनेनें आपण मिळविलेल्या द्रव्यावर आपला पूर्ण हक्क असतो, ती बरी नव्हे काय ? मुळींच द्रव्यसंचय नसण्यापेक्षां दोन चार आसामींनींच कां तो केला असेना, तो त्या सर्व एकंदर समाजासही फायदेशीरच आहे. संचय करण्यास मितव्यय कारण असल्यामुळें, जो द्रव्यसंचय करितो, त्याच्या हातून सहसा त्याचा गैरउपयोग होत नाहीं, व असें झालें म्हणजे जरी त्या द्रव्यसंचयावर एकाचेंच स्वत्व असलें, तरी त्यापासून समाजाचें परंपरेनें हित होतेंच. एकदां मितव्ययाची संवय जडली, म्हणजे इतर संवयीप्रमाणें ती जन्मभर सुटत नाहीं. मग " निःस्वोप्येकशतं शती दशशतं सोऽपीह लक्षं शतं " असें रहाटगाडगें सुरू होऊन पैशाचे दोन पैसे करण्याची जी मालकाची इच्छा, तिनें पुष्कळ कारखाने निघून, हजारों लोक त्यावर आपला उदरनिर्वाह करितात ! तथापि अशा समाजरचनेंत एक दोन मोठे दोष असतात. पैकीं पहिला दोष हा, कीं प्रत्येक मनुष्यास स्वार्जित द्रव्यावर हक्क दिल्यानें, त्याच्या हातून त्याचा गैर उपयोग होण्याचा संभव असतो. कारण मागील अंकीं सांगितल्याप्रमाणें कायद्यानें या कामांत कांहीं हात घालितां येत नाहीं. बाकी राहिलें भय म्हटलें म्हणजे धर्माचें व लोकमताचें. पण त्यास लोक जाणते पाहिजेत. नाहीं तर, ब्राह्मणभोजन, लग्न, दत्तक, दारूबाजी यांत हजारों रुपयांचा चुराडा होऊन जातो. उघडच आहे, कीं पांचपन्नास रुपये दरमहा झडूं लागले, कीं घाल ब्राह्मणभोजन, कर दागिने, ठेव एखादें पांखरूं, किंवा आण तांबडें पाणी, असा जेथें लोकांचा समज, तेथें तो समज फिरल्याखेरीज द्रव्याचा अपव्यय कसा बंद करणार ? तात्पर्य मनुष्यमात्रास स्वार्जितावर जो हक्क आहे, तो स्वयंभू नाहीं, तर गेल्या अंकीं सांगि-

तल्याप्रमाणें समाजानें तो त्यास दिलेला असून, त्यांत बहुधा समाजाचें हित होतें, म्हणूनच तो दिला आहे. व त्याकरितां स्वार्जितांचा उपयोग समाजाच्या हिताकडे करणें, हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. ही गोष्ट कित्येक लोक विसरतात, व अज्ञानानें समाजांतील इतर लोक तिची उपेक्षा करितात. दुसरा दोष मागें सांगितलाच आहे, कीं असा अधिकार दिल्यानें कांहीं लोक श्रीमंत व पुष्कळ दरिद्री राहतात. आळशी लोक दरिद्री असल्यास, त्याबद्दल कोणास वाईट वाटणार नाहीं. पण दिवसभर उद्योग करणाऱ्या लोकांस पोटभर अन्न न मिळणें समाजास श्रेयस्कर नाहीं. हे दोनही दोष जर निघतील तर स्वार्जितावर आपलें ज्यांत पूर्ण स्वत्व आहे, ती समाजरचना हितकारक आहे. आतां हे दोनही दोष निंघाल्यास एकंदर लोकांच्या आचारांत व विचारांत बरेच फेरफार झाले पाहिजेत. विचारांतील फरक म्हटला म्हणजे हा कीं–विनाकारण धर्माची किंवा दुसऱ्या कशाची सबब सांगून जर कोणी पैशाचा दुरुपयोग करूं लागेल, तर तो प्रकार लोकांत निंद्य मानला जावा, व तसेंच खऱ्याखोट्या कारणांचा विचार होऊन व निर्णय करून, त्यांचा लोकांत प्रसार व्हावा. आचारांतील फरक असा कीं–मनुष्यास द्रव्यसंचय करण्यास उत्तेजन येईल इतकें त्याच्या स्वार्जितावर त्याचें स्वत्व ठेवून, मग ज्या चालीच्या योगानें द्रव्यसंचय समाजांत वांटतां येईल, त्या चाली प्रचारांत याव्या, व तद्विरुद्ध प्रचारांतून काढून टाकाव्या. परोपकार करण्याची इच्छा वाढणें, विमा उतरणाऱ्या मंडळ्या निघणें, वगैरे पहिल्या प्रकारचीं व दत्तक घेणें, वडिल मुलासच सर्व इस्टेट मिळणें, वगैरे दुसऱ्या प्रकारचीं उदाहरणें होत. या सर्वांचा विचार करण्यास सवड नाहीं, करितां दत्तकाचा याशीं संबंध कसा पोंचतो हें दाखवून आजचा लेख पुरा करितों.

आपण असें समजूं कीं, एका मनुष्यानें आपल्या कष्टानें बरेंच द्रव्यसंपादन केलें आहे. आतां ज्याअर्थीं समाजाच्या संमतीवांचून हें द्रव्य त्यास संपादन करितां आलें नसतें, व ज्याअर्थीं सार्वजनिक हितासाठींच समाजानें प्रत्येक मनुष्यास स्वार्जितावर पूर्ण हक्क दिला आहे, त्याअर्थीं तद्गतद्रव्याचा आपल्या व समाजाच्या हितासाठीं व्यय करण्याचा त्या मनुष्यास पूर्ण अधिकार आहे. तसेंच त्याच्या पाठीमागें औरस पुत्र असल्यास त्यासही तें द्रव्य देण्याचा त्यास अधिकार पोंचतो, कारण पुत्रादिकांस जन्म देऊन, त्यांस त्या मनुष्यानें एका विशेष गृहस्थितींत राहण्याची संवय लावून दिली आहे. तथापि

जर तो मनुष्य आपल्या हयातींत द्रव्याचा गैरउपयोग करूं लागेल, किंवा आपल्या पाठीमागें पुत्रादिकांस ज्याप्रमाणें हक्क आहे तसा नसतांही, दुसरे कोणास तो आपली इस्टेट देऊं लागेल तर तो प्रकार, शिष्टसांप्रदायाविरुद्ध समजून 'लोक-भयानें' समाजानें बंद केला पाहिजे. द्रव्यसंपादन करणाऱ्या मनुष्यास मितव्ययाची संवय असल्यामुळें, त्याच्या हातून द्रव्याचा भलतेच ठिकाणीं व्यय होत नाहीं, व त्याच्या कुटुंबांतील मनुष्यांसही बहुधा ही संवय लागण्याचा संभव असतो. पण ज्यास एकदम इतकें द्रव्य मिळण्याचा मुळींच संभव नसतो व ज्याचा त्यावर कांहींएक हक्क पोंचत नाहीं, आणि ज्यास द्रव्यसंपादनांत काय दुःख आहे, हें मुळींच समजत नसतें, त्याचे हातीं एकदम इस्टेट पडल्यावर त्यानें ती न उधळल्यास आश्चर्यच मानावयाचें. समाजानें मनुष्यास स्वार्जितावर जो हक्क दिला आहे तो वरील कारणाकरितां नाहीं. मिळविणारानें किंवा त्याच्या औरस संततीनें त्याचा उपभोग घ्यावा, पण ह्या दोहोंच्या अभावीं दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीचा व समाजाचा त्यावर सारखाच हक्क आहे, इतकेंच नव्हे तर, एकाच मनुष्याच्या हातीं ती इस्टेट पडल्यास तिचा वाईट व्यय होण्याचा ज्यास्त संभव आहे. यासाठीं औरस संततीच्या अभावीं एखाद्याची इस्टेट समाजास गेल्यासच त्यांत लोकांचें हित आहे. प्राचीनकाळीं जेव्हां समाजास अशी इस्टेट देतां येत नव्हती, त्याकाळीं दत्तकाचा प्रचार पडला; पण आतां त्याची कांहीं जरूर राहिली नाहीं. उलट त्यापासून द्रव्यसंचय थोडयाशा लोकांतच राहिला जाऊन एकंदर समाजाचें नुकसान होत आहे.

इतर सर्व गोष्टींप्रमाणेंच सर्वथैव निर्दोष अशी कोणतीच समाजरचना सांपडावयाची नाहीं. तथापि लोकस्थिति मनांत आणितां, अमुक एक समाजास अमुक समाजरचना विशेष फायदेशीर होईल, इतकें सांगणें कांहीं कठीण नाहीं. विभक्तावस्था व अविभक्तावस्था या दोन्हीही प्रत्येकीं समाजास एका विशेष स्थितींत श्रेयस्कर होतात. पैकीं जोंपर्यंत द्रव्याचा खरा उपयोग लोकांस समजूं लागला नाहीं व जोंपर्यंत समाजाच्या कल्याणाकरितां द्रव्यसंचय करण्याची बुद्धि बहुतेकांस होत नाहीं, तोंपर्यंत मागें सांगितल्याप्रमाणेंच समाजाची अविभक्तावस्था म्हणजे जींत प्रत्येक मनुष्याचा आपल्या स्वार्जितावर पूर्ण हक्क असतो, तीच एकंदर समाजास हितावह आहे. असा हक्क दिल्यानें कमजास्त प्रयत्न, मितव्ययबुद्धि वगैरे कारणांनीं समाजांत द्रव्याचा विषम विभाग हा होणारच, व जोंपर्यंत

स्वार्जितावर प्रत्येक मनुष्याचा पूर्ण हक्क आपण कबूल करितों, तोंपर्यंत समाजांतील एक अतिशय श्रीमंत व एक अतिशय दरिद्री हा भेद आपणास अजीबात कधींही काढून टाकितां येणार नाहीं. तरी स्वार्जितावर हा अधिकार दिल्यानें समाजांत हा जो दोष दृष्टोत्पत्तीस येतो, तो काढून टाकण्याचा जेव्हां जेव्हां योग्य प्रसंग येईल, तेव्हां तेव्हां आपण तो फुकट दवडितां कामा नये. दत्तक घेण्याची वेळ म्हणजे अशाच तऱ्हेचा एक प्रसंग होय. यद्यपि द्रव्यसंचय करण्यास प्रत्येक मनुष्यास प्रेरणा व्हावी म्हणून स्वार्जितावर त्यास कायद्यानें पूर्ण हक्क दिला आहे. तथापि एखाद्यास श्रमावांचून पुष्कळ द्रव्य सांपडल्यास त्यावर त्याचा पूर्ण हक्क आहे असा त्याचा अर्थ होत नाहीं. उद्यां एखाद्यास सहज जमिनींत मोहरांचा हांडा सांपडल्यास सरकार म्हणजे समाजाचा प्रतिनिधि त्यावर त्या मनुष्याचा पूर्ण हक्क कबूल करील काय ? नाहीं, तर त्या मनुष्यानें ही गोष्ट प्रसिद्ध केली या त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल त्यास कांहीं भाग देऊन बाकी सरकार आपल्या तिजोरींत नेईल, म्हणजे तो पैसा सरकारमार्फत (येथें सरकार लोकांचे कल्याणाकरितां आहे असें समजावयाचें व त्याचें खरोखर कामही हेंच आहे) लोकोपयोगाकडे लागेल. जमिनींत सांपडलेल्या द्रव्याची जर ही गोष्ट तर दत्तक होऊन एखाद्याची इस्टेट घेणारासच निराळा नियम कां असावा ? कोणी असें म्हणतील कीं या दोन गोष्टी अगदीं भिन्न आहेत. कारण दत्तकास जी इस्टेट मिळते ती पूर्वीच्या मालकांच्या अनुमतीनेंच मिळते व त्याबद्दल त्यास मृताचें श्राद्धादिक करावें लागतें, परंतु तसा प्रकार जमिनींत सांपडलेल्या द्रव्याचा नाहीं. गोष्ट खरी आहे, पण त्यांत प्रश्न म्हणून येवढाच कीं मालकांस, अशा रीतीनें, वाटेल त्यास विनाकारण आपली इस्टेट देण्याचा अधिकार कोठून आला ? एखाद्या वस्तूवर आपला हक्क कांहीं नैसर्गिक नाहीं, म्हणजे एखादी वस्तु आपणास प्रयत्नानें मिळाली तेवढ्यानेंच त्या वस्तूवर आपला हक्क येत नाहीं. श्रम, बुद्धि, मितव्यय हीं जरी द्रव्यसंचयाचीं कारणें आहेत तरी त्यांपासून हक्काची उत्पत्ति होत नाहीं. केवळ मीं मिळविलें म्हणूनच माझा त्यावर हक्क नाहीं, तर लोकांनीं तो हक्क कबूल केल्यामुळें तो मला प्राप्त झाला आहे, ही गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवली पाहिजे. अर्जन व अधिकार यांचा कार्यकारणभाव स्वभावसिद्ध नसून, तो लोकांनीं कबूल केल्याखेरीज होणें अशक्य आहे. ही लोकांची कबुली किंवा अनुमोदन दोन प्रकारें व्यक्त होत असतें, एक कायद्यानें व दुसरें लोकमतानें; कारण सर्वच गोष्टींचें

कायद्यानें नियमन करितां येत नाहीं. जेथें जेथें कायदा अपुरा पडतो, तेथें तेथें लोकभय भर घालतें. स्वकष्टार्जित द्रव्याचा हवा तसा व्यय करण्यास जरी कायद्यानें प्रत्येक मनुष्यास अधिकार दिला आहे, तरी मागें लिहिल्याप्रमाणें आपलें द्रव्य दुर्व्यसनांत उडविण्यास लोक कां भितात ? लोकभयानें. मग हेंच लोकभय दत्तक न घेण्यास कां उपयोगी पडूं नये ? समाजरचनेच्या नियमांच्या आमच्या अज्ञानाखेरिज आम्हांस तर दुसरें कांहीं कारण दिसत नाहीं. स्वार्जितावर पूर्ण हक्क दिल्यानें जसा दुर्व्यसनांत व समुद्रांत पैसे उडविण्याचा व टाकण्याचा कोणास हक्क येत नाहीं, तशीच मरतेवेळीं एखाद्या उपटसुळास विनाकारण आपली दौलतही त्यास देतां येणार नाहीं. दोनही प्रकार सारखेच निंद्य होत; भेद इतकाच कीं, एक आपण मानीत आलों, व दुसरा तसा मानण्यास अजून शिकलों नाहीं. औरस पुत्रादिकांस आपली इस्टेट कां द्यावी, हें मागें सांगितलेंच आहे; ती दत्तकास देण्यास तशा तऱ्हेचें कांहीं कारण नसतें. त्यानें श्राद्धादिक करावें, याकरितां देतों म्हणून कोणी म्हणतील, तर एक तर हें पोकळ कारण आहे, हें मागें सिद्ध केलेंच आहे; व दुसरें तेवढ्याकरितां कांहीं सगळी इस्टेट दत्तकास द्यावयास नको. स्वार्जितावर पूर्ण अधिकार दिल्यानें आधींच समाजांत द्रव्याचा विषम विभाग होत आहे. पण जरी कसा तरी द्रव्यसंचय व्हावा, येवढ्याकरितां समाजानें तो कबूल केला आहे, तरी द्रव्याची वांटणी समाजांत सारखी होऊन सर्वत्रांस सारखें सुख व्हावें, हा आपला इष्ट हेतु असल्यामुळें, जेव्हां जेव्हां स्वार्जितावर जितका हक्क दिल्याखेरीज द्रव्यसंचय कोणी करणार नाहीं, तितका हक्क कायम राखून द्रव्याची लोकांत सारखी वांटणी करितां येईल, किंवा एकाचा द्रव्यसंचय सर्वत्रांच्या उपयोगास लावितां येईल, तेव्हां तेव्हां आपणांस त्या प्रसंगाचा पूर्ण उपयोग करून घेतला पाहिजे. दत्तक घेण्याचा काळ हा अशाच प्रसंगांतील मुख्य प्रसंग म्हटला तरी चालेल. दत्तक होणाराचा त्या द्रव्यावर कांहीं हक्क नसतो, व दत्तक घेणारास वास्तविक रीतीनें पाहिलें म्हणजे दत्तकास तें द्रव्य देण्याचा अधिकार असूं नये. लोकांस ही गोष्ट कळूं लागून, लोकमतांत थोडासा फेर झाला, म्हणजे स्वार्जितावर अधिकार दिल्यानें समाजांत जे दोष उत्पन्न होतात, ते थोडेबहुत तरी निवारण्याचा आपणांस एक चांगला मार्ग सांपडेल. दत्तकाचा प्रघात पडल्यानें आज लाखों रुपये लोकोपयोगाकडे न लागतां, श्रम केल्यावांचून कांहीं लोक त्यांचा यथेच्छ

उपभोग घेत आहेत. यांत समाजाचें किती नुकसान होतें, याची वाचकांनींच कल्पना करावी. सारांश अर्थशास्त्रदृष्ट्या पाहिलें तर दत्तकाचा प्रघात आमच्यांत चालू असल्यामुळें व्यवहारांत आमच्या लोकांचें पुष्कळ नुकसान होऊन, स्वार्जितावर अधिकार दिल्यापासून समाजांत जो भेद होतो, तो मोडून टाकण्याची अमोलिक संधिही आज आपण गमावीत आहों. मग यापुढें आमचे डोळे कधीं उघडतील ते उघडोत!

शेवटीं वरील सिद्धांतास एक दोन ठळक अपवाद आहेत, ते सांगून आजचा लेख संपवितों. अर्थशास्त्ररीत्या दत्तकाची चाल अग्राह्य कां आहे, हें वर सांगितलेंच आहे. तेव्हां वरील नियमांस अपवाद म्हटले म्हणजे, जेथें तें कारण लागू पडत नाहीं ते होत. पैकीं पहिला व मुख्य अपवाद ज्या इस्टेटीस कांहीं कामगिरी जोडली असते, त्यासंबंधीं होय. यांत पाटिलकीपासून राज्यापर्यंत सर्वांचा समावेश होतो. तशा इस्टेटीचा मालक औरस संततीवांचून मयत झाला असतां, त्याच्या पाठीमागें त्याची कामगिरी बजाविण्यास कोणी तरी मनुष्य पाहिजेच. वस्तुतः पाहतां, सदर इस्टेटीस स्वार्जित न म्हणतां, कांहीं विशेष कामाबद्दल वेतन म्हटलें असतां चालेल. ह्या वेतनावर कोणाचाही स्वार्जिताप्रमाणें हक्क पोंचत नाहीं. जो काम करीत असतो, त्यासच तें मिळेल. व काम बंद पडणें इष्ट नसल्यास, तें वेतन तसेंच सुरू ठेविलें पाहिजे. कोणताही राजा निपुत्रिक मेला असतां, त्याची गादी चालविण्यास कोणी नसल्यास, त्यांत लोकांचें नुकसानच आहे. करितां अशा ठिकाणीं दत्तक घेण्यास कांहीं हरकत नाहीं; तथापि औरस संततीच्या अभावीं कोणास दत्तक घ्यावा, किंवा निदानपक्षीं वारीट मनुष्य तरी दत्तक होऊं नये, हें पाहणें लोकांकडे असावें.

दुसरा अपवाद मिल्ल साहेबांनीं प्रस्तुत विषयासारखाच एक विषय प्रतिपादन करीत असतां, आपल्या अर्थशास्त्रावरील पुस्तकांत दिला आहे. तो असा कीं, जर मयत मनुष्याचा एखादा मोठा कारखाना असला, तर तो मोडून टाकून त्याचे पैसे करून लोकोपयोगाकडे लावण्यापेक्षां, तो एकास देण्यांतच लोकांचा विशेष फायदा आहे; करितां अशा वेळी एकासच इस्टेट दिल्यानें, लोकांचें कांहीं नुकसान होत नाहीं. अशा प्रसंगीं दत्तक घेणें अगदीं जरूर आहे. एखादा कारखाना एकाकडेसच असल्यानें जितका सुरळीत चालण्याचा संभव असतो, तितका बारभाई झाल्यानें असत नाहीं. कारखाना मोडला तर हजारों लोकांचें

(इंग्लंडांत एकेका गिरणींतून हजारांवर लोक असतात) नुकसान होतें. म्हणून दत्तकाखेरीज दुसरा चांगला मार्गच नाहीं. तथापि तेथेंही त्या कारखान्यांतलि सर्व उत्पन्न दत्तकास देण्याची आम्हांस जरूर दिसत नाहीं. कारखाना चालविण्यास त्यास उमेद येईल, व त्याच्या श्रमाचा त्यास योग्य मोबदला मिळेल, इतकें उत्पन्न त्यास देऊन, बाकी भाग लोकोपयोगाकडे लावण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. वरील दोनही अपवादांसंबंधानें यापेक्षां कांहीं ज्यास्त लिहिण्याची गरज आहे, असें वाटत नाहीं. कारण दत्तक घेण्यास जीं कारणें आम्हीं आजपर्यंत दर्शविलीं आहेत, व त्यांपैकीं विशेषतः अर्थशास्त्रदृष्ट्या जीं कारणें सांगितलीं आहेत, त्यांपैकीं एकही ह्या दोनही गोष्टींस लागू पडत नाहीं.

दत्तक अनवश्यक म्हणण्यास दुसरें सबळ प्रमाण असें कीं, ही चाल पुरातन असून चांगल्या सुधारलेल्या राष्ट्रांतून आतां अगदीं नष्ट होत चालली आहे, व कित्येकांत झालीही आहे. या प्रमाणास इतकें महत्त्व देण्याचें कारण असें कीं, देशादेशाच्या इतिहासांत, किती जरी अंतर असलें, तथापि एकंदर सुधारलेल्या राष्ट्रांच्या इतिहासाकडे दृष्टि दिली, तर असें नजरेस येईल कीं, सुधारणा होण्यास म्हणून जीं साधनें आहेत, तीं येथून तेथून सारखींच. आतां सर्वच राष्ट्रें सारखीं सुधारलीं नव्हतीं, व नाहींतही; तरी जीं कांहीं हल्लीं सुधारलेल्या राष्ट्रांत अग्रगण्य म्हणून मोडतात, त्यांच्या सध्यांच्या स्थितीवरून एकंदर सुधारणेचा झोंक कोणीकडे आहे, हें तेव्हांच दिसून येतें. परंपरागत चालत आलेल्या चाली होतांहोईपर्यंत सोडूं नयेत, असा मानवी स्वभाव असल्यामुळें, जेव्हां सुधारणेच्या मार्गास लागलेलें एखादें राष्ट्र आपली क्रमागत चाल सोडून देतें, किंवा तींत फेरफार करतें, तेव्हां साधारणतः असेंच समजलें पाहिजे कीं, ती चाल देशोन्नतीस कांहीं तरी प्रतिबंधक होती, एरव्हीं ती लोकांनीं कधीं सोडली नसती. 'सुधारणेच्या मार्गास लागलेलें' असें म्हणण्याचें कारण असें कीं, ज्या राष्ट्रांची सुधारणा खुंटली आहे, त्यांत किंवा जीं सुधारलेल्या स्थितींतून रानटी स्थितींत जात आहेत, त्यांत जर वरील प्रकार घडला, तर त्यापासून कांहीं अनुमान काढितां येणार नाहीं. उलट कदाचित् तो फेरफार आपण सुधारणांस प्रतिकूळ असें मानूं. ज्याप्रमाणें नदी वाहत असली, म्हणजे तिचें पाणी स्वच्छ व आरोग्यकारक असतें, व तीच वाहण्याची बंद होऊन तींत डबकीं झालीं, म्हणजे जशी पाण्यास दुर्गंधी येऊं लागते, त्याचप्रमाणें देशांतील सुधारणेचा प्रकार होय. एकदां


सुधारणेचें पाऊल खुंटलें, म्हणजे पूर्वीचे चांगले चांगले प्रघात देखील वाईट रूपास येतात; व तेंच सुधारणेचें पाणी वहात असलें म्हणजे बारिकसारिक वाईट आचारही निर्मल होऊन निघतात. वरील नियमास कांहीं अपवाद आहेत; नाहींत असें नाहीं. तथापि येवढी गोष्ट खरी कीं, ज्या देशांत सुधारणा जागृत असते; तेथल्या रीतीभातींतही पण कांहीं जोम असतो; करितां एखाद्या देशाचाराचें सुधारणेस अनुकूल व शुद्ध असें स्वरूप पाहणें असल्यास, त्या बाबतींत, ज्या देशांत सुधारणा चालू आहे, तेथें कसा काय प्रघात आहे तो अवश्य पाहिला पाहिजे. प्रस्तुत ज्या देशांत सुधारणा जागृत आहे, असे देश म्हटले म्हणजे, युरोपांतील इंग्लंडादि व अमेरिकेंतील युनाय स्टेड्स्टेटस् आदिकरून होत. व या सर्व देशांच्या सुधारणेचा मूळ पाया रोमन व ग्रीक लोकांची सुधारणा होय. युरोपांतील हल्लींचीं बहुतेक राष्ट्रें रोमन व ग्रीक लोकांच्या मोडक्या इमारतीच्या पायावरच उभारलीं आहेत. म्हणून जर त्या राष्ट्रांत एखाद्या बाबतींत कसा काय रिवाज आहे, हें पाहावयाचें असलें, तर त्यापूर्वी रोमन व ग्रीक लोकांत त्यासंबंधीं कशी काय वहिवाट होती, हें पाहिलें पाहिजे. म्हणजे त्याची उपपत्ति चांगली कळून येईल; याकरितां दत्तकाच्या संबंधानें तिथीपासून सुरवात करूं.

प्राचीन सुधारलेल्या राष्ट्रांपैकीं मुख्य मुख्य म्हटलीं म्हणजे एशिया खंडांतील हिंदुस्थान, चीन वगैरे देश, व युरोपांतील रोम व ग्रीस देश हीं होत. व त्यांतही पहिली सुधारणा म्हणजे एशियाखंडांतलीच. तथापि या दोनही खंडांतल्या सुधारणेंत एक मोठें अंतर आहे तें हें कीं, आम्ही व आमचे सर्वभक्षक बंधू चिनी लोक, यांनीं परंपरागत आलेली सुधारणा पुढें चालविण्याचा प्रयत्न केला नाहीं, आणि रोमन व ग्रीक सुधारणेची तशी व्यवस्था न होतां, स्वदेशांत नाहीं, तर परदेशांत तरी तिला पुरस्कर्ते मिळून तिची वाढ कायम राहिली आहे. एवढ्याच कारणानें जरी या दोनही सुधारणांचें पूर्वरूप बहुधा सारखें आहे, तरी शेवटीं शेवटीं दोहोंत पुष्कळच फरक नजरेस येतो. उदाहरणार्थ दत्तकच घ्या. यासंबंधानें एशिया खंडांतील व युरोपखंडांतील सुधारलेल्या प्राचीन राष्ट्रांतला रिवाज अगदीं सारखा होता, असें म्हटल्यास कांहीं हरकत नाहीं. इतकेंच नव्हे, तर कित्येकांस हा प्रघात पूर्वेकडून पश्चिमेकडे गेला कीं काय, अशीही शंका आहे. पण शेवटील प्रकार पहावा तों अगदींच निराळा. आम्ही अजून जशाचे तसेच "माता पिता वा दद्यातां" घाटीत बसलों आहों, व आमचे पाश्चिमात्य बंध

झपाट्यानें पुढें चालले आहेत. दत्तकाच्या संबंधानें आज जी माहिती उपलब्ध आहे, तीवरून असें दिसून येतें कीं, पूर्वी हा प्रघात सार्वत्रिक होता. आमच्याप्रमाणें रोमन, ग्रीक व चिनी लोकांत पितरांच्या ऋणाचें महत्त्व मानिलें आहे. व आमच्यामध्यें जसें कुलाचाराचें प्राधान्य आहे, तसेंच इतर राष्ट्रांतही एकदां होतें. ग्रीस देशचे इतिहासकार मि. ग्रोट यांनीं असें लिहिलें आहे कीं, त्या देशांत पूर्वी प्रत्येक घराण्याचा कुलाचार निरानिराळा असे, व त्या कुलांतील होमहवन किंवा श्राद्धादिक करण्यास कुलांतल्या पुरुषांखेरीज कोणासही अधिकार नव्हता. चिनी लोकांत अजून हाच प्रकार आहे असें म्हणतात. रोमन लोकांत आमच्याप्रमाणेंच पूर्वी दत्तक देणाराचा एकटाच मुलगा असल्यास घेत नसत; कारण त्यास घेतल्यानें त्याच्या कुलांतील श्राद्धादिक करण्यास कोणी अधिकारी रहात नसे. यहुदी लोकांतही हाच प्रकार थोडाबहुत होता, असें आढळतें. जुन्या काळचा इतिहास पाहिला असतां, त्यांत श्राद्धाचें, पितरांचें, कुलाचाराचें, व त्याबरोबर पुत्रोत्पादनाचें फारच प्राधान्य होतें. व असें असणेंही अगदीं स्वाभाविकच होतें. कारण हल्लींप्रमाणें लोकांचें दळणवळण त्यावेळेस वाढलें नसल्यामुळें, आपलें कूळ व आपण या पलीकडे प्रत्येक मनुष्यास कांहीं दिसत नसे; व कूळ नष्ट झालें म्हणजे अर्थातच ह्या जगांत आपलें नांव ठेवण्यास त्यावेळेस दुसरा मार्ग नव्हता. हल्लीं आपणास कुलक्षयाची जी एवढी भीति वाटते, तिची तरी उपपत्ति वरील स्थितीवरून करावयाची. नाहींपेक्षां, दत्तकापेक्षां कुलांचें नांव राखण्यास हल्लीं शतपट चांगले उपाय आहेत. असो, पण ज्यावेळेस हल्लींचे उपाय मुळींच ठाऊक नव्हते, व ज्याकाळीं कूळ व कुळाचार यांचेंच समाजांत प्राबल्य होतें. त्यावेळेस कसें तरी करून कुळाचें नांव चालविणें, हें प्रत्येक मनुष्य आपलें कर्तव्य समजत असे. औरस संतति नसली, तर त्याकाळी आपल्या इस्टेटेची हवी तशी व्यवस्था करण्याचा दुसऱ्या कोणास अधिकार नव्हता. औरस पुत्र नसल्यास, कोणास तरी दत्तक घेण्याची वहिवाट फार पुरातन काळापासून रोमन व ग्रीक लोकांत होती; व यहुदी लोकांत तर आपल्याप्रमाणेंच मयताच्या विधवेस दिरापासून पुत्रोत्पत्ति करून घेण्याची परवानगी होती. या जुन्या ग्रंथांतून दुसरी एक विशेष गोष्ट अशी आढळते कीं, प्रथमतः कोणास आपली इस्टेट मरतेसमयीं मृत्युपत्रानें दुसऱ्यास देतां येत नसे. निपुत्रिक मनुष्यास, मृत्युपत्र करून आपली इस्टेट लोकांस देण्याचा अधिकार, ग्रीक लोकांत सोलननें व

रोमन लोकांत ट्वेल्व्हटेबलच्या (द्वादशाज्ञा) कर्त्यांनीं प्रथमतः प्रचारांत आणिला; व ह्याच प्रकार वाढतां वाढतां पुढें दत्तकाच्या मुळावर आला, असें बहुतेक विद्वानांचें मत आहे. मागें सांगितल्याप्रमाणें आपणांत, व ग्रीक आणि रोमन लोकांत, जो फरक दृष्टीस पडतो तो येथेंच. पिंडदानादिक धर्मकृत्यांशीं व इस्टेटीशीं जो संबंध शास्त्रकारांनीं प्रथमतः जोडून दिला होता, तो ग्रीक व रोमन लोकांत लवकरच तुटला; व त्याबरोबरच धर्मशास्त्राचा इस्टेटीवरील पगडा सुटून व्यावहारिक कायद्याप्रमाणें तिची व्यवस्था होऊं लागली. या व्यवस्थेपासून एकंदर राष्ट्राच्या रचनेंत काय काय फेरफार झाले, व मृत्युपत्रानें दत्तकास कसकसें मागें टाकिलें, याची हकीकत पुढील खेपेस देऊं, पण आजच्या लेखावरून ध्यानांत येईल कीं, दत्तकाचा प्रचार प्राचीन सर्व राष्ट्रांत सुरू होता, व त्याचीं कारणेंही सारखींच होतीं. म्हणजे पितरांचें ऋण देण्याकरितां दत्तक घ्यावयाचा, अशी बहुतेक प्राचीन लोकांची सर्वत्र समजूत होती. परंतु कांहीं राष्ट्रांत या समजुतींत लवकरच फरक होऊन, इस्टेटीचा व पिंडोदकदानाचा कांहीं संबंध नाहीं, असें ठरल्यामुळें पुढें दत्तकाची चाल प्रचारांतून नाहींशी होत चालली. व आमच्यासारख्या कांहीं राष्ट्रांची पहिल्या पायरीच्यापुढें मजलच गेली नाहीं.

[वर्ष ३ अंक ४५, ४६, ४७, ४९, ५०, ५१.
वर्ष ४ अंक ४, ११.]



व्यापाराखेरीज तरणोपाय नाहीं.

इतक्या दिवस असा भ्रम असे कीं, चीन देशाची लोकसंख्या पंचेचाळीस कोटी आहे, तेव्हां पृथ्वींत मनुष्यांनीं विशेष गजबजलेला देश कायतो चीन देश. पण अलीकडे झालेल्या मनुष्यगणतीवरून असें समजतें कीं, चीनची लोकसंख्या हिंदुस्थानच्या लोकसंख्येइतकीच, म्हणजे पंचवीस कोटींच्या आंत-बाहेर आहे. असें असतां चीनचे किती लोक नानातऱ्हेच्या व्यापारांवर पोट भरितात! आमच्या देशांत शेतीच्या उपयोगाची पुष्कळ जमीन आहे, हें खरें. पण ती कधींच लागवडींत येऊन चुकली आहे. कित्येक नेटिव संस्थानांत अद्यापि कांहीं पडीत जमीन आहे, व ती लागवडीला आणिली असतां, बराच फायदाही होणार आहे; पण त्याचा आम्हा ब्रिटिश अंमलाखालच्या प्रजेस काय उपयोग? एकतर नेटिव संस्थानिक इकडील प्रजेस ती लागवडीस आणण्याची परवानगी देतील कीं नाहीं याचा संशय आहे, व देतील असें मानिलें, तरी आपलें घरदार सोडून परमुलखांत जाण्याचें धैर्य, व पडीत जमीन लागवडीस आणण्यास लागणारें भांडवल हीं आम्हांपाशीं कोठें आहेत! ब्रिटिश अंमलांतील प्रजेपैकीं तीनचतुर्थांशांहून अधिक प्रजा केवळ शेतीवर चरितार्थ चालविते; यामुळें दुष्काळाच्या प्रसंगीं अन्नावांचून लाखों लोक प्राणास मुकतात. युरोपांतील निरानिराळ्या देशांत शेतीचा धंदा करणाऱ्यांचें इतर धंदेवाल्यांशीं प्रमाण आपल्याहून अगदीं भिन्न आहे. कोठें तीन, कोठें चार, कोठें पांच, कोठें सहा धंदेवाल्यास एक शेतकरी पडतो. त्यामुळें दुष्काळाच्या वेळीं चारपांच जणांस एकावर अवलंबून राहवें न लागतां, एकालाच चारपांच जणांवर अवलंबून राहावें लागल्यामुळें, त्याचा सहज बचाव होतो. ज्या देशांत व्यापार पुष्कळ चालतो, त्यांतील लोकांस उपाशीं मरण्याची पाळी कधींही येत नाहीं. शेतकीच्या धंद्याला लागतात तेव्हां फार मणासें लागतात, नाहीं तेव्हां मुळींच लागत नाहींत, किंवा एकदोघांवरच तो चालतो. पेरणी झाल्यापासून भांगलणीचा वेळ येईपर्यंत, फारच थोड्या मनुष्यांची अवश्यकता असते. दाणा भरेपर्यंत राखणीचें काम करण्यास देखील एखादा मनुष्य बस होतो. पुष्कळ मनुष्यें लागण्याचा प्रसंग म्हणजे काय तो कापणीचा. जिन्नाप बागा-

ईंत असो किंवा जिराईंत असो, पिकें कापून माल घरीं आणण्यास पुष्कळ मनुष्यांचें साहाय्य लागतें, व या कृत्यास युरोपांतील यांत्रिक कलेची मदत घेतल्यास, यालाही फार मनुष्यांची गरज पडणार नाहीं. ज्यांच्याकडे जिराईंत जमिनी आहेत, त्यांना तर उन्हाळ्यांत कांहीं करावयाचें नसतें. आपलें आणि आपल्या जनावरांचें पोट भरण्यासाठीं कित्येकांना गाडीवानांचा धंदा करावा लागतो, व कित्येक मुंबईकडे किंवा सोलापुराकडे गिरणींत काम पाहण्यास जातात. तसेंच रेल्वेवर व दुसरा एखादा कारखाना निघाला तर त्यावर, हवे तेव्हां हवे तितके मजूर मिळण्याची मुळींच पंचाईंत पडत नाहीं. यावरून काय सिद्ध झालें, कीं आमच्या देशांत पुरेसें काम नाहीं, असे पुष्कळ लोक आहेत. त्यांना तें मिळण्यास आपल्या देशांत लहानसान व्यापार काढले पाहिजेत. आजच वसईंच्या पुलायेवढे पूल ओतण्याजोगे लोखंडाचे कारखाने, किंवा मांचिस्टरच्या येवढ्या टोलेजंग गिरण्या आम्हांस स्थापितां येणार नाहींत; व असल्या जाडी प्रकरणांत आरंभींच हात घालणें, म्हणजे यशाची मुळींच आशा सोडण्यासारखें होय; आजकाल शहरोंशहरीं बारीकसारीक वस्तूंचे कारखाने निघाले, तरी कित्येक मोकळ्या बसणाऱ्या मजुरांस काम मिळून, इंग्लंडांतून येणाऱ्या पुष्कळ चिजा येथल्या येथें तयार होतील; व त्या येथें झाल्यानें फार स्वस्त पडतील. एके ठिकाणीं बसून कोणीही आपल्या सभोंवतीं नजर फेंकली असतां, त्याला असें दिसून येईल कीं, त्याच्या नित्याच्या उपयोगास लागणाऱ्या शंभर जिनसांत सुमारें ९० जिनसा इंग्लंडाहून आलेल्या असतात. कुलपें, टांक, दवती, कागद, पुस्तकें, शाई, सुया, साबण, नेसावयाचीं धोतरें, व अंगांतील आंगरखे, सुताराचीं हत्यारें, तांबें, रुपें, सोनें, औषधांच्या बाटल्या, घड्याळें वगैरे साऱ्या परक्या देशांतून आलेल्या चिजा. आणि त्या सगळ्यांबद्दल आम्ही परत काय देतों तर धान्य. या आणि असल्या अनेक वस्तु येथल्या येथें तयार करण्यास फारसें भांडवल पाहिजे आहे असें नाहीं. पण आमच्या लोकांस किरकोळ कारखाने काढण्याची चटच लागली नाहीं, यामुळें आमचें पराकाष्ठेचें नुकसान होत आहे. शेतकऱ्यांच्या कायद्यामुळें, ज्यांचें भांडवल मोकळें पडलें आहे, त्यांपैकीं दहापांच जणांनीं मिळून दहा पंधरा हजार रुपयांच्या निरनिराळ्या रकमा उभ्या केल्या, व साबण, काडयाच्या पेट्या, मेणबत्त्या, जाड कागद, अर्क, तेल, साखर वगैरे जिनसा करण्याचे जागोजाग कारखाने घातले, तर व्याजानें

रुपये लावण्यापेक्षां त्यांस कमी फायदा पडणार आहे असें नाहीं. पण असल्या शुष्क कामास देखील लागणारें धाडस व माहिती आमच्या लोकांत आहेत कोठें ?. त्यांना बसल्या जागेहून हालायाला नको. घरच्या घरीं बसून फायदा होण्याची इच्छा मोठी. जे लोक आपले पैसे ब्यांकेंत टाकून शेंकडा चार रुपये व्याजांत समाधान मानून घेतात, त्यांनीं लहान लहान कंपन्या काढून, अशा प्रकारच्या कारखान्यांत आपले पैसे घातले, तर त्यांना निदान बारा रुपये व्याज पडणार आहे. परकी राज्य असल्यामुळें, आम्हांस प्रतिवर्षीं जी खंडणी द्यावी लागते, तीमुळें हा देश तर भिकार होत चाललाच आहे, पण तशांत आम्हींही हातपाय हालविण्याचें सोडलें, तर आम्हां सर्वांस लवकरच अन्नान्नदशा येईल. यासाठीं सर्व समंजस पैसेवाल्यांस आमची अशी विनंति आहे कीं, त्यांनीं येत्या प्रदर्शनास स्वतः जाऊन, किंवा आपल्या वतीनें शिकलेले व हुशार लोक पाठवून, तेथें जीं नानातऱ्हेचीं यंत्रें आलीं असतील, त्यांपैकीं या देशांत कितीकांचा उपयोग करतां येईल त्याचा शोध करवावा, व ते ते कारखाने काढण्याची सुरवात करावी.

हिंदुस्थानाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळें, या देशांत व्यापारवृद्धीची किती अवश्यकता आहे, हें मागल्या निबंधांत सांगितलें. प्रस्तुत निबंधांत व्यापाराला आमची देशस्थिति किती अनुकूल आहे हें दाखवायाचें आहे.

व्यापाराच्या जिनसा उत्पन्न करण्यास मुख्य दोन गोष्टी लागतात; त्या कोणत्या म्हणाल तर मजुरी आणि कच्चा माल. देशांत नानातऱ्हेचे मजूर असल्याशिवाय, किंवा खंडयांच्या खंडया कच्चा माल उत्पन्न होत असल्याशिवाय, त्यांत व्यापाराची भरभराट व्हावयाची नाहीं. या दोनही वस्तूंची आमच्या येथें समृद्धि आहे. सर्व संपत्तीचा मूळ झरा जमीन होय. संपत्ति म्हणजे जिला किंमत येते, अशी हरएक उपयोगी वस्तु होय. व क्षणभर विचार केला असतां आपणांस असें दिसून येईल कीं, प्रत्येक उपयोगी वस्तु जमीनींतून काढलेल्या, या नाहीं तर त्या, द्रव्याची केलेली असते. कागद, दवती, धान्य, औषधें, कांच, कलाबतू, लोंकर, रेशीम हीं सारीं जमिनीपासून निघालेलीं द्रव्यें होत ! अज्ञान वाचकांस कलाबतू, लोंकर, रेशीम वगैरे वस्तु जमिनींतून निघाल्या आहेत असें म्हणणें थट्टा वाटेल. परंतु अल्प विचाराअंतीं हें गूढ कोडें त्याचें त्यालाच सोडवितां येईल. कलाबतू सोन्याची किंवा रुप्याची करतात; पण या दोनही धातु जमिनींतून

काढलेल्या असतात. लोंकर आणि रेशीम झाडपाल्यावर व वनस्पतीवर उपजीविका करणाऱ्या मेंढरांपासून व रेशमी किड्यांपासून पैदा होतात; पण झाडें आणि वनस्पति जमिनीवर वाढतात, हें सर्वांस ठाऊक आहे. याप्रमाणें हरएक वस्तु परंपरेनें तरी जमिनीशीं लागून आहे असें दाखवितां येईल. तेव्हां ज्या देशाच्या जमिनीच्या पोटांत नानाप्रकारचे उपयोगी खनिज पदार्थ सांपडतात, व ज्या देशाची जमीन सुपीक आहे, त्या देशांत व्यापारास अवश्य रीतीनें लागणाऱ्या दोन जिनसांपैकीं एक आहे असें सिद्ध होतें. या पहिल्या वस्तूपलीकडे दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मजुरीची. कोळसा, लोखंड, तांबें, सोनें, रुपें वगैरे खनिज पदार्थ कितीही विपुल असले, किंवा नुस्तें बीं फेंकून दिलें, तरी जींत उत्तम पीक येतें, अशी सुपीक जमीन असली, तरी ज्या देशांत नानातऱ्हेचे धंदे करणारे चतुर कारागिर किंवा मजूर मिळत नाहींत, त्यांत त्या खनिज पदार्थांचा किंवा जमिनीच्या सुपीकपणाचा काय उपयोग? व्यापाराचे जिन्नस तयार होण्यास त्या दोनही गोष्टी असल्या पाहिजेत, व ईश्वररुपेनें दोहींचीही वाण आमच्या येथें नाहीं. असें असतां आमच्या येथें व्यापाराच्या जिनसा झपाट्यानें कां उत्पन्न होत नाहींत? नित्याच्या उपयोगास लागणाऱ्या वस्तू देखील आम्ही परक्या देशापासून कां घेतों? आमची जमीन इतकी सुपीक असतां दुष्काळांत लाखों लोक अन्नावांचून कां मरतात? पृथ्वीवरील पुष्कळ राष्ट्रांपेक्षां आमचा देश नैसर्गिक किंवा सृष्टसंपत्तींत श्रेष्ठ असतां, दुसरीं राष्ट्रें स्वातंत्र्याचा आणि बाह्य सुखांचा पूर्ण अनुभव घेत आहेत, व आम्ही कंगाल स्थितींत आपलीं आयुष्यें कंठितों आहों, याचें कारण काय? कितीएक इतिहासकारांचें असें म्हणणें आहे कीं, हजार पंधराशें वर्षांपूर्वी खरी सुधारणा अशी काय ती आशियाखंडांत, व विशेषेंकरून हिंदुस्थानांत होती व बाकी सारीं खंडें अज्ञाननिद्रेंत घोरत पडलीं होतीं. त्यावेळच्या अंतरिक्षस्थ प्रेक्षकाला आशियाखंडांत मात्र कांहीं हालचाल दिसती; इतर खंडांत अगदीं सामसूम! पण तोच अंतरिक्षस्थ प्रेक्षक पृथ्वीच्या आजच्या स्थितीकडे पाहील, तर त्याला असें वाटेल कीं, कांहीं हालचाल असेल तर ती युरोपांत व उत्तर अमेरिकेंत आहे; पूर्वीच्या जागृत आशियाखंडाला आतां चांगली झोंप लागली आहे. हें दुःखदायक स्थित्यंतर होण्यास काय बरें कारणें झालीं असावीं? स्विट्झरलंडसारख्या खडकाळ देशाची भरभराट असावी, व हिंदुस्थानसारखा सुपीक व जुना देश

विपद्ग्रस्त असावा हें नवल नव्हे काय ? कांहीं अंशीं यांत कांहीं नवल नाहीं. संतोषाची गोष्ट येवढीच. कीं ज्याप्रमाणें गानटी लोकांच्या झुंडीपुढें ग्रीक आणि रोमन लोकांच्या सुधारणेचा मागमूस नाहींसा झाला; त्याप्रमाणें मुसलमान, डच, पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्लिश यांच्यापुढें आमच्या सुधारणेच्या अस्तित्वाचा पूर्ण लय न होतां हिंदुस्थानांत कांहीं हिंदुत्व म्हणून अद्यापि कायम राहिलें आहे, व प्रस्तुतच्या चिन्हांवरून असें दिसत आहे कीं, काळाच्या आणि क्रांतीच्या फेऱ्यांतून तगलेलें हें हिंदुत्व फिनिक्स पक्ष्याप्रमाणें पुनः वाढीस लागून तारुण्यावस्थेंत येईल. ही तारुण्यावस्था प्राप्त करून घेणें किंवा न घेणें हें केवळ आमच्या परिश्रमावर अवलंबून आहे. आमचा देश परकीय अमलाखालीं असल्यामुळें त्याच्यापासून होणाऱ्या तोट्याखालीं चीत् न होतां, कष्टानें आणि आयासानें आमचें डोकें आम्हांस वर काढावयाचें आहे. तेव्हां स्वतंत्र देशांतील लोकांपेक्षांही आमच्या लोकांनीं व्यापारवृद्धि, विद्यार्जन, एकी वगैरे गोष्टी घडवून आणण्यासाठीं विशेष मेहनत केली पाहिजे, हें कांहीं सांगायला नको. व्यापाराचीं अवश्य दोन अंगें तर आम्हांस अनुकूल आहेत. आतां त्यांचा उपयोग कोणत्या रीतीनें केला असतां व्यापारवृद्धि लवकर होईल, हें दाखवावयाचें राहिलें.

मजुरी आणि कच्चा माल हीं जीं व्यापाराचीं अवश्यक अंगें, तीं आपणांस अनुकूल आहेत हें मागल्या निबंधांत दाखविलें. चालूंत तीं अनुकूल असतांहि आमचा अभ्युदय कां होत नाहीं, हें दाखवावयाचें आहे. मजुरी आणि कच्चा माल हीं व्यापाराचीं अवश्यक अंगें खरीं; तथापि अलीकडे युरोपखंडांत यांत्रिक कलेचा विलक्षण प्रसार झाल्यामुळें, या दोनच साधनांपासून आम्हांस व्हावा तितका फायदा होत नाहीं. आम्हांमध्यें हस्तकला शिखरास जाऊन पोहोंचली होती, याबद्दल काळाच्या फेऱ्यांतून चुकलेल्या जुन्या जिनसा अजून साक्ष देत आहेत. लांकूड आणि दगड यांवरील नक्शीचें काम, सोन्या-रुप्याच्या कलाबतूंचे नानात-हेचे वेल, पारावताच्या रंगाप्रमाणें क्षणोक्षणीं रंगांतर भासवणारीं रेशमाचीं आणि लोंकरीचीं वस्त्रें, स्पर्शानुकूल व दर्शनानंदकारी असे गजनीचे मखमालीचे व किनखापाचे पट जे पूर्वी राजाश्रय मिळत असल्यामळें प्रतिवर्षी तयार होत, अशा प्रकारच्या मौल्यवान् चिजांला वर्षाच्या वर्षांस लाखों रुपयांचें गिऱ्हाईक मिळत असल्यामुळें, त्यांचा पुष्कळ खप होऊन त्या त्या कारागिरांस उत्तेजन

मिळे, व ते धंदे मोठ्या भरभराटींत असत. तसेंच युरोपांतही हस्तकलेचा किंवा यांत्रिक कलेचा विशेष प्रसार झाला नसल्यामुळें, हिंदुस्थानच्या मालावर युरोपीय लोकांची प्रत्येक वर्षी मोठी जबर मागणी असे; त्यामुळें इकडील कारागिरांस हवें तितकें काम मिळून, त्या खंडांतून या देशांत द्रव्याचा पाट चाले. मुसलमान लोक धर्मसंबंधानें पराकाष्ठेचे जुलमी खरे; पण त्यांस ऐषआरामांचा विशेष नाद असल्यामुळें, व हिंदुस्थान देशास त्यांनीं स्वगृह करून टाकल्यामुळें, त्यांची कारकीर्द येथील हस्तकौशल्याच्या लयास कारण न होतां, तिच्या योगानें त्याची उन्नतिच झाली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. दिल्लीपासून रामेश्वरापर्यंत व कराचीपासून श्रीनिगरपर्यंत मुसलमान लोकांनीं जागोजाग टोलेजंग मनोरे, मशीदी, कबरस्थानें, वाडे व किल्ले उठवून दिले त्यामुळें त्यांच्या अस्वस्थ अमलांत देखील कलाकौशल्याचा ऱ्हास झाला नाहीं. इतिहासांतून अवरंगजेबाच्या दक्षिणेंतील छावणीचीं जीं वर्णनें दिलीं आहेत, त्यांवरून असें वाटतें कीं, प्रस्तुतच्या गव्हर्नर-जनरलाच्या छावणींत देखील त्याच्या दशांश किमतीचें सामान नसेल. शिवाजीनें मराठी राज्याचा पाया घातल्यापासून अखेरच्या पाजी बाजीच्या हातून त्याचा समूळ उच्छेद होईतोंपर्यंत, स्वाभाविकरीत्या महाराष्ट्र देशांत सर्व प्रकारच्या कलाकौशल्यास राजाश्रय व लोकाश्रय मिळत जाऊन तें तरतें राहिलें. पेशवाईंत सारख्या लढाया चालल्या होत्या व देशाला स्वस्थतेचा अनुभव फार क्वचित् होत होता, तरी स्वराज्य असल्यामुळें कारागीर लोकांस कामाची आणि अन्नाची वाण कधींच पडली नाहीं. पण खडकीची लढाई होतांच सर्व मनू बदलून गेला ! आमच्या सरदारांच्या आपआपसांतील यादव्या आणि फुटाफुटी, व "अलिफ्टन" साहेबासारख्या कारस्थानी पुरुषांच्या कुटिल मसलती, यांच्यामुळें शनवारच्या वाड्यावर इंग्रजी निशाण फडकूं लागून साताऱ्च्या छत्रपतींच्या सिंहासनावर पाटलूणवाल्या गोऱ्यांचे बूट चढले ! व बाजीरावाला ब्रह्मवर्ताचा मार्ग सुधारावा लागला ! येथून पुढें ज्या गोष्टी झाल्या त्या अत्यंत खेदकारक आहेत, व त्यांचा प्रस्तुत विषयाशीं संबंध नसल्यामुळें, त्यांचा येथें उल्लेख करण्याची गरज नाहीं. तथापि इतकें सांगितलें पाहिजे, कीं या वेळेपासून हरएक नेटिव गोष्टीला उतरती कळा लागन परकीय गोष्टींचें प्रस्थ माजूं लागलें. होतां होतां अखेरीस एतद्देशीय सर्व कलांचा पूर्ण ऱ्हास होऊन, आतां आम्हांस ज्या त्या गोष्टीसाठीं इंग्लंडाकडे पहाण्याची पाळी आली आहे.

इंग्लिश लोक ज्ञानानें आणि शौर्यानें आम्हांहून फार श्रेष्ठ असल्यामुळें, आमचें दुहेरी किंवा तिहेरी नुकसान होत आहे. ते आमच्या इतकेच अडाणी असते, किंवा आहेत तितके सुधारलेले असून आपलीं घरेंदारें येथें करून रहाते, तर द्रव्यदृष्ट्या आमचें इतकें नुकसान होतेंना. ते दुरून राज्य करीत असल्यामुळें, हिंदुस्थानच्या वार्षिक वसुलाचा सुमारें तीन चर्तुर्थांश भाग देशाबाहेर जातो तो जातोच; पण यांत्रिक कलेंतही ते आम्हांपेक्षां शतपट पुढें असल्यामुळें, व्यापारसंबंधानेंही ते आम्हांस वर डोकें करूं देत नाहींत. इतक्या अडचणींतून आम्हांस आपली उन्नति करून घ्यावयाची आहे, तेव्हां आम्हांस कोण भगीरथ प्रयत्न केला पाहिजे, याची वाचकांस सहज कल्पना करतां येईल. प्रस्तुत निबंधांत राज्यविषयक गोष्टींचा कांहीं अर्थार्थी संबंध नाहीं, म्हणून ती दिशा अजीबात सोडून देऊन, इंग्रज लोकांत यांत्रिक कलेचा प्रसार कसा झाला, व तो येथें होण्यास काय उपाय करावे, याचा आतां विचार करणें जरूर आहे. यंत्रकलेचा प्रसार होण्यास यंत्ररचनेस लागणाऱ्या वस्तु आणि ज्ञान हीं असलीं पाहिजेत. इंग्लंडांत लोखंड आणि कोळसे यांच्या असंख्य खाणी असल्यामुळें यंत्ररचनेस लागणाऱ्या अवश्यक वस्तुपैकीं एक तेथें थोडक्या श्रमानें आणि द्रव्यानें प्राप्त होते; व दुसरी अवश्यक वस्तु, म्हणजे ज्ञान. त्याचीही आतां तेथें उणीव पडेनाशी झाली आहे. विद्येच्या सर्व शाखांचा युरोप खंडांत पुष्कळ प्रसार झाला असल्यामुळें, व आगगाड्या आणि वर्तमानपत्रें यांच्यामुळें, एका राष्ट्रांतील लोकांचे विचार आणि कल्पना, दुसऱ्या राष्ट्रास हमेश कळत असल्यामुळें, युरोपाच्या एकाद्या भागांत कांहीं युक्ति निघाली, कीं ती महिन्यापंधरा दिवसांच्या आंत सगळ्या युरोपभर होते. शिवाय, नवीन युक्ति काढणारास राजाकडून इनाम मिळतें, किंवा त्या युक्तीपासून कांहीं वर्षें होईल तितका फायदा करून घेण्याबद्दल कायद्याची मदत मिळते. या रीतीनें कल्पक व चतुर लोकांस प्रत्यक्ष किंवा परोक्ष उत्तेजन मिळत असल्यामुळें, तिकडे प्रतिवर्षीं कांहींना कांहीं नवीन शोध लागतात, नवीन यंत्रें निघतात, व जुन्या यंत्रांत सुधारणाही होतात. वाफ, वीज, पाणी, वारा, वगैरे सृष्ट व कृत्रिम पदार्थांचा यांत्रिक कलेकडे उपयोग होऊं लागल्यापासून युरोपखंडांतील लोकांच्या चालचलणुकीवर, रीतीभातींवर, व आचारविचारांवर जे परिणाम घडले आहेत, किंवा घडत आहेत, त्यांचें संक्षिप्त वर्णन करणें देखील अत्यंत दुरापस्त आहे.

तिकडे यंत्रकलेच्या अचाट कार्यशक्तीपुढें हस्तकला अगदीं मागें पडून गेली, व कांहीं वर्षांनीं तिचा समूळ अभाव होण्याचा संभव दिसत आहे. पूर्वी एक माग चालविण्यास एक मनुष्य लागे; आतां पांचपंचवीस मनुष्यांच्या क्षुल्लक साहाय्यानें एकटें यंत्र चारशें किंवा पांचशें माग चालवूं शकतें! याप्रमाणेंच इतर धंद्यांची स्थिति झाली आहे. काम हाकणारे असले जबरदस्त ब्रह्मराक्षस तिकडे मनुष्यांनीं भारून टाकून आपल्या सेवेस लाविले असल्यामुळें, त्यांनीं तें देश संपत्तीनें आणि तज्जन्य सुखानें भरून टाकिले आहेत. असल्या राक्षसांशीं आमच्या इकडील साळी, कोष्टी, किंवा सुतार, हातमागांनीं व हातकरवतांनीं कसली प्रतिस्पर्धा करणार? दररोज खंड्यांच्या खंड्या जवस आणि तीळ चिरडून टाकणाऱ्या यंत्रापुढें आमच्या घाण्याच्या बैलांकडून आमचे तेलीबोवा किती घाणे उतरणार? तर इंग्लंडसारख्या देशाशीं टिकाव धरतां येण्यास मजूर आणि कच्चा माल या दोन गोष्टींची अनुकूलता असली म्हणजे पुरे आहे असें नाहीं, तर यंत्रशक्तिही बऱ्याच उपयोगांत आली असली पाहिजे.

[वर्ष ३, अंक ४४, ४५, ४६.]

आयर्लंडाकडे पाहून तरी जागे व्हा.

बांधवहो, गिझनीच्या महंमदानें सोमनाथ येथील मूर्ति फोडून जो खजिना लुटला त्यानें, तैमूरलंगानें स्वारी करून तलवार आणि विस्तव यांनीं जो प्रलय करून दिला त्यानें, अवरंगजेबानें दक्षिणेपर्यंत स्वाऱ्या करून जो कहर करून सोडिला त्यानें, १७३८ त अफगाणच्या चोरानें जो धुमाकूळ मांडिला होता त्यानें, किंवा १७५९ त अबदालीनें जी कत्तल उडविली तिनें, तुमची निद्रा दूर झाली नसेल तर प्रस्तुत कालीं आयर्लंडांत जो प्रकार चालला आहे तो ऐकून तरी जागे व्हा, आणि देश सुखी कशानें होतो, याचें तत्त्व उमजा.

जे लोक तुम्हा महाराष्ट्रीयांवर क्लैणत्वाचा आरोप करीत असतील, जे तुमच्या अंगीं एकी नाहीं, राजकारणकौशल्य नाहीं, ज्ञान संपादण्याची इच्छा नाहीं, मोठेपणा मिळविण्याची चाड नाहीं, आणि स्वातंत्र्याची गोडी नाहीं, असें म्हणत असतील ते तुमचे मित्र नव्हत, तर शत्रु होत, असें समजून त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देऊं नका, व आपला आपणच धिक्कार करण्यास लागूं नका. पुराणपूर्व कालापासून पेशवाईचा लय होईपर्यंत ज्ञान, शौर्य, परोपकार, देशप्रीति, स्वामिभक्ति, प्रजावात्सल्य, इत्यादि गुणांबद्दल जे येथें नांव ठेवून अमर होऊन गेले आहेत, त्यांचें नित्य स्मरण करीत जाऊन, व सध्यां आपणांत जे दोष वसत आहेत, त्यांचें शांतपणें निरीक्षण करून, आपल्यापेक्षां पुढील पिढी ज्ञानानें, सद्गुणानें व सुखानें श्रेष्ठ कशी होईल या गोष्टीचें मोठ्या काळजीनें चिंतन करा, आणि मनांत धरलेला हेतु तडीस जाण्यास जे उत्तम उपाय असतील, ते शोधून काढून अमलांत आणण्याविषयीं रात्रंदिवस परिश्रम करा. जे ज्या देशांत जन्माला येतात, जे ज्या देशांतील संपत्तीचा उपभोग घेतात, व ज्यांचें ज्या देशांतील सुधारणेवर प्रत्येक प्रकारचें सुख अवलंबून असतें, त्यांनीं त्या देशांतील ज्ञानाचा, संपत्तीचा, नीतीचा, व स्वातंत्र्याचा विस्तार करण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली नाहीं, तर त्यांच्यांत, आणि त्याच देशांत उपजीविका करून आयुष्य कंठणारे जे खालचे जीव त्यांत, भेद तो कोणता ? मनुष्यांत आणि पशूंत जो मुख्य भेद आहे, तो हा कीं पशूंना आपलें ज्ञान, व आपलीं

सुखें, हवीं तितकीं वाढवितां येत नाहींत. मनुष्याची गोष्ट तशी नाहीं. त्याच्या अंगीं वाग्विचारादि ज्या अनेक शक्ति आहेत, त्यांच्यामुळें त्यास आपलें ज्ञान आणि सुख हवें तितकें वाढवितां येणार आहे. कित्येक वेदांत्यांना ज्ञानाची आणि सुखाची वृद्धि करण्यांत कांहीं हांशील वाटत नाहीं; आणि कदाचित् त्यांचें म्हणणें खरेंही असेल; पण ज्ञानवृद्धींत आणि सुखांत कांहीं तात्पर्य नाहीं, हें ज्ञान होण्यास तरी अगोदर किती ज्ञान संपादावें लागतें ? तसेंच, ज्ञानसंपादनाच्या पाठीमागें जे लागले आहेत, ते सारेच वेदांती झाले, असें कधींही होत नाहीं. पुनः, ज्याअर्थीं वैराग्य आणि आधिभौतिक सुखोपभोग, या दोनही गोष्टी अनेक वर्षें लोकांपुढें असतां, बहुतेकांची प्रवृत्ति पहिल्याकडे न होतां, दुसऱ्याकडे होत आहे, त्याअर्थीं मनुष्यप्रकृतीला साधारणपणें आधिभौतिक सुखोपभोग अधिक इष्ट आहे, हें निर्विवाद सिद्ध होतें. समजूं लागल्यापासून मरेतोपर्यंत, जो तो होईल तितकें सुख संपादण्याच्या, व तें भोगण्याच्या धांदलींत असलेला दृष्टीस पडतो, व तो तींत इतका निमग्न होऊन गेलेला असतो, कीं त्याला आपलें खरें सुख कशांत आहे, तें कशानें प्राप्त होईल, तें पुष्कळ दिवस टिकेल कशानें, याचा विचार करण्यास, किंवा तें प्राप्त झालें असतां थोडा वेळ त्याचा स्वस्थपणें उपभोग घेण्यासमुद्धां वेळ सांपडत नाहीं ! यामुळें होतें काय, कीं प्रत्येक मनुष्याला आपापल्या आवडीनावडीप्रमाणें, चाहील त्या सुखाचा यथेच्छ उपभोग घेतां येण्यास, ज्या सार्वजनिक गोष्टीकडे त्याच्या चित्ताचा कांहीं भाग, निदान मधून मधून तरी, वेधला पाहिजे, तो वेधेनासा होऊन, सर्वांच्या सुखाच्या पायाभूत ज्या गोष्टी, त्यांच्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळें, व्यक्तींच्या सुखाची इमारत एकदम ढासळून जाऊन तींत वास करणाऱ्यांच्या कपाळीं पारतंत्र्य येतें. व त्यांस नित्य कष्टभारी व्हावें लागतें ! पृथ्वींतील ज्या ज्या राष्ट्रांकडून या सर्वसामान्य व सर्वाधाररूप गोष्टींकडे जोंपर्यंत दुर्लक्ष झालें नाहीं, तोंपर्यंत त्या त्या राष्ट्रांत ऐश्वर्य, संपत्ति, ज्ञान, व शौर्य यांचा अव्याहत विस्तार होत गेला. ज्या दिवशीं या गोष्टींस ते पराङ्मुख झाले, त्या दिवशीं त्यांच्या मोठेपणास उतरता पाया लागला, व अखेरीस त्यांचा ऱ्हास झाला. पृथ्वीवरील पाहिजे त्या जुन्या किंवा नव्या राष्ट्राच्या इतिहासाकडे पहा; वर सांगितलेल्या तत्त्वाचा त्यांत तुम्हाला प्रत्यय आल्यावांचून रहाणार नाहीं.

मनुष्यें समाज करून राहूं लागलीं, म्हणजे त्यांच्यांत परस्परावलंबन स्वाभाविकपणें उत्पन्न होतें. समाजांत राहणाऱ्या मनुष्यास थोडेंबहुत पारतंत्र्य किंवा

परावलंबन भोगण्यास नेहमीं तयार असलेंच पाहिजे. समाज व्यवस्थितपणें चालून, त्याचें पाऊल एकसारखें पुढें पडत जाण्यास जितक्या पारतंत्र्याची अवश्यकता आहे, तितकेंच पारतंत्र्य ज्या समाजांतील प्रत्येक व्यक्तीस भोगावें लागतें, व अधिक भोगावें लागत नाहीं, तो देश अत्यंत सुखी आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्या मानानें ह्या अवश्यक पारतंत्र्याचा हिस्सा असमतेनें पडूं लागतो, त्या मानानें अनवस्था, दुःख, जुलूम, व असंतोष, यांचा उद्भव होतो. आईबापांना मुलांवर, नवऱ्याला बायकोवर, स्वामींना सेवकांवर, व राजांना प्रजेवर, जों जों अधिकाधिक हक्क मिळत जातात, तों तों एका पक्षाला अयुक्त स्वातंत्र्य मिळत जातें, व दुसऱ्याच्या वांट्याला पारतंत्र्य येतें. आपलें मन एकीकडे ठेवून दुसऱ्याच्या तब्यतीप्रमाणें वागावें लागणें, यांतच मोठें दुःख आहे. कित्येकदां असें होतें, कीं ज्याचें त्याला आपलें हित बरोबर कळत नसतें, व दुसऱ्यानें सांगितलेलें त्याला रुचत नसतें. या रीतीनें एकीकडून अज्ञान, व दुसरीकडून परोपदेशतिरस्कार, यांचा घरा पडून शेवटीं तो आपल्या खऱ्या कल्याणास मुकतो ! असें जरी आहे, तरी ज्याचें त्याला होईल तितकें स्वातंत्र्य भोगूं देणेंच इष्ट आहे. कारण एकानें दुसऱ्याचें हित कशांत आहे, हें शोधून काढण्यांत जितक्या चुका होण्याचा संभव आहे, त्यापेक्षां लक्षपटीनें कमी चुका, ज्याचें त्यानें आपलें हित कशांत आहे, हें शोधून काढण्यांत होणार आहेत. म्हणून राष्ट्राच्या राज्यरीतींत या गोष्टीकडे होईल तितकें लक्ष देणें फार जरूर आहे.

अनियंत्रित एकसत्ता मोडून तिच्या जागीं बहुसत्ताक राज्यपद्धति स्थापणें, जिंकणाऱ्या राष्ट्रांचा अंमल झुगारून देणें, स्थानिक स्वराज्याचा अधिकाधिक विस्तार करणें, गुलामांचा व्यापार बंद करणें, स्त्रीपुरुष, स्वामिसेवक, गुरुशिष्य, राजाप्रजा—यांच्यामधील संबंध होतील तितके अन्योन्यांच्या इच्छेवर आणून ठेवणें--या सगळ्यांच्या मुळाशीं वर निर्दिष्ट केलेलें तत्त्व आहे. होईल तितकें करून ज्याचें त्याला आपलें काम आपल्या मनाप्रमाणें करूं द्यावयाचें.

आयर्लंडाचा इंग्लंडाशीं जो झगडा चालला आहे तो सगळा या तत्त्वासाठीं. इंग्लिश लोक सध्यां आयर्लंडाचें राज्य जितक्या व्यवस्थेनें करीत आहेत, तितक्या व्यवस्थेनें कदाचित् त्यांचें त्यांना करतां येणार नाहीं; म्हणून त्यांना स्वातंत्र्य देणें बरोबर नाहीं, हें म्हणणें न्याय्य नाहीं. आपलें काम वेडेंवांकडेंच कां होईना, पण जेव्हां तें आपल्या हातून वठतें, तेव्हां जें समाधान होतें, त्याच्या शतांश

समाधान दुसऱ्यानें तें कितीही सुबक करून दिलें तरी होत नाहीं. आणि असें कां होतें याला कारण आहे. आपलें काम आपल्यावर पडलें असलें म्हणजे तें आज नाहीं साधलें तरी उद्यां साधेल, उद्यां न साधलें तरी पर्वां साधेल; कालांतरानें तें आपलें आपणांस उत्कृष्ट करतां येऊन त्याच्यापासून होणाऱ्या साऱ्या सुखाचा उपभोग आपणांस घेतां येईल, अशी ईर्षा निरंतर जागृत असते, व तिच्यामुळें अवर्णनीय समाधान होत असतें. पण जेव्हां दुसरा आपलें काम करीत असतो, तेव्हां या समाधानाचा अंतःकरणास स्पर्श सुद्धां होत नसतो. जो दुसरा आपल्यासाठीं आपलें काम करीत असतो, तो आपल्यापेक्षां विशेष चतुर असेल, व फारच कमी स्वार्थसाधु असेल, तर कांहीं काळपर्यंत आपणांस नुसतें बाह्यसुख थोडेसें अधिक होण्याचा संभव आहे. पण ज्याची त्याच्या शिरावर जबाबदारी असल्यानें त्याच्या बुद्धीस जें चांचल्य येतें, उद्योगनिमग्नत्वामुळें त्याच्या वृत्तींत जी प्रफुल्लता असते, कष्टान्तीं जय आल्यास जो अनिर्वचनीय आनंद होतो, तो दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणाऱ्यास कधींही व्हावयाचा नाहीं. मि. ग्लाडस्टन यांच्या मनांत हें मत अगदीं खिळून गेलेलें आहे. आणि म्हणून त्यांच्या हातून आयरिश बिल पार्लमेंटापुढें आलें. ब्रिटिश पार्लमेंटापुढें आमच्यासाठीं असें बिल आणण्यास ईश्वरानें कोण योजून ठेविला असेल तो असो ! इतकें खरें आहे कीं आम्ही शेंदोनशें वर्षें दांतीं तृण धरून एकदिलानें परिश्रम केल्याशिवाय तो इसम पुढें येण्याचा संभव नाहीं. हे परिश्रम कोणकोणत्या दिशांनीं करावे हें पुढें एखादे प्रसंगीं लिहूं.

[वर्ष ६, अंक १८.]

हिंदुस्थानावर रशिया स्वारी करणार काय ?

असल्या विषयावर आम्ही नेटिव पत्रकर्ते जीं आर्टिकलें लिहितों, त्यांत कांहीं विशेष अर्थ असतो असें नाहीं. कारण, एक तर आमची सगळी माहिती इंग्रजी पत्रांतून किंवा मासिक पुस्तकांतून चोरलेली, अथवा घेतलेली असते. दुसरें आम्हांस जी माहिती लागते, ती बहुशः गोष्ट घडून आल्यावर महिनापंधरा दिवसांनीं मागून लागते ! तिसरें, असल्या उपटाउपट करून मिळविलेल्या शिळ्या माहितीवर आम्हीं कांहीं आर्टिकलें जरी झोडलीं, व " सरकारानें यंव करावें व त्यंव करावें, " अशीं मोठ्या ऐटीचीं मतें दिलीं, तरी असल्या प्रकरणांत त्यांचा रतिभार तरी विचार होत असेल किंवा नाहीं, याचा आम्हांस बळकट संशय आहे. असें जर आहे तर आम्ही तरी असलीं आर्टिकलें खरडण्यांत आपली जागा कधीं कधीं कां अडवितों, असा प्रश्न आम्हांस कोणीही सहज करणार आहे. त्यावर आमचें असें उत्तर आहे कीं, आम्ही रशियाच्या कारस्थानांत कधीं कधीं जे पडतों, ते ग्लाडस्टन, बिस्मार्क, लॉर्सडेन किंवा डफरिन यांसारख्यांना कांहीं सल्लामसलत देण्यासाठीं नव्हे, तर आमच्या लोकांना या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नासंबंधीं कांहीं माहिती हस्तेंपरहस्तें तरी झालेली असावी, यासाठीं होय. हिंदुस्थानसरकारानें अमुक करावें, इंग्लिश लोकांनीं तमुक करावें, अशा आपल्याकडून मोठ्या शहाणपणाच्या गप्पा जरी मारल्या, तरी त्यांपासून काडीचा फायदा नाही. नवीन प्रांत काबीज करण्यासाठीं फौजा धाडणें, परदेशाशीं लढाया उपस्थित करणें, उपस्थित झालेल्या तहांनीं शेवटास आणणें, दुसऱ्या राजांच्या दरबारांत ढवळाढवळ करणें, निरनिराळ्या स्वतंत्र राष्ट्रांच्या राजधान्यांत वकील ठेवणें, वगैरे राज्यकर्तृत्वाच्या अंगांनीं आम्हांस अगदीं सोडलें आहे. आमच्या कृपावंत सरकारच्या उदारपणामुळें, व ममतेमुळें आम्हांस असल्या काळजीच्या प्रश्नांनीं डोकीं तापवून घेण्याचा प्रसंग केव्हांही येत नाहीं. आमचें कर्तव्यकर्म येवढेंच आहे कीं, सरकार जें काय करील त्याला लागणारा खर्च देण्यास तयार असलें म्हणजे झालें. तो आम्ही कुरकुर न करतां देत गेलों, म्हणजे आमच्या सल्लामसलतीची सरकाराला मुळींच पर्वा नाहीं.

तथापि कोणत्याही राजकीय उलाढाली झाल्या, तरी त्या पैसा आणि माणसें यांशिवाय व्हावयाच्या नाहींत. माणसें इंग्लंडांत हवीं तितकीं पैदा होतात. पण पैशाचें तसें नाहीं. तो येथल्यायेथेंच काढावा लागतो. उदार इंग्लंड आम्हांस आपले हवे तितके पुत्र देतें, पण पौंड देत नाहीं. रुपये देण्याचें औदार्य हिंदु लोकांच्या कपाळीं येतें; व हें औदार्य करतांना आमच्या खिशांतील हा रुपया कोणीकडे चालला आहे, असा विचार आल्याशिवाय राहत नाहीं. रुपये आकाशांतून पडते, तर असा विचार न येता. पण दुर्दैवानें तसें होत नाहीं. ते मिळण्यासाठीं या पृथ्वीवर आम्हांस खपावें लागतें. रात्रंदिवस हाडांचें पाणी करावें, तेव्हां ते दृष्टीस पडतात. याप्रमाणें निढळाच्या घामावर कमावलेल्या लाडक्या गोऱ्या गुंडगुळ्यांचा वियोग अत्यंत दुःसह आहे. तो ज्या वेळेस होतो. त्या वेळेस सर्व वेदांत व औदार्य एकीकडे ठेवून "अव्यापारेषु व्यापारः" करण्याची थोडीशी स्वाभाविक बुद्धि होते. शिवाय आणखी एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे, ती ही कीं, इंग्रजांच्या बलाढ्य छत्राखालीं आजतारखेला आम्हांस घोरत पडायास सांपडत आहे, हें जरी खरें आहे, तथापि दैवदुर्विलासानें जर कदाचित् रूस लोकांच्या वादळामुळें हें छत्र उडूं लागलें, किंवा फाटूं लागलें तर आमची कशी गत होणार ! आम्हांस त्रास पडूं न देतां इंग्रजांस आम्हांसाठीं ज्या लढाया कराव्या लागतील त्यांस लागणारीं माणसें आणि पैसा, आम्हांस द्यावा लागतो, व पुढेंहि द्यावा लागणार व कोणत्याही रीतीनें इंग्रजांच्या राज्यास धक्का पोंचल्यास त्याच्यापासून उपस्थित होणाऱ्या घोर अनर्थांची पीडा आम्हांसच भोगावी लागणार, हें त्यांना, आम्हांला व कोणालाही कबूल केलें पाहिजे. समजा कीं रशियानें ब्रिटिशसरकारचा पराभव करून हिंदुस्थानांत आपली सत्ता स्थापण्याचा घाट आणिला, तर काय स्थिति होईल ! आमचे राज्यकर्ते आपल्या व्यापाराच्या सोईपुरती रशियन लोकांशीं व्यवस्था करून जहाजें भरभरून इंग्लंडास चालते होतील. प्रस्तुत आम्हांत व रूसलोकांत इंग्रजांचा पडदा आहे, व रूसलोकांचे सारे बाण या मध्यस्थ पडद्यावर पडत असल्यामुळें, आम्हांस पैशाशिवाय दुसऱ्या कशाचीही पीडा होत नाहीं, हें खरें आहे. तथापि जर या पडद्यास फार भोंकें पडलीं, किंवा कांहीं अनपेक्षित कारणांनीं तो उडून गेला, अथवा वर ओढला जाऊन मग वरच्यावर नाहींसा झाला, तर आमची वाट काय होणार ! हिंदुस्थानच्या वायव्य दिशेकडून येणाऱ्या लढाऊ झुंडीच्या

रानटी व क्रूर महत्त्वाकांक्षेचा सारा बोजा आम्हांवर पडणार. रशियन लोक ख्रिस्तधर्मानुयायी आहेत, तेव्हां केवळ तैमुरलंगाच्या लुटारू व दुष्ट शिपायांप्रमाणेंच ते आमचे हाल करतील असें वाटत नाहीं; तथापि एकदां लढाईच सुरू झाली म्हणजे कोणी कोणत्याही धर्माचा असला, तरी त्याला आपल्या धर्मांतील नाजुकपणाचीं तत्त्वें एकीकडे ठेवून जेणेंकरून शत्रूचा पराभव होईल, अशा प्रकारचीं कृत्यें करण्यास मनाचा धडा करावा लागतो. हिंदुस्थानदेश काबीज करतांना इंग्रजांनीं केलेलें सारेंच आचरण नीतितत्त्वास अनुसरून होतें असें नाहीं. तसेंच थोड्या वर्षांपूर्वी रशिया व टर्की, व फ्रान्स आणि जर्मनी यांच्यांत जी रणें झालीं, त्यांत त्यांना पुष्कळ गोष्टींत ख्रिस्ती धर्माच्या आज्ञा उल्लंघाव्या लागल्या. शिवाय रशियन लोक हिंदुस्थानावर येतील, तेव्हां ख्रिस्ती फौजाच घेऊन येतील, असें नाहीं. त्यांच्या परिवारांत मोंगल असतील, टार्टर असतील, अफगाण असतील व दुसरे अनेक कडवे लोक असतील. पूर्वी झांझिजखान, तैमूर, नादिरशहा वगैरे पुरुषांनीं ज्या रानटी लोकांनिशीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या, तेच लोक रशियाच्या निशाणाखालीं गोळा होऊन मागच्याप्रमाणें माणसें कापीत, घरेंदारें जाळीत, व देश उध्वस्त करीत आपलें कुच करतील. असला सैन्यपूर एकदां जोरानें वाहूं लागला, म्हणजे आमची व आमच्या सरकारची केवढी त्रेधा उडेल याची कल्पना सुद्धां करणें अशक्य आहे. तथापि असला बिकट प्रसंग आमच्यावर पुढें मागें ओढणार आहे याबद्दल आतां कोणास शंका राहिलेली नाहीं. म्हणून रशियन कोणत्या प्रकारचे लोक आहेत, हिंदुस्थानावर त्यांनीं फार वर्षांपासून डोळा ठेविला आहे किंवा नाहीं, काबीज केलेल्या देशांस ते कोणत्या रीतीनें वागवितात, हिंदू लोकांविषयीं व इंग्रज लोकांविषयीं त्यांचे काय समज आहेत, इंग्रज लोकांत आणि त्यांच्यांत काय तफावत आहे, त्यांचें सैन्यबल व द्रव्यबल किती आहे, आपला हेतु सिद्धीस नेण्यासाठीं त्यांनीं कोणकोणते उपाय चालविले आहेत, व त्यांत त्यांना किती यश येण्याचा संभव आहे, त्यांचा पराभव करण्यास आमच्या सरकारापाशीं काय काय साधनें आहेत, व याप्रसंगीं इंग्रजांनीं आमच्याशीं व आम्हीं त्यांच्याशीं कसें वागावें, वगैरे गोष्टींविषयीं आम्हां लोकांस पूर्ण माहिती असणें फार अवश्यक आहे, व ती देववेल तितकी देण्याचा आम्हीं विचार केला आहे.

नाइन्टीन्थ सेंचरीच्या जानेवारीच्या अंकांत आरमीनिअस व्हॅंब्री या नांवाच्या गृहस्थाचें " रशिया जिंकील काय ! " म्हणून जें आर्टिकल आलें आहे, त्याच्या आधारानें आमचीं आर्टिकलें लिहिण्यांत येणार आहेत. ज्यांना हीं आर्टिकलें समजण्याच्या हेतूनें वाचावयाचीं असतील, त्यांनीं तीं वाचतांना नकाशाचें चांगलेंसें पुस्तक जवळ ठेविलें पाहिजे. रस्त्यांत अंधाला जशी यष्टि, तसा इतिहासाला भूगोल होय. शाळेंतील मुलें ब्लेनहिम कोठें आहे, हें माहित नसतां ब्लेनहिमच्या लढाईची हकीकत लिहितात, व मार्क मिळवून परीक्षेंत पास होऊन जातात. पण व्यवहारांत पडलेल्या प्रौढ मुलांस कांहीं तरी लटपट करून परीक्षा पास व्हावयाचें नसतें ! ज्या ज्ञानापासून खरें हित होण्यासारखें असेल, असें ज्ञान त्यांना मिळवावयाचें असतें. सबब, रशियाच्या हालचालींचें वास्तविक स्वरूप लक्षांत येण्यास क्वेटा, सिब्बी, हिरात, टाश्कंद, बाटूम, टिफ्लिस, पीटर्सबर्ग वगैरे नांवें मुखोद्गत असलीं, म्हणजे अवश्य भूगोल आला असें होत नाहीं. रशियाच्या राज्याचा एकंदर विस्तार केवढा आहे, मध्यएशियांत त्या देशानें जे प्रांत काबीज केले आहेत, त्यांचीं क्षेत्रफळें, हवापाणी, डोंगर, नद्या, पिकें, उत्पन्नें, लोकसंख्या व लोकस्वभाव इत्यादि गोष्टींचें यथार्थ ज्ञान असलें पाहिजे. या सगळ्या विषयांची माहिती अगोदर देऊन मग आर्टिकलें लिहिणें, हें केसरीयेवढ्या आठवड्याच्या पत्रांत साधण्याचा संभव नाहीं. म्हणून ज्यांना या प्रश्नांत मन घालायाचें असेल, ते मध्यएशियाच्या भूगोलाची माहिती प्रथम करून घेतील, अशी आशा करून प्रकृत विषयाकडे वळतों.

रशियाच्या राष्ट्रत्वाचा पाया घालणारा रशियाचा राजा पीटर धी ग्रेट होय. क्रमिक शाळापुस्तकांत या थोर पुरुषाविषयीं थोडीशी हकीकत दिलेली आहे, तीवरून बहुतेक वाचकांना याची जुजबी तरी ओळख असेल. रशियाचें राज्य बलाढ्य व विस्तृत व्हावें अशी याची उत्कट इच्छा होती; तथापि राज्य-विस्तारास्तव पुढें मागें रशियानें हिंदुस्थानावर चाल करून जावें, असें याच्या स्वप्नांत तरी आलें असेल, असें वाटत नाहीं. याच्यापुढें क्याथलाईन म्हणून रशियांत अत्यंत प्रसिद्ध राणी होऊन गेली. हिच्या कारकीर्दीत ही सुवर्णभूमि संपादण्याचा विचार कोणाच्या मनांत आला असावा, असें मानण्यास आधार नाहीं. क्यास्पिअन (कश्यप) समुद्राच्या उत्तरपश्चिम म्हणजे वायव्यसीमेवरील आस्त्राखान व कासान हे प्रांत जिंकण्यांत येऊन, ते रशियाच्या राज्यास जोडले

गेल्यावर त्या प्रांताच्या दक्षिण दिशेस ज्या स्वाऱ्या होऊं लागल्या त्या कदाचित् स्वतंत्र तार्तरींतील खीव प्रांताच्या सुवर्णकणमय वालुकारण्यांतील सोनें गोळा करण्याच्या लोभानें होऊं लागल्या असाव्यात, असें मानिलें तरी चालेल. पूर्वी एका खंडांतील लोकांस दुसऱ्या खंडांत प्रवास करण्याचीं साधनें आतांपेक्षां फार कमी असल्यामुळें, व सुरक्षितपणा मुळींच नसल्यामुळें, कोणाची कोणास खरी माहिती नसे. जे धाडस प्रवासी जीवावर उदार होऊन प्रवास करून जात, त्यांनीं हव्यातशा गप्पा मारिल्या तरी लोकांना त्या खऱ्या वाटत. अनभ्यस्त ठिकाणीं प्रवास करण्याचें धाडस ख्रिस्ती पाद्र्यांत जसें आहे, तसें त्या धर्माच्या दुसऱ्या कोणत्याही वर्गांत नसेल असें वाटतें. शुभवर्तमानाचा पृथ्वीतलावर विस्तार करण्यासाठीं या लोकांच्या झुंडी कष्टाकडे न पहातां; हव्या त्या ठिकाणीं जाण्यास मागेंपुढें पहात नाहींत. पृथ्वीच्या सर्व भागांत हे पसरलेले आहेत. पालेस्टाईन प्रांतांत जीं धर्मयुद्धें झालीं, त्यांसाठीं युरोपांतील ख्रिस्ती राजांना सारॉसिन लोकांशीं लढण्यासाठीं राजधान्यांतून बाहेर काढण्याची विलक्षण खटपट प्रथम पाद्र्यांनींच केली ! पाद्री हें नांव त्यांना अगदीं अयथार्थ आहे ! तात्पर्य काय कीं, धर्मप्रसारासाठीं मिशनरी प्रवाशांनीं, किंवा स्वार्थ साधण्यासाठीं व्यापारी प्रवाशांनीं, प्रथम नवीन देशांत प्रवेश करून त्याची वरवर टेहेळणी करावी, व स्वदेशीं परत गेल्यावर आपापला कार्यभाग साधण्यासाठीं, आपल्या देशबंधुंपाशीं खाशा खाशा बाता ठोकून त्यांस घरांतून बाहेर पडण्यास, स्वाऱ्या करण्यास उद्युक्त करावें, असें पूर्वी फार होत असे. शिवाय बऱ्याच वर्षांमागें युरोपापेक्षां आशियाखंडांत कलाकौशल्याचा विस्तार झाला असल्यामुळें, तिकडील थंडीनें कुडकुडलेले, व अन्नावांचून भुकावलेले जे प्रवासी इकडे येत; ते इकडील वस्त्रेंपात्रें, बागबगीचे, शहरें, रस्ते, घरेंदारें, देवळेंवाडे, व ऐषआराम पाहून दिपून जात, व आपल्या देशबंधूंस असल्या सुपीक व रम्य प्रदेशांची हकीकत आपण केव्हां जाऊन सांगूं, व त्यांस इकडे केव्हां घेऊन येऊं, असें त्यांना होत असे. या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या अनेक कारणांमुळें राशियाच्या लोकांस युरोपांतील राशिया पुरेनासा झाल्यावर त्यांनीं आपल्या पूर्वसीमेवरील यूरल पर्वत व यूरलनदी उल्लंघून सैबिरिया देशांत, व आपल्या अग्नेय सीमेवरील क्यास्पिअन समुद्र उल्लंघून स्वतंत्र तार्तरींत, प्रवेश केला असावा, असें अनुमान दिसतें. तथापि या गोष्टी त्यांनीं ज्यावेळेस केल्या, त्यावेळेस हिंदुस्थान

जिंकण्याची कल्पना त्यांच्या मनांत होती, असें मानण्यास फारसा आधार कोठें दिसत नाहीं. मध्यएशियांतील निर्जन व निपाणी अशा वाळूच्या भणभणीत मैदानांतून नीटपणें पार पडून, आपल्यापेक्षां वसि किंवा तीसपट अधिक अशा रानटी तार्तरी लोकांचा पराभव रशियन शिपायांस जेव्हां करतां आला, व टाश्कंद् शहर त्यांच्या हस्तगत झालें, तेव्हां ही कल्पना त्यांच्या मनांत आली असावी. ही गोष्ट दोन दशकांच्या पूर्वी, म्हणजे १८६४ त झाली. टाश्कंद् सर करण्याचें काम जनरल चरनेफ याजकडे होतें. त्यानें त्या प्रसंगीं आपल्या एका मित्रास जें पत्र लिहिलें, त्यांत पुढें दिलेले विलक्षण शब्द होते. "हिंदुस्थान जिंकण्याबद्दल आतांपर्यंत आम्हांस जें गूढ होतें, व जी गोष्ट आजपावेतों आम्हास केवळ काल्पनिक वाटे, ती आतां माझ्या दृष्टीस संभवनीय वाटूं लागली आहे." या लेखावरून हिंदुस्थान काबीज करण्याचा आशांकुर रशियन लोकांच्या अंतःकरण क्षेत्रांत या वेळेस प्रथम उद्भवला, हें उघड आहे. व्होलगा व यूरल नद्यांच्या पूर्वेस, व यूरल पर्वताच्या दक्षिणपूर्वेस वाळूचीं जीं भयाण व अफाट मैदानें आहेत त्यांत किर्घिज व कोसाक लोक रहातात. याच निर्जन प्रदेशांच्या मध्यभागी आरल समुद्र आहे. या समुद्रास पश्चिमोत्तर-वाहिनी यक्षस्तरी किंवा जग्झारटीज नांवाची नदी येऊन मिळते. या नदीच्या आसपास गांवें वसलीं आहेत, व जमीनही बरीच सुपीक आहे. किर्घिज मैदानांत येऊन टेपल्यावर, रशियन लोकांच्या टोळ्या थाऱ्याच्या जागा पाहूं लागल्या; कांहीं टोळ्या उत्तरेकडे गेल्या व त्यांनीं वीरतृषा किंवा ईर्टिज नदीच्या उत्तरेकडे वाहणाऱ्या ओघात अनुसरून, टोबाल अथवा टोबालस्क शहर आपलेसें करून घेतलें. दक्षिणेकडे ज्या टोळ्या निघाल्या, त्यांनीं यक्षस्तरीची थडी धरली, व त्या थडीनें बेताबेतानें खालीं उतरून टाश्कंद् शहर बळकाविलें. यापुढें रशियन लोकांनीं स्वतंत्र तार्तरीत जे प्रांत काबीज केले, ते या मध्यटाण्याच्या अवसानावर केले.

टाश्कंद् येथें शाबूद ठाणें सांपडल्याबरोबर मागेंपुढें पाय शिरकाविण्यास चांगली सोय झाली. जो प्रांत काबीज केला, तो तर संभाळलाच पाहिजे. अशिक्षित रानटी मुसलमानांशीं भांडाभांडीचा प्रसंग हा नेहमीं यावयाचाच, तेव्हां एक तर त्यांच्याशीं सख्य केलें पाहिजे, किंवा त्यांना पक्कें जिंकिलें पाहिजे. रशियानें बहुशः

सर्वत्र मध्यम मार्गाचें अवलंबन केलें. मध्यएशिआंतील मुसलमान लोकांत आपआपसांत तंटे फार असल्यामुळें, राशियाला आपलें कारस्थान चालविण्यास आयतीच संधी सांपडली. बोखारा प्रांतांत तंटा सुरू झाल्यामुळें, खानाच्या कल्याणासाठीं व संरक्षणासाठीं, राशियाला त्या तंट्यांत हात घालावा लागला! सन १८६८ त राशियानें बोखारा शहर घेतलें, व या नवीन काबीज केलेल्या प्रांताची व्यवस्था करण्यापुरती राशियापाशीं द्रव्यसामुग्री असती, तर हा प्रांत राशियाच्या राज्याचा एक अवयव केव्हांच होऊन जाता. पण खजिना अगदीं कोरडा पडला असल्यामुळें, खानाला नामधारी राजा करून, त्याच्याकडून त्याच्या मुलखाचें काम चालविणें भाग पडलें ! झरेफशान अथवा शास्यन्ती नदीच्या तीरावरील घा अमिराचें सिंहासन अबाधित राहूं दिल्यामुळें, राशियन लोकांनीं त्याची कृतज्ञता व प्रीति संपादिली आहे. तो झाराचा विश्वासुक बंदा नोकर झाला आहे. आज साठीनें त्याच्या काठीची धनुकली व तोंडाचें बोळकें झालें आहे. या छायामात्र राजपुत्रानें राशियाचा एक मोठा फायदा होत आहे, तो हा कीं, राज्य चालविण्याचा व दंगेधोपे मोडण्याचा सारा खर्च त्याच्या खजिन्यावर पडत असल्यामुळें " साल तुला आणि गीर मला " या रीतीनें या प्रांतांत त्यांचा राज्यप्रसार होत आहे. या अमिराच्या पाठीमागून त्याच्या स्थानापन्न होणारा त्याचा मुलगा प्रत्येक बाबतींत राशियन धर्तीवर वाढलेला आहे, तेव्हां त्याच्यापासून राशियास त्रास न होतां उलट फायदाच होणार. वाढतां वाढतां त्याची स्वामिभक्ति व राजनिष्ठा इतकी वाढेल कीं " आपण प्रजाकल्याणासाठीं व मानवोन्नतीसाठीं माझ्या राज्याचा भार आपल्या शिरावर घेण्याची तखलीफ घ्या " अशी तो झारास विनंति करील, व मनुष्यजातीच्या हितास्तव त्याला ती मान्य करावी लागेल ! देश काबीज करण्याच्या कामांत रूस लोक घाई अशी कधीं करीत नाहींत. एकदां बळकटसें एखादें ठाणें धरून बसावयाचें. पुढें एखादा खान किंवा अमीर बगलेंत मारून चेताबेतानें राशियन पेहराव, राशियन भाषा, राशियन खाना व राशियन पेयें यांची लोकांस लालूच लावून, ते पक्के आटोक्यांत आल्यासारखे दिसले, कीं बकध्यान एकीकडे. अशा धिमेपणानें नादीं लावलेला मुलूख खालसा करावयाचा.

१८७३त बोखाराची स्थिति खीव परगण्यास आली. येथेंही राशियन लोकांनीं परगण्याचें स्वामित्व खानाकडे ठेवून आपल्याकडे त्याचें पालकत्व मात्र घेतलें ! हा

खान दिसण्यांत मोठा गुलजार व तरुण आहे, पण याची बुद्धि जितक्यास तितकीच आहे. लढाईचा खर्च रशियन लोकांनीं याच्या गळ्यांत बांधिला आहे. बहुशः या प्रांताचा हा शेवटचाच खान होईल असें वाटतें! राजकीय, व्यापार-संबंधीं, व अशाच प्रकारच्या दुसऱ्या अनेक कारणांमुळें हा प्रांत रशियाला आपल्या हातांत घ्यावा लागेल असा सुमार दिसतो!

खीवाच्या पाठीमागून तीन वर्षांनीं, म्हणजे १८७६ त खोकंद परगण्याचीं रशियाच्या घशांत पडण्याची पाळी आली. या परगण्यांत येणारें टाश्कंद शहर रशियन लोकांनीं पूर्वीच काबीज केलें होतें, हें मागें सांगितलेंच आहे. एकाच प्रांतांत द्विधा अंमल सुरू झाल्यामुळें तंट्यांची लवकरच रेलचेल झाली. खोकंदच्या खानाचें सिंहासन डळमळूं लागलें, व त्याचें संरक्षण करणें अशक्य झाल्यामुळें, रशियास तो प्रांत खालसा करावा लागला! या प्रांतापासून रशियास म्हणण्यासारखा फायदा होण्याचा संभव नाहीं. कारण त्याच्या पश्चिमेकडील मुलूख त्याच्या ताब्यांत असल्यामुळें त्यांना त्याच्यापासून कांहींएक भीति नव्हती. येवढें खरें कीं हा प्रांत तुर्कस्थानाच्या अगदीं पूर्वसीमेवर असल्यामुळें त्यांतून चिनईतार्तरीवर स्वारी करण्यास चांगली सोय आहे. पण ती स्वारी अंगावर घेण्याचा रशियाचा सध्यां तरी बेत दिसत नाहीं. तसेंच या प्रांतांतून बाहेर पडून पामिरचें सपाट मैदान स्वाधीन करून घेण्यांतही फारसा फायदा दिसत नाहीं; कारण या मैदानांत व काश्मिरांत हिमालय पर्वत आहे. या प्रचंड पर्वताचें पामिरच्या बाजूनें उल्लंघन करून चित्रल प्रांतांत किंवा काश्मीर प्रांतांत प्रवेश करणें अत्यंत दुस्तर आहे. या दुःसाध्य कामीं काश्मीराकडून कांहीं साहाय्य होईल, असें रशियन लोकांस कदाचित् वाटत असेल. पण "आम्हां इंग्लिश लोकांस" या पर्वताच्या अवघड अडचणींची जी माहिती आहे तीवरून तरी रशियन लोक या मार्गानें हिंदुस्थानावर छापा घालतील असें वाटत नाहीं.

येणेंप्रमाणें दहा वर्षांच्या आंत तुर्कस्थानांतील तीन मोठे परगणे रशियानें हस्तगत करून घेऊन त्यांतील मूर्तिमंत रानटीपणास जेरीस आणिलें व राशियाचा निर्बंध अम्मल मोठ्या खर्चानें आणि श्रमानें तेथें स्थापिला; तेव्हां साहजिकपणें असा प्रश्न उत्पन्न होतो, कीं रशियानें हा इतका जो प्रचंड खटाटोप केला तो कशासाठीं? श्रमाच्या आणि खर्चाच्या मानानें यापासून कांहीं प्राप्ति होइल म्हणून, किंवा केवळ परोपकारबुद्धीनें मनुष्यजातीच्या उन्नतीसाठींच?

१८७० च्या पूर्वी रशियन लोकांस असें वाटत होतें कीं, पेरूप्रमाणें टाश्कंद प्रांतांत सोन्याच्या खाणींची खूप चंगळ आहे. पण हा आपला भ्रम आहे असें थोड्याच दिवसांनीं त्यांस पक्कें दिसून आलें. रशियन हंपिसरांच्या खोट्या बातांनीं माखलेल्या तुळतुळीत रिपोर्टास भुलून ज्या व्यापारी लोकांनीं सोनें गोळा करण्यासाठीं मोठमोठ्या कंपन्या काढल्या, त्यांचें भांडवल मातींत जाऊन त्या साफ बुडाल्या ! रशियन लढवय्यांनीं मात्र जिंकलेल्या लोकांवर हवातसा जुलूम करून आपल्या तुंबड्या भरून घेतल्या, व ओसाड प्रांत जिंकण्याचा खर्च राष्ट्रीय खजिन्यावर लादून त्याचें दिवाळें निघण्याचा प्रसंग आणिला ! हा प्रांत अगदींच नापीक आहे असें नाहीं, श्रम केले असतां त्याची जमीन लागवडींत घेण्यासारखी आहे. तथापि रशियन लोकांचा प्रचंड हव्यास, आणि या प्रांताची उत्पन्नशक्ति यांचें समीकरण कधीं तरी जुगेल असें दिसत नाहीं. रशियाच्या गिरण्यांत प्रतिवर्षी एक लक्ष बारा हजार टन कापसाचीं वस्त्रें तयार होतात. यांपैकीं आठ हजार टन कापूस या प्रांतांतून जातो. फारच खटपट केली तर आतांपेक्षां त्याचें उत्पन्न दुप्पट किंवा तिप्पट होईल. व तेवढें सारें झालें तरी बाकी राहिलेल्या कापसासाठीं रशियाला अमेरिकेवर अवलंबून रहावें लागणार तें लागणारच.

कापसाप्रमाणेंच व्यापारसंबंधीं इतर बाबतींतही निराशा झाल्यामुळें या तुर्कस्थानाचें आतां काय करावें, अशी रशियास साहजिक पंचाईत पडली. दीर्घ विचाराअंतीं त्यास असें दिसून आलें कीं, राजकीय आणि लष्करी खटपटी पक्कविण्यास ही मोठी सोईची जागा आहे. येथें लढाईची सारी तयारी झाली, म्हणजे पाहिजे त्या देशावर व विशेषेंकरून हिंदुस्थानावर चाल करून जाण्यास मोठें सवघड पडणार आहे. पण लष्करी जमातीचें तरी सुरक्षित ठाणें येथें होतें कसें ? यूरल पर्वताकडून खुष्कीच्या लांबच लांब, थंड, व ओसाड मार्गानें सैन्यें आणणें फार कठिण; तेव्हां तीं सहज रीतीनें येण्यास दुसरी एखादी तोड काढिली पाहिजे, व खिव परगणा जिंकिल्यावर रशियास ती तोड सहज काढतां आली. क्यास्पिअन समुद्रावर रशियाचें स्वामित्व आहे. या स्वामित्वाचा फायदा घेऊन त्यांनीं त्याच्या किनाऱ्यावर सैन्यें उतरलीं, व तुर्कोमन लोकांस मागून पुढून घेरून धरून त्यांना जिंकण्याचा बेत केला, व तो त्यांनीं जिवाकडे, कष्टाकडे किंवा पैशाकडे न पाहतां तडीस नेला.

आतां या प्रश्नाच उत्तर थोडक्यांत आटपतें घेतलें पाहिजे. कारण, गेल्या आठवड्यांत ज्या तारा आल्या आहेत, त्यांवरून रशिया व इंग्लंड यांच्या मधील

पाणी बरेंच गढूळ झाल्यासारखें दिसतें. राज्यकारस्थानांत पुष्कळदां खटाटोपो भयंकरः असेंच असतें, हें जरी खरें आहे, व कासाक आणि तुर्कोमन लोकांच्या घोड्यांच्या टापा आर्यभूमीला लागण्यापूर्वी त्यांच्याकडून सारा अफगाण देश तुडविला गेला पाहिजे, हेंही जरी खरें आहे, तरी लढाईंच्या कामांत फारच गाफिलगिरी कामाची नाहीं. मागल्या खेपेस रशियन लोकांस क्यास्पियन समुद्राच्या पूर्वकिनाऱ्यावर उतरून ठेवलें आहे. तेथून पुढें येण्यास त्यांनीं काय काय केलें, हें सांगून अवकाश राहिल्यास इंग्लिशांच्या आणि त्यांच्या सामर्थ्यांची, व देश काबीज करण्याच्या पद्धतींची, तुलना करण्याचा हेतु आहे. हें काम जलदीनें झालें तर बरें, नाहीं तर आमच्या पत्रांत ते हिरातपर्यंत येऊन पोंचण्यापूर्वीच हिंदुस्थानच्या किल्लीचा कबजा त्यांच्या हातीं जावयाचा ! असो.

क्यास्पिअन समुद्राच्या दक्षिण-पूर्व किनाऱ्यावर चेकिश्लार म्हणून एक बंदर आहे. या बंदरापाशींच आट्रेक नदी आपल्या पतीस येऊन मिळते. या नदीच्या दुथडीस जी थोडी बहुत माणसांची, जनावरांची, व झाडांची वस्ती आहे, ती वर्ज करून बाकी सर्वत्र वाळूच्या खरपुस ओसाड मैदानाशिवाय दुसरें कांहीं नाहीं. आट्रेकच्या उत्तरेकडील मैदानाच्या उत्तरेस बाल्कन पर्वताची रांग आहे, व दक्षिणेस इराणची उत्तरेची खाष्ट सरहद्द आहे. या मैदानांत भटकणारे तुर्कोमन लोक फार कडवे आहेत. ते कधीं आट्रेक नदीच्या उत्तरेस, व कधीं दक्षिणेस, चाऱ्याचा लाग जसा लागेल, तशा मानानें स्थानांतरें करीत असतात. रशियन लोकांनीं हिकमत काय केली कीं, या अडमुठ्या रानवटांना जिंकण्याच्या भरीस न पडतां, टेहराणच्या पादशहाला मोठेपणा देऊन व "आट्रेकपर्यंत तुमची हद्द; करतां त्या हद्दींतील रानटी लोकांकडून आम्हांस त्रास न होईल, अशा रीतीनें तुम्ही त्यांचा बंदोबस्त कराल, तर आम्हांवर तुमची मोठी मेहेरबानी होईल," अशा प्रकारचें सलोख्याचें बोलणें त्याच्याशीं लावून, त्यांच्या द्वारें आपलें थोडेंबहुत कार्य साधीत साधीत, व अगदीं गरजच पडल्यास एखादी दुसरी झटापट करीत, आट्रेक नदीच्या कांठाकांठानें रशियन लोक बामीपर्यंत येऊन ठेपले. बामी व चंकिश्लार यांच्यामध्यें फार झालें तर २४० मैलांचें अंतर आहे. या अंतरांतून पार पडेपर्यंत रूस लोकांना तुर्कोमन लोकांपासून जरी म्हणण्यासारखा त्रास झाला नाहीं, तरी या प्रांतांतील प्रखर हवेनें त्यांची पक्कीच खरड काढली ! तुर्कोमन लोकांपासून जबरीनें किंवा विकत घेतलेले उंट

या भयंकर मैदानांतून जात असतां, पटापट प्राण सोडति, व खंदे रशियन शिपायी भूलोकावरील या यमलोकच्या सरहद्दींत पाय ठेवला कीं पाण्यासाठीं तडफडून व आगीनें होरपळून राम म्हणत ! अफगाण किंवा हिंदुस्थान जिंकतां आल्यानें रशियास पुढें जो काय फायदा होणार असेल तो होवो, येवढें खरें आहे कीं महत्त्वाकांक्षारूप मृगजलाच्या पाठीमागें लागून या अरण्यांत भटकत असतां तृषार्त मृगापेक्षांही त्यांची दुर्दशा झाली !

एकदां बामीपर्यंत मजल येऊन ठेपल्यावर रशियन लोकांस असें वाटलें, कीं प्रत्येक वेळीं माणसांची अशी हानि होऊं देणें बरें नाहीं, व ती न होण्यासाठीं कांहीं तरी उपाय अवश्य केला पाहिजे. प्रथम "ट्रामची" सडक बांधावी असा बूट निघाला. पण पुढें तो रद्द होऊन आगगाडीचा अरुंद रस्ता बांधण्याचा बेत ठरला, व त्यासाठीं ६४,८०,००० रु. खर्च करून तो त्यांनीं तडीस नेला. ज्या मैदानांत पक्षपद तुर्कोमानी अश्वास पाय ठेवण्याची मुष्कील पडे, त्यांत वाष्पजीवी लोहाश्व खिंकाळत व प्रचंड पादध्वनि करीत, सकाळ-संध्याकाळ मोठ्या वेगानें पळत असतो ! असल्या निबिड वालुकामय अरण्यांत लोहमार्ग बांधण्यासाठीं वाळू अडवून धरण्यास, तुळया आंथरण्यास, व त्यावर लोखंडी रेल टाकण्यास काय कष्ट पडले असतील, याची वाचकांनींच कल्पना करावी ! जनरल स्काबेलाफनें हें अद्भुत काम तडीस नेण्यांत जिवाकडे, पैशाकडे, किंवा कष्टांकडे असें कधीं पाहिलें नाहीं.

याप्रमाणें बामीपर्यंत रेलवे येऊन थडकल्यावर स्काबेलाफला प्रथम गोफ टेपचा किल्ला सर करावा लागला. हा किल्ला फार मजबूत असल्यामुळें त्यांतील रानटी स्वतंत्र लोकांस असें वाटत होतें कीं रशियाचा प्रपितामह आला तरी त्याला त्याच्यानें धक्का लाववणार नाहीं ! पण हा त्यांचा भ्रम लवकरच लयास गेला ! त्या बिचाऱ्यांना जगदुद्धारार्थ धारातीर्थीं प्राण वेंचणाऱ्या ख्रिस्ती लोकांच्या सदय क्रूरतेची खरी कल्पना नव्हती ! जेव्हां रशियन लोकांच्या गोळ्यांचा भडिमार सुरू झाला, व किल्ल्याच्या भिंती ढासळूं लागल्या, तेव्हां त्या किल्ल्यांतील स्वातंत्र्याभिलाषी मूर्ख पुरुष, बायका, व पोरें, चाकू, काड्या, कुऱ्हाडी, खिळे, सारांश जें सांपडेल तें, हातीं घेऊन, आपल्या प्राणांहून प्रिय अशा स्वातंत्र्याचें संरक्षण करण्यासाठीं, उघड्या छातीवर तोफांचे गोळे घेत बाहेर पडलीं, व सर्वांचीं शरीरें धुळीस मिळेत तोंपर्यंत निकरानें लढलीं ! हा एकटा किल्ला सर करण्या-

साठीं रशियाच्या पुण्यश्वेत झाराला तीस हजार स्वातंत्र्यरक्षू रानटी लोकांचा होम करावा लागला !

हा अनर्थकारक लोहमार्ग बामपिर्यंतच थांबावयाचा आहे, असें नाहीं. राशियन इपीशिअल सर्कलांत (वर्तुळांत) तो प्रथम आष्काबादपर्यंत वाढवून, तेथून साराक्सच्या मार्गानें हिरातपर्यंत आणून भिडवावा, असा बेत सुरू आहे; बामीपासून हिरातपर्यंत अंतर ५२० मैल आहे; व इतक्या लांबीचा आगगाडीचा रस्ता बांधल्यास, त्याला दोन कोटी रुपये लागतील, असा अजमास आहे. ज्या राशियानें हिंदुस्थानावर इतका लोभाचा डोळा ठेविला आहे, तो एवढा खर्च करण्यास डगेल अशी शंका देखील नको ! दुर्दैवानें राशियाच्या हातून हा रस्ता जर तयार झाला, तर आशिया खंडाच्या रानटी मध्यभागांत युरोपिअन सुधारणेचा प्रसार केल्याबद्दल आजपासून पांच सातशें वर्षांनीं हा मनुष्यलोक राशियाचे आभार मानील तर मानो, सध्यां तर या रस्त्यामुळें तोफांच्या गोळ्यांचा भडिमार, रक्तस्राव, आणि जीवहानि यांचा आशिया खंडांत कहर होऊन जाईल, यांत संशय नाहीं.

गेल्या तीन अंकांत मध्यआशियांतील प्रांत काबीज करण्यासाठीं, राशियानें ज्या खटपटी केल्या, त्यांची थोडीबहुत हकीकत दिली आहे. रूस लोकांनीं काराकूम मैदानांतील मर्व्ह शहर आपल्या अंगाखालीं घातलें आहे, हें सर्वांस ठाऊक असेलच. हें नाक्याचें ठाणें हातीं आल्यामुळें, मध्य आशियावर राशियाचा पगडा मोठ्या जोरानें बसला आहे. हें शहर त्यांच्या हातांत पडल्यामुळें, इराणच्या उत्तरपूर्वेच्या, व बोखारा प्रांताच्या दक्षिण-पश्चिमेच्या, तुर्कोमान लोकांवर त्यांचा शह बसल्यासारखा होऊन, त्यांना राशियास कोणत्याही प्रकारें म्हणण्यासारखा त्रास देतां येण्याची सवड राहिली नाहीं. हें शहर प्रस्तुत शुद्ध मैदानांत आहे. पण त्यांत जर त्यांनीं टेझेंड, खुष्क, व आमू नद्यांचे कालवे बांधून आणिले, तर मर्व्हच्या सभोंवतीं दळणवळणाची उत्तम सोय होऊन इराण, आफगाण, व मध्यआशिया, यांच्या मध्यभागीं व्यापाराचें हें एक जंगी कोठार होईल, व राशियाचे सारेच बेत फलद्रूप झाले, तर युरोप आणि आशिया, म्हणजे राशिया व हिंदुस्थान, यांच्या दरम्यान मोठ्या महत्त्वाचें लष्करी व व्यापारी शहर बनेल.

येथपर्यंत राशियाच्या हावरेपणाचा जो फाडा वाचला, तेवढ्यावरून वाचकांच्या हें लक्षांत येऊन चुकलें असेल, कीं राशियानें मध्यआशियाच्या निर्जन रणांत जे

कोट्यावधि रुपये व प्राण खर्ची घातले आहेत, ते कांहीं त्या प्रदेशांतील रानटी लोकांस सुधारावें, अशा परोपकारबुद्धीनें नव्हत, तर केव्हां तरी हिंदीमहासागराच्या क्षारोदकांत आपलीं जहाजें स्वामित्वाच्या वैभवानें हाकारलीं जावींत, व आर्टिक समुद्रापासून कन्याकुमारीपर्यंत पुण्यश्वेत झाराचीं निशाणें अबाधित फडकावींत, यासाठीं होय. रशियाच्या हातून ही प्रचंड महत्त्वाकांक्षा पूर्ण होवो किंवा न होवो, इतकें खरें आहे, कीं सध्यां दक्षिणेकडे अधिकाधिक पाय शिरकविण्यांत याशिवाय रशियाचा दुसरा कांहींएक हेतु नाहीं. फार प्राचीन काळापासून रशियानें राष्ट्रविस्ताराची व प्रांतविस्ताराची सारखी टाकी चालविली आहे. एकदा तैमूर व झांजिझखान यांच्या स्वाऱ्यांमुळें कांहीं वर्षें ही टाकी बंद होती, पण त्या स्वाऱ्यांच्या अरिष्टाचें पर्यवसान झाल्याबरोबर, ती जी पुनः सुरू झाली ती अजून चालली आहे. या शतकाच्या आरंभीं रशियाची लोकसंख्या तीन कोटी होती; प्रस्तुत ती आठ कोटींजवळ येऊन ठेपली आहे, असें मानण्यास हरकत नाहीं. यांच्या व रोमन लोकांच्या राज्यविस्तार करण्याच्या रीतींत पुष्कळ साम्य आहे. भेद इतकाच आहे, कीं रशियन लोक जेथें आपला पाय शिरकवूं शकतात, तेथें ते बेताबेतानें आपलें घरच करतात ! सध्यांची रशियन जात अठरापगड जातींचें झालेलें एक कडबोळें आहे. त्यांत कोसाक्स तुर्कोमन आहेत, ग्रीक्स आहेत, सैबेरियाचे लोक आहेत; सारांश आर्तिक समुद्रापासून ब्लाकसमुद्रापर्यंत व बालटिकसमुद्रापासून टोबालस्कपर्यंत हवी ती जात रूस लोकांत मोडते. एखाद्या नवीन प्रांतावर डोळा ठेविला, कीं व्यापाराच्या निमित्तानें रशियन व्यापारी प्रथम त्यांत घुसतात, व त्यांच्या पाठोपाठ कोसाक्स शिलेदार प्रवेश करितात. या दोघांनीं श्रीमन्महा केला म्हणजे रशियन पोप आपल्या सर्व परिवारासह संचार करूं लागतो. रशियन पाद्रीसंघ जाऊन एकदांचा धडकला, व थोडासा सुस्थावला कीं, त्याच्या पाठीमागून रशियन व्होडकी व चिनावनिक (हपिसर मंडळी) यांनीं आपलें प्रस्थान ठेवलेंच म्हणून समजावें ! हें सारें लटांबर येऊन पोहोंचलें कीं, सुधारणेस आरंभ व्हावयाचा ! रशियन वसाहती करणारांनीं अगोदर जमिनीची एक चिरटोळी घेऊन, तींत रशियन शाळा व ख्रिस्ती धर्म, यांची स्थापना करावयाची. रानटी लोकांस सुधारलेल्या लोकांचें मायावीपण मोठें मोहक असतें; तशांत त्यांना चाटलाबाईंचा नाद एकदां लावून दिला, कीं काम फत्ते होण्यास काय कठिण ! या रीतीनें रानटी लोकांत सुधारणा पसरून देऊन, त्यांचें आपणाशीं तादात्म्य

करून घेण्याची अद्वितीय शैली, रशियन लोकांस इतकी उत्कृष्ट साधली आहे, कीं नवीन प्रांतांत पाय टाकल्यापासून पंचवीस चाळीस वर्षांच्या आंत ते अगदीं भिन्न धर्मांच्या व भिन्न चालीरीतींच्या लोकांस आपलेसे करून टाकून, आपला धर्म, आपला पेहराव, आपल्या चालीरीती व आपली भाषा—यांचा स्वीकार ते त्यांच्याकडून करवितात. येणेंप्रमाणें जेथें जेथें रशियाचा अंमल पंचवीस चाळीस वर्षें झाला आहे, तेथें तेथें मूळच्या लोकांचें आणि यांचें अद्वैतच दृष्टीस पडतें ! ही रशियन लोकांची राज्यें काबीज करण्याची पद्धति होय. ही इंग्लिश लोकांस बिलकुल साधलेली नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ते जेथें जातात तेथें तुसड्यासारखे निराळे रहातात. त्यांना कलमी झाडाप्रमाणें परजातीच्या व परधर्माच्या लोकांशीं एक जीव करून घेतां येत नाहीं. इंग्लंडचे लोक परक्या ठिकाणीं जाऊन वसाहती करतात, तेथील लोकांस ते राष्ट्रत्व आणतात; पण त्यांस गिळून टाकून पचवून बसण्याची रशियाची विलक्षण कोटी इंग्लंडाला मुळींच साधलेली नाहीं, व मुळापासून तसें करण्याची इंग्लिशांना संवयच नाहीं ! इंग्लिश लोकांत दुसरी एक गोष्ट अशी आहे, कीं त्यांची राज्यपद्धति लोकसत्तात्मक असल्याकारणानें ज्या कामास गुप्तता, जलदी व द्रव्यबल पाहिजे, त्याची त्यांच्या पार्लमेंटांत इतकी वाटाघाट होते, कीं बहुतेकदां त्यांचे बेत जागच्याजागींच जिरतात किंवा क्षीण आरंभ होऊन फसतात. रशियाचें तसें नाहीं. तेथें अनियंत्रित एकसत्ताक राज्यपद्धति असल्यामुळें, रशियन शिपायांस व राज्यकारस्थान्यांस हव्या तितक्या खर्चाचें, धाडसाचें व जोखमीचें काम असलें, तरी तें फक्त झाराची संमति घेऊन हव्या त्यावेळीं बिनबोभाट फाडदिशीं उडवून देतां येतें ! तिसरें, रशियापाशीं आज तारखेस कमीतकमी दहा लक्ष फौज तयार आहे, व गरज पडल्यास हवेंतितकें दांडगें बाजारबुणगें सैन्यांत गोळा करण्याची चांगली सोय आहे. या बाबतींत इंग्लंड रशियापुढें कांहींच नाहीं, असें म्हणतां येईल. "हिंदुस्थानावर चालून जावयाचें" असा जाहिरनामा रशियानें एकदां काढला, कीं साऱ्या मध्यआशियांतील भुकेबंगाल, दांडगी, लुटारू मंडळी, पुष्ट प्रेतांच्या लोभानें एकत्र जमून, जमिनीवर उतरणाऱ्या गिधाडांप्रमाणें रशियाच्या गरुडांकित निशाणाखालीं हं हं म्हणतां जमा होईल. चवथें, आजपर्यंत हिंदुस्थानावर स्वारी करण्यास मुख्य अडथळा, थोड्या काळांत रशियाच्या मध्यभागापासून आशियाच्या मध्यभागापर्यंत सैन्य कसें आणावें, हा होता. पण आतां तो अगदीं

दूर झाला आहे. रशियाच्या मध्यभागीं, आणि काळ्या समुद्राच्या उत्तर किनाऱ्यावर ओडीसा शहर आहे. तेथें आगबोटींत सैन्य भरून एकदां चालतें केलें, कीं त्याला काळासमुद्र उल्लंघण्यास ४८ तास लागतील; काळ्या समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील बाटूम बंदरांत उतरून काकेसस रेल्वेनें क्यास्पियन समुद्राच्या पश्चिम किनाऱ्यावरील बाकू बंदरास येऊन पोहोंचण्यास २४ तास लागतील. तेथें पुनः आगबोटींत बसल्यावर क्यास्पियन समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर येण्यास एक दिवस लागेल. या किनाऱ्यावरील मिचेलव्होस्क स्टेशनापासून हिरातपर्यंत लाईन पूर्ण झाली, म्हणजे तिनें तेथपर्यंत येऊन ठेपण्यास आणखी ४८ तास लागतील. सारांश काय कीं बामी-हिरात-रेल्वे संपली, म्हणजे ओडिसापासून हिरातपर्यंत हवें तितकें सैन्य सहा दिवसांच्या आंत कष्टाशिवाय व अडथळ्याशिवाय येऊं शकेल. काळ्या व क्यास्पियन समुद्रांत रशियासरकारच्या आगबोटींशिवाय रशियन व्यापाऱ्यांचीं हवीं तेवढीं व हवीं तितकीं जहाजें, पाहिजे तेव्हां, पैदा होण्यासारखीं आहेत. पांचवी गोष्ट अशी आहे, कीं मध्यआशियांत रशियाचा फार वर्षांचा फार मोठा दरारा व वजन आहे. यामुळें रूस लोकांस त्या ठिकाणाहून हव्या त्या प्रकारची कुमक पाहिजे तेव्हां मिळण्यासारखी आहे. रशियाच्या बाजूनें इतक्या गोष्टी अनुकूल आहेत. तेव्हां यांचा फायदा घेऊन रशिया हिंदुस्थानावर स्वारी करील काय, व केली असतां रूस लोकांना यश खात्रीनें येईल काय, या प्रश्नांचें उत्तर व्हांब्रीमें नायन्टींथ सेंचरीच्या फेब्रुवारीच्या अंकांत 'नाहीं' म्हणून दिलें आहे, तें कोणत्या कोणत्या कारणांस्तव दिलें आहे याचा खुलासा पुढल्या अंकांत करण्याचें अभिवचन देऊन या बऱ्याच लांबलेल्या लढाऊ चऱ्हाटाची आज येथेंच इतिश्री करतों.

या विषयावरील गेल्या पांच नंबरांत नायन्टींथ सेंचरीच्या जानेवारीच्या अंकांत व्हांब्रीचें जें आर्टिकल आलें होतें, त्याच्या अनुरोधानें देण्यासारखी होती, तितकी माहिती दिली आहे. त्याच मासिकाच्या फेब्रुवारीच्या अंकांत व्हांब्रीच्या आर्टिकलाचा उत्तरार्ध आला आहे, हें मागल्या अंकांतील आर्टिकलाच्या शेवटास थोडक्यांत दर्शविलेंच आहे. आज त्याचाच थोडासा विस्तार करण्याचा विचार आहे. व्हांब्रीचें हें दुसरें आर्टिकल फारसें चांगलें नाहीं. साधारण लोकांस सुचणारे जे विचार त्यांहून यांत तो फारसा पुढें गेलेला नाहीं, इतकेंच नाहीं, पण

दोनतीन मुद्यांच्या बाबतींत त्याचे विचार बऱ्याच चुकीचे आहेत, अशी आमची समजूत आहे. तथापि आज त्याच्या लेखावर टीका करीत बसण्याचा आमचा हेतु नाहीं. पूर्वीप्रमाणें त्याचें जें म्हणणें आहे तें आज थोडक्यांत देतों, व पुढल्या खेपेस "रशिया व इंग्लंड" यांच्यासंबंधानें आमचे जे ठोकळ ठोकळ विचार आहेत ते देऊं.

इंग्लंडांत लिबरल व राडिकल पक्षांचे जे लोक आहेत, त्यांना इंग्लंडच्या अफाट राज्यविस्ताराची फारशी काळजी वाटत नाहीं. त्यांचें सारें लक्ष थेट इंग्लंडच्या लोकांची विद्यावृद्धि, त्यांचा व्यापार, त्यांचें राज्यविषयक शिक्षण-यांकडे लागलेलें असतें. इंग्लंडच्या मुकुटांतील अत्यंत मौल्यवान रत्नाची त्यांना कांहींच परवा वाटत नाहीं. तें आपल्या ताब्यांत राहिलें काय, किंवा दुसऱ्या कोणीं तें हिरावून घेतलें काय, याचा त्यांना फारसा विधिनिषेधच वाटत नाहीं. पण कान्सर्व्हेटिव्ह लोकांचें तसें नाहीं. त्यांना इंग्लंडच्या कबज्यांतून हिंदुस्थान जाऊं न देण्याविषयीं फार काळजी आहे. राडिकल लोकांप्रमाणें "जळो तो हिंदुस्थानदेश," असें त्यांच्यानें कधींही म्हणवायाचें नाहीं. ते युरोपांतील लोकांप्रमाणें जगाची रहाटी चांगल्या प्रकारें जाणून आहेत. भलतींच तऱ्हेवाईक मतें धरून बसून पोकळ तत्त्वज्ञानाच्या पिसेपणांत ऐश्वर्य गमावण्याच्या फंदांत ते कधींही पडावयाचे नाहींत. पण असल्या या दोन फळ्या इंग्लंडदेशांत सर्वदा डोळ्यांत वात घालून एकमेकांचीं उणीं काढण्यास दक्षतेनें टपून बसल्यामुळें, एकीनें अधिकारारूढ असतां मोठ्या खर्चानें जें करावें, तें दुसरीनें अधिकारारूढ झाल्यावर मोडून टाकावें, असें चालतें. रशियाची तशी गोष्ट नाहीं. बादशहाच्या किंवा झाराच्या मनाला जी गोष्ट येईल, ती सर्वांना शिरसावंद्य. तेव्हां यासंबंधानें इंग्लंडचा रशियापेक्षां फारच उणेपणा आहे, व त्यामुळें इंग्लंडास पुष्कळच त्रास होण्याचा संभव आहे. दुसरी एक गोष्ट अशी आहे, कीं रशिया जे प्रांत काबीज करतो, तेथील लोकांशीं आपल्या लोकांचा एक जीव करून टाकतो. इंग्लिश लोकांचें तसें नाहीं. हे तुसडे लोक सदा तुटून असायाचे. आणि तेंही वाजवीच आहे. अर्धवट रानटी रशियन लोकांस आशियांतील पूर्ण रानटी लोकांशीं मिळून जाण्यास फारशी पंचाईत पडत नाहीं. पण इंग्रजांची आणि हिंदू लोकांची तशी गोष्ट नाहीं. धर्म, नीति, आचारविचार, रंग, चालीरीती, सुधारणा, या सर्व बाबतींत इंग्लिश लोकांत व हिंदू लोकांत

पृथ्वीच्या दोन ध्रुवांइतकें अंतर आहे. तेव्हां हिंदुस्थानांत इंग्रजी अंमल झाल्यास आज सुमारें शंभर वर्षें जरी होत आलीं आहेत, तरी त्यांच्यांत आणि नेटिवांत म्हणण्यासारखा सख्यसंबंध झाला आहे, असें दिसत नाहीं. इंग्लिश लोक हिंदुस्थानांत बहुशः व्यापारी, किंवा सरकारच्या पदरचे सिव्हिल व मिलिटरी नोकर, होऊन कांहीं वर्षें काढतात, व दोन पैसे गोळा झाले कीं, इंग्लंडास परत जातात. अशा प्रकारच्या त्यांच्या वर्तनामुळें हिंदू लोकांचें आणि त्यांचें घट्ट सख्य जमण्याचा संभव नाहीं. चवथी गोष्ट अशी आहे कीं, इंग्लिश लोक फाजील ममताळू, व न्यायी आहेत. त्यांना कोणत्या ठिकाणीं ममता करावी, व कोठें करूं नये यांचें व्यावहारिक ज्ञान अगदीं नाहीं. याचें उदाहरण इलबर्ट-बिल, व नेटिव प्रेसआक्ट रद्द करणें. ज्या हक्कांस हिंदू लोक अद्यापि योग्य झालेले नाहींत, ते त्यांस देऊन फायदा काय ? उलटें नुकसान मात्र व्हावयाचें. पांचवी गोष्ट अशी आहे कीं, इंग्लंडाला लढाई आवडत नाहीं. यूरोपांतील पुष्कळ राष्ट्रांतील लोकांना शिपाई कोट चढविणें, व बंदुका खांद्यावर टाकणें, यांत मोठी फुशारकी वाटते, पण इंग्लंडाला लढाईंचा मनापासून कंटाळा आहे. सहावी गोष्ट अशी आहे, कीं इंग्लंडाला एका ठिकाणीं सैन्यें नेण्यास रशियाप्रमाणें खाशी सोय नाहीं. गरज पडल्यास रशियाची हवी तितकी फौज ६ दिवसांत हिरातेस येऊन पोंचण्यास कांहीं अडचण उरलेली नाहीं. पण त्याच ठिकाणीं इंग्रजी फौज येऊन पोंचण्यास निदान तीन आठवडे तरी लागणारच. माल्टा, सैप्रस, एडन वगैरे ठाणीं महत्त्वाचीं आहेत, नाहींत असें नाहीं. पण किती झाला तरी समुद्रांतील प्रवास खुष्कीच्या प्रवासाशीं कोठून टक्कर मारणार ! सातवी गोष्ट अशी आहे कीं, एशियांतील बहुतेक मुसलमानलोक इंग्लिशांस प्रतिकूल व रशियास अनुकूल असे आहेत. त्यामुळें मागें पुढें इंग्रजांला निर्भयपणा म्हणून नाहीं. तेव्हां इतक्या गोष्टी प्रतिकूल असतां रशियापुढें इंग्लंडाचा टिकाव कसा लागेल, हा मोठा गूढ प्रश्न आहे. जर असें म्हणावें कीं, इंग्लिशांनीं आज पक्कीं शंभर वर्षें मोठी खटपट करून हिंदुस्थानांत जिकडे तिकडे शांतता केली आहे, व नेटिव लोकांची प्रीति संपादिली आहे, तेव्हां रशियाशीं लढण्यांत ते गुंतले असले, तरी त्यांना मागें बंडबखेडा होण्याची कांहीं भीति नाहीं, तर तसेंही नाहीं. दुर्दैवानें इंग्लिशांच्या परिश्रमाचा हिंदुस्थानच्या रानटी लोकांवर व्हावा तसा परिणाम अद्यापि झालेला नाहीं. इंग्लिशांनीं हिंदू लोकांच्या कल्याणाच्या कांहीं थोडया गोष्टी केल्या नाहींत.

दोनतीन मुद्यांच्या बाबतींत त्याचे विचार बऱ्याच चुकीचे आहेत, अशी आमची समजूत आहे. तथापि आज त्याच्या लेखावर टीका करीत बसण्याचा आमचा हेतु नाहीं. पूर्वीप्रमाणें त्याचें जें म्हणणें आहे तें आज थोडक्यांत देतों, व पुढल्या खेपेस "रशिया व इंग्लंड" यांच्यासंबंधानें आमचे जे ठोकळ ठोकळ विचार आहेत ते देऊं.

इंग्लंडांत लिबरल व राडिकल पक्षांचे जे लोक आहेत, त्यांना इंग्लंडच्या अफाट राज्यविस्ताराची फारशी काळजी वाटत नाहीं. त्यांचें सारें लक्ष थेट इंग्लंडच्या लोकांची विद्यावृद्धि, त्यांचा व्यापार, त्यांचें राज्यविषयक शिक्षण-यांकडे लागलेलें असतें. इंग्लंडच्या मुकुटांतील अत्यंत मौल्यवान रत्नाची त्यांना कांहींच परवा वाटत नाहीं. तें आपल्या ताब्यांत राहिलें काय, किंवा दुसऱ्या कोणीं तें हिरावून घेतलें काय, याचा त्यांना फारसा विधिनिषेधच वाटत नाहीं. पण कान्सर्व्हेटिव्ह लोकांचें तसें नाहीं. त्यांना इंग्लंडच्या कबज्यांतून हिंदुस्थान जाऊं न देण्याविषयीं फार काळजी आहे. राडिकल लोकांप्रमाणें "जळो तो हिंदुस्थानदेश," असें त्यांच्यानें कधींही म्हणवायाचें नाहीं. ते युरोपांतील लोकांप्रमाणें जगाची रहाटी चांगल्या प्रकारें जाणून आहेत. भलतींच तऱ्हेवाईक मतें धरून बसून पोकळ तत्त्वज्ञानाच्या पिसेपणांत ऐश्वर्य गमावण्याच्या फंदांत ते कधींही पडावयाचे नाहींत. पण असल्या या दोन फळ्या इंग्लंडदेशांत सर्वदा डोळ्यांत वात घालून एकमेकांचीं उणीं काढण्यास दक्षतेनें टपून बसल्यामुळें, एकीनें अधिकारारूढ असतां मोठ्या खर्चानें जें करावें, तें दुसरीनें अधिकारारूढ झाल्यावर मोडून टाकावें, असें चालतें. रशियाची तशी गोष्ट नाहीं. बादशहाच्या किंवा झाराच्या मनाला जी गोष्ट येईल, ती सर्वांना शिरसावंद्य. तेव्हां यासंबंधानें इंग्लंडचा रशियापेक्षां फारच उणेपणा आहे, व त्यामुळें इंग्लंडास पुष्कळच त्रास होण्याचा संभव आहे. दुसरी एक गोष्ट अशी आहे, कीं रशिया जे प्रांत काबीज करतो, तेथील लोकांशीं आपल्या लोकांचा एक जीव करून टाकतो. इंग्लिश लोकांचें तसें नाहीं. हे तुसडे लोक सदा तुटून असायाचे. आणि तेंही वाजवीच आहे. अर्धवट रानटी रशियन लोकांस आशियांतील पूर्ण रानटी लोकांशीं मिळून जाण्यास फारशी पंचाईत पडत नाहीं. पण इंग्रजांची आणि हिंदू लोकांची तशी गोष्ट नाहीं. धर्म, नीति, आचारविचार, रंग, चालीरीती, सुधारणा, या सर्व बाबतींत इंग्लिश लोकांत व हिंदू लोकांत

पृथ्वीच्या दोन ध्रुवांइतकें अंतर आहे. तेव्हां हिंदुस्थानांत इंग्रजी अंमल झाल्यास आज सुमारें शंभर वर्षें जरी होत आलीं आहेत, तरी त्यांच्यांत आणि नेटिवांत म्हणण्यासारखा सख्यसंबंध झाला आहे, असें दिसत नाहीं. इंग्लिश लोक हिंदुस्थानांत बहुशः व्यापारी, किंवा सरकारच्या पदरचे सिव्हिल व मिलिटरी नोकर, होऊन कांहीं वर्षें काढतात, व दोन पैसे गोळा झाले कीं, इंग्लंडास परत जातात. अशा प्रकारच्या त्यांच्या वर्तनामुळें हिंदू लोकांचें आणि त्यांचें घट्ट सख्य जमण्याचा संभव नाहीं. चवथी गोष्ट अशी आहे कीं, इंग्लिश लोक फाजील ममताळू, व न्यायी आहेत. त्यांना कोणत्या ठिकाणीं ममता करावी, व कोठें करूं नये यांचें व्यावहारिक ज्ञान अगदीं नाहीं. याचें उदाहरण इलबर्ट-बिल, व नेटिव प्रेसआक्ट रद्द करणें. ज्या हक्कांस हिंदू लोक अद्यापि योग्य झालेले नाहींत, ते त्यांस देऊन फायदा काय ? उलटें नुकसान मात्र व्हावयाचें. पांचवी गोष्ट अशी आहे कीं, इंग्लंडाला लढाई आवडत नाहीं. यूरोपांतील पुष्कळ राष्ट्रांतील लोकांना शिपाई कोट चढविणें, व बंदुका खांद्यावर टाकणें, यांत मोठी फुशारकी वाटते, पण इंग्लंडाला लढाईचा मनापासून कंटाळा आहे. सहावी गोष्ट अशी आहे, कीं इंग्लंडाला एका ठिकाणीं सैन्यें नेण्यास रशियाप्रमाणें खाशी सोय नाहीं. गरज पडल्यास रशियाची हवी तितकी फौज ६ दिवसांत हिरातेस येऊन पोंचण्यास कांहीं अडचण उरलेली नाहीं. पण त्याच ठिकाणीं इंग्रजी फौज येऊन पोंचण्यास निदान तीन आठवडे तरी लागणारच. माल्टा, सैप्रस, एडन वगैरे ठाणीं महत्त्वाचीं आहेत, नाहींत असें नाहीं. पण किती झाला तरी समुद्रांतील प्रवास खुष्कीच्या प्रवासाशीं कोठून टक्कर मारणार ? सातवी गोष्ट अशी आहे कीं, एशियांतील बहुतेक मुसलमानलोक इंग्लिशांस प्रतिकूल व रशियास अनुकूल असे आहेत. त्यामुळें मागें पुढें इंग्रजांला निर्भयपणा म्हणून नाहीं. तेव्हां इतक्या गोष्टी प्रतिकूल असतां रशियापुढें इंग्लंडाचा टिकाव कसा लागेल, हा मोठा गूढ प्रश्न आहे. जर असें म्हणावें कीं, इंग्लिशांनीं आज पक्कीं शंभर वर्षें मोठी खटपट करून हिंदुस्थानांत जिकडे तिकडे शांतता केली आहे, व नेटिव लोकांची प्रीति संपादिली आहे, तेव्हां रशियाशीं लढण्यांत ते गुंतले असले, तरी त्यांना मागें बंडबखेडा होण्याची कांहीं भीति नाहीं, तर तसेंही नाहीं. दुर्दैवानें इंग्लिशांच्या परिश्रमाचा हिंदुस्थानच्या रानटी लोकांवर व्हावा तसा परिणाम अद्यापि झालेला नाहीं. इंग्लिशांनीं हिंदू लोकांच्या कल्याणाच्या कांहीं थोडया गोष्टी केल्या नाहींत.

बंडें मोडून टाकलीं; चोऱ्यामाऱ्या बंद केल्या; न्यायाचीं कोर्टें स्थापिलीं; आगगाड्या व तारायंत्रें सुरू केलीं; पाश्चिमात्य विद्येच्या प्रसारार्थ शाळा व कालेजें स्थापिलीं; सारांश, मनुष्याचें जीवित सुरक्षित राहून त्याच्या वित्ताची वृद्धि होण्यास ज्या गोष्टी पाहिजेत त्या साऱ्या केल्या, पण त्यांचा परिणाम अद्यापपर्यंत अळवावरील पाण्यासारखा झाला आहे. हिंदुस्थानांतील मोठ्या दोन जातींपैकीं ब्राह्मणधर्मानुयायी जात म्हणजे हिंदूलोक महंमदानुयायी जातीपेक्षां म्हणजे मुसलमानलोकांपेक्षां विद्येंत, सुधारणेंत, राजभक्तींत, व नवीन पद्धतीचा स्वीकार करण्यांत बरेच कुशल झाले आहेत. पण मुसलमानलोक पूर्वीपासून जसे कडवे आहेत तसेच अद्यापि आहेत. यांच्या बंडखोरपणापासून इंग्लिशांना मोठी धास्ती आहे. यांच्यावर भरंवसा टाकण्याची सोय नाहीं. कधीं कधीं इंग्रजी अमलांत कर फार द्यावा लागतो, म्हणून नेटिव लोक रडगाणें गात असतात; पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. इंग्लिश लोकांनीं ज्या जबरदस्त सुधारणा चालविल्या आहेत, त्या घडवून आणण्यासाठीं प्रत्येक वर्षीं असामीमागें अडीच तीन रुपये कर भारी झाला असें म्हणतां येत नाहीं. राष्ट्रांची रानटी स्थिति जाऊन तीं सज्ञान होण्याच्या दरम्यान जो काळ जातो, त्यांत त्यांना कराचें ओझें भोगणें जरूरच असतें. यूरोपांतील बहुतेक राष्ट्रांस एकेकदां या स्थितींतून जावें लागलें, व कित्येक अद्यापि जात आहेत. हिंदू व मुसलमान लोकांच्या राजद्रोहाशिवाय आणखी एक भीति आहे, ती कोणती म्हणाल तर नेटिव संस्थानिकांच्या सैन्यांची. नेटिव संस्थानांखालीं असलेल्या पांच कोटी प्रजेच्या संरक्षणास तीन लक्ष फौज, व ब्रिटिश अमलाखालीं असणाऱ्या वसि कोटी प्रजेच्या संरक्षणासही जवळ जवळ तितकीच फौज हा मोठाच चमत्कार होय. या नेटिव राजांच्या फौजांवर नजर ठेवण्यासाठीं इंग्लिशांना आपली बरीच फौज गुंतवून ठेवावी लागते. असे एक ना दोन–त्यांच्या पाठीमागें शेंकडों पेंच आहेत, ते कोठवर सांगावे !

असें जरी आहे, तरी रशियाला हिंदुस्थान जिंकतां येईल असें नाहीं. फार झालें तर रशियाला एखादी दुसरी स्वारी करतां येईल. पण रशियन लोकांचें कायमचें राज्य गंगेच्या किंवा सिंधूच्या कांठीं होण्याचें नांवच नको. झालेंच तर त्या कृत्यास शेंदोनशें वर्षें पाहिजेत. तें आज होईल असें समजणें म्हणजे, मनांत मांडे खाण्यासारखें होय. रशियानें मध्यएशियांत जे प्रांत काबीज केले

आहेत, ते एकदोन किंवा दहापांच वर्षांत केलेले नाहींत. राशियाचा राज्यविस्तार आज शेंदीडशें वर्षें सारखा होतो आहे. अफगाणिस्थान जिंकून हळूं हळूं एक जीव करीत हिंदुस्थानापर्यंत येऊन पोंचण्यास राशियास शेंपन्नास वर्षें तरी पाहिजेत. तेवढचा फुरसुतींत इंग्लिशांनीं हिंदुस्थानांत आरंभिलेली सुधारणा पुष्कळ फैलावून, नेटिव लोक पक्के राजनिष्ठ बनतील, व ते तसे झाले म्हणजे राशियाची मुळींच भीति राहणार नाहीं. तथापि हिंदुस्थानची सुधारणा करण्याचें जें उदार कृत्य त्यांनीं आरंभिलें आहे, त्यास दुष्ट राशियाकडून व्यत्यय न यावा, यासाठीं कंदाहार, बल्क, व हिरात या तीन शहरांनीं होणाऱ्या त्रिकोणाच्या तीन कोनांवर जबरदस्त किल्ले बांधून, या किल्ल्यापासून त्या किल्ल्यापर्यंत निर्भयपणें जातां येईल अशा प्रकारें लष्करी बंदोबस्त केला पाहिजे; म्हणजे अफगाणच्या अमीरास वगैरे मांडलिकाची पदवी देऊन अफगाणिस्थानाचें स्वामित्व आपणाकडे घेतलें पाहिजे. असें केलें तरच राशिया हिंदुस्थानापासून दूर राहील व त्याच्यापासून हिंदुस्थानच्या सुधारणेस विघ्न होणार नाहीं. ही सुधारणा बळावल्यावर हिंदुलोक स्वतंत्रपणें राज्य करण्यास योग्य होतील किंवा नाहीं हा निराळा प्रश्न आहे. तरी येवढें खरें कीं ही सुधारणा बरींच वर्षें अव्याहत चाल-ल्यास इंग्लिशांस राशियाची मुळींच भीति राहणार नाहीं, व हिंदुस्थानदेश इंग्लंडाकडे पुष्कळ वर्षें चालेल.

[वर्ष ५, अंक ८, ९, १०, ११, १२, १३.]

बंडें मोडून टाकलीं; चोऱ्यामाऱ्या बंद केल्या; न्यायाचीं कोर्टें स्थापिलीं; आगगाडया व तारायंत्रें सुरू केलीं; पाश्चिमात्य विद्येच्या प्रसारार्थ शाळा व कालेजें स्थापिलीं; सारांश, मनुष्याचें जीवित सुरक्षित राहून त्याच्या वित्ताची वृद्धि होण्यास ज्या गोष्टी पाहिजेत त्या साऱ्या केल्या, पण त्यांचा परिणाम अद्यापपर्यंत अळवावरील पाण्यासारखा झाला आहे. हिंदुस्थानांतील मोठ्या दोन जातींपैकीं ब्राह्मणधर्मानुयायी जात म्हणजे हिंदूलोक महंमदानुयायी जातीपेक्षां म्हणजे मुसलमानलोकांपेक्षां विद्येंत, सुधारणेंत, राजभक्तींत, व नवीन पद्धतीचा स्वीकार करण्यांत बरेच कुशल झाले आहेत. पण मुसलमानलोक पूर्वीपासून जसे कडवे आहेत तसेच अद्यापि आहेत. यांच्या बंडखोरपणापासून इंग्लिशांना मोठी धास्ती आहे. यांच्यावर भरंवसा टाकण्याची सोय नाहीं. कधीं कधीं इंग्रजी अमलांत कर फार द्यावा लागतो, म्हणून नेटिव लोक रडगाणें गात असतात; पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. इंग्लिश लोकांनीं ज्या जबरदस्त सुधारणा चालविल्या आहेत, त्या घडवून आणण्यासाठीं प्रत्येक वर्षीं असामीमागें अडीच तीन रुपये कर भारी झाला असें म्हणतां येत नाहीं. राष्ट्रांची रानटी स्थिति जाऊन तीं सज्ञान होण्याच्या दरम्यान जो काळ जातो, त्यांत त्यांना कराचें ओझें भोगणें जरूरच असतें. यूरोपांतील बहुतेक राष्ट्रांस एकेकदां या स्थितींतून जावें लागलें, व कित्येक अद्यापि जात आहेत. हिंदू व मुसलमान लोकांच्या राजद्रोहाशिवाय आणखी एक भीति आहे, ती कोणती म्हणाल तर नेटिव संस्थानिकांच्या सैन्यांची. नेटिव संस्थानांखालीं असलेल्या पांच कोटी प्रजेच्या संरक्षणास तीन लक्ष फौज, व ब्रिटिश अमलाखालीं असणाऱ्या वसि कोटी प्रजेच्या संरक्षणासही जवळ जवळ तितकीच फौज हा मोठाच चमत्कार होय. या नेटिव राजांच्या फौजांवर नजर ठेवण्यासाठीं इंग्लिशांना आपली बरीच फौज गुंतवून ठेवावी लागते. असे एक ना दोन–त्यांच्या पाठीमागें शेंकडों पेंच आहेत, ते कोठवर सांगावे ?

असें जरी आहे, तरी रशियाला हिंदुस्थान जिंकतां येईल असें नाहीं. फार झालें तर रशियाला एखादी दुसरी स्वारी करतां येईल. पण रशियन लोकांचें कायमचें राज्य गंगेच्या किंवा सिंधूच्या कांठीं होण्याचें नांवच नको. झालेंच तर त्या कृत्यास शेंदोनशें वर्षें पाहिजेत. तें आज होईल असें समजणें म्हणजे, मनांत मांडे खाण्यासारखें होय. रशियानें मध्यएशियांत जे प्रांत काबीज केले

आहेत, ते एकदोन किंवा दहापांच वर्षांत केलेले नाहींत. राशियाचा राज्यविस्तार आज शेंदीडशें वर्षें सारखा होतो आहे. अफगाणिस्थान जिंकून हळूं हळूं एक जीव करीत हिंदुस्थानापर्यंत येऊन पोंचण्यास राशियास शेंपन्नास वर्षें तरी पाहिजेत. तेवढ्या फुरसुतींत इंग्लिशांनीं हिंदुस्थानांत आरंभिलेली सुधारणा पुष्कळ फैलावून, नेटिव लोक पक्के राजनिष्ठ बनतील, व ते तसे झाले म्हणजे राशियाची मुळींच भीति राहणार नाहीं. तथापि हिंदुस्थानची सुधारणा करण्याचें जें उदार कृत्य त्यांनीं आरंभिलें आहे, त्यास दुष्ट राशियाकडून व्यत्यय न यावा, यासाठीं कंदाहार, बल्क, व हिरात या तीन शहरांनीं होणाऱ्या त्रिकोणाच्या तीन कोनांवर जबरदस्त किल्ले बांधून, या किल्ल्यापासून त्या किल्ल्यापर्यंत निर्भयपणें जातां येईल अशा प्रकारें लष्करी बंदोबस्त केला पाहिजे; म्हणजे अफगाणच्या अमीरास वगैरे मांडलिकाची पदवी देऊन अफगाणिस्थानाचें स्वामित्व आपणाकडे घेतलें पाहिजे. असें केलें तरच राशिया हिंदुस्थानापासून दूर राहील व त्याच्यापासून हिंदुस्थानच्या सुधारणेस विघ्न होणार नाहीं. ही सुधारणा बळावल्यावर हिंदुलोक स्वतंत्रपणें राज्य करण्यास योग्य होतील किंवा नाहीं हा निराळा प्रश्न आहे. तरी येवढें खरें कीं ही सुधारणा बरींच वर्षें अव्याहत चालल्यास इंग्लिशांस राशियाची मुळींच भीति राहणार नाहीं, व हिंदुस्थानदेश इंग्लंडाकडे पुष्कळ वर्षें चालेल.

[वर्ष ५, अंक ८, ९, १०, ११, १२, १३.]

इंग्लंडाशिवाय आम्हांस गति नाहीं.

सध्यां हें भरतखंड इंग्लिश लोकांच्या एकछत्री राज्याखालीं आहे. त्याच्यापूर्वी तें मुसलमान लोकांच्या अमलांत होतें. मुसलमान लोकांची सत्ता येथें स्थापित होण्यापूर्वी येथील राज्यव्यवस्था कशी होती, याबद्दल आम्हांस इत्थंभूत माहिती नाहीं. तरी ज्या अर्थीं हिंदुस्थानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत महंमदीयांस आपलें राज्य स्थापितां आलें, त्या अर्थीं त्या वेळच्या राजेलोकांच्या अंगीं स्वतंत्रतेचें संरक्षण करण्यास अवश्य लागणारे गुण नव्हते, असें मानिलेंच पाहिजे. मुसलमान लोकांचा ऱ्हास आणि मराठ्यांचा उदय, या दोन ऐतिहासिक गोष्टी घडत असतां, इंग्लिश लोकांनीं या देशांत प्रवेश केला, व पडते मुसलमान आणि चढते मराठे या दोघांनाही पादाक्रांत करून युक्तिप्रयुक्तीनें व शौर्यानें त्यांनीं आपलें राज्य स्थापिलें.

मुसलमान लोक आम्हांस जिंकायास आले, आणि येथील रहिवासी झाले. इंग्लिश लोक व्यापारासाठीं आले, जिंकणारे झाले, पण रहिवासी झाले नाहींत, व होण्याची त्यांची इच्छा नाहीं. इंग्लिश लोकांनीं ऐर्लंड जिंकून त्यांत त्यांनीं आपलीं रहाण्याचीं ठाणीं केल्यामुळें, आमच्याप्रमाणेंच ते जरी जिंकलेले लोक आहेत, तरी त्यांना आम्हांहून अधिक राज्याधिकार किंवा राजकीय हक्क मिळालेले आहेत. मुसलमान लोकांच्या अमलांत आमचीही कांहीं अंशीं अशीच स्थिति होती. इंग्लिश लोकांचें ऐर्लंडचें राज्य, व मुसलमान लोकांचें हिंदुस्थानचें राज्य, हीं सर्वतोपरी जरी सारखीं म्हणतां येणार नाहींत, तरी त्यांत पुष्कळ साम्य आहे हें कोणीही कबूल करील. अमेरिकेप्रमाणें ऐर्लंड इंग्लंडापासून दूर असतें, किंवा हिंदुस्थानांत आलेल्या मुसलमान लोकांप्रमाणें ऐर्लंडांत गेलेले इंग्लिश लोक मातृभूमीशीं हरएक प्रकारचा संबंध तोडून टाकते, तर मराठ्यांनीं मुसलमान लोकांस जेरीस आणून ज्याप्रमाणें अखेरसि त्यांचें जूं झुगारून दिलें, त्याप्रमाणें ऐरिशलोक आपल्या जिंकणाऱ्यांस जिंकून आपलें स्वातंत्र्य पुनः स्थापिते. पण ज्या कारणांमुळें ऐरिश लोकांस आपलें स्वातंत्र्य स्थापितां आलें नाहीं किंवा येत नाहीं, त्याच कारणामुळें व आणखी दुसऱ्या पुष्कळ कारणांमुळें तें आम्हांस

स्थापितां आलें नाहीं. व आणखी शेंकडों वर्षें येण्याचा संभव नाहीं, असें दिसतें. राजकीय स्वतंत्रतेसारखी दुसरी अमोलीक चीज नाहीं, हें आम्ही कबूल करतों. पण ती संपादण्यास व संपादिली असतां तिचें संरक्षण करण्यास लोकांच्या अंगीं जे गुण असावे लागतात ते आम्हांत नाहींत. या गोष्टीस आमच्या पराधीनतेपेक्षां दुसरा सबळ पुरावा नको. शिवाय निरनिराळ्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्यांतही पुष्कळ फरक असतो. दिसण्यांत पुष्कळ देश स्वतंत्र दिसतात. पण खरें स्वातंत्र्य त्यांतील राजांनाच काय तें ठाऊक असतें. बाकी सारी प्रजा मेंढराप्रमाणें राजाच्या कृपेवर अवलंबून असते. असल्या राष्ट्रास स्वतंत्र म्हणावें कीं नाहीं, याचा आम्हांस संशय आहे. आमच्यासारखीं दिसण्यांत परतंत्र राष्ट्रें राज्यकर्त्यांच्या चांगुलपणामुळें वर सांगितल्यासारख्या स्वतंत्र राष्ट्रांपेक्षां अधिक सुखी असण्याचा संभव आहे. सारांश, घरच्या जुलमांत असणारीं नांवाचीं स्वतंत्र राष्ट्रें, व प्रजासत्ताक व्यवस्थित राष्ट्रांनीं जिंकिलेलीं परतंत्र राष्ट्रें—या दोहोंत अधिक सुखी कोणतीं असावीं, किंवा असण्याचा संभव आहे, या अत्यंत गूढ राज्यविषयक प्रश्नांचें खात्रीपूर्वक एखादें उत्तर देतां येईल असें वाटत नाहीं. युरोपांतील तुर्कस्थानची स्थिति चांगली कीं आमची स्थिति चांगली—या प्रश्नाचें उत्तर देणें फार कठिण आहे. तथापि एक गोष्ट जर ध्यानांत आणिली, तर हा प्रश्न जितका गूढ वाटतो आहे तितका तो नाहीं, असें दिसून येईल. स्वातंत्र्याकडून पारतंत्र्य येण्याचा संभव असल्यास तें स्वातंत्र्य इष्ट नाहीं. पारतंत्र्याकडून स्वातंत्र्य येण्याचा संभव असल्यास त्या पारतंत्र्याचा कंटाळा करणें वेडेपण होय. बहुतेक मुसलमान लोकांच्या, व विशेषेंकरून युरोपांतील तुर्की लोकांच्या, पूर्वीच्या इतिहासाची, व प्रस्तुत स्थितीची आम्हांस जी थोडी माहिती आहे, तीवरून असें वाटतें कीं कांहीं वर्षांनीं तुर्क लोकांचें स्वातंत्र्य जाऊन ते पराधीन होतील; व आम्ही आमचें पारतंत्र्य जाऊन पुनः न गमावेल अशा प्रकारच्या स्वातंत्र्यास पावूं. हें इष्ट स्थित्यंतर इंग्लिश लोकांच्या आश्रयावांचून, मदतीवांचून, व अंमलावांचून व्हावयाचें नाहीं, अशी आमची पक्की खात्री झाली आहे, आणि म्हणूनच "इंग्लंडाशिवाय आम्हांस गति नाहीं," असा या निबंधाला शिरोलेख घातला आहे.

आमच्या प्रस्तुत स्थितीवरून आम्ही पुढें स्वतंत्र होऊं असें मानणें, कित्येकांस फार हास्यास्पद वाटत असेल. देशांत जी प्रबल राजसत्ता आहे, तिच्या

विरुद्ध बोलणें किंवा लिहिणें राजद्रोह होय, म्हणून आम्ही ब्रिटिश लोकांच्या राज्यरीतीचें गौरव करतों असें कोणी म्हणेल; अथवा, मिथ्या आशापाशांत जखडून जाऊन आम्ही कांहीं तरी बडबडतों, असाही दोष आम्हांस कोणी देतील. पण असल्या लोकांची पर्वा आम्हांस नाहीं. ज्याला जें वाटत असेल तें त्यानें लोकांपुढें मांडणें हें त्याचें कर्तव्यकर्म होय. प्रस्तुत प्रसंगीं तर हें कर्तव्यकर्म इमानानें बजावणें फारच अगत्याचें आहे. इंग्लिश लोकांच्या राज्यामुळें आमचें जें नुकसान होत आहे, तें आम्ही पक्कें जाणून आहों. तथापि इंग्लिशांचें राज्य जाऊन दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राचें राज्य झाल्यास आमची स्थिति रेसभर तरी बरी होईल, असें आम्हांस बिलकुल वाटत नाहीं. इंग्लिश लोकांपेक्षां परक्या देशाचें राज्य अधिक उदारपणें करणारें दुसरें राष्ट्र पृथ्वीच्या पाठीवर आहे, असें आम्हांस वाटत नाहीं, व ज्या अर्थीं इंग्लिश लोकांशीं लढाई करून स्वातंत्र्य मिळविण्याची, व तें राखण्याची, आम्हांस ताकद नाहीं, त्या अर्थीं त्यांच्याच धोरणानें वागून बेताबेतानें पाऊल पुढें टाकणें हें आम्हांस श्रेयस्कर दिसतें. दुर्दैवानें इंग्लंडचें राज्य जाऊन दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राच्या अंमलाखालीं आम्ही आलों, तर आमची सुधारणा हजार पांचशें वर्षें मागें सरेल इतकेंच नाहीं; तर आज ब्रिटिश अमलाखालीं असल्यामुळें पुढें मागें आमचें डोकें वर निघेल म्हणून जी आशा आम्हांस वाटत आहे, ती मुळींच नाहींशी होईल; व कदाचित् आम्हांस पूर्ण दास्य येऊन, शेवटीं भारतीयांचें नांवही नाहींसें होईल. इंग्लंड आणि रशिया यांच्या भांडणांत आमचें स्वातंत्र्य आम्हांस मिळवितां येईल, असें कोणास वाटत असेल तर ती त्याची मोठी चूक होय. व जरी तें मिळवितां येईल, असें घटकाभर मानिलें तरी राखतां येईल असें मानणें यासारखा मूर्खपणाचा दुसरा भ्रमच नाहीं. रशियाच्या जबड्यांतून आम्ही चुकलों, तर दुसऱ्या एखाद्या राष्ट्राच्या जबड्यांत आम्ही पडणार, हें अगदीं निश्चित आहे. पाहिजे ती कल्पना करून पहा, जर शांतपणें विचार कराल तर तुम्हांस असें दिसून येईल कीं, आम्हांस कधींकाळीं चांगले दिवस येणार असतील, तर ते इंग्लिश लोकांच्या साहाय्यानेंच येणार आहेत. आमच्यावरचें इंग्लिश लोकांचें झांकण नाहींसें झालें कीं निरंतर दास्य आमच्यासाठीं राखून ठेवल्यासारखें आहे, असें आम्हांस वाटतें. आमची प्रस्तुतची दीन स्थिति पाहून कित्येक उतावीळ लोकांस असें वाटत असेल कीं

मुंगीच्या पावलानें सुधारणा होत जाऊन, येथून हजार पांचशें वर्षांनीं प्राप्त होणाऱ्या संशयास्पद स्वातंत्र्याची आशा धरून बसण्यांत काय हांशील आहे ? या प्रश्नास आमचें असें उत्तर आहे कीं, ही आशा सोडून कोणाच्या तरी निरंतर दास्यांत तरी जाऊन पडण्यांत काय हांशील आहे ? राज्यप्रकरणीं प्रश्नांचा विचार करतांना अत्यंत ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट ही आहे कीं, घाईनें घडवून आणलेली राज्यक्रांति कधींहि हितावह होत नाहीं. पुष्कळदां इतकें मात्र होतें कीं अशा घाईमुळें देशास उन्नति आणणारीं जीं सामर्थ्यें असतात तीं धुळीस मिळून देशच्यादेश अजिबात नाहींतसे होतात, किंवा निरंतर दास्याप्रत पावतात. घाईं करून जायाचें आहे कोठें ? काल निरवधि आहे, व जनन अनंत आहे. ज्या गोष्टी आजच्या पिढीला असंभवनीयशा वाटत आहेत, त्या येथून दहाव्या पिढीला कदाचित् सुकर वाटतील, व विसाव्या पिढीच्या हातून घडूनही येतील. घाईनें व अविचारानें वित्तनाश व प्राणनाश करून घेऊन, भावी उन्नति असंभवनीय करून टाकणें, हें असमंजस मनुष्याचें काम होय. हिंदुस्थानांतील सर्व लोकांनीं पक्की खूणगांठ घालून ठेवावी कीं, अनंतदशाचक्रांत भ्रमतां भ्रमतां ज्या राष्ट्राच्या सत्तेखालीं आम्ही आलों आहों, तेंच राष्ट्र झालें तर आमच्या उन्नतावस्थेस कारण होणार आहे. त्या राष्ट्राशीं बेइमानी होण्यांत आमचें कोणत्याही प्रकारचें हित नाहीं. रशियाच्या हातून हिंदुलोकांचें चांगलें होणें, किंवा हिंदुलोकांस इंग्लिशांच्या मदतीशिवाय स्वतंत्रता संपादितां येऊन ती राखतां येईल असें मानणें—या गोष्टी, रशिया आणि हिंदुस्थान या देशांतील लोकांच्या सध्यां ज्या प्रकृति दिसत आहेत, त्या अगदीं उलट होणें शक्य आहे, असें मानिल्याखेरीज कोणासही संभवनीय वाटणार नाहींत. व असा प्रकृतिविपर्यास शक्य मानणें, म्हणजे कांहीं अज्ञात व गढ कारणांमुळें कोट्यावधि वर्षें स्थिर दिसून आलेले जड सृष्टीचे धर्मही फिरूं शकतील असें मानण्यासारखें होय.


इंग्रज लोकांचें राज्य झाल्यापासून राजापासून रंकापर्यंत साऱ्यांस सारखी निस्तेजता आली आहे. बुद्धीला उत्तेजन, व्यापाराला खप, व कौशल्याला पोशिंदा नाहींसा झाला आहे. जिकडे पाहावें तिकडे उत्साहशून्यता दिसते. मोठें औदार्य, मोठें शौर्य, मोठें धाडस, मोठी कल्पकता-सारांश, प्रत्येक प्रकारच्या मोठेपणाचा लोप झाल्यासारखा झाला आहे. लढाई किंवा तह करणें, लोकांच्या सुखासाठीं, राज्यसंबंधीं किंवा व्यापारसंबंधीं मोठमोठ्या युक्ति काढणें, वित्तसर्वस्व

व बुद्धिसर्वस्व खर्ची घालून नवीन शोध करणें, निरपेक्ष बुद्धीनें विद्याव्यासंगांत किंवा लोकोपकारांत गढून राहणें, देशासाठीं किंवा स्वार्थासाठीं अचाट कृत्यें करण्यांस तयार होणें, टोलेजंग कारखाने समाईक भांडवलानें चालविणें, राज्यविषयक, धर्मविषयक, व समाजविषयक सुधारणा करण्यासाठीं मंडळ्या व सभा स्थापून उत्साहपूर्वक कामें करणें, वगैरे सुधारलेल्या स्वतंत्र देशांत दृष्टीस पडणाऱ्या गोष्टी येथें क्वचित् दृष्टीस पडतात. प्रतिवर्षी कोट्यावधि रुपये परदेशास जात असल्यामुळें, कंगालता जेथें तेथें मी म्हणत आहे. नेहमीं वरिष्ठास खूष ठेवण्याची व त्याची प्रीति संपादण्याची संवय लागल्यामुळें स्वार्थपरायणता आणि नीचता सर्वत्र व्यक्त होऊं लागल्या आहेत. लोकभय व धर्मभय हीं अगदीं सुटूं लागलीं आहेत. ज्या त्या गोष्टींत परकीयांचें अनुकरण व स्वकीय आचारांचा व रीतीभातींचा तिरस्कार—यांत आनंद वाटूं लागला आहे. अशा या शोचनीय स्थितींतून आम्ही बाहेर कसें पडूं ? हींतच आमचा व आमच्या राष्ट्राचा अंत होणार, यासाठीं होईल तितकी चैन करून घ्यावी, व मरून जावें, असें म्हणणारे व त्याप्रमाणें आचरण करणारे उदास व खेदी लोक जिकडे तिकडे पसरले आहेत.

प्रस्तुत देशास्थितीच्या चित्राची ही एक बाजू झाली. दुसरी बाजू अशीच असती, तर मात्र या देशांत जन्मास येणें मोठेंच दुर्दैव होतें. वास्तविक पहातां विपत्ति दुःखकारक नाहीं. विपत्तींतून सुटण्याची निराशा ही अत्यंत दुःखकारक आहे. सारें सुख आशेंत भरलें आहे. आशा खुंटली कीं सारें आटपलें ! आमची प्रस्तुत स्थिति जरी अत्यंत शोचनीय आहे, तरी तींत भावी सुखाची आशा धरण्यास पुष्कळ आधार आहे, असें आम्हांस वाटतें. कोट्यावधि रुपये प्रतिवर्षी परदेशास जात आहेत खरें, पण त्यांच्याबद्दल अननुभूतपूर्व आशा स्वास्थ्याचा व शांततेचा उपभोग मिळत असल्यामुळें, पूर्वीपेक्षां राष्ट्रीय संपत्तीचें वार्षिक उत्पन्न वाढलें आहे; एका अंगानें समाजाचे बंध सुटत आहेत; पण दुसऱ्या अंगानें नवीन बंध उत्पन्न होऊन हिमालयाच्या पायथ्याजवळचे लोक कन्याकुमारीच्या लोकांस मित्रभावानें आलिंगूं लागले आहेत. जुन्या कलाकौशल्याचा ऱ्हास होत आहे; पण त्याच्या जागीं नवें कलाकौशल्य येत आहे; पूर्वीची विद्या आणि शास्त्रें मालवत आहेत; तथापि नवीन विद्यांचा आणि शास्त्रकलांचा उदय होत आहे; पूर्वीची रग आणि पूर्वीचा जोम जरी कोठें दिसत नाहीं, तरी

हेच गुण अन्यरूपानें क्वचित् क्वचित् बाहेर येऊं लागले आहेत; पूर्वी हिंदुस्थानांतले निरनिराळे लोक माळेंतील विस्खलित मण्याप्रमाणें असत; आतां त्यांच्यांतून देशाभिमानाचा दोरा शिरूं लागून, त्यांची माळ गुंफूं लागली आहे. बापलेक, नवराबायको, स्त्रीपुरुष, गरीबश्रीमंत, व्यक्तिसमाज, नगरनागरिक, व राजाप्रजा—यांच्यामधील संबंधाचें उद्घाटन होत असून, एकानें दुसऱ्याशीं कसें वागावें, याची चर्चा होत आहे, व तिचा परिणाम लोकांच्या आचरणावर घडूं लागला आहे. धर्मस्वातंत्र्य, आचारस्वातंत्र्य, व विचारस्वातंत्र्य अधिकाधिक मिळूं लागल्यानें, जुलमाशिवाय ऐक्य होऊं लागलें आहे. या मार्गानें समाजसुधारणा होण्यास पुष्कळ वर्षें लागतील खरीं; पण ती पक्क्या पायावर होत असल्यामुळें, तिची ढासळण्याची भीति नाहीं. सारांश ब्रिटिश लोकांविषयीं पूर्ण राजनिष्ठा, स्वदेशहितविषयीं पूर्ण दक्षता व स्वतःविषयीं पूर्ण अभिमान, जर आम्हीं टाकला नाहीं, तर थोड्याच वर्षांत आमचा भाग्योदय झालाच पाहिजे, याबद्दल आम्हांस काडीमात्र संशय नाहीं.

[वर्ष ५, अंक १६.]



दागिन्यांचा सोस

"एकपट रूप आणि दुप्पट पोषाख" ही म्हण सर्वत्र लागू पडते. विशेषतः सर्व पृथ्वीवरील स्त्रीजातींत. दागिन्यांचा उपयोग दोन प्रकारचा आहे. "किमिवहि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम्" ही महाकविकालिदासोक्ति अक्षरशः खरी आहे असें नाहीं. कारण, "जातीच्या सुंदरांना कांहींहि चालतें" असें जरी आहे, तरी त्यांनाच जर उत्तम रीतीनें नटविलें, तर त्या अधिक खुलून विशेष मनोहर होणार नाहींत, असें नाहीं. कामबद्ध दुष्यन्तास ऋषिकण्वाश्रमीं वल्कल धारण करणारी कण्वसुता शकुन्तला फारच रम्य दिसली हें खरें, तथापि नवऱ्याच्या घरीं धाडतांना उटजवृक्षानें समर्पिलेला शालू नेसवून व किसलयोद्भेदाशीं प्रतिद्वंद्व करणाऱ्या वनदेवताकरतलांनीं पुढें केलेलीं आभरणें घालवून, प्रियंवदानुसूयादि सख्यांनीं नटविलेली शकुन्तला, राजा दुष्यन्त जर पाहता, तर अधिकच भुलून गेला असता!! केवळ नैसर्गिक सौन्दर्यानें मनुष्याची तृप्ति होत नाहीं, त्याला भर पाडणारी कृत्रिम शोभा पाहिजेच. मनुष्य जातींत अलंकार घालण्याची प्रवृत्ति पडली हें नवल नाहीं. पण कविधुरंधरांनासुद्धां स्वकृतिकन्या "अलंकारां" शिवाय वाचकजनहृदयांत कौतुक उत्पन्न करणारी करतां येईना. - पृथ्वीवरील पाहिजे तो देश घ्या, कोणत्यातरी प्रकारचे दागिने घालण्याचा प्रकार तेथें आढळल्यावांचून रहाणार नाहीं. रानटी लोकांचे दागिने कदाचित् रानटी असतील; पण ते दागिने तर खरे. कोठें नाकाला भोकें पाडून सोन्याच्या तारेंत ओंविलेलीं मोत्यें घालतात, कोठें खालचा ओंठ फाडून त्यांत चातीयेवढा शिंपेचा तुकडा बसवितात, कोणी तर पुढल्या दातांचीं शेवटें छाटून हिरड्यांत सोन्याच्या किंवा रुप्याच्या चुका ठेकितात, असें डारविन साहेबानें आपल्या "मनुष्यपीठिकेंत" सांगितलें आहे. अमुक एक प्रकारचा पेहेराव उत्तम, किंवा अमुकच दागिने निर्दोष, असें कधींही ठरवितां येणार नाहीं. रस्ते झाडीत जाणारे झगे कोणाला मानवतील! कोणाचें पुरतें अंग न झांकणाऱ्या चोळीशिवाय चालावयाचें नाहीं! एकाला काळ्या कापडानें मढविलेल्या चटईच्या टोप्या पाहिजेत, दुसऱ्याचें कोकीशिवाय कोणाशीं पटायाचें नाहीं. अमुक एक लोकांचा पेहेराव सर्वथैव वाईट म्हणणें थोड्या अवि-

चारार्चें खरें. अनेक भाषा, अनेक धर्म, तसेच अनेक पोषाख, व अनेक प्रकारचे दागिने–हा भेद देशकालमानानें थोडाबहुत पडलाच पाहिजे. या सर्व लिहिण्या-वरून दोन गोष्टी आमच्या वाचकांच्या लक्ष्यांत आल्यावांचून राहणार नाहींत. पहिली, दागदागिना व लत्ताकपडा चांगला ल्याल्यानें मनुष्य असेल त्यापेक्षां जरासें अधिक बरें दिसतें, असें सर्वांप्रमाणें आमचें मत आहे. दुसरी अशी कीं, गरीब बिचाऱ्या जोडयाला बर्तफें करून "बुटिष्टाकण्यास" नोकरीवर लावणें किंवा चंद्रकोरापुढें वेताच्या काटक्यांत बसविलेल्या पिसांचा बडिजाव करणें, आम्हांस बिलकूल आवडत नाहीं. या विषयावर लिहिण्यास आरंभ करण्यांत आमचा हेतु निराळाच आहे. दागिन्यापासून उत्पन्न होणारी शोभेची शोभा कायम राखून, दागिन्यांत घातलेल्या कोट्यावधि रुपयांचा निरुपयोग होऊन प्रतिवर्षी लक्षावधि रुपयांचें नुकसान होत आहे, तें कांहीं युक्तीनें समूळ काढून टाकितां आलें नाहीं, तरी कांहीं अंशीं कमी करितां येईल कीं नाहीं, याचा विचार करणें आहे.

प्रथम दागिन्याचा पक्ष धरून भांडणारांचें काय म्हणणें आहे तें पाहूं. त्यांचा पहिला मुद्दा असा असतो कीं, अलंकार हे बाह्यशोभावर्धक आहेत इतकेंच नाहीं, तर श्रीमंतीसूचकही आहेत. पैशापासून सुख दोन प्रकारचें. एक त्याचा थेट शरीराला उपभोग होतो. (खाणें पिणें, वस्त्रपात्र चांगलें असल्यानें शरीर सुखी राहून आयुष्य नकोसें होत नाहीं), व दुसरा उपयोग ऐटीचा. प्रत्येक मनुष्याला मी पैसेवाला आहें असें लोकांस कळल्यापासून एका विलक्षण प्रकारचा आनंद होत असतो. हा आनंद प्राप्त होण्यास या राजश्रींच्या श्रीमंतीची द्वाही फिरली पाहिजे. माझ्याजवळ अमुक रुपये आहेत असें तर वेडगळासारखें सांगत फिरतां येत नाहीं; तर मग करावें तरी काय ! बिनबोलतां सोनेंरूपें अंगावर लादल्यानें काम होतें ! पण ही समजूत वेडेपणाची आहे हें दाखविणें फारसें कठिण नाहीं. दुसरा मुद्दा; दागिने घालण्याची चाल असल्यामुळें संचय करण्याची लोकांस चटक लागते. तिसरा मुद्दा; दागिने द्रव्यरूपानें आपल्यापाशीं असल्याकारणानें प्रसंगीं उपयोगी पडण्याचा संभव असतो. चवथा मुद्दा; सोन्यारूप्याचें पाणी अंगावर पडलें पाहिजे ! त्यांत तर कांहीं हंशिल नाहीं.

आतां श्रीमंती दाखविण्याला अनेक उपाय आहेत. राहण्यास चांगलें हवाशीर घर, चांगली धडी पगडी, एखादा नोकर–अशा गोष्टी जीवित सुखावह होण्यास फार अवश्य आहेत. कल्पना करा कीं, एका मनुष्याच्या बायकोच्या

अंगावर एक हजार रुपायांचे दागिने आहेत. दागिन्याच्या रूपानें त्यांच्यापासून कांहीं एक उत्पन्न न होतां उलटी झिजमात्र जाते. हेच रुपये दागिन्यांतून काढून एखाद्या व्यापारांत घातले तर काय होतें तें पाहूं. या रकमेवर निदान आठ आण्याप्रमाणें वर्षाचे साठ रुपये उत्पन्न होतील. आतां साठ रुपयांचा विनियोग अनेक रीतींनीं करतां येईल. आपले लोक खाण्यापिण्याच्या संबंधानें किती काट-कसर करितात ? दरवर्षीं पाळणा न चुकणाऱ्या बायकांना घरचें बहुतेक काम करावें लागून, नेहमीं अंगावर एक मूल संभाळावयाचें असतें. याप्रमाणें दोन तऱ्हेनें शक्ति नाहींशी होत असतां, तिचा पुरवठा करण्याचा कांहीं उपाय न केला, तर त्या बायकोची काय गति होईल ? या गोष्टीकडे लक्ष न दिल्यामुळें पंचवीस सवीस वर्षांच्या बायका जरखड म्हाताऱ्यासारख्या दिसूं लागतात, व तिशी उलटली नाहीं, तों पोराबाळांचा राडा मागें टाकून नाहींशा होतात. अशांची बाळंतपणांत चांगली खबरदारी घेणें किती जरूर आहे ? तसेंच दररोज त्यांच्या पोटांत चार पैसेभार तूप जाणें अवश्य नाहीं काय ? हजार रुपयांचे दागिने अंगावर घालून शक्तिहीनतेमुळें पुष्कळ विपत्ति भोगून अकालीं मृत्यूच्या स्वाधीन होण्यापेक्षां, वर सांगितल्याप्रमाणें तीच रक्कम एखाद्या चांगल्या व्यापारांत लावून, तीवर आलेल्या साठ रुपयांची, महिना पांच रुपये प्रमाणें, पोटाकडे प्राप्ति लावून दिल्यास किती चांगलें होईल ? किंवा ज्यांना सुग्रास मिळत असेल, पण काम फार पडत असेल, त्यांनीं एखादा नोकर ठेविल्यास किती सुखावह होईल ? त्याप्रमाणेंच कपड्याची आणि राहण्याच्या जागेची व्यवस्था. घरीं दिवसभर सुडकें लावायाचें, आणि बाहेर पडतांना मात्र मोठीं लुगडीं आणि जरीकांठी चोळ्या ! ! अशा रीतीनें श्रीमंतीची फुशारकी मिरविण्यांत काय नफा आहे ? अंगणांत किंवा दारापुढें उकिरडे सांचलेल्या घरांत राहण्यापेक्षां, तेच साठ रुपये एखादें चांगलें घर भाड्यानें घेण्याकडे खर्च केले, अथवा स्वतःचें घर असल्यास प्रतिवर्षी त्याच्या दुरुस्तीकडे साठ रुपये लाविले, तर थोड्या वर्षांत राहण्याची चांगली सोय होणार नाहीं काय ? मध्यम स्थितीच्या लोकांस तर दागिन्याचा हव्यास अगदीं उपयोगी नाहीं. पुनः दागिने हरवण्याचा किती संभव असतो ! नथेसारखा दागिना एखादे वेळेस फांसा निखळून, किंवा मोडून, कोठें पडला कीं दोन तीन वर्षांच्या कमाईची झाली रांगोळी ! ! या गोष्टी नित्याच्या असतां इकडे कोणी लक्ष पुरवीत नाहीं, हें केवढें दुर्भाग्य ! ! सोन्याचें

कांहीं तरी बरें; पण वहिवाटीनें व पाणी लागल्यानें मोत्यांची किंमत किती उतरते ? शिवाय दागिने अंगावर घालून मुलेंबाळें बाहेर धांवल्यानें प्रत्येक दिवशीं केवढे अनर्थ होत आहेत ? कैकवर्षे कष्टानें संपादिलेलें सोनें चोरीस किती जात आहे ? या सोप्या प्रश्नांचें उत्तर एखादें लहान मूल देखील देईल, व मला दागिने नको, असें म्हणेल; पण आम्हांमधील विचारी पुरुषांस या सर्व गोष्टी पूर्णपणें कळत असतांही, सोन्यारुप्यांत पैसे अडवून टाकण्याची चाल मोडून टाकण्याचा कोणी प्रयत्न करीत नाहीं, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. खाण्या-पिण्यांत, घरदारांत, लत्ताकपड्यांत घालविलेल्या पैशाचा विनियोग अर्थशास्त्र-दृष्ट्या फार निराळ्या तऱ्हेचा होतो. सोन्यांत घातलेला पैसा मात्र उपयोगाच्या संबंधानें विहिरीच्या किंवा नदीच्या बुडाशीं असलेल्या ठेव्याप्रमाणें पडून राहतो. एकदां सोनारास दागिना घडतांना जी मजुरी मिळेल ती. ती देखील गोटा-सारखे नग करितांना अशीच ! ! यावरून पहिल्या मुद्याच्या संबंधानें वाचकांच्या लक्ष्यांत येवढें आल्यावांचून राहणार नाहीं कीं, दागिने न करितां एखाद्या धंद्यांत पैसे घातल्यानें मुद्दल रक्कम कायम राहून किरकोळ खर्च करण्यापुर्ती प्राप्ति त्यावर होते. बाकीच्या मुद्यांचा विचार पुढें एखाद्या खेपेस करूं.

दागिन्यांत पैसा न घालतां तोच एकाद्या व्यापारांत घातला असतां त्यावर येणाऱ्या नफ्यानें (व्याजानें) दुसरीं पुष्कळ फायद्याचीं कामें करून घेतां येतील, असें दाखविण्यांत आलेंच आहे. आतां दागिन्यांचा पक्ष धरून भांडणाऱ्यांच्या इतर मुद्यांचा विचार करूं. कोणी असें म्हणतात कीं दागिने करण्याची इच्छा धरिल्यानें संचय करण्याची संवय लागते; कबूल. पण संचय करण्याची संवय लागण्यास दागिन्यांचेंच आमिष कशाला पाहिजे ! संचय म्हणजे कशाचा ! प्रसंगीं उपयोगीं पडणाऱ्या पदार्थांचा, हेंच कीं नाहीं ! मग दागिने हेच उपयोगास येणारे पदार्थ आहेत असें नाहीं. शेतभात, घरदार, गल्ला, व्यापाराचे जिन्नस, यंत्रें वगैरे सर्व उपयोगाचेच पदार्थ आहेत. यांपैकीं कोणताही पदार्थ प्रसंग पड-ल्यास विकतां येऊन पैसा करतां येण्याजोगा आहे. आतां कोणी असें म्हणतील कीं, आयत्या वेळेस विकति कोणीं बसावें ? बरें विकण्यास तयार झालों तरी असल्या जिनसास घेण्यास उभा राहतो कोण ? आणि मोठी खटपट करून कोणी गिऱ्हाईक मिळविला, तरी रुपायास आठ आणे उभे राहण्याची मारामार. हें

केवढें नुकसान ! यासाठीं आपले दागिने करून ठेवावे, गरज पडेल त्या वेळेस ताबडतोब मोडावेत, व गरज भागवून टाकावी. याला उत्तर असें कीं, एक तर दागिन्यांत घातलेला पैसा जितक्याचा तितका उत्पन्न होतो, हें अगदीं खोटें. मोत्यांची किंमत वहिवाटीनें किती लवकर उतरते हें सर्वांस माहीत आहे. मोत्यांत घातलेला बहुतेक पैसा नथेंत किंवा बुगडयांत आणि कापांत अडला जातो. विंदीं करणारे थोडेच. आतां नथेचीं मोत्यें श्वासोच्छ्वासानें व तोंडाच्या संबंधानें नेहमीं पाणी लागल्यानें, व बायकांना चुलीपुढें बसण्यास लागत असल्यामुळें उष्णतेनें, थोडया वर्षांत खराब होऊन जातात, व चवथा हिस्सा किंमत येण्यांची मुष्कील पडते. ही मोत्यांची गोष्ट झाली. पण सोन्याचाही पुष्कळ अंशीं तसाच प्रकार आहे. डाकावर घातलेलें सोनें कितीसें हातास लागतें. टुशा, टिका, डोकीचीं फुलें, मूद–यांच्या सोन्याचा डाकानें किती नाश होतो ! हें तर असो, पण प्रथम दृष्टीला पाटल्या, गोट, किंवा तोडे–यासारखे सोन्याच्या भेंडोळ्यांचे दागिने, ज्यांच्यापासून बिलकुल तोटा होत नाहींसें वाटतें, ते तरी किती झिजून जातात ? गोटांचा जोड कमींत कमी सहा मासे दरवर्षीं झिजला असें मानिलें तरी फटकन झालें नऊ किंवा दहा रुपयांचें नुकसान ! हे तर सर्व किरकोळ विचार आहेत. मुख्य मुद्दा अजून पुढें आणलाच नाहीं; तो असा. दागिन्यांत न घालतां कोणत्याही व्यापारांत घातलेला पैसा, प्रसंग विशेषीं परत काढण्याची जरूरी पडल्यास, व्यापाराचे जिन्नस घाईनें विकल्यास कमी किंमत येऊन तोटा येतो ही गोष्ट खरी; पण किती तोटा येतो याचा कोणी विचार करीत नाहीं. बरें विक्रीच्या वेळेपर्यंत त्याच पैशावर केलेल्या व्यापारापासून आलेला नफा किंवा व्याज कोणीकडे गेलें ? तें कोणीं घेतलें ? कित्येक वर्षेंपर्यंत घेतलेल्या व्याजांतून विक्री करतांना झालेला तोटा वजा केला तर बहुतेक बाबतींत व्याजाकडे बाकी थकेल, म्हणजे कमी किंमत आल्यानें झालेल्या नुकसानापेक्षां व्याजरूपानें आलेला नफा अधिक होईल. एकंदरींत तर मग संचय करावयाचा तो दागिन्याच्या रूपानें करून ठेवण्यापेक्षां, दुसऱ्या कोणत्याही रूपानें ठेविला तर त्यापासून अधिक फायदा होतो हें दाखविलें. पण याहीपेक्षां कित्येक लोक या कामांत मूर्खपणाची कमाल करितात; ती अशी, कर्ज काढून दागिन्यांचा संचय करावयाचा यांत तिहेरी नुकसान होतें. पहिलें, दागिन्यांची झीज गेल्यानें होणारें नुकसान; दुसरें, दागिने अनुत्पादक वर्गांत पडून राहिल्यानें

व्यापारांत घातलेल्या पैशाप्रमाणें त्यांच्यापासून कांहीं एक फायदा होत नाहीं; तिसरें, दागिन्यासाठीं काढिलेल्या कर्जाबद्दल व्याज भरावें लागतें. याच संबंधानें आणखी एक सर्व साधारण मूर्खपणा पाहण्यांत येतो तो असा कीं, कित्येक लोक दागिने गहाण ठेवून कर्ज करितात. थोड्या वेळांत कर्ज फेडून दागिने सोडवून आणण्याची ज्यांची हिम्मत असेल त्यांना फारसा बोल लाविता येत नाहीं, पण जे लोक अजागळासारखे मागें पुढें न पाहतां, व काडीची प्राप्ति नसतां, दागिने गहाण ठेवून मोठमोठीं व्याजें भरीत बसतात, व शेवटीं मुद्दल जिनसालाही मुकतात त्यांच्या शहाणपणाचें काय वर्णन करावें ? सावकाराच्या घरीं गहाण होऊन राहण्यासाठीं बाहेर पडलेला जिन्नस क्वचितच मालकाच्या घरीं परत येतो. दागिने गहाण ठेवून कर्ज काढणारी मंडळी बहुतकरून भुकेबंगालच असते. अशा लोकांनीं दागिने ज्या वेळच्या त्या वेळेस मोडून टाकून निदान व्याजाचा बोजा तरी टाळावा हें बरें दिसतें. असो. या सर्व विचारांवरून दागिने करण्यानें संचय करण्याची संवय लागते, हें म्हणणें किती पोकळ आहे, हें आमच्या वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

अलंकारपक्षवादी आणखी असें म्हणतात कीं, दागिन्यासारखें प्रसंगीं उपयोगी पडण्यास दुसरें कांहीं नाहीं. यावर उत्तर असें कीं दागिन्यासारखें प्रसंगीं लुटून किंवा सांडून टाकण्यास दुसरें कांहीं नाहीं. एखादी हिंच्याची किंवा माणकाची आंगठी गेली सांडून, कीं बसले तळमळत ! ! इकडे तिकडे जातांना चोरांनीं मारला डल्ला कीं घरचें खाऊन लागले जोडे झिजवीत पोलिसांच्या मागें. मग कांहीं सांपडलें तर सांपडलें. संचय केलेलें द्रव्य प्रसंगीं फारसें उपयोगीं पडत नाहीं. मोठ्या हळहळीला आणि संतापाला मात्र कारण होतें. तेंही असो. प्रसंगीं उपयोगीं पडण्यासाठीं दागिन्यांतच पैसा घातला पाहिजे अशी कांहीं जरूरी नाहीं. ब्यांकेंत ठेविलेल्या पैशानें, व्यापारसंबंधीं नीट व्यवस्था होऊन, शिवाय मालकांस व्याज मिळतें व प्रसंगीं पैसा काढून घेतां येतो. ज्यांस कोणताही व्यापार करण्याची सोय नाहीं त्यांनीं ब्यांकेंत पैसे ठेविले तर किती उत्तम होईल ! सरकारी ब्यांकेंत कमी व्याज मिळतें व गरीबगुरीब मजुरास त्यांत पैसे ठेवण्याजोग्या सोई नाहींत हें खरें, पण या गैरसोई दूर करणें फारसें कठीण नाहीं. मोठमोठ्या पतीच्या सावकार लोकांनीं ब्यांका (पेढ्या) काढाव्या, गरीबगुरीबांपासून पैसे घ्यावे, मोठमोठे व्यापार सुरू करावे, पुष्कळ नफा मिळवावा, व त्याचा कांहीं भाग व्याजरूपानें पेढीवर पैसे

ठेवणारांस द्यावा. पण हा पेढीचा प्रश्न बिकट आहे, यासाठीं त्याचा साद्यंत विचार पुढें एकाद्या खेपेस करूं.

गेल्या सगळ्या लिहिण्यावरून दागिन्यांचे खरे उपयोग दोनच दिसतात. एक श्रीमंतीचें प्रदर्शन, २ रें रूपाला भर. व्यापारधंदा, चाकरमाणसें, गाडयाघोडीं, वस्त्रें-पात्रें पदरीं बाळगल्यानें श्रीमंती दिसते हें मागें दाखविलेंच आहे. दागिन्यांनीं रूपाला भर पडत नाहीं. पण खर्च न करितां सुंदर दिसण्याची तोड काढणें कठिण नाहीं ! ! ती तोड सर्वांस पसंत मात्र पडली पाहिजे. खऱ्या मोत्यांच्या जागीं कापूरमोत्यें घालून केलेली नथ नाकास कमी शोभा देते असें नाहीं. " नथेनें माझें तोंड सुरेख दिसतें व मी श्रीमंत आहे असें लोकांस कळतें " या दोन कामांपैकीं पहिलें काम खोट्या नथेनें होईल, व दुसरें काम म्हणजे श्रीमंती दाखविण्याचें काम, वरील सांगितल्यापैकीं कोणत्या एका साधनानें तडीस नेतां येईल. पण असें केल्यानें नफा मात्र फार होईल त्यास काय करावें !

एकत्र राहणें चांगलें का ?

कित्येक गोष्टी अशा आहेत कीं, त्यांसंबंधानें लोकांचे दुराग्रह कांहींही असोत, देशकालमानाच्या संबंधानें त्यांत फेरफार व्हावयाचाच. जी गोष्ट स्वाभाविक असते, ती तिच्या ओघानें न जाऊं दिल्यास मुळींच दबून राहते असें नाहीं. भेद इतकाच कीं, विचार करून, व कालमानाकडे दृष्टि देऊन अमुक एक मार्ग चांगला असें ठरवून त्यानेंच जावयाचें, असा निश्चय केल्यानें फार त्रास पडल्याशिवाय चांगल्या गोष्टी तेव्हांच प्रचारांत येतात; पण असें न केलें तर कालहानि होऊन बराच त्रास सोसावा लागतो. बाकी ज्या गोष्टी मनुष्याचे मनोधर्म आणि साधारण कळ यांवर अवलंबून आहेत, त्या आज नाहीं उद्या, त्या त्या वळणावर जावयाच्याच. पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, बालविवाह यांसंबंधानें आमच्या लोकांचे पुष्कळ हेकेखोर दुराग्रह आहेत, ते तसेच शाश्वत राहतील, असें कधींही होणार नाहीं. आम्हीं होऊन ते दूर करण्याविषयीं खटपट न करितां उलटे ते तसेच राखून ठेवण्याचा जरी प्रयत्न केला, तरी देखलि हे कालांतरानें खचित लय पावणार, अशी आमची खात्री आहे. तथापि विचाराला जी गोष्ट प्रशस्त दिसते, तिच्याप्रमाणें आपण लोकभीतस्तव वागण्यास कचरतों. यामुळें आपल्या देशांतील लोकांचें अतोनात नुकसान होत आहे. " यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाकरणीयं " या वाक्याची फार उत्तम प्रकारची छाप आम्हां सगळ्यांवर बसली आहे. आणि याच वाक्याला जगांतील बहुतेक लोक अनुसरतात; व एका प्रकारें ते तसें करितात हेंही बरें; कारण निरनिराळ्या गोष्टींचा विचार करून बरी कोणती, वाईट कोणती, याचा निर्णय करण्याची ज्यास शक्ति नाहीं, त्यानें पूर्वापार चालत आलेल्या प्रचारास अनुसरावें हेंच चांगलें. पण विचारी पुरुष देखील जर असें करूं लागतील, व इतर लोक देखील, अमुक एक गोष्ट विचारदृष्ट्या चांगली दिसते, असें कबूल करून, ती केवळ नवीन, म्हणून प्रचारांत आणण्यास अडथळा करतील, तर सुधारणा म्हणून जी म्हणतात, ती कधींही व्हावयाची नाहीं. बहुतेक लोक, आणि बहुतेक राष्ट्रें, स्थित्यंतराच्या मानानें, आपल्या चालचलणुकींत फेरफार करितातच; सर्व जगाची एकसारखी

पुढें धांव आहे, हें अनुभवसिद्ध आहे; पण हें सत्य न जाणतां, जे मनुष्य व जीं राष्ट्रें हें जग स्थिर आहे, असें वृथा मानून, जेथें तेथें अडून बसतात, व नवीन प्रचाराला अटकाव करितात, ते आपलें आणि दुसऱ्यांचें फार नुकसान करितात. यासाठीं ज्याला त्याला दुसऱ्याचें नुकसान न करितां, व लोकांची भीति न बाळगितां, आपल्या विचारानुरूप स्वतंत्रपणानें वागतां येईल, तर फार चांगलें होईल. दागिन्यांच्या संबंधानें व लग्नाच्या संबंधानें, आज ज्याप्रमाणें पुष्कळ लोकांच्या मनांत फेरफार करावयाचे असून, लोकभीतीस्तव ते करण्याचें धैर्य होत नाहीं, त्याप्रमाणेंच एकत्र राहण्याच्या चालीसंबंधानें होय. ज्यांची प्राप्ति फार कमी आहे; त्यांना, घरीं बसून आळसानें दिवस काढणाऱ्या जवळच्या आप्तांना, लोक हंसतील, यामुळें पोसावें लागत असल्यामुळें फार पीडा होते. ही गोष्ट पुष्कळांच्या, अनुभवांतली आहे; तरी तिला उपाय करण्याचें धाडस कोणाच्यानें होत नाहीं. आमचें म्हणणें इतकेंच आहे कीं, जी गोष्ट मनुष्य-स्वभावाप्रमाणें झालीच पाहिजे, व जी कधींना कधीं होतेच, व जी होतांना आतां तंटेबखेडे होऊन होते, ती आपण होऊन, एकमेकांच्या विचारानें थोडी अगोदर घडवून आणल्यास, त्यापासून पुष्कळ त्रास चुकून, सर्वांचेंच हित होण्याचा संभव आहे. यासंबंधानें सुबोधपत्रिकेंत (१८८१) एक दोन लेख आले आहेत, ते फार संथपणानें विचार करून लिहिलेले आहेत; तथापि त्यावर धर्माची छाया पडली असल्यामुळें विचारांत बराच कोतेपणा आला आहे, व पूर्वापार सृष्टिक्रम असा चालला आहे, व लोकांच्या इच्छेविरुद्धही मतभेद एकसारखा झपाट्यानें कसा होत चालला आहे, या गोष्टीकडे पुरेसें लक्ष पोहोंचलें गेलें नाहीं.

आमच्या मतें एकंदरीनें एकत्र राहणें चांगलें नाहीं. अशा मताचा अंगीकार करण्यास आम्ही पुष्कळ कारणें दाखविणार आहों; त्यांपैकीं आज थोडींशीं सांगतों.

ज्या वेळेस हिंदुस्थान परलोकांच्या अमलांत नव्हतें, ज्या वेळेस जमिनीचें उत्पन्न कोणत्याही रूपानें बाहेर जात नव्हतें, ज्या वेळेस लोकसंख्या फार लहान होती, व ज्या वेळेस ऐषआरामाची चाड लोकांस लागली नव्हती, त्या वेळेस पुष्कळ भोजनभाऊ जवळ बाळगणें फारसें कठिण नव्हतें. घरीं दाणाटुणा फार येत असल्यामुळें, व त्याचा व्यय करण्यास कांहीं साधन नसल्यामुळें, दहा मंडळी पंक्तीला घेऊन जेवतां येण्याचें फारसें कठिण नसे. पण आतां ते दिवस गेले. परकी लोकांचें राज्य झाल्यामुळें देशाला अन्नान्नदशा येऊन पोहोंचली.

कवडीची माया जवळ नसतां, नाहीं;नाहीं त्या इषकी, आणि चोचले करावेसे वाटूं लागले. इंग्रज लोकांच्या चांगल्या गुणांचा कित्ता घेणें एकीकडे राहून नाटकें, तमाशे, गाड्या, बुटिष्टाकण्या, हाफजाकिटें, पाटलुणी, सोडावाटर आणि सर्वांच्या-वर ताण जगदंबा ताडीबाईनासुद्धां हिणवून लावणारी गोऱ्यांच्या देशांतील ब्रांडी-बाई, यांजकडे लाखों रुपये उडूं लागले. पंधरा वर्षांपासून प्रजोत्पादनाचें काम सुरू होऊन चाळिसावे वर्षीं देखील तें थांबेनासें झाल्यामुळें लोकसंख्या इतकी वाढली आहे कीं, एकाद्या पावसाळ्यांत वरुण महाराजांनीं किंचित् करडी नजर केली कीं, गरीब लोकांस पोटचीं पोरें किंवा आपलेच हातपाय चाऊन खाण्याचा प्रसंग येऊन टेपतो ! अशा वेळीं एकानें मरमर मरावें, आणि बाकीच्यांनीं गले-लठ्ठाप्रमाणें बसून खावें, हें ठीक दिसत नाहीं.

एकत्र राहण्याविरुद्ध जीं अनेक कारणें आहेत, त्यांपैकीं पहिलें कारण जें खाणाऱ्यांची संख्या वाढत जाऊन अन्नाचा पुरवठा वाढत जात नाहीं, यामुळें होणारा त्रास, तें वर थोडक्यांत सांगण्यांत आलें आहे. एकाच कुटुंबाचा विचार करूं, म्हणजे ही गोष्ट स्पष्टपणें लक्षांत येईल. एका गृहस्थास दरमहा पंचवीस रुपयांची प्राप्ति आहे, व त्याचें कुटुंब पांच माणसांचें आहे, अशी कल्पना करूं. आतां या पांच माणसांच्या ठिकाणीं सात किंवा आठ माणसें झालीं, आणि पैशाची प्राप्ति जशीच्या तशीच राहिली, तर पांच माणसांचें अन्न सात किंवा आठ मनुष्यांत विभागलें जाणार. असें झाल्यानें दोन प्रकारचे वाईट परिणाम होतात. एक तर प्रत्येकाच्या अन्नाचा वांटा कमी होतो. पण जेवायला बसलें म्हणजे पोटाची खळी कशी तरी भरून काढल्याशिवाय चैन पडत नाहीं, यासाठीं बहुधा पांचजणांचें अन्न सात किंवा आठजण वांटून घेत नाहींत, तर त्याच किंमतीचें हलकें अन्न खाण्यास प्रारंभ होतो. हिंदुस्थानची प्रजा दुर्बल होण्याचीं जीं अनेक कारणें आहेत, त्यांपैकीं असलें सत्वहीन अन्न हें मोठें महत्त्वाचें कारण आहे. आपण अगोदर धान्याहारी पडलों; तशांत तेंही चांगलें व पोटभर न मिळाल्यास शक्ति कोठून रहाणार ? आपल्याकडील मोठमोठ्या श्रीमंतांच्या घरींदेखील किती पुळपुळीत खाणें खातात ? जिकडे तिकडे काट-कसर करून जो संचय करावयाचा, तो सगळा दागिन्यांत किंवा लग्नकार्यांत खर्च करण्यांत नाहींसा करून टाकावयाचा. अशा प्रकारची दुष्ट चाल या देशांत सर्वत्र पडून गेली आहे, हें अत्यंत शोचनीय होय. युरोपांतील व इतर

खंडांतील लोक मांसाहारी असल्यामुळें, त्यांच्या अंगांत आमच्यापेक्षां पुष्कळ शक्ति असते, व सरासरीनें आमच्यापेक्षां ते अधिक जगतात. सरसकटीच्या मानानें हिंदु लोकांचें आयुष्य एकवीस किंवा बावीस वर्षें पडतें, व इंग्लिश लोकांचें आयुष्य पसतीस किंवा छत्तीस वर्षें पडतें; याचें कारण त्या लोकांस कसदार व पुष्कळ अन्न मिळतें, आणि आम्हांस तें मिळत नाहीं, हेंच होय. आपल्या लोकांत पुरभई वगैरे ज्या जातींत चांगलें खाणें खातात, ते इंग्रज लोकांबरोबर मेहनत करूं शकतात व जगतात असें पहाण्यांत आलें आहे. "अन्नमय प्राण" म्हणून पूर्वापार जी म्हण आली आहे, ती सर्वथैव खरी आहे. ज्या प्रकारचें अन्न त्या प्रकारचा शरीरपिंड. शक्ति आणि अन्न यांच्यामध्यें कार्य-कारणाचा संबंध आहे. हें सर्व सांगण्याचें प्रयोजन येवढेंच कीं अनेक कारणां-मुळें आमच्या देशांतील अन्नाचा पुरवठा कमी होत जात असून, खाणारांची संख्या झपाट्यानें वाढत चालली आहे, त्यामुळें दिवसेंदिवस चांगल्या रीतीनें रहाण्याची फार पंचाईत पडूं लागली आहे. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांत अशा रीतीनें खाणारांची संख्या वाढली कीं, तेथील लोक आपला देश सोडून ज्या ठिकाणीं लोकांची वस्ती अगदीं पातळ आहे, किंवा ज्या मुलखांत कोणीच वसाहत केलेली नाहीं, अशा ठिकाणीं जातात. ऐर्लंडांत बटाट्यांचें उत्पन्न फार, व त्यांत जरी कस फारसा नाहीं, तरी पोटभरीला तें बरें असल्यामुळें, गरीब बिचारे ऐरिश लोक त्यांवरच आपला चरितार्थ करितात; पण हें बटाट्यांचें उत्पन्न देखील त्यांना पुरेनासें झालें आहे, त्यामुळें हजारों ऐरिश लोक आपला देश सोडून अमेरिकेंत जाऊन राहिले आहेत. अजून पृथ्वीवर पुष्कळ पड जमीन आहे, म्हणून जेथें लोकवस्ती फार दाट झाली असेल, तो देश सोडून तेथील लोक पड जमिनीच्या प्रदेशांत जाऊन वसाहत करितात. पण या रीतीनें अन्नाचा पुर-वठा करण्याचा प्रकार आम्हांस बरोबर वाटत नाहीं; कारण एकतर एक देश सोडून दुसऱ्या देशांत वसाहत करण्यास एखादी मंडळी निघाली, म्हणजे पहिल्या देशांतील पुष्कळ पैसा व सशक्त माणसें घेऊन जाते. त्यामुळें त्या देशाचें दोन प्रकारें नुकसान होतें. पुष्कळ पैसा देशांतून बाहेर पडल्यानें त्या देशाचें भांडवल कमी होतें. पण देशांतील भांडवलावरच देशाचा कामधंदा चालत अस-ल्यामुळें, तें कांहींसें कमी झाल्याबरोबर मजूरदार उघडे पडतात, व त्यांना अन्नान्न होतें, म्हणजे अन्नाची तूट भागविणें हा जो दुसऱ्या ठिकाणीं वसाहत करण्याचा मूळचा उद्देश, तो निष्फळ होतो. दुसरी गोष्ट अशी कीं, बाहेर देशांत वसाहत

करणारी मंडळी चांगली कुशल, हुशार व सुदृढ असावी लागते. चतुर आणि सशक्त कारागिर हे तर देशाची फारच मोलाची संपत्ति होत. ही नाहींशी झाल्यानें देशाचें फारच नुकसान होतें. मातीचा पैसा करणारी मंडळी देश सोडून गेल्यानें, येवढें नुकसान होतें यांत आश्चर्य तें कोणतें ? मागेंपुढें न पहातां आतांचे-प्रमाणें प्रजा उत्पन्न करण्याचें काम असेंच जारी सुरू राहील, तर थोड्या वर्षांच्या आंत जगावर मोठा कठिण प्रसंग येऊन ठेपेल. आज जिकडे तिकडे पुष्कळ पड जमीन आहे; म्हणून कोणास कांहीं वाटत नाहीं; पण एकदां पृथ्वी माणसांनीं गजबजून गेल्यावर पुढें लोकांचा चरितार्थ कसा चालेल ! केव्हां तरी जगापुढें हा प्रश्न येणारच आहे; केव्हां तरी अन्नोत्पत्ति आणि प्रजोत्पत्ति यांचें समीकरण बसलेंच पाहिजे. बरें, हें समीकरण बसविण्याची केव्हां तरी पाळी येणारच हें सिद्ध आहे, तर या प्रश्नाचा आजपासूनच विचार कां करूं नये? पुनः सगळी पृथ्वी मनुष्यप्राण्यांनीं भरून टाकण्यांत तरी काय हंशील आहे ? जिकडे तिकडे माणसेंच माणसें पेरून टाकून, जगांतील शांतता व एकांत नाहींसा करून टाकण्याचा परिणाम चांगला होण्याचा संभव नाहीं. दिवसाचा बहुतेक भाग गडबडींत घालविल्यानंतर, दोन घटका एकांतांत घालविल्यापासून होणाऱ्या सुखाचा अनुभव घेण्यास सांपडणें, प्रत्येकास अवश्य आहे. शिवाय जे प्राणी जगांत आलेले नाहींत, त्यांना न आल्याबद्दल कांहीं वाईट वाटत असेल असें मानितां येत नाहीं; कारण ते जगांत येण्याच्या पूर्वी कसे आणि कोठें असतात, याचीच कल्पना आम्हांस करितां येत नाहीं; असें असल्यावर त्यांच्या सुख-दुःखाचा विचार करणें एकीकडेच राहिलें पाहिजे. पण ज्यांच्या खाण्यापिण्याची सोय आपणांस चांगल्या रीतीनें करितां येत नाहीं; व ज्यांना दरिद्री व भुकेबंगाल आईबापांच्या पोटीं आल्यामुळें आयुष्य यातनाकुंडाप्रमाणें भासतें, अशा लोकांच्या विपत्तीबद्दल त्यांचे उत्पादक जबाबदार आहेत. शिक्षा करावयाची असेल तर त्यांना करावी; व शापाचें खापर त्यांच्या डोक्यावर फोडावें. परंतु मनुष्यांवर या बाबतींत अंविचाराचा इतका पगडा आहे कीं, अर्धेमुर्धे पोट भरून जोंपर्यंत जीव आणि शरीर यांची सांगड जडून राहील तोंपर्यंत ते या प्रश्नाचा विचार करणार नाहींत, इतकेंच नाहीं, तर जो विचार करील त्याला हंसतील, व त्याची कुटाळकी करतील. या प्रश्नाचा प्रकृत प्रश्नाशीं निकट संबंध असल्यामुळें, याच्या विवेचना-कडे इतकी जागा दिली. निराळें राहिल्यानें प्रत्येक मनुष्यास आपला आदा किती व खर्च किती याचें बरोबर अनुमान करितां येतें. स्वतःवरच कुटुंब-भरणाचें ओझें पडत असल्यामुळें द्रव्य संपादणें किती कष्टकारक आहे, हें चांगलें कळून येतें. पोटासाठीं दुसऱ्यावर अवलंबून राहिल्यानें मनुष्याची योग्यता आणि स्वातंत्र्य हीं जितकीं कमी होतात, व उद्योग जितका मागें पडतो, तितका दुसऱ्या कोणत्याही कारणानें पडत नाहीं.

अनुकरण

अनुकरण म्हणजे काय हें बहुधा कोणालाही सांगायाला नकोच; दुसऱ्याचें पाहून करणें यांचें नांव अनुकरण. हें अनुकरण दोन प्रकारचें आहे; एक शारीर व दुसरें मानसिक. शारीर अनुकरण म्हणजे दुसऱ्याचा हुबेहुब कित्ता उचलून त्याच्याप्रमाणें बोलणें, चालणें, पेहेराव करणें वगैरे; आणि मानसिक अनुकरण म्हणजे त्याची विचारपद्धति उचलणें, त्याच्या मतांचा अनुवाद करणें, इत्यादि होय.

सदरील विषयाचा प्रस्तुत कालीं विचार करण्याचें कोणतें अगत्य आहे हें कोणाच्याही सहज लक्षांत येण्यासारखें आहे. तें असें कीं, आमचे राज्यकर्ते हे आम्हांपासून आचार, विचार, विद्या, वगैरे सर्व गोष्टींत अत्यंत भिन्न आहेत. तर त्यांचें अनुकरण आम्हीं करावें कीं नाहीं, व करणें झालें तर कोणत्या गोष्टीत व कितपत करावें, वगैरे गोष्टींचा या काळीं विचार करणें अत्यंत महत्त्वाचें आहे. या समयासच वरील विवेचनाचें येवढें महत्त्व काय, असें जर कोणी विचारील, तर त्यास उत्तर देणें सोपें आहे. जोंपर्यंत घडा ओला असतो किंवा झाड कोवळें असतें, तोंपर्यंत त्यावर विवक्षित संस्कार घडण्याची शक्यता असते; त्याप्रमाणेंच आमच्या पाश्चात्य बंधूंचा समागम आम्हांस कोठें नुकताच घडला आहे, यास्तव प्रस्तुत विषयाचें विवरण करणें तें या वेळेसच करणें विशेष उपयोगाचें आहे. एकदां या नव्या मुशींतून निघून आम्ही कठिण होऊन बसलों म्हणजे मग नाइलाजाची गोष्ट होणार आहे !

आतां अनुकरणाविषयीं सामान्यतः विचार करतां ही गोष्ट कोणासहि स्पष्ट दिसणार आहे, कीं ही प्रवृत्ति मनुष्यस्वभावासच खिळलेली आहे. 'मनुष्य हा अनुकरणशील प्राणी आहे' (Man is an imitative animal) अशी एका तत्त्ववेत्त्यानें 'मनुष्य' या शब्दाची व्याख्या केली आहे. मनुष्य जो बरें-वाईट आचरण करतो, त्याच्या अंगीं गुण-अवगुण जे दृष्टीस पडतात, तें सर्व अनुकरणाचें फल आहे असें सामान्यतः अनुभवावरून आढळतेंच. खाटकाचें पोर आणि गुराचें ओरडणें ऐकून कळवळूं लागलें; किंवा कलावंतिणीची पोर आणि व्यभिचाराची गोष्ट ऐकून तिच्या अंगावर कांटा आला, या गोष्टी मुळींच

संभवत नाहींत. संस्कारविशेषाच्या योगानें पुढें कांहीं निराळा प्रकार झाला तर न जाणों; पण जोंपर्यंत तो झाला नाहीं, तोंपर्यंत मनुष्याच्या मनाचे धर्म हे सर्व साहजिक अनुकरणानें जसे बनतील तसेच बनतील हें उघड आहे. तेव्हां ही प्रवृत्ति स्वभावतःच येवढी प्रबळ असल्यामुळें, अलीकडे आमच्या देशांत पाश्चात्यांच्या अनुकरणाचा जो प्रकार आढळतो, तो साहजिकच म्हटला पाहिजे. पूर्वी मुसलमानांच्या कारकीर्दीतही तो घडला, हें सर्वांस महशूर आहेच. मराठे लोकांचा गोषा, एकंदर लोकांची पोषाकाची तऱ्हा, ऐषआराम या सर्व गोष्टी वरील प्रवृत्तीचींच फळें होत. नर या दृष्टीनें पहातां अलीकडे डगला, बूट, स्टाकिंग, चहा, काफी, खियांबरोबर सहल करणें, वगैरे रिवाज व यांहूनही विचित्र गोष्टी ज्या कांहीं कांहीं प्रचारांत आल्या आहेत, व येऊं पाहत आहेत, त्या मनुष्यस्वभावाच्या कलास अनुसरूनच होत हें उघड आहे !

आतां वरील प्रकार आमच्यामध्यें अनुकरणाच्या रूपानें प्रवृत्त होणें हें जरी साहजिक आहे, तरी त्यांत पोरकटपणाचा, पोकळ डौलाचा, व मूर्खत्वाचाही थोडा अंश आहे असें नाहीं. यास उत्कृष्ट उदाहरण चष्म्याचें घ्या. चष्मा हा खरोखरी वृद्ध लोकांकरतां आहे; त्यास 'चाळिशी' हा वरील कारणावरूनच पर्यायशब्दसुद्धां होऊन बसला आहे ! पण मौज पहा काय आहे, कीं मिऱ्याएवढीं पारशांचीं पोरें व ऐन उमेदींत झाकीनें मिरवणारे फांकडे विद्वान् यांच्या नाकावर पहावें तों उपनेत्राचें अधिष्ठान ! ज्यास आपली श्रीमंती दाखवायाची असेल, त्यास आठबारा आण्यांच्या खर्चांत ती दाखवण्याचा मार्ग वरील भिंगें झालीं आहेत ! ज्याची विद्वत्ता तुटपुंजीची असेल, व आपलें वजन पोरांसोरांवर वगैरे (कां कीं, ज्याला आंतली ओळख पोंचली आहे तो नुसत्या चष्म्यानें कधीं दबकला जाणारा नव्हे !) बसवावयाचें असेल, त्यानें नाकावर चष्मा चढविला कीं पुरे, त्याचा वरचष्मा झालाच ! रस्तोरस्तीं शिपाई वगैरे अनभिज्ञ लोकांकडून ज्यास ओंझळी ओंझळी रामराम, सलाम, व नमस्कार घेण्याची हौस वाटत असेल, पण ती पुरविण्यास पदरीं तर काडीइतकाही अधिकार नाहीं, त्यानें खासा जामानिमा करून, खऱ्या डोळ्यावर खोटे डोळे मात्र लावून द्यावे, कीं झालें काम ! आतां या नकली डोळ्यांचा खरोखर उपयोग किती आहे म्हणाल, तर जेव्हां पाहण्याचा खराखुराच प्रसंग पडतो, तेव्हां अस्सलाचाच उपयोग करणें भाग पडतें; अशा वेळीं काचचक्षूंस वर कपाळावर सारून पशुपतीच्यावर ताण करावी लागते !

पशुपति भालनेत्र खरा, पण त्या बिचाऱ्याला एकच डोळा, आमच्यापाशीं जोडी ! ! त्यांतून विद्वत्तेच्या अगदीं शिखरावर आरूढ झाल्याचा जर अडाणी लोकांस भ्रम पाडायाचा असेल तर, एकेरी चष्मा घ्यावा; आणि कांहीं वाचायाचें किंवा सूक्ष्म रीतीनें पाहायाचें असल्यास चटदिशीं एका डोळ्यावर भिंग ठेवावें, आणि त्याचें काम झाल्याबरोबर चटदिशीं तें आपोआप सोडून द्यावें ! आमच्या देशास सज्ञान दशेची कळा नुकती कोठें उगीच येऊं लागली आहे; हिंदुस्थानांतले गिबन्, मेकॉले, वेब्स्टर वगैरे तर अजून पुढेंच उगवायाचे आहेत; मग इतक्यांतच आमचे चर्मचक्षु मंदतेज होऊन विलायती काचांनीं त्यांचा पाठपुरावा करण्याची जर जरूर पडूं लागली, तर मोठमोठे इतिहास, मोठमोठे कोश आमच्या देशभाषांतून निपजण्याची जेव्हां महापर्वणी येईल, तेव्हां सत्यलोकीं डोळ्यांचा नवा कारखाना काढण्याविषयीं ब्रह्मदेवास येथून नोटीस पाठवावी लागेल कीं काय कोण जाणें ! वरील वेडगळ हौस पुरवण्याच्या पायी कित्येकांनीं आपलें जन्माचें नुकसान करून घेतल्याचेंही आढळतें. तें असें कीं, पहिल्या प्रथम पोकाक्षातर म्हणून ज्या गोष्टींचा अंगीकार करावा, तींच मग उरावर बसून शोकास मात्र कारण होते. प्रथमतः छानछुकीचें कलम म्हणून डोळ्यांस आरशीची संवय करून घ्यावी; आणि मग ती आयतीच नाकावर बसून तिजवांचून गत्यंतरच नाहीं अशी फजिती होते !

वरील उपनेत्रांप्रमाणेंच हातमोचे, पायमोचे, गळपट्टा वगैरे जीं अलीकडे सोंगें निघालीं आहेत, तींही आम्हांस तर निवळ उपहासास्पद वाटतात. एक तर वरील शरीरत्राणावांचून आजपर्यंत कधींही कोणास इजा पोंचल्याचें ऐकिवांत नाहीं. यास्तव वरील ढंग सारे बायकेपणाचे होत, असें आम्ही समजतों. शिवाय त्यांजपासून विनाकारण देशाचा पैसा खर्च होत आहे हें निराळेंच. चहाकाफीलाही आम्ही वरील अनावश्यक वस्तूंतच काढणार. त्यांचा समयविशेषीं जरी उपयोग होतो, तरी नेहमीं त्यांचें लचांड बाळगणें हें आम्हांस बिलकुल पसंत वाटत नाहीं. त्यांतून हल्लींच्या देशस्थितींत तर वरील पोकास भिकारचाळा असें नांव देण्यासही आम्हांस धास्ती वाटत नाहीं.

वर बारीकसारीक गोष्टींत आढळणाऱ्या अनुकरणाच्या प्रकाराविषयीं आम्हीं लिहिलें. आतां पाश्चात्यांच्या अनुकरणाचे कांहीं भयंकर प्रकार जे आम्हांमध्यें सुरू झाले आहेत त्यांच्या संबंधानें लिहितों.

वरील प्रकारांत अग्रगण्य प्रकार कोणता आहे हें आज कोणालाहि सांगायला पाहिजे असें नाहीं. हा प्रकार मद्यप्राशन हा होय. हा कुत्सित विषय हातीं घेऊन आमच्या लोकांच्या मूर्खत्वावर विवेचन करण्याचा प्रसंग यावा ही गोष्ट मोठी शरमेची आहे; पण तीस इलाज नाहीं. आपल्या भाषेंत म्हण आहे कीं, 'दुखणें झालें कीं तें वेशीवर बांधावें'; तर हाच न्याय पतकरून आमच्या लोकांत, आणि त्यांतून विद्वान् व सुधारलेले म्हणविणाऱ्या मंडळींत, हें जें अत्यंत लज्जास्पद व हानिकारक दुर्व्यसन प्रविष्ट होऊं पाहत आहे, त्याच्या संबंधानें या खेपेस प्रसंगानुसार चार शब्द लिहिल्यावांचून राहवत नाहीं.

मद्यप्राशनाचा प्रकार या देशांत प्राचीन काळीं सार्वलौकिक होता असें दिसतें. तो पुढें दैत्यगुरु शुक्राचार्य यांनीं निषिद्ध केला, अशी महाभारतांर्गत आदिपर्वांत कथा आहे, हें सर्वांस माहीत आहेच. या काळापासून (म्हणजे निदान दोन हजार वर्षें तरी) ही दुष्ट प्रवृत्ति ब्राह्मणज्ञातींत विच्छिन्न झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. नाहीं म्हणायाला शक्तिपूजेच्या मिषानें मात्र हा निंद्य प्रकार चालू होता, व अद्यापही कोठें कोठें असेल तेथें असेल. अलीकडे इंग्रजी विद्येची प्रवृत्ति इकडे झाल्यापासून व तज्जनित दुर्विकार आमच्या लोकांत दृष्टीस पडूं लागल्यापासून देवीपूजेचें वगैरे बंड माजवण्याची व चोरून कोणीकडे मध्यरात्रीं वरील सुरोपासना करण्याची आमच्या मंडळीस जरूर राहिली नाहीं. समुद्रमंथनकाळीं जसें अमृत, विष व मद्य हीं तिन्हीं एकदम प्रादुर्भूत झालीं, त्याप्रमाणेंच आंग्लभौमाविद्योदधींतून ज्ञानामृत, व दुर्ग्रहविष हीं दोन्हीं एका कालींच उत्पन्न झालीं. त्यांत केवळ ज्ञानामृताचेच चाहते व भोक्ते एकंदर थोडेच निघाले. अमृताच्या अंशाबरोबर ज्यांच्या अंतःकरणास वरील विषार थोडाबहुत तरी झोंबला नाहीं असे एकंदर विरळाच. त्यांतून या कालकूटाचा अर्क जी सुरा तिनें तर पुष्कळच भक्त आपल्या चरणीं लोळवले ! फार तर काय, पण ज्या बेट्यांस वरील सुधाविषमय पात्राचा फारसा योग घडला नाहीं, त्यांनीं त्याच्यावर आलेला फेसच केवळ चाखला, आणि तेवढ्यानेंच लहर येऊन ते रथ्योदकानिमग्न झाले ! तेव्हां ही सुरादेवी अर्वाचीन, सुधारलेल्या काळांत अशी राजरोस प्रगट झाली असतां, आतां तिला पूर्वीप्रमाणें अभिसारिकावेष धारण करण्याची बिलकूल गरज उरली नाहीं. तिनें अलीकडे वेश्येप्रमाणें उघड माथ्यानें रोजगार आरंभून इंग्रजी विद्येची ती जणूं काय सहचरीच बनलेली आहे ! त्यांतून आधुनिक

गौरकाय प्रभूंचाही तिजवर कृपाकटाक्ष ! मग काय विचारतां ? आमच्या दयाळू सरकारचें मुख्य लक्ष आपली पोतडी भरण्यावर; मग श्वेतद्वीपिजन्य द्राक्षावल्लींतून आमच्या आर्यबंधूंनीं काढलेला जो अर्वाच्य सोमरस त्याचें आनंदानें सेवन करून आम्ही जर मोठ्या खुषीनें सरकारी खजिन्यांत भर टाकतों आहों, तर आमच्या प्रभूंच्यानें आमचें मन कसें मोडवेल बरें ! खरोखरच मोडणार नाहीं. कालिदासानें म्हटलें आहेः—'राजा प्रकृतिरंजनात्' 'राजा कोण तर जो प्रजेस रंजवील तो ! !' शिवाय बाटलाबाईंची पारमार्थिक दृष्ट्या तरी योग्यता लहान आहे काय ? छे छे, कोण म्हणेल ! प्रभू येशूची तर ती साक्षात् अर्धांगी होय. प्रभुभोजनांत या महातीर्थांवांचून तर कधीं चालायाचेंच नाहीं. ज्या प्रभुरुधिराच्या सेवनानें या पापी भूलोकाचें पातकक्षालन झालें त्याचेंच प्रतिनिधित्व ख्रिस्ती शास्त्राप्रमाणें मद्याकडे आहे, हें मत आमच्या कित्येक वाचकांस माहीत असेलच. खेरीज इकडच्या दृष्टीनें पाहिलें, तरी 'वेदार्थयत्न' कारांनीं सोमवल्लीचें व द्राक्षावल्लीचें अद्वैत कसें प्रतिपादन केलें आहे हेंही पुष्कळांस माहीत असेलच. तेव्हां या अशा जबरदस्त प्रमाणांपुढें बिचाऱ्या शुक्राचार्यांच्या निषेधाची आजकाल कोण मातब्बरी मानणार आहे ?

हा येथवर विनोदाचा प्रकार झाला. वस्तुतः पाहतां या द्वाड व्यसनापासून किती प्रकारचें नुकसान आहे हें जर मनांत आणलें, व मद्यपि हा किती कुचकामाचा मनुष्य होऊन जातो व केवळ पशूच्या योग्यतेस तो कांठवर पोंचतो, वगैरे गोष्टींचा जर क्षणभर विचार केला तर विनोदाकडे ज्याची प्रवृत्ति होईल असा मनुष्य फार विरळा. ज्या इंग्रज लोकांचें पाहून आमच्यांतल्या मूर्ख लोकांनीं ही छाकटेगिरी उचलली आहे, ते जर इंग्रजांची या योगानें इतर राष्ट्रांत किती बदछान आहे हें लक्षांत आणतील, व इंग्रजी भाषेंतल्याच कित्येक म्हणींकडे जर अंमळ लक्ष पुरवतील*, तर त्यांनीं उचललेली ही तऱ्हा किती बेवकुफीची आहे, हें त्यांच्या सुद्धां मनांत येऊन चुकेल, असें वाटतें. त्यांतून अलीकडे आम्हांस जो शक्तिक्षय व द्रव्यक्षय लागला आहे, त्यांतही वारुणी बाईनें कृपा केली म्हणजे मग कडेलोटच केला म्हणायाचा ! अगोदर आमचीं

---

* 'Bacchus has drowned more than Neptune' (**समुद्रांतल्यापेक्षां मद्यांत पुष्कळ बुडून मेले आहेत**); 'When wine is in; wit is out' [**दारू आंत आली कीं बुद्धि बाहेर जाते.**]

युनिवर्सिटीचीं बाळें म्हणजे कसले जंगी पहिलवान, की वाऱ्याशीं झुंजावयाचे ! गाढवाच्या ओझ्याचीं बुकें उराशीं बाळगून त्यांचें पीठ पाडतां पाडतां अगोदरच कंठाशीं प्राण येऊन पोंचलेले ! मग त्यांत ही बाटलाबाईंची गळ्यांत मिठी पडली म्हणजे आटपलाच कारखाना ! ! आमची मागली साधीभोळी मंडळी पन्नाशीला, साठीला सुद्धां दाद न देतां काळाशीं टक्कर देऊन राहत असे, आणि आतांची सुधारलेली संतति पाहावी तों विशी तिशीलाच त्यांची मजल थकून ज्ञानवृद्धतेमुळें जरेचीं चिन्हें त्यांजवर प्रगट व्हावयाला आरंभ होतो. तेव्हां ही एकंदर स्थिति किती शोचनीय आहे बरें !

प्रस्तुत विषयाचें समग्र विवेचन करूं गेल्यास एक स्वतंत्र ग्रंथच होणार आहे. पण येवढ्या विस्ताराची तूर्त जरूर नाहीं. प्रस्तुत प्रसंगीं हा अनुकरणाचा प्रकार किती निंद्य व हानिकारक आहे येवढेंच सांगावयाचें होतें, यास्तव वरील दिग्दर्शन बस आहे. शिवाय या दुर्व्यसनापासून काय काय परिणाम घडतात हें सर्वांस स्पष्ट दिसणारें असून त्यावर वर्तमानपत्रांतून अनेक वेळां चर्चाही झालेली आहे. यास्तव हें प्रकरण येथेंच संपवितों.

येवढावेळ अनुकरणाच्या दोन प्रकारांविषयीं निरूपण केलें. आतां एका तिसऱ्या प्रकाराविषयीं लिहितों.

हा प्रकार धर्मसंबंधीं अनुकरण होय. अलीकडे आमच्या देशांत ख्रिस्ती धर्माच्या योगानें किती चलबिचल झाली आहे हें सर्वांस माहीत आहेच. पुष्कळांची स्वधर्मावरील श्रद्धा उडाली आहे, कित्येक तर येशूच्या कळपांत जाऊन सार्माल झाले आहेत, कित्येक 'सब् झूट है' म्हणून निवळ नास्तिक बनले आहेत, कित्येक 'न हिंदुर्न यवनः' अशा अधल्या मधल्या स्थितींत अडकून राहिले आहेत, आणि कित्येक नवीन नवीन धर्मशाखा काढून त्यांस लोंबकळत राहिले आहेत. या सर्व तऱ्हा ख्रिस्ती धर्म व इंग्रजी विद्या यांचा इकडे प्रचार झाल्यापासून उत्पन्न झाल्या आहेत. यांपैकीं प्रस्तुत विषयांत अंतर्भाव म्हटला म्हणजे शेवटल्या प्रकाराचा होतो हें उघडच आहे. यास्तव त्याविषयीं थोडें निरूपण करूं.

ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, सत्यशोधक समाज, हे वस्तुतः पाहतां एकाच वस्तूचे पर्याय होत. बंगाल्यांतील बाबूंनीं जो सुधारलेला पंथ नवीन काढला तो ब्रह्मसमाज, मुंबईतील कांहीं प्रमुख मंडळीनें काढला तो प्रार्थनासमाज, आणि

येथील कांहीं शूद्र मंडळींनें काढला तो सत्यशोधक समाज. याप्रमाणें वरील तिहींस केवळ स्थलभेदेंकरून व पुरुषभेदेंकरून निरनिराळें नामाभिधान प्राप्त झालें आहे. बाकी मुळाशीं जातां साऱ्यांचीं मतें एकच आहेत. मुसलमानांचा धर्म ज्या देशांत प्रवृत्त झाला असतां जसे नवे धर्मभेद निर्माण झाले, तसाच चालू शतकांत ख्रिस्ती धर्माचा प्रभाव प्रगट होत आहे. शकि हे मूळचे हिंदु असून त्यांचा कल कुराणाकडे वळला, व उलटपक्षीं कबीरपंथी हे मूळचे मुसलमान असून हे रामोपासक बनले. ही चलबिचल जशी मागील काळांत झाली, त्याप्रमाणेंच सध्यांच्या शतकांत असा चमत्कारिक योग आला आहे कीं, हिंदु लोकांस आपल्या धर्माचा कंटाळा येऊन त्यांनीं ख्रिस्ती धर्माकडे धांव घेऊन वरील समाज काढले आहेत, आणि ख्रिस्ती मंडळीला बैबलाचा वीट येऊन ते हिंदुधर्मांत शिरूं पाहत आहेत. दोनतीन वर्षांपूर्वी 'थिओसोफिस्ट' पंथाची मंडळी अमेरिकेहून निघून मुंबईस येऊन दाखल झाली, व ख्रिस्तस्वामीस झुगारून देऊन त्यांनीं दयानंदस्वामींच्या चरणसरोजीं आपला माथा ठेविला, ही अजब गोष्ट आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस अवगत असेलच ! एकंदरींत पाहतां चालू शतकाचा महिमा असा दिसतो कीं, ज्याचा धर्म त्यास नकोसा झाला आहे; इतरांच्या धर्माची काय काय मौज आहे ती अनुभवायाची लहर पुष्कळांच्या ठायीं आढळते. त्यांतून कित्येक बहादर तर असेही आमच्यांत आहेत कीं, त्यांचा धर्म आणि सरड्याचा रंग हीं एक;—म्हणजे सरडा जसा घटकेंत तांबडा, घटकेंत पांढरा, आणि घटकेंत हिरवा; त्याप्रमाणेंच वरील तत्त्वजिज्ञासु हे प्रार्थनामंदिरांत पाहिले तर प्रार्थनामंदिरांत आहेत, येशूच्या मठींत पाहिले तर तेथेंही सर्मन् ऐकतातच आहेत, मुल्लासाहेब भेटले तर त्यांच्याबरोबर नमाज पढायालाही तयारच, व इकडे वेदमूर्तींची सभा पहावी तों तींतही शालजोडी परिधान करून आपले अधिष्ठित आहेतच ! अशांच्या धर्मांची मीमांसा करतांना बिचारा जैमिनिही हात टेकील असें वाटतें ! !

तेव्हां अशा प्रकारची सध्यां आमची धर्मप्रकरणीं हालहवाल आहे. हिजविषयीं तूर्त आम्हांस कांहीं विचार कर्तव्य नाहीं. वरील समाजांचीं मतें कोणत्या तऱ्हेचीं आहेत, व त्यांत सत्याचा किंवा समजसत्तेचा कितपत अंश आहे, याविषयीं येथें विवेचन करणें नलगे. तूर्त येवढेंच बस आहे कीं, या समाजवाल्यांनीं अनुकरणाचा प्रकार कितपत स्वीकारला आहे, व त्याच्या योगानें त्यांच्या कार्यास कितपत साह्य होतें.

प्रार्थनासमाज हा पंथ आपणास हिंदुधर्माहून अत्यंत भिन्न म्हणवतो, यास्तव त्याच्या मंदिराचा घाट आमच्या देवळासारखा नाहीं; शिवाय त्याचें व्यासपीठ, त्याची उपदेशपद्धति, त्याचें धर्मपुस्तक वगैरे सर्व गोष्टींत निराळीच तऱ्हा दृष्टीस पडते. यासंबंधानें आमचें कांहीं म्हणणें नाहीं. वरील प्रकारांत एकंदरींत पाहतां हिंदुधर्मापेक्षां ख्रिस्ती धर्माकडेच सदरील पंथाचा अधिक ओढा दिसतो, हें उघड आहे; पण ज्याअर्थीं वरील परधर्मापासूनच सदरील मंडळीस मूळ स्फूर्ति प्राप्त झाली आहे, त्याअर्थीं तसा कल असणें हें साहजिकच आहे. तसेंच ख्रिस्ती धर्मांतला पवित्र दिवस जो आदितवार तोच प्रस्तुत भक्तजनांनीं पतकरला आहे, याबद्दलही त्यांस अशी सवड आहे कीं, हा दिवस मोकळा असल्यामुळें विशेष सोईचा झालेला आहे. यास्तव या अनुकरणाच्या संबंधानेंही आम्ही त्यांस नांव ठेवीत नाहीं. पण याखेरीज एकदोन गोष्टी ज्या सदरील धर्मपंथांत आढळतात, त्यांची आम्हांस येवढी मोठी अवश्यकता वाटत नाहीं; तर केवळ अनुकरणेच्छेचींच तीं फळें होत असें दिसतें. हे अनुकरणाचे प्रकार येणेंप्रमाणेंः—

पहिला प्रकार गाणेंबजावणें. दरएक समाजांत गवई ठेवलेला असून तो भक्तमंडळीच्या संगीतास साह्य करीत असतो. त्यानें 'प्रार्थना संगीतां'तलीं पद्यें तालसुरावर बसवून प्रथमतः म्हणण्यास आरंभ करावा, आणि नंतर साऱ्या सामाजिकांनीं त्याच्या मागून सूर ओढीत असावें, ही पद्धति चोहींकडे चालू आहे. आतां हा प्रकार ख्रिस्ती देवळांतून जी तऱ्हा आढळते तिचेंच केवळ अनुकरण होय हें कोणासही सहृद्दर्शनीं सुद्धां भासणारें आहे. गाणेंबजावणें हें श्रवणेंद्रियास अत्यंत तोषकर असल्यामुळें आमच्या जुन्या धर्मांतसुद्धां त्याचें साहाय्य कीर्तनप्रसंगीं घेतात हें खरें; पण नुसत्या साध्या उपासनेच्या वेळींही तालसुराची काय गरज आहे हें आम्हांस कळत नाहीं. ब्राह्मणानें संध्या तालसुरांत केली, किंवा मुसलमानानें नमाज तालसुरांत म्हटला तर किती विलक्षण प्रकार होईल ! त्यांतून गायाचेंच, तर मुख्य उपदशकानें किंवा गवयानेंच तेवढें गाइलें असतां बस नाहीं काय ? साऱ्या मंडळीनें मागून हेल ओढावे, आणि कोणाचा मंजुळ स्वर तर कोणाचा भसाडा आवाज, अशी सळभिसळ होऊन अठरा धान्यांचें कोडबोळें वर ' आकाशांतील बापा ' कडे जावें, यांत समाजवाल्या मंडळीस काय मौज वाटत असेल ती असो !

दुसरा प्रकार खीजनाचा. आमचे सुधारलेले भक्तजन हे केवळ स्वतःच जुन्या धर्मांस कंटाळलेले आहेत असें नाहीं; तर त्यांतून सहकुटुंब सहपरिवार

आपली मुक्ति व्हावी अशी त्यांतील पुष्कळांची इच्छा दिसते. यास्तव उपासनेच्या दिवशीं प्रार्थनामंदिरांत जें जावयाचें तें शानदार पोषाक करून, लेडीला हातीं धरून, अशा थाटानें जावयाचें! हाही केवळ अनुकरणाचा प्रकार असून अनावश्यक असल्यामुळें आम्हांस अत्यंत दूषणीय वाटतो. आमच्या सामाजिकांस मोठमोठे ग्रंथ वाचल्यानें उपरति होऊन खऱ्या प्रभूच्या नांवानें डोळे मिटण्याची खराखर अंतःकरणापासून प्रेरणा झाली असेल हें आम्हांस कबूल आहे; कां कीं तो प्रकार संभवदुक्तिक तरी आहे. पण नवऱ्यावर 'पवित्र आत्म्या'नें झडप घातली म्हणजे नवऱ्याबरोबर बायकोच्या अंतःकरणांतही तितकें तत्त्वज्ञान उतरलेंच असें समजलें पाहिजे काय? कोण जाणें बोवा, इंग्रजींत बायकोस partner (भागीदार) म्हणतात, किंबहुना better-half (अर्धाधिक अंश) म्हणतात, तेव्हां नवऱ्याच्या हातास हात लागल्यानें नवऱ्याच्या विद्वत्तेंतला अर्धा किंवा अधिकही भाग 'अर्धांगी' चे ठायीं उतरत नसेल कशावरून? रसायनशास्त्रांत good conductor (संक्रामक) आणि bad conductor (असंक्रामक) असा एक भेद सांगितला आहे, तेव्हां ब्रह्मदेवानें स्त्रीजातींत तसाच कांहीं चमत्कार ठेवला नसेल कशावरून? तेव्हां धर्मस्फूर्तीच्या संक्रमणधर्माविषयीं आम्ही अनभिज्ञ असल्यामुळें, त्याजविषयी आम्ही कांहीं बोलत नाहीं. तरी लोकव्यवहारदृष्ट्या पाहतां आम्हांस इतकेंच नवल वाटतें कीं, जरी सद्धर्माकडे आमच्या देशभगिनींची मनोदेवता वाहत असली, तरी त्या स्फूर्तीचा नट्यापट्याशीं कांहीं संबंध दिसत नाहीं. 'पवित्र आत्मा' खोप्यांतील गजऱ्यावर मोठा फिदा होतो काय?

असो; आतां सरतेशेवटीं प्रकृत विषयाच्या संबंधानें एक घडलेला प्रकार एथें दाखल करून आटपतें घेतों. मुंबईत प्रथमतः वरील समाजाची जेव्हां स्थापना झाली, तेव्हां उपासनेच्या वेळेस स्त्रीजनांनीं माडीवरील सज्जा सुशोभित करावयाचा असा मंडळीनें प्रघात सुरू केला. स्त्रीजनांच्या कंठांत विधात्यानेंच माधुर्य हा धर्म ठेविला आहे, तेव्हां वरील प्रसंगीं तो धर्म धर्मोन्नतीच्या कामीं फार उपयोगी पडूं लागला. समाजांत उपासकांची दिवसेंदिवस गर्दी होऊं लागली. प्रथमतः या गर्दीची योग्य मीमांसा भोळ्या भक्तजनांस झाली नाहीं असें दिसतें. बलरामाच्या संबंधानें जसें मोरोपंतानें म्हटलें आहे, कीं—

मथि कामशर जया त्या राम म्हणे साधु मोक्षसत्पथिका।

तसाच कांहीं प्रकार वरील प्रसंगीं झाला असावा असें वाटतें; किंवा सामा-

जिकांनीं कदाचित् असाही विचार मनांत आणला असेल, कीं खिस्ती देवळांतून सुद्धां पुष्कळ लोक कर्णेंद्रियाची व चक्षुरिंद्रियाची तृप्ति करायाला जात नाहींत काय ? मग येथें तसा जरी प्रकार कदाचित् असला तरी काय हरकत आहे ? पण पुढें पुढें जेव्हां देवळांत रिकामी दाटी फारच व्हावयाला लागली, तेव्हां त्या दाटीचें कारण त्यांनीं मोडून टाकलें. या हकीकतीवरून केवळ अनुकरणाच्या प्रकारापासून काय परिणाम होतात हें आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच !*

येथपर्यंत अनुकरणाच्या दूषणयि प्रकारांविषयीं लिहिलें. आतां पाश्चात्यांपासून आम्हीं ज्या अनेक गोष्टी घेण्यासारख्या आहेत, व ज्यांपासून वरील प्रवृत्तिही आम्हांस हितावह होण्यासारखी आहे, त्या सांगतों.

पाश्चात्य लोकांपासून, आणि त्यांतून विशेषतः इंग्रजलोकांपासून, कित्ता घेण्यासारखी सर्वांत मोठी गोष्ट म्हटली म्हणजे व्यवस्थितपणा ही होय. या लोकांचें इकडे जें प्रभुत्व स्थापित झालें, व ते आम्हांस अजेय होऊन त्यांचा थोडयाच काळांत इकडे जो पगडा झाला, हें सर्व कार्य वरील एका गुणाचें होय असें म्हणायास हरकत नाहीं. बाकी आमचे लोक त्यांच्याशीं थोडे झगडले असें नाहीं. व आमच्यांत मर्दुमकीच्या संबंधानें कांहीं उणेपणा होता असेंही नाहीं; कित्येक वेळां तर यशवंतराव, हैदर वगैरे मंडळीनें त्यांस अगदीं जेरीस आणून सोडलें होतें हें इतिहासांत प्रसिद्धच आहे. पण यांची व्यवस्था कांहीं लोकोत्तर; तिच्यापुढें आमचे लोक अगदीं चीत होऊन गेले ! अजून तरी वसि कोटी लोकांवर येवढ्याशा थोडया मंडळीचा जो अंमल चालू आहे, आणि तो पुनः असा कीं येवढ्या अवाढव्य देशांत कोण कोठें हूं कां चूं करील ! हा सारा प्रभाव कशाचा बरें ? एका व्यवस्थितपणाचा, दुसरें कांहीं नाहीं. इंग्रज लोकांचें कोणत्याही गोष्टींत वर्तन पहा,—राज्यकारभार, व्यापार, सामान्य व्यवहार,—चोहींकडे जसा काय घडयाळाचा ठोका ! अमक्या अमक्या वेळेस अमकें अमकें काम व्हावयाचें, म्हणजे त्या वेळेस तें झालेंच म्हणून समजावें, त्यांत कधीं अंतर पडा-

---

* या निबंधाविषयीं **केसरींत** व **सुबोधपत्रिकेंत** त्यावेळेस पुष्कळ चर्चा झाली होती. 'निवडक निबंधांत' हा निबंध विषयपूर्ततेकरितां घेतला आहे, हें येथें वाचकांचा गैरसमज न होण्यासाठीं सांगणें जरूर आहे.

याचें नाहीं ! सृष्टीचे व्यापार जसे आज अनादिसिद्ध सुयंत्रपणें चालले आहेत, तोच प्रकार आमच्या राज्यकर्त्यांचा होय असें म्हणायास हरकत नाहीं !

आतां तिकडून आमच्या मंडळीकडे जों वळावें तों सगळा प्रकार बहुतेक उलटा आढळतो. मोठमोठ्या संस्थानांतील कारभारापासून तों साधारण जेवणाच्या कामापर्यंत सारा एक प्रकार; तो काय ! तर सुस्ती, अंदाधुंदी, अलगरजीपणा, कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं ! हा सर्व गैदीपणा आमच्या इतका अंगवळणीं पडून गेला आहे कीं, त्याचें दोषरूपत्वही आम्हांस भासेनासें झालें आहे. जुन्या लोकांच्या तोंडून मराठी दरबाराची किंवा मोंगलाईची तारीफ कधीं कधीं ऐकूं येते, ती काय ?—तर ' अंदाधुंद कारभार !' ' अलीजाही कारखाना ! ' ही अलीजाही आम्हांस पुरती भोंवून तिनें अगदीं अन्नास मोताद करून टाकलें असतांही, अद्याप आमचे डोळे उघडले आहेत असें नाही. आमचा श्रीमंतीचा धूर व बाच्छाई खाका अजून आहे तो आहेच !

असो. आतां एकदोन गोष्टींचीं उदाहरणें घेऊन व्यवस्थितपणाच्या संबंधानें आमच्यांत व इंग्रजलोकांत कितीसें अंतर आहे तें दाखवितों.

पहिली गोष्ट लौकिककृत्यें. लौकिककृत्यें म्हणजे सार्वजनिक कल्याणार्थ उभारलेलीं सभादिक कार्यें. यांची व्यवस्था सामान्यतः कोणत्या प्रकारची आढळते, याविषयीं पूर्वी आम्हीं सविस्तर विवेचन केलेलेंच आहे. हल्लीं त्यांच्यासंबंधानें लोकांचा नियमितपणा कितपत आढळतो हें सांगतों. कोणतेंही कार्य म्हटलें म्हणजे तें झटल्याशिवाय सिद्धीस जात नसतें हें उघडच आहे; याविषयीं कोणाच्या मनांत संदेह असेल असें नाहीं. पण हा झटण्याचा प्रकार आमच्या मंडळींत इतक्या तऱ्हेचा आढळतो कीं, सभेला नियमित वेळीं येण्यापासूनच अगोदर रड ! पांचपन्नास मंडळीस चार वाजतां येण्याविषयीं जर आमंत्रणपत्रिका गेल्या, तर साडेचाराला पांचसात मंडळी जुळलेली आढळली तर भाग्याची ! निंमेंशिंमें मंडळी तर मुळींच यावयाची नाहीं, आणि त्यांतली निंमेंशिंमें सरासरी काम आटपण्याच्या बेताला आली तर आली ! मुळीं आवाहनापासूनच जर इतकी व्यवस्था, तर नेमलेलें काम वेळच्या वेळीं करायाचें, मनापासून झटून करायाचें वगैरे गोष्टी तर कोठच्या दूरच्या हें सांगावयाला नकोच ! आमच्या मंडळ्यांपैकीं कित्येकांतून असा प्रकार आढळण्यांत येतो, व आलाही आहे कीं, एखादा चांगला व्यवस्थित व मेहनती मनुष्य आला, तर ह्याच्या अमदानीपर्यंत कारभार बरा चालतो, पण तो गेला

कीं आटपलें ! याचें कारण स्पष्टच आहे, कीं ' भांगेंत तुळस ' या न्यायानें आमच्यांत एखादा जर उद्योगी मनुष्य निपजला, तर त्याचें कर्तृत्व त्याच्याबरोबर जातें; इतर मंडळींचा जन्मसिद्ध गुण कधीं पालटायाचा नाहीं.

दुसरी गोष्ट जेवणाची घ्या. या संबंधाचा अनुभव दरवर्षीचा सर्वांस आहेच. बोलावणेकऱ्याला ताकीद, कीं दहावाजतांचें सर्वांस आमंत्रण कर; मंडळी नेहेमींची घटलेलीच, तिनें मुळींच घरून बारा वाजतां किंवा एक वाजतां बाहेर पडायाचें; मग तेथें गेल्यावर चार घटका भोजनप्रतीक्षा झाल्यावर उपरांतिक अन्नाचा लाभ व्हावयाचा. त्यांतून एकादे बडे गृहस्थ यावयाचे असले, किंवा कांहीं मानपानाची मंडळी यावयाची असली, म्हणजे तर कांहीं विचारूंच नये. मग बुभुक्षु मंडळीनें बिछाइतीवर एकेक झोंप काढून घ्यावी हा उत्तम मार्ग ! आणि या मार्गास कित्येक अनुसरतातही ! कां कीं आमच्यांत आढ्यतेचें व श्रीमंतीचें विशेष कलम कोणतें, कीं निदान दोन बोलावणीं तरी घेतल्याखेरीज जागचें हालूंच नये. आणि त्यांतून ही बाच्छाई मिजास म्हणजे कोणती, कीं दोन बोलावणीं परत लावून तिसऱ्या खेपेला सांगायाचें कीं कोणी येत नाहीं ! ! खरोखरी पहातां, हा केवळ मूर्खपणा नव्हे बरें ? ज्या बेट्यांना वेळेची किंमत कळत नाहीं, आपल्या एकट्याकरतां शेकडों मंडळीस विनाकारण ताटकळत ठेवण्याची शरम वाटत नाहीं व पोरकटपणाची आढ्यता मिरवून आपलें हंसें करून घेतल्याचीही ज्यांस पर्वा नाहीं, त्यांस काय म्हणावें ? असो. परमेश्वर करो आणि असल्या जडशिरोमणींच्या डोक्यांत थोडी तरी समजूत शिरो, या प्रार्थनेखेरीज आम्हांस दुसरा कांहीं भाग दिसत नाहीं.

युरोपियन लोकांचे या संबंधानें रिवाज किती उत्तम आहेत ! निमंत्रण व्हावयाचें तें नुसत्या एका चिठ्ठींत; पांच वाजतांचें बोलावणें असलें तर पावणेपांच पावेतों कोणाला कांहीं गडबड सुद्धां दिसायाची नाहीं. पांचाच्या ठोक्याला पहावें तों तमाम मंडळी हजर. कोणास यावयाचें नसलें, कीं त्याची माफीची चिठ्ठी हजर व्हावयाची ! या उत्तम व्यवस्थेमुळें सर्वांस किती सोईकर होतें ! हीच गोष्ट सभादिकांची. फार करून पांचमिनिटेंही त्यांचीं कधीं आगेंमागें व्हावयाचीं नाहींत. सारें काम एकाद्या यंत्राप्रमाणें चालायचें ! पहा आमचें यंत्र एकदां कधीं काळीं बिघडलें आहे तें आज मित्तीपर्यंत ! तें परमेश्वरसत्तेनें कधीं ताळ्यावर येईल तें येवो; येईल तो सुदिन इतकें खरें ?

इंग्रज लोकांपासून कित्ता घेण्यासारखी दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे साहस होय. हा गुण ज्या मानानें राष्ट्रांत आढळतो त्या मानानेंच त्याचा उत्कर्ष किंवा अपकर्ष सामान्यतः आढळतो. शरीराचें चालक जसें मन, त्याप्रमाणेंच मनाचें चालक साहस हें होय. साहसजन्य उत्साह ज्याच्या मनाला नाहीं तो केवढाही बुद्धिमान् असला, तरी सुस्तींत पडलेल्या अजगराप्रमाणें किंवा मेलेल्या हत्तीसारखाच तो होय. त्याचा मोठेपणा म्हणजे अवजडपणा; त्यापासून उपयोग म्हणून कांहीं नाहीं.

इंग्रज लोक केवढे साहसप्रिय आहेत हें येथें सविस्तर सांगायला पाहिजे असें नाहीं. त्यांच्या उलाढालीपासून व उपद्व्यापापासून कांहीं राहिलें असें या जगांत आहे काय ? विजयी नॉर्मन लोक आणि पराधीन झालेले साक्सन लोक यांची सळमिसळ होऊन त्यांचा एकवटपणा जेव्हांपासून झाला, व इंग्लिश हें दोघांचें सामान्य अभिधान जेव्हांपासून प्रवृत्त झालें, तेव्हांपासून या राष्ट्राची जी चळवळ सुरू झाली ती या घटकेपर्यंत चालत आहे ! स्कॉटलंड, वेल्स, ऐर्लंड, फ्रान्स, पालिस्टाइन, येथपर्यंत त्याचा शस्त्रप्रभाव गाजला; पुढें आपल्या राजाशीं त्यांनीं कटकट करून दोघां असार्मीस चीत करून टाकलें, व आणतां आणतां राजसत्ता अगदीं संपुष्टांत आणून सोडली; एक मंडळी पाश्चिम दिशेकडे वाहवली, तों तिनें तिकडे टोलेजंग वसाहती उठवल्या, व त्यांचें आलीकडे एक बलाढ्य राष्ट्र वसवून दिलें; दुसरी मंडळी पूर्व देशांकडे वळली तों तेथेंही तिनें दिगंत कीर्ति जोडून अश्रुतपूर्व असा राज्यव्यूह रचला; बाकीच्या जगांत तरी या प्रतापी मंडळीचा सुळ-सुळाट म्हणजे चुकला आहे असें कांहीं नाहीं. कोणी जहाजांत बसून ध्रुवाकडच्या हिममय प्रदेशांत थंडीनें व भुकेनें मरायाला जातातच आहेत; कोणी आफ्रिकेच्या मध्य भागांत मुशाफरी करायला निघाले आहेत; कोणी विमानांत बसून मेघमंडलास भेदून वर चालले आहेत; कोणी भूमध्य व तांबडा समुद्र यांचा प्रीतिसंगम करून देण्याच्या घाटांत आहेत; कोणी भरतखंडास लोहशृंखलेनें जखडण्याच्या खटपटींत आहेत; कोणी अटलांटिक महासागराच्या खालून 'नवीन जगां'त दाखल होण्यासारखें अपरंपार विवर निर्माण करण्याची वाटाघाट करीत आहेत;—याप्रमाणें आमच्या राज्यकर्त्यांचा उपद्व्याप सारखा चालू आहे; त्यास खळ म्हणून नाहीं ! राजकारण, युद्धकर्म, व्यापार, विद्या, कला, मुशाफरी,—कांहींही घ्या; कोठें म्हणजे या लोकांची यत्किंचितही कसूर आहे असें कांहीं नाहीं. यामुळें ते या युगाचे जणूं काय विश्वकर्मेच होऊन बसले आहेत; व आजपर्यंत होऊन गेलेल्या महा-विख्यात राष्ट्रांसही त्यांनीं दिपवून टाकलें असें म्हणायास हरकत नाहीं !

आतां वरील अमोलिक गुण आमच्या येथें कितपतसा दृष्टीस पडतो हें पाहूं. आरंभीं दाखल केलेल्या सिद्धांताप्रमाणें आमच्या सध्यांच्या स्थितीवरून पाहतां तो येथें कितपतसा वास करीत असावा याचें प्रमाण सहज निघणार आहे. हें प्रमाण अर्थात् हेंच कीं, जसा उत्कर्षाच्या संबंधानें या राष्ट्रांत अभाव दृष्टीस पडतो, तसाच त्याचें कारण जें साहस त्याच्या संबंधानेंही तो आढळतो. दीर्घकालीनं परवशतेमुळें म्हणा, अगर आमच्या दुर्दैवानें म्हणा, हल्लीं तर अशी स्थिति येऊन पोंचली आहे कीं, कोणत्याही कामांत साहसाचें म्हणून नांवही आम्हांस माहीत नाहींसें झालें आहे. आमचेंच घर आम्हांस पारखें होऊन 'खाजाविलें जेंवि आपुलें घोडें' * या पंतवचनाची सार्थकता आमचे ठायीं पूर्णपणें दिसून येत चालली आहे इतकेंच नव्हे; तर परकी लोकांनीं आमच्या तोंडांत मारून आमचे व्यापार बसवले, आमच्या कला नाहींशा केल्या, सुईदोऱ्यापासून तों मोठ्या उंची सणंगापर्यंत आम्हांस खुळ्यांप्रमाणें आपल्या तोंडाकडे बघायाला लावलें, तरी आम्हांस त्याची बिलकुल शरम वाटेनाशी झाली आहे! ज्या हिंदुस्थानच्या व्यापारावर केवळ परंपरेच्या संबंधानें आलेक्झांड्रिया व व्हेनिस हीं शहरें एकदम भरारलीं, आणि तो धागा फिरंगी लोकांनीं तोडून टाकतांच एकदम खचूनही गेलीं, त्यांची आज तीन चार शतकांत काय दशा होऊन गेली आहे पहा! कामधेनूसच जसा गवताचा चारा दुर्लभ व्हावा, किंवा अन्नछत्रवाल्यांस जसा चौपदरीचा योग यावा, त्याप्रमाणें या भरतभूमिवासी जडभरतांची आजला हालहवाल होऊन गेली आहे. तुमचीं धोतरें फाटलीं काय? मांजरपाठी धागा आणा. तुमची चूल अडली काय? आगकाडीची पेटी आणा आणि अग्नि सिद्ध करा. एखादा झुरका जास्ती होऊन तुम्ही बटारांत पडलां आहां काय? विलायती 'मेकर'ची मेणबत्ती काढा, तुम्हांला रक्तशुद्धि करवणें आहे काय? हालोवेला किंवा मरे आणि लान्मन् यांना बोलावा. तुम्हांला संहिता पढायाची आहे काय? भट्ट मोक्षमूलर यांचा गाथा आणवा. तुम्हांला मराठी किंवा संस्कृत शब्द अडला आहे काय? मोलस्वर्थ किंवा मॉनियर वुइलियम्स यांनीं निर्मिलेलीं सरस्वतीभांडारें काढा. याप्रमाणें आम्ही होतां होतां निवळ आयदोजी होऊन बसलों आहों. आमच्या ढुंगणचें वस्त्र सोडून नेलें, व चामड्याचाही चट्टा निघण्याची वेळ आली, तरी आमची आम्हांला शुद्ध नाहीं! नुसत्या अल्पस्वल्पे

---

* 'गदापर्वा'त पुढील अभिमानोक्ति धुळींत पडलेल्या दुर्योधनाच्या भाषणांत आहे:—होऊनि पराजित परप्रेष्य न मी जाहलों न हें थोडें। अरिहतपदोपजीवन खाजाविलें जेंवि आपुलें घोडें॥

जिनसांच्या व्यापाराची वरच्यासारखी रड, मग याहून धाडसाच्या कृत्यांविषयीं तर बोलावयासही नको. हल्लींच्या सत्ययुगांत आम्हांस दारूगोळा दृष्टीस पडावयाचा म्हटला म्हणजे दिवाळींत, व आमचीं शस्त्रास्त्रें म्हटलीं म्हणजे आफिसांतली चाकू-कात्री! ज्या महाराष्ट्र देशांतले वीर साऱ्या हिंदुस्थानास पुरून उरत असत, त्यांच्यांत आज इतकी वीरश्री उरली आहे कीं एकदोनजण इंग्रजी पलटणींत शिरून अफगाणिस्थानच्या मोहिमेंत गेले तों चोहोंकडे हाहाकार व आश्चर्य झालें. एका फडक्यानें हातचें पेन टाकून देऊन तरवार घेतली तों मोठा उत्पात झालासा सर्वांस वाटला! इतर देशांत जी नेहमींची आंगवळणांतली गोष्ट ती आमच्या देशांत धुमकेतूप्रमाणें किंवा धरणीकंपाप्रमाणें मोठी अपूर्व वाटूं लागली आहे. फार दूर कशाला? ज्या आमच्या पुणें शहरचे पट्टे गेल्या शतकांत साऱ्या हिंदुस्थानभर हुतूतू घालीत होते, त्यांत आज शिळोप्याच्या वेळीं दोन रामटोले मारावयालाही कोणी न मिळून बिचारें 'क्रीडाभुवन' इंद्रभुवनाच्या भेटीस जाण्याच्या लागांत आहे; आणि जेथली मंडळी 'पानपतच्या वारू'वर स्वार होऊन 'चौमुलखांत धौशा वाजवून' माघारी येत होती, तेथें आतां मर्दुमकी कोठें राहिली आहे, तर जातीनें घोडयाची रेन धरून सारथ्यकर्म बजावण्यांत!!

तेव्हां एकंदरींत पाहतां साहसाचा आमच्या देशांत अगदींच ऱ्हास होऊन गेला आहे यांत संशय नाहीं. जिकडे तिकडे आपलपोटेपणा व कमकुवतपणा माजल्यामुळें कोणतीही गोष्ट म्हणजे आम्ही आपल्या हिमतीवर करूं असा प्रकार आमच्यांत मुळींच राहिला नाहीं. अगोदर कोणाचा कोणाला विश्वास नाहीं, कोणी कोणाचें ऐकायाचा नाहीं, जो तो दुढ्ढाचार्यपणा मिरवूं पाहणार, यत्किंचित् लाभ होण्याचा सुमार दिसूं लागला न लागला तों लठ्ठालठ्ठी सुरू व्हावयाची, ही सर्व तयारी आमच्या घरीं भरपूर असल्यामुळें जरी कोणाला एखाद्या कार्या-विषयीं स्फूर्ति झाली तरी ती लवकरच लयाला जाते. शेंकडों बुद्बुदप्राय उद्योग आजपर्यंत उभारून क्षणभरानें नाहींसे झाले आहेत ते वरील गुणांमुळेंच! सर्वांस जर एखाद्या गोष्टीविषयीं उत्साह आहे आणि सर्व मनापासून झटताहेत तर गोष्ट सिद्ध होणार नाही हें सहसा घडायाचें नाहीं. तर ज्या आमच्या फांकड्या मंड-ळींनें नुसत्या साहेबी विजारी व साहेबी बूट तेवढे बाह्य ढंग पतकरले आहेत, ते जर त्यांजबरोबर पाश्चात्यांच्या आवेशाचें व साहसाचेंही अनुकरण करूं लागतील तर फार बरें होईल. पण ही गोष्ट केवढी दुरापास्त आहे! कोणी कवि म्हणतोः—

आबद्धकृत्रिमसटाजटिलांसभित्तीरारोपितो मृगपतेः पदवीं यदि श्वा ।
मत्तेभकुंभतटपाटनलंपटस्य नादं करिष्यति कथं हरिणाधिपस्य ॥*

वर इंग्रजलोकांच्या साहसगुणाच्या संबंधानें किंचित् दिग्दर्शन केलें. आतां त्यांच्या जात्यभिमानाच्या संबंधानें थोडें लिहितों. कोणत्याही राष्ट्रास नीच स्थितीपासून उच्च स्थितीस येण्यास जे गुण अवश्य आहेत, त्यांपैकीं जात्याभिमान हा एक होय. ज्या पेशाच्या लोकांत हा गुण चांगलासा वसत नसेल त्यांच्यापासून मोठेपणाचीं कामें होण्याचा संशय आहे. ज्याप्रमाणें कर्पासतंतु निरनिराळ्या मौक्तिकफलांत प्रवेश करून त्यांचा एक हार बनवून सोडितो त्याप्रमाणें जात्यभिमानबंध एक जातीच्या अनंत व्यक्तींस एकत्र बद्ध करून टाकितो. हा अभिमानाग्नि लोकांच्या अंतःकरणांत प्रज्वलित झाला, म्हणजे त्यापुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं. एखाद्या वेळेस हा विकोपास गेला तर त्याच्यापासून फार वाईट परिणाम होतात, हें आम्ही कबूल करितों. परंतु बाह्य जगांत अशी कोणती वस्तु आहे, किंवा अंतःकरणांत असा कोणचा मनोविकार आहे कीं, ज्याचा दुरुपयोग केला असतां तो घातुक होणार नाहीं ! बचनागसोमलादि मी मी म्हणविणारीं विषारी औषधें सदुपयोग केला असतां गुणकारी होतात, व संजीवनी, सुवर्णमालिनी, किंवा मौक्तिकरस—यांसारखीं टोलेजंग रामबाण औषधें सुद्धां अज्ञानामुळें व दुरुपयोगामुळें प्राणहारक होतात, ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. तथापि कोणत्याही मनोवृत्तीस किंवा बाह्यवस्तूस चांगलीवाईट म्हणायाचें, तें तिच्या सामान्य स्वरूपावरून होय. मदमत्त झालेल्या द्विपेन्द्रनाथानें एखादे वेळीं कचित् प्राणनाश केला, म्हणून ज्याप्रमाणें ऐरावती लक्ष्मीचा अनादर करावयाचा नाहीं, त्याप्रमाणें कांहीं प्रसंगीं प्रमत्त झालेल्या जात्यभिमानापासून जरी घोर अनर्थ घडतात, तरी त्यासाठीं या अनुपमेय गुणाचा तिटकारा करावयाचा नाहीं. जात्यभिमानापासून वाईट परिणाम होण्यास कधीं कधीं धर्माभिमानाशीं त्याची गट्टी कारण होते. हे दोघे बंधु स्वभावरीत्या एकत्र झाले म्हणजे जगास भारी होतात. या दोघांत मागून निर्दोशिलेल्याची प्रकृति विशेष तऱ्हेवाईक, लहरी आणि जलाल आहे. या वडील बंधूनीं एखादे वेळेस उग्ररूप धारण केलें म्हणजे छोटे बंधु

---

* " बांधोनि कृत्रिम जटा भरि मान सारी । झाला जरी शुनक सिंहपदाधिकारी ॥
मत्तेभगंडतटभेदनपंडिताची । तो गर्जना कशि करील मृगाधिपाची ॥

त्यांच्यापुढें " हूं चूं " करीत नाहींत; ते त्यांच्या प्रकृतिप्रवृत्त्यनुरूप आचरण ठेवितात. असो; हा जात्यभिमानाचा गुण इंग्रज लोकांत पूर्वीपासून पूर्णपणें वसत आहे. साक्सन लोकांच्या अंगीं जात्यभिमानाचा खरा पीळ नसता तर नॉर्मन लोकांनीं त्यांस दहापांच वर्षांत चीत करून टाकिलें असतें. नार्मन लोकांनीं जंग जंग पछाडलें, पण त्या रंगदार द्वीपस्थांनीं आपलेपणा हा गुण कधीं सोडिला नाहीं. कित्येक वर्षेंपर्यंत नार्मन लोकांनीं त्यांच्यावर हवा तसा कहर करून सोडिला, पण त्या निश्चयी लोकांनीं परिणामीं नार्मन लोकांची नांगी उतरली इतकेंच नाहीं, तर तिसऱ्या एडवर्डच्या अमलांत आपली भाषा, आपल्या चालीरीति, आणि आपला धर्म, यांची दीक्षा देऊन शेवटीं त्यांस आत्मस्वरूप करून टाकिलें ! प्रस्तुत गुण इंग्रजलोकांचे ठायीं आहे इतका नसता तर या अनेक धर्मवर्णोपित अफाट आर्यभूमीचें राज्य त्यांच्या हातून कधींच झालें नसतें. या सर्व देशभर लाखों इंग्रज पसरले आहेत, पण प्रसंग पडला तर सगळे कसे एकाच आईच्या उदरांतून आलेले सख्ये भाऊ ! अशा प्रकारचें प्रेम जोंपर्यंत यांच्यांत राहील, तोंपर्यंत शेंकडों वासुदेव बळवंत पाताळांतून वर आले, किंवा आकाशांतून उतरले तरी त्यांच्यानें यांच्या एका रोमाला धक्का बसणार नाहीं, अशी आमची पक्की खात्री आहे. दोन हजार कोसांवर आपला देश सोडून देऊन एकच हेतूनें येथें येणाऱ्या इंग्लंडपुत्रांत परस्परांविषयीं सख्ख्या भावंडाप्रमाणें प्रीति नसती, अथवा हरएक प्रसंगीं ते एकमेकांस पाठबळ न देते, तर त्यांची येथें कधींच नाचक्की झाली असती, व वजन केव्हांच उडालें असतें. आपल्या राजकर्त्यांनीं या देशांत या जात्यभिमानामुळें आपल्या जातीच्या वजनाचें (Prestige) केवढें थोतांड माजविलें आहे ! त्यांच्यासाठीं निराळे कायदे ! त्यांच्यासाठीं हिंदु लोकांपासून एकीकडे कंपूंत राहण्यासाठीं बंगले ! एखाद्या दिवाणी किंवा फौजदारी खटल्यांत या श्रेष्ठ जातीचा कोणी सांपडला तर त्याची चौकशी नेटिव्हाकडून होणें उपयोगी नाहीं ! कोणी रंगेल्या गडयानें बाटलाबाईच्या नादांत किंवा कधीं कधीं जाणूनबुजून सुद्धां नेटिव्हाचा खून पाडला तरी त्याच्यावर पांघरूण घालण्यासाठीं सर्वांची कोण धूम तारंबळ ! नाहीं तर आम्ही तरी ! एकाचें तोंड पूर्वेकडे तर दुसऱ्याचें पश्चिमेकडे, आणि कोणाची दाद कोणासच नाहीं ! मूळचे चतुर्वर्ण आम्हीं हिंदु लोक असतां कालांतरानें आम्हांत किती जाती उद्भवल्या आणि पुढें किती उद्भवणार आहेत, हें परमेश्वर

जाणे. या जात्यनंतत्वामुळें आमच्या जात्यभिमानाचे तुकडे तुकडे झाले, आणि हीच गोष्ट पुढें आमच्या हरएक प्रकारच्या नाशास आणि दुर्दैवास कारण झाली हें उघड आहे. ही गोष्ट निरंतर लक्षांत ठेवून या जात्यभिमानाच्या बाबतींत इंग्लिश लोकांचें अनुकरण करणें आपणांस किती योग्य आहे, याचा वाचकांनींच विचार करावा.

पाश्चात्य मंडळीपासून आमच्या लोकांनीं घेण्यासारखी दुसरी एक मोठी गोष्ट एकी होय. एकी म्हणजे अवघ्या राष्ट्राची जूट. ही आमच्या देशांत अनेक कारणांनीं कमी असल्यामुळें आमच्यांत पारतंत्र्य शिरण्यास पुष्कळ मार्ग झाला. वरील गोष्ट इतिहासाच्या द्वारें सिद्ध करून देतां येईल, व प्रत्यक्ष अनुभवही तसा पुष्कळ आहे, हें सांगणें नकोच. तर या संबंधानें आम्हांत व आमच्या राजकर्त्यांत कितीसें अंतर आहे तें पाहूं.

इंग्रज लोकांचा तिकडला व इकडला इतिहास ज्यास अवगत असेल त्यास वरील गुण त्यांच्या अंगीं कितपतसा आढळतो, हें सहज कळून येईल. याचा प्रत्यय दोनतीन ठळक गोष्टींवरूनसुद्धां पूर्णपणें येण्यासारखा आहे. एक गोष्ट स्पेनच्या राजानें केलेली स्वारी. ही स्वारी इलिझाबेथराणीच्या कारकीर्दीत झाली असून वरील राजानें इंग्लंडावर आपलें अजिंक्य 'आरमार' पाठवून दिलें होतें हें सर्वप्रसिद्धच आहे. या स्वारीच्यावेळीं इंग्लंडांत धर्मसंबंधानें केवढी जबरदस्त दुफळी पडून राहिली होती, व प्रॉटेस्टंट लोकांस हात फावला कीं त्यांनीं क्याथलिक लोकांस जाळावें, व क्याथलिक लोकांची सरशी झाली कीं त्यांनीं प्रॉटेस्टंट मंडळीचा खरपूस समाचार घ्यावा, असा प्रकार किती काळपावेतों चालला होता हें इतिहासज्ञांस विदित आहेच. त्यांतून आदल्या वर्षीं केलेला मेरीराणीचा वध आणि नुकती होऊन गेलेली बार्थालोम्यूची कत्तल, या दोन गोष्टी क्याथलिक लोकांच्या मनांत जळत होत्याच! तेव्हां अशा वेळीं म्हटलें म्हणजे इंग्लंडांत किती फंदफितूर व्हावा बरें? फिलिपराजाचा कृतसंकल्प, कीं सुधारलेल्या धर्माचा बीमोड करून टाकायाचा; आणि तो संकल्प सहज सिद्धीस नेण्यासारखें त्याच्यापाशीं साधनही जबरदस्त, कां कीं त्या वेळीं त्याच्याशीं जमिनीवर किंवा समुद्रावर टक्कर मारण्याची कोणाचीही प्राज्ञा नव्हती. त्यांतून सारें इंग्लंड घाबरून गेलेलें; देवावर व नशिबावर हवाला ठेवून तें सामन्याला उभें राहिलें खरें, पण त्याचा त्यास

भरंवसा नव्हता ! पण इतकें असून काय ? वरील स्वारींचा पुकार होतांच साऱ्या राष्ट्रास असा आवेश चढला कीं, जुना व नवा धर्म हा भेद तत्क्षणीं लोपून गेला, आपण सारे इंग्लिस्तानवासी आहों येवढी काय ती बुद्धि सर्वांनीं धारण केली, आणि 'अजिंक्य आरमारा' ची वाताहात करून सोडली ! असाच प्रकार पुढें नेपोलियनाच्यावेळीं घडून आला. त्या महावीरानें सारें भूमंडळ पालथें घालण्याचा संकल्प योजून इंग्लंडावर त्याचा सारखा डोळा होता; व १८०३ सालीं त्यानें इंग्लिश खाडीच्या दुसऱ्या बाजूवर सैन्य व आरमार जमवून इंग्रजांवर चढाई करून जाण्याचा खूप घाट घातला होता. पण इकडे जों ही तयारी तों दुसऱ्या बाजूस काय ? तीन लाख पट्टे घरदार सोडून व बायकापोरांचा निरोप घेऊन त्याला जबाब द्यावयाला एका जुटीनें उभे ! हा कट्टा सरंजाम जेव्हां नेपोलियनानें पाहिला, तेव्हां साक्षात् युद्धप्रसंग करण्याचा नाद सोडून देऊन अन्य उपायांनीं आपल्या शत्रूस जेरीस आणण्याचा क्रम त्यानें आरंभला. हा क्रम युरोपाच्या बंदरांची नाकेबंदी करून इंग्रजांचा व्यापारच खुंटवणें हा होय. ही जबरदस्ती कांहीं वेळ थोडीबहुत चालली, पण पुढें हीच परंपरेनें त्यास रशियाच्या द्वारें भोंवली !

वरील दोन उदाहरणें इंग्लंडच्या इतिहासांतलीं झालीं. आतां वरील राष्ट्राची आजपर्यंत येथें जी नांदणूक झाली ती जरी पाहिली तरी तोच प्रकार आढळून येईल. गेल्या शंभरसवाशें वर्षांच्या कारकीर्दीत कोणी इंग्रज म्हणजे फितूर करून शत्रूंस सामील झाला असें एकही उदाहरण नाहीं. बाकी त्यांच्यावर कसले प्रसंग येऊन गुदरले आहेत हें बहुधा कोणाला सांगायाला नकोच. कोंडमारे झाले, कत्तली झाल्या, वृषोत्सर्गांचा प्रकार झाला,--सर्व कांहीं होऊन चुकलें ! पण स्वदेशाशीं निमकहरामपिणा म्हणून त्यांनीं कोठेंही केला नाहीं. याच सद्गुणाचें फळ ते आज युधिष्ठिराची व अकबर बादशहाची गादी चालवून अनुभवीत आहेत. बाकी यांच्यांत येथें सुद्धां कलागती व मारामाऱ्या नाहींत असें नाहीं. कलहाला आरंभ म्हटला म्हणजे श्रीमन्महा हेस्टिंग्स व त्याचे कौन्सिलदार यांनीं पहिल्या सलामीपासूनच केला. आणखी त्यांत प्रत्यक्ष 'जूनियस्' ची मूर्ति सर फिलिप फ्रान्सिस् यांचें तर पहिल्या लाटसाहेबांशीं कोणत्या तऱ्हेचें सूत होतें तें सांगायला नकोच. च्यावम्याव झाल्याखेरीज कौन्सिलांतली एकही बैठक पार पडायाची नाहीं. खडाजंगी दररोज होतां होतां शेवटी उघड्या मैदानावर दोघांची पिस्तुला-पिस्तुली झाली. फ्रान्सिससाहेबांचा हात लुळा झाला, तरी तो अलगत बांधून

स्वारी पुनः वाग्युद्धाला उभीच, आणि सरतेशेवटीं निजधामास गेल्यावर तेथेंही सारखा आठ वर्षें भर पार्लमेंटांत उभा दावा ! !

आतां इकडे आमच्या भारतपुत्रांकडे वळा. सध्यां आम्हांस जी येवढी लाजिरवाणी स्थिति प्राप्त झाली आहे ती कशामुळें बरें ? दुसरें काय, स्वदेशाविषयीं कोणाच्या मनांत कल्पनाही नाहीं. आपल्या स्वार्थावर काय ती नजर, आपल्या एकट्याच्या हिताकरतां सारें राष्ट्रही बुडवायाला मागेंपुढें पहावयाचें नाहीं, कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, गुलामगिरीचें मेलेलें अन्न खाण्याची हौस, हे प्रकार जे चोहोंकडे माजले आहेत यांचेंच वरील अवस्था हें कार्य होय. साऱ्या राष्ट्राची तर गोष्ट राहिलीच, पण आपली ज्ञाति, आपलें कुटुंब, आपली मंडळी, येवढ्यापुरती सुद्धां आमच्यांत एकी आढळेनाशी झाली आहे. म्यांचेस्टर, लिव्हरपूल, यांच्यासारखे कारखाने तर दूरच; पण एखादें यःकश्चित् काम कां असेना, एकाचें तोंड पूर्वेकडे तर दुसऱ्याचें थेट पश्चिमेकडे ! एकानें एखादी गोष्ट काढली कीं दुसऱ्यानें ती मोडून काढलीच ! स्वतः हातून कांहीं व्हावयाचें नाहीं, दुसरा कांहीं करूं लागला तर पदरच्या भाकरी खाऊन त्यास होईल तेवढा उपद्रव करण्यास मनापासून झटायाचें, त्याच्या कामांत नाहींत तितके फांटे फोडायाचे, आणि ही इमारत खचेल केव्हां आणि आम्ही आनंदानें ×× बडवूं केव्हां ही वाट पहात बसायाचें ! रिकामटेकडेपणांत, गप्पा झोकण्यांत, किंवा गटारांत उलथून पडण्यांत काळ घालावण्यापेक्षां, शेंकडों उद्योग करून तितक्यांतही फसलेला मनुष्य किती थोर आहे ही कल्पनाही आमच्या देशांतील तत्त्वज्ञ मंडळीच्या मनांत येत नाहीं. वस्तुतः पाहतां या भरतभूमीसारखा धन्य देश साऱ्या भूमंडळावर तरी दुसरा आहे काय ? किती प्रकारच्या सोई, किती तऱ्हेची समृद्धि, सर्व प्रकारचें सामर्थ्य अनुकूळ, सुधारणेंत अग्रगण्य, पदवीस पोंचलेल्या राष्ट्राची निकट संगति, ज्यांनीं आम्हांस पादाक्रांत करून टाकलें ते होऊन आम्हांस उच्चस्थितीस नेण्यास झटत आहेत व आमचे डोळे बळेंच उघडीत आहेत,--पण हें सर्व आम्हांला काय होय ? आमचे अवगुण आम्हांला सुटतील तेव्हां पुढें सर्व गोष्टी. या अवगुणांचा राजा म्हटला म्हणजे ऐक्याभाव हा होय. त्यांतून विशेष लज्जास्पद गोष्ट ही कीं, एकवेळ गांवढळ व अज्ञान लोकांची जूट बऱ्याच प्रकारें बनवतां येईल; पण चार अक्कलवान व शहाणेसुरते जमले कीं, चौघांचीं तोंडें चार दिशांस झालींच ! कुणब्या-माळ्यांत पाहिजे तसा कट करतां येईल, पण 'वर्णानां ब्राह्मणो गुरुः' त्यांत एकी

करतांना बिचारा ब्रह्मदेवही थकेल असें वाटतें. सारेच बृहस्पति पडले म्हणजे कोणीं कोणाचें ऐकावें ? इंग्रजींत एक म्हण आहे कीं, * " बब्बरजी फाजील झाले कीं पाक बिघडलाच " ! तर हा प्रकार आम्हांस आज भोंवतो आहे.

येथवर या विषयावर लिहिलें. आतां आणखी एका गुणाविषयीं विवरण करून हें प्रकरण आटपतों.

हा गुण मानसिक धैर्य, ज्यास इंग्रजींत 'मॉरल करेज' म्हणतात, तो होय. शारीरि धैर्य म्हणजे काय हें कोणालाही सांगायाला नकोच; अंगधिटाईनें शत्रूवर चालून जाणें, संकटसमयींही न डगमगणें, इत्यादि व्यापार ज्या गुणाचे आविर्भाव होत त्यास वरील नांव आहे. आतां मानसिक धैर्य म्हणजे काय ? तर स्वतंत्रतेनें विचार करून जें आपणांस तथ्य वाटेल तें बिनदिक्कत बोलून दाखविणें, आणि त्या बोलण्याप्रमाणें आचरण करणें, या तीन गोष्टींस वरील नांव आहे. खरा शूर आहे तो जसा शत्रूंच्या संख्येची। पर्वा न करितां त्यांच्यावर बेलाशक तुटून पडतो, व धारातीर्थीं पतन पावण्याचा उत्साह बाळगतो, त्याप्रमाणेंच मानसिक धैर्य ज्याच्या ठायीं पुरें वास करित आहे तो पुरुष प्रतिपक्ष्यांच्या आक्षेपांस किंवा निंदकांच्या निर्भर्त्सनेस खुशाल एकीकडे गुंडाळून ठेवतो आणि आपल्या मताचें निःशंकपणें प्रतिपादन करून त्याप्रमाणें आचरणही करण्यास चुकत नाहीं. 'तस्मान्मूर्खसहस्रेभ्यः प्राज्ञ एको विशिष्यते' [तस्मात् हजार मूर्खांहून एक शहाणा अधिक आहे] हा न्याय ध्यानांत आणून वरील तत्त्वज्ञ हा जगाच्या हाकाटीस केवळ कोल्हेकुईदाखल समजतो, आणि आपल्या मनानें ज्याविषयीं द्वाही दिली तेंच खरें मानतो. साऱ्या जगाचा असा समज आहे, किंवा मोठमोठे शहाणे म्हणून नाणावलेले लोक अमुक अमुक तऱ्हेचा अभिप्राय देतात, किंवा आपले वाडवडील आज अनादिसिद्ध असें असें म्हणत आले, वगैरे गोष्टींचा विचार करण्याची त्यास जरूर पडत नाहीं.

हल्लींच्या काळीं वरील धैर्याची किती अवश्यकता आहे हें सांगणें नकोच. जुलमाचे मोठे प्रकार दोन; एक ऐहिक व दुसरा पारलौकिक. पहिला प्रकार म्हटला म्हणजे सरकार व सरकारी अधिकारी यांचा जुलूम; व दुसरा प्रकार धर्माध्यक्ष व धर्माधिकारी यांचा. वस्तुतः पाहतां वरील दोघां प्रभूंचा अधिकार मर्यादित आहे; राजानें लोकांच्या जीविताचें व संपत्तीचें रक्षण करण्याच्या तजविजींत

* " Too many cooks spoil the broth. "

राहावें, आणि धर्माधिकाऱ्यांनीं लोकांची नीति न बिघडे इतक्यापुरता अंमल चालवावा. पण मनुष्यमात्राची ही रीतच आहे, कीं अधिकार प्राप्त झाला कीं तो वाढविण्याचा हरप्रयत्न करावयाचा. या प्रवृत्तीस अनुसरूनच राज्यावर व धर्मावर जे अधिकृत असतात ते नाहीं नाहीं तेथपर्यंत आपला अंमल चालवून लोकांस नाडूं लागतात. हल्लीं आमच्या देशांत या दोनही प्रकारांनीं मोठी चमत्कारिक स्थिति झाली आहे. मागें मोगलाई किंवा पेशवाई अंमल जरी होता, तरी लोकांत कुवत होती व त्राण होतें; हल्लींच्या सुधारलेल्या अमलांत येवढ्या अफाट हिंदुस्थानदेशाची अशी अवस्था होऊन गेली आहे कीं, जसा केवढाही मेढ्यांचा कळप असला तरी एखादें पोर त्याला खुशाल वळवूं शकतें, त्याप्रमाणें दरसालीं विलायतेहून पंचवीसतीस वर्षांचीं पोरें इकडे पाठवून दिलीं जातात आणि तीं खुशाल येवढ्या वीस कोटी लोकांवर पाहिजे तसा अंमल चालवितात ! अगोदर परकी अंमल, त्यांतून एक धनी नाहीं, राज्याची कदर व सामर्थ्य विलक्षण, त्यामुळें दिवसेंदिवस प्रजा अगदींच नामर्द व नादान होत चालली आहे; व सरकारी अंमलदार काय करतील ती पूर्वदिशा असा प्रकार झाला आहे. ही एका प्रकरणांतील हालहवाल झाली. दुसरें प्रकरण धर्माचें. या संबंधें तर वरच्याहूनही विलक्षण स्थिति आज दृष्टीस पडत आहे. एखादें जहाज तुफानांत सांपडून त्याची जशी दुर्दशा व्हावी,—ढालकाठी पडावी, सुकाणूं सुटून जावें, नांगर नाहींसा व्हावा, आणि लाटांचे तडाखे खात त्यानें पाहिजे तिकडे भडकत सुटावें, किंवा कोठें तरी रेंदाळांत अडकून राहावें,—त्यासारखी हल्लीं हिंदुधर्माची अवस्था झाली आहे. धर्माचा आणि देशस्थितीचा मेळ जो असावा तो नसल्यामुळें एक अगदींच धर्म ×× तरी व्हावें किंवा अंधपरंपरेनें चालावें, ही पाळी येऊन ठेपली आहे. मागें वेळोवेळीं एतद्देशीय धर्मास तत्तत्कालानुरूप जसा संस्कार मिळत गेला तसें अलीकडे दीर्घ कालपावेतों न झाल्यामुळें धर्म, आचारविचार, रीतारिवाज, हा सारा एकच गप्पागोंधळ होऊन गेला आहे !

तर असल्या प्रसंगीं वरील दोनही प्रकरणांचा पोक्तपणानें विचार करणारे व ते अमलांत आणणारे पुरुष आमच्या देशांत निपजले पाहिजेत. अशी मंडळी युरोपांत आजपर्यंत किती होऊन गेली आहे व अद्याप किती होत आहे हें येथें सांगूं लागल्यास फारच विस्तार होणार आहे. यास्तव येथें थोडक्यांत इतकेंच सांगतों कीं पाश्चात्य राष्ट्रांत हरएक प्रकरणीं आपले विचार स्पष्टपणें प्रगट करणारे पुरुष

वेळोवेळीं अनेक झाले आहेत, व म्हणूनच त्यांची सुधारणा आज इतक्या दशेला येऊन पोहोंचली आहे. हें मी कसें बोलूं, लोक मला काय म्हणतील, 'यद्यपि शुद्धं, लोकविरुद्धं नाकरणीयम् नाचरणीयम्' 'जिकडे वारा वाहील तिकडे पाठ द्यावी,' वगैरे भेकडपणाचे विचार वरील महापुरुषांच्या मनास शिवलेही नाहींत; आणि याप्रमाणें त्यांनीं आपलें शिर हातांत घेऊन एकेक मत प्रसिद्धच केलें, व एकेक गोष्ट अमलांत आणली म्हणूनच यश आलें, नाहीं तर आमच्या इकडे बडया बड्या मंडळीचें हरएक प्रसंगीं जें धरसोडीचें वर्तन दृष्टीस पडलें आहे व पडत आहे तें तरी पहा! आज हा रंग दाखवावयाचा, उद्यां तोच पालटून निराळाच तऱ्हा दृष्टीस पडायाची. बोलतांना यथेच्छ वाहवत जावयाचें आणि करणी करायाचा प्रसंग येऊन ठेपला कीं, आयत्या वेळेस अंग काढून द्यावयाचें,—हा प्रकार पुढारी म्हणविणाऱ्या बहुतेक मंडळींत आजपर्यंत दृष्टीस पडल्यामुळें आमच्यांत लोककल्याणाची बडबड मात्र पुष्कळ माजली आहे, पण वस्तुतः पाहिलें तर हातून कांहीं एक होत नाहीं. असो; तर इतःपर आमचे देशबंधु केवळ प्रलाप करायाचे सोडून देऊन जें काय थोडें बहुत आपल्या हातून होण्यासारखें असेल तेवढें मनापासून झटून करून दाखवितील, व आपल्या देशाचें पाऊल आज जें हरएक गोष्टींत इतकें मागें आहे तें पुढें सरकवूं लागतील, अशी आशा प्रगट करून हा लेख पुरा करतों.

सदरील विषय बराच लांबला, व याहूनही तो लांबवण्यासारखा आहे. पण येथवर दाखविलेल्या गुणांच्या संबंधानें आम्हांत व आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंत किती अंतर आहे हें लक्षांत आणलें असतां आमच्या वाचकांची बहुतकरून खात्री होईल कीं, नुसत्या वरकांती अनुकरणापेक्षां अंतर्गत सद्गुणांचा कित्ता वळवणें हें आम्हांस फार श्रेयस्कर होण्यासारखें आहे. हाच मुद्दा शाबीत करण्याकरतां प्रस्तुत विषय आम्हीं उचलला होता. तर वरील तत्त्व जर आमच्या वाचकांच्या कांहीं तरी मनांत बिंबलें असेल तर आमच्या कलमास विनाकारण तसदी पडली नाहीं असें होईल; नाहीं तर आमच्या शूद्रककवीचा सुवर्णकारनालिकान्याय सिद्धच आहे.—

नळी फुंकिली सोनारें । इकडुन तिकडे गेलें वारे ॥

[वर्ष १ अंक ३२,३३,३४,३६,३७,३८,३९,४०.]

अर्थशास्त्रदृष्ट्या बालविवाहाचा विचार

यंदां लग्नांचें पिक चहूंकडे फार चांगलें आल्याचें समजतें. धारण सवंग असल्यामुळें चहूंकडे बरीच शांतता आहे, व मोठ्या बाईसाहेबांनीं आपली स्वारी काढल्याचें कोठें ऐकूं येत नाहीं. या दोन कारणांमुळें हें वर्ष हिंदुस्थानास बरें जाईल असें वाटत आहे. पुष्कळ आईबापें आपल्या मुलींचीं लग्नें करून टाकून वीतचिंत झालीं असतील, व पुष्कळ सास्वांना हाताखालीं सुना आल्याबद्दल आनंद होत असेल. पण ही लग्नाची सांथ अर्थशास्त्र्याला मात्र टोंचीत आहे. त्याच्या मतें अविचारी लोक पतंगाप्रमाणें अग्नींत उड्या टाकीत आहेत, व त्यांच्या अविचाराचीं फळें त्यांस भोगावीं लागणार आहेत. फार दिवसांचा काळिजाला आणि बरगड्यांला भिनून गेलेला रोग ज्याप्रमाणें पुष्कळ वर्षेपर्यंत तीक्ष्ण औषधोपचार केल्याशिवाय निघावयाचा नाहीं, त्याप्रमाणें फार दिवस चालत आलेल्या दुष्ट चालींचें जूं लोकांस सहज झुगारून देतांच येत नाहीं. बालविवाहाचा विषय पराकाष्ठेचा शिळा झाला आहे; पण त्याच्या शिळेपंणाला कंटाळून उपयोग काय? शरीरांत जोंपर्यंत रोग आहे तोंपर्यंत औषध चालविलेंच पाहिजे, व त्याच्या कडूपणामुळें रोग्यास तें न घ्यावेसें वाटलें तरी त्याच्या घशांत कोंबलें पाहिजे; त्याप्रमाणें आमच्या वाचकांना हा विषय जरी न आवडला तरी जोंपर्यंत ही बालविवाहाची दुष्ट चाल आमच्या लोकांतून समूळ निघून गेली नाहीं, तोंपर्यंत आमची ही उपदेशाची किरकीर चालावयाचीच. टाकी मारून दगड झिजविणें देखील सोपें, पण उपदेशानें लोकांचे दुराग्रह काढणें फार दुस्तर. आमच्या देशांतील मोठे शहाणे लोक दुसऱ्यास लांबलांब उपदेश करणारे, आपल्या विद्वत्तेची ज्यांस मोठी ऐट, ज्यांचा शहाणपणाचा तोरा केवढा, असे शिकलेले, विद्वान् म्हणवून घेणारे लोक, प्रसंग आला कीं शेंपूट घालून मागें सरतात, आणि इतर लोकांप्रमाणें वर्तन करितात, हें मोठें शोचनीय होय. यांत कोणाही व्यक्तिमात्रास उद्देशून लिहिण्याचा हेतु नाहीं. जी खरोखर स्थिति आहे, ती आम्ही प्रांजलपणें सांगत आहों; व या अविचाराच्या चालीनें आमचें केवढें नुकसान होत आहे, हें आमच्या वाचकांपैकीं एकाच्या जरी नजरेस आलें,

व ती चाल मोडून टाकण्याचा निश्चय करण्याचें मनांत आलें, तरी आमच्या लिहिण्याच्या श्रमाचें सार्थक झालें असें आम्ही समजूं. कारण कोणतीही बरी-वाईट गोष्ट एखाद्याचे मनांत भरविण्यास लिहिणें किंवा बोलणें याशिवाय दुसरा उपाय तो कोणता ? एखाद्या वाईट गोष्टीनें होणारें नुकसान अनेक तऱ्हांनीं होत असतें. शक्तिहीन संतति, उद्योगप्रत्यवाय, शक्तिहानि वगैरे अनेक प्रकारचीं दुःखें बालविवाहामुळें आम्हांस भोगावीं लागत आहेत. पण त्या सगळ्यांचाच येथें विचार करण्यास आज आम्हांस सवड नाहीं. बालविवाहापासून केवळ अर्थशास्त्र-दृष्ट्या आमचें जें नुकसान होत आहे, तें दाखविण्याचा आमचा विचार आहे. पुढें याच प्रश्नाचा दुसऱ्या एखाद्या दृष्टीनें (!) विचार करूं.

या पुणें शहरांतच कित्येकांनीं हजार हजार पंधरापंधराशें रुपये हुंडा देऊन मुलींचीं लग्नें केलीं, व अशींच सगळ्या देशभर झालीं असतील. या लग्नांपासून किती नुकसान झालें आहे, हें सहज लक्षांत येण्याजोगें नाहीं. मुलीकडील लोक इतका हुंडा देऊन मुलगे विकत घेतात याचें कारण काय ! याचीं अनेक कारणें आहेत. प्रथम मुलाच्या घराण्याची किंमत, दुसरी मुलाच्या विद्येची किंमत, तिसरी मुलाच्या रूपाची किंमत. वास्तविक पाहतां बहुतेक किंमत मुलाच्या गुणांला आणि स्वभावाला असावी, त्याचें कांहींच नाहीं. असो; पण आम्ही अर्थशास्त्र-दृष्ट्या या प्रश्नाचा विचार करीत आहों, हें विसरतां कामा नये. ज्यास स्वार्थ तरी निदान चांगला समजतो आहे तो आपल्या कोणत्याही वस्तूचा विक्रय करणें झाल्यास तिला ज्यावेळेस फार मोल येण्याचा संभव आहे त्या वेळेस करील, पण हा स्वार्थ देखील आमच्या लोकांना बरोबर कळत नाहीं. मोठ्या घराण्यांतला, सुदृढ, सुरूप मुलगा चांगला विद्वान् होऊन पैसे कमावूं लागल्यावर त्यास पुष्कळ किंमत येण्याचा संभव आहे हें कोणीही कबूल करील. अशा प्रकारच्या मुलास मुलगी देण्याची आवड अलीकडे पडूं लागली आहे, हें अलीकडे कॉलेजांतील मुलग्यांवर ज्या उडया पडतात, त्यावरून स्पष्ट सिद्ध होतें. थोडे दिवस मुलगा राखून ठेविल्यानें त्याच्या मोठेपणाबद्दल व विद्वत्तेबद्दल येणारा फायदा लोक कशासाठीं बुडवितात कोण जाणें ! कदाचित् असें असेल कीं, एकदां पुष्कळ हुंडा देऊन एखादा चांगला मुलगा लग्नाची बिडी घालून कायम करून टाकावयाचा. पण त्यावर आमचें असें उत्तर आहे कीं, अमुक एक मुलाच्या आईबापांनीं त्याच्या लहानपणींच विक्रय केला म्हणून दुसऱ्या मुलांची काय वाण

आहे ! आज हजार रुपये द्यावयाचे व दहा वर्षांच्या पोराच्या गळ्यांत चार वर्षांच्या पोरीचें लोढणें अडकवायाचें, त्यापेक्षां दहाबारा वर्षें तेच रुपये ब्यांकेबिंकेंत ठेविल्यास हजाराचे दोन हजार होतील, व तेवढ्या रकमेनें चांगला मोठा मुलगा मिळण्याची पंचाईत पडावयाची नाहीं. पण आम्हांस अमक्याच घरीं मुलगी द्यावयाची असली तर मग तुमचें म्हणणें काय कामाचें ! तसाही कोणाचा हट्ट असला तरी दोनहीकडील पक्षांनीं साधारणपणें वाग्निश्चय करून ठेवून मुलगा-मुलगी चांगलीं वयांत आल्यावर लग्न लाविलें तर चालणार आहे. पण मुलगा-मुलगीचें लग्न लावून टाकणें हें आईबापांचें कर्तव्यकर्म असें ज्या देशांत मानण्याची चाल पडली आहे, त्या देशांत साड्याच्या दुसऱ्या दिवशीं मुलाबरोबर मुलीस मधुकरी मागण्यास निघावें लागलें तरी, किंवा वार लावून मुलगा शाळेंत जात असून रुपयाभर फी देण्यास त्याला सामर्थ्य नसलें तरी, दोनचारशें रुपये कर्ज काढून त्याचें लग्न झालेंच पाहिजे. कोणी आडपता-दडपता नसला म्हणजे मूर्ख लोकांच्या खुळेपणाचें पीक चांगलें समजतें. नाहाण आल्याशिवाय मुलींचीं लग्नें करूं नयेत असा अकबर बादशहानें केलेला कायदा मान खालीं घालून चट साऱ्या लोकांनीं ऐकिला. पेनाच्या सपाट्यासरशी दयावंत बेटिंकसाहेबांनीं पतिमरणांत स्त्रीहत्या बंद केली. जर्मनी वगैरे देशांत अमुक एक वय झाल्याशिवाय लग्नेंच होऊं देत नाहींत. सारांश आमच्या देशांत मूर्खपणाचा जो प्रसार होत चालला आहे त्याला कारण कोणी आटपता नाहीं म्हणून. वर्तमानपत्रकर्त्यांनीं कितीही रड गाइली म्हणून हट्टी व मूर्ख लोकांची कशी समजूत पडणार ! पण स्वतःची राज्यसत्ता नाहीं, व जें सरकार आहे तें अशा कामांत मन घालीत नाहीं. तेव्हां दादापुता करूनच लोकांचीं मनें वळविलीं पाहिजेत. ज्या कोणास चांगल्या मतांचा प्रसार करणें असेल त्यांनीं आपला सर्व राग आपल्यापाशींच गिळून टाकून लोकांचा तिरस्कार न करितां त्यांच्यापुढें त्या मतांचें नित्य प्रतिपादन केलें पाहिजे. लोकांस सोडून देऊन अरण्यांत तर रडत बसावयाचें नाहींना ! सत्ता हातीं नसल्यामुळें पुष्कळ काळ लागेल; एखादे वेळेस फार मेहनत करूनही ती अगदीं व्यर्थ जाईल, पण याला काय उपाय ! ज्यांच्या हातांत सत्ता नाहीं, पण शहाणपण आहे, आणि लोकांचें चांगलें व्हावें याबद्दल खरी कळकळ आहे, त्यांनीं धिमेपणाचा अंगीकार करून हातून होईल तितकी खटपट करावी. या विषयाच्या संबंधानें आणखी पुष्कळ लिहावयाचें आहे तें पुढल्या अंकांत लिहूं.

इंग्रजींत एक अशी म्हण आहे कीं, ज्या बाबतींत अज्ञान हें सुखकारक आहे, त्या बाबतींत ज्ञान होणें महद्दुर्दैव होय. आणि ही म्हण अगदीं वाजवी आहे. अमुक एक वाटेनें आपण गेलों असतां आपणास खचित दगा होईल, असें पक्कें माहीत असून कित्येक बाह्यकारणांच्या दडप्यामुळें त्याच वाटेनें जावें लागणें यापेक्षां त्या वाटेच्या धोक्याविषयीं मुळींच अज्ञान असणें हें बरें, हें कोणीही समंजस पुरुष कबूल करील. ज्या भावी अपायांचा प्रतिकार करण्याची सवड नसते, अशा अपायांचें पूर्वज्ञान हें पुष्कळदां निरर्थक विपत्तीला आणि मनाच्या अस्वस्थतेला कारण होतें, ही प्रत्येकाच्या अनुभवास आलेली गोष्ट आहे. एक तर संकटांचा सुगावा लागून त्यांच्याशीं प्रतिद्वंद्व करण्यास सिद्ध होण्यास अवकाश सांपडावा, किंवा त्यांचा हल्ला आपणावर येणार आहे हें मुळींच कळूं नये. अमुक एक दिवशीं मृत्यु खास आपणावर छापा घालणार असें पूर्वज्ञान प्राणिमात्रास होतें तर जीवधारण कधींच दुःसह झालें असतें. सारांश, शुद्ध दुःखांत दुःखत्व आहे असें म्हणतां येत नाहीं. दुःख प्राप्त झालें असतां त्याचा प्रतिकार करण्याची आशा असल्यास दुःखावस्थेंत देखील थोडेंबहुत सुख होतें, हा सर्वसाधारण अनुभव आहे; परंतु अमुक एक दुःखाला प्रतिकार नाहीं, अशी जेव्हां बळकट खात्री होते, त्या वेळेस तें दुःख अगदीं हलक्या प्रतीचें असलें तरी फार पीडा करतें, हें सर्वांस माहीत आहे. बालविवाहापासून अनेक घोर अनर्थ उत्पन्न होत आहेत, असें माहीत असून त्याचा निषेध न करितां येणें, यापेक्षां बालविवाहापासून होणाऱ्या अनर्थांचें स्वरूपच न कळतें तर बरें होतें. अर्थशास्त्रदृष्ट्या या विषयाची चर्चा करण्याचें काम आम्हीं मागेंच सुरू केलें आहे, हें आमच्या वाचकांच्या लक्षांत असेलच. पण आजरोजीं त्याच दिशेनें या दुष्ट चालीवर चाल करण्याचें काम कांहीं हेतूनें बंद ठेविलें आहे. मे महिन्याची सुटी या पुणें शहरांत मोठ्या चैनींत व आनंदांत जाते. वक्तृत्वसभा, नाटकें, व्याख्यानें वगैरे अनेक मनोरंजनाच्या गोष्टींची एकसारखी रेलचेल चाललेली असते. येथें विद्याभ्यास करून चरितार्थ चालविण्यासाठीं दूरदूरच्या प्रदेशांत झुकलेली मंडळी वार्षिक उत्सव करण्यासाठीं पूर्वस्थानास येतात, तेणेंकरून या सगळ्या महिन्याभर पुणें अगदीं हलून गेल्यासारखें दिसतें. जिकडेतिकडे विद्वान् लोकांचे थवेच्या थवे दिसतात. अशा वेळेस लौकिककल्याणाच्या एखाद्या कृत्याचा बूट काढावा अशा हेतूनें अर्थशास्त्रदृष्ट्या या विषयाचा उहापोह करण्याचें काम


सध्यां तहकूब ठेवून व्यवहारदृष्ट्या तत्संबंधानें इतरांचें काय म्हणणें पडतें तें पहावें, या हेतूनें मागला विषयक्रम तसाच ठेवितों, आणि व्यवहारदृष्ट्या यासंबंधानें आम्हांस जें वाटत आहे तें थोडक्यांत वाचकांस कळविण्याचा प्रयत्न करितों.

बालविवाहापासून होणाऱ्या अनेक अनर्थांचा डंका इंग्लंडपर्यंत जाऊन थडकावा, व मि० राबर्ट नाईट यांस वाईट वाटून त्यांनीं बालविवाहनिर्बंध या विषयावर लंडन स्टेट्समन् या मासिक पुस्तकांत निबंध लिहावा हें आमच्या सुधारणेला आणि विचारीपणाला शोभतें काय ? या दुष्ट चालीमुळें होणाऱ्या आमच्या नुकसानाचें फारच हुबेहूब चित्र मि० नाइट यांनीं काढिलें आहे. त्यांच्या आमच्या विचारांत तफावत आहे असें नाहीं. पण त्यांनीं तें आपल्या भाषेंत काढलें असल्यामुळें अगदीं ठसठशीत उठवून दिलें आहे.

बालविवाहापासून जे अनेक तोटे होतात त्यांपैकीं प्रथम ठळकठळकांचा विचार करूं. स्वातंत्र्यहानि, शक्तिहीनता, धाडसपणाचा अभाव आणि बुद्धिमांद्य हीं बालविवाहामुळें आमच्या ठायीं आलीं आहेत. आतां स्वातंत्र्यहानि या शब्दानें राजकीय स्वातंत्र्य असें समजावयाचें नाहीं. स्वातंत्र्य म्हणजे मनुष्य वयांत आल्यावर त्यास पाहिजे त्या रीतीनें वागण्याची मोकळीक. ही मोकळीक आम्हांपैकीं फार थोड्यांसच भोगण्यास सांपडते. लहानपणापासून मानेवर खडा ठेवून कोठें एखादी परीक्षा होऊन दोन अक्षरें आलीं नाहींत तों बिचाऱ्याच्या पाठीवर संसाराची गोणी लादली जाते. वास्तविक पाहतां लग्नापासून होणारें जातिविशिष्टसुख सर्व श्रमांच्या फळांच्या जागीं असावें, म्हणजे हवा तितका विद्याभ्यास प्रथम व्हावा, रोजगारधंदा लागून दोन पैसे मागें पडावेत; व इतके कष्ट झाल्यावर स्वाभाविकपणें एकटें आयुष्य घालविण्याचा त्रास येऊं लागला म्हणजे लग्नाकडे मन वळावें. पण आमच्या देशांतील प्रकार पहावा तो कांहीं विलक्षणच. पोरें शाळेंत जात असतात; बायको म्हणजे काय हें देखील त्यांस बरोबर कळत नसतें. अशा वेळीं आईबाप विचार न करितां एकमेकांची एकमेकांला बिडी घालून टाकितात, हें किती दुःखकारक आहे ! सतराआठरा वर्षांच्या सुमाराच्या ऐन तारुण्याच्या ज्या रात्री सहाध्यायांच्या संगतीनें निमग्नपणें पुस्तकपठणांत जाव्या, त्या रात्रींना विषयसुखानभिज्ञ अशा मुलामुलींच्या मूर्खपणाच्या बळजोरीनें घडवून आणिलेल्या रतिक्रीडेच्या साक्षिणी होणें भाग पडावें, हें केवढें दुर्भाग्य !! अशा अकालिक विषयसुखोपभोगानें मुलीमुलें पिळून जाऊन व

पांढरीं पडून क्षयी किंवा रोगग्रस्त झालीं तर त्याचा शाप ज्यांनीं अशा सुखाचीं चटक त्यांस लाविली त्यांच्या टाळक्यावर जाऊन सडकत नाहीं काय ? व अशीं मेपपात्रें कसल्या धाडसाचीं कामें करणार ? युनिव्हर्सिटीच्या भट्टींतून बाहेर पडताहेत तों संसाराग्नीची आंच लागूं लागते; व या रीतीनें सर्व जन्म दुःखांत जातो. वर जें लिहिलें आहे ती अतिशयोक्ति नाहीं असें प्रत्येक विचारी मनुष्यास कबूल करावें लागेल. अशा प्रकारच्या आयुष्यक्रमांत स्वतंत्रता ती कोठें राहिली ? एकवीस बाविसावे वर्षीं कुटुंबभरणाचें ओझें छातीवर पडल्यानें बिचारा काळजी-ग्रस्त होऊन जातो. मग कोठला कुलाभिमान, जात्यभिमान, आणि देशाभिमान ! यासंबंधानें पुष्कळच लिहावयाचें आहे, पण स्थलसंकोचास्तव आज येथेंच थांबतों; तथापि हा लेख संपविण्याच्या पूर्वी एकदोन सूचना करावयाच्या आहेत त्या करितों. पूर्वी सांगितलेंच आहे कीं, या महिन्यांत येथें पुष्कळ लोकांचा समुदाय जमलेला असतो, यासाठीं बालविवाह-निषेधक मंडळीनें असें करावें कीं, ज्या कोणास बालविवाहाची चाल आवडत नसेल त्यांच्या वक्तृत्वाच्या समाजांत सह्या घ्याव्या, व पुढें वर्तमानपत्रद्वारें प्रसिद्ध कराव्या. पुढें गांवोगांव सह्या घेण्याकरितां पत्रें आणि मनुष्यें पाठवावीं, व एकंदर सुमारें दोन हजार सह्या झाल्यानंतर प्रसिद्धपणें पुनर्विवाहाची चाल अमलांत आणावी. जो कोणी हा नेम मोडील त्यास या मंडळीनें बहिष्कार घालावा. असें केल्यानें थोड्या वर्षांत प्रौढ विवाहाची चाल सर्वसाधारण होईल असें आम्हांस वाटतें. पण ही गोष्ट फार कळकळीनें कालविलंब न होतां झाली पाहिजे. याकरितां सर्व देशहितचिंतकांस आमची विनयपूर्वक अशी विनंति आहे कीं, त्यांनीं या सर्वोपयोगी कृत्याला मदत करण्यांत अगदीं कुचराई करूं नये.

[वर्ष १ अंक १४,१९]



भोजनगृह.

वरील नांवाचा एक कारखाना आज सहा महिन्यांवर या शहरांत निघालेला आहे, हें आमच्या येथील वाचकांस व कित्येक बाहेरच्यांसही माहीत असेलच. आजच्या अंकांत प्रस्तुत गृहासारख्या लोकोपयोगी गोष्टीच्या संबंधानें कांहीं मजकूर लिहिण्यासारखा आहे तो वाचकांस सादर करतों.

भोजनगृह ही वस्तुतः पहातां पाश्चात्यांच्यापैकीं एक सुधारणा होय. हा प्रचार आमच्या देशांत आजपर्यंत कधींच नव्हता. येथील पूर्वपरंपरागत रीति म्हटली म्हणजे अतिथिअभ्यगताचा सत्कार करणें ही होय. गार्हस्थ्याचा धर्म म्हटला म्हणजे प्रतिदिवशीं दोन प्रहरीं बलिहरणोत्तर चतुष्पथावर मुहूर्तमात्र उभें राहून अतिथीची प्रतीक्षा करावी आणि कोणी पथिक आल्यास त्यास घेऊन भोजन करावें हा होय. * ही पद्धति अद्यापही या देशांत कित्येक प्रांतीं आढळते, व अभ्यागत कितीही आले तरी त्यांस पाहुणचार मिळतो, हें प्रसिद्धच आहे. पण अलीकडे लक्ष्मी व अन्नपूर्णा या दोनही देवतांनीं या देशास सोडल्यामुळें वरील प्राचीन पद्धति अर्थातच सामान्यतः पहातां लुप्त होत चालली आहे. शिवाय अर्थशास्त्र (पोलीटिकल एकॉनमी) ही थोडकेंसें इकडे डोकावूं लागल्याबरोबर आमचे ठायीं ही समजूत बिंबत चाललेली आढळते कीं, कोणालाही फुकट जेवूं घालणें म्हणजे निवळ आळस वाढवणें होय; यास्तव मोठा स्नेही जरी चार दिवस घरीं येऊन उतरला तरी त्याच्या हातांत जातांना बेलाशक बिल हजर करावें ! असो; तर येणेंप्रमाणें पूर्वीच्या व आतांच्या काळांत भेद पडला आहे.

तेव्हां भोजनगृह हें प्रस्तुतच्या कालमानानें पाहतां मोठी अवश्यक गोष्ट होऊन बसलें आहे. मोठमोठ्या शहरांतून तर असल्या कारखान्यांची अतिशयित अवश्यकता असते. पुणें किंवा मुंबई यांसारख्या ठिकाणीं लोकांची नेहमीं रहदारी असते; प्रत्यहीं शेकडों हजारों माणसें वरील शहरीं हरएक कामा-

---

* ' गृहस्थ ' व ' आगंतुक ' या दोन्ही शब्दांचे मूळ अर्थ सध्यांच्या पेक्षां फार निराळे आहेत. गुरूची आज्ञा घेऊन संपूर्ण विद्या होत्साता जो दारपरिग्रह म्हणजे विवाह करितो तो गृहस्थाश्रमी अथवा ' गृहस्थ ' होय; आणि ' आगंतुक ' म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें अकस्मात् आलेला पाहुणा होय.

निमित्त येत असतात व जात असतात. आतां वरील गृहाच्या अभावीं वरील फिरस्ती मंडळी काय करते याचा जर विचार केला, तर त्यांस अर्थातच बहुशः स्नेही मंडळीसच अडचणींत घालावें लागतें. घरचें जेवणखाण आटपून जों स्वस्थपणें अंमळ वामकुक्षि घ्यावयाला आरंभ करावा, तों कोणी आप्त किंवा स्नेही अगर बादरायणसंबंधी अचानक येऊन दत्त म्हणून उभा राहतो व खुंटीस गोवाळें अडकवितो. हा प्रसंग उभयपक्षींही किती अवघड बरें! घरच्या यजमानास येवढा थकून भागून व भुकेलेला जो पाहुणा दारीं आला त्याच्यावर अर्धचंद्रप्रयोग करणें म्हणजे केवढी खडतर गोष्ट, बरें दुसऱ्या पक्षीं पहातां अतिथिव्रत चालविण्याची तरी केवढी पंचाईत! जो बिचारा निरुपायास्तव मुंबापुरीची नेभळी हवा पतकरून इवल्याशा जागेंत संकोचवृत्तीनें राहिलेला, आणि या महिन्याची त्या महिन्यालाही ज्याची जेमतेम गांठ, त्याला प्राघूर्णिकाची स्वारी अलुक म्हणून येऊन उभी राहिली असतां केवढा संतोष होत असेल बरें! मोठ्या शुक्रस्वर्गींच्या घंटांचा घणघणाट त्याच्या कानीं येऊन पडला तरी नित्याच्या नकारघंटेचा रव त्याच्यानें लोपला जाईल काय? इंग्रजी खराटा चार हजार कोसांवरून इकडे घांवत येऊन या सुवर्णभूमीवर फिरूं लागल्याच्या पूर्वी येथें अशी स्थिति होती कीं, अन्नाला मोताद असा कोणीच नव्हता. खेरीज 'पोलिटिकल एकॉनमी' नें उपदेशिलेला जो शास्त्रोक्त अदत्तपणा त्याचीही फार करून कोणास ओळख नव्हती. आमच्या पुणें शहरीं श्रावणमासीं लाख दोन लाख मंडळींचा महापूर लोटे, पण इतक्यांचीही सरबराई येथें होत असे. तेथेंच आतां इंग्रेजी सुधारणा पूर्णपणें प्रतिबिंबित होऊन इंग्रेजी औदार्य सुरू झालें आहे, तें कसें? तर तोंडानें नाहीं म्हणून सांगावयाचें नाहीं, अन्नार्थी याचकानें बोर्डाकडे नजर फेंकावी आणि त्यावरील वळणदार ढोबळीं अक्षरें पाहून समाधान करून घ्यावें,—एकीकडे 'अवकाश आहे' व दुसरीकडे 'झाली'!

तर ज्यापक्षीं हल्लींची स्थिति अशी चमत्कारिक झालेली आहे, त्याअर्थीं आतां पूर्वीचें वैभव विसरून आपलें कालानुरूप वर्तन झालें पाहिजे हें उघड आहे. मागले लक्षभोजनाचे दिवस आतां गेले; आतां त्यांच्या जागीं लक्षोपवासाचे व लक्षमरणाचे दिवस येऊन ठेपले आहेत. मेघराजानें कृपा केली तर हीं भरतभूमीचीं लेंकरें आणखी एक वर्षभर जगणार, नाहीं तर एकदम शंभर वर्षांचीं निश्चिंती! मागले खुळे राजे कोठें अन्नछत्रें घालीत, कोठें सदावर्तें ठेवीत, अस

अशास्त्र वागणुकीचा प्रकार असे; हल्लींच्या सुधारलेल्या अमदानींत असा पैशाचा अपव्यय कालत्रयींही व्हावयाचा नाहीं. अन्नछत्राची किंवा खिचडीची तर गोष्टच राहूं द्या. पण कोणीं भोजनगृह सुरू केलें कीं लागली त्याच्या मागें उदीम-पट्टी ! सुमारें दहा वर्षांपूर्वी तर आमच्या स्थानिक सरकारच्या कौन्सिलांत मेज-वान्यांवर कर बसवावा असेंही घाटत होतें. हा बहारीचा कर आणखीही केव्हां येईल याचा कांयनेम आहे ? तो आला असतां केवढी मौज होईल बरें !—कीं द्वादशीचे बारा ब्राह्मण घालायाचे तर एका हातांत जेव्हां पास द्यावा तेव्हां दुसऱ्या हातानें उदक सोडावें ! तर असली चोख पाश्चात्य सुधारणा येथें जारीनें चालू असल्यावर राजरोस भोजनगृहें चालू झालीं पाहिजेत हें उघड आहे. अशा ठिकाणीं अर्थातच यजमानासही संकोच नको, व पाहुण्यासही नको ! पाहुण्यानें पाहिजे तेव्हां यावें, पाहिजे तितके दिवस रहावें, व पाहिजे तितकी मंडळी आणावी; आणि पुनः उभयपक्षींही कार्डी इतकाही संकोच बाळ-गण्याची जरूरी नाहीं. पैसे टाकले कीं, हवी तेवढी सोय होते आहे. युरोपियन लोकांच्या हॉटेलांतून वरील सोयी किती उत्तम प्रकारच्या असतात हें पुष्कळांस ठाऊक असेलच. त्यांत कित्येक गृहस्थ सहकुटुंब सहपरिवार सुद्धां हवे तितके दिवस राहूं शकतात. नाहीं तर आमच्या येथील मौज ! पाहुण्यानें पडशी खालीं ठेवावी तों घरांत तांब्या उपडा पडावा; म्हणजे मग यजमानांनीं भाकरी थोपटावी. आणि पाहुण्यानें वर चढवावी !

फिरस्त्या लोकांखेरीज विद्यार्थ्यांचीही भोजनगृहानें मोठी सोय होणार आहे हें उघड आहे. हल्लींच्या खानावळींतून तरुण विद्यार्थ्यांचा बंदोबस्त हवा तसा न राहून त्यांची कुमार्गाकडे प्रवृत्ति होण्यास व छचोरपणा माजण्यास किती कारण होतें हें सर्व प्रसिद्धच आहे; तर लोकनीतीच्या व विद्यावृद्धीच्या दृष्टीनें पहातांही. वरील विषयाकडे आमच्या देशबंधूंनीं लक्ष पुरविणें हें किती अगत्याचें आहे हें उघड आहे. सदरील कारखाना हा याच शहरांत प्रथम निघून तो हल्लींही बऱ्याच रीतीनें चालला आहे हें त्यास भूषणप्रद होय. तर त्याची अभिवृद्धि करण्याविषयीं आमच्या पुण्यजनवृंदास सूचना करून इतर ठिकाणींही त्याचा नमुना उचलण्याविषयीं आम्ही आपल्या आर्यबंधूंस सूचना करितों, आणि आटपतों.

युरोपिअन आणि नेटिव यांचें अन्योन्य संघट्टन

समानशीले व्यसनेषु सख्यम् ॥

महाराष्ट्र देशांत स्वराजीचा किंवा पेशवाईचा लय होऊन इंग्रजांचें स्वामित्व ठाम बसत गेल्यास आजमितीला फार नाहीं तरी पन्नास पाऊणशें वर्षें होऊन गेलीं. येवढ्या कालांत उभय राष्ट्रांतील पहिली द्वेषबुद्धि निरस्त होऊन त्यांची मैत्री घडून येण्यास बरींच कारणें झालीं आहेत, व उत्तरोत्तर ती मैत्री दृढ होत जाण्याचा संभव आहे, असें कित्येकांचें मत आहे; तेव्हां आमच्या राज्यकर्त्यांची आणि आमची ही स्नेहबुद्धि कोणच्या पल्ल्यास नेतां येईल किंवा नेणें इष्ट आहे, या दोन गोष्टींचा विचार करणें जरूर आहे.

इंग्रज लोकांचें प्रभुत्व आम्हांवर बरेच दिवस होऊन राहिल्यानें त्यांची विद्या, त्यांची राज्यपद्धति, त्यांच्या कला, त्यांचे रीतिरिवाज वगैरे गोष्टींचा प्रसार आमच्या देशांत पुष्कळ झाला आहे. इंग्रजी भाषेचा अभ्यास येथें जारीनें सुरू असल्यामुळें राज्यकर्ते आणि त्यांच्या प्रजा यांचें मनोगत परस्परांस कळविण्याचें प्रबल साधन झालें आहे; सारांश या देशांतील निदान मोठमोठ्या शहरांतील लोकांच्या चालचलणुकीवर आणि रीतीभातींवर इंग्रजी चालीरीतींची सफाईदार जिल्हई चढल्याचा भास होत आहे, व त्यामुळें उभय जातींचा भेदाभेद कमी होऊन दोहोंत प्रेमभाव उत्पन्न झालासें दिसत आहे, आणि त्याची वृद्धि करण्यासाठीं कित्येकांचे प्रयत्न सुरू आहेत. ते कोठपर्यंत फलद्रूप होण्याचा संभव आहे हें आपण प्रथम पाहूं.

साता समुद्रांपलीकडून आमचे प्रभु इकडे येऊन त्यांनीं आम्हांस आपल्या पराक्रमानें जिंकिलें आणि आपल्या अंमलाची या सुवर्णभूमींत तिच्या कल्याणासाठीं स्थापना केली, तेव्हां त्यांच्या या परमार्थबुद्धीबद्दल आम्हांस, स्वभावतः न होतां आलें, तरी विचारांतीं कृतज्ञ आणि राजनिष्ठ झालेंच पाहिजे. परंतु एका राष्ट्रास दुसरें राष्ट्र जें जिंकतें तें आपल्या फायद्यासाठीं जिंकतें असें कोठेंच होत नाहीं ! कोणत्याही राष्ट्राचें स्वातंत्र्य नष्ट करून त्याला पराजित करण्यांत जिंकणाऱ्या राष्ट्राचा त्याचें कल्याण करण्याचाच हेतु असतो व ज्या बुद्धीनें इंग्लंडानें

हिंदुस्थानचें राज्य काबीज केलें, त्याच बुद्धीनें ऐर्लंड देशही इंग्रज लोकांनीं आपल्या ताब्यांत ठेविला आहे, व आज तीन चारशें वर्षें ते त्याच्या उन्नतीसाठीं आपलें नफानुकसान न पाहतां शुद्ध परमार्थ बुद्धीनें अहर्निश झटत आहेत, तरी ऐर्लंडचे बटाटेखाऊ कृतघ्न क्याथालिक लोक दोन्ही बेटांचा चांगला मिलाफ होऊं देत नाहींत. त्या मंदबुद्ध बेट्यांना इंग्रज लोकांचा आणि आपला एकजीव करून घेतल्यानें आपलें केवढें हित होणार आहे हें कांहीं केल्यानें लक्षांतच येत नाहीं ! इंग्रजांनीं आपला प्रसादहस्त आंखडिला तर पृथ्वीच्या नकाशांतून ऐर्लंड नाहींसें होईल हें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं ! अकराव्या शतकांत मूचीकन्योद्भव नारमंडीप्रभूनें ब्रिटनचा हारोल्ड धुळीस मिळवून त्याची सत्ता बळकाविली, व साक्सन लोकांकडून फ्रेंच भाषेचा, फ्रेंच राज्यपद्धतीचा आणि फ्रेंच रीतरिवाजांचा स्वीकार करविला. हें सर्व वुइलियमानें आंग्लभौमांच्या कल्याणासाठींच केलें ! ' क्रीसी ' इतिहासकारानें त्या वेळच्या फ्रेंच लोकांच्या नांवानें जी रड गाइली आहे ती केवळ मूर्खपणाची. आस्ट्रिया, प्राशिआ, आणि राशिया यांनीं १८ व्या शतकांत पोलंड देशाचे तुकडे पाडून तो अजीर्णात गट्ट केला. हा सर्व प्रकार त्यांनीं पोलिश लोकांच्या हितासाठींच केला ! १९ व्या शतकाच्या आरंभीं बोनापार्टानें यूरोपांत जो धुमाकूळ मांडिला होता तो तरी त्या खंडांतील अनेक राष्ट्रांच्या हितासाठींच ! ट्युनिसप्रकरण, झुलूप्रकरण, ट्रान्सव्हालप्रकरण, अफगाणिस्थानची लढाई वगैरे सर्व गोष्टी त्या त्या ठिकाणच्या लोकांच्या कल्याणासाठीं चालल्या आहेत ! रानटी लोकांना त्यांचें खरें स्वरूप न कळतां ते मूर्खपणानें जिवांचे बळी पाडतात हें त्यांचें दुर्भाग्य ! मध्य एशियांत राशिया चाल करून येत आहे यांत कोसाक्स यांची लवलेश पापबुद्धि आहे असें नाहीं ! सातव्या आठव्या शतकांत अरब (मूर) लोकांनीं हुतुतू घालून सालमांकापासून कुस्तुंतुनिआपर्यंत सर्व यूरोपियन लोकांस जेरीस आणिलें हें तरी त्यांच्या फायद्यासाठींच ! खिस्ती शकाच्या पूर्वी पारसीकांचा प्रभू ग्झरक्झजि यानें अश्रुतपूर्व असें तुंबळ सैन्य आणि आरमार एकत्र करून स्वातंत्र्यप्रिय अशा चिमुकल्या ग्रीस देशावर स्वारी केली, व त्याच्या शहरांचा आणि वित्ताचा फडशा उडविला, हा कहर त्यांच्या हितांसाठींच केला ! आलेक्झांडर, ज्याला पूर्वेकडील लोक अलिसुंदर किंवा शिकंदर असें म्हणतात, त्यानें पंजाबावर स्वारी करून पोरस राजाशीं सामना करण्याचा घाट घातला हें त्या राजाच्या कल्याणासाठींच ! गिज-

नीच्या महंमदापासून नादीरशहापर्यंत कुराणभक्तांनीं स्वाऱ्या कर करून आर्यभूमि पुनः पुनः धुऊन काढिली, व हिमालयाच्या पायथ्यापासून कन्याकुमारीच्या टोंकापर्यंत शाह्याच शाह्या लावून दिल्या, तें सर्व त्यांनीं भरतपुत्रांचें नित्य कल्याण करण्याच्या उद्देशानेंच केलें असेल! दूर कशाला? महाराष्ट्राबाहेरच्या मराठ्यांच्या स्वाऱ्या देखील शुद्ध परमार्थबुद्धीनें झाल्या होत्या असें कोणाच्यानेंही निःशंकपणें म्हणवणार नाहीं. सारांश 'चळी तो कान पिळी' हा न्याय जगांत जेथें तेथें दृष्टीस पडतो. व याच न्यायानें जोंपर्यंत राष्ट्रांचें वर्तन चालेल तोंपर्यंत त्यांच्या परमार्थांच्या पोकळ गप्पांवर कोणीही समंजस मनुष्य भरंवसा ठेवणार नाहीं, व अशा दोन राष्ट्रांचा एक जीव होऊन त्यांची घट्ट मैत्री होण्याचा किंवा त्यांचें अन्योन्य संघट्टन होण्याचा फारच थोडा संभव असतो.

मागल्या खेपेस अनेक ऐतिहासिक उदाहरणें देऊन असा सिद्धांत केला कीं, दोन राष्ट्रांपैकीं एकाकडे स्वामित्व किंवा प्रभुत्व आणि दुसऱ्याकडे भृत्यत्व किंवा प्रजात्व आलें असतां त्या दोन राष्ट्रांची मैत्री होणें अत्यंत दुरापास्त होय. एकपक्षीं जय आणि दुसऱ्या पक्षीं अपजय होऊन अशा प्रकारचा सेव्यसेवकभाव उत्पन्न झाल्यानें अन्योन्य संघट्टनास कोणत्या रीतीनें व्यत्यय येतो तें पाहूं.

ज्याप्रमाणें जड अशा बाह्यसृष्टींत पदार्थांच्या संयोगावियोगाला त्यांचें समानधर्मत्व किंवा असमानधर्मत्व हीं कारण होतात, त्याप्रमाणेंच चल अशा अन्तःसृष्टीची गोष्ट होय. पाषाण आणि काष्ठ, धातु आणि मृत्तिका यांचें जसें संमेलन होत नाहीं, त्याप्रमाणेंच अधिकारी आणि अनाधिकारी, स्वामी आणि सेवक, सकांचन आणि निष्कांचन, स्वतंत्र आणि परतंत्र यांची मैत्री जुळत नाहीं. समशीलत्व हें अन्योन्यमैत्रीचें आद्यबीज किंवा अनन्यथासिद्ध आदिकारण होय. स्वभावविपर्यास जेथें झाला तेथें संघट्टन होण्याची बिलकुल अपेक्षा राहिली नाही. वरील वाक्यांचें याथार्थ्य ज्यांच्या लक्षांत बरोबर उतरेल त्यांना युरोपिअन आणि नेटिव यांचें परम सख्य कधींही बनावयाचें नाहीं असें जें आम्ही आग्रहानें म्हणतों, त्याचा चमत्कार वाटणार नाहीं. मनुप्रणीत ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्र या वर्णांनीं झालेल्या जातिभेदापेक्षां पराभवजन्य जो जातिभेद असतो तो फारच तीव्र असतो. दुसऱ्या लाखों गोष्टींमध्यें जरी एकता असली तरी 'प्रभूप्रजा' या एका भावानें सर्वांवर विरजण पडून एकजीव होण्याचा संभव नाहींसा होतो.

आमची आणि इंग्रज लोकांची तर गोष्ट राहूं द्या, पण फ्रेंच किंवा जर्मन, ऐरिश किंवा इंग्लिश यांच्या रीतीभातींत, आचारविचारांत, ज्ञानसुधारणेंत केवढें साम्य आहे ! तथापि त्यांची मैत्री घडत नाहीं ही आपल्या डोळ्यांपुढें धडधडीत उभी असणारी गोष्ट निरंतर लक्षांत ठेवण्याजोगी आहे. ऐरिशलोकांना इंग्लंडाप्रमाणें आपलें राज्य आपल्या हातांत पाहिजे आहे. इंग्रजलोकांना स्वार्थासाठीं ऐर्लंडावरील आपली चिकाटी सोडवत नाहीं. जर्मनीच्या मनांत आलसेस प्रांतांत आपला वरचष्मा असावा, फ्रान्सच्या मनांत आपला असावा–म्हणून दोघांदेशांचा जबर तेढा पडला आहे तो अजून सुटत नाहीं. पण दोघेही भल्ले खंबीर झोंबीखोर असल्यामुळें एकाचा सर्वस्वी नाश आणि दुसऱ्याची सर्वस्वी सरशी– असा परिणाम झाला नाहीं. बाकी इतर ठिकाणीं अशा प्रकारचे तंटे सुरू झाले म्हणजे दोहोंतून एकपक्ष धुळीस मिळतोच मिळतो. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रास जिंकून पादाक्रांत केलें म्हणजे त्या जिंकित राष्ट्राचेंच नुकसान होतें असें नाहीं, तर त्याच्या बरोबर त्या जिंकणाऱ्या राष्ट्राचें व इतर आजूबाजूच्या राष्ट्रांचें देखील मोठें नुकसान होतें. ज्याप्रमाणें शरीराच्या कोणत्याही भागास जखम झाली तरी तिच्या वेदना सर्वांगांत भिनावयाच्या, त्याप्रमाणें कोणतेंही राष्ट्र संगिनी आणि तोफा यांच्या माऱ्यांत सांपडलें तरी त्याचा थोडा बहुत संसर्ग इतरांस लागल्याखेरीज राहत नाहीं. सभोंवतालच्या राष्ट्रांस जिंकणाऱ्या राष्ट्राचा मत्सर व भीति उत्पन्न होऊन महत्त्वाकांक्षेनें व स्वसंरक्षणबुद्धीनें तींही आपापल्या तलवारी पुढें सरसावूं लागतात, आणि जिंकणाऱ्या राष्ट्रावर चालून जातात. मग त्यांतल्या त्यांत तंटेबखेडे आणि याद्व्या सुरू होतात. कोणी जिंकणाऱ्या राष्ट्राचा पक्ष घेतात, कोणी पराभूत राष्ट्राची बाजू उचलितात, व थोड्या वेळांत चोहोंकडे माणसें कापण्याचें काम जारीनें सुरू होतें ! व या रीतीनें एकाच्या सापराध लोभास्तव सर्वांना फळ भोगावें लागतें. ज्या राष्ट्रानें जयाशेनें किंवा धनाशेनें प्रथम कुरापत काढलेली असते त्याला आपल्या अपराधाबद्दल कधीं कधीं दुप्पट शिक्षा भोगावी लागते, व जें कांहीं आधाशीपणानें मटकाविलेलें असेल त्याच्या दुप्पट ओकावें लागतें. कोणतेंही राष्ट्र कितीही सामर्थ्यवान असो, त्यानें अशी घमंड बाळगूं नये कीं, अमुक एक देश मीं जिंकिला आहे, याचें स्वामित्व माझ्याकडे निरंतर राहिलच राहील. आतां पराजित देशांतील मनुष्यन् मनुष्य नाहींसा केला तर ती गोष्ट निराळी; पण कोणत्याही प्रकारें त्यांचें देशत्व मागें राहिलें तर तें जिंकणाऱ्या

राष्ट्राच्या मुळावर आल्याशिवाय कधींही सोडणार नाहीं. पराजित देश जों जों ज्ञानसंपन्न आणि धनसंपन्न होत जातो; तों तों जिंकणाऱ्या देशाशीं मैत्रीसंबंधानें जवळ जवळ येतो, असें आम्हांस वाटत नाहीं; मनुष्याला सुखावह काय आणि दुःखावह काय हें जर ज्ञानानें कळत असेल, आणि सुखावह गोष्टींच्या संपादनासाठीं व दुःखावह गोष्टींच्या निरसनासाठीं धनाचा उपयोग असेल, तर कोणताही देश, ज्ञान आणि धन यांनीं परिपूर्ण झाला म्हणजे दुसऱ्या देशाच्या ताब्यांत असणार नाहीं. व हिंदुस्थान देशाचें ज्ञान आणि धन प्रतिवर्षीं वाढत आहेत हें खरें असेल तर, इंग्रज आणि नेटिव यांची उत्तरोत्तर मैत्री वाढत जाणार नाहीं इतकेंच नाहीं, तर दिवसेंदिवस यांच्यांत कलागती लागत जाऊन परिणामीं हातघाईवर काम येऊन ठेपेल, व या रीतीनें हिंदुस्थानाला आपली मुक्तता करून घेतां येईल असें मानल्याखेरीज प्रत्यवाय नाहीं. हिंदुस्थानांत खरें ज्ञान आणि धन यांची वृद्धि होत जाऊन इंग्रज आणि नेटिव यांच्यांत बेबनाव न होतां सख्य होत गेलें तर मनुष्यस्वभाव आतां ज्या प्रकृतितत्त्वांनीं झाला आहे त्यांहून निराळीं तत्त्वें त्यांत उद्भवल्या शिवाय तशी गोष्ट होणार नाहीं. इतकें खरें आहे कीं, "परोपकारस्तु पुण्याय पापाय परपीडनं" हा धर्म, ज्याला युटिलिटेरिआनिझम् असें इंग्रजींत म्हणतात, तो पृथ्वींत उत्तरोत्तर पसरत गेला, आणि राष्ट्राचें वर्तन सुद्धां तत्प्रणीत मार्गानें चाललें, तर फार त्रास न पडतां हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हिंदुस्थानाला मिळेल. या धर्माचा प्रसार केवळ विद्यावृद्धीवर अवलंबून आहे. युरोपांतील बहुतेक देशांत या पक्षांचे लोक आहेत. या धर्माप्रमाणें "महत्संख्येचें महत्कल्याण" ज्या मार्गानें होतें तो नीतीचा उत्तम मार्ग. ग्लाडस्टन, रिपन, वगैरे सदय मंडळी याच मार्गाला अवलंबून असणारी आहे; आणि म्हणूनच यांची कारकीर्द हिंदुस्थानाला थोडीबहुत सुखावह जात आहे. किती जरी झालें तरी हिंदुलोक धनसंपन्न आणि ज्ञानसंपन्न झाले म्हणजे इंग्रजलोक एके दिवशीं आपलें चंबूगवाळें आटोपून चालते होतील असें कोणींही मानूं नये. राज्यशास्त्राप्रमाणें व ऐतिहासिक अनुभवाप्रमाणें हिंदुस्थानच्या लोकांची अक्कल आणि ताकद दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत जाऊन, व दिवसेंदिवस इंग्रजांची आणि त्यांची अधिकाधिक फाटाफाट होत जाऊन, शेवटीं घरची मंडळी आगंतुकांना धुडकावून लावणार. ही इष्ट गोष्ट आज उद्यां घडून येणारी नाहीं; इला शतकेंच्या शतकें लोटलीं पाहिजेत. व ही घडून येणार असें जर हिंदुस्थानच्या कपाळीं

लिहून ठेविलें असलें तर तसें होण्यास नेटिव लोकांचा इंग्रजांशीं प्रेमसंबंध न वाढतां उत्तरोत्तर उभयतांची फुटाफूट होत गेली पाहिजे. इंग्रज लोकांची आणि आमची निकट मैत्री होण्याच्या कामांत अनेक अडथळे आहेत त्यांपैकीं हा पहिला आहे. इंग्रजांत आणि आम्हांत राजपक्ष आणि प्रजापक्ष असा भाव निरंतर जागृत असल्यामुळें तो दोघांच्याही अंतःकरणाला सदां डांचत असतो. साहेबलोकांस असें वाटत असेल कीं, आम्ही काय राजे; आमच्या पूर्वजांनीं आपलें रक्त पाडून घेऊन हा देश काबीज केला; त्यांचीं मुलेंबाळें आम्ही या देशावर जगलों नाहीं तर दुसरें कोण जगायाचें आहे ! हिंदुस्थानावर आमचा पूर्ण अधिकार आहे, आमच्या कल्याणांत त्यांचें कल्याण साधलें तर करावयाचें; आमच्या पुढें त्यांची मातब्बरी चालावयाची नाहीं. ते आमच्या पोटांत; आम्ही त्यांचे देव आणि मायबाप; आम्ही करूं ती पूर्वदिशा. आणि खरोखरच अशाच थाटावर हिंदुस्थानचें राज्य चाललें आहे. शौर्यप्रतिष्ठा, अधिकारगर्व, निष्काळजी, वगैरे गुण प्रतिवर्षीं इकडे जें खिल्लार येतें, त्यांपैकीं कांहींच्या अंगीं असतात.

हिंदुस्थानांत असलेल्या किंवा येणाऱ्या इंग्रज लोकांवर "आम्ही प्रभु आहों" या बुद्धीचा असा परिणाम होतो. इकडे "आम्ही परतंत्र आणि पराधीन आहों" या बुद्धीचा वेगळाच परिणाम नेटिव लोकांच्या मनावर होत आहे व झाला आहे. तो कोणता हें पुढच्या खेपेस सांगून मग असल्या भिन्नप्रकृति लोकांच्या वर्तनांतलें अंतर दाखवूं.

शौर्यप्रतिष्ठा, अधिकारगर्व, निष्काळजी, वगैरे गुण आमच्या राज्यकर्त्यांपैकीं कांहींच्या अंगीं आले आहेत आणि येतात, हें मागल्या खेपेस सांगितलें. आतां आमच्या दास्यत्वामुळें आम्ही कोणत्या प्रकारचे लोक बनलों आहों, हें सांगून आमची आणि आमच्या प्रभूची मैत्री जुळण्याचा कितपत संभव आहे, हें दाखवावयाचें. तें करण्यापूर्वी इतकें सांगून ठेवितों कीं वर जी गुणमालिका दिली आहे ती येथें असलेल्या आमच्या प्रभुवर्गांपैकीं प्रत्येकाच्या कंठांत रुळतेच रुळते असा नियम नाहीं. कित्येकांचें वर्तन अपवादक असेल. शिवाय जयमदानें धुंद झालेल्या अत्रस्थ इंग्रजाचीच ही स्थिति. विलायतेंत असा प्रकार नाहीं हें सांगायाला पाहिजे असें नाहीं.

आमचें राज्य गेलें त्याच्या बरोबरच राज्य चालविण्यास लागणारे अवश्य गुण गेले असें म्हणण्यास हरकत नाहीं. कोणतेंही राष्ट्र कितीही रानटी असलें तरी तें

जोंपर्यंत स्वतंत्र आहे तोंपर्यंत त्याच्यांत थोडेबहुत तरी बुद्धिवान् आणि कल्पक मनुष्य असतात ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. अंगावर जबाबदारी असली म्हणजे मनुष्याला विचार करणें भाग पडतें आणि त्याच्या डोक्यांतून एकादे वेळेस तरी विलक्षण कल्पना निघते. 'प्रसंग हा नवीन युक्तीची जनकमाता होय' अशा अर्थाची एक इंग्रजींत म्हण आहे तींत पुष्कळ तथ्य आहे. व्यवहारांत अत्यंत कठिण गोष्ट म्हणजे राष्ट्राचें राज्य चालविण्याची. या गोष्टीचा बोजा ज्यांच्या शिरावर असतो त्यांचा मेंदू थोडाबहुत तरी पाजळला जाऊन त्यांतून कांहीं तरी निष्पन्न होतें. मांजराला चोहोंकडून आडविलें म्हणजे तें देखील सुटून जाण्यासाठीं नाहीं नाहीं त्या युक्ति लढवितें. मग माणसें पेंचांत आलीं असतां बचावासाठीं हरतऱ्हेनें एखादा तरणोपाय शोधून काढितात, हें मोठें नवल नाहीं. पण प्रसंगच आला नाहीं तर उगीच निष्कारण जिकीर करतो कोण ? इंग्रजांनीं परम दयाळु होऊन परमार्थबुद्धीनें आमचा सर्व कारभार आटपला आहे, तेव्हां आम्हांला आमचें डोकें खर्च करण्याची गरज राहिली नाहीं, परचक्राचें भय राहिलें नाहीं, म्हणजे आम्हांस राहिलें नाहीं. रूस लोकांची भीति इंग्रजांला, आम्हांला नाहीं ! कांहीं कमी अधिक झालें तर त्यांचे ते समाचार पाहून घेतील ! हिंदुस्थानचें राज्य त्यांना पाहिजे असेल तर लढतील नाहीं तर सोडून देतील ! आमच्या प्रभूंच्या साम्राज्य छायेखालीं आमची चैन चालली म्हणजे झालें ! बरें इंग्रज जाऊन रूस आला तरी त्याचा विधिनिषेध आम्हांस काय! उद्यां त्यांचें दास्य करण्यास आम्ही तयार आहोंच. चोर, परीट, आणि गाढव यांची समग्र गोष्ट येथें सांगण्याची जरूर नाहीं ! ! हें परचक्रसंबंधानें झालें. येथल्या येथें राजेरजवाड्यांत घरच्या घरीं किंवा आपआपसांत तंटे लागले म्हणून त्यांची तरी आम्हांस काय पर्वा ? खव्या-चढ्ढल तंटा करणाऱ्या दोन भाट्यांचा न्याय वान्नरानें ज्याप्रमाणें केला त्याप्रमाणें आमच्या बुद्बळी राजांची स्थिति झाल्यास आमचें काय वेंचणार आहे ? कायदे, कानू, पाठशाळा, यंत्रालयें, आणि दुसऱ्या अनेक हिताच्या गोष्टी इंग्रज लोक आपल्या आपण पाहून घेत आहेत; आम्हांला त्यांची कटकट कशाला पाहिजे ! आम्हांला कां राज्यें करायचीं आहेत कीं काय ? कारकुनांच्या, बटलराच्या, मोत-द्दाराच्या, पाणक्याच्या, हमालाच्या जागा एकूण एक नाहींशा होतील तेव्हां पुढचा विचार पाहून घेऊं ! निदान या घटकेस तरी हातपाय हालविण्याची गरज नाहीं ! प्राण आणि कुडी यांचा जोंपर्यंत वियोग झालेला नाहीं तोंपर्यंत विशेष

झटून उद्योग करण्याची गरज नाहीं; आणि तो झाला म्हणजे कशाचीच फिकीर नाहीं! शिवाय 'स्वदेश स्वदेश' म्हणून रात्रंदिवस शंख करण्यांत काय हंशील आहे? जे मारताहेत त्यांनीं काय दिग्विजय लावला आहे! स्वबंत्रता आणि परतंत्रता या कर्माधीन गोष्टी होत. मनुष्यांनीं करून त्या होत नाहींत, आणि नको म्हटल्यानें राहत नाहींत! नाहीं त्या उठाठेवीला हात घालून स्वतांचें नुकसान करून घेण्यांत हंशील नाहीं. उगीच पोकळ धामधूम आणि आरडाओरड केल्यानें कोठें राज्यें काबीज होत असतात! अर्धी सोडून सगळीच्या पाठीला लागण्यासारखा दुसरा मूर्खपणा नाहीं. लहान तोंडीं मोठा घांस घेण्यांत काय हंशील आहे? इंग्रज केवढे आम्ही केवढे! चालले आपले त्यांच्याशीं बरोबरी लावायाला! करंगळी सुजली म्हणून डोंगरायेवढी होणार काय? खरा मार्ग म्हटला म्हणजे भलत्यासलत्या कल्पना टाकून देऊन 'कुच रोटी कुच लंगोटी' या रीतीनें कसा तरी पोराबाळांचा गुजारा करून राहणें होय! नाहींतर काढली एकानें सार्वजनिक सभा! लागला दुसरा वर्तमानपत्रांत निरर्गल बरळायला! विचार न करितां पोंचाबाहेर लफडीं अंगावर घेऊन फें फें उडूं लागली कीं लागले दांत वासून लोकांपाशीं भिक्षा मागायला! कोणी सांगितल्या आहेत यांना येवढ्या उठाठेवी? पालनें झुरळ गट्टम केला म्हणून यांच्या पदरचें काय गेलें? परमेश्वररूपेनें पितृवत् पालन करणार असा प्रभु मिळाला आहे, त्याची निःसीमभक्तीनें सेवा करणें येवढें मात्र आमचें खरें कर्तव्यकर्म! मूर्खलोक देशाभिमानाच्या आणि स्वराज्याच्या बाता मारतात, पण इंग्रजांचें राज्य आल्यानें आमचें कायहो वांकडें झालें आहे? आगगाड्या, तारायंत्रें, विद्यालयें, दवाखाने, इनसाफकचेऱ्या, कायदेकौन्सिलें, पोलिसबंदोबस्त, तोफखाने, दारूगोळा, तटबंदी, रस्ते, पूल, तळीं, व्यापारवृद्धि-कमी तरी आहे काय? नेटिव लोकांचें राज्य असून आणखी काय मिळावयाचें होतें? आणि जेथें तें आहे तेथें काय बाजा वाजतो आहे? खरोखर म्हटलें म्हणजे स्वतः राज्य करण्याच्या कामास आम्ही पराकाष्ठेचे नालायक लोक आहों. आम्ही लायक असतों तर आमचें राज्य गेलेंच नसतें. पुन्हा पेशवाई स्थापन करून ब्राह्मणभोजनें घालावयाचीं हेंच कीं नाहीं! आहे हिंदूंचीं अक्कल माहीत! कोण मारामाऱ्या, कोण चोऱ्या, कोण लुटालुटी! यानें त्याच्या मानगुटावर बसावें, त्यानें याचा गळा धरावा, आणि शेवटीं दोघांनीं एकमेकांचा जीव घ्यावा, आणि

जोंपर्यंत स्वतंत्र आहे तोंपर्यंत त्याच्यांत थोडेबहुत तरी बुद्धिवान् आणि कल्पक मनुष्य असतात ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. अंगावर जबाबदारी असली म्हणजे मनुष्याला विचार करणें भाग पडतें आणि त्याच्या डोक्यांतून एकादे वेळेस तरी विलक्षण कल्पना निघते. 'प्रसंग हा नवीन युक्तींची जनकमाता होय' अशा अर्थाची एक इंग्रजींत म्हण आहे तींत पुष्कळ तथ्य आहे. व्यवहारांत अत्यंत कठिण गोष्ट म्हणजे राष्ट्राचें राज्य चालविण्याची. या गोष्टीचा बोजा ज्यांच्या शिरावर असतो त्यांचा मेंदू थोडाबहुत तरी पाजळला जाऊन त्यांतून कांहीं तरी निष्पन्न होतें. मांजराला चोहींकडून आडविलें म्हणजे तें देखील सुटून जाण्यासाठीं नाहीं नाहीं त्या युक्ति लढवितें. मग माणसें पेंचांत आलीं असतां बचावासाठीं हरतऱ्हेनें एखादा तरणोपाय शोधून काढिनात, हें मोठें नवल नाहीं. पण प्रसंगच आला नाहीं तर उगीच निष्कारण जिकीर करतो कोण ? इंग्रजांनीं परम दयाळु होऊन परमार्थबुद्धीनें आमचा सर्व कारभार आटपला आहे, तेव्हां आम्हांला आमचें डोकें खर्च करण्याची गरज राहिली नाहीं, परचक्राचें भय राहिलें नाहीं, म्हणजे आम्हांस राहिलें नाहीं. रूस लोकांची भीति इंग्रजांला, आम्हांला नाहीं ! कांहीं कमी अधिक झालें तर त्यांचे ते समाचार पाहून घेतील ! हिंदुस्थानचें राज्य त्यांना पाहिजे असेल तर लढतील नाहीं तर सोडून देतील ! आमच्या प्रभूंच्या साम्राज्य छायेखालीं आमची चैन चालली म्हणजे झालें ! बरें इंग्रज जाऊन रूस आला तरी त्याचा विधिनिषेध आम्हांस काय! उद्यां त्यांचें दास्य करण्यास आम्ही तयार आहोंच. चोर, परीट, आणि गाढव यांची समग्र गोष्ट येथें सांगण्याची जरूर नाहीं ! ! हें परचक्रसंबंधानें झालें. येथल्या येथें राजेरजवाडयांत घरच्या घरीं किंवा आपआपसांत तंटे लागले म्हणून त्यांची तरी आम्हांस काय पर्वा ? खव्याबद्दल तंटा करणाऱ्या दोन भाट्यांचा न्याय वान्नरानें ज्याप्रमाणें केला त्याप्रमाणें आमच्या बुद्बळी राजांची स्थिति झाल्यास आमचें काय वेंचणार आहे ? कायदे, कानू, पाठशाळा, यंत्रालयें, आणि दुसऱ्या अनेक हिताच्या गोष्टी इंग्रज लोक आपल्या आपण पाहून घेत आहेत; आम्हांला त्यांची कटकट कशाला पाहिजे ? आम्हांला कां राज्यें करायचीं आहेत कीं काय ? कारकुनांच्या, बटलराच्या, मोतद्दाराच्या, पाणक्याच्या, हमालाच्या जागा एकूण एक नाहींशा होतील तेव्हां पुढचा विचार पाहून घेऊं ! निदान या घटकेस तरी हातपाय हालविण्याची गरज नाहीं ! प्राण आणि कुडी यांचा जोंपर्यंत वियोग झालेला नाहीं तोंपर्यंत विशेष

झटून उद्योग करण्याची गरज नाहीं; आणि तो झाला म्हणजे कशाचीच फिकीर नाहीं ! शिवाय 'स्वदेश स्वदेश' म्हणून रात्रंदिवस शंख करण्यांत काय हंशील आहे ? जे मारताहेत त्यांनीं काय दिग्विजय लावला आहे ? स्वतंत्रता आणि परतंत्रता या कर्माधीन गोष्टी होत. मनुष्यांनीं करून त्या होत नाहींत, आणि नको म्हटल्यानें राहत नाहींत ! नाहीं त्या उठाठेवीला हात घालून स्वतांचें नुकसान करून घेण्यांत हंशील नाहीं. उगीच पोकळ धाम-धूम आणि आरडाओरड केल्यानें कोटें राज्यें काबीज होत असतात ? अर्धी सोडून सगळीच्या पाठीला लागण्यासारखा दुसरा मूर्खपणा नाहीं. लहान तोंडीं मोठा घांस घेण्यांत काय हंशील आहे ? इंग्रज केवढे आम्ही केवढे ! चालले आपले त्यांच्याशीं बरोबरी लावायाला ! करंगळी सुजली म्हणून डोंगरायेवढी होणार काय ? खरा मार्ग म्हटला म्हणजे भलत्यासलत्या कल्पना टाकून देऊन 'कुच रोटी कुच लंगोटी' या रीतीनें कसा तरी पोराबाळांचा गुजारा करून राहणें होय ! नाहींतर काढली एकानें सार्वजनिक सभा ! लागला दुसरा वर्तमानपत्रांत निरर्गल बरळायला ! विचार न करितां पोंचाबाहेर लफडीं अंगावर घेऊन फें फें उडूं लागली कीं लागले दांत वासून लोकांपाशीं भिक्षा मागायला ! कोणी सांगितल्या आहेत यांना येवढ्या उठाठेवी ? पालनें झुरळ गट्टम केला म्हणून यांच्या पदरचें काय गेलें ? परमेश्वरकृपेनें पितृवत् पालन करणार असा प्रभु मिळाला आहे, त्याची निःसीमभक्तीनें सेवा करणें येवढें मात्र आमचें खरें कर्तव्यकर्म ! मूर्खलोक देशाभिमानाच्या आणि स्वराज्याच्या बाता मारतात, पण इंग्रजांचें राज्य आल्यानें आमचें कायहो वांकडें झालें आहे ? आगगाड्या, तारायंत्रें, विद्यालयें, दवाखाने, इनसाफकचेऱ्या, कायदेकौन्सिलें, पोलिसबंदोबस्त, तोफखाने, दारूगोळा, तटबंदी, रस्ते, पूल, तळीं, व्यापारवृद्धि-कमी तरी आहे काय ? नेटिव लोकांचें राज्य असून आणखी काय मिळावयाचें होतें ? आणि जेथें तें आहे तेथें काय बाजा वाजतो आहे ? खरोखर म्हटलें म्हणजे स्वतः राज्य करण्याच्या कामास आम्ही पराकाष्ठेचे नालायक लोक आहों. आम्ही लायक असतों तर आमचें राज्य गेलेंच नसतें. पुन्हा पेशवाई स्थापन करून ब्राह्मण-भोजनें घालावयाचीं हेंच कीं नाहीं ! आहे हिंदूंचीं अक्कल माहीत ! कोण मारा-माऱ्या, कोण चोऱ्या, कोण लुटालुटी ! यानें त्याच्या मानगुटावर बसावें, त्यानें याचा गळा धरावा, आणि शेवटीं दोघांनीं एकमेकांचा जीव द्यावा, आणि

तिसऱ्यानेंच मधल्यामधेंच आपला कावा साधावा, हें आमचें शहाणपण ! देशांत कोठें स्वस्थता नाहीं. वित्ताचें आणि शरीराचें संरक्षण नाहीं, न्याय नाहीं, ज्यानें उठावें त्यानें लुटीत सुटावें अशी चोहोंकडे स्थिति ! आजकाल आपणांस इकडे तिकडे पाहण्याची गरज नाहीं; आपलें हपीस बरें कीं घर बरें ! !

याप्रमाणें आम्हांपैकीं शेंकडा नव्याण्णव लोकांच्या मनाची सांप्रतची स्थिति आहे असें म्हटल्यास बिलकुल अतिशयोक्ति होणार नाहीं असें आम्हांस वाटतें. 'स्वदेश' म्हणून कांहींएक पूज्य वस्तु आहे, आणि त्यांच्यासाठीं आत्महिताकडे किंचित् दुर्लक्ष करून झटणें योग्य आहे असें हजारांत एकाला देखील वाटत नाहीं. ज्याची त्याची आपापल्या पोळीवर तूप ओढण्याकडे नजर लागून गेली आहे. स्वहितासाठीं देशचा देश फडशा झाला तरी बेहेत्तर आहे पण तें साधलेंच पाहिजे. छोकरे लोक, मडम, आणि साब यांचा तळीराम गार झाला म्हणजे बस आहे. रस्त्यावर एखादें ओलें हाड पडलेलें पाहिलें म्हणजे ग्रामसिंहांची झुंडच्या झुंड ज्याप्रमाणें त्यावर जाऊन पडते, त्याप्रमाणें एखादी जागा रिकामी झाल्याची वार्ता ऐकिली कीं सर्टिफिकिटांच्या आणि अर्जांच्या सुरळ्या घे घेऊन लागले साहेबांच्या बंगल्यावर धांवायाला ! अधिकाऱ्यांची मर्जी संपादन करून घेऊन बढतीची जागा (प्रमोशन) उपटण्यासाठीं चुगल्या सांगण्यास, पंगत करण्यास, ग्लास झोंकण्यास, हाड चोंखण्यास, पोरें उचलण्यास, बूट पुसण्यास, आणि याहीपेक्षां निंद्यकर्मे करण्यास 'हां' म्हणून सदां उभे ! साहेबाच्या बबरजीच्या बबरजीची आज्ञा देखील शिरसावंद्य ! शब्दांचा मार किंवा बुटाचा मार दिला तरी लतकोडग्यासारखे फिरून हांजी हांजी करण्याला तयारच. देशकल्याणाच्या एखाद्या कामाची गोष्ट निघाली कीं सगळ्यांनीं घातलीं आपलीं शपटें खालीं ! पोकळ व्याख्यानें देण्यास मात्र काडीची कसर नाहीं ! आज काय आमक्या सभेचे चिटणीस, उद्यां काय तमक्या सभेचे अध्यक्ष, परवां काय तिसऱ्याच समाजाचे अध्वर्यु; या रीतीनें ऋतुऋतूला सडर्यांप्रमाणें रंग बदलण्यास आमच्यापैकीं मोठमोठे म्हणविणाऱ्यांस शरम वाटेनाशी झाली आहे. *करकरीत बुटिष्टाकण्या

---

* Stiff in opinions, always in the wrong,
Was every thing by starts, and nothing long ;
But, in the course of one revolving moon,
Was chemist. fiddler, statesman, and buffoon.

* * * * *

(पुढील पृष्ठ पहा)

आणि पाटलुणी घालाव्यात, मानेवर पडणारे चार बोटें जाडीचे तुळतुळीत घेरे राखावेत, इस्तरीचे कोट घालावेत, खांद्यावरून खडखडीत उपरणीं फडकत सोडावींत, आणि डोक्यावर एक कोकीदार फक्कड चक्री अलगत ठेवून द्यावी कीं बनले सभ्यगृहस्थ (जन्टलमन)! घरीं लेडीचा असाच थाट! चाकरी लागली कीं पुस्तकांची विल्हेवाट लागलीच पाहिजे! एखादे वेळेस हुक्कीच आली तर 'मिस्टरी बिस्टरी' चा एखादा व्हाल्यूम हाताशीं असल्यास उघडायाचा! चहाकाफीशिवाय चालायाचें नाहीं! मधून मधून पंचकव्याशिवाय ग्लानीचा परिहार करण्यास दुसरा उपाय नाहीं! ही आम्हांपैकीं इंग्रजी विद्या शिकून पढित शहाण्यांपैकीं बहुतेकांची स्थिति. याहून अगदीं भिन्न आणि अत्यंत वंद्य असें कित्येकांचें वर्तन आहे, यांत संशय नाहीं. तथापि सरसकट वर्णन करायाचें म्हणजे वरच्यासारखेंच केलें पाहिजे. सारांश इंग्रज बहादरांचें या देशांत राज्य झाल्यानें येथील लोकांच्या चांगल्या चांगल्या गुणांचा बहुतेक लोप झाला असें म्हणणें भाग पडतें. आतां इंग्रजलोक आम्हांस जी विद्या देत आहेत तिच्यामुळें कदाचित् ते सर्व आम्हांत पुनः उदयास येतील, व आमच्या उत्कर्षाला कारणीभूत होतील हें शक्य आहे; तथापि नवीन बीजारोपण करून परक्यांच्या जनतेनें वाढसि आलेल्या झाडांची गोष्ट घरच्या घरीं घराच्या माळ्यांनीं पाणी घालून फळास आणलेल्या झाडांच्या गोष्टीहून फार निराळी. 'आईचा कोंडा आणि इतरांचा मांडा'–या म्हणीची सार्थ

(मागील पृष्ठावरून चालू)

Blest madman ! who could every hour employ
With something new to wish or to enjoy.
Railing and praising were his usual themes,
And both, to show his judgment, in extremes.
John Dryden.

" (राजश्रींचीं) मतें हेकेखोर आणि नेहमीं चुकीचीं असावयाचीं. बेटयाला ज्या त्या गोष्टीचें फेंफरें यावयाचें, पण एक तरी स्थिर राहील तर ज्याचें नांव तें ! फार काय सांगावें, एक पंधरवाडा लोटतो आहे नाहीं तों हे (तैलबुद्धि) रसायनवेत्ते, वाद्यगुरु, राजकार्यधुरंधर आणि विदूषक बनून पार!! सारांश धन्य या टोणप्याची! ज्याच्या डोक्यांत प्रत्येक घडीला कांहीं तरी नवीन वांच्छच किंवा भोग्य वस्तूचा विचार घोळत असायाचाच; निंदा आणि स्तुति करणें हा ज्याचा नित्याचा धंदा; आणि तो कशाकरितां तर दोन्ही बाबतींत आपल्या शाहणपणाची सीमा प्रकट करण्याकरितां!!

वरील वर्तन आमच्या रा. बा. पैकीं एकास कसें टाम लागून जातें हें आमच्या धूर्त वाचकांच्या लक्षांत आल्याखेरीज राहणार नाहीं.

कता राजकारणांत जशी होते तशी अन्यत्र होत नाहीं. आंग्लविद्येच्या सरस व मधुर फलांचा लाभ आम्हांस केव्हां होईल तो होवो ! पण आज तारखेला आम्ही देशाभिमानशून्य, धर्माभिमानशून्य, नष्टशौर्य, नष्टवित्त, नष्टाचार, द्रव्याभिलाषी, निरुद्योगी, लोभी, मत्सरी, डोली, हेकड, टवाळ, लांचलुचपतखोर, हांजीहांजीखोर, चहाडखोर, खाल्ल्याघरचे वांसे मोजणारे आणि हरामखोर असे झालों आहोंत. अशा आमचें आणि आम्हांहून अत्यंत प्रकृतिभिन्न अशा इंग्रजांचें संघट्टन कसें होणार ?

मागल्या खेपेस पारतंत्र्यामुळें आमच्या अंगीं कोणते अवगुण आले आहेत हें दाखविलें; व त्याच्या पूर्वीच्या अंकांत प्रभुत्वामुळें येथें असणाऱ्या इंग्रज लोकांच्या प्रकृतीवरही काय परिणाम झाला आहे हें सांगितलें आहे. एकंदरीनें पाहतां त्यांच्या आमच्यांत नेहमीं छत्तिसाचा आंकडाच रहावा अशी उभयपक्षांची स्थिति आहे. याच मुद्याचा आज आणखी थोडासा खुलासेवार विचार करणें जरूर दिसतें. 'शौर्यप्रतिष्ठा' वगैरे इंग्रज लोकांच्या अंगची जी गुणमालिका आम्हीं दिली आहे तीवरून कित्येकांस असें वाटूं लागलें आहे कीं, आम्ही आपले लिहिण्याच्या झोंकांत लेखणीला हवतिशी बागडूं देतों. तसेंच मागल्या खेपेस कित्येक आधुनिक विद्वानांचें जें वर्तनदोषाविष्करण केलें आहे तें वाचूनही पुष्कळांस वाईट वाटलें असेल, व लिहितांना आम्हांस सुमार रहात नाहीं अशी शंकाही आली असेल. पण जो कोणी निष्पक्षपातानें आमच्या लेखांचें मनन करील, व आपल्या भोंवती नजर फेंकून आम्हीं वर्णिलेली स्थिति खरी आहे कीं नाहीं हें पहाण्यापुरता परिश्रम करील, त्याला आमच्या लिहिण्याचा पडताळा आल्याशिवाय राहणार नाहीं. म्हटलें आहे "अप्रियस्य चापथ्यस्य श्रोता वक्ताच दुर्लभः" या न्यायानें आमचे लेख तीक्ष्ण आणि कटु लागण्याचा संभव आहे. त्यावर आमचें एकच उत्तर आहे तें हें कीं, आमच्या देशबंधूंनीं आम्हांवर न रागावतां शांततेनें आपल्यामधलि अवगुण काढून टाकण्याची खटपट करावी आणि आमचें लिहिणें खालीं पाडण्याची इच्छा धरावी. घरांत पोटभर अन्न मिळण्याची मारामार असतां, बाहेर निघाले कीं इस्तरीचे आंगरखे, रेशीमकांठीं लाल उपरणीं आणि फटक फटक करणारे कंगणीदार जोडे चढवून, हायकोर्टा-पासून राणीच्या बागेपर्यंत, आणि बंडबागेपासून पर्वतीच्या तळ्यापर्यंत भडकत

फिरणारे इषकबाज लोक कमी आहेत काय ? ज्यानें त्यानें आपापल्या अंतः-करणाशीं विचार करावा आणि आमच्या देशाची केवढी दीनावस्था झाली आहे हें पहावें. ज्या दिवशीं आमचें राज्य गेलें त्या दिवशीं आमच्या अंगांतला मर्द-पणा गेला असें मानण्यास हरकत नाहीं. ज्याप्रमाणें मेंढक्या मेंढरांस पाहिजे तिकडे वळवितो, त्याप्रमाणें आमच्या स्वामींना आम्हांस पाहिजे तसें वागवितां येतें. जीं राष्ट्रें स्वतंत्र असतात, त्यांच्या अंगांत रग म्हणून कांहीं एक अमोलिक वस्तु असते, ती आम्हांमधून अगदीं अदृश्य झाली, असें कोणीही कबूल करील. थोड्या दिवसांपूर्वी 'बांबेग्याझेटां'त जर्मन लोकांच्या संबंधानें निंद्य असे लेख आले होते, त्याबरोबर येथें असलेल्या जर्मन लोकांनीं त्या पत्राची कशी त्रेधा उडवून दिली, हें आमच्या बहुतेक वाचकांच्या लक्षांत असेलच ! कारण काय म्हणाल तर तें फारच क्षुल्लक होतें. जर्मन लोक आपल्या बायकांस मारतात, गुरांप्रमाणें त्यांना वागवितात, व त्यांच्याकडून फार हलक्या प्रकारचीं कामें करून घेतात, अशा प्रकारचा मजकूर त्या पत्रांत आला. तो आल्याबरोबर दुसरे दिवशीं सह्या घालून 'बांबेग्याझेटा'ला मुंबापुरस्थ शार्मण्यांनीं अशीं पत्रें लिहिलीं कीं, अशा प्रकारचे बेअब्रूचे लेख तुम्हीं कोणत्या आधारावरून लिहिलेत तें सिद्ध करून द्या, नाहींतर आमच्या राष्ट्राची अब्रू घेतल्याचा खटला आम्ही तुम्हांवर चालवूं ! याप्रमाणें पत्रांचा जेव्हां चोहोंकडून मारा झाला, व उत्तर देण्यास कांहीं सवड सांपडेना, तेव्हां राजश्रींनीं झकत क्षमा मागितली ! ! याला म्हणावा देशा-भिमान ! नाहीं तर आम्ही ! वर्तमानपत्रांतून आमची हवीतशी टवाळी नित्य चालते, यांत कांहींच नाहीं; पण मेकाले व मिल्लुसारख्या इतिहासकारांनीं आह्मांस शंढ, लुच्चे, पाजी, गाढव असें साफ म्हणून ठेविलें आहे. मेकालेनें या देशांत बरींच वर्षें काढिलीं असल्यामुळें हिंदुस्थानासंबंधीं त्याच्या लेखाला इंग्लंडांत पुष्कळ मान आहे; व त्यानें तर आह्मांविषयीं वर निदर्शिल्याप्रमाणें आपलें मत ठोकून दिलें आहे. आगबोटीवर चढतांना आमच्या सिविलसुरवंटांच्या हातांत पडणारा जाडी ग्रंथ म्हटला म्हणजे मेकालेचा निबंधसंग्रह ! आगबोटींतल्या आगबोटींत दहापंधरा दिवस या संग्रहाचीं, आणि अशाच प्रकारच्या दुसऱ्या मासलेवाईक ग्रंथांचीं पानें चाळलीं, कीं बनले आमचे साहेब हिंदुस्थानच्या लोकस्थितीच्या ज्ञानांत पहिल्या प्रतीचे प्रवीण प्रोफेसर ! ! किनाऱ्यावर पाय ठेविल्याबरोबर कोणी विनंति केल्यास चार व्याख्यानें झोडण्याइतकी तयारी होऊन पार ! तर अशा रीतीनें अगोदरच दूषित

होऊन आलेल्या हापिसरांच्या हातून आमच्या लोकांचा प्रतिदिवशीं उपमर्द होतो यांत नवल तें कोणतें ? हिंदु लोक अर्धवट रानटी आहेत ही कल्पना सर्व इंग्रज-लोकांच्या मनांत पुरतेपणीं खिळून गेलेली आहे; त्यामुळें आम्हीं कांहीं केलें आणि कितीही जपून वागलों, तरी आमची वागणूक त्यांच्या पसंतीस पूर्णपणें कधींही यावयाची नाहीं. महारोगानें ग्रस्त झालेल्या मनुष्याचा आपण जसा कंटाळा करितों, त्याप्रमाणें आमच्या काळ्या कातडयाचा त्यांना स्वाभाविकपणें कंटाळा येत असेल. नट्टापट्टा करून बंगल्यावर भेटीस जाणाऱ्या श्रीमंत लोकांची गोष्ट राहूं द्या, पण शहरांतील रस्त्यांत, बाजारांत, शेतांत फिरणारे उघडेबंब काळे कुळंबट पाहून, निरंतर चिरगुटांत गुरफटलेल्या आमच्या पाश्चात्य प्रभूंना त्यांचा घडोघडीं तिरस्कार येत असेल हें सांगायला पाहिजे असें नाहीं. साहेब लोक आपल्याशीं जो थोडा-बहुत संबंध ठेवितात तो ठेवणें त्यांना भागच पडतें म्हणून ते ठेवितात, व जितका तो टाळवेल तितका टाळण्याचा त्यांनीं प्रयत्न करणें अगदीं स्वाभाविक आहे. आमची अशी खात्री आहे कीं कांहीं वर्षांनीं इंग्रजी दाया, इंग्रजी घोडेवाले, इंग्रजी बबरजी, आणि इंग्रजी बुट्लेर इकडे येऊं लागले तर खालच्या प्रतीच्या नेटिवांना साहेब लोकांच्या बंगल्याची पायरी सुद्धां कोणी चढूं देणार नाहीं. व्यवहारांत अशी म्हण आहे कीं " कोणाचा होऊं नये चाकर आणि कोणाची होऊं नये बायको. " म्हणजे या दोन स्थितींत मनुष्याला स्वातंत्र्यसुखाचा लाभ बिलकुल मिळत नाहीं, म्हणून त्या अत्यंत दुःखप्रद आहेत. द्रव्यहीनत्वामुळें एकाला दुसऱ्याची सेवा करावी लागते, व त्यामुळें दोघांत सेवक आणि धनी हा भाव उत्पन्न होतो; पण एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रास जिंकलें असतां त्या त्या राष्ट्रांतील लोकांमध्यें जो सेव्यसेवकभाव उत्पन्न होतो, तो धनी आणि चाकर यांच्यामधील सेव्यसेवकभावा-पेक्षां शंभरपट खडतर असतो. प्रभुवर्गांपैकीं अगदीं हलकट प्रतीच्या मनुष्यास देखील असें वाटतें कीं माझ्यापुढें नेटिवांचा पाड काय ! किती झालें तरी आम्हीं तलवार गाजविणारे ! आणि हे पराजित ! यांनीं आमच्यापुढें प्रतिष्ठा कशासाठीं मिरवावी ? ही गर्वबुद्धि आमच्या प्रभुवर्गांपैकीं बहुत लोकांच्या मनांत नेहमीं जागृत असल्यामुळें, आमच्यापैकीं मोठमोठ्या लोकांचा ते बेधडक हवा तसा अपमान करितात, व त्याबद्दल त्यांना तिळभर वाईट वाटत नाहीं. आज काय धरला एक रावसाहेब आणि नेला धक्के देत गेटावर; उद्यां काय हसडल्या दुसऱ्या एका-वर पांच पन्नास शिव्या; परवां ओढला एकाला गाडींतून ! याप्रमाणें एकेक दिवस

नवीन प्रकार कानीं येतात. हें माहात्म्य कशाचें म्हणाल तर जयमदजन्य गर्वाचें. "नको बोवा ही चाकरीची झारकी; खायला मिळालें नाहीं तर पोटांत कांटे भरावे," अशारीतीनें विवळणाऱ्या मामलतवाल्यांचा हेल पुष्कळांच्या कानीं पडला असेल. ही आम्हांपैकीं वरील प्रतीच्या नोकरांची गोष्ट झाली. याहीपेक्षां विशेष दुर्दशा म्हटली म्हणजे पोटासाठीं साहेबलोकांच्या घरीं पट्टेवाल्याची किंवा कुत्तेराख्याची नोकरी करणारांची. असल्या नोकरांवर साहेबबहादूर केव्हां कसे कदरतील याचा सुमार नाहीं. आज काय कोणी साहेब शिकारीला गेले असतां, अवसान न राहिल्यामुळें सावजावर गोळी पडावयाची ती जवळच्या शिपुड्यांवर किंवा वाटसरावर येऊन धडकली! उद्यां काय साहेबांची स्पृहा वाढली असल्यामुळें तिच्या झटक्यांत त्यांनीं चाकरास बुटाची लाथ मारून परलोकास पाठविलें! परवां काय बाटलाबाईंच्या तारेंत शुद्धीवर नसल्यामुळें लठ्ठंभारती अमकीतमकीच्या अंगावर चालून गेले! याप्रमाणें अधिकारमदानें वोढवलेल्या बेफामपणामुळें अतिशय निंद्य असे प्रमाद आमच्या प्रभुवर्गापैकीं कित्येकांच्या हातून मधून मधून घडून येतात, असें कोर्टापुढें येणाऱ्या खटल्यांकडे पाहिलें असतां सहज लक्षांत येणार आहे. बरें अशा प्रकारच्या अपराध्यांला त्यांच्या अपराधानुसार शिक्षा होईलच होईल असें नाहीं. त्यांच्यासाठीं कायदे निराळे; त्यांच्यासाठीं कोर्टें निराळीं; त्यांच्यासाठीं शिक्षा निराळ्या! राजकर्त्यांची प्रतिष्ठा (प्रेस्टीज,) राहण्याकरितां तसा भेदाभेद केलाच पाहिजे! गोरा तुमानवाला सापराध ठरला तरी जुरी क्षमेबद्दल शिफारस करावयाचीच; बहुतेक बाबतींत ठरलेली शिक्षा म्हटली म्हणजे मोठ्या पगारावर दूर ठिकाणीं रवानगी! फारच मोठा गुन्हा असल्यास 'फरलो' घेऊन इंग्लंडांत वर्षभर काढून आले कीं झालें सगळ्या दोषांचें क्षालन! मातक्यान प्रमोशनाच्या वरणीला जयदत्त करून उभेच! असें नसतें तर आतां जे जागोजाग ठोंबे अधिकारी दिसतात त्यांचा टिकाव कसा लागला असता? या इलाख्यांत देखील असे जज्ज, मॅजिस्ट्रेट, व सुप्रिंटेंडंट सांपडतील कीं ज्यांच्या कोर्टाची पायरी चढण्यापेक्षां मृत्यु बरा वाटतो. नोकरीच्या किंवा कामकाजाच्या संबंधानें अशांच्या पुढें जावें लागतें, याला इलाज नाहीं; पण जो खरा निर्लोभी असेल, व ज्याला स्वाभिमान म्हणून कांहीं असेल, तो अगदीं जरूरीच्या कामाखेरीज अशांचें मुखावलोकनसुद्धां करणार नाहीं. इंग्रजलोकांचींच वर्तणूक अशी आहे म्हणून त्यांना विशेष दोष देणें रास्त नाहीं. जेथें जेथें परकीय राज्यकर्ते

आहेत, तेथें तेथें असाच प्रकार चालायाचा; मग ते इंग्रज असोत, फ्रेंच असोत, जर्मन असोत, कीं हिंदु असोत. परकीय प्रभूंच्या अंगीं असें औधत्य येणें हें अत्यंत साहजिक आहे. शिवाय वरील प्रकाराहून अत्यंत भिन्न असेंही पुष्कळांचें वर्तन असतें. या देशांतही कोठें कोठें वर्डस्वर्थ, वेडर्बर्न सांपडतात; व यांच्या-सारख्यांशीं सलगी करणें शक्य आहे. पण असल्या थोडया माणसांखेरीज या देशांत जी घबाड गोरी मंडळी आहे, तिच्याशीं कोट्यावधि वर्षें तपें केलीं तरी आमच्या लोकांचें संघट्टन घडण्याची वार्ता नको.

आजपर्यंत या विषयावर जे निबंध लिहिले गेले त्यांत इंग्रजलोक आमचे राज्य-कर्ते आणि आम्ही त्यांच्या प्रजा, या संबंधानें त्यांच्या व आमच्या स्वभावांत जें नैसर्गिक अंतर पडलें आहे, त्यामुळें त्यांची आमची मैत्री जुळणें हें किती कठिण आहे, हें दाखविलें. आतां ही मैत्री होण्याला कित्येक बाह्योपाधिही आड येतात; त्यांपैकीं पहिली उपाधि भाषाभिन्नत्वाची होय. तेव्हां तिच्यासंबंधानें आज थोडेसें लिहिण्याचा हेतु आहे.

एका राष्ट्राचे लोक दुसऱ्या राष्ट्राच्या भाषेचा अभ्यास करितात तो कांहीं तरी हेतूनें करितात हें उघड आहे. कोणाला झालें तरी विनाकारण मानसिक श्रम कर-ण्याची हौस असत नाहीं. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी या देशांतील युनिव्हर्सिटिमधून ग्रीक, ल्याटिन, व क्वचित् क्वचित् संस्कृत, अरबी, पराशिअन आणि हिब्रयू या भाषां-चा अभ्यास चालतो. या परकी भाषांचा अभ्यास करण्याचें मुख्य कारण कर्मणूक होय. ज्या ग्रीस देशांत साक्रेतीस, प्लेटो, आरिस्टाटल यांसारखीं रत्नें होऊन गेलीं, त्या देशाची भाषा शिकून तद्द्वारा तेथील कविशिरोमणींनीं व तत्त्ववेत्यांनीं आपल्या ग्रंथरूप कांचनपात्रांत सांठवून ठेवलेलें जें विचारामृत, त्याचें यथेच्छ प्राशन करून, ज्ञानसंपादनाकांक्षारूपतृषेनें आर्त झालेलें जें मन, त्याचें समाधान कर-ण्यांत जो आनंद आहे त्याची महती काय विचारावी! होमर काय; व्हर्जिल काय, व्यासवाल्मीकी काय–यांपैकीं कोणा एकाचेही ग्रंथ मूळ भाषेंत वाचण्या-साठीं परक्या भाषेच्या अभ्यासाचे श्रम करण्यास कोणीही तयार होईल. आतां 'गाडयाबरोबर नळ्याला काशियात्रा' या न्यायानें कर्मणुकेसाठीं या भाषांचा अभ्यास केला असतां त्यापासून दुसरे पुष्कळ फायदे करून घेतां येतात ही गोष्ट निराळी; पण मूळ हेतु मनोरंजन करण्याचा हें कोणीही कबूल करील.

इंग्लंडचा प्रवास करण्यास कोणी निघाला असला म्हणजे वाटेनें लागणाऱ्या इतली, फ्रान्स वगैरे देशांची माहिती मिळविण्यासाठीं त्याला निराळा खर्च केला पाहिजे असें नाहीं; त्याप्रमाणें मनोरंजनासाठीं जरी एखाद्या परक्या भाषेचा अभ्यास केला तरी, त्याच्याबरोबरच दुसऱ्या पुष्कळ गोष्टींचा लाभ होतो; ज्या देशाची ती भाषा असेल त्या देशांतील लोकांच्या चालरीति, नीति, धर्म, कला वगैरे इतर अनेक गोष्टींचें ज्ञान फुकटांत पदरीं पाडतां येतें. त्याप्रमाणेंच ज्यांना भाषापरिज्ञानाचा किंवा इतिहासाचा षोक असेल त्यांना असल्या अभ्यासापासून आपला इष्ट हेतु पुरविण्याच्या कामीं बरेंच सहाय्य होतें. आणखी एका कारणासाठीं लोक परभाषेचा अभ्यास करीत असतात. तें असें कीं, परक्या भाषेंत तत्त्वविचार किंवा शास्त्रकला यांवर जे नवीन नवीन ग्रंथ होत असतील, त्यांचें आपल्या भाषेंत भाषांतर करून आपल्या लोकांस दुसऱ्या लोकांपेक्षां ज्ञान आणि सुधारणा यांत मागें राहूं द्यावयाचें नाहीं. या हेतूनें परकीय भाषेचा अभ्यास करण्यामध्यें मनोरंजनापेक्षां उपयोगावर विशेष दृष्टि असते. अलीकडे युरोपांत असा कांहीं चमत्कार झाला आहे कीं, कोणत्याही विषयावर कोणत्याही भाषेंत नवीन महत्त्वाचा ग्रंथ झाला कीं, दोन तीन महिन्यांच्या आंत त्याचीं भाषांतरें होऊन सर्व देशांत त्याची प्रसिद्धि होते. एखाद्या नवीन शोधाची शहानिशा करण्याविषयीं पश्चिमेकडील लोक अलीकडे किती दक्ष झाले आहेत हें पुढील हकीकतीवरून तेव्हांच ध्यानांत येईल. थोड्या वर्षांपूर्वी रा० ब० केरोलक्ष्मण छत्रे यांनीं सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत पर्जन्य आणि अवर्षण यासंबंधानें कांहीं उपपत्ति प्रसिद्ध केली होती, ती हिंदुस्थान सोडून जी निघाली, ती भूमध्य समुद्राचें उल्लंघन करून इतलींत उतरली, व तेथून जर्मनींतून तडक निघून जाऊन हालंडांतील एका माथेफिरू गणित्याच्या टेबलावर जाऊन पडली! त्यानें ती समजाऊन घेऊन तिचें खंडन केलें, आणि, जर्मन भाषेंत तें छापून, त्याची एक प्रत अवलोकनासाठीं आणि प्रत्युत्तरासाठीं आमच्या ज्योतिषीबोवाकडे पाठविली. पण येथें तें कोणाला समजणार!! सारांश काय कीं, परकी देशांनीं शोधून काढलेल्या नवीन युक्ति, नवीन कल्पना, यांचा लाभ आपापल्या जन्मभूमीस तत्काल करून देण्यासाठींही परक्या भाषेचा अभ्यास करण्याचा परिपाठ पडला आहे. या दोन कारणांखेरीज आणखी एका कारणासाठीं एका राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राची भाषा शिकावी लागते. हिंदुस्थानचे लोक मरमरून

इंग्रजी भाषेचा जो अभ्यास करितात तो वास्तविक पहातां कर्मणुकेसाठीं नव्हे, किंवा परदेशाच्या ज्ञानाचा स्वदेशांत प्रसार करण्यासाठींही नव्हे. इंग्रजलोक आमचे प्रभु आणि आम्ही त्यांचे भृत्य; त्यांचें आमचें दळणवळण नीट चाललें पाहिजे, आमच्या इच्छा, आमच्या नडी व आम्हांस दुःख देणाऱ्या गोष्टी त्यांस समजल्या पाहिजेत, त्यांनीं आम्हांस आपल्या पदरीं नोकऱ्या दिल्या पाहिजेत— अशा अनेक कारणांसाठीं इंग्रजी भाषेचा अभ्यास करणें आमच्या कपाळीं आलें आहे. या भाषेचा अभ्यास करण्यानें आमचें कांहीं नुकसान न होतां उलट फायदा होत आहे असें कित्येकांचें म्हणणें आहे तें कांहीं अंशीं खरें आहे; पण स्वतंत्रता असून कर्मणुकेसाठीं किंवा ज्ञानसंपादनासाठीं परक्या भाषेचा अभ्यास करणें, हें, पारतंत्र्यामुळें परकीय स्वामींच्या परक्या भाषेच्या कराव्या लागणाऱ्या अभ्यासाहून, फार वेगळें होय. आम्ही स्वतंत्र असतों, आणि आम्हांला केवळ कर्मणुकेकरितां किंवा ज्ञानसंपादनाकरितां परक्या भाषेचा अभ्यास करण्याची पाळी येती तर आम्हीं सगळ्यांनीं मेकालेमिल्लवरच, झडपा घातल्या असत्या असें नाहीं. कोणी डेक्काची (फ्रेंचमन) ओळख करून घेतली असती, कोणी श्लेजेलच्या (जर्मन) संगतीनें रात्री घालविल्या असत्या; कोणी डान्टीचें (इटालियन) कल्पनाचातुर्य आणि देशाभिमान यांचें आश्चर्य करीत राहिला असता. नुसत्या इंग्रजीचा अभ्यास करण्यानें आमचे विचार पराकाष्ठेचे एक-देशीय होऊन आमच्या आंग्लभौम प्रमूखेरिज पृथ्वीतलावर दुसरें अधिक चांगलें राष्ट्र नाहीं, अशी आमची समजूत होऊं लागली आहे. फार कशाला, अलीकडे वर येऊं लागलेला जपान देश आपले सगळे विद्यार्थी लंडनालाच पाठवीत नाहीं. फ्रान्सांत, जर्मनींत, इटलींत, अमेरिकेंत, आणि रानटी रशियांत देखील त्या देशाहून प्रतिवर्षी अनेक विद्यार्थी धाडले जातात. दुसरी एक लक्षांत ठेवण्या-जोगी गोष्ट ही कीं, कोणतेंही राष्ट्र स्वतंत्र असलें म्हणजे त्यांतील सर्वच लोक, निदान सगळे बुद्धिवान् आणि होतकरू लोक, परक्या भाषेच्या अभ्यासांत दंग होऊन गेलेले असतात असें नाहीं; किंवा परक्या भाषेंत निष्णात झालेल्यांसच राज्यांतील मोठमोठे हुद्दे आणि लौकिकाचीं व जबाबदारीचीं कामें मिळण्याचा संभव असतो असें नाहीं. कोणत्याही स्वतंत्र राष्ट्रांतील सगळ्याच हुशार लोकांनीं परक्या भाषेच्या अभ्यासाचे श्रम करणें शक्य नाहीं इतकेंच नाहीं, पण तें शक्य असतें तरी तसें करणें अत्यंत अनिष्ट होतें. अशानें राष्ट्राच्या समाईक मान-

सिक शक्तीचा दुर्विनियोग होतो हें उघड आहे. कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्रांचीं सर्व कामें श्रमविभागाला धरून चाललीं पाहिजेत. व्यापार, व्यवहार वगैरे सर्व गोष्टींत या तत्त्वाचें अनिर्विवाद प्राबल्य आहे. या दृष्टीनें पाहतां कोणत्याही राष्ट्रांतील बहुतेक बुद्धिवान् लोकांनीं परक्या भाषेचें ज्ञान संपादण्यांत आपली हिंमत खर्च करणें हें अगदीं अप्रशस्त आणि अहितकारक होय.

एकंदरींत आज इतकें दाखविलें कीं एका भाषेचे लोक दुसऱ्या भाषेचा अभ्यास करितात तो कधीं कर्मणुकेसाठीं, व कधीं उपयोगासाठीं करितात आणि कधीं कधीं या दोहोंपैकीं एकही हेतु नसतां नाइलाजास्तव त्यांना तो करावा लागतो. आणखी एक अशी गोष्ट सांगितली आहे कीं, कोणत्याही देशांतील सगळ्याच बुद्धिवान् लोकांना परभाषेचा अभ्यास करावा लागणें किंवा त्यांचा अभ्युदय तिच्या ज्ञानावर अवलंबून राहणें हें फार अहिताचें आहे. या दोन गोष्टींच्या जोडीला आणखी दोन तीन गोष्टी सांगावयाच्या आहेत, त्यांचा आणि यांचा एकत्र विचार केला म्हणजे भाषेच्या अडचणीमुळें इंग्लिश लोकांचें आणि आमचें चांगलेंसें संघट्टन कधींही होणार नाहीं, हें स्पष्ट दिसून येईल.

मागल्या अंकांत असें दाखविलें आहे कीं, एका भाषेचे लोक दुसऱ्या भाषेचा अभ्यास करितात तो कर्मणुकेसाठीं, उपयोगासाठीं किंवा नाइलाजासाठीं होय. दुसरें असेंही सांगितलें आहे कीं, कोणत्याही मनुष्याचा उत्कर्ष परक्या भाषेच्या ज्ञानावर अवलंबून राहणें हें चांगलें नाहीं. पण आम्ही परकीय राजकर्त्यांच्या सत्तेखालीं असल्यामुळें देशभाषेंत आमची कितीही प्रवीणता असली तरी तिचें चिज न होतां लौकिकसंपादन आणि द्रव्यप्राप्ति हीं राजभाषांकित होऊन राहिलीं आहेत. ज्यानें त्या भाषेचें ज्ञान संपादिलें नाहीं तो कितीही बुद्धिमान किंवा चतुर असला तरी त्याच्या गुणांचें तेज पडत नाहीं. आमच्या देशी ग्रंथांतून जितकें हवें तितकें ज्ञान नाहीं ही अनिर्विवाद गोष्ट आहे, पण तें असतें तरी त्याचा उपयोग होता किंवा नाहीं याचा मोठाच संशय आहे. अशी कल्पना करा कीं बिएची किंवा एम् एची पदवी धारण करणाराला अनेक गोष्टींच्या संबंधानें जितकें ज्ञान असतें, तितकें किंबहुना त्याहून अधिक ज्ञान एखाद्यानें महाराष्ट्र भाषेच्या द्वारें संपादन केलें तर त्याला लोकांत किंवा सरकारांत एम् ए., बिएच्या इतका मान मिळणार आहे काय ? अर्थात नाहीं. यावरून काय झालें कीं, आम्हांस मोठ्या पदवीस चढण्याला इंग्रजी मुलखांत इंग्रजी भाषेखेरीज गत्यंतर राहिलें नाहीं.

आतां इंग्रज आणि नेटिव यांच्यामध्यें अन्योन्य संघट्टन असावें असें जे प्रतिपादितात त्यांच्या बोलण्याचा खरा अर्थ तरी काय तो पाहूं. इंग्रजांच्या अमलांत एकंदर सुमारें पंचवीस कोटि लोकसंख्या आहे; तींतून मुलें आणि चायका काढून टाकल्या असतां सुमारें सात किंवा आठ कोटी पुरुष राहतील; यांपैकीं म्हातारेकोतारे सोडून दिले पाहिजेत. शिवाय अशिक्षित लोकांचें आणि युरोपिअन लोकांचें संघट्टन होण्याचा मुळींच संभव नाहीं; यासाठीं त्यांनाही मुळींच सोडून दिलें पाहिजे. सुशिक्षित असून इंग्रजी भाषेचा संस्कारही ज्यांना बराच झाला आहे अशा नेटिवांत आणि युरोपिअनांत थोडीबहुत मैत्री होण्याचा संभव आहे. शिवाय कामधंद्याच्या संबंधानें ज्यांच्यामध्यें उच्चनीचत्वाचा भाव उत्पन्न झाला आहे, अशांत कशानें संघट्टन होणार ? याकरितां तेही वगळले पाहिजेत. याप्रमाणें छाटाछाट करितां करितां साहेबलोकांशीं खरी मैत्री करण्याला योग्य असे सर्व हिंदुस्थानांत पांच सात लाख लोक निघतील कीं नाहीं याचा आम्हांस बराच संशय आहे. शिवाय पहिल्या प्रतीची मैत्री इंग्रजांत आणि आम्हांत कधींही होणार नाहीं हें एकदां मागें सांगितलें आहे. कारण मैत्री ही समस्थितीच्या व्यक्तींत होत असते. आमच्या सगळ्याच राष्ट्राची स्थिति इंग्लंडाहून भिन्न असल्यामुळें इंग्लिश लोकांत आणि आम्हांत उत्तम प्रकारची किंवा पहिल्या प्रतीची मैत्री होण्याचा मुळींच संभव नाहीं. झालीच तर दुय्यम प्रतीची होणार. आणि ती तरी पंचवीस कोटी प्रजेपैकीं पांचचार लक्षांची आणि आमच्या राजकर्त्यांची ! राजकर्त्यांत सगळेचजण मैत्री करण्यालायक आहेत असेंही नाहीं. पलटणींतल्या सोल्जराच्या वाऱ्याला देखील उभें राहणें आमच्या नेटिवांस आवडणार नाहीं, मग त्यांच्याशीं मैत्री करण्याची वार्ता कशाला पाहिजे ! सारांश काय कीं आमच्या राजकर्त्यांत आणि आम्हांत परस्परांशीं मैत्री करण्याला योग्य असे फारच थोडे लोक आहेत. आणि त्या थोड्यांची मैत्री होण्यालाही शेंकडों विघ्नें आहेत. इंग्लिश लोक राज्यकर्ते असल्यानें त्यांचा स्वभाव निराळ्या तऱ्हेचा होऊन आमचें त्यांचें संघटन होण्याला मोठी नड पडते याची बरीच चर्चा केली आहे. प्रस्तुत भाषेच्या दुजेपणामुळें येणाऱ्या नडीचा विचार चालला आहे. वर जें सांगितलें आहे त्यावरून वाचकांच्या लक्षांत ही गोष्ट येईल कीं, साहेबलोकांशीं मैत्री करण्याची ज्यांना संधि पडणार, असे आपल्या लोकांत फारच थोडे असामी सांपडतील. कित्येक सुशिक्षित, सुस्वभावाचे व मनामिळाऊ असे इंग्लिश-

लोक, व त्याच प्रकारचे नेटिव लोक यांच्यामध्यें थोडेंबहुत संघट्टन होण्याचा संभव आहे; आणि तें तरी " तुम्ही खुशाल आम्ही खुशाल, " " तमक्या संबंधानें तुमचें म्हणणें तसें आहे, पण आमचें म्हणणें असें आहे, " येथपर्यंतच. फारच झालें तर दोघांनीं एका टेबलावर बसून चहा घ्यावा, चिरुट ओढावा, आणि फारच सलगी असली तर जड अन्नाचा खाना खावा. ही नेटिवांची साहेबलोकांच्या घरची वागणूक झाली. साहेबलोक नेटिवांच्या घरीं आले म्हणजे असाच प्रकार होत असतो. ज्यांची फारच घसट पडली आहे ते साहेबांना वांग्याची भाजी, मेतकूट, पापड, लाडू, श्रीखंड किंवा दुसरीं पक्कान्नें पोंचवितात, व त्याबद्दल ' थँक्स ' मिळवितात. हा सगळा वर वर प्रकार आहे, व याला आमच्यानें संघट्टन किंवा खरी मैत्री म्हणवत नाहीं. तथापि साहेबलोकांशीं सलगी पाडूं इच्छिणारे याच्या पलीकडे जात असतील असें आम्हांस वाटत नाहीं. कित्येक साहेबलोकांचें असें म्हणणें आहे कीं, नेटिवलोक आपल्या बायकांना बाहेर काढीत नाहींत. त्यामुळें आमच्या मडमांची आणि त्यांची मैत्री होत नाहीं. यासाठीं नेटिव लोकांना आमच्याशीं विशेष संघट्टन करण्याची जरूरी असेल तर त्यांनीं आपल्या बायकांस शिकवून तयार कराव्या, व आमच्याप्रमाणें हिंडाफिरायला काढून स्त्रीपुरुषांचा वारंवार संकर घडवून आणावा म्हणजे दोन्ही पक्षांचा इष्ट हेतु तडीस जाईल. आमच्या लोकांत स्त्रियांना शिक्षण आणि स्वातंत्र्य कमी आहे किंवा मुळींच नाहीं, व तें दिलें पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे. पण ही घडवून आणल्यानें साहेबांचें आणि आमचें मेतकूट बनून जाईल असें आम्हांस वाटत नाहीं. ज्यांच्या स्त्रिया आधींच सुशिक्षित आहेत त्यांनीं तरी या कामांत कितीसें यश संपादिलें आहे व त्यापासून त्यांना काय लाभ झाला आहे ! स्त्रियांना शिक्षण दिलें पाहिजे हें आम्ही कबूल करितों; पण साहेबलोकांशीं संघट्टन करण्यासाठीं त्यांना इंग्रजी शिकविणें ही कल्पना आम्हांस अगदीं रुचत नाहीं. अगोदर निरुपायास्तव आम्हांपैकीं लाखों जणांचा मानसिक श्रम परक्या भाषेचा अभ्यास करण्यांत फुकट जात आहे. आम्ही स्वतंत्र असतों तर सगळ्यांना हा बुद्धिश्रमाचा निरर्थक उपयोग करावा लागला नसता. जर्मनी, फ्रान्स, किंवा इंग्लंड या देशांत सर्वच सुशिक्षित लोक दोन दोन तीन तीन भाषा शिकतात असें नाहीं. ज्यांनीं दोन किंवा तीन भाषांचा अभ्यास केलेला असतो, ते त्या भाषेंतील ग्रंथांचीं भाषांतरें आपल्या देशबंधूंस पुरवितात, व त्याच्या-

योगानें त्या भाषांचा अभ्यास करण्यांत काल आणि श्रम यांचा व्यर्थ व्यय न करावा लागून सर्वांस त्या त्या लोकांनीं केलेले विचार समजतात, व त्यांचें खंडन किंवा मंडन करण्याला सोपी सोय होते. मिल्लसाहेबांच्या तर्कशास्त्रावर युरोपांतील अनेक तर्कशास्त्रज्ञांनीं टीका केली आहे. तीं त्यांनीं तो ग्रंथ इंग्रजींत वाचून केली असें नाहीं. तो ग्रंथ छापला गेल्यावर निरनिराळ्या भाषेंत त्याचीं भाषांतरें झालीं. आणि ज्यांच्या मनांत त्यांत काय कोटिक्रम केला आहे हें पहावयाचें होतें. त्यांना तें भाषांतरद्वारां आपल्याच भाषेंत पहाण्यास मिळाल्यासारखें झालें. सारांश काय कीं, कोणत्याही निमित्तानें एका देशांतील बहुतेक लोकांस दुसऱ्या देशाची भाषा शिकावी लागणें हें अत्यंत अपायकारक आहे. आम्हांपैकीं स्त्रियांना शिक्षण देण्याच्या कामीं ज्यांची उडी फार पुढें आहे ते त्यांना इंग्रजी शिकवावें असें म्हणतात. असें करण्यांत त्यांचा हेतु मराठींत सध्यां उपयुक्त आणि मनोरंजक ग्रंथांचा सांठा असावा तेवढा नाहीं हाच असावा असें आम्हांस वाटतें. कांहीं वर्षांनीं मराठी भाषेंत उपयुक्त ग्रंथांची रेलचेल झाली, व साधारण स्त्रियांच्या हातून संपादन होण्याइतकें ज्ञान तिच्या द्वारें मिळण्याचा संभव झाला; म्हणजे कोणीही सुशिक्षित मनुष्य आपल्या बायकोला परकीय भाषेच्या अभ्यासाच्या श्रमांत निरर्थक घालण्यास इच्छील असें आम्हांस वाटत नाहीं. आतां पुरुषाप्रमाणेंच ज्ञानसंपादनाविषयीं ज्या स्त्रियांना उत्कट इच्छा झाली असेल, तेवढ्या मात्र परकी भाषेचा अभ्यास करतील तर करोत; पण मध्यम स्थितीच्या व मध्यम बुद्धीच्या स्त्रियांना ग्रंथसामुग्री झाल्यावर ती कष्टसाध्य गोष्ट करण्याची अवश्यकता पडणार नाहीं असें दिसतें. दुसरी एक गोष्ट सांगावयाची आहे ती अशी कीं आम्ही एकेक तप इंग्रजीचा अभ्यास करितों, तरी तींत आम्हांस पहिल्या प्रतीचें प्राविण्य येत नाहीं, तेव्हां असल्या बिकट फेऱ्यांत आणखी बायकांस पाडण्यांत काय हंशील आहे? आम्हीं कितीही जपून लिहिलें किंवा बोललों, तरी साहेबलोक त्यांत जागोजाग चुक्या काढल्याशिवाय राहत नाहींत. असें जर आहे तर त्यांच्या चोचलेखोर मडमा आमच्या मुखदुर्बळ बायकांच्या इंग्रजी बोलण्याला किती नाकें मुरडतील कोण जाणे? कोणत्याही दोन व्यक्तींची उत्कृष्ट मैत्री होण्याला त्यांना परस्परांचें मनोगत उत्तम रीतीनें कळलें पाहिजे; व तें कळण्यास दोघांची एकच भाषा पाहिजे, किंवा दोघांनाही एकमेकांच्या भाषेचें चांगलेंच ज्ञान पाहिजे; असें नसेल तर अशा प्रकारच्या दोन व्यक्तींत

चांगलीशी मैत्री कधींही होणार नाहीं. अभिमानी मडमा आमची भाषा शिकायाच्या नाहींत, व त्यांना ती यावयाची नाहीं; त्याप्रमाणेंच आमच्या बायकांना चांगलें इंग्रजी यावयाचें नाहीं; एकूण द्वोघांची गट्टी कधींही जुळायाची नाहीं, व ती जुळायाला नकोही. आमच्या बायकांची कथा काय ? मेकालेनें असें लिहिलें आहे कीं, ' मिल्टन् ' आमच्यांतला ल्याटिन पंडित खरा; पण इतलींतल्या आठ वर्षांच्या पोराच्या कवितेबरोबर देखील मिल्टन्ची कविता टिकायाची नाहीं,' प्राशियाचा फ्रेडरिक धी ग्रेट यानें अनेक फ्रेंच पंडित जवळ बाळगून जन्मापासून फ्रेंच भाषेचा अभ्यास केला, तरी तींत त्यानें म्हणण्यासारखी कमाई केली असेल असें म्हणाल तर तें कांहीं नाहीं. एकदां त्यानें कांहीं कविता तयार करून प्रसिद्ध फ्रेंच ग्रंथकर्ता व्होल्टेर यांच्याकडे तपासण्याकरितां पाठविल्या. त्या वेळेस तो आपल्या मित्रास म्हणाला " पाहिलेंस नारे, प्राशियाच्या राजानें कसलें घाणेरडें पढम माझ्याकडे धुवायाला पाठविलें आहे ! " सारांश काय, कीं कोणाला झालें तरी जन्मभाषेप्रमाणें दुसऱ्या भाषेचें हृद्गत कळत नाहीं. ती शिकावयाची ती कित्येकजण कर्मणुकेसाठीं, उपयोगासाठीं किंवा नाइलाजासाठीं शिकतील तर शिकोत. बाकी दुसऱ्या मार्गानें ज्ञानसंपादनाचें काम होईल तर ती शिकण्यांत मोक्ष आहे असें नाहीं. साहेबलोकांचा आणि आमचा एक जीव कधींही व्हावयाचा नाहीं. पुढें मागें त्यांची आमची फाटाफाट व्हावयाचीच. ती लढाईनें नव्हे तर सामोपचारानें व्हावयाची आहे. यासाठीं त्यांच्याशीं जितका चांगला संबंध ठेववेल तितका ठेवावा. त्यांच्याशीं लत्कोडगेपणा करून घडोघडी मानखंडना करून घेण्यापेक्षां निकडीच्या कामापुरतें त्यांच्या जवळ जावें, बाकीचा वेळ दोन पावलें दूर असावें हें बरें. आम्हीं किंवा आमच्या बायकांनीं कितीही परिश्रम केले तरी आम्हांस चांगलें इंग्रजी यावयाचें नाहीं, आणि म्हणून साहेबांची व आमची मैत्री जुळावयाची नाहीं, याकरितां त्या मार्गालाच फारसें जाऊं नये हें प्रशस्त दिसतें.

या विषयावर बरेच लेख येऊन गेले त्यामुळें वाचकांना याचा थोडासा कंटाळा आल्यासारखा झाला असेल; परंतु जो विषय एकदां हातीं धरला तो केव्हां तरी तडीस नेलाच पाहिजे. विशेषेंकरून प्रस्तुत विषयावर बराच मतभेद असल्यामुळें त्या संबंधानें आमच्या विचारांचा चांगला खुलासा झाला पाहिजे; व

कोणत्याही प्रकारचा गैरसमज होतां कामा नये. अनेक कारणांवरून आमची अशी पक्की खात्री झाली आहे कीं, आमच्या प्रभूंची आणि आमची चांगली मैत्री कधींही जुळावयाची नाहीं. त्यांपैकीं कित्येक कारणें प्रसंगविशेषीं निर्दिष्ट करण्यांत आलींच आहेत. आणखी कित्येक राहिलीं आहेत तीं सगळीं केसरींत साद्यंत देतां येतील कीं नाहीं याचा संशयच आहे, तथापि त्यांपैकीं आज येथें एकाचा विचार करण्याचा हेतु आहे.

दोन राष्ट्रांची मैत्री होण्याला दोघांची समास्थिति किंवा समभाषा पाहिजे इतकेंच नाहीं, तर समानधर्मत्वही पाहिजे. जगाच्या इतिहासावरून असा सुमार दिसतो कीं, धर्मांचें वेड लोकांच्या डोक्यांतून आणखी हजार दोन हजार वर्षें तर खचित जात नाहीं. तरी कोणत्याही निष्पक्षपाती विचारी मनुष्याला येवढें कबूल केलें पाहिजे कीं, लोकसंख्येच्या मानानें धर्माविषयीं जगांत आज जी उदासीनता आहे, तेवढी गेल्या हजार पांचशें वर्षांत कधींही नव्हती. त्यावेळेस लोकांच्या आचाराविचारांवर व अन्योन्यसंबंधावर धर्मांचें जें प्राबल्य होतें, तें आतां बिलकुल राहिलें नाहीं. क्याथलिक लोकांना पार्लमेंटसभेचे मेंबर होण्याचा अखत्यार मिळाला आहे इतकेंच नाहीं, तर इंग्लंडची बादशाही राणी इंग्रजी कायद्याप्रमाणें प्राटेस्टंट धर्मानुयायिनी असतां हिंदुस्थानचा प्रतिनिधी क्याथोलिक-कमतानुवर्ती असला तरी चालतो; व त्याच्या नेमणुकीविषयीं कित्येक हट्टी व हेकोखोर लोकांनीं कांहीं वेळ आरडाओरडा केला तरी त्याच्याकडे कोणी लक्ष देत नाहीं, येथपर्यंत इंग्लंडसारख्या देशांत धर्मसंबंधानें लोकांच्या अंगीं सौजन्य किंवा औदासीन्य आलें आहे! धर्मांचें खूळ फार दिवसांपासून चालत आलेलें आहे. तें मनुष्यमात्राला लवकर सोडील असें वाटत नाहीं. शिवाय मनुष्याच्या मनोवृत्तींचा बारकाईनें विचार करितां असें दिसून येतें कीं, मनुष्याच्या मनाची उडी स्वभावतः फार दूरवर झुकत असल्यामुळें ज्या त्या गोष्टींत आद्य कारणाचा शोध लाविल्याशिवाय त्याचें समाधान होत नाहीं. तें जात्या पराकाष्ठेचें चंचल आणि महत्त्वाकांक्षी असल्यामुळें हवें तिकडे भटकण्याची त्याला फार हौस. कोट्यावधि वर्षें विचार केला तरी ज्या प्रश्नाचा उलगडा कधीं व्हावयाचा नाहीं असे प्रश्न सोडविण्याविषयीं फिरून फिरून धांव घेईल, निराश होऊन मागें परतेल, कांहीं वेळ गेल्यावर पुनः चाल करून जाईल; सारांश काय कीं, ज्यांना थोडी-बहुत विद्या प्राप्त झाली आहे; त्यांचीं मनें कधीं ना कधीं तरी प्रापंचिक विचारांना

सोडून जगदुत्पत्ति, जगदात्मा, जीवात्मा, परमात्मा, पुनर्जन्म—यांसारख्या गहन विषयांत भ्रमण करीत राहतात. तेव्हां सिद्ध काय झालें कीं कांहीं तरी अघटित विषयावर विचार करणें हा उन्नत मनाचा स्वभाव होय. प्रस्तुत कालीं असल्या अघटित विचारांचा पुरवठा धर्मानें आपल्याकडे घेतला आहे; व पुढेंही तो धर्माकडेसच राहील असें मानण्यास कारणें आहेत. येवढें मात्र बहुतकरून खचित घडून येईल कीं, धर्मसंबंधानें चोहोंकडे आतां ज्या समजुती आहेत त्या समूळ बदलून, किंवा त्यांत पुष्कळ फेरफार होऊन, आतांहून अगदीं भिन्न असा धर्मशब्दाचा अर्थ लोक समजूं लागतील. न जाणों ईश्वरावरील श्रद्धा नाहींशी होऊन निरिच्छ बुद्धीनें मनुष्यमात्राच्या कल्याणासाठीं झटणें हेंच धर्माचें खरें तत्त्व होऊन बसेल! असो, सांगायची ती गोष्ट येवढीच कीं, धर्मसंबंधानें कोणत्याही प्रकारच्या कल्पना व्यवहारांत आल्या तरी येवढें खरें आहे कीं ज्या दोन राष्ट्रांची किंवा व्यक्तींची चांगली मैत्री बनावी अशी अपेक्षा असेल, त्या दोघांचे धर्मसंबंधीं विचारही एकसारखे असले पाहिजेत. अलीकडे थोडी कमी झाली आहे, नाहीं तर धर्मसंबंधानें लोकांना भागें फार चीड असे; आणि अजूनही मि. कुकूसारखे नास्तिकांच्या वाऱ्यास भिणारे, व स्पर्श झाल्यास बुचकळी मारण्यास तयार असणारे, पाद्री मधून मधून दृष्टीस पडतात, त्यावरून पूर्वीची जारी चीड अजून समूळ लयास गेली नाहीं असें मानणें भाग पडतें. ख्रिस्त्यांतल्या ख्रिस्त्यांत तंटे कमी आहेत असें नाहीं; आम्हां मूर्तिपूजकांपेक्षां कांकणभर अधिकच, पण कमी नाहींत! थोड्या दिवसांपूर्वी येथील हिराबागेंत अमेरिकेंतील एका फिरत्या मिशनरीची आणि गांवच्या मिशनरींची लठ्ठालठ्ठी होण्याची संधि येऊन ठेपली होती, पण ख्रिस्तानें तो हातघाईचा प्रसंग येऊं दिला नाहीं! तेव्हां ख्रिस्तधर्माच्या निरनिराळ्या शाखेंतील पाद्र्यापाद्र्यांत जर अशीं रणें पडतात, व मैत्री होण्याचा संभव रहात नाहीं, तर ख्रिस्तधर्मानुयायांचें मनुधर्मानुयायांशीं संघटन कसें होणार? धर्मसंबंधानें ज्यांचे विचार कळसास जाऊन पोहोंचले आहेत, किंवा जे त्यासंबंधानें स्वतः मुळींच विचार न करितां "गावश्च गोभिः" या न्यायानें कामापुरते भटांच्या किंवा सामाजिकांच्या हाताला हात लावून वेळ मारून नेणारे आहेत, असे बरेच नवे व जुने लोक साहेबलोकांशीं चोरून जडान्नव्यवहार ठेवणारे सांपडतील; पण राष्ट्रांराष्ट्रांत मैत्री होते ती असल्या चोरटेपणांत भीत भीत केलेल्या कृत्यांनीं होत नाहीं. पुष्कळांना असें वाटूं लागलें आहे कीं, आमच्या धर्मीत अगदीं अर्थ नाहींसा

कोणत्याही प्रकारचा गैरसमज होतां कामा नये. अनेक कारणांवरून आमची अशी पक्की खात्री झाली आहे कीं, आमच्या प्रभूंची आणि आमची चांगली मैत्री कधींही जुळावयाची नाहीं. त्यांपैकीं कित्येक कारणें प्रसंगविशेषीं निर्दिष्ट करण्यांत आलींच आहेत. आणखी कित्येक राहिलीं आहेत तीं सगळीं केसरींत साद्यंत देतां येतील कीं नाहीं याचा संशयच आहे, तथापि त्यांपैकीं आज येथें एकाचा विचार करण्याचा हेतु आहे.

दोन राष्ट्रांची मैत्री होण्याला दोघांची समस्थिति किंवा समभापा पाहिजे इतकेंच नाहीं, तर समानधर्मत्वही पाहिजे. जगाच्या इतिहासावरून असा सुमार दिसतो कीं, धर्माचें वेड लोकांच्या डोक्यांतून आणखी हजार दोन हजार वर्षें तर खचित जात नाहीं. तरी कोणत्याही निष्पक्षपाती विचारी मनुष्याला येवढें कबूल केलें पाहिजे कीं, लोकसंख्येच्या मानानें धर्माविषयीं जगांत आज जी उदासीनता आहे, तेवढी गेल्या हजार पांचशें वर्षांत कधींही नव्हती. त्यावेळेस लोकांच्या आचाराविचारांवर व अन्योन्यसंबंधावर धर्माचें जें प्राबल्य होतें, तें आतां बिलकुल राहिलें नाहीं. क्याथलिक लोकांना पार्लमेंटसभेचे मेंबर होण्याचा अखत्यार मिळाला आहे इतकेंच नाहीं, तर इंग्लंडची बादशाही राणी इंग्रजी कायद्याप्रमाणें प्राटेस्टंट धर्मानुयायिनी असतां हिंदुस्थानचा प्रतिनिधी क्याथोलिक-कमतानुवर्ती असला तरी चालतो; व त्याच्या नेमणुकीविषयीं कित्येक हट्टी व हेकोखोर लोकांनीं कांहीं वेळ आरडाओरडा केला तरी त्याच्याकडे कोणी लक्ष देत नाहीं, येथपर्यंत इंग्लंडसारख्या देशांत धर्मसंबंधानें लोकांच्या अंगीं सौजन्य किंवा औदासीन्य आलें आहे! धर्माचें खूळ फार दिवसांपासून चालत आलेलें आहे. तें मनुष्यमात्राला लवकर सोडील असें वाटत नाहीं. शिवाय मनुष्याच्या मनोवृत्तींचा बारकाईनें विचार करितां असें दिसून येतें कीं, मनुष्याच्या मनाची उडी स्वभावतः फार दूरवर झुकत असल्यामुळें ज्या त्या गोष्टींत आद्य कारणाचा शोध लाविल्याशिवाय त्याचें समाधान होत नाहीं. तें जात्या पराकाष्ठेचें चंचल आणि महत्त्वाकांक्षी असल्यामुळें हवें तिकडे भटकण्याची त्याला फार हौस. कोट्यावधि वर्षें विचार केला तरी ज्या प्रश्नाचा उलगडा कधीं व्हावयाचा नाहीं असे प्रश्न सोडविण्याविषयीं फिरून फिरून धांव घेईल, निराश होऊन मागें परतेल, कांहीं वेळ गेल्यावर पुनः चाल करून जाईल; सारांश काय कीं, ज्यांना थोडी-बहुत विद्या प्राप्त झाली आहे; त्यांचीं मनें कधीं ना कधीं तरी प्रापंचिक विचारांना

सोडून जगदुत्पत्ति, जगद्‌ात्मा, जीवात्मा, परमात्मा, पुनर्जन्म—यांसारख्या गहन विषयांत भ्रमण करीत राहतात. तेव्हां सिद्ध काय झालें कीं कांहीं तरी अघटित विषयावर विचार करणें हा उन्नत मनाचा स्वभाव होय. प्रस्तुत कालीं असल्या अघटित विचारांचा पुरवठा धर्मानें आपल्याकडे घेतला आहे; व पुढेंही तो धर्माकडेसच राहील असें मानण्यास कारणें आहेत. येवढें मात्र बहुतकरून खचित घडून येईल कीं, धर्मसंबंधानें चोहोंकडे आतां ज्या समजुती आहेत त्या समूळ बदलून, किंवा त्यांत पुष्कळ फेरफार होऊन, आतांहून अगदीं भिन्न असा धर्मशब्दाचा अर्थ लोक समजूं लागतील. न जाणों ईश्वरावरील श्रद्धा नाहींशी होऊन निरिच्छ बुद्धीनें मनुष्यमात्राच्या कल्याणासाठीं झटणें हेंच धर्माचें खरें तत्त्व होऊन बसेल! असो, सांगायची ती गोष्ट येवढीच कीं, धर्मसंबंधानें कोणत्याही प्रकारच्या कल्पना व्यवहारांत आल्या तरी येवढें खरें आहे कीं ज्या दोन राष्ट्रांची किंवा व्यक्तींची चांगली मैत्री बनावी अशी अपेक्षा असेल, त्या दोघांचे धर्मसंबंधीं विचारही एकसारखे असले पाहिजेत. अलीकडे थोडी कमी झाली आहे, नाहीं तर धर्मसंबंधानें लोकांना मागें फार चीड असे; आणि अजूनही मि. कुक्‌सारखे नास्तिकांच्या वाऱ्यास भिणारे, व स्पर्श झाल्यास बुचकळी मारण्यास तयार असणारे, पाद्री मधून मधून दृष्टीस पडतात, त्यावरून पूर्वीची जारी चीड अजून समूळ लयास गेली नाहीं असें मानणें भाग पडतें. ख्रिस्त्यांतल्या ख्रिस्त्यांत तंटे कमी आहेत असें नाहीं; आम्हां मूर्तिपूजकांपेक्षां कांकणभर अधिकच, पण कमी नाहींत! थोड्या दिवसांपूर्वी येथील हिराबागेंत अमेरिकेंतील एका फिरत्या मिशनरीची आणि गांवच्या मिशनरींची लठ्ठालठ्ठी होण्याची संधि येऊन ठेपली होती, पण ख्रिस्तानें तो हातघाईचा प्रसंग येऊं दिला नाहीं! तेव्हां ख्रिस्तधर्माच्या निरनिराळ्या शाखेंतील पाद्र्यापाद्र्यांत जर अशीं रणें पडतात, व मैत्री होण्याचा संभव रहात नाहीं, तर ख्रिस्तधर्मानुयायांचें मनुधर्मानुयायांशीं संघटन कसें होणार? धर्मसंबंधानें ज्यांचे विचार कळसास जाऊन पोहोंचले आहेत, किंवा जे त्यासंबंधानें स्वतः मुळींच विचार न करितां "गावश्च गोभिः" या न्यायानें कामापुरते भटांच्या किंवा सामाजिकांच्या हाताला हात लावून वेळ मारून नेणारे आहेत, असे बरेच नवे व जुने लोक साहेबलोकांशीं चोरून जडान्नव्यवहार ठेवणारे सांपडतील; पण राष्ट्रांराष्ट्रांत मैत्री होते ती असल्या चोरटेपणांत भीत भीत केलेल्या कृत्यांनीं होत नाहीं. पुष्कळांना असें वाटूं लागलें आहे कीं, आमच्या धर्मांत अगदीं अर्थ नाहींसा

झाला आहे. होय, त्याचें पुष्कळ सामर्थ्य कमी झालें आहे यांत संशय नाहीं; पण अजूनही त्यांत तें बरेंच आहे असें कित्येक प्रसंगीं स्पष्ट दिसून येतें. कारण ताज्या ताज्या सुधारलेल्या धर्मांची स्थापना करण्याविषयीं ज्यांनीं विडा उचलला, असे अर्वाचीन शंकराचार्यही लोकसमाजांत आले म्हणजे "खादाड गणपति", "व्यभिचारी कृष्ण" आणि "तापट गोसावडा" यांस ज्या अज्ञानमय धर्मांत पूजितात तद्धर्मानुयायांप्रमाणें वर्तन करितात!! वास्तविक रीतीनें अशा धर्मस्थापकांस जरिकांठी पितांबराची, गळ्यांतील कापसाच्या धाग्याची, किंवा पानाबाहेर लोटावयाच्या भाताची पर्वा कां असावी? स्वतः पुनर्विवाह करण्याचें धैर्य नसलें तरी तो ज्यांनीं केला आहे अशांशीं उघडपणानें अन्नोदकव्यवहार कां ठेऊं नये? अमुक रस्त्यानें तुम्ही चला म्हणून लोकांस उपदेश करून आपण भलताच रस्ता धरावयाचा! लोकांची पूज्यबुद्धि नाहींशी होऊन विटंबना होते आणि हातीं धरलेलें काम तडीस जात नाहीं तें असल्या धरसोडीनें व अनिश्चितपणानें! तात्पर्य हें कीं नवीन नवीन उदार धर्मांचें बीजारोपण होऊं लागलें आहे तरी फार दिवसांच्या जरुखड खोडाचीं पाळेंमुळें दूरवर जाऊन पोहोंचलीं असल्यामुळें, व मनूचें आणि ख्रिस्ताचें मुळीं बनत नसल्यामुळें, युरोपिअन लोकांचें आणि आमचें संघटन होण्यास अनिवार्य व्यत्यय येतो.

[वर्ष २ अंक १३ ते २४]

मराठमोळा.

*" आपल्या हृदयंगमेचा मत्सर करूं नकोस; आणि आपण होऊन आपल्या-विरुद्ध तिचें मन कलुषित करूं नकोस. "

अन्योन्य संघट्टनाला सध्यां किंचित् विश्रांति देऊन शिरोलेखांत नमूद केलेल्या विषयावर दोन शब्द लिहिण्याचा हेतु आहे.

मराठमोळा म्हणजे काय हें विशेष स्पष्ट करून सांगण्यास पाहिजे असें नाहीं. मराठे लोकांत पुरुषांप्रमाणें स्त्रियांस उघडपणें वागण्याचा जो प्रतिबंध आहे, त्याला मराठमोळा असें म्हणतात. हा प्रकार आमच्या लोकांत कधीं आला, व कशानें आला, यांत चांगुलपणा कांहीं आहे कीं काय ? यापासून पुरुषांच्या व स्त्रियांच्या वर्तनावर काय परिणाम होतात वगैरे गोष्टींचा खुलासा या विषयाच्या प्रतिपादनांत निघाला पाहिजे. पौराणिक कालाचा विचार करितां त्यावेळेस हा प्रघात मुळींच नव्हता, असें स्पष्ट दिसून येतें. रामायण, महाभारत वगैरे पुस्तकें वाचिलीं असतां स्त्रियांना गोषांत गुंडाळून ठेवण्याची चाल होती असें कोठें आढळत नाहीं. रामराज्यांत पुरुषांप्रमाणें स्त्रियांना मोकळेपणीं वावरण्याची परवानगी होती असें दिसून येतें. कित्येक ठिकाणीं असेंही आढळतें कीं, मोठमोठे ऋषी आपापल्या धर्मपत्नींना घेऊन समाजांत जात व तेथें त्यांना आपल्या शेजारीं घेऊन बसत. रामचंद्राच्या वाम अंकावर जेथें पाहव्या तेथें सीताबाई बसलेल्या ! मग लक्ष्मण जवळ असो कीं अंजनीसुत असो, त्यांना त्यांच्यापुढें आपण असें कसें वागावें याची बिलकूल लज्जा वाटत नसे ! पार्वती तर शिवाची अर्धांगीच ! सर्वसंगपरित्याग करून गळ्यांत रुंडमाळा धारण करणाऱ्या स्मशानवासी कठोर कामांतकालादेखील दुर्गासान्निध्याखेरीज चैन पडायाचें नाहीं ! कृष्ण तो कृष्णच !! कृष्णाच्या अमदानींत स्त्रियांना जसें स्वातंत्र्य होतेसें वाटतें तसें त्यांना फिरून पृथ्वीच्या कोणत्याही राष्ट्रावर मिळेल कीं नाहीं, याची शंका आहे ! या रसिक

---

* Be not jealous over the wife of thy bosom, and teach her not an evil lesson against thy--self.

Ecclus IX. 1.

रंगेल देवाचें लहानपणापासून लोकांच्या बायका भुलवण्याकडे लक्ष ! षोडशसहस्र नारींशीं रममाण होणारा हा सुलतानांचा सुलतान पुनः आपला धुतलेला ब्रह्मचारी तो ब्रह्मचारी ! ! ऐंद्रजालकाच्या नागसुराप्रमाणें यानें वृंदावनांत उभें राहून सुंदर वेणूचा कर्णमनोहर ध्वनि काढला कीं वृजनारींची झाली धूम तारांबळ ! मग कोठले पति ! अपत्यें कोणाचीं ! आणि गृहकर्मांची कोणाला आहे भ्रांति ! चालल्या सगळ्या नागिणीसारख्या ऐंद्रजालकाकडे ! शकुंतलेसारख्या ऋषिकन्यांनाही अतिथिसत्कार करण्याची पूर्ण परवानगी असे ! याप्रमाणें प्रस्तुतचें दुष्ट कलियुग अवतरण्यापूर्वी आर्यस्त्रियांनीं स्वातंत्र्यसुखाचा पूर्ण उपभोग घेतला. सत्यद्वापारादि पुण्ययुगांत स्त्री-पुरुषांचा संकर झाल्यानें स्त्रियांचें पातिव्रत्य भ्रष्ट होण्याची पुरुषास बिलकुल भीति नव्हती. सगळा घात कलियुगानें केला ! यांत बायका लबाड आणि पुरुष लुच्चे ! बायकांचें पातिव्रत्य तर कसें तरी संभाळलें पाहिजे; जगाचा व्यवहार चालण्यासाठीं पुरुषांना बाहेर फिरणें जरूर. बाकी राहिल्या बायका, यांना कोंडून ठेविल्या तर पातिव्रत्याची परिटघडी निष्कलंक राहिलीच पाहिजे ! ! !

आतां विनोद बस करून गम्भीरपणानें विचार करूं. मुसलमान लोक हिंदुस्थानांत येण्याच्या पूर्वी हा मूर्खपणाचा प्रघात आमच्या देशांत रूढींत नव्हता असें वाटतें. त्या अर्धवट रानटी लोकांच्या टोळ्या जेव्हां टोळधाडीसारख्या येऊन पडूं लागल्या, तेव्हां देशांतील स्वस्थता अगदीं नाहींशी झाली. शत्रूंच्या दुष्ट वासनांपासून स्त्रियांची अब्रू बचाविण्यासाठीं पुरुषांना त्यांना सुरक्षित ठिकाणीं लपवून ठेवणें भाग पडूं लागलें. त्यांच्या भीतीमुळें त्यांस मोकळेपणीं बाहेर हिंडूंफिरूं देतां येईना. मग शत्रु दुसऱ्या ठिकाणीं गेला तरी बाहेर पडण्याची भीति वाटूं लागली. एखादी नवीन टोळी केव्हां येईल, किंवा एकदां येऊन गेलेली परत केव्हां फिरेल, याचा कांहींच भरंवसा नसल्यानें त्या सर्वदा लपून राहूं लागल्या असाव्यात. लढाईला निघावयाचें म्हटलें म्हणजे पहिलें काम स्त्रियांसाठीं सुरक्षित जागा पहावयाची, व पराजय झाला असतां आसपासच्या राजेरजवाड्यापाशीं त्यांच्या संरक्षणासाठीं तयारी करून ठेवायाची. रजपुतांसारख्या अभिमानी लोकांना दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याचा प्रकार न आवडून त्यांनीं अशी चाल पाडिली कीं अपजय येण्याचा सुमार दिसूं लागला कीं, अगोदर आपण होऊन तलवारीनें किंवा अग्नीनें आपल्या स्त्रियांची वाट लावायाची, आणि मग शत्रूवर निकरानें चालून जाऊन

आपल्या प्राणांची आहुति पाडावयाची. अपजयकालीं बायकांना जाळणें, झनाना गोषा–हीं सगळीं असुरक्षितपणामुळें उद्भवलीं असावीं असें वाटतें. शिवाय मुसलमान लोकांत स्त्रियांना झांकून ठेवण्याची चाल फार प्राचीन कालापासून वहिवाटींत आहे असें दिसतें. ही चाल त्या लोकांत काय कारणामुळें पडली असेल याचा निश्चय करण्याची ही जागा नाहीं. पण आमच्या लोकांत ती पडण्याचीं दोनच कारणें दिसतात; एक मुसलमानांची भीति; आणि पुढें ते स्थायिक राज्यकर्ते झाले, तेव्हां त्यांचें अनुकरण. एकदां या दोन कारणांमुळें स्त्रियांना घरांत राहण्याची संवय लागल्यामुळें पुढें त्यांना बाहेर पडण्याचा स्वाभाविकपणें संकोच वाटूं लागला. गरीबीमुळें कित्येकांना बाहेर पडणें जरूर पडल्यामुळें कांहीं मराठ्यांत हा निर्बंध नाहीं. पण जी बाहेर पडली ती गरीब, अकुलीन, दांडगी असा समज होऊं लागला असावा, व त्यामुळें कित्येकजण अभिमानानें आपल्या बायका होतां होईल तों, बाहेर पडूं न देण्याची खटपट करूं लागले असतील. खायाला अन्न मिळालें नाहीं, किंवा डोकीवरून पाणी आणावें लागलें, अथवा बायकोचीं लुगडीं धुण्याचा प्रसंग आला तरी बेहेत्तर आहे, पण कुलीनत्व सांडतां कामा नये, असा आग्रह झाला असेल. निदान आतांशा कित्येक मराठ्यांचें जें वर्तन दिसतें, त्यावरून अशीं अनुमानें करण्यास फार धीर येतो. ज्या ज्या प्रदेशांत मुसलमान लोकांनीं विशेष कहर करून दिला, त्या त्या प्रदेशांतील मराठ्यांत या चालीचें विशेष प्राबल्य आहे. पेशवाईच्यापूर्वी ब्राह्मणांना घर सोडून जाण्याची गरज नसल्यामुळें, व पेशवाई झाल्यावर त्यांच्या हातांत सत्ता असल्यामुळें, ही चाल त्यांच्यांत पडली नसावी. अस्तु, ही चाल कोणत्याही कारणानें पडली असो, आतां तिच्यांत कांहीं चांगुलपणा आहे असें दाखविल्याशिवाय ती चालूं ठेवणें हा शुद्ध वेडेपणा होय. ज्यांना म्हणून थोडाबहुत विचार करून तदनुसार आपलें वर्तन कमीअधिक फिरविण्याची संवय आहे, त्यांनीं कालिदासाची खालील उक्ति ध्यानांत ठेवावी:—

*पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि सर्वं नवमित्यवद्यं ।
सन्तः परीक्ष्यान्यतरद्भजन्ते मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः ॥
—मालविकाग्निमित्रे कालिदासः ॥

* सर्व गोष्टी केवळ जुन्या म्हणून चांगल्या व नव्या म्हणूनच वाईट असें मानावयाचें नाहीं. शहाणे लोक परीक्षा करून मग बऱ्यावाइटाचा अंगीकार करतात. मूढजन मात्र लोकांच्या मतानें चालतात.

आम्हांस असें वाटतें कीं, या चालींत चांगुलपणाचा भाग मुळींच नाहीं म्हटलें तरी चालेल. शिंदे, होळकर, गायकवाड वगैरे राजघराण्यांतील मराठ्यांत, व दुसऱ्या कांहीं उच्च म्हणविणाऱ्या कुलांतील मराठ्यांत ह्या चालीचें अद्याप मोठेंच वर्चस्व आहे. तुम्ही ह्या चालीला अजून कां पाळतां म्हणून त्यांना विचारलें तर ते बहुशः असें उत्तर देतील कीं, " कां म्हणजे, वाडवडलापासून हा आमचा कुलाचारच आहे. ज्या आमच्या ' चतुर पूर्वजांनीं ' ही चाल पाडिली ते का मूर्ख होते ? कुलीन घराण्यांतील स्त्रियांनीं परपुरुषास तोंड दाखविणें किती अश्लाघ्य आहे ? नीति आणि पातिव्रत्य हीं स्त्रियांचीं परमभूषणें होत; त्यांचें संरक्षण होण्यासाठीं ही चाल सोडतां कामा नये. " फारच त्रास दिला तर सरशेवटीं ते असें म्हणतील कीं, " ही चाल फार दिवसांपासून चालत आली आहे म्हणून ती आम्ही तशीच पुढें चालविणार; तुम्हीं यासंबंधानें आमच्याशीं अधिक बोलूं नये" ! असें चापून उत्तर मिळालें म्हणजे बृहस्पतीची देखील मति खुंटली पाहिजे ! " बस, आम्ही काय पाहिजे तें करणार, आम्हांस विचार करण्याची गरज नाहीं " असेंच मनुष्य म्हणूं लागला म्हणजे त्याच्यापुढें काय बोलावयाचें आहे ? दुसरे कांहीं विशेष अविचारी, आत्मनिष्ठ, आणि स्त्रीमत्सरी असतील ते असें म्हणतील कीं, "अहो स्त्रियांची कामवासना पुरुषापेक्षां आठपट अधिक; त्यांना अशा कोंडून धाकांत नाहीं ठेवल्या तर त्या दुसऱ्या दिवशीं परक्याच्या हातांत हात घालून उठून जातील ! म्हणतात ना ! ' स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं, देवो न जानाति कुतो मनुष्यः ' ! ' बाबा या स्त्रियांचा कांहीं नेम नाहीं. यांना असेंच वागविलें पाहिजे ' ! ! यंवरे मर्द ! पेशवाई गेल्यातागाईंत खऱ्या मर्दांचा लय होऊन असले शेंदाडशिपाई फार सवंग झाले आहेत ! बायकांना दुसऱ्या पुरुषाचें तोंड आणि सूर्यप्रकाश दृष्टीस पडूं न देण्यांत काय कुलीनता आहे हें आम्हांस कळत नाहीं. बरें, त्यांना अशा रीतीनें वागविल्यानें त्या नीतिभ्रष्ट होत नाहींत हें खरें मानलें तर ज्या बायकांना बाहेर पडण्याची मोकळीक आहे त्या सगळ्या लबाड आणि दगलबाज ठरल्या ! ! या न्यायानें थोड्याशा मराठ्यांच्या आणि मुसलमानांच्या बायकांखेरीज पृथ्वीवरील बाकी सगळ्या लोकांच्या बायका नवऱ्याच्या हातावर तुरी देणाऱ्या कीं काय ? कोणी मराठे असें म्हणतील कीं, तसें नसलें म्हणून काय झालें ? बाकीच्यापेक्षां आम्हांत अधिक चांगल्या बायका सांपडतील. दुसऱ्यांत शेंकडा दहा वाईट असल्या तर आम्हांत मारामारीनें एखादी तशी सांपडेल. तेंही

कबूल. पण त्याला प्रमाण काय ? " त्याला प्रमाण दुसरें काय द्यावयाचें आहे ? कोंड्नच ठेवल्यावर जातात कोठें ? " यावर आमचें असें उत्तर आहे कीं, ज्या-अर्थीं कामवासनेसारखी दुसरी उत्कट वासना नाहीं, ज्याअर्थीं या झांकलेल्या स्त्रियांचा संसर्ग गडीमाणसांपासून देखील तोडलेला असतो असें नाहीं, व ज्याअर्थीं हरकसबानें आपलें इंगित पुरविणारे असे भानगडी, धीट, आणि साहसी लोक या जगांत पुष्कळ आहेत, त्याअर्थीं या पडद्यांतील स्त्रियांना तेथल्या तेथें वाईट पाऊल टाकण्यास संधि सांपडत असेल. शिवाय दुसरी अशी भीति आहे कीं पडद्याच्या अटकेमुळें हलकट लोकांशीं संबंध ठेवण्याची अवश्यकता पडून याच अटकेनें तो छपविण्यासही पुष्कळ साहाय्य होत असेल. स्त्रियांची नीति राखण्या-स्तव त्यांना कोंडून ठेवणें येवढाच मार्ग असेल तर नमस्कार असो त्या नीतीला आणि या जगांतील अस्तित्वाला ! सुशिक्षण, सदुपदेश, सत्समागम, सन्मार्ग-वर्तन, सद्व्यवसाय यांचा कांहींच उपयोग नाहीं काय ? या साधनांची उत्तरोत्तर वृद्धि होत गेल्यास स्त्रियांची नीति राहून त्या मनुष्यजन्माला आल्याचें साफल्य त्यांना करून घेतां येणार नाहीं काय ? लग्न झाल्यापासून मरेपर्यंत एकाच्या संगतीनें पडद्याच्या आंत सगळें आयुष्य कंठावयास लागणें यापेक्षां काळ्यापाण्याची शिक्षा बरी ! गोषांतल्या बायकांना राबत्यांतल्या कित्येक पुरुषांचें मुखावलोकन करण्याची परवानगी असते, हें आम्हांस ठाऊक आहे. येवढ्या पुरुषांवरून त्यांनीं जगाची कल्पना करावयाची ! आंगठ्यापासून ताळवेच्या केसापर्यंत बुरख्यानें अंग झांकून घेऊन डोळ्यापाशीं ठेवलेल्या खिडक्यांच्या साहा-य्यानें बाहेर फिरण्याची ज्यांस मुभा आहे, अशा मिसरी स्त्रियांची तरी स्थिति बरी. त्या जगास पहातात, पण जग मात्र त्यांना पाहूं शकत नाहीं ! पडद्यांतील स्त्रियांची स्थिति याहूनही शोचनीय होय. त्या जगास मुकलेल्या आणि जग त्यांना ! परमेश्वरानें मनुष्य जन्मास घालून त्याबरोबर दिलेल्या अनेक मानसिक शक्तीचा उपयोग काय, कीं एका पुरुषाच्या समागमानें दहापांच मुलांस जन्म द्यावा, आणि उंबरांतील किड्यांप्रमाणें जेथल्या तेथें धुळीस मिळावें ! ! !

कित्येक समंजस आणि सुशिक्षित मराठ्यांना या चालीच्या रानटीपणाचा मनापासून तिरस्कार आलेला असेल; पण लोकापवादभयानें जो तो जेथल्या तेथें थिजून गेला आहे. वर डोकें काढण्यास कोणाचा उमका होत नाहीं. ही चाल नाहींशी होण्याला आमच्या मतें मोठ्या कुळांतील लोकांनींच पुढारीपणा

आपल्या अंगावर घेतला पाहिजे. बडोद्याच्या महाराजांसारख्यांनीं या बाबतींत सुधारणा करण्याचें मनांत आणल्यास, आज नाहीं उद्यां, यश खचित येणार आहे. स्त्रीजातीवर येवढी सक्ति करण्यास आम्हांस काय अधिकार आहे? "बळी तो कान पिळी" या सूत्रावर झालेली जगाची व्यवस्था न्यायाची असें मानायचें असल्यास इंग्रज लोकांनीं आम्हांस जिंकिलें तेव्हां त्यांनीं आम्हांस पाहिजे तसें वागविलें तरी आम्हीं रड गातां कामां नये असें कबूल करावें लागेल. मनुष्यांच्या अंतःकरणांत परमेश्वरानें प्रेरिलेल्या न्यायवासनेमुळें पुढें मागें जगास असा दिवस खचित येणार आहे कीं, ज्या वेळेस राष्ट्राराष्ट्रांमधला किंवा मनुष्यामनुष्यांमधलाचसा काय, पण स्त्रीपुरुषांमधला सुद्धां प्रत्येक व्यवहार उभय पक्षांच्या पूर्ण संमतीनें चालेल, व एकास दुसऱ्यावर बिलकुल जुलूम करण्यास सांपडणार नाहीं.

[वर्ष २, अंक १७.]

मराठमोळ्याची पुरवणी.

बादशाही अंमलांत हिंदुस्थान देश ज्यानें जर्जर करून सोडिला त्या इराणच्या नादीरशहाची अशी गोष्ट सांगतात कीं, एकदा त्याचा मुलगा फार आजारी पडला, त्या वेळेस त्यानें हिंदुस्थानांतून एक वैद्य नेला. वैद्यानें रोग्याची परीक्षा करून शहाशीं असा करार केला कीं, अमुक एक दिवसांत मी तुमचा मुलगा बरा करून दहा लक्ष रुपये बक्षीस घेईन; तसें नाहीं झालें तर शीर उतरून देईन ! वैद्यबुवांचें औषध सुरू झालें; मुदत भरत आली; तरी मुलाची प्रकृति जशीच्या तशी; तींत उतार म्हणून बिलकुल नाहीं. तेव्हां त्या तरुण वैद्यानें आपल्या बापास निराशेचा असा निरोप पाठविला कीं, " आपण या प्रसंगीं कांहीं युक्ति न सुचवाल तर थोडया दिवसांत पुत्राची मृत्युवार्ता ऐकाल. " त्यावर बापानें असें लिहून घातलें कीं, " रक्त पाहून उपचार कर. " येवढा इषारा पोहचतांच वैद्यबोवांनीं नादीरशहाच्या बेगमेची एकांतीं गांठ घेतली आणि असें म्हणाले कीं, " कांहीं एक गोष्ट माझ्या वैद्यचातुर्यानें मला आधींच कळून चुकली आहे, ती फक्त तुमच्या तोंडांतून वदवायची आहे; मजपाशीं कबूल कराल तर ती मी शहाच्या कानावर जाऊं देणार नाहीं. हा मुलगा कोणाच्या पोटचा आहे तें सांगा. " बेगमेनें ' तो एका सिद्धयाच्या पोटचा ' म्हणून उत्तर दिलें ! नादीरशहासारख्या जमदग्नीच्या गोषांत येवढा अंधार ! तात्पर्य काय कीं, बायकांना कोंडून घातल्यानें त्या चांगल्या राहतील असा कांहीं भरंवसा नाहीं. पुरुषांनीं बायका ह्या केवळ प्रजोत्पादनाचीं हिंडतीं फिरतीं यंत्रें आहेत असें समजूं नये. बायकांना का बुद्धि नाहीं, का मन नाहीं, का रुचि नाहीं, का बरें-वाईट समजण्याची अक्कल नाहीं ? पुरुषांपेक्षां त्यांच्यांत कमी तें काय आहे ? पुरुषांना ज्याप्रमाणें सुखदुःखें होतात त्याप्रमाणें त्यांनाही होतात; मग त्यांनाच या भयंकर अज्ञातवासांत कशासाठीं ठेवावें ? बायकोला कोंडून ठेवून तिच्या पातिव्रत्याची बढाई मिरविणारा, पौरुषाभावामुळें ब्रह्मचर्याची ऐट मारणाऱ्यासारखा होय. जें मोतीं लाखोंजणांच्या परीक्षेला येऊन पाण्यास उतरलें तेंच खरोखर मोलाचें; त्याप्रमाणें व्यवहारांत मोकळेपणीं वागत असतां ज्या मोहक गोष्टी वारंवार भेटतात, त्यांना चुकवून किंवा टाळून जी आपल्या नवऱ्याला चिकटून राहिली

ती खरी साध्वी; आणि अशाच्या साधुत्वाचा अभिमान असणें हें योग्य आहे. ज्याला आपल्या बायकोनें आपल्याशीं इमानी रहावें असें वाटत असेल त्यानें तिच्यावर अंतःकरणापासून प्रीति करावी; तिच्या हातून एखादी चुकी झाली असल्यास तिला ती नीट समजून सांगावी; आपली चुकी आपण कबूल करावी, बाहेरख्याल करूं नयेत, खर्च दोघांच्या विचारानें करावा; सारांश एकमेकांनीं एकमेकांचीं मनें संतुष्ट राखण्याविषयीं नित्य प्रयत्न करावा. अशा रीतीनें वागणाऱ्या स्त्रीपुरुषांचें प्रेम एकमेकांवर घट्ट बसून त्यांत बिघाड पाडण्यास धजणारा असा विरळाच सांपडेल. जारकर्म होण्याला पहिलें कारण स्त्रीपुरुषांचा बेबनाव हा होय. कोणत्याही व्यक्तीची आपल्यावर खरी प्रीति पाहिजे असली तर आपण त्यावर खरी प्रीति केली पाहिजे. जगाच्या सध्यांच्या स्थितींत बहुतेक मनुष्यांना जन्मभर सुखापेक्षां दुःखच फार भोगावें लागतें. स्वातंत्र्य असलें म्हणजे त्यांतल्या त्यांत त्याचा थोडा विसर पडतो. पण "मराठमोळा" असला म्हणजे जन्मभर पारतंत्र्यांत बुचकळ्या माराय्याच्या! जे कोणी गोषा चांगला असें म्हणतात त्यांना असें विचारावें कीं कांहीं मंत्रानें एखाद्या सुलताना ची सुलताना लुम्हाला बनवून त्याच्या झनान्यांत नेऊन टाकलें तर खपेल काय! विचारांतीं जी गोष्ट आपण करण्यास सिद्ध होणार नाहीं, ती बायकांना करायाला लावणें म्हणजे बळामुळें जुलूम करण्यासारखें होय. मुली लहान असतां त्यांस चांगलें शिक्षण देऊन त्या उपवर झाल्या म्हणजे त्यांच्या संमतीनें त्यांस नवरे पाहून दिल्यानें अनेक स्त्रीपुरुषांचीं सुखी जोडपीं दिसूं लागतील; इतकेंच नाहीं, तर पुरुषांप्रमाणें स्त्रिया मोकळेपणीं वागूं लागल्या म्हणजे पुरुषांच्या अनीतीलाही थोडा धाक बसेल. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, जगाची सुधारणा म्हणून मनुष्य-जातींचें कांहीं एक कर्तव्य आहे. तें त्याच्या बुद्धिश्रमानें होतें. आजपर्यंत बायकांस कोंडून घातल्यानें तें व्हावें त्याच्या निम्मे वेगानें होत आहे. तें लवकर व्हावें अशी इच्छा असेल तर स्त्रियांना गोषांत ठेवायाच्या नाहींत, इतकेंच नाहीं, तर पुरुषांप्रमाणें त्यांना प्रशस्तपणें हरएक शास्त्रांत, कलेंत, आणि व्यवहारांत निष्णात केल्या पाहिजेत.

[वर्ष २, अंक १८.]

सासुरवास.

ननांदा सानंदा हसितवदनाभूद्बहिनिका ॥
कृतार्था च श्वश्रूः कुपितदृशि पत्यौ मयि सखि ॥
स चेदुच्चैर्ब्रूते कठिनवचनैस्तर्हि सकलाः
करिष्यन्ति प्रायो वसनरहितास्ताण्डवविधिम् ! ॥*

पूर्व वयांत ज्याचे दिवस पारतंत्र्यांतच जातात, दुसऱ्यापुढें केविलवाण्या मुद्रेनें तोंड वेंगाडल्यावांचून ज्यास एकही दिवस उजाडत नाहीं, फुकाचे दोन गोड शब्द कानीं पडून होणाऱ्या सुखास जो सर्वथैव आंचवलेला असतो, न्याय्य प्रत्युत्तर करण्यासही ज्यास आपले ओठ हलवितां येत नाहींत, व अत्यंत दुःसह अन्याऱ्याच्या वर्तनानें येणारा राग निमूटपणें गिळून टाकण्यावांचून ज्यास या जगातीतलावर दुसरा मार्गच नसतो, अशा मनुष्यास ईशरुपेनें धनदौलत व अधिकार प्राप्त झाला असतां, त्यानें धनमदांध होऊन अधिकाराच्या बळावर माणुसकीस विसंगत असें आचरण करावें, व "मनुष्यरूपेण मृगाश्चरन्ति" या कोटींत आपली गणना करून द्यावी, या सारखी सखेदाश्चर्याची दुसरी कोणतीही गोष्ट नाहीं; व यासारखी दुसरी कोणती सत्यही गोष्ट नाहीं कीं बहुतेक सासवा, नणंदा व जावा यांस सासरच्या जाचाची स्वानुभवानें चांगली ओळख असूनही सासुरवाशिणींशीं त्यांपैकीं बहुतेकांचें वर्तन अत्यंत निंद्य प्रकारचें असतें. मनुष्य परक्या स्थळीं गेलें असतां त्याची स्थिति कशी होते याचा थोडाबहुत अनुभव प्रत्येकास असेल. व परत्रवास जगांत वागलेल्या साधारण मनुष्यासही कंटाळवाणा वाटतो, हें जर खरें असेल, तर जिची बालपणची नैसर्गिक अल्लड वृत्ति अजून नाहींशी झाली नाहीं, अशी मुग्धबाला आपल्या समवयस्क व जन्मापासूनच्या

---

* कोणी तरुण युवति आपल्या सखीस म्हणतेः—सखे अग तुला काय सांगूं, तिकडून कुटें माझ्याकडे रागानें पहाणें झालें तों वन्संना केवढा आनंद झाला ! जाऊबाईचें तोंड किती उल्हासलें ! सासूबाईंना तर वाटलें कीं मी आज अगदीं कृत्यकृत्य झालें ! मग हेंच जर का मला रागानें बोलणें झालें असतें तर मला गडे वाटतें, नेसूचें सोडून ह्या सगळ्या थइथइ नाचल्या असत्या ! ! !

मैत्रिणींस सोडून, आपल्या आप्तगणगोतांच्या लडिवाळ वर्तनास पारखी होऊन, व मातापितरांच्या अनुपम ममतेच्या सावलीस मुकून, ज्या वेळीं आपल्या पतिगृहाचा उंबरठा चढत असेल त्यावेळेस तिच्या मनाची स्थिति कशी होत असेल, हें शब्दांनीं व्यक्त करण्यास आमच्या लेखणींत सामर्थ्य नाहीं. याची वाचकांनीं कल्पनाच केली पाहिजे. व अशा स्थितींत असणाऱ्या वधूशीं सासरच्या माणसांची वागणूक फार ममतेची असावी हें उघड आहे. परंतु नित्यानुभव याच्या अगदीं विरुद्ध आहे ही मोठी दिलगिरीची गोष्ट आहे. सून घरांत येऊन फार दिवस झाले नाहींत तोंच सासूबाई आपल्या सासूपणाचा अम्मल तिच्यावर गाजवूं लागतात. वडील जाऊबाई असल्या तर त्यांनाही आपली अंकितवृत्ति सोडून जरा अधिकारारूढ होण्याची हौस फेडून घेतां येते. नणंद असली तर अधिकार जास्तच, व ती वेळ सांपडेल तेव्हां आपल्या अधिकारांतली शिक्षा चोपायला मागें पुढें पहात नाहीं, व त्यांतूनही ही नणंद जर का आपल्या दुर्दैवानें घरजावाईण होऊन बसली असली तर बनली लागलीच ती प्रतिसासू ! किंबहुना सख्खी सासू बरी, पण ही प्रतिसासू मोठी कठिण ! शिवाय फावल्या वेळेस मामंजी, भाऊजी आणि पतिराज हेही तिचा थोडासा समाचार घेण्यास तत्पर असतातच. अशा प्रकारें वर सांगितलेले व्याघ्र चोहींकडून त्या बालकुरंगीच्या राशीस लागल्यावर तिचा छळवाद होतो हें सुप्रसिद्धच आहे. कित्येक ठिकाणीं तिला सक्तमजुरीचीही शिक्षा मिळते. भेद येवढाच कीं पायांत बिडया मात्र नसतात. कित्येक ठिकाणीं पोलिसची समजही मिळते; व आईबापांचा उद्धार तर सर्वत्रच होत असतो. इतकेंही होऊन पुनः कुठें बोलण्याचीही चोरी. कुठें शेजारींपाजारीं जाऊन आपल्या कर्मकटकटीचा पाढा वाचून दोन अश्रु गाळून जरा समाधान करून घ्यावें तर होऊन बसणार एखादें भलतेंच ! वर निर्दिष्ट केलेल्या प्रकारांहून अन्य छळणूकही थोडी असते असें नाहीं. लग्नांत घडलेल्या क्षुल्लक गोष्टीही तिला जन्मभर टोणपे मारण्यास त्या मायलेकींस व इतर आखाडसासवांस पुरेशा होतात. अशा प्रकारें सारखी गांजणूक सुरू असल्यावर जिवाचाही कंटाळा येऊन कित्येक सुना आडविहीर करून प्राणान्त करतात यांत नवल तें कोणतें ? येथपर्यंत आम्हीं सभर्तृक सुनेचें मात्र वर्णन केलें. परंतु आमच्या अनाथ गतभर्तृका सुनांची स्थिति तर अत्यंत हृदयभेदक असते. आपल्या मातापितरांचा दुःसह वियोग व सासरच्या सर्व

माणसांचा जाच हीं ज्या पुढें होणाऱ्या पतिसुखाच्या आशेवर सहन करून ती आपले बंदिखान्यांतील दिवस कंठीत असते, त्या सर्वांचें मूळच दुष्ट काळानें हिरावून नेल्यावर तिचे हाल कुत्राही खाईनासा होतो. पतिशोकानलानें दग्ध झालेल्या त्या बिचाऱ्या अनाथ अबलेच्या दुःखावर डाग दिल्याप्रमाणें रात्रंदिवस तिजवर अपशब्दांचा भडिमार होऊं लागतो. एकीनें म्हणावें, 'काय अवदसा पायगुणाची ! घरांत आली नाहीं तोंच सगळें वाटोळें करून बसली !' दुसरीनें म्हणावें, 'होती मागल्या जन्मींची कोणी दावेदारीण, तो घेतलान् दावा साधून आणि दुसरें काय ? आतां बसली कीं नाहीं निवान्त !' तिसरीनें म्हणावें, "पांढऱ्या पायाची ही मला पहिल्यापासूनच माहीत; बयाचा पाय घराला लागल्यापासून घरांत चैन कसें तें कुणाला ठाऊक देखील नाहीं।" असो; अशा प्रकारची तिची नुसती तोंडपुजाच होऊन रहाते असें नाहीं. घरांतील सर्व कामाचा रेट तिजवरच बसतो. जात्याची घरघर तर कर्णरंध्रांत खिळूनच जाते. धुण्याच्या गंगाळाची खूण कमरेवर दृष्टीस पडण्यास फारसें कठिण पडत नाहीं. वाचकहो, अशा प्रकारच्या शेंकडों गोष्टी तुम्ही नित्यशः पहात असून त्यांच्या प्रतिकारार्थ कांहींच उपाय तुम्हीं करूं नये काय ? हा सर्व प्रकार तुम्हांस मानवतो काय ? नेत्रमांद्यामुळें ज्यांच्या नेत्रांस चाळशी लागली आहे, व दंत भ्रष्ट होऊन ज्यांच्या तोंडाचें बोळकें बनलें आहे, अशा नव्याण्णव वर्षांच्या थेरड्यासही दुसरें लग्न करण्याची परवानगी असून, व ते करीतही असून, अत्यंत मुग्धावस्थेंत असणाऱ्या, व पति म्हणजे काय हेंही जीस पुरतें माहीत नाहीं, अशा अनाथ बालेस तिचा कांहीं अपराध नसतां दुसरें लग्न करण्याची परवानगी नसावी, व तिचें एखादें वांकडें पाऊल पडेल, या भीतीनें ज्या केशकलापावरून हस्तिदंती फणीचा संस्कार झाला, त्यावरच नापिताची पोलादी फणी फिरावी, यासारखी अश्लाघ्य व लाजिरवाणी गोष्ट दुसरी कोणती आहे ? तेव्हां आधीं अशी गोष्ट करणें हाच मुळीं अन्याय. त्यांतूनही अशा निंद्य पक्षपातानें तिच्या संसाराचा सर्वस्वीं भंडवडा करून तिचा सर्वांनीं छळवाद मांडावा हें कर्म तर राक्षसी अंतःकरणाच्या लोकांवांचून दुसरा कोणीही करणार नाहीं. वरील सर्व विचार अतिशयोक्तीचे आहेत असेंही मानणारे कित्येक निस्सीम बहाद्दर आम्हांत आहेत हें आम्ही जाणतों, व त्यांस आम्ही इतकेंच उत्तर देतों कीं "पाण्यांतील मासा झोंपी जातो कैसा। जावें त्यांच्या वंशा तेव्हां कळे॥" परंतु प्रत्यक्ष

अनुभवावांचूनही मनुष्याच्या अंतःस्थितीचें हुबेहुब चित्र ज्यांस आपल्या मनापुढें उभें करतां येतें त्यांना वरील लेख अक्षरशः खरा आहे, असें आढळून आल्यावांचून रहाणार नाहीं; व हा निंद्य प्रचार बंद करण्याविषयीं प्रयत्न करणें हेंही त्यांचें कर्तव्यकर्म होय. आमच्या आर्यमहिलासमाजानें इतर महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष्य न देतां (व जोंपर्यंत त्यांस स्वतंत्रता मिळाली नाहीं तोंपर्यंत त्यांनीं दिलेल्या लक्ष्याचाही तितपतच उपयोग होणार !), गृहस्थितीविषयीं विचार करण्यांत जर आपला कालक्षेप केला तर बऱ्याच महत्त्वाचें काम तडीस नेल्याचें श्रेय त्यांस येईल; व आमचे सुशिक्षित देशबांधवही आपलीं बाहेरचीं महत्त्वाचीं कामें क्षणभर एका बाजूस ठेवून माजघरच्या दाराच्या आंतील गोष्टींकडे जरासें लक्ष्य पोंचवितील तर त्यायोगानें त्यांस कमीपणा येईल असें आम्हांस वाटत नाहीं. हे व अशाच प्रकारचे जे दुसरे लेख प्रत्यहीं प्रसिद्ध होतात ते घरच्या स्त्रियांच्या कानांवर घालण्यांत गेलेला वेळ व्यर्थच जाणार नाहीं अशी आमची खात्री आहे. सर्व घरभर घाण तशीच राहूं देऊन दारापुढें मनोरम बगीचा उठवून दिल्यानें स्वच्छतेचा खऱ्या सुखाचा फायदा होणें नाहीं. असें करणें हें आम्हांस युरोपियन लोकांच्या बटलरांच्या बाह्य परीटघडीप्रमाणेंच हास्यास्पद दिसतें. आतां असें केल्यानें म्हणजे आजच्या लेखांत दिग्दर्शित केलेल्या सर्व अनर्थांचा समूळ परिहार होईल असें नाहीं. ज्याप्रमाणें एखाद्या अफाट विस्ताराच्या वृक्षापासून अडचण होऊं लागली असतां त्याच्या तात्कालिक शाखावच्छेदनापासून थोडासा गैरसोईचा त्रास चुकतो, त्याप्रमाणें हा केवळ तूर्तांतूर्ततेचा उपाय आहे. समूळ गैरसोय दूर करण्यास "मूले कुठारः" या न्यायाचेंच अवलंबन केलें पाहिजे. घराच्या मजबुतीस पायाची बळकटी जशी अत्यावश्य असते, त्याप्रमाणें कुटुंब सुखी रहाण्यास त्यांतील सर्व इसमांस चांगलें शिक्षण मिळालें पाहिजे, व त्यांस योग्य स्वतंत्रताही असली पाहिजे, व या दोहोंचा अभाव हेंच आमच्या गृहस्थितींतील प्रस्तुतच्या दोषांचें मूळ बीज होय. सासूपेक्षां सासऱ्याचा जाच सुनेस कमी कां ? याचें कारण इतकेंच कीं प्रत्येक मनुष्यास दुसऱ्यावर ताबा चालविण्याची स्वाभाविक हौस असते. लहान भाऊ जवळ असल्यावर वडील दादा अगदीं क्षुल्लक कामाकरितांही आपणास तसदी देत नाहींत, याचा अनुभव आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस असेल. लहानपणीं खेळांत पंतोजींचें सोंग घेऊन आपल्या इतर सोंगड्यांस छप्या मार-

ण्याची हौस पुरवून घेतलेलीही अझून कित्येकांच्या स्मरणांत असेल. घरच्या मालकास सर्वांवर अधिकार चालविण्याची सत्ता व योग्यता असल्यामुळें त्याचा अम्मल सर्वांवर वांटला जातो. घरधनिनींचें तसें नसतें. मुलगा जाणार शाळेंत, मुलगी जाणार सासरीं; तेव्हां त्यांच्यावर तर अम्मल चालवितां येत नाहीं शिलक राहिली सून. तेव्हां तिच्यावर घ्यावा काढून ताव; व हें असें होणेंही सहाजिकच आहें, व याबद्दल आमच्यानें सासू, नणंद व जाऊ यांस विशेष दोष देववत नाहीं. त्यांस चांगलें शिक्षण मिळून जर हल्लीं असलेल्या दास्यत्वापासून त्यांची कांहीं सुटका होईल, तर त्यांचाही सुनेवर इतका दांत रहाणार नाहीं. बालविवाहाची चाल मोडून टाकल्यानेंही सासवांचा अधिकार नियमित होईल, व सुनांची ठेप बरीच कमी करतां येईल, असें आम्हांस वाटतें. पुनर्विवाहाचा प्रघात प्रस्तुतहून जास्त फैलावल्यास अनेक अनाथ सुना सासुरवासांतून सुटतील. इतकेंच नाहीं, तर त्यांची वैधव्यदुःखांतून सुटका केल्याचेंही श्रेय आमच्या देश-बांधवांस मिळेल, व परदेशस्थांसही आमच्या नाकांत काड्या घालतां येणार नाहींत. असो; आतांपर्यंत सांगितलेल्या व कांहीं अन्य उपायांचें सवडीनुसार अवलंबन करून शिरोलेखांत असलेल्या सुभाषितास खोटें ठरविण्याबद्दल आमचे देशबांधव मनापासून झटतील, अशी उमेद बाळगून आम्ही दुसऱ्या कामास लागतों.

[वर्ष २, अंक ५२.]

दारूबाजी

सुरापान ऊर्फ दारूबाजी हें व्यसन या देशांत इंग्रजांचें राज्य होण्यापूर्वी अगदींच ठाऊक नव्हतें असें नाहीं; किंवा या अपूर्व ऐहिक पेयद्रव्यापासून होणाऱ्या स्वर्गीय सुखाची अनुपमेय लज्जत जाणण्याचें महाभाग्य थोड्यांच्याच वांट्याला येई असेंही नाहीं. भरतखंडाच्या प्राचीन इतिहासावरून असें दिसून यतें कीं "पानभूमि" आणि तींतील सुखानुभव हीं या देशांत फार दिवसांपासून सर्व जातींस (ब्राह्मणसुद्धां) अवगत आहेत. मुसलमानांच्या अमदानींतही या व्यसनाची समिध शेकली होती असें नाहीं. तेही भले रंगेल असल्याकारणानें त्यांनींही सुराबाईला थोडेंसें उत्तेजन दिलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि आमच्या सुधारलेल्या पाश्चिमात्य प्रभूचें येथें राज्य होण्यापूर्वी "बाटलाबाईच्या" तारेंत--

ब्रह्मानंदीं लागली टाळी।
कोण देहातें सांभाळी॥

अशी अजगरावस्था करून घेण्याइतकी निष्णातता क्वचित् दृष्टीस पडे. पण प्रस्तुत असल्या रमणीय दर्शनांची बिलकुल वाण नाहीं. लहानापासून थोरापर्यंत, श्रीमंतापासून गरीबापर्यंत-सर्व स्थितींत 'आनंदी आनंद' करून सोडण्याच्या कामाचा मक्ता या अद्वितीय रसाकडे येऊं लागला आहे हें या आर्यभूमीच्या पूर्वीच्या महतीचें, सध्याच्या वाढलेल्या सुधारणेचें, आणि पुढच्या स्वातंत्र्याचें अत्यंत दृढ दर्शक होय. या मोहक व दुःखापहारक अर्वाचीन सोमरसाचा प्रसार करण्यांत अध्वर्युपण आमच्या प्रभूंनीं स्वीकारलें आहे, व आम्ही त्यांचे पट्टशिष्ये बनत चाललों आहों. जुन्या पिढीपेक्षां नव्या पिढीचें पाऊल प्रत्येक बाबतींत पुढें आहे हें अगदीं निर्विवाद आहे. पण या बाबतींत तर नवीनें जुनीस शेंकडों योजनें मागें टाकिलें यांत अणुमात्र संशय नाहीं! कांहीं अंशीं मनाला, धर्माला, व विशेषेंकरून लोकापवादाला व बहिष्काराला वचकणारी आमची पांढरमिशी जरठ मंडळी, विद्यामृतानें परिपुष्ट होऊन लोकांची किंवा आप्तांची पर्वा न करणाऱ्या, पर्यस्तधर्मशृंखल, आमच्या अर्वाच्य विद्वत्परंपरेपुढें काय टिकाव धरणार

व ब्रान्डाबाईला किती उत्तेजन देणार ? मागच्या म्हातारड्यांना काय, खावें आणि स्वस्थ घोरत पडावें येवढें ठाऊक होतें ! आतांप्रमाणें छाती दडपविणारे बुकांचे भारे खलास करून लिटलगो, बी. ए., एम्. ए., एल्. सी. ई., एल्. एम्. आन्ड एस्. व एल्एल्. बी. च्या परीक्षा कोठें द्याव्या लागत ? बुकें घोकतां घोकतां ज्यांना तोंडाला कोरड पाडून घ्यावी लागते, ज्यांना गांवोगांव व रानोमाळ साहेब लोकांच्या घोड्यामागें तंगड्या तोडीत किंवा तट्टें पिटाळीत जावें लागतें, ज्यांना सूक्ष्म बुद्धि करून न्याय देण्यांत, किंवा न्यायाधिशांपुढें पक्षकारांचें भांडण भांडण्यांत मेंदू किंवा घसा कोरडा करून घ्यावा लागतो, ज्यांना शिकवितां शिकवितां उरांत रक्त पाडून घ्यावें लागतें, ज्यांना रोजच्या रोज तावावर ताव खर्डावे लागून मानेचा कांटा ढिला करून घ्यावा लागतो त्यांना या श्रमपरिहारक कादंबरीप्राशनाला उदार आश्रय दिल्यापासून काय हित होतें हें समजणार आहे. तें यांना एक समजतें कीं आर्यजननीचा उद्धार करण्यास निघालेल्या जातिभेदासहिष्णु ऐक्यवर्धक मित्रकान्यांस समजतें ! सारांश काय कीं वेश्यागमन आणि सुरापान यांनीं ज्याच्या गळ्यास घट्ट मिठी मारली त्याच्या हातून विद्याप्रसार, समाजसुधारणा, परदेशप्रयाण, शास्त्रकलाभ्यास, धर्मविचार, वगैरे देशोन्नतीचीं कामें जशीं वठणार आहेत तशी तूपपोळी आणि ताकभात खाऊन विवाहित स्त्रीशीं एकभावानें राहणाऱ्या ढिसूळ, ढिल्या, व एककल्ली मनुष्याच्या हातून कधींही होणार नाहींत हें उघड आहे. वर सांगितल्या प्रकारचे कांहीं धीरोदात्तगंभीर वीर आम्हांत आहेत म्हणून बरें आहे; नाहीं तर हिंदुस्थानचा " बोलो भाई राम " कधींच झाला असता !

वर जें लिहिलें आहे ती केवळ अतिशयोक्ति आहे असें कित्येकांस वाटणार आहे; ती अतिशयोक्ति ठरेल तर आम्हांसही बरें वाटेल. पण आमच्या समाजांत अलीकडे निर्लज्जपणाचा जो प्रकार वारंवार दृष्टीस पडूं लागला आहे, तो बंद करण्याविषयीं आपण कांहीं खटपट न केल्यास हें व्यसन किती चेकळेल याचा आज अजमास सुद्धां करतां येत नाहीं. जे कित्येक शुद्धीवर असतां विद्वानांत व हुशार पुढाऱ्यांत गणले जातात, तेच ह्या व्यसनाच्या आधीन असले म्हणजे गटारांत नागवे उघडे कसे पडतात, व " चेला, माडिके उप्पर गाडी लाव " असें बरळून आपणांस ' छीः थू ' करून कसे घेतात, हें पुष्कळांस पाहून व सगळ्यांस ऐकून तरी ठाऊक असेल ! तसेंच ज्यांनीं आपल्या अधिकाराच्या जोरावर

दारूबाजी

सुरापान ऊर्फ दारूबाजी हें व्यसन या देशांत इंग्रजांचें राज्य होण्यापूर्वी अगदींच ठाऊक नव्हतें असें नाहीं; किंवा या अपूर्व ऐहिक पेयद्रव्यापासून होणाऱ्या स्वर्गीय सुखाची अनुपमेय लजत जाणण्याचें महाभाग्य थोड्यांच्याच वांट्याला येई असेंही नाहीं. भरतखंडाच्या प्राचीन इतिहासावरून असें दिसून यतें कीं "पानभूमि" आणि तींतिल सुखानुभव हीं या देशांत फार दिवसांपासून सर्व जातींस (ब्राह्मणसुद्धां) अवगत आहेत. मुसलमानांच्या अमदानींतही या व्यसनाची समिध शेकली होती असें नाहीं. तेही भले रंगेल असल्याकारणानें त्यांनींही सुराबाईला थोडेंसें उत्तेजन दिलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि आमच्या सुधारलेल्या पाश्चिमात्य प्रभूचें येथें राज्य होण्यापूर्वी "बाटलाबाईच्या" तारेंत--

ब्रह्मानंदीं लागली टाळी।
कोण देहातें सांभाळी॥


अशी अजगरावस्था करून घेण्याइतकी निष्णातता क्वचित् दृष्टीस पडे. पण प्रस्तुत असल्या रमणीय दर्शनांची बिलकुल वाण नाहीं. लहानापासून थोरापर्यंत, श्रीमंतापासून गरीबापर्यंत-सर्व स्थितींत 'आनंदी आनंद' करून सोडण्याच्या कामाचा मक्ता या अद्वितीय रसाकडे येऊं लागला आहे हें या आर्यभूमीच्या पूर्वीच्या महतीचें, सध्याच्या वाढलेल्या सुधारणेचें, आणि पुढच्या स्वातंत्र्याचें अत्यंत दृढ दर्शक होय. या मोहक व दुःखापहारक अर्वाचीन सोमरसाचा प्रसार करण्यांत अध्वर्युपण आमच्या प्रभूंनीं स्वीकारलें आहे, व आम्ही त्यांचे पट्टशिष्ये बनत चाललों आहों. जुन्या पिढीपेक्षां नव्या पिढीचें पाऊल प्रत्येक बाबतींत पुढें आहे हें अगदीं निर्विवाद आहे. पण या बाबतींत तर नवीनें जुनीस शेंकडों योजनें मागें टाकिलें यांत अणुमात्र संशय नाहीं! कांहीं अंशीं मनाला, धर्माला, व विशेषेंकरून लोकापवादाला व बहिष्काराला वचकणारी आमची पांढरमिशी जरठ मंडळी, विद्यामृतानें परिपुष्ट होऊन लोकांची किंवा आप्तांची पर्वा न करणाऱ्या, पर्यस्तधर्मशृंखल, आमच्या अर्वाच्य विद्वत्परंपरेपुढें काय टिकाव धरणार

व ब्रान्डाबाईला किती उत्तेजन देणार ? मागच्या म्हातारड्यांना काय, खावें आणि स्वस्थ घोरत पडावें येवढें ठाऊक होतें ! आतांप्रमाणें छाती दडपविणारे बुकांचे भारे खलास करून लिटलगो, बी. ए., एम्. ए., एल्. सी. ई., एल्. एम्. आन्ड एस्. व एल्एल्. बी. च्या परीक्षा कोठें द्याव्या लागत ? बुकें घोकतां घोकतां ज्यांना तोंडाला कोरड पाडून घ्यावी लागते, ज्यांना गांवोगांव व रानोमाळ साहेब लोकांच्या घोड्यामागें तंगड्या तोडीत किंवा तट्टें पिटाळीत जावें लागतें, ज्यांना सूक्ष्म बुद्धि करून न्याय देण्यांत, किंवा न्यायाधिशांपुढें पक्षकारांचें भांडण भांडण्यांत मेंदू किंवा घसा कोरडा करून घ्यावा लागतो, ज्यांना शिकवितां शिकवितां उरांत रक्त पाडून घ्यावें लागतें, ज्यांना रोजच्या रोज तावावर ताव खर्डावे लागून मानेचा कांटा ढिला करून घ्यावा लागतो त्यांना च्या श्रमपरिहारक कादंबरीप्राशनाला उदार आश्रय दिल्यापासून काय हित होतें हें समजणार आहे. तें यांना एक समजतें कीं आर्यजननीचा उद्धार करण्यास निघालेल्या जातिभेदासहिष्णु ऐक्यवर्धक मित्रकान्यांस समजतें ! सारांश काय कीं वेश्यागमन आणि सुरापान यांनीं ज्याच्या गळ्यास घट्ट मिठी मारली त्याच्या हातून विद्याप्रसार, समाजसुधारणा, परदेशप्रयाण, शास्त्रकलाभ्यास, धर्मविचार, वगैरे देशोन्नतीचीं कामें जशीं वठणार आहेत तशी तूपपोळी आणि ताकभात खाऊन विवाहित स्त्रीशीं एकभावानें राहणाऱ्या ढिसूळ, ढिल्या, व एककल्ली मनुष्याच्या हातून कधींही होणार नाहींत हें उघड आहे. वर सांगितल्या प्रकारचे कांहीं धीरोदात्तगंभीर वीर आम्हांत आहेत म्हणून बरें आहे; नाहीं तर हिंदुस्थानचा " बोलो भाई राम " कधींच झाला असता !

वर जें लिहिलें आहे ती केवळ अतिशयोक्ति आहे असें कित्येकांस वाटणार आहे; ती अतिशयोक्ति ठरेल तर आम्हांसही बरें वाटेल. पण आमच्या समाजांत अलीकडे निर्लज्जपणाचा जो प्रकार वारंवार दृष्टीस पडूं लागला आहे, तो बंद करण्याविषयीं आपण कांहीं खटपट न केल्यास हें व्यसन किती चेकळेल याचा आज अजमास सुद्धां करतां येत नाहीं. जे कित्येक शुद्धीवर असतां विद्वानांत व हुशार पुढाऱ्यांत गणले जातात, तेच ह्या व्यसनाच्या आधीन असले म्हणजे गटारांत नागवे उघडे कसे पडतात, व " चेला, माडिके उप्पर गाडी लाव " असें बरळून आपणांस ' छीः थू ' करून कसे घेतात, हें पुष्कळांस पाहून व सगळ्यांस ऐकून तरी ठाऊक असेल ! तसेंच ज्यांनीं आपल्या अधिकाराच्या जोरावर

आपल्या दारूपासून व स्पर्शरोगापासून होणाऱ्या दुष्ट यातना अनाथ स्त्रियांस भोगण्यास लाविलें आहे, असे आत्मसुखाभिलाषीही पुष्कळांच्या पहाण्यांत असतील. सारांश काय कीं जे या दुष्ट व्यसनांच्या फेऱ्यांत न सांपडते तर आपल्या कुलाला व देशाला भूषण झाले असते, असे कित्येक खासे मोहोरे रांडेच्या पायीं व दारूच्या पायीं झिजून गेले आहेत, व जात आहेत, हें प्रतिदिवशीं प्रत्येकाच्या पाहण्यांत येऊं लागलें आहे. या व्यसनाचा नाश करण्यासाठीं इंग्लिश लोकांकडे पाहून कांहीं उपयोग होईल असें आम्हांस वाटत नाहीं. कारण, ते पक्के दारूबाज होऊन बसले आहेत. इंग्लंडांत प्रतिवर्षी एक अब्ज चाळीस कोटींची दारू खपते. या रकमेला इंग्लंडच्या लोकसंख्येनें भागून काढलें तर दरमाणशीं दर वर्षास चाळीस रुपयांची दारू पडते ! तेव्हां ज्या आमच्या लोकांचें वार्षिक उत्पन्न दरमाणशीं मि. दादाभाईप्रमाणें रु. २१ आणि सर एव्हेलिन बेअरिंग यांच्याप्रमाणें रु. २७ पडतें, त्या आम्हीं या कामांत इंग्रजांस गुरु करणें म्हणजे दोन दिवे दिसणाऱ्या रोग्यानें चार दिवे दिसणाऱ्या वैद्याकडे औषधासाठीं जाण्यासारखें होय ! या व्यसनाची दुष्ट कळी आतांच्या आतांच खुडून टाकण्याचा कांहीं प्रयत्न केला नाहीं तर ही एकदां उमलली म्हणजे तिचा विषारी गंध सर्वांस फार जाचणार आहे. करितां सर्व स्वपराहितचिंतक या विषयाकडे लवकर लक्ष देतील अशी आम्ही आशा करितों.

[वर्ष ३, अंक ३५]



इंग्रजी विद्या व आमची सामाजिक स्थिति

हिंदुस्थानांत इंग्रज लोकांचें राज्य झाल्यापासून, व आमच्या लोकांस पाश्चात्य विद्येचा संस्कार घडूं लागल्यापासून, आमच्या समाजावर जे अनेक परिणाम, बरे किंवा वाईट, झाले आहेत, त्यांपैकीं आज एकाचा विचार करण्याचें आम्हीं योजिलें आहे. महाराष्ट्र देशांत खरा इंग्रजी अम्मल सुरू होऊन साठपांसष्ट वर्षें तरी झालीं; तथापि जोंपर्यंत इंग्रजी विद्येचें आम्हांस फारसें ज्ञान नव्हतें, तोंपर्यंत आमच्या समाजास इंग्रजी अंमलापासून फारसा उपयोग किंवा उपद्रव झाला नाहीं. या विद्येचें खरें महत्त्व कळूं लागून, व तिची केवळ उदरनिर्वाहासही अत्यावश्यकता जाणवूं लागल्यापासून, फारशीं वर्षें झालीं नाहींत; अशी स्थिति आम्हांस येऊन फार तर १५–२० वर्षें झालीं आहेत. तथापि या थोडया काळांत आमच्या समाजाचें किती स्वरूप बदललेलें आहे हें कोणीं विचार केल्यास त्याच्या सहज लक्षांत येईल. आमची गृहस्थिति, आमचे धर्माधर्मविचार, आमचा जातिभेदाविषयीं ग्रह, व इतर जातींशीं वागणूक, व आमचा नित्यव्यवहार, या सर्व गोष्टींवर इंग्रजी विद्येचे बरे किंवा वाईट परिणाम घडले आहेत. मागील दोनतीन अंकांत आमच्या समाजांत जें एक प्रकारचें विलक्षण स्थैर्य व तटस्थता दृष्टीस पडते, व ज्या स्थैर्यास व तटस्थतेस जगांतील दुसऱ्या देशांत क्वचितच उपमा सांपडेल, त्यांचीं कांहीं कारणें दाखविलीं. आमची तर सर्व पाश्चात्य राष्ट्रांत या सामाजिक तटस्थतेबद्दल विशेष प्रसिद्धि आहे. असें असतांही इंग्रजी विद्येनें इतक्या अल्पकाळांत आमच्या समाजांत विलक्षण चळवळ व फेरफार चालविले आहेत, व ते आजमित्तीस उघड दिसूं लागले आहेत असें म्हटलें असतां कोणास आश्चर्य वाटेल. परंतु या गोष्टीचा बारीक विचार केला असतां आपली वरती सांगितल्याप्रमाणें खात्री होईल.

वृद्धलोकांनीं आपणांस सांगितलेल्या अनेक आख्यायिकांचें मनन केलें असतां, व इंग्रजी विद्येचा ज्यामध्यें फारच थोडा प्रसार झाला आहे, अशा एतद्देशीय संस्थानांतील लोकस्थिति पाहून, आपण वीस पंचवीस वर्षांमागें कोणत्या स्थितींत होतों, याची आपणांस बरीच कल्पना करितां येईल. कदाचित् आम्हांपैकीं

कित्येकांस तिचा प्रत्यक्षही अनुभव असेल. अनेक मनुष्यें ज्या सामाजिक पाशांनीं एकत्र बांधलीं जातात, असे जे द्रव्यसंबंधीं, ज्ञातिसंबंधीं, धर्मसंबंधीं, अनेक पाश पूर्वीं आम्हांमध्यें होते, व ज्यांचें प्राचल्य वृद्धांच्या गोष्टींवरून आपल्या सहज ध्यानांत येतें, ते पाश आतां कितपत उरले आहेत ? जीं घराणीं पूर्वीं मोठीं संपत्तिमान् व वजनदार म्हणून आपण ऐकत होतों, त्यांपैकीं आतां किती उरलीं आहेत ? व त्यांस वजन तरी आतां कितपत आहे ? पुनर्विवाहाचा पक्ष धारण करण्याचें कोणीं बोलून दाखविलें कीं त्यांस बहिष्कार घालण्याकरितां पूर्वधर्मानुयायी गृहस्थ व भिक्षुक सर्व एकत्र होऊन त्यांनीं ग्रामण्य केलें, व त्यांस आपल्या दृष्टीनें प्रायश्चित्तें घ्यावयास लाविलीं, ते दिवस, ते लोक, व तो धर्मपाश आतां कोठें आहे ? सोनारांनीं आपण ब्राह्मणांशीं समानाधिकारी आहों, असें ग्रंथाच्या आधारानें सिद्ध करण्याचा घाट घालतांच ब्राह्मणांनीं त्यांचें खंडन करण्यास मोठ्या आवेशानें एकत्र व्हावें; मद्यपी व मांसाहारी लोक, मग ते शाक्त असोत किंवा इंग्रजी सुधारलेले असोत, त्यांचा तलास लावून त्यांस जातिबाह्य करावें इत्यादि गोष्टी ज्या पूर्वीं घडून येत असत, त्यावेळीं ज्या पाशांनीं आम्ही बांधलों गेलों होतों, ते पाश आतां कितपत उरले आहेत ! ते सर्व आतां नाहींसे होत आहेत; व त्यांचा इतका मोड होण्यास इंग्रजी अंमल व इंग्रजी विद्या हींच कारण होत हें उघड आहे.

तर आतां आमच्या समाजाची काय स्थिति झाली आहे ? इंग्रजी कायद्यानें जातिभेदादि सर्व विचार एकीकडे ठेवून कायद्याच्या दृष्टीनें सर्व सारखे, व सर्वांस एकच कायदा लागू, असें ठरवून टाकिलें आहे; व ज्या ज्या लोकांस इंग्रजी विद्येचा खरा संस्कार झाला आहे त्यांस ही गोष्ट यथायोग्य भासते. सरकारी नोकऱ्या बहुधा जातीचा विचार न करितां केवळ गुण पाहून देण्याचें ठरलें असल्यामुळें जातिभेदाचें बरेंच माहात्म्य मोडलें आहे, व जात्यभिमानही आतां आम्हांत, निदान व्यवहारांत, फारसा वास करीत नाहीं. धर्मसंबंधानें सर्व सक्ती व भय नाहींसें होत असल्यानें, शंकराचार्यादिधर्मगुरूंचें या प्रांतांत वर्षेंचीं वर्षें आगमन होत नाहीं. याप्रमाणें जिकडे पहावें तिकडे, पूर्वी जे जे पाश आम्ही मानीत होतों, व ज्यांच्या योगानें आमचा अल्पकाळांत एकोपा होण्याचा संभव होता, ते सर्व पाश आतां छिन्नविछिन्न होऊन गेले आहेत. प्रत्येकास स्वतंत्रपणें व स्वेच्छेनें वागण्याचा अधिकार आला आहे. कोणी

कोणावर अवलंबून नाहीं, व बहुधा कोणावर खरें वजन उरलें नाहीं; त्या-योगानें प्रत्येकाच्या अंगीं आत्महितबुद्धीचें अत्यंत प्राबल्य होत आहे. प्रत्येकास सर्व गोष्टींत आपलेंच हित डोळ्यापुढें दिसत असतें. आपण श्रीमंत व्हावें, आपली चैन असावी, आपणास अधिकार व अंमल असावा, अशा विचारांनीं प्रत्येकाचें मन बहुधा भरून गेलें असतें; परंतु आपण ज्या समाजांत वागतों त्याचें आपल्या हातून कांहीं हित व्हावें, सर्व समाजावर आपलें वजन असावें, व आपली कीर्ति आपणामागें उरावी, इत्यादि विचार कोणाच्याही मनांत येत नाहींत, किंवा आले तर अगदींच थोड्यांच्या मनांत येतात. इंग्रजी अंमलानें व विद्येनें आम्हांस जें स्वातंत्र्य दिलें, व ज्या योगानें आम्हांस इतरांवर अवलंबण्याचें कारण उरलें नाहीं, त्याचें हें फळ होय.

याप्रमाणें पूर्वीच्या सामाजिक पाशांचा छेद झाल्यानें आम्हांत स्वहितावर निःसीम भक्ति व इतरांविषयीं निश्चिंतता व उदासीनताही उत्पन्न झाली आहे; परंतु इंग्रजी अंमलाचे एवढेच वाईट परिणाम आमच्यावर झाले आहेत असें नाहीं. वरील दोन दुर्गुणांपासून आमच्या पुष्कळ सद्गुणांचाही लोप झाला आहे, व त्यांपासून आमचें किती नुकसान हल्लीं होत आहे हें पूर्णपणें सांगणेंही कठिण आहे.

मागील अंकांत इंग्रजी विद्येचा हल्लीं आमच्या देशांत जो प्रसार होत चालला आहे त्यामुळें, व इंग्रजी राज्यरीतीमुळें, आमच्या लोकांन जी स्वहितपरता व इतरांविषयीं निश्चिंतता व औदासीन्य उत्पन्न झालें आहे, त्यांचें थोडें वर्णन केलें. या स्वहितपरतेनें व औदासिन्यानें आमचें राज्यप्रकरणीं व सामाजिक किती नुकसान होत आहे याचा आज विचार करणें आहे.

इंग्रजी विद्येनें आणि इंग्रजी अंमलानें आम्हांस विचारस्वातंत्र्य व व्यवसाय-स्वातंत्र्य दिलें. या स्वातंत्र्यामुळें आम्ही कोणाची परवा न बाळगतां हवें तसें स्वेच्छ वागण्यास मोकळे झालों ही गोष्ट खरी. परंतु जों जों आम्ही स्वेच्छ व स्वतंत्र होत चाललों तों तों आमच्या अंगांत दौर्बल्य व पराधीनता येत चालली आहे, इकडे कोणाचें लक्ष जात नाहीं. पहा कीं लोकांच्या मनावरचा धर्म-संबंधीं दाब नित्यशः कमी होत असल्यानें, आम्हांपैकीं कित्येक मोठ्या पगाराच्या गृहस्थांस व श्रीमंत लोकांस सुरापानाचें व वेश्यागमनाचें दुष्ट व्यसन लागलें

आहे. साधारण लोकांतही ह्या दुर्व्यसनांचा इतका प्रसार होत चालला आहे कीं कांहीं दिवसांनीं या गोष्टी दुर्व्यसनांत मोडतील कीं नाहीं याचाही कित्येकांस संशय वाटूं लागला. तथापि आम्हांत आज हजारों विचारी लोक असे सांपडतील कीं त्यांस ह्या दुर्व्यसनांचा मनापासून द्वेष आहे, व तीं होतील तितकीं कमी करण्यास ते मनापासून झटतीलही. परंतु इंग्रजी विद्येनें आम्हांस जें स्वातंत्र्य दिलें आहे, त्यामुळें कोणाचेंच कांहीं चालत नाहीं. दारूचा वर्षांचे वर्षांस अधिक खप होत आहे हें आम्ही ऐकतों; नित्यशः कोणीना कोणी बडा मनुष्य गटारांत पडल्याची वार्ता आमच्या कानावर येते; आज कोणी कोडतांत बरळत होते; आज अमक्यांनीं रस्त्यांत मारामारी करून ते फरसखान्यांत पकडून नेले गेले; आज अमुक या दुर्व्यसनानें एकाएकीं स्वर्गांची पायरी चढले; अशा गोष्टी ऐकणें म्हणजे आमच्या नित्य परिपाठांतील झालें आहे. या गोष्टींबद्दल आम्हांतील सुज्ञ व समंजस लोकांस वाईट वाटत नाहीं असें नाहीं, परंतु त्यांच्या वाईट वाटण्यास किंवा निंदेस, आणि सगळ्या जगाच्याही निंदेस विचारतो कोण? आम्ही स्वतंत्र आहों, पैसेवाले आहों, मग आम्हीं लोकांची परवा कां करावी? याप्रमाणें आम्हांतील सदाचारी मनुष्यांस जें दौर्बल्य आलें आहे त्याचें मूळ कारण इंग्रजी अंमल हेंच होय. आमच्या प्राचीन धर्माचे पाश जर आज जिवंत असते, तर इतक्या शोचनीय दशेस आम्ही आलों असतां खचित स्वस्थ बसलों नसतों. कोणाच्याही ढोबळ दुर्गुणास विसरून जाऊन यःकश्चित् सद्गुणांचें स्मारक करण्यास आम्ही खचित एकत्र झालों नसतों; उलट धर्मामध्यें जो या दुर्व्यसनांचा प्रतिषेध केला आहे त्यास, हृद्रोग, उदर, अर्धांगवायु, अकालमृत्यु, इत्यादि घोर व्याधींच्या नित्य डोळ्यांसमोर घडणाऱ्या उदाहरणांनीं व अनुभवानें बळकटी आणली असती. परंतु स्वतंत्रतेबरोबर आम्हांमध्यें व्यक्तिदौर्बल्यही शिरलें आहे. आमच्या कित्येक सभांस मद्यपानाच्या नित्यवृद्धीचें मोठें भय वाटून त्यांनीं त्यास उपाय काय योजिला, कीं सरकारनें दारूच्या दुकानांची संख्या कमी करण्याची तजवीज करावी, तीं म्युनिसिपालिटींच्या स्वाधीन करावीं, इ. इ., सुचविलें. परंतु जोंपर्यंत त्यांनीं अनुभवसिद्ध मद्यपानाच्या दुष्ट परिणामांबद्दल लोकांची खात्री केली नाहीं, जोंपर्यंत मद्यपानामुळें आपणांस कोठें मान नाहीं, आपणांस गटारांत पडलेलें पकडण्यास पुष्कळ लोक टपले असून ते आपली केव्हां अप्रतिष्ठा करतील न जाणों, आपण सभ्यांच लोकांच्या मनांत किती सलतों आहों, व मृत्यूनंतर तर

आपल्या पूर्वाधिकाराची अगदीं परवा न बाळगतां आपली सर्वत्र फटफजिती होणार. आपल्या पुढील पिढीस त्यापासून अपमान व अपाय होणार, इत्यादि विचार प्रत्येकाच्या मनांत सदोदित वागत नाहींत; तोंपर्यंत अशा प्रकारचीं दुर्व्यसनें कधींही थांबणार नाहींत. दारूवर कर बसवून ती महाग केल्यास, किंवा दुकानें कमी करून ती दुर्मिळ केल्यास, तिकडची आमची प्रवृत्ति कमी होईल असें वाटत नाहीं; त्यापासून या दुर्व्यसनांत जाणारा पैसा कांहीं वांचेल असेंही होणार नाहीं; उलट " ऋणं कृत्वा सुरां पिबेत् " असें मूळ श्लोकाचें पाठांतर होण्याचा मात्र फार संभव आहे. आतां वरच्या प्रकारची दहशत कोणासही बसण्यास आपली स्वातंत्र्यजनित तटस्थप्रवृत्ति व खेद हीं कितीकशीं उपयोगीं पडणार ? या बाबतींत सर्वांनीं खरे प्रयत्न केले पाहिजेत; परंतु आमची स्वहितपरता तिकडूनही आड येते.

याप्रमाणें इंग्रजी विद्येच्या व अंमलाच्या योगानें आम्हांस जें स्वातंत्र्य प्राप्त झालें आहे, त्यापासून आमचें अपरिमित नुकसान होत आहे. आमची सदाचाराबद्दल निरपेक्ष पूज्यबुद्धि व प्रीति नाहींशी झाली; दुष्कीर्ति व जनलज्जा यांस आम्ही अगदीं मोजीत नाहींसें झालों. स्वहितपरता अंगीं पूर्णपणें वागत असूनही आम्ही दुर्व्यसनपाशांत गुंतून आपलें, आपल्या संततीचें अहित संपादन करीत आहों. व आम्हांमध्यें हीच स्वातंत्र्यास्थिति कायम राहिली, व आपण पूर्वीच्या सामाजिक पाशांच्या जागीं जर दुसरे कृत्रिम पाश उत्पन्न करून त्यांनीं आपणांस स्वेच्छेनेंच बांधून घेतलें नाहीं, तर अल्पकाळांत आम्हांमधील सर्व थोरवी व सद्गुण नाहींसे होण्याचा संभव आहे.

याप्रमाणें सामाजिक नुकसानाचें एक उदाहरण देऊन आज विवेचन केलें. आतां राज्यप्रकरणीं असेंच आमचें नुकसान होत आहे, व आम्हांवर अत्यंत जुलूम होण्यास हल्लींची आमची स्वतंत्रताच बहुधा कारण आहे हें पुढें दाखवूं. नंतर कृत्रिम सामाजिक पाश कोणते व ते कसे उत्पन्न करितां येतात इत्यादि विषयांचें प्रतिपादन करितां येईल.

इंग्रजी अमलानें व इंग्रजी विद्येनें आम्हांस जें विचारस्वातंत्र्य व व्यवहारस्वातंत्र्य दिलें आहे, त्याचे समाजावर जे परिणाम झाले आहेत, व त्यापासून आमचीं जीं नुकसानें होत आहेत, त्यांचें एक उदाहरण घेऊन गेल्या निबंधांत विवेचन

केलें. या निबंधांत राज्यकारणीं जे आमचे तोटे होत आहेत, ते दाखविण्याचा आमचा विचार आहे.

इंग्रजी राज्याच्या रीतीप्रमाणें सरकारी नोकऱ्या देणें त्या केवळ मनुष्याचे गुण मात्र पाहून द्यावयाच्या असें ठरविलें आहे. आमचें सरकार नेटिवांस नेमितांना तरी, जातिभेद, धर्मभेद, व दुसरे अनेक भेद, जे आज आमच्या समाजास खिळून गेले आहेत, त्यांचा मुळींच विचार करीत नाहीं. आतां ह्या गोष्टीस बरेच अपवाद सांपडतील; परंतु त्यांचा आजच्या विषयाशीं फारसा संबंध नाहीं. साधारणपणें सरकारची वागणूक वर सांगितल्याप्रमाणेंच आहे. त्यामुळें मोठमोठ्या पगाराच्या व अधिकाराच्या जागा बुद्धिवान्, उद्योगी व मनमिळाऊ अशाच लोकांस मिळतात. ही गोष्ट सर्वथा युक्त आहे; व तीस कोणत्याही प्रकारें दोष देण्यास जागा नाहीं. परंतु ह्या पद्धतीपासून समाजाचें नुकसान होतें कीं काय हें मात्र पाहिलें पाहिजे.

आमच्या लोकांमध्यें विचारस्वातंत्र्य व व्यवसायस्वातंत्र्य आल्यानें आमच्या समाजाचें पूर्वी जें जातिभेदामुळें व धर्मभेदामुळें वर्गीकरण झालें होतें त्याचा आतां लोप होत जाऊन त्याच्या जागीं प्राप्तीच्या व संपत्तीच्या मानानें वर्गीकरण होत चाललें आहे. हें वर्गीकरण हल्लीं बरेंच स्पष्टपणें दृष्टीस पडूं लागलें आहे. असें वर्गीकरण होण्याचीं मूळ कारणें म्हटलीं म्हणजे दोन. एक आम्हांस आपल्या प्राचीन रीतीभातींचा जो तिरस्कार व कंटाळा वाटूं लागला आहे तो, व दुसरें, इंग्रजलोकांच्या रीतीभातींचें अनुकरण करण्याची जी उत्कट इच्छा उत्पन्न होत चालली आहे ती. प्रत्येक मनुष्य आपआपल्या प्राप्तीप्रमाणें ह्या दोनही गोष्टी साधण्यास पहात असतो. व त्या प्राप्तीच्याच मानानें सिद्धीस जातात. कारण ज्या मानानें आपली प्राप्ति कमी, त्या मानानें आपणांस अधिकाधिक लोकांच्या अनुरोधानें वागावें लागतें, व त्याच मानानें आपलें वास्तविक स्वातंत्र्य कमी होतें, व पूर्वीच्या व्यवहारास व रूढीस सोडण्याचें आपणांस जड पडतें. शिवाय, इंग्रजलोकांचें अनुकरण करणें म्हणजे पैशाचेंच काम आहे. याप्रमाणें थोड्या प्राप्तीचे लोक घरास चुना देऊन एखादें खुर्चीटेबल मिळवून, व पूर्वीच्या धर्माबद्दल अश्रद्धा, व रीतीभातीबद्दल कोरडा तिरस्कार दाखवून तृप्त असतात, व त्यांचा एक वर्ग होतो. त्याहून ज्यांची अधिक प्राप्ति आहे असे लोक खुर्चीटेबलांची संख्या वाढवितात, व घरांत बूट स्टाकिंग, ग्लास, चहादाणी, घड्याळें वगैरेंची त्यांस अवश्यकता भासूं लागते. त्यांच्या प्राचीन रीतीही

त्याच मानानें सुटत जातात. कोणी पार्शी फ्याशन् अंगरखे करितो, कोणी युरोपिअन फ्याशन् कोट घालतो, कोणास धोतरें अवजड वाटून पाटलोणावांचून बाहेर पडणें अवघड वाटतें, कोणी वृद्धपणींही टोपी घालून रस्त्यांत फिरतो. ह्या लोकांस बऱ्याच हिंदु रीतिभाती सोडून देतां येतात, त्यांस व्यक्तिमात्र स्वातंत्र्यही बरेंच येतें, व इंग्रजांचें अनुकरण करण्याचीही त्यांस ऐपत असते. यांस खालच्या वर्गाविषयीं तिरस्कार उत्पन्न झालेला असतो, व तो त्यांच्या वागणुकींत सहज दिसून येतो; त्यांस ह्या हीन वर्गांतील लोकांचा त्यामुळें सहवास बहुधा आवडत नाहीं. व त्यांचा एक वर्ग बनतो. त्यांच्याहूनही ज्यांची प्राप्ति अधिक, त्यांच्या हिंदु रीतिभाती बहुतेक सुटतात. गांवाबाहेर, निदान एकीकडे, बंगल्यांत राहणें, स्त्रीपुरुषांची विशेष मोकळेपणाची वागणूक असणें, स्त्रियांस धर्मतत्त्वांची व नीतितत्त्वांची चांगली माहिती होण्याकरितां त्यांस तारुण्यदशेंतही शाळांस व समाजांस पाठविणें, नमस्काराऐवजीं इंग्रजी शेकहॅण्ड, गुड मार्निंग वगैरे चाली बहुधा योजणें, मद्यमांसाचा औषध रूपानें किंवा पार्टी रूपानें स्वाहाकार करणें इ० इ० या सर्व गोष्टी या वर्गांत सामान्य होऊन जातात, व त्यांच्यामध्यें हिंदुत्व फार थोडें उरतें. व त्यांसही आपल्या खालच्या वर्गांशीं कारणावांचून बहुधा सहवास आवडत नाहीं. असो; याप्रमाणें आमच्या लोकांमध्यें हल्लीं प्राप्तीच्या मानानें समाजाचें वर्गीकरण होत चाललें आहे; व ज्याप्रमाणें मनुष्य वरच्या वर्गांत असेल त्याप्रमाणें त्याचा सामान्य समाजाशीं संबंध कमी, त्याची परवा कमी, व त्याबद्दल प्रेमबुद्धि व कळकळही कमी. हा साधारण नियम होय. यास कांहीं अपवाद सांपडतील हें उघडच आहे.

आतां याप्रमाणें प्राप्तीच्या मानानें समाजाचें वर्गीकरण होऊन प्रत्येक वरच्या वर्गाचा खालच्या वर्गांशीं संबंध तुटणें, व त्याबद्दल कळकळ नाहींशी होणें, हें समाजास राज्यकारणीं किती अपायकारक आहे, व त्यापासून आपणांवर किती जुलूम होत आहे, याचा थोडा विचार करूं. आजकाल आम्हांमध्यें ज्यांची प्राप्ति फार मोठी असे लोक बहुतेक सर्व सरकारी मोठ्या पगाराचे अंमलदार, हायकोर्टांचे बडे बडे वकील इ० होत. ह्या लोकांस सामान्य लोकांत मिसळणें, किंवा त्यांबद्दल कळकळ बाळगणें कितपत आवडतें, हें सर्वांस माहीतच आहे. ह्यांचा इंग्रज लोकांशीं, अधिकाराच्यासंबंधानें, व सदोदित त्यांच्या अनुकरणापासून उत्पन्न होणाऱ्या बहुमानामुळें, जितका संबंध असतो तितका स्वदेशीयांशीं

नसतो. स्वहितसाधनाच्या खटपटींत त्यांस पुष्कळ कामांत साहेब लोकांचें आभारी व्हावें लागतें. पुढें जेव्हां एखादा जुलमी व अन्यायाचा कायदा विचारास येतो, किंवा एखादा नवा कर लोकांवर बसविण्याचें सरकारच्या मनांत असतें, तेव्हां — आणि रयतेच्या अहिताच्या अशाच दुसऱ्या अनेक बाबतींत, — या आमच्या बड्या प्राप्तीच्या लोकांस, प्रत्युपकारबुद्धीनें म्हणा, किंवा मुरवतीनें म्हणा, किंवा आधींच समाज रानटी वाटून त्याबद्दल कळकळ नसल्यानें म्हणा, सरकारासारखाच आपला अभिप्राय देणें भाग पडतें. ह्या प्रकारचीं प्रत्यंतरें येथें दाखविणें इष्ट नाहीं; तथापि आजपर्यंत एकंदर कायदेकौन्सिलाचा इतिहास ज्यांस माहीत असेल, सर टी. माधवराव यांची बडोद्याची कारकीर्द व त्यांचा इलबर्ट बिलावरील अभिप्राय ज्यांच्या वाचण्यांत आला असेल, त्यांची आमच्या वरील लेखाच्या यथार्थतेबद्दल सहज खात्री होईल.

आमच्या लोकांविषयीं साहेब लोकांचें वाईट मत होण्यास, आमच्या सभांचीं छिद्रें साहेब लोकांच्या कानावर जाण्यास, आमच्या सुधारणेसाठीं कांहीं विलक्षण व अपव्ययाच्या युक्त्या निघण्यास, व इतर बहुतेक बाबतींत, आमच्यांतील ही जी वरिष्ठ वर्गांतील मंडळी त्यांचा साहेबलोकांशीं असणारा स्नेहभावच कारण होतो. व याप्रमाणें इंग्रजी विद्येमुळें व अंमलामुळें आम्हांस जें स्वातंत्र्य मिळालें आहे व आम्हांत जी स्वहितपरता संचार करूं लागली आहे, ती राज्यकारणीं आमच्याच अहितास कारण होते.

इंग्रजी अंमल इकडे सुरू झाल्यापासून आमच्या सामाजिक स्थितीवर जे परिणाम झाले आहेत त्यांचें मागील तीन अंकांत वर्णन केलें. आम्हांमध्यें जे थोडे मोठमोठे श्रीमंत सावकार होते, त्यांच्या संपत्तीचा लोप झाला आहे; पूर्वीचीं मुसलमानी व मराठी राज्यें विलयास गेल्यावर अवशेषरूपी जे कांहीं सरदार लोक उरले होते, त्यांचे शौर्यादि सर्व गुण नाहींसे होऊन ते आतां कर्जबाजारी होऊन बसले आहेत; पूर्वधर्माचें प्रतिपालन करणें ज्यांस अवश्यक कर्तव्यकर्म वाटत होतें, व ज्यांनीं ग्रामण्यें कायम ठेवून मद्यपानादि दुराचार आटोक्यांत ठेविले होते, ते लोक आतां कोठें दृष्टीस पडत नाहींत, व क्वचित् असल्यास त्यांचें आतां मुळींच प्राबल्य व माहात्म्य उरलें नाहीं. एकीकडे पूर्वीच्या सर्व सामाजिक पाशांचा छेद होत आहे; दुसरीकडे इंग्रज लोकांचें अनुकरण सुरू होऊन तें समाजाचें

मूळ स्वरूप अगदीं बदलून टाकीत आहे. पूर्वीच्या जातिभेदादिपाशांनीं जे लोक क्षणांत एकत्र जमण्याचा संभव होता, तेच आतां आपआपल्या प्राप्तीच्या मानानें एकमेकांपासून दूर होत आहेत, व आम्हांमध्यें परस्परांबद्दल तुच्छबुद्धि व तिरस्कार उत्पन्न होत आहेत; ज्यांवर समाजाचें हित किंवा अहित अवलंबून असतें, व ज्यांच्या साहाय्यानेंच केवळ समाजाचा उत्कर्ष होणें शक्य आहे, असे लोक म्हणजे बुद्धिमान्, विद्वान् व सर्व कार्यक्षम लोक, सरकारचे बंदे नोकर बनले आहेत; इतकेंच नव्हे तर त्यांमधील हिंदुत्वच नाहींसें होत चाललें आहे.

येणेंप्रमाणें आमच्या समाजाची स्थिति झाल्यानें आम्हांत एकी मुळींच उरली नाहीं; स्वहितपरता प्रत्येकाच्या अंगांत निरंतर वास करीत आहे; दुराचारांचा दिवसानुदिवस उत्कर्षच होत आहे; राजकारणीं सारखा जुलूम चालला असतांही कोणास हातपाय हालविण्याचें सामर्थ्य उरलें नाहीं; आणि एका स्वातंत्र्याच्या देणगीनें, सरकारानें आमचे बाकी सर्व हक्क हिरावून घेतले आहेत; व आम्हांतील बहुतेकांस सरकारचें दासानुदास व्हावें किंवा अन्नान्नदशेंत आयुष्यक्रमण करावें, यावांचून शरीरसंरक्षणाचा तिसरा उपाय दिसत नाहीं.

याप्रमाणें आपल्या सामाजिक स्थितीचें ज्यानें खरें स्वरूप ओळखिलें असेल त्यास या अनिष्ट स्थितींतून पार पडण्यास कांहीं तरणोपाय आहे कीं नाहीं याची सहजच चिंता उत्पन्न होईल. आमच्या देशांत आजपर्यंत पुष्कळ स्वदेशीय व परदेशीय राज्यें होऊन गेलीं, परंतु याप्रमाणें सुधारलेल्या राष्ट्राच्या जबड्यांत सांपडून इतक्या निकृष्ट व शोचनीय स्थितीस येण्याचा आम्हांस अद्याप प्रसंग आला नव्हता. असा प्रसंग हा पहिलाच असल्यानें, या स्थितींतून मुक्तता करून घेण्याचे उपाय आमच्या इतिहासांत सांपडणार नाहींत; ते उपाय सुधारलेल्या राष्ट्रांच्याच इतिहासांत व सामाजिक स्थितींत शोधिले पाहिजेत. कलाकौशल्यांची वृद्धि करावी, उद्योगास उत्तेजन द्यावें, व्यापारावांचून तरणोपाय नाहीं, पाश्चात्य शास्त्राध्ययनाच्या पाठशाळा असल्या पाहिजेत, लोखंड व कोळसे यांच्या समृद्धीनें उत्कर्ष पावलेल्या पाश्चात्य राष्ट्रांत पूर्णदशेस आलेल्या शिल्पकलेचा व यंत्रकलेचा अभ्यास होण्याकरितां शिल्पशाला स्थापन झाल्या पाहिजेत, पूर्वधर्माचे प्रतिबंध दूर होऊन काचकृति वगैरे कला शिकण्यास युरोपांत व अमेरिकेंत एतद्देशीयांचें गमन झालें पाहिजे, इत्यादि या निकृष्ट स्थितींतून मुक्तता करून घेण्याचे मार्ग पुष्कळांनीं सुचविले आहेत; व हे मार्ग स्वीकारिल्यास या हत-

भाग्य देशास ऊर्जितकळा येईल यांत संशय नाहीं. परंतु हे उपाय लोकांच्या नजरेस येऊन आज पुष्कळ वर्षें झालीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि अद्याप यांपैकीं किती थोड्यांचा पाया या देशांत पडला आहे ह्याचा मात्र विचार केला असतां आश्चर्य वाटतें; आणि ह्या उपायांत कोठें तरी न्यूनता आहे, किंवा ते दुसऱ्या कांहीं उपायांवर अवलंबून आहेत असा साहजिक ग्रह होतो; व या दोनही गोष्टी खऱ्या आहेत असें म्हणण्यास आम्हांस हरकत दिसत नाहीं.

वरील उपायांचें ज्यानें मनन केलें असेल त्याच्या साहजिक लक्षांत येईल कीं हे उपाय सुचविणारांनीं, त्यांस लागणारें भांडवल कसें गोळा व्हावें याचा विचार केला नाहीं. आम्हांमधील साधारणपणानें भांडवलवाले लोक म्हटले म्हणजे, मुंबईतील भाटे वगैरे, गुजराथी व मारवाडी लोक, व कांहीं व्याजबट्टा करणारे हिंदु सावकार होत. आतां या लोकांपैकीं कितीकांचें भांडवल पेटींत व्यर्थ मोहोरबंद होऊन राहिलें आहे याचा विचार केला असतां आपल्या सहज ध्यानांत येईल कीं, प्रत्येक आपल्या द्रव्याचा आपल्या बुद्धीप्रमाणें सद्व्यय करून आपली उपजीविका करीत आहे. आतां प्रत्येक मारवड्यानें वाण्याचें दुकान घालून बसावें, आणि खेड्यांतील प्रत्येक सावकारानें गहाणाचा व्यापार करावा, हें इंग्रजी विद्येनें ज्यांची बुद्धि विकास पावली आहे, त्यांच्या दृष्टीनें शहाणपणाचें होणार नाहीं; परंतु त्या त्या लोकांच्या समजुतीच्या, त्यांच्या व्यवहारज्ञानाच्या, त्यांच्या धाडसाच्या, व त्यांच्या सध्यांच्या फायद्याच्या मानानें पाहिलें असतां, त्यांनीं स्वीकारिलेल्या जीवितवृत्तीस क्वचितच दोष देतां येईल. त्यांचें भांडवल निश्चल पडलेलें नाहीं, व त्यापासून त्यांस जो फायदा होत आहे त्यापेक्षां वरील एखाद्या उद्योगांत त्याचा उपयोग केला असतां अधिक फायदा होईल अशी त्यांस हमी देणारा कोणीही भेटेल असें आम्हांस वाटत नाहीं. याप्रमाणें स्वहितपरता व देशोन्नति यांमध्यें विरोध येणें हें वरतीं सांगितलेल्या भांडवलवाल्यांच्या संबंधानें अगदीं स्वाभाविक आहे.

तर आतां समाजांतील कोणच्या लोकांचें भांडवल मोकळें आहे हें पाहिलें पाहिजे. या प्रश्नाचा विचार कोणींही केला असतां त्यास दिसून येईल कीं ज्यांजवळ थोडेंबहुत मोकळें भांडवल आहे, किंवा ज्यांस तें तयार करितां येईल असे लोक सरकारी नौकर, व केवळ बुद्धिव्ययानें पैसे मिळवणारे वकील वगैरे हे होत. शिवाय ह्याच लोकांस इंग्रजी विद्येचा संस्कार घडलेला असतो, यांसच

पाश्चात्य लोकांच्या इतिहासाची, सामाजिक स्थितीची, व त्यांच्या घडामोडींची माहिती असते. वरील उपायांची प्रथम स्फूर्ति यांसच झाली. म्हणून याच लोकांच्या हातून वरील उपाय सिद्धीस जाणें योग्य व अवश्यक आहे. जर त्यांच्या हातून ते सिद्धीस न जातील तर त्यांत साधारण समाजाकडे, किंवा हल्लींच्या व्यापारी भांडवलवाल्यांकडे, दोष पोंचत नाहीं असें आमचें मत आहे.

आतां या लोकांकडून वरील उपाय योजण्याच्या कामांत मुळींच खटपट होत नाहीं, यांमध्यें केवळ वाक्पांडित्यं मात्र दृष्टीस पडतें, आणि व्यवहारज्ञानाची उणीव यांच्या खेरीज दुसऱ्या कोठेंही विशेष दिसत नाहीं. या सर्व गोष्टींचें कारण काय असावें ? आम्हांस वाटतें हें कारण, या लोकांची स्वहितपरता व इतरांविषयीं निश्चिंतता, हें होय.

प्रत्येकास वाटतें आपलें भांडवल तें किती व तें आज आपण वर सांगितलेल्या व्यापारांत घातलें तर फुकट प्रयास मात्र मागें लागणार, व कदाचित् नवीन व्यापार अजीबात बुडण्याचाही प्रसंग येईल. आपण ब्यांकेंत पैसे ठेविले आहेत आणि विनाश्रमानें व्याज घेत आहोंत, तेंच बरें. असलीं कामें मोठमोठ्या लक्षाधीश व्यापाऱ्यांनीं हातीं घेणें इष्ट आहे. त्यांसच आपण चार स्वदेश-हिताच्या गोष्टी सांगूं. कित्येकांस वाटतें आपली उद्यां चैनबाजी बंद होईल, व आपल्या इंग्रजी तऱ्हेच्या आहारविहारांत कदाचित् तूट पडेल. अशा लोकांची बहुधा पगाराची पगारास गांठच पडत नाहीं.

इंग्रजी विद्येचे सर्व संस्कार ज्यांवर फुकट गेले आहेत, व जे समाजाच्या अहि-तास खरे कारण होतात, ते लोक मुख्यत्वेंकरून सरकारी नौकर वगैरे भांडवल-वाले होत, हें वरील लेखावरून स्पष्ट होईल. भांडवल हें मितव्ययावांचून कधींही जमत नाहीं. तें जमविण्याकरितां कधीं कधीं विषयासक्ततेचें संयमन केलें पाहिजे. थोडें थोडें भांडवल पुष्कळ ठिकाणीं सांचलें असल्यास तें एकत्र करण्यास प्रथम एकत्र होऊन एखादी मंडळी स्थापन केली पाहिजे. कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्रांत एकानेंच कोणताही व्यापार किंवा कला चालू केल्याचीं उदाहरणें फार थोडीं, इत्यादि गोष्टी उघड असूनही त्या यांस दिसत नाहींत, व हें फुटकळ आलेलें भांडवल एकत्र न होतां स्वस्थ पडून राहिलें आहे, हें कळत नाहीं.

गेल्या चार निबंधांत या विषयाचें जें विवेचन केलें आहे, त्यावरून इंग्रजी विद्येचे व इंग्रजी अंमलाचे आमच्या समाजादर जे दुष्ट परिणाम झाले आहेत त्यांची थोडी कल्पना आमच्या वाचकांस आलीच असेल. प्रस्तुतच्या निबंधांत ह्या दुष्ट परिणामांची प्रवृत्ति कशी बंद करितां येईल याचा विचार कर्तव्य आहे. गेल्या निबंधांत सामाजिक स्थिति सुधारण्याचे इतर लोकांचे विचाराप्रमाणें जे जे उपाय आहेत ते सांगून, ते हल्लीं व्हावे तसे कां साध्य होत नाहींत हें दाखविलें. ते सर्व उपाय सफळ होण्यास पहिलें साधन भांडवल हें होय; व तें आज आम्हांमध्यें ज्यांनीं गोळा केलें पाहिजे, ते लोक बहुधा ऐषआरामी व समाजाविषयीं निश्चिंत असे आहेत. अशा स्थितीमध्यें आमच्या समाजाची सुधारणेच्या बाबतींत मंदगति असावी हें साहजिकच आहे आणि ते उपाय सिद्धीस जाण्यास व सुधारणेंत आमची गति तीव्र होण्यास या पलीकडचा कांहीं उपाय आपणांस योजिला पाहिजे, हें उघडच आहे. यूरोप व अमेरिका यांचा इतिहास वाचिला असतां, व त्यांची सांप्रतची सामाजिक स्थिति पाहिली असतां, तो उपाय कोणता हें आपल्या ध्यानांत येईल.

इंग्लंडचें राज्य इकडे सुरू झाल्यापासून इंग्लिश व इतर युरोपियन लोकांशीं आमचा बराच परिचय झाला आहे; या लोकांचे इतिहास व राज्यकारणीं हालचाली ह्याही अलीकडे आमच्या लोकांस कळूं लागल्या आहेत; व त्यांच्या समाजाची प्रत्यक्ष माहिती जरी आम्हांस नाहीं, तथापि त्यांच्या इतिहासावरून व त्यांच्या व्यवहारावरून त्यांच्या समाजस्थितीचें आम्हांस अनुमान करितां येतें.

प्रस्तुत विषयाचा विचार करितांना युरोपियन व अमेरिकन लोकांच्या इतिहासांतून व समाजांतून घेण्याजोगी गोष्ट म्हटली म्हणजे त्यांची सभास्थापनपद्धति होय. इंग्रज लोकांचे आज या देशांत कोट्यावधि रुपयांचे व्यापार आहेत; परंतु या व्यापारांपैकीं एकट्यानेंच सर्व जोखीम अंगावर घेऊन चालविलेले व्यापार किती आहेत, हें पाहिलें असतां तसे व्यापार क्वचितच आढळतील. हे सर्व व्यापार कंपन्यांनीं किंवा पुष्कळ लोकांनीं आपलें अल्प भांडवल एकत्र करून चालविलेले आहेत. हिंदुस्थानांत युरोपियन लोकांचीं जीं दुकानें आहेत (उदा. ट्रेचर वगैरे) तीं देखील, त्यांस भांडवल फारसें न लागतांही,–एकट्यानें चालविलेलीं दिसत नाहींत. परंतु आमच्या मुंबईतील व्यापाऱ्यांची स्थिति पाहिली असतां ती ह्यांहून फार भिन्न दिसून येईल; व होईल तितकें करून फायदेशीर

कामांत एकटाच मनुष्य आपणावर सर्व जोखीम घेऊं पाहतो, असें आपल्या दृष्टोत्पत्तीस येईल.

आतां कंपन्या म्हणजे एक प्रकारच्या सभाच आहेत. यूरोपांत किंवा अमेरिकेंत अशा लाखों सभा आहेत. त्या अस्तित्वांत कशा येतात हें प्रथम पाहिलें पाहिजे. कोणाही मनुष्याजवळ थोडें भांडवल सांचलें कीं तो त्याचा काय विनियोग करावा ह्याच्या विचारांत पडतो. तें प्रथम एकाद्या ब्यांकेंत टाकिलेलें असतें, परंतु ब्यांकेच्या व्याजाचा दर अगदींच कमी असतो, त्यामुळें प्रत्येक आपलें भांडवल दुसऱ्या कांहीं अधिक फायद्याच्या कामांत घालण्याच्या विचारांत असतो. तशांत कोणाच्या मनांत कांहीं नवीन व्यापाराची किंवा दुकानाची कल्पना आल्यास, तो त्या व्यापारास लागणारें सर्व भांडवल आपणाजवळ नाहीं म्हणून उदासीन रहात नाहीं; तें भांडवल एकंदर किती लागेल व नफा काय होईल ह्याचा अदमास करून त्याचा एक प्रास्पेक्टस काढितो, व वर्तमानपत्रांतून वगैरे त्यास प्रसिद्धि आणितो. असें केल्यानें ज्यांजवळ फुटकळ भांडवल थोडें थोडें सांचलेलें असतें, ते सर्व ह्या व्यापाराच्या संबंधानें विचार करूं लागतात. व ज्यांस तो फायदेशीर दिसेल ते त्यांत आपलें भांडवल घालण्यास लागलेच राजी होतात, व सर्व एकत्र जमून एक कंपनी स्थापन होते. आमच्या लोकांची स्थिति ह्याहून अगदीं उलट आहे; व ज्यास ह्याचें प्रत्यंतर पाहणें असेल त्यानें—पुण्यांत कागदाचा कारखाना निघणार होता तो कां निघाला नाहीं, व इतरही पुष्कळ व्यापारांसंबंधानें लोकांचे अनुकूल अभिप्राय असून ते कां निघत नाहींत—ह्याचा विचार करावा, म्हणजे त्याच्या लक्षांत येईल.

येथपर्यंत केवळ व्यापारासंबंधानें गोष्ट झाली. परंतु युरोपियन लोक, व विशेषेंकरून अमेरिकन लोक, हरएक कामांत सभांचाच उपयोग करितात. सभास्थापनाची अवश्यकता त्यांस लहानपणापासून शिकविलेली असते. कोणताही खेळ आरंभण्यापूर्वी सर्वांनीं एकत्र जमून बहुमतानें खेळाच्या अटी वगैरे ठरवाव्या, व त्या कोणीं मोडिल्यास त्यास कोणती शिक्षा असावी, हें प्रथम ठरवून नंतर मुलें खेळण्यास आरंभ करितात. एकादी नाटक कंपनी काढणें झाल्यास, शहरांत कांहीं उत्सव करणें झाल्यास, मद्यपानादि दुराचारांची प्रवृत्ति कमी करण्यास, धर्मविवेचन करण्यास, शास्त्रीय शोध लावण्यास, सारांश, सर्व लहानमोठ्या कामांकरितां अमेरिकेंत सभा स्थापन होतात; व त्या स्थापन करण्यास वर्तमानपत्रांतील नोटिसही पुरे होते.

आमच्या लोकांस अद्याप सभास्थापनाचे फायदे मुळींच कळूं लागले नाहींत; व ज्या थोडयांस माहिती आहे त्यांस ते लोकांस समजावून देतां येत नाहींत. आमचा समाज सभास्थापनाच्या कामांत इतका मागें कां रहावा, व आम्हांमधील विद्वानांतही सभा स्थापण्याची प्रवृत्ति कां नसावी, ह्या प्रश्नाचें उत्तर देणें फारसें कठिण नाहीं. युरोपाच्या इतिहासाचें ज्यांस थोडें ज्ञान असेल, त्यांच्या सहज ध्यानांत येईल कीं सर्व प्रकारच्या सभांमध्यें प्रथम राजकारणी सभा उत्पन्न होतात; तदनंतर व्यापार व उद्योगवृद्धि या संबंधाच्या, व अखेरीस सामाजिक सुधारणेच्या, शास्त्रीय, इत्यादि. या अनुक्रमानें सभांची उत्पत्ति होण्याचें कारण असें कीं कोणाही मनुष्याची कोणत्याही नव्या गोष्टीकडे किंवा स्थितीकडे प्रवृत्ति होण्यास त्यास त्यांत आपलें हित दिसलें पाहिजे. व्यापारांत व उद्योगवृद्धींत मनुष्यास फायदा दिसत असतो खरा, परंतु तो फायदा भावी असतो, व भांडवल खर्च करण्याचें धाडस मात्र आधीं लागतें. सभा किंवा कंपनी करणें म्हणजे पुष्कळांवर विश्वास ठेवून अवलंबून रहावें लागतें; व मनुष्याची तिकडे प्रथम प्रवृत्ति होत नाहीं. परंतु राजकारणी सभांची अशी स्थिति नाहीं. सरकारच्या दुष्ट कायद्यांनीं, किंवा कराच्यां जबर ओझ्यानें, किंवा राज्यांतील इतर गैरव्यवस्थेनें व जुलमानें, प्रत्येकाचें जें नुकसान होतें तें त्यास स्वतःच्या व इतरांच्या अनुभवानें धडधडीत स्पष्ट दिसत असतें. शिवाय जेथें एकदोघांची दाद लागत नाहीं, तेथें हजार पांचशांची लागण्याचा अधिक संभव असतो; तसेंच अशी दाद मागणारांस पैशाची आधींपासूनच जरूर लागत नाहीं; व कार्यसिद्धि होतेशी वाटल्यावर तो देण्यासही बहुधा कोणास जड वाटत नाहीं. जों जों अशा प्रकारची सभा मोठी असते, तों तों तिचें अधिकाधिकच प्राबल्य होतें, आणि सरकारासही एक प्रकारची दहशत पडते. राजकारणी सभा प्रथम उत्पन्न झाल्यावर मनुष्यास एकत्र होऊन कोणतेंही काम ऐक्यानें केल्यापासून त्यांत कोणत्या रीतीनें फायदा होतो हें कळूं लागतें, व जों जों व्यक्तिमात्र मनुष्य सामाजिक स्वातंत्र्यानें दुर्बळ होत जातो, व जुलमी राज्याखालीं धनहीन होत जातो, तों तों त्यास परस्पर साहाय्याची व ऐक्याची जरूर विशेष भासूं लागते. परंतु सभास्थापनाचें मूळ शिक्षण राज्यकारणीं मिळालें नसेल, तर त्यास सभांची योग्यता व शक्ति कळत नाहीं. आमची स्थिति अशाच प्रकारची आहे.

आमच्या पूर्वींच्या स्वदेशीय राजांच्या कारकीर्दीत जुलूम होऊन लोकांस फार त्रास होत असे हें खरें; परंतु राजा हा ईश्वरांश अशी धर्मसंबंधानें त्यांची समजूत असल्यानें आणि सौम्योपायांनीं राजे लोक ताब्यावर येण्याचाही संभव फारच थोडा असल्यानें, जे कोणी विशेष राजनिष्ठ व सौम्यस्वभावाचे असत, ते जुलूमही सोसून राहत, व जे याच्या उलट प्रकृतीचे असत, ते दंगेधोपे करून व बंडें उत्पन्न करून स्वतंत्रता मिळवीत. याप्रमाणें सोळाव्या शतकापूर्वी जी इंग्लंडची लोकस्थिति असे, तशी स्थिति आमच्या स्वदेशीय राजांच्या कारकीर्दीत आमची होती. परंतु इंग्लंडांत वरील बंडखोर लोकच दिवसानुदिवस सुधारत जाऊन, व त्यांस शहाण्या लोकांचा सल्ला मिळत जाऊन, येतां येतां गेल्या चार शतकांच्या शेवटीं त्यांस राजकारणसभांचें रूप आलें आहे. आमच्या देशाच्या इतिहासाचा कांहीं निराळाच प्रकार झाला आहे. इंग्रज सरकारनें एकामागून एक एतद्देशीय राज्यें तोंडांत टाकिल्यावर, प्रथम राज्यकारभार मोठ्या दक्षतेनें चालविला; व पूर्वीचे धर्मसंबंधीं ग्रह जितके न दुखावतील तितके न दुखवण्याचा प्रयत्न केला. पूर्वीहून शेतकऱ्यांचा सारा कमी केला. अशा अनेक गोष्टींनीं आमच्या भाविक लोकांस स्वराज्यापेक्षां हें परकीय राज्यच बरें असें वाटावयास लाविलें. लोकांचा जुलूम झाला असतां एकत्र होण्याची, बंडाच्या रूपानें कां होईना, जी प्रवृत्ति ती याप्रमाणें पुष्कळ दिवस मलीन झाल्यानें, व त्याच मानानें इंग्रजी अंमल उत्तरोत्तर बळकटी पावत गेल्यानें, आतां लोकांस सरकारी जुलमाच्या प्रतिकारास मार्ग उरला नाहीं असें वाटूं लागलें आहे; व त्यांस सभांची योग्यता व शक्ति हीं कळेनातशीं झालीं आहेत; व त्यामुळें सभास्थापनाविषयीं राज्यकारणीं जें शिक्षण मिळावें तें त्यांस अद्याप मिळालें नाहीं; व इतर सर्व प्रकारच्या सभा किंवा कंपन्या आम्हांत उत्पन्न होत नाहींत. अशीच स्थिति, सोळाव्या शतकांत इंग्लंडांत जर राज्यक्रांति झाली असती व एकोणिसाव्या शतकांतील सुधारलेला अंमल एकाएकीं सुरू झाला असता, तर इंग्लंडची, किंवा इतर कोणत्याही युरोपिअन राज्याची, झाली असती, यांत संशय नाहीं. तर आमच्याच लोकांस अशी स्थिति कां यावी याविषयीं आश्चर्य मानायास नको.

याप्रमाणें राज्यप्रकरणीं सभा उत्पन्न होण्यास आमच्या देशांत वेळ न सांपडल्यामुळें आम्हांत उद्योगवृद्धीच्या किंवा सामाजिक सुधारणेच्या सभा उत्पन्न झाल्या नाहींत, व सभास्थापनाची प्रवृत्तिही आम्हांत आली नाहीं. वास्तविक

पाहिलें तर आम्हांत व्यक्तिपरता व दारिद्र्य जों जों वाढत जातील, तों तों सभांवांचून दुसरा तरणोपायच उरणार नाहीं; व त्या उत्पन्न न होतील तर लहानसान उद्योग किंवा सुधारणा करणेंही आम्हांस अशक्य होईल. सभास्थापन करण्याचें काम ज्यांस इंग्रजी विद्येचा संस्कार झाला आहे अशाच लोकांनीं प्रथम हातीं घेतलें पाहिजे. कारण त्यांच्या साहाय्यावांचून सभास्थापन होणें अगदीं अशक्य आहे, व त्या स्थापन झाल्याच तर त्यांचें काम सुरळीतपणें चालून, त्यांपासून व्हावा तितका उपयोग होणें तरी असंभाव्य आहे. आतां सभा स्थापन करून तिची व्यवस्था आपल्या शिरावर घेणारे इंग्रजी विद्वान् सध्यांच्या स्थितींत थोडेच सांपडतील हें खरें आहे; परंतु त्या थोड्यांनीं तरी आपला आळस या देशहिताच्या कामाकरितां कांहीं दिवस एकीकडे ठेविला पाहिजे. असें त्यांनीं न केल्यास, त्यांच्या देशहिताच्या संबंधानें सर्व गप्पा व्यर्थ जाणार आहेत हें अगदीं उघड आहे; व पाश्चात्य देशांतील लोक या देशास रानटी व सार्वजनिक कामांत उदासीन असें म्हणतात तें यथार्थ होईल.

वरील लेखावरून, आमच्या विद्वान् लोकांनीं आजपर्यंत मुळींच सभा काढिल्या नाहींत, असा मात्र आमच्या वाचकांचा ग्रह होऊं नयें. आम्हांत कांहीं निरंतरच्या, व कांहीं प्रासंगिक उत्पत्ति पावणाऱ्या, सभा आहेत. पहिल्या प्रकारच्या सभा म्हटल्या म्हणजे अलीकडील धार्मिक समाज वगैरे होत; दुसऱ्या प्रकारच्या सभा म्युनिसिपालिटीच्या व इतर कामासंबंधानें प्रसंगानुसार भरविण्यांत येतात त्या होत. आतां निरंतर चालणाऱ्या सभांपैकीं केवळ राज्यकारणाकरितांच स्थापन केलेल्या अशा सभा एक किंवा दोनच निघतील; परंतु त्यांमध्यें जितकें विचारस्वातंत्र्य व जितकी चळवळ दृष्टीस पडावी तितकी नाहीं, यामुळें त्यांबद्दल लोकांत जितकें गौरव असावें, व त्यापासून सभास्थापनाचे फायदे जितके लोकांच्या नजरेस यावे तितके येत नाहींत. उलट धर्मसंबंधीं समाज अकालीं स्थापन होऊन त्यांमध्यें आजकाल विलक्षण चळवळ सुरू झाल्यानें, साधारणपणें सभा स्थापन करणें म्हणजे स्वधर्मनिंदा लोकांस ऐकिविण्याचीं, त्यांच्या रीतीभातींची चेष्टा करण्याचीं, व इंग्रजांच्या अनुकरणास उत्तेजन देण्याचीं स्थानें उत्पन्न करणें असा आमच्या लोकांचा ग्रह होऊन, हे निरुद्योग्याचे उद्योग, यांपासून कवडीचाही फायदा नाहीं, अशी त्यांची समजूत होत आहे. याप्रमाणें होतील तितक्या राज्यकारणी सभा, व त्यांमागून उद्योगवृद्धीच्या

सभा स्थापन करण्याचें सोडून, आधींच सामाजिक सुधारणेच्या सभा उत्पन्न करणें हें केवळ समाजास कांहीं अंशीं अपायकारक होतें, असा आमचा अभिप्राय आहे; व अशा रीतीनें उद्दिष्ट हेतु सिद्धीस न जातां स्थापन करणारांचे दीर्घ प्रयासही फुकट जाऊन ते केवळ लोकांच्या उपहासास मात्र पात्र होतात. अशी त्यांची स्थिति होण्याचीं कारणें मागील लेखांवरून कोणाच्याही ध्यानांत येतील; व त्यांत त्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

आजपर्यंत या विषयाचें जें प्रतिपादन केलें, त्यावरून आमच्या समाजाचें खरें स्वरूप वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. इंग्रजी अंमलामुळें व विद्येमुळें आम्हांस जी अनिष्ट स्थिति आली आहे, ती दूर करण्यास सांप्रतकाळीं सभा स्थापन केल्यावांचून दुसरा उपाय नाहीं, हें आतांपर्यंत दाखविलें; व सभा स्थापनाची आम्हांमध्यें इतकी कमी प्रवृत्ति कां, व ती प्रवृत्ति आम्हांत येण्यास कोणत्या रीतीनें प्रथम आरंभ करावा हेंही दाखविलें. येथें हा विषय पुरा झाला.

[वर्ष १ अंक ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०.]

हिंदुस्थानदेश बुडाला, हो, ठार बुडाला !

" हे रानडे आणि हे भांडारकर ! हे पंडित आणि हे मोडक ! हे आमच्या समाजाचे पुढारी ! यांच्या अकला गेल्या तरी कोठें ! ज्या वयांत बुद्धीचा आणि विचारशक्तीचा पूर्ण विकास व्हावयाचा, व चांगली गोष्ट कोणती व वाईट कोणती हें चांगलें कळावयाचें, त्या वयांतच यांना चळ तर लागला नाहींना ? यांना इतके दिवस आम्ही मोठे शहाणे समजत होतों; पण आज आतां समजली यांची अक्कल ! सुदैवानें बरें झालें कीं यांचें हें बुद्धिमांद्य लवकरच बाहेर पडलें; नाहीं तर महाराष्ट्र देशांतील चटसारीं माणसें यांच्या जाळ्यांत सांपडतीं ! काय यांचा हा अविचार ! आपण कोणत्या स्थितींत आहों; आपली पूर्वी स्थिति कैशी होती व ती पुढें होणार कशी; आपले शहाणे पूर्वज कोणत्या रीतीनें वागले; आपण मूर्ख लोक कोणत्या रीतीनें वागत आहों; आपला देश पूर्वी सुवर्णमय असून आतांच मृण्मय कसा झाला; पूर्वीची चैन नाहींशी होऊन प्रस्तुतची कंगाल अवस्था कशी आली, वगैरे देशोन्नतीच्या महत्त्वाच्या गोष्टींचा विचार एकीकडे टाकून, बायकांना गाड्यांत घालून शाळेंत धाडण्याचे हे भिकार चाळे, या समाजाग्रणीना, परमेश्वरा, कोठूनरे सुचले ! आतां आमची वाट काय होणार ! शिव ! शिव !! शिव !!! यांच्या लहररूपी भोंवऱ्यांत आमचें सुधारणारूप तारूं गर्र गर्र फेऱ्या खाऊन अखेरीस तळ पहाणार ! किंवा यांच्या तव्यतरूप झंझाच्या झपाट्यांत सांपडून फजित्याच्या खडकावर त्याचीं छकलें छकलें होणार ! यांच्या 'अंधत्वामुळें' 'मूर्खत्वामुळें' व 'अविचारित्वामुळें' सगळ्या हिंदुस्थानास नाचण्यांची अंबीलि आणि कळण्याच्या भाकरी यांवर राहण्याचा प्रसंग येणार ! हिंदुस्थानची संपत्ति स्त्रीशिक्षणाकडे लावण्यापेक्षां ती समुद्रांत तरी कां नाहीं लोक ओतीत ? हे भरतखंडवासी आर्य जनहो, स्त्रियांस विद्यामृत पाजून त्यांस जारिणी होऊं देणें तुम्हांस बरें वाटतें काय ? या पंडितरानडयादि माथेफिरूंचें व त्यांच्या कटाला सामील होणाऱ्या वेडर्बर्न कागलकरादि इंग्रज नेटिवांचें वेड घालविण्यास किंवा पारिपत्य करण्यास तुमची ती पूर्वीची जपजाप्यविद्या, मंत्रसामर्थ्य, किंवा धनुर्विद्या आज कांहींच उपयोगीं पडत नाहीं काय ? शिवाजीनें मुसलमान लोकांच्या छातीवर पाय देऊन मराठी राज्याचा

पाया घातला. बाजीरावानें आपल्या बाहुबलानें त्याचा अफाट विस्तार केला. शिपायांचा शिपाई राव रघुनाथराव पेशवा यानें आपले घोडे 'सिंधु नदींत पाजले'- सारांश काय, आमच्या तरवारबहाद्दर पूर्वजांनीं जिवावरचे पराक्रम केले, पण बायकांना शाळेंत धाडण्याचे अनार्य ढंग त्यांना कधीं सुचले नाहींत, किंवा तसें करण्याची अवश्यकता त्यांना कधीं भासली नाहीं. असें असतां आमचे अलिकडले समाजसूत्रधार, हे आमच्या आधुनिक सुधारणानौकेचे कर्णधार, यांना बायकांना पायमोचे बूट घालून शाळेंत पाठवितां आलें म्हणजे आपण मोठा विजयध्वज लाविला असें वाटत आहे, तेव्हां आमच्या दुर्भाग्याला काय म्हणावें ! काळच फिरला, सद्बुद्धीचा शेवट झाला, पुण्याई खलास झाली, व या हतभाग्य हिंदुस्थानावर अखंड भोक्तृत्व ओढवलें असें म्हटलें पाहिजे; नाहीं तर या वेळीं यांना ही असली घातक अवदशा कां आठवती ! गिरण्या वगैरे घालण्याचा विचार सोडून असलीं वेडगळपणाचीं कुलंगडीं यांना कां सुचतीं ! "

अशा प्रकारचा ओरडा स्त्रीशिक्षणाच्या शत्रूंनीं सध्यां मांडला आहे, व त्यांना अशी घमंडी वाटत आहे कीं आपल्या वाक्शल्यांनीं या चळवळीच्या पुरस्कर्त्यांचीं अंतःकरणें विदारून टाकून आपण त्यांचा गर्व उतरूं, व त्यांनीं मोठ्या परिश्रमानें रचिलेला व्यूह ढांसळून टाकूं ! पण आमची तर अशी खातरी आहे कीं या शेंदाडशिपायांच्या शस्त्रसंपातानें स्त्रीशिक्षणाच्या किल्ल्याचें एक ढेंकूळ सुद्धां न ढासळतां त्याला अधिकच बळकटी येईल ! आम्ही या अविचारी व दुराग्रही निंदकांना असें खात्रीनें बजावतों कीं, त्यांच्या पिरपिरीनें या चळवळीला काडी- येवढा सुद्धां धक्का पोहोंचणार नाहीं, व त्यांचा सारा आक्रोश अरण्यरुदिताप्रमाणें होणार आहे. स्त्रीशिक्षणासहिष्णूंनीं वर्षैंच्या वर्षैं जरी पाल्हाळखोरे कटकट चाल- विली, तरी तींतील सार आम्हीं वर दिलें आहे इतकेंच असूं शकणार आहे हें त्यांनाही कबूल केलें पाहिजे, व त्यांची बाजू जितक्या खंबीरीनें त्यांनाही दाखवितां आली नसती तितक्या खंबीरीनें ती वर दाखविण्यांत आली आहे, याला कोणीही निष्पक्षपाती मनुष्य 'हो' म्हणेल. स्त्रीशिक्षणाच्या वैऱ्यांचें सारें पांडित्य व वक्तृत्व संकुचित दर्शनाचा परिणाम असल्यामुळें, त्यांचें खंडन करण्यास फारशा कागदाचा किंवा शाईचा खर्च केला पाहिजे असें नाहीं. इतकें खरें आहे कीं आमच्या लिहिण्यानें अगर मुलींच्या हायस्कुलास भरभराटी आल्यानें आपले विचार चुकीचे होते, अशी मनांतल्या मनांत जरी त्यांची खात्री झाली तरी दुराग्रही व

मूढ लेखकांच्या जातीला विशिष्ट जो लत्कोडगेपणा, त्यामुळें आमचें मतांतर झालें आहे, असें ते प्रसिद्धपणें, निदान कांहीं वर्षें तरी, कबूल करणार नाहींत. यांच्या विचारांत जी चूक होते तिला आमच्या मतें मुख्य दोन कारणें आहेत. तीं हीं. (१) त्यांना ज्ञानाची योग्यता व उपयोग कळत नाहीं; (२) आणि देश-सुधारणेचें खरें स्वरूप आणि तिचे उपाय हे त्यांना समजत नाहींत. पूर्वी, म्हणजे पेशवाईंत, स्त्रियांसाठीं पाठशाळा नसतां त्या वेळच्या बाप्यांनीं मोठमोठे पराक्रम केले हें आम्ही कबूल करतों. पण त्यापासून बायकांना आतां देववेल तितकें शिक्षण देऊं नये हें कसें निघतें ? मुसलमानी बायकांस शिक्षणाची गोष्ट तर राहूंच द्या, पण आमच्या बायकांइतकें किंबहुना मुळींच स्वातंत्र्य नसतांही एकाकाळीं त्यांनीं सर्व यूरोपालाच पालथें घातलें होतें इतकेंच नाहीं, तर आमच्या देशाचींही हाडें खिळखिळीं करून त्याच्यावर अनेक वर्षें सामराज्य केलें ! स्त्री-शिक्षणावांचून अनेक मोठ्या गोष्टी झाल्या आहेत व होतील. त्याच्याशीं आम्हांला काय करावयाचें आहे ? स्त्रीशिक्षणानें कांहीं एक चांगलें होत नाहीं असें जरी घेऊन चाललें तरी तें न द्यावें असें म्हणतां येत नाहीं. स्त्रीशिक्षणाच्या योगानें वाईट परिणाम होतात असें जो कोणी सिद्ध करून देण्यास समर्थ असेल, त्यानें या विषयावर लिहिण्यास लेखणी धरावी, व अशाच्याच तोंडाला लागण्यांत कांहीं हाशील आहे. पण आमच्या मतें असली गोष्ट स्वर्गांतून खुद्द बृहस्पति जरी अवतरला तरी त्याच्यानें देखील सिद्ध होणार नाहीं, मग लुंग्यासुंग्या टांक ओढ-णारांची प्राज्ञा काय ! विद्यार्जनानें किंवा सुशिक्षणानें स्त्रिया अनीतिवती, अविनयवती, व अनयवती होतील असें म्हणण्याहून दुसरें अजागळ मूर्खपण तें कोणतें ! स्त्रियांवर विद्येचा किंवा ज्ञानाचा असा परिणाम होईल असें मानणें म्हणजे त्या मनुष्य जातींत येत नाहींत असें कबूल केलें पाहिजे; कारण आम्हां पुरुषांवर ज्ञानाचा तसा परिणाम होत आहे असें वाटत नाहीं. व तसा होत आहे असें ज्यास वाटत असेल त्याला असें कबूल केलें पाहिजे कीं पुरुषांमध्यें सध्यां जो ज्ञान-प्रसार होत आहे त्यामुळें ते संसार करण्याला अयोग्य होत आहेत. आमच्या साऱ्या शाळा आणि विद्यालयें लहान मोठ्या मुलांना अविनय, जारकर्म, अन्याय, व अनीति पढविण्यासाठीं स्थापिलेलीं दुष्ट आलयें होत ! ज्या मूर्ख मनुष्याच्या मनांत असले विचार येत असतील तो खुशाल हवें तसें बहकत राहो. आमची अशी पूर्ण खात्री आहे कीं, स्त्री आणि पुरुष या उभय जातींत ज्ञानाचा जों जों अधिक

प्रसार होत जाईल, तों तों मनुष्यजातीची हरएक प्रकारें सुधारणा होईल, व ज्या वेळेस या भरतखंडांत गार्गीवाचक्नवी, वडवाप्रातिथेयी, व सर्वामैत्रेयी–यांच्याप्रमाणें साऱ्या स्त्रिया अत्यंत ज्ञानवती होतील, त्या वेळेस हें भरतखंड स्वातंत्र्यादि ऐहिक सुखांचा पूर्ण अनुभव घेईल इतकेंच नाहीं, तर त्या स्थितींत कोणतीही इच्छा परिपूर्ण न होण्याचा संभव न राहिल्यामुळें, या पृथ्वीवर स्वर्गस्थिति अवतरल्या-सारखी होईल, किंवा ही पृथ्वीच स्वर्गतुल्य होईल ! पण ही युगांतरींची आशा होय. तिची मूर्ति आमच्याचशी काय, पण आम्हांपासून पन्नासाव्या पिढीच्या हयातींतसुद्धां होणार नाहीं. तथापि मानवी सुधारणेचा अपरिहार्य कल त्या दिशेला असल्यामुळें उगीच आढेवेढे न घेतां ही गोष्ट अनिवार्य आहे असें समजून घेऊन, ती आनंदमय स्थिति मनुष्यतेला जितक्या थोडया काळांत प्राप्त होईल, अशा रीतीचें वर्तन करणें हें प्रत्येक समंजस व स्वजातीचें कल्याण चिंतणाऱ्या मनुष्याचें कर्तव्यकर्म होय. जगाच्या प्रस्तुत स्थितींत अगदीं कंगाल अवस्थेंतल्या कुटुंबापासून अत्यंत श्रीमान घराण्यांतल्या मुलांस व मुलींस एकसारखें, किंबहुना, उणेंअधिक शिक्षण देतां येत नाहीं, ही मोठ्या खेदाची गोष्ट होय. तसेंच, स्त्रीपुरुषांमध्यें जें स्वाभाविक अंतर आहे त्यामुळें कांहीं केलें तरी पुरुषांइतक्या सर्व स्त्रिया कधींच ज्ञानवती होणार नाहींत हें आम्ही प्रांजल-पणें कबूल करतों. तथापि ज्ञानाच्या संबंधानें प्रस्तुतकालीं त्यांच्यांत व पुरु-षांत जें जमीन अस्मानाचें अंतर दृष्टीस पडत आहे, तें जसजसें कमी होत जाईल तसतसें मनुष्यजातीचें सुख वाढत जाईल, व ज्या वेळेस तें अत्यंत सूक्ष्म होईल, त्या वेळेस मनुष्याच्या ऐहिक सुखाची परमावधि झाली असें म्हणावें लागेल. दारिद्र्यामुळें, पोटासाठीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत काबाडकष्ट करावे लागत असल्यामुळें, जुन्या विचारांच्या ग्रहानें ग्रासून टाकलें असल्यामुळें, किंवा दुसऱ्या कोणत्याही अडचणीमुळें — ज्यांना आपल्या मुलींबाळींस घरच्याघरीं दोन अक्षरें शिकविण्याचें, किंवा तीं येण्यासाठीं शाळेस पाठविण्याचें, सामर्थ्य अथवा सोय नसेल, त्यांची पराकाष्ठेची शोचनीय स्थिति होय, व ती आपल्याकडून होईल तितकी दूर करणें हें प्रत्येक देशहितचिंतकाचें व मनुष्यहितचिंतकाचें कर्तव्यकर्म होय. पण ज्यांना आज तारखेला ज्ञानाचा महिमा पूर्णपणें अवगत झाला आहे, ज्यांनीं जुन्या ग्रहांचें जूं झुगारून दिलें आहे, ज्यांना द्रव्यानुकूलता आहे, ज्यांनीं विद्वत्ता संपादिली आहे — त्यांनीं मुलींसाठीं हायस्कूल स्थापण्याचा

प्रयत्न करणें, किंवा आपल्या घरच्या मुलीबाळी त्यांत पाठविणें, यांत नांवें ठेवण्यासारखें काय आहे, हें आम्हांस समजत नाहीं. अमेरिकेंत प्रत्येक मुलास व मुलीस लिहितां वाचतां येतें. प्रत्येक मुलास व मुलीस लिहितां वाचतां आलें पाहिजे, असा जर्मनींत कायदा आहे. आमच्या विपरीत स्थितीमुळें आम्हांस आज तसा कायदा येथें करतां येत नाहीं व तो केला असतां त्यापासून फायदा होणार नाहीं. तथापि ज्यांना स्वसंतोषानें आपल्या व दुसऱ्यांच्या मुलीबाळींस दोन अक्षरें आणून देण्यासाठीं कांहीं उपाय करण्याची अनुकूलता आहे, व जे तशा प्रकारच्या, खटपटीस लागले आहेत, अशांना दोष देण्याहून दुसरा अधमपणा व विचारशून्यपणा नाहीं, असें आम्हांस वाटतें. प्रस्तुतचे रानडे, मानकर, पंडित वगैरे पुढारी जरी गेले, तरी त्यांच्या पाठीमागें जिकडे तिकडे भटजी, दीक्षित, व आचार्य—यांचें राज्य होईल असें नाहीं. सध्यांच्या चिन्हांवरून प्रस्तुतच्या पुढाऱ्यांपेक्षां सवाई पुढारी निघतील, व ते स्त्रीशिक्षणाचें काम अधिक हौसेनें पुढें चालवितील, असा संभव दिसत आहे.

[वर्ष ४, अंक ३२.]

स्त्रीशिक्षणावर शेवटचे दोन शब्द.

या विषयाच्या संबंधानें आजपर्यंत येऊन गेलेल्या लेखांवरून त्याविषयीं आमचे विचार आमच्या वाचकांस विदित झाले असतीलच. स्त्रियांस मुळींच शिक्षण देऊं नये असें म्हणणारे फारच थोडे लोक आहेत, सबब स्त्रीशिक्षणाची उपयुक्तता स्थापित करीत बसण्याची अवश्यकता नाहीं. जो थोडासा मतभेद आहे तो स्त्रियांस कोणत्या प्रकारचें किती शिक्षण द्यावें, व तें इंग्रजी भाषेच्या द्वारें द्यावें किंवा नाहीं, यासंबंधाचा आहे. ज्यांनीं या विषयावर लिहीत असतां आपल्या लेखणीस हवें तसें बागडूं दिलें, त्यांनीं एक मोठी चूक केली ती ही कीं, ज्याला त्याला आपल्या वित्ताचा हवा त्या कामाकडे व्यय करण्याचा पूर्ण अखत्यार आहे, हें तत्त्व विसरून जाऊन केवळ आपणास अप्रिय अशी गोष्ट दुसरे करण्यास प्रवृत्त झाले आहेत, येवढ्याच कारणास्तव त्यांनीं सर्व सभ्य रीतींस पराङ्मुख होऊन स्त्रीशिक्षणाच्या कैवाऱ्यांवर अविचारानें कोरडे ओढण्याचें महत् पातक केलें. ज्या संस्थानिकांनीं व सुशिक्षित आणि श्रीमंत लोकांनीं या सत्कृत्यास द्रव्यद्वारा मदत केली आहे, त्यांना, त्यांच्यावर तुटून पडणाऱ्या लोकांइतकाच, आपापल्या पैशाचा हवातसा खर्च करण्याचा अधिकार आहे. उद्यां जर आम्ही असें प्रतिपादूं लागलों कीं सर्वांनीं आपापले पैसे छापखाने स्थापण्यांत व वर्तमानपत्रें काढण्यांत घालावे, तर बरें दिसेल काय ? किंवा सर्वांनीं तसें केलें असें घटकाभर घेऊन चाललों, तरी त्यामुळें देशाचें हित होणार आहे काय ? यंत्रकलाप्रसार, व्यापारवृद्धि वगैरे गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या खऱ्या, पण सगळ्यांच्याच प्राप्तीचा ओघ त्यांच्याकडे कसा वाहणार ? व वाहून तरी फायदा काय ? मनुष्यमात्राच्या सुखास अमुक एकच गोष्ट कारण आहे असें नाहीं. सुख अनेकविध असल्याकारणानें तें प्राप्त करून घेण्याचीं साधनेंही अनेक आहेत. ज्या मानानें हीं साधनें कमी पडत जातील, त्या मानानें कमी सुखप्राप्ति होणार आहे. एका प्रकारचीं सुखें आपण अनुभवीत असतां त्यांपासून आपणांस दुसऱ्या सुखांची कल्पना उत्पन्न होते. नंतर या नवीन सुचलेल्या कल्पनांची तृप्ति करण्यासाठीं नवीन साधनें योजून त्यांपासून पूर्वी न अनुभवलेला सुखा-

नुभव होऊं लागला, म्हणजे आणखी नवीन सुखांची आकांक्षा उत्पन्न होते; व त्यांच्या प्राप्तीसाठीं पुनः नवीन साधनें शोधून काढण्यांत आपण पडतों. या रीतीनें मनुष्यांच्या सुखाच्या कल्पना आणि त्या सफल करण्याचीं साधनें — यांचा एकसारखा विस्तार होत आहे; व या विस्तारालाच आपण सुधारणा असें म्हणतों. मानवी मनोवृत्तींच्या या स्वाभाविक प्रवाहाला बांध घालण्याचा किंवा मागें हटविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे ज्या रानटी स्थितीपासून आम्हांस प्रस्तुतची स्थिति प्राप्त झाली आहे, त्या स्थितीस फिरून जाण्याचा प्रयत्न करण्यासारखें होय. " भिन्नरुचिर्हि लोकः " हें महाकविवाक्य लक्षांत धरून जें बोलणें किंवा लिहिणें असेल तें बोललें आणि लिहिलें पाहिजे. स्त्री-शिक्षणाच्या द्वेष्ट्यांना स्त्रीशिक्षणाच्या कैवाऱ्यांच्या आणि प्रोत्साहकांच्या द्रव्यावर कोणत्याही प्रकारचा हक्क नाहीं. कदाचित् त्यांनीं आरंभिलेल्या कृत्यापासून त्यांचें नुकसान होणार आहे, असें या स्त्रीशिक्षणशत्रूंस वाटत असेल तर केवळ मित्रत्वाच्या नात्यानें "तुम्ही असें करीत आहां, पण अमुक कारणामुळें त्याचा चांगला परिणाम होईल असें आम्हांस वाटत नाहीं" इतकें सामोपचारानें सांगण्याचा मात्र हक्क पोंचतो. यापेक्षां अधिक कांहीं नाहीं. आतां कोणी असें म्हणतील कीं येथें निघणाऱ्या मुलींच्या हायस्कुलाचा सारा खर्च खासगी रीतीनें जमा केलेल्या फंडावर चालावयाचा असता, तरच लिहिण्यांत विशेष कटुता येऊं देणें अन्यायाचें झालें असतें. पण ज्या अर्थी या हायस्कुलाचा बराच खर्च सरकारनें चालविण्याचें अभिवचन दिलें आहे, व ज्याअर्थी या कामास म्युनिसिपालिटीकडूनही बरीच मदत मिळण्याचा संभव आहे, आणि ज्याअर्थी कोणत्याही कामास सरकारानें किंवा म्युनिसिपालिटीनें दिलेला पैसा लोकांचा पैसा असतो, त्याअर्थी त्याचा अपव्यय होऊं लागला असतां तो करणाऱ्यांस दूषण देण्याचा अधिकार लोकांच्या प्रतिनिधींस पोहोंचतो. या आक्षेपास एक उत्तर असें आहे कीं, जे आपणांस लोकांचे प्रतिनिधि म्हणवीत आहेत त्यांना कोणींही प्रतिनिधि नेमिलेलें नाहीं. तें त्यांचें त्यांनींच बळकाविलेलें आहे. दुसरें उत्तर असें आहे कीं ज्यांच्याकडे सरकारी अधिकार असतो त्यांना तरी लोकांचे प्रतिनिधि कां म्हणूं नये ? इंग्लंडसारख्या लोकसत्तात्मक देशांत सारी राजसत्ता लोकांच्या प्रतिनिधींच्या हातांतच असते. लोकांत दोन फळ्या असल्या म्हणजे त्यांच्या प्रतिनिधींतही दोन फळ्या असायाच्याच. जी फळी ज्या वेळीं विशेष सामर्थ्यवान् असेल तिच्या हातांत सारी राज्यसत्ता येते,

व दुसऱ्या फळीस तिचें करणें निमुटपणें ऐकून घ्यावें लागतें. आपणास अधिकार प्राप्त होईपर्यंत आपल्या प्रतिपक्ष्यांचें एकसारखें दोषाविष्करण करणें हें कमजोर फळीस आपलें कर्तव्यकर्म वाटत असतें, व बरोबरही आहे. पण सामाजिक सुधारणेची कमान एकसारखी चढती असावी, यासाठीं अगत्याचें काय आहे कीं, दोनही फळ्यांनीं एकमेकांचे दोष दाखविणें ते चांगल्या मनानें व चांगल्या शब्दांनीं दाखविले पाहिजेत. नाहींतर उभय फळ्यांत रणें पडून उभयतांच्या अस्तित्वालाही धक्का पोंचावयाचा. अशाच प्रकारच्या फळ्यांमुळें आम्हीं आज कित्येक शतकें पारतंत्र्याचा अप्रिय अनुभव घेत आहों. प्रस्तुत आम्हांत ज्या दोन फळ्या आहेत त्यांपैकीं कोणतीलाही काम करून घेण्यासाठीं परकीय राज्यसत्ताधाऱ्यांकडे जावें लागतें. ते त्यांच्या समजुतीप्रमाणें ज्या फळीचा पक्ष अंगीकारतील त्या फळीचा वरचष्मा होऊन दुसऱ्या फळीस चूपू बसावें लागतें! आजकाल स्त्रीशिक्षणप्रोत्साहकांनीं आपल्या करामतीनें राज्याधिकाऱ्यांना आपल्याकडे वळवून घेतलें आहे. सबब त्यांच्या प्रतिपक्ष्यांनीं आतां तिडतिड करण्याचें सोडून देऊन चुप्प बसावें हेंच बरें. रागाच्या झपाट्यांत भलतेंच बडबडत सुटण्यांत कांहीं हंशील नाहीं. आपसांत कलागत लागून दुसऱ्यांनीं तमाशा पहावा किंवा अविचारामुळें कांहीं तरी अनिष्ट परिणाम व्हावा हें अत्यंत शोचनीय होय. एवंच सिद्ध काय झालें कीं मुलींच्या हायस्कुलासाठीं सरकारानें व लोकांनीं मदत केली आहे. ही गोष्ट ज्यांना पसंत नसेल त्यांनीं आपल्या समजुतीप्रमाणें जें लिहिणें असेल तें टांक संभाळून मर्यादेनें व उदार अंतःकरणानें लिहावें इतकेंच करण्याचा त्यांस हक्क आहे, व तसें करणें भूषणही आहे.

कित्येकांना स्त्रीशिक्षण हवें आहे, व त्याकरितां लोकांचा सामाजिक किंवा खासगी पैसा खर्च झाला तरी वाईट वाटत नाहीं, पण जें शिक्षण द्यावयाचें तें व्यवहारोपयोगी असून फक्त मराठी भाषेच्या द्वारें द्यावें असें वाटतें. परकीय भाषाभ्यासाचे कष्ट निदान बायकांच्या तरी पाठीमागें लावूं नयेत, त्यापासून आमचें अनेक प्रकारचें नुकसान आहे असें या पक्षाचें म्हणणें आहे. व तें पुष्कळ अंशीं सयुक्तिकही आहे. देशाभिमान्यांचा आणखी एक पक्ष आहे, त्याचें म्हणणें काय आहे कीं, इंग्रजी भाषेचा विटाळ आमच्या बायकांस तरी होणें इष्ट नाहीं. पुरुषांत इंग्रजीचा प्रसार धडाक्यानें होत असल्यामुळें बिचाऱ्या मराठीला कोणी पुसेनासें झालें आहे. जो उठणार तो इंग्रजी लिहिणार आणि

इंग्रजी बोलणार. मराठींत ग्रंथ नाहींत, मराठींत वक्ते नाहींत, मराठींत हें नाहीं, मराठींत तें नाहीं वगैरे ! मुलांसाठीं मराठी कॉलेजें किंवा मराठी युनिव्हर्सिट्या स्थापा म्हणून कोणी सध्यां स्थापीत नाहीं; सबब, बायकांसाठीं तरी या गोष्टी करून मराठीची दीनावस्था घालवा ! भाषांतरें करण्यासाठीं ग्राजुअटें लावा, बक्षिसें ठेवा, व हरएक प्रकारचें उत्तेजन द्या ! बायकांच्या शाळेंत मराठींतच सर्व शास्त्रांचा अभ्यास करावयाचा असा निर्बंध केलात कीं, त्या त्या शास्त्रांच्या पुस्तकांसाठीं मागणी केल्यासारखें होईल ! व मागणी आली कीं ज्या वस्तूसाठीं ती मागणी असेल तिचा बाजारांत पुरवठा झालाच पाहिजे असा अर्थशास्त्राचा निर्बाध नियम आहे ! सबब, स्त्रियांच्या हायस्कुलांत मराठी सुरू कराल तर उत्तेजन न देतां सुद्धां मराठींत ग्रंथोत्पादन होऊन महाराष्ट्रवाणी युरोपांतील सुधारलेल्या भाषांच्या पंक्तीस अल्पकाळांत चेऊन बसणार आहे ! या विलक्षण मताच्या बाजूस कित्येक पट्टीचे ग्राजुएट असून, अलीकडे त्यांनीं निरनिराळ्या पत्रांत, व विशेषेंकरून मराठ्यांत, बरेच आठवडेपर्यंत मोठ्या निकराची टांकांची लढाई चालविली होती ! आमच्या मतें या पेनबहादुरांची बुद्धि उत्कट देशाभिमानामुळें किंचित् मंदावल्यासारखी होऊन अगदीं स्वल्प गोष्टी सुद्धां त्यांना क्षणभर नीट समजेनाशा झाल्या. मुलांत इंग्रजीचा प्रसार जारीनें होत असल्यामुळें मराठीकडे दुर्लक्ष होत आहे हें खोटें आहे; कोणी तरी कोट्यावधि रु० खर्च करण्यास उभा राहिल्याखेरीज केवळ दहापांच मुलींच्या मागणीनें मराठींत अनेक शास्त्रांवर ग्रंथविस्तार होणें अशक्य आहे; इंग्रजी भाषेचा अभ्यास मागें पडून कालेजांत, युनिव्हर्सिटींत, बेंचांत, बारांत, व अशाच दुसऱ्या महत्त्वाच्या ठिकाणीं देशीभाषांचें पाऊल शिरकणें तें दुसऱ्याच पंथांनीं होण्यासारखें आहे; सध्यां मराठी भाषेंत कितीही ग्रंथ झाले तरी राज्यकर्ते इंग्रज लोक असल्यामुळें, एखाद्या मनोरंजक बातमीपासून तों राज्यप्रकरणीं गूढ भानगडी समजण्यास, व द्रव्यप्राप्ति, लौकिकप्राप्ति किंवा ज्ञानप्राप्ति करून घेण्यास, इंग्रजी भाषेशिवाय दुसरें सुलभतर साधन नाहीं; प्रस्तुतकालीं कोणी केवढाही पंडित असला तरी त्याला थोडेंबहुत इंग्रजी येत असल्याखेरीज त्यांचें कांहींच तेज पडत नाहीं, व त्याच्या गुणांची व्हावी तशी चहा होत नाहीं; ज्या स्त्रियांना इंग्रजी शिकून नोकऱ्या करावयाच्या नसतील, त्यांचें इंग्रजी भाषेचें ज्ञान मराठी भाषेंत ग्रंथवृद्धि करण्याच्या कामीं फारच उपयोगी पडणार आहे; अखेरीस, ज्या त्या मुलीवर इंग्रजीचा बोजा लाद-

ण्याचा या हायस्कूलस्थापकांचा इरादा नाहीं,—वगैरे गोष्टींचा मुळींच विचार न करितां या देशाभिमानी कागदी लढवय्यांनीं कांहीं दिवस उगीच सुळसुळाट मांडला होता, व अजूनही तो पुरता विझाला आहे असें वाटत नाहीं ! असो.

कांहीं म्हटलें तरी हा क्षुल्लकवाद आहे. दोनही पक्षांची मंडळी समंजस अस-ल्यामुळें तह होण्यास कठिण पडणार नाहीं. आमच्या युनिव्हर्सिटीच्या परीक्षेस न बसणाऱ्या मुलींस होतां होईल तों सारे विषय मराठी शिकवावेत, व आतां ज्याप्रमाणें इंग्रजीशिवाय दुसऱ्या कोणत्या तरी भाषेचा अभ्यास मुलांकडून माफक रीतीनें करवितात, त्याप्रमाणें मुलींच्या हायस्कुलांत इंग्रजी अभ्यास माफक रीतीनें करवावा, म्हणजे जसे दुसरे अनेक विषय शिकवायाचे, तसाच हाही एक समजावा. जी ती गोष्ट इंग्रजींतून शिकविण्याची अवश्यकता नाहीं. ज्यांना युनिव्हर्सिटीच्या परीक्षा द्यायच्या असतील, त्यांना युनिव्हर्सिटी त्या मराठींत घेण्यास तयार होईपर्यंत, सर्व अभ्यास इंग्रजींत शिकण्याहून गत्यंतरच नाहीं. कोणत्या मुलीचा कोणच्या पद्धतीवर अभ्यास चालवायाचा हें एकदां तिच्या नवऱ्याला, बापाला, भावाला, किंवा जो पालक असेल त्याला विचारून, सुरवात केली म्हणजे कांहीं अडचण पडणार नाहीं. या आणि असल्या प्रकारच्या ज्या दुसऱ्या बारीकमोठ्या व्यवस्था करावयाच्या आहेत, त्या करण्यास नेमलेल्या म्यानेजिंग कमिटींतले लोक विद्वान्, समजंस, व विचारी आहेत; व त्यांच्या हातून त्या सर्व योग्य रीतीनें पाहिजेत तसतशा होत जातील अशी आमची पक्की खात्री आहे.

असो, येत्या विजयादशमीस या स्त्रीविद्यालयाची प्रतिष्ठा होणार. या सुमुहूर्ता-वर त्याची प्रतिष्ठा होऊन त्याला अखंड विजय येवो, व त्यांत सुसंस्कृत होऊन संसारांत प्रवेश करणाऱ्या युवती आपापल्या मातापितरांस व भर्त्यांस आपल्या समर्याद सुशिक्षेनें प्रमुदित करोत, परिश्रमानें प्राप्त करून घेतलेल्या आपल्या ज्ञानानें आपल्या अपत्यांस लहानपणापासून सुशिक्षण देऊन नीति, देशाभिमान, व लोककल्याण यांचीं बीजें त्यांच्या कोमल अंतःकरणभूमींत काळजीपूर्वक लावोत, सुविद्या प्राप्त झाल्यापासून अंतःकरणांत उत्पन्न होणारी जी स्वहितत्याग-क्षमता व प्रेमबुद्धि तिच्या योगानें, वैधव्यादि अनेक अत्यंत दुःखकारी क्लेशपाशांत सांपडलेल्या व सांपडणाऱ्या आपल्या अनाथ भगिनींची मुक्ति करण्याच्या कामांत सदा रत होवोत, आणि मनुष्यास ऐहिक व पारमार्थिक सुखप्राप्ति करून घेण्यास व शेवटीं मुक्ति संपादण्यास ज्ञानाशिवाय सुलभतर साधन नाहीं, हें निरंतर ध्यानांत बागवून, त्याची शांत आणि कल्याणप्रद पताका सर्व भरतखंडभर लावोत, असें आम्ही अंतःकरणापासून चिंतितों.

[वर्ष ४, अंक ३८]

माधवबागेंतील सभेवरील आक्षेप.

मातंगाः किमु वल्गतैः किमफलैराडंबरैर्जम्बुकाः।
सारंगा महिषा मदं व्रजत किं शून्येषु शूरा न के॥
कोपाटोपसमुद्भटोत्कटसटाकोटेरिभारेः पुरः।
सिंधुध्वानिनि हुंकृते स्फुरति यत्तद्गर्जितं गर्जितम्॥

हिंदुसमाजानें माधवबागेंत जें आपलें रौद्रस्वरूप प्रकट केलें, त्याची आमच्या अत्युत्कट साहसी सुधारकांस, अथवा दुर्धारकांस, पूर्वी कदाचित् कल्पनाही नसेल. समाजाची दृष्टि आपणांकडे वळली नाहीं, हें जोंपर्यंत त्यांस पूर्णपणें माहीत होतें, तोंपर्यंत त्यांनीं त्यावर अपशब्दांचा वर्षाव करून घेतला; आपलें ज्ञानभांडार वर्तमानपत्रांच्या द्वारें निःशेष बाहेर काढिलें; आपली विचारशैली व आपलें वाक्पांडित्य निरर्गलपणें सभांतून व समाजांतून प्रकट केलें; आपली थोरवी वर्णितांना व आपल्या अप्रतिम धैर्याची, श्रेष्ठतेची, सद्यतेची व परोपकारित्वाची बडिजाव मिरवितांना; ते वस्तुस्थिति अगदींच विसरून गेले, व मनोराज्याच्या परम भरांत, शहाणपणांत, दूरदर्शित्वांत व शक्तिमत्वांत आपण ईश्वरतुल्यच आहों असेंही पण त्यांस बहुतेक वाटूं लागलें. "कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं" असें आपल्या अंगीं सामर्थ्य असतां हिंदुसमाजास आपण शेंडी धरून कां वांकवूं नये, अशी त्यांच्या मनांत साहजिकच वीरश्री उत्पन्न झाली. व त्यांच्या वल्गना प्रत्यहीं अधिकाधिक बीभत्स स्वरूप धारण करूं लागल्या; त्यांची प्रकृति व प्रवृत्ति दिवसानुदिवस अधिकाधिक जाज्वल्यता प्रगट करूं लागली, व प्रत्येक वीर आत्मबहुमानानें आपल्या नांवाचा डंका वर्तमानपत्रांतून मिरवून सुधारकांचा अग्रणी होण्याची अत्याशा बाळगूं लागला. या प्रकारें सर्वत्र निःसीम कलकलाट उडून गेल्यावर, स्थिर व गंभीर असा आमचा हिंदु समाजही फार वेळ तटस्थ वृत्ति धारण करील, हें शक्य नव्हतें. त्यानें अखेरीस आपलें अकाळविकाळ स्वरूप प्रकट करण्याचा निश्चय केला. त्याची वार्ता पसरते न पसरते, तोंच आमच्या साहसी सुधारकांच्या तोंडचें पाणी पळालें; त्यांच्या शक्ति विगलित झाल्या! त्यांचीं हृदयें निराशेनें पूर्णपणें ग्रासून टाकिलीं; व विराटपुत्र उत्तर

याहूनही ज्यांचा वीर्यातिरेक विशेष, असे हे सुधारकांचे मोहोरे, कोणी बृहन्नडा आपणांस या प्राणांतिक संकटांतून वांचवील काय या विचारांत पडले!


माधवबागेंतील टोलेजंग सभेमध्यें जो ठराव होणार होता, त्यांतील शब्द-मात्रासही सभेंत विरोध करण्याची ज्यांची प्राज्ञा नव्हती, अशी ही भेकड मंडळी आतां काय युक्ति लढवितात, हें पाहण्याची आम्हांस फारच उत्कंठा होती; व त्यांनीं सर्वानुमतें जी अजब युक्ति काढिली ती आतां जगत्प्रसिद्ध झालीच आहे, तेव्हां त्यांच्या अकलेची व धूर्ततेची वाचकांस कल्पना आलीच असेल. सरकारानें हिंदुधर्मांतील लग्नकार्यादि विषयांत हात घालूं नये, अशा अर्थाचा अर्ज करावयाचा, हें कर्तव्य जाणून हजारों लोक एकत्र होतील, माधव-बागेंतील विस्तीर्ण जागेंतही मावायाचा नाहीं, असा अफाट लोकसमुदाय जमेल व आ. रा. सा. मंडलिक यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारिलें असतां, त्यांच्या प्रसिद्ध लोककल्याणकारित्वामुळें मुंबईतील लहानमोठे सर्व व्यापारी, कामदार, व वजनदार लोक–त्यांच्या पक्षास बळकटी देण्याकरितां एकजूट होतील, व आजपर्यंत अपशब्द, मिथ्यारोप, व अमंगळ वल्गना असह्य होईपर्यंत सहन केल्यानें, प्रतिपक्ष चळावेल कीं काय या भीतीनें सर्व विचारी व समजंस लोक आपले विचार एकवेळ प्रकट करण्याचीही संधि घेतील-ह्या सर्व गोष्टी जाणून, व आपली अल्पसंख्या लक्षांत आणून, आमच्या उत्कट सुधारकांनीं अर्जाचे अक्षरास हात न लावतां त्यांत आपलें कार्य होईल, अशा तऱ्हेचें एक वाक्य घालण्याचा निश्चय केला, व त्याबद्दल सूचना करण्याकरितां मि. तेलंग यांची उठावणी केली. या सूचनेचा पूर्णपणें मोड झाला, हें वाचकांस अवगत आहेच; परंतु ती करण्यांत मतलब काय होता हें कदाचित् सामान्य वाचकांस कळलें नसेल. आपला हीन पक्ष आहे हें जाणून, व तो पक्ष सबळ होण्याची आशा नाहीं असें समजून, मंडळींनीं विचार केला कीं, हिंदुधर्मांतील रीतिभातींनीं आमचा पुष्कळ तोटा होत आहे, हें अर्जांत हलकेंच घुसडून द्यावें, व आपल्या पुढील खटपटीस तितकीच बळकटी करून घ्यावी. अशा युक्तीनें लोकांच्या डोळ्यांत धूळ पाडतां येईल. ही शक्कल ज्यांस सुचली त्यांस प्रथम आपल्या अकलेची केवढी वाहवा वाटली असेल, व मागून मुंबईतील लोकांची धूर्तता पाहून, त्यांचा किती निरुत्साह झाला असेल! क्षुद्रप्राणीही मरतां मरतां हातपाय झाडल्यावांचून राहत नाहीं. आपलें सर्व वाग्जाल फुकट जाणार, आपला भ्रमाचा

भोपळी फुटून आपली सर्वत्र उपहास्यता होणार, व अविचार, दुराग्रह व मंदमति या त्रिदोषानें आपली कीर्ति पंचत्व पावणार हें पाहून, या तीव्रसुधारकांनीं सभेच्या कामावर व तेथें जमलेल्या मंडळीवर, व त्यांच्या साहजिक व अनिवार्य कृत्यांवर मिथ्याक्षेप करण्यास आरंभ केला. कोणीं व्याघ्रचर्मानें आपलें शरीर व कर्ण-युगुल झांकीत झांकीत, सभेमध्यें केवढा घोंटाळा, केवढीं लाथाळीं, व कलकलाट होता, अशा तऱ्हेची तक्रार अध्यक्षाकडे करूं लागला; पण त्या सर्वांत आपला व आपल्या सज्जातीयांचा कितीतरी भाग होता, हें साहजिकच विसरून गेला. कोणी आमचा पक्ष फारच मोठा होता, परंतु त्यास आपलें अस्तित्व दाखविण्यास संधि सांपडली नाहीं, व त्यामुळें तो कोणाचे दृष्टीस पडला नाहीं, अशी तक्रार करूं लागला. कोणी काय त्या सभेंत भाटे, वाणी वगैरे जाति होत्या, ब्राह्मण व मराठे कोठें होते, ते तर आमच्या पक्षास आहेत, अशी फुशारकी मिरवूं लागला; व कोणी ही सभा मूर्ख व अज्ञान लोकांची होती, आमच्यासारखे त्यांत शहाणे किती सांपडतील, असा स्वाभिमानपूर्वक प्रश्न करून आपलें समाधान करून घेऊन तटस्थ झाला. अशा तऱ्हेचे आक्षेप काढणारे केवळ शेंदाडशि-शिपाई नव्हेत काय ? आपल्या पक्षाचे सबळतेची ज्यास खात्री आहे, आपल्या पक्षाकडे शहाणपणाचा मक्ता आहे, असें ज्याची मनोदेवता सांगते, व हजारों सुविचारी लोक आपणांस हाक मारतांच आपणांस पाठबळ देण्यास येऊन सभेची व्यवस्था व शांतपणा यांचा बिलकुल मोड करणार नाहींत, असा ज्याच्या अंतर्यामीं भरंवसा असेल, तो असल्या कुरापती काढून रडत बसेल काय ! प्रतिपक्षानें दुसरेच दिवशीं तशीच सभा कां नाहीं भरविली ? त्यांच्या निश्चयाचीं बंधनें वरच्यासारख्या सभेनें कां शिथिल व्हावीं ? सुधारणेचीं सूत्रें स्वतःच्या उत्साहानें एकवार हातीं घेतलीं असतां, कोणत्याही धैर्यवान् व बुद्धिमान् पुरुषाचे हातांतून तीं याप्रमाणें गळून पडतील असें आम्हांस वाटत नाहीं.

असो, परंतु या साहसी सुधारकांचा जो शेवटचा आशातंतु होता तोही आतां तुटला. सरकारानेंच परपक्षाची बळकटी जाणून आपण या कामांत सुधारकांस मदत करणार नाहीं असें आतां स्पष्ट सांगितलें. सुधारकांनीं आपल्या शहाण-पणाचा किंवा कर्तव्याचा कोणताही भाग लोकांचीं चित्तें पुनः आपणांकडे वळ-विण्याकरितां शिल्लक ठेविला आहे असें नाहीं. तेव्हां आतां पुनरपि त्यांनीं आपली अधिकच बेअब्रू करून घेण्याचे नादीं न लागतां स्वस्थ रहावें हें बरें. हा आमचा उपदेश त्यांनीं मान्य न केल्यास त्यांत हिंदुसमाजाचें काय नुकसान होणार !

उत्पतितोऽपिहि चणकः
शक्तः किं भ्राष्ट्रकं भंक्तुम् ।

[वर्ष ६, अंक ३७.]



आतां कसें ?

स्थळ–मुंबई, गिरगांवांतील एक बंगला.

[रा. ब. गोपाळराव देशमुख, आनरेबल मि. का. त्रिं. तेलंग, मि. शांताराम नारायण, मि. शामराव विठ्ठल, मि. वामन आबाजी मोडक, मि. चंदावरकर वगैरे मंडळी एका राऊंड टेबलाभोंवतीं बसलेली दिसते.] रा. ब. देशमुख हे सर्वांच्याकडे पाहून वयाच्या, व अर्थात् अनुभवाच्या मानानें आपल्याकडेच श्रेष्ठपण येतें असें समजून, बोलतातः " मित्रहो, आजपर्यंत परिश्रम करून रचिलेली इमारत आजच्या सभारूपी वादळांत खालीं येते कीं काय, अशी या वृद्ध डोक्यास भीति उत्पन्न झाली आहे. तुमच्या चेहऱ्यावरून तुम्हां सर्वांसही तशीच घास्ती पडल्याचें दिसत आहे. तेव्हां अशा प्रकारचें संकटैक्य असल्यावर आपल्यांत दुही माजणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. आतां एवढेंच राहिलें आहे कीं या प्रसंगांतून मुक्त कसें व्हावें हें ठरवायाचें. वार्धक्यामुळें नवीन तोड काढण्याच्या कामीं हें पोक्त डोकें जरा कमजोर झालें आहे. आपल्यासारख्या विद्वान् व जोमाच्या, व जाडया बुद्धीच्या गृहस्थांना एखादी अजब युक्ति शोधून काढणें जड नाहीं. हूं चालूं द्या. आपले विचार बाहेर पडल्यावर मी आपल्या अनुभवाच्या कसाला ते लावून पाहीन. विशेष अवघड प्रश्न आल्यास हीं लोकहितवादीचीं दप्तरें मीं आणलींच आहेत. यांत इतिहास भरपूर आहे. पूर्वी राजपुतान्यांत—"

मि० चंदावरकर––(पुढें सरसावून) वयाच्या व शिक्षणाच्या मानानें मला या सभेंत बोलण्याला अधिकार पोंचत नाहीं. परंतु थोडक्याच दिवसांपूर्वी आपणां सर्वांच्या कृपेनें माझ्या हातून जें महत्कृत्य घडलें, व सकळ सुधाऱ्याचें माहेरघर जें इंग्लंड तेथें मला जो अनुभव आला, त्याच्या योगानें—

मंडळी–ऐका. ऐका. (टाळ्या पिटतात.)

मि० चंदावरकर–या उत्तेजनाबद्दल मी आपला फार फार आभारी आहें. मी इंग्लंडांत असतांना माझी व मि. जॉन ब्राइट, या मुत्सद्याची भेट झाली. त्या

भेटीची हकीगत आपण वाचलीच असेल. त्यांच्या हाताला माझा हात लागला हें मी मोठें भाग्य समजतों. तेव्हां माझें असें म्हणणें आहे कीं विलायतेचा प्रवास (मंडळींतून " विषयांतर " असा ध्वनि निघतो.)

मि० चंदा०—अशा तऱ्हेनें मध्येंच त्रास देण्याच्या वाईट संवयीचा मला विलायतेकडे पक्का अनुभव येऊन चुकला आहे तेव्हां—

("पुरे पुरे" असे शब्द मंडळींत निघून कुजबुज सुरू होते; मि० चंदावरकर रागानें डोळे गरगर फिरवूं लागतात—इतक्यांत मि० मलबारी आंत येतात व शेकह्यांड करीत, रा. ब. देशमुखांच्या जवळच्या खुर्चीवर आपला देह टाकतात.)

रा. ब. देश०—वेल ! शेटजी ! तुम्ही तर आम्हां सुधारकांचे अपॉसल म्हणजे शंकराचार्य. तुम्ही या कामीं दिरंगायी करूं लागलां तर आम्हां सर्वांची कंबर खचणार. तुम्हींच आतां आमचे आधारस्तंभ आहां.

मि० मलबारी—रावसाहेब, ते तसा नाहीं. तुमी आमचा गुरु व आमी तुमचा शिसा. आमचा तमे ऐकतां व आमी तमचा सर्वांचे करितां स्रम करतो. आतांच एक पतर लॉर्ड रीपनचा आला त्याचा जवाब लिखन्यामदीं आमी एंगेज झाला होता. हा पहा तो पतर. नाहीं; ही नवे. हा त्या पंजाबच्या लेफ्टनंट गव्हर्नराचा—हा चीनच्या बादशहाचा.—ही मोरोक्कोहून आमच्या दोस्तसाहेबांकडून आला आहे—

मंडळी—तें असो हो पंत्रांचें. पण आजच्या सभेचद्दल काय विचार ?

मि. मलबारी—ऊँः, त्यांत काय ? आमी असा नाहीं डरते. आमी सारा देस फिरला. समदा लोक आमच्यासारखा बोलते. सरकारी साहेबलोक आमाला मदत देते. मग काय ?

रा. ब. देशमूख—मला शेटजीचें म्हणणें बिलकुल कबूल आहे.

मि० तेलंग—माझी समजूत अशी होती कीं, आज आपण जमून कांहीं तरी तोड काढणार. मी येथें हजर असतां सर्व लोक कायदा पाहिजे असें म्हणतात असें सांगणें जरा धाडसाचें दिसतें. आतां कायद्याची मुळींच मदत घेऊं नये असें मी म्हणत नाहीं. कामाच्या व्यापृतत्वामुळें या प्रश्नाचा विचार करण्यास मला वेळ मिळाला नाहीं; तरी कायदा नको असें म्हणणाऱ्यांपैकीं मी एक आहें. परंतु—

रा. ब. देश०—ही गोष्ट मला मान्य आहे.

मि. मल.--रावसाहेब ! आपण असा काय करितां ! आमचा दोस्त तेलंग कायद्याच्या अगदीं आगेन्स्ट नाहींत; म्हणजे ते आमच्या साईडचा आहेत. तसेंच मि. वेस्ट-

मि. तेलंग—हें म्हणणें एका अर्थीं खरें आहे; आणि एका अर्थीं खोटेंही आहे. तथापि--

मि. शांताराम--अशानें आपला निश्चय होणार नाहीं. प्रसंग आणीबाणीचा आहे ही गोष्ट आपल्याला कबूल केली पाहिजे. भट सुधारणाद्वेष्ट्यांनीं मि. मंडलिक यांच्या नांवाचा फायदा घेण्याची जी मसलत काढली आहे ती सिद्धीस गेल्यास आपल्यास फार घातक होणार आहे. मंडलिकाच्या नांवावर हजार पांचशें लोक--

मि. मल.--पुः ! शेंदोनशें फार झाला तर--

मि. शांताराम--हजारपांचशें नाहीं दोनएक हजार तरी असतील. तेव्हां अशा सभेचा परिणाम काय होईल याचा विचार सर्वांनीं करावा. सभा मोडणें नाहींच-

मि. चंदाः--नानसेन्स, तें का ? मी असें सांगतों कीं याहींपेक्षां मोठ्या सभा विलायतेंत मोडलेल्या मीं पाहिल्या आहेत. एकदां म्यांचेस्टरमध्यें मि. स्ल्याग.-

मि. मल.--रावसाहेब, आपला विलायतचा गोस्ट आपण येथें सांगूं नको पाहिजे. आमी देखील हिंदुस्थानांत पुश्कल सभा पाहिला आहे.

मि. वामन आबाजी--शांतिः शांतिः शांतिः ! ! !

मि. शांताराम--सभेंत बखेडा करणें मुष्कील आहे. तेव्हां माझी अशी सूचना आहे. हल्लीं तयार झालेल्या अर्जाला एक प्यारा जोडावा अशी आजच्या सभेंत अमेंडमेंट सुचवावी. त्या प्याऱ्यांत असें ल्याहावें कीं " बालविवाह व असंमत वैधव्य हीं वाईट आहेत व तीं बंद करण्याविषयीं आम्ही प्रयत्न करूं. " या अमेंडमेंटपासून आपल्या पक्षाला जोर येणार आहे.

रा. ब. देश०--वाहव्वा ! वाहव्वा. खाशी युक्ति ! मी या सूचनेस "जोर" देतों. या माझ्या ग्रंथांतून--

मि. तेलंगः--या सूचनेच्या विरुद्ध फारसें म्हणतां येणार नाहीं; परंतु याची कांहीं विशेष अवश्यकता आहे असें जरी म्हणतां येणार नाहीं तरी--

रा. ब. देश०--हेंही मत मला सर्वांशीं ग्राह्य वाटतें.

मि. वामन आबाजी--आपण सर्वत्र सदसद्विवेकाचें अनुसरण केलें असतां आपल्या पूर्वग्राह्य मतांशीं या सूचनेची असंबद्धता समुत्पन्न होते असें आम्हांस भासतें.

रा. ब. देश०--आम्हांसही असेंच भासतें.

मि. मलबारी--हे दोनी नान्सेस बोलतो.

मि. शांताराम--झालें तर मग ही युक्ति तुह्मां सर्वांस पसंत आहे हें पाहून मला फार आनंद होतो. आतां एवढीच गोष्ट राहिली कीं, ही सूचना त्या सभेंत करावयाची कोणीं ? माझ्या मतें आमचे अध्वर्यु मि. मलबारी शेट यांनीं ही गोष्ट आपल्या शिरावर घ्यावी.

रा. ब. देशमुख--हें म्हणणें मला फारच योग्य दिसतें.

मि. मलबारी--तमे माजावर जो मान टाकतां त्याला आमी योग्य नाहीं. मीटिंग हिंदूचा आहे. तवा समदा लोक माजा ठट्ठा करेल. माजा मत मि. तेलंग-

मि. तेलंग--छे, छे ! माझ्या व्यवसायव्यापृतत्वामुळें माझ्या हातून तें काम तडीस जाईल असें वाटत नाहीं. शिवाय माझ्याकडे शहाणपणाचा अनन्योपभोग आहे असेंही नाहीं. रा. ब. देशमुख यांनीं असलीं वाग्‌रणें बरींच पाहिलीं आहेत. त्यांच्यासारख्या जरठ महायोध्याचें हें काम आहे.

मि. वामन आबाजी--हें सत्य आहे. नहि सत्यात् परो धर्मः !

रा. ब. देशमुख--मलाही असेंच वाटतें. कोणत्याही प्रसंगीं सभेला अध्यक्ष पाहिजे असेल तर मलाच विचारतात.

मंडळीपैकीं एक--त्याचीं कारणें निराळींच आहेत.

मि. चंदावरकर--ही वेळ मोठी प्रसंगाची आहे. यावेळीं आपल्या पक्षाकरितां पाहिजे तें करण्यास सिद्ध होणें ही ड्यूटी आहे असें मी समजतों. मी विलायतेंत असतां एकदां लार्ड सो-ऑन्ड सोची व माझी गांठ पडली त्यावेळीं--

मंडळींतील एक--सोमवार संध्याकाळीं आपल्या " प्रकाशांत " येईना ती गोष्ट. म्हणजे कामांत काम होईल.

मि. शांताराम--माझी अशी सूचना आहे कीं हें काम आन० मि. तेलंग यांनींच केलें पाहिजे. तेच या कामाला योग्य आहेत. इतरांच्या हातून हें रेटणार नाहीं. आन० रावसाहेब मंडलिक सी. एस. आय. यांशीं आन० मि. तेलंग सी. आय. ई. हेच सामना करण्याला योग्य. माझी अशी आशा आहे कीं मि. तेलंग यावेळीं त्यांची नित्याची कामाची सबब फारशी जोरानें पुढें आणणार नाहींत.

रा. ब. देशमुख--माझें या सूचनेस पूर्ण अनुमोदन आहे.

(मंडळी टाळ्या पिटतात.)

मि. तेलंग--मंडळीचा ज्या अर्थीं इतका आग्रह दिसतो त्यां अर्थीं हें काम मी पत्करतों. माझें एवढेंच म्हणणें आहे कीं माझ्याकडे जी सूचना करण्याचें काम आपण देणार आहां, तींत कायद्याचा कांहीं संबंध नसावा, व त्या ठिकाणीं मला मंडळींचें पाठबळ पाहिजे.

मंडळी—आफ कोर्स ! या दोन्ही गोष्टी आम्हांला कबूल आहेत.

मि. वामन आबाजी—आतां आपण सर्व निवृत्त होण्यापूर्वी माझी अशी सूचना आहे कीं, ज्या सर्वशक्ति, सकलसत्ताधीश, परम गुह्य, परम निर्मल, परम पवित्र अशा सच्चिदानन्द परमेशाच्या सहायानें आपली आजची सभा निर्विघ्न झाली, त्या महाशक्तीचे आभार मानून, आज संध्यासमयीं होणाऱ्या सभेंत आत्मोद्दिष्ट-कार्य सिद्धीस जावो, अशी त्याची आपण सर्वांनीं एकचित्तानें प्रार्थना करावी.

(कांहीं निघून जातात. बाकीचे प्रार्थनोत्तर " ईश्वरनामसंकीर्तन ! जय जय ईश्वर ! " असा घोष करीत निघून जातात.)

रात्रौ ८ वाजण्याचे सुमारास गिरगांवांत एका बंगल्यांत, रा. ब. गोपाळराव देशमुख, मि. शांताराम नारायण, मि. र. ना. खोटे, मि. चंदावरकर, मि. शामराव विठ्ठल, मि. परमानन्द, मि. मलबारी वगैरे मंडळी खिन्नवदन होऊन बसली आहे. रा. ब. देशमुख हे आपल्या " लोकहितवादी " ग्रंथाच्या ढिगाकडे शून्य दृष्टीनें पहात आहेत; मि. मलबारी यांणीं छातीवर हात लावून पुढें पडलेल्या उघड्या पत्राकडे हताशमुद्रेनें नजर लाविली आहे; मि. चंदावरकर आपल्या ' इंग्लंडांतील दहा आठवडे ' या पढमावर डोकें टेकून पडले आहेत; व इतर मंडळीही अशाच रीतीनें खेद दाखवीत आहेत. इतक्यांत मि. वामन आबाजी यांनीं हातांतील ' गीता ' आपणांशींच वाचीत असतां सहज पुढील चरण मोठ्यानें म्हटलाः—

" अहो बत महत्पाप कर्तुं व्यवसिता वयम् "

हें ऐकून मंडळी चपापून उठतात, व एकमेकांकडे पाहूं लागतात–तों मि. वामन आबाजी यांच्या तोंडून पुढील चरण ऐकू येतोः—

" यद्राज्यसुखलोभेन हन्तुं स्वजनमुद्यताः । "

मि. मलबारी—मि. वामन आबाजी, तमे असा काय आमचा डोक्स्याला सतावते. ते तुमचा पोती पुराण सुनायला नहीं आला येते. जा, तिकरे बसून-नशी वाचेल आपला बूक.—

(नंतर मि. वामन आबाजी एकीकडे जाऊन आपला गीतापाठ पुनः आरंभापासून सुरू करतात. कांहीं श्लोक ते आपल्याशींच वाचतात, कांहीं न कळत त्यांच्या तोंडांतून मोठ्यानें बाहेर पडतात.)

अरे बापरे ! आतां काय करावा ? आमी एवरा मोठा श्रम करूनशी सारा कसा खड्ड्यामधिं डुबला. कालचा सारा प्लान कसा घणो चोख्खा तैय्यार केला हता पन ए आमचे लोकने अमाला ठार केला. अमेंडमेंट पास झाला असता तर केवरा मौज करता हता. सिमल्याला जाऊनशी गोऱ्या लोकांच्यापुरें बोंब करून सोरला असता के ए आर्थोडाक्स इव्हील कबूल करते, पण तेच्या विरुद्ध कांहीं करते नथी. अरे हायरे हाय ! आमी एकट्यानें तो किती मरावा ? तुमी बद्धा हिंदू लोक नादान, नादान ! मी पारशीभाई पण केवरा बोंब करून सोरला !

[मि. वामन आबाजी--"शंखं दध्मौ प्रतापवान्. "]

मि. चंद्रावरकर—शेटजी ! बस्स झालें आतां. पूर्वीच चुकलें. मी सांगत नव्हतों कीं या ठिकाणीं माझ्या दहा आठवड्यांच्या प्रवासाचा आपण फायदा करून द्या म्हणून ?--

रा. ब. देशमुख--आणि मीहि पण आपलें पांढऱ्या वयाचें या दक्षरांत भरलेलें शहाणपण आपल्या सेवेस सादर करीत होतों. श्रीमन्महाभारतांत अनुतापशमनपर्वांत.--

मि. र. ना. खोटे--नाहीं, पण मी आपल्याला असें विचारितों कीं आपल्या शांतारामजींच्या हातून ही गोष्ट सहज पार पडली नसती कां ? अहो, ज्यांनीं वकीली, चाळी, गिरण्या, कारखाने, शेती, इतक्या व आणखी पुष्कळ खटपटींना एकदम आपला खांदा दिला आहे, ते पण रिफार्मच्या कामांत कमी आहेत असें नका समजूं.

[मि. वा. आ.--"शंखान् दध्मुः पृथक् पृथक्. "]

रा. ब. देशमुख--वाजवी ! वाजवी !

मि. मल०--आतां कसला फुसारकी मारते ! तुमीच सारा घाण करून सोरला. आतां आमी ए म्याटरचा आपला हात धुवेल. तुमचा तुमीच ए घाण करा; आमी बघेल.

मि. शामराव—आतां कशानें ही घाण निघते ! आपली तर बोवा कंबरच खचली.

रा. ब. देशमुख–वाः ! लाख रुपयांची गोष्ट बोललांत !

[मि. वा. आ.–" सीदन्ति मम गात्राणि, मुखं च परिशुष्यति. " (वरतीं पाहून) कां शेटजी, कोठपर्यंत आपल्या उद्दिष्टकार्यांची सिद्धता झाली आहे ?]

मि. शांताराम नारायण–माय फ्रेंड मि. खोटे ! तुम्ही माझी जी स्तुति केलींत तिला मी फारच थोडा पात्र आहें. तें असो, परंतु आज झालेल्या सभेवर जर हल्ला केला नाहीं, तर मग आपल्या या पवित्र उद्धेशाची धडगत दिसत नाहीं. तुम्हां आम्हां सुधारकांची एकदां पत गेली तर सुधारणेचें काम कित्येक शतकांनीं मागें पडेल. तुमचा व आमचा आजचा हा मान म्हणजे लूथरप्रमाणें आहे. अशा प्रसंगीं आपली सर्व मालमत्ता व पत ' प्लेज ' करावयासही मी तयार आहें. आपण मात्र मागें घेऊं नका. देशाचें कल्याण व आपली अजरामर–

मि. मल०–आतां रडून काय करेल ! झाली एवढी बेअबरू बस्स झाला ! काय करावयाचा ते तर ठरवेल !

मि. परमानन्द—सान्या जगभर आमची आतां बेअब्रू होईल ! आम्हां सुधारकांच्या डोळ्यां देखत हें असें व्हावें असें इष्ट नाहीं. तुमच्यापैकीं कोणीतरी हें काम करील असें वाटलें होतें पण कसलें ! तुमच्या हातून नाहींच व्हावयाचें तें. मीं तरी कांहीं केलें असतें, परंतु तुमच्या भरंवशावर गेलों. बोला पाहूं कोणीं कोणीं काय काय केलें आहे तें !

(सर्वजण माना हालवतात.)

[मि. वा. आ. "क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप. "]

मि. मल०–वारेवा ! केवरा हुसार ! तुमचा हातून कांहीं होत नवता तर कसाला ए कामामदिं सिरावा. "जेनुं काम तेनुं थाय." अमी तो आज तुमचे अब्रू राखेल, तमाला माहित नाई आमी आज काय करत हता ते. तागवर तार लिखित हता. आजचा मीटिंग "मासांज्"चा हता, तेथें मोट्टा विचारी लीडर तो कुई नवता. सारिकडे आमी रिपोर्ट पसरून देते.

मि. चंदा०—हो ! मला वाटतें प्रथम उद्यांच्या रिपोर्टांची अगोदर व्यवस्था झाली पाहिजे. मुख्य मुख्य धेंडें संभाळलीं म्हणजे झालें; पैकीं एक माझा 'इंदु' तर आहेच. त्याच्या अर्ध्या बाजूची मी पाहिजे तशी वासलात लावीन. इतरांविषयीं–

मि. मल०--अरे तमे त्येचा दिक्कत नही करेल ! आमी टाईम्स, गझेटमर्दि कमजास्त कांहीं येल तर पाहून घेऊं. पन तो अडव्होकेटकडे आमचा वजन नाहीं.

मि. चंदा०--ऊँः ! त्याला कोण विचारतो ! तें तर कालचें पत्र. डेली असलें म्हणून काय झालें ? आमच्या वुइकलीपैकीं एक दोन्हींची सर त्याला येणार नाहीं. असल्या विरुद्ध जाणाऱ्या पत्रांकडे मी ढुंकून सुद्धां पहात नाहीं. विलायतेंत मी ती युक्ति शिकलों आहें. एकदां--

मि. मलबारी--ओहो ! अगदींच फरगेट झाला. आमी आतां हा लार्ड रिपनचा लेटर पब्लिश करेल !

मि. खोटे-तुम्ही तीं पत्रें संभाळा, मी हें माझें शरीर व माझी गाडी व हा माझा घोडा हीं या कामीं झिजवणार ! उद्यांपासून-

रा. ब. देश०-माझें मत असेंच आहे ! इतक्यानें नच निभाव लागल्यास माझें हें विचारभांडार लुटा !

मि. चंदा०-ओ माय डिअर, काय खाशी युक्ति सुचली ! (एकदम टेबलावर हात मारून,) वस्स ! एक लीडर मात्र पाहिजे, म्हणजे देऊं एक जंगी मीटिंग उडवून ! हिंदू, ख्रिस्तियन, मुसलमान, पारशी सर्व आमचे सिम्पथायझर येऊं द्या. त्या ठिकाणीं मनुष्यांची पण गर्दीच गर्दी होऊन जाईल, माणसें चिरडतील, टाळ्यांनीं आकाश दणाणेल, भाषणांचा पूर वाहवेल, आमच्या मंडळींच्या ज्ञानाचा उजेड पडेल, लोकांचीं मनें आमच्यातर्फे क्षुब्ध होतील, सारांश आमच्या पक्षाचा विजयध्वज पुनरपि वातावरणांत फडकूं लागेल ! त्या प्रसंगाचें वर्णन हें पहा येथें माझ्या स्क्र्याप बुकांत कापून ठेविलेलेंच आहे. सगळा इंदु भरून काढतों. त्यांतून सभेंत मलबारी शेटजींचें आगमन, त्यांचें भाषण व त्याचा लोकांच्या मनावरील ठसा-यांचें तर हुबेहूब वर्णन तयार आहे. हें ग्लाड्स्टनचें लाइफ उघडण्याचा अवकाश, ग्लासगोमध्यें--

(मंडळी हें भाषण ऐकून चकित होतात व " ब्रेव्हो, ब्रेव्हो " असें ओरडतात; मि. वामन आ० हे आपल्याच नादांत पुढील श्लोक मोठ्यानें वाचतातः--

आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनम्
आश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ।
आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति,
श्रुत्वा चैनं वेद नचैव कश्चित् ॥)

सर्वजण—होऊं द्या सभा, होऊं द्या सभेसभेचा सामना. (टाळ्यांचा गजर करतात.)

मि. चंदा०—थांक्स, थौजंड थांक्स ! (आपल्याशीं) ओ माय् ब्रेन । यावेळीं काय बहार दिलीस उडवून. क्या अजब चीज निकली है ! (उघड) बरें तर मग. झालें आतां; बोला; लीडर काढा.

मि. खोटे व शांताराम—त्याची नको तुम्हांला काळजी. आणूं धरून ब्यारोनेट मंगळदासाला. आहे कीं नाहीं वरजीवनदास माधवदासाच्यावर कडी ?

मि. परमानन्द्—शेटला शेट तर जुळला ! पण त्या भटाशीं सामन्याला कोण आणणार ?

मि. शांताराम—आतां बोवा तेलंग येणार नाहीं. त्याला मागच्याच खेपेला आणतांना कोण आयास पडले. त्याच्या त्या परंतु–तथापि–कदाचित्–खरें–खोटें–यांच्या गुर्हेतून त्याला बाहेर काढणें फार कठीण. आजच्या प्रसंगामुळें तर तो अगदीं हातपाय गाळून बसला असेल.

रा. ब. देशमुख—मलाही असेंच वाटतें. या प्रसंगीं प्रत्येकानें आपल्या योग्यतेनुरूप कार्यभाग उचललाच पाहिजे. अध्यक्ष होण्याच्या कामीं मीं कधींही मागें घेतलें नाहीं, व आपण सुचवीत असल्यास मी त्यास अनुमोदन देण्यास तयार आहें.

[मि. वा० आ०—"हतो वा प्राप्स्यासि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीं"]

मि. मल०—रावसाहेब तमे आतां बद्धा म्हातारा झाला. तवां तुमच्यानें आा मीटिंगामदीं घणो लांब स्पीच नही करवेल. अरे ! तुमी तेचा पंचात कसाला करते ? मी तो मद्रासहून ते रघुनाथरावाला, नहि तो नेटिव्हथिंकाला तारेंतून आणून देल ?

मि. परमानन्द्—अहो मद्रास कशाला ? त्या रानड्यांना धरा. तो बरा आहे या कामाला. कौन्सीलरला कौन्सीलर देवूं झुजवून.

सर्वजण—बस, बस. ठरलें, ठरलें. रानडेच पाहिजेत. (टाळ्यांचा गजर होतो)

[इतक्यांत राव. ब. रानडे येतात; व मंडळीच्या जवळ येऊन]

रा. ब. रानडे—कायहो, काय ठरलें काय ? कांहीं मसलत काढिलीत वाटतें. आणि तें आमचें नांव कां काढलें होतें ? आमच्या गळ्यांत कांहीं लोढणें अडका-

मि. मल०--अरे तमे त्येचा दिक्कत नही करेल ! आमी टाईम्स, गझेटमर्दि कमजास्त कांहीं येल तर पाहून घेऊं. पन तो अडव्होकेटकडे आमचा वजन नाहीं.

मि. चंदा०--ऊँः ! त्याला कोण विचारतो ! तें तर कालचें पत्र. डेली असलें म्हणून काय झालें ? आमच्या वुइकलीपैकीं एक दोन्हींची सर त्याला येणार नाहीं. असल्या विरुद्ध जाणाऱ्या पत्रांकडे मी ढुंकून सुद्धां पहात नाहीं. विलायतेंत मी ती युक्ति शिकलों आहें. एकदां--

मि. मलबारी--ओहो ! अगदींच फरगेट झाला. आमी आतां हा लार्ड रिपनचा लेटर पब्लिश करेल !

मि. खोटे-तुम्ही तीं पत्रें संभाळा, मी हें माझें शरीर व माझी गाडी व हा माझा घोडा हीं या कामीं झिजवणार ! उद्यांपासून-

रा. ब. देश०-माझें मत असेंच आहे ! इतक्यानें नच निभाव लागल्यास माझें हें विचारभांडार लुटा !

मि. चंदा०-ओ माय डिअर, काय खाशी युक्ति सुचली ! (एकदम टेबलावर हात मारून,) बस्स ! एक लीडर मात्र पाहिजे, म्हणजे देऊं एक जंगी मीटिंग उडवून ! हिंदू, ख्रिस्तियन, मुसलमान, पारशी सर्व आमचे सिम्पथायझर येऊं द्या. त्या ठिकाणीं मनुष्यांची पण गर्दीच गर्दी होऊन जाईल, माणसें चिरडतील, टाळ्यांनीं आकाश दणाणेल, भाषणांचा पूर वाहवेल, आमच्या मंडळींच्या ज्ञानाचा उजेड पडेल, लोकांचीं मनें आमच्यातर्फे क्षुब्ध होतील, सारांश आमच्या पक्षाचा विजयध्वज पुनरपि वातावरणांत फडकूं लागेल ! त्या प्रसंगाचें वर्णन हें पहा येथें माझ्या स्क्र्याप बुकांत कापून ठेविलेलेंच आहे. सगळा इंदु भरून काढतों. त्यांतून सभेंत मलबारी शेटजींचें आगमन, त्यांचें भाषण व त्याचा लोकांच्या मनावरील ठसा-यांचें तर हुबेहूब वर्णन तयार आहे. हें ग्लाड्स्टनचें लाइफ उघडण्याचा अवकाश, ग्लासगोमध्यें--

(मंडळी हें भाषण ऐकून चकित होतात व " ब्रेव्हो, ब्रेव्हो " असें ओरडतात; मि. वामन आ० हे आपल्याच नादांत पुढील श्लोक मोठ्यानें वाचतातः--

आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनम्
आश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ।
आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति,
श्रुत्वा चैनं वेद नचैव कश्चित् ॥)

सर्वजण—होऊं द्या सभा, होऊं द्या सभेसभेचा सामना. (टाळ्यांचा गजर करतात.)

मि. चंदा०—थांक्स, थौजंड थांक्स ! (आपल्याशीं) ओ माय् ब्रेन । यावेळीं काय बहार दिलीस उडवून. क्या अजब चीज निकली है ! (उघड) बरें तर मग. झालें आतां; बोला; लीडर काढा.

मि. खोटे व शांताराम—त्याची नको तुम्हांला काळजी. आणूं धरून ब्यारो-नेट मंगळदासाला. आहे कीं नाहीं वरजीवनदास माधवदासाच्यावर कडी ?

मि. परमानन्द—शेटला शेट तर जुळला ! पण त्या भटाशीं सामन्याला कोण आणणार ?

मि. शांताराम—आतां बोवा तेलंग येणार नाहीं. त्याला मागच्याच खेपेला आणतांना कोण आयास पडले. त्याच्या त्या परंतु–तथापि–कदाचित्–खरें–खोटें–यांच्या गुहेंतून त्याला बाहेर काढणें फार कठीण. आजच्या प्रसंगामुळें तर तो अगदीं हातपाय गाळून बसला असेल.

रा. ब. देशमुख—मलाही असेंच वाटतें. या प्रसंगीं प्रत्येकानें आपल्या योग्यतेनुरूप कार्यभाग उचललाच पाहिजे. अध्यक्ष होण्याच्या कामीं मीं कधींही मागें घेतलें नाहीं, व आपण सुचवीत असल्यास मी त्यास अनुमोदन देण्यास तयार आहें.

[मि. वा० आ०—"हतो वा प्राप्स्यासि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीं"]

मि. मल०—रावसाहेब तमे आतां बद्धा म्हातारा झाला. तवां तुमच्यानें आ. मीटिंगामदीं घणो लांब स्पीच नही करवेल. अरे ! तुमी तेचा पंचात कसाला करते ? मी तो मद्रासहून ते रघुनाथरावाला, नहि तो नेटिव्हथिंकाला तारेंतून आणून देल ?

मि. परमानन्द—अहो मद्रास कशाला ? त्या रानड्यांना धरा. तो बरा आहे या कामाला. कौन्सीलरला कौन्सीलर देवूं झुजवून.

सर्वजण—बस, बस. ठरलें, ठरलें. रानडेच पाहिजेत. (टाळ्यांचा गजर होतो)

[इतक्यांत राव. ब. रानडे येतात; व मंडळीच्या जवळ येऊन]

रा. ब. रानडे—कायहो, काय ठरलें काय ? कांहीं मसलत काढिलीत वाटतें. आणि तें आमचें नांव कां काढलें होतें ? आमच्या गळ्यांत कांहीं लोढणें अडका-

वयाचें आहे होय ! (असें म्हणून बसतात.) [मि. वामनराव हे आलेसें पाहून गीता खालीं ठेवितात.]

मि. मल०--काय रावसाब, तमे कितना देर केला. आमी अगदीं भीत होता के तमे आतां नाहीं येते. तवा आमी ठरावून टाकला के मंडलिकाच्या मीटिंगच्या आगेन्स्ट एक मीटिंग भरवेल. तेंत तमाला प्रेसिडेंट करेल. अमीची मीटिंग अड्रेस करेल.

रा. ब. रानडे:--हें पहा तुम्ही मीटिंग करून काय करणार ? आपल्या मीटिंगला कोणी यायचें नाहीं आणि त्यानें आपली दुर्बलता आपणच उघडकीस आणली असें होईल.

रा. ब. देश०--हें अगदीं रास्त आहे.

मि. मल०--मि. रानडे तुम्ही असा डरला नाहीं पाहिजे. मुंबईमदिं पांच हजार माणूस नाहीं जमेल असा तमे समजते ! तमे आपला जातभाई आणा. मीबी आणतो.

मि. चंदा०--यस्--तीच तीच ऐडिया. मी मघांशीं सांगितल्याप्रमाणें--

रा. ब. रानडे--नूर्त मीटिंगचें राहूं द्या. प्रथम आजच्या मीटिंगाविषयीं प्रोटेस्ट तयार करून त्यावर दहापांचांच्या सह्या घालून एक कॉपी मंडालिकाकडे, व एक टाईम्स गॅझेटला--

मि. शांताराम--बरें आहे. हीही ऐडिया कांहीं वाईट नाहीं. त्या प्रोटेस्टांत द्याव्या दहापांच इरेग्युलारिटिझ घालून-कलम-पहिलें--मि० गोकुळदास हे अमेंडमेंट सेकंड करायाला उठले असतां त्यांस प्रेसिडेंटांनीं अडथळा केला-दुसरें-सदर गोकुळदास यांस लेजिस्लेटिव्ह इंटरफियरन्सवर बोलूं दिलें नाहीं. तिसरें-गोकुळदास उभे राहिले असतां त्या कीर्तीकराला बोलावयास सांगितलें.

मि. घनश्याम:--शिवाय-चवथें--आमच्या पक्षाचा एक इसम बोलण्यास लागला असतां त्यास उद्धेशानें आबस्ट्रक्ट करणें व--पांचवें--आपल्या पक्षाकडील कोणा एका इसमास मध्यंतरीं बोलण्यास सांगणें.

रा. ब. देशमुख--हे सर्व मुद्दे अगदीं योग्य आहेत.

मि. चंदा०--अहो तें मुख्य कलम राहिलेंच ना ! आमच्या बाजूचे शेंकडों शें लोक अमेंडमेंटकरितां व्होट देण्यास पुढें येत असतां, त्यांस (मागें पाहून)

एका हलकट वाणगटानें नका येऊं म्हणून सांगितलें. त्यामुळें आमची संख्या अत्यंत कमी भरली.

रा० ब० देशमुख–ही गोष्ट प्रमाणसिद्ध आहे.

मि० चंदावरकर—आणि ही गोष्ट राणी सरकारच्या कोणत्याही हैकोर्टांत ४७ साक्षिदारांकडून सिद्ध केली जाईल.

मि. शामराव—हां ! शिवाय चेअरमनला मंडळी मोजतांही येईना असें असून त्यांनीं ४७ हा आंकडा कसा सांगितला ?

मि. खोटे—अहो आणखी पुष्कळ मुद्दे आहेत. तुमचे किती झाले ? हे मांडा–अकरावें—ती जागा फार संकुचित होती.–बारावें—तींत गुदमरत होतें–तेरावें–आमची मंडळी पुढें आली नाहीं–चवदावें–सभा वाजवीपेक्षां फाजील मोठी होती–पंधरावें–त्या ठिकाणीं गोंगाट होता–सोळावें–आणखी–आणखी काय पहा. असेच आणखी पांचपंचवीस मुद्दे काढले होते हो. (खिशांत हात घालून) मध्यंतरीं उतरलों होतों तिथें राहिली वाटतें बाय ! —

मि. शांता०–आणखी पुष्कळ मंडळीच्या मनांतून बोलायचें असून त्यांस संधि सांपडली नाहीं, व सभा आडजर्नही केली नाहीं. आणखी गर्दीमध्यें आमच्या पक्षाला लोकांकडून त्रास पोंचावा व मेमोरियलच्या पक्षाला जोर मिळावा म्हणून कांहीं खटपटी मंडळी उभी केली असावी असें वाटतें असाही एक जबरदस्त मुद्दा आहे.

रा. ब. रानडे—भाईसाहेब, वाः मुद्दे तर सर्वोत्कृष्ट काढले आहेत. त्यांत आपल्याला मेजारिटी मिळाली असती असें दिग्दर्शनही होत नाहीं आहे ही एक गोष्ट चरी केली आहे. सह्या करून द्या पाठवून. तेलंगाची सही घेण्याला विसरूं नका हो. नाहीं तर तें मोठें चमत्कारिक दिसेल.

मि. शांताराम—तेवढेंच कठिण दिसतें. त्याला सांगितलें कीं तो म्हणणार चापासून फारसा उपयोग दिसत नाहीं, तरी—

मि. चंदा०—मग माझी ती मीटिंगची ऐडिया—

रा. ब. रानडे—ती ऐडिया कांहीं वाईट नाहीं आहे. परंतु हल्लींच्या प्रसंगीं अगदीं अप्रयोजक व सुसाइडल दिसते. तुम्हांस पाहिजे तर करा मीटिंग; पण माझ्यानें अध्यक्षाचें काम रेटणार नाहीं, असें वाटतें.

मि. मल०--अरे, तमे का असा मागे फिरता! रिस्पान्सिबिलीटी आमचा डोक्यावर आहे कीं नाहीं.

मि. शांताराम--माझ्या या कलमवार प्रोटेस्टनें बरेंच काम होणार आहे.

मि. खोटे--यस्, तें होणारच!

मि. चंदावरकर--पण माझ्या मीटिंगच्या ऐडियाचें काय! विलायतेंत असल्या कामीं मीटिंगा--

मि. शांताराम--मला वाटतें नुसती लेक्चरची मीटिंग करावी व तींत रा. ब.-रांस लेक्चर देण्याविषयीं आपण विनंति करावी. आपल्याला माधवबाग मात्र मिळत नाहीं. कावजीहालांतच गेलें पाहिजे. तेथें लोक फार रहात नाहींत हीही गोष्ट आपल्या फायद्याचीच आहे.

(मंडळीपैकीं कांहींजण 'मीटिंग' 'मीटिंग' व कांहींजण 'लेक्चर' 'लेक्चर' म्हणून ओरडतात.)

मि. वा. आ.—हें पहा, आमचे माधवरावजी हे पोक्त, सुविचारी, अनुभवशीर दूरदृष्टि असे आहेत. तेव्हां त्यांचाच सल्ला या कामीं आपण घ्यावा हें आम्हांस प्रशस्त दिसतें.

रा. ब. देशमुख—वामनरावजी म्हणतात तें आम्हांसही मान्य आहे.

रा. ब. रानडे–हें पहा मंडळी, अहो शेटसाहेब, मी आपणां सर्वांस एवढावेळ ऐकलें, व माझ्याही मनांतील आशय थोडासा आपल्या लक्षांत आलाच असेल. परंतु आपण माझा सल्लाच विचारतां, व मजवर थोडें जबाबदारीचें कामही आपण टाकण्याचा विचार करीत आहां, तेव्हां माझ्या मनांतील विचार आपणांस स्पष्टपणें कळविणें या प्रसंगीं अत्यंत इष्ट दिसतें. मला वाटतें आपल्या प्रयत्नांची दिशा प्रथमतःच कांहींशी चुकली. आपण कायद्याचें नांव काढण्यापूर्वीच हिंदु लोकांकडून प्रसिद्धपणें बालविवाहादिकांनीं समाजास होणारे अपाय कबूल करून घ्यावयाचे होते. परंतु आपला उत्साह अनावर झाला. ही युक्ति आपणांस त्या वेळीं सुचली नाहीं व ती आज सुचून तिचा उपयोग झाला नाहीं. असो. झाल्या गोष्टीबद्दल शोक करण्याचा हा काळही नव्हे, स्थळही नव्हे, प्रसंगही नव्हे. आजच्या सभेंत आपला पक्ष दुर्बळ आहे, व तो मुळींच सबळ नाहीं, हें सर्व जगापुढें निर्विवाद दिसून आलें आहे. तेव्हां आपण केवळ चढाओढीनें दुसरी सभा भरविण्यांत कांहीं अर्थ नाहीं आहे. आपला पक्ष सबळ होता अशी आपण कागदोपत्रीं

तक्रार करितों इतकेंच या वेळीं आपण करणें रास्त आहे. यापुढें आपलें सुकाणूं दुसऱ्या दिशेस फिरविल्यावांचून इलाज नाहीं आहे, सत्परिणाम नाहीं आहे, व तसें न करण्याचा माझा विचारही नाहीं आहे. ती दिशा ही कीं आपण कांहींवेळ कायद्याचें नांव सोडून द्यावें, व सरकारापाशीं या दुष्ट चालीपासून होणारे दुष्परिणामाची चौकशी करण्याकरितां एक कमिशन ऑफ इन्क्वायरी मागावें. त्या कमिशनांत आपल्यापैकीं पुष्कळांचा प्रवेश होईल; व कमिशनच्या रिपोर्टावरून सरकार व लोक कांहीं अंशीं बांधले जातील; जननमरणाचे, अपमृत्यूचे, विधवांच्या दुराचाराचे, व असेच दुसरे आंकडे बाहेर येतील; त्यांची इतर देशांशीं तुलना होईल. कदाचित् आर्यधर्मांतील खऱ्या चालींचा व भ्रष्ट चालींचा कांहींसा आपल्यासारखा निर्णय होईल व मग त्यांवरून आपणा कायदेवाल्यांची बाजू सहजच बळावेल; व सरकारासही कांहीं अंशीं विचार करणें भाग पडेल. आपणांमध्यें अनेक जातींत अनेक रीति आहेत, त्यांची आपणास तरी आज आंकड्यांसह माहिती कोठें आहे ! तेव्हां हें माझें म्हणणें आपणांस पसंत असल्यास आपण विद्वान् लोकांची सभा बोलवा. मी तेथें बालविवाहादि चालींच्या दुष्परिणामांवर व्याख्यान देतों. सुधारणेचें काम मागें टाकण्यास मी अत्यंत शेवटचा मनुष्य होय ! या दिशेनें आपणांस गेलें पाहिजे; आपलें जहाज या दिशेस वळलें पाहिजे; आपणांस प्रसंगावर दृष्टि दिली पाहिजे. आपणांस झाल्या गोष्टीचा खेद मानून उपयोग नाहीं आहे; विनाकारण संतापून आपली उपाहास्यता करून घेणेंही उपयोगी नाहीं आहे. आपण जो विचार ठरवायाचा तो शांतपणें ठरविला पाहिजे; दूरदृष्टीनें ठरविला पाहिजे; प्रसंग पाहून ठरविला पाहिजे.

रा. ब. देशमुख—या सूचनेला माझेंही परिपूर्ण अनुमोदन आहे.

(इतर टाळ्यांनीं आपली संमति दर्शविनात.)

रा. ब. रानडे—बरें तर आपला खास विचार काय होतो तो मला पुण्यास कळवा

(मंडळी जाऊं लागते, तोंच—)

मि. शांताराम—मि. मोडक ! प्रार्थना राहिली.

मि. वामन आबाजी—हो, केवढा प्रमाद होत होता ! भो सकलचराचर नियामका ! आजच्या पराभवखेदामुळें चित्तास व्यग्रता येऊन तुझ्याविषयींचें आमचें कर्तव्य आम्ही विसरलों याची क्षमा कर. क्षमस्व, क्षमस्व, क्षमस्व.

इतर—आमेंन ! (सर्व जातात.)

[वर्ष ६, अंक ३७–३८.]

सास्वांस नोटीस !

कलकत्ता येथील साधारण कुलीन घराण्यांतल्या एका सास्वेनें आपल्या सुनेस कांहीं शिवाशिव केल्याचा व फराळाचें चोरल्याचा अंदेशा आल्यावरून हातपाय बांधून लाल झालेल्या उलथन्यानें डाव्या गालावर, उजव्या खांद्यावर, उजव्या पायाच्या पुढल्या भागावर, व एका हातावर डागिलें. या अपराधाबद्दल माजिस्ट्रेट बाबू रामशंकरसेन यांपुढें तिची चौकशी होऊन ती दोषी ठरली, व तिला चार महिन्यांच्या सक्तमजुरीची व शंभर रुपये दंडाची शिक्षा देण्यांत आली. सबब या लेखाअन्वयें पहिल्या चालीच्या सर्व खाष्ट सास्वांस अशी नोटीस देण्यांत येते कीं इतउत्तर ज्या सास्वांकडून सुनांचे अशा रीतीनें हाल करण्यांत येतील त्यांची चौकशी करून त्यांना शिक्षा देण्यासाठीं कोर्टांचीं द्वारें अगदीं खुलीं करण्यांत आलीं आहेत ! सर्व सास्वांनीं येथून पुढें हें पक्कें ध्यानांत धरावें कीं, आतांच्या सुधारलेल्या कायद्यास सुनांचा हवातसा जुलूम करण्याचा हिंदु सास्वांचा पूर्वापार चालत आलेला हक्क मुळींच संमत नाहीं ! म्हणून ज्या सास्वा या अतिरूढ हक्काच्या आधारावर सुनांचे हाल करण्यास प्रवृत्त होतील त्यांस सक्तमजुरीची, बिनमजूरीची, किंवा दंडाची शिक्षा करण्यांत येऊन बिनभाड्याच्या घरांत टकोरी बडविण्यास अथवा ज्या प्रकारच्या कामाबद्दल रत्नागिरिकडील पत्रांनीं ओरड चालविली आहे तसलीं कामें करण्यास पाठविलें जाईल ! पूर्वीप्रमाणें आतांच्या सुना घरांतील झांकापाक होऊन जिकडेतिकडे निजानीज व सामसुम झाल्यावर व मध्यरात्रींचा चौघडा पडल्यावर, कांकणांस फडकीं बांधून, एका हातांत लामणदिवा किंवा पणती व दुसऱ्या हातांत तांब्यापंचपात्री घेऊन, पाय न वाजवितां व श्वासोच्छ्वास न करितां नवऱ्याच्या खोलींत जात नाहींत; व तेथील अवश्य कृत्य आटोपल्याबरोबर पुनः माजघरच्या धर्मशाळेंत एकत्र निजलेल्या मुलीबाळींत येऊन पडत नाहींत; पूर्वीप्रमाणें वडील माणूस दृष्टीस पडल्याबरोबर त्यांस खडी ताजीम देऊन एखाद्या आंधेऱ्या कोपऱ्यांत जाऊन उभ्या राहत नाहींत; पूर्वीप्रमाणें सास्वांनीं कितीही जाच केला अथवा शरीरदंड केला तरी ब्र न काढतां तो निमूटपणें सोसून घेत नाहींत, व त्याच्या शमासाठीं एकांतीं मुळमुळ

रडत बसत नाहींत; पूर्वीप्रमाणें लिहिण्यापुसण्याचा, नवऱ्याशीं चोरून देखील बोलण्याचा, त्याच्या पुढेंपुढें करण्याचा, व त्याच्याशीं खिदळण्याचा कंटाळा करीत नाहींत; पूर्वीप्रमाणें सास्वांचे व नणंदांचे शब्दप्रहार व लगुडप्रहार नवऱ्यापासून चोरून ठेवीत नाहींत; पूर्वीप्रमाणें सासूसासऱ्यांच्या सेवेस गुलामाप्रमाणें तत्पर असत नाहींत, व त्यांच्या तोंडांतील शब्द झेलीत नाहींत--ह्या व असल्या प्रकारच्या दुसऱ्या सबबी सुनांविरुद्ध आणिलेल्या पुराव्यांत बिलकुल ऐकिल्या जाणार नाहींत ! कोणी सास्वा असें म्हणतील कीं ' आमच्याविरुद्ध येवढी करडी नोटीस काढण्याची अवश्यकता नव्हती. कारण चक्रनेमिन्यायानें कोणाचा पक्ष केव्हां वर असतो व केव्हां खालीं असतो. आम्ही सुना होतों, तेव्हां आम्हीं नाहीं का आपल्या सास्वांचें हवें तसें बोलून घेतलें ? त्या वेळेस आम्ही कोठें फिर्यादी लावायाला गेलों होतों ? सासूबाई खांडगळ्या शिव्या देत, मामंजी लांकडांनीं मारीत, घरांत मनांतल्या मनांत पुष्कळ वाईट वाटे; पण तिकडून किंवा आमच्याकडून सासूबाईंला किंवा मामंजीला एक प्रत्युत्तर देखील गेलें नाहीं ! कधीं राज्य करून घेण्याचें व कधीं तें करण्याचे दिवस पाळीपाळीनें साऱ्यांना येतात ! मग त्याचा येवढा दांडोरा कशाला पिटवायाला पाहिजे ? आम्हीं एखादे वेळेस कुठें चुकून घरांत म्हटलें कीं " आम्हीं कांहीं केलें तरी सासूबाईंच्या मनासच येत नाहीं; वन्सें नाहीं तर भाऊजी कांहीं तरी सांगतात, आणि सासूबाई व मामंजी आपले आमच्यावर रागावतात, " तर आम्हांस साफ सांगणें होईं कीं " त्यांची चूक असली तरी तिकडे मला पहायाचें नाहीं; तुमचा पक्ष घेऊन त्यांचा पाणउतारा करण्यास आम्ही तयार झालों नाहीं ! आम्हांला लोकांत वागायाचें आहे; बाईलबुद्धि झालों म्हणून उद्यां ते आमच्या तोंडांत शेण घालूं लागतील ! " तिकडलें असें बोलणें झालें कीं आम्हांस झकमारीत गप्प बसावें लागे ! आतांच्या मुलींची पहावी तीं कांहीं चमत्कारिकच तऱ्हा ! त्यांना हूं म्हटलेलें खपेनासें झालें आहे ! आम्हांला नव्हते असले ढंग ठाऊक ! दुसऱ्या कोणी सास्वा किंवा त्यांचे वकील असें म्हणतील कीं, 'सास्वांकडून सुनांना जाच होतो हें म्हणणें अगोदर बरोबर नाहीं. कारण त्या लहान असतां त्यांना ओळ लावण्यासाठीं त्यांच्यावर कधीं रागावणें व कधीं त्यांना मारणें अगदीं जरूर आहे. अभ्यासासाठीं शाळेंतले मास्तर नाहीं का मुलांना मारीत ? मास्तरांवर नाहीं केल्या कोणीं कधीं फिर्यादी ? त्यांना नाहीं कोणी देत नोटिशी ? शिवाय, सुनांना तरी आमच्यावर अंमल करण्यास मुळींच सांपडत नाहीं असें नाहीं.

त्यांच्या सुनांवर त्यांना अंमल गाजविण्यास सांपडून शिवाय वृद्धापकाळीं आमचें उसनेंही त्यांना आम्हांवर काढून घेतां येतें! आमची तरी प्रतिष्ठा कोठपर्यंत? ते असतील तोंपर्यंत! सृष्टीच्या राहटीप्रमाणें आम्हांपैकीं बहुतेकांना वृद्धापकाळ वैधव्यांत घालवावा लागतो! तें आलें म्हणजे आमच्या हातांत मुळींच सत्ता रहात नाहीं! आम्हांस मग सुनांच्याच नादानें वागावें लागतें! या स्थितींत आमची दुपारची चूल कधींही सुटायाची नाहीं! धू अंग कीं शरि चुलींत! मुलाबाळांचें आटोपून सूनबाईंना केरपाट करायला व तूप वाढायला फावलें तर आमचें मोठें भाग्य! नाहीं तर तेंही आम्हांलाच करावें लागतें! दूधदुभतें, झाडसारवण, धुणेंसवरणें, सांडलेंलोटलें, आलागेला, कामाचा सारा धबडगा तेवढा आमच्याकडे! सूनबाईंचें कधीं बाळंतपण, कधीं दुखणेंबाणें, कधीं मूल लहान! त्यांना म्हणून कामाला हात लावायाला फावायाचें नाहीं! बरें, म्हटलें आल्यागेल्याचा बेत नीट ठेवीन, तर सारें सूनबाईंच्या कुलपांत! रवा कुलपांत, मसाला कुलपांत, साखर कुलपांत! चांगली भाजी सुद्धां कुलपांत! कां आम्ही टवळ्या सास्वा कुणाला नेऊन देतों, कीं स्वतः खातों, का मुलींचीं घरें भरतों, कीं करतों तरी काय? पण नाहीं! आमच्या सूनबाई कुलपाची किल्ली एक क्षणभरसुद्धां आमच्यावर विसंबायच्या नाहींत; तिची आणि त्यांच्या गळ्याची दिवसभर गांठ! देवापुढें मुठभर तांदूळ ठेवीन म्हटलें, कीं एकाद्या पुराणिकाला कांहीं देईन म्हटलें, कीं कोणाला जेवायाला बोलावीन म्हटलें, तर अगोदर सूनबाईंची पायधरणी करावी तेव्हां काय तें! दानधर्माला तर उचलून पैसा कधीं मिळायचाच नाहीं, पण फुटक्या कपाळामुळें बायकांच्या नशिबीं येऊं नये तें आमच्यावर येऊन गुदरलें असतां, महिना दोन महिन्यांनीं चार पैसे लागायाचे, ते सुद्धां तोंड वेंगाडल्याशिवाय मिळण्याची मारामार! आमच्यासारखीं पोटावारी काम करणारीं पोतेंरीं पुढें त्यांना जड वाटूं लागतात! घरांत बाई ठेविली तर तिला नाहीं का पोटाला घालून वर आणखी तीन चार रुपये द्यावे लागत! ठेवलेल्या बाया आमच्याप्रमाणें मुलाबाळांस व प्रपंचास जपतील काय? पण सासू म्हटली कीं कपाळाला तिडीक! लहानपणीं कोठें दहापांच वर्षें जाच केला असेल, तेवढ्याबद्दल सुनांनीं आम्हांला म्हातारपणीं इतकें का छळायाला पाहिजे? जन्मास आल्यासारखें मनुष्याला थोडाबहुत अधिकार मिरवायाला पाहिजे, त्याशिवाय कांहीं मजा नाहीं, हें आम्ही कबूल करतों! पण तो आमच्यावरच कशाला मिरवायला पाहिजे? तो त्यांनीं आपल्या सुनांवर मिरविला

तर नाहीं का पुरे होणार ! पण हें अलीकडच्या मुलींना समजतें आहे कोठें! आम्हीं नाहीं आपल्या सासूबाईंना म्हातारपणीं असें छळिलें ! ' मुलींच्या आया कदाचित् असेंही म्हणतील कीं ' ज्या अर्थी आम्ही आपल्या मुली दुसऱ्या बायकांच्या सुना व्हाऊं देतों, व त्या त्यांना कशाही वागवीत असल्या तरी त्यांच्याशीं किंवा जावयाशीं भांडायाला आम्ही जात नाहीं, त्याप्रमाणें ज्यांच्या मुली आमच्या हाताखालीं आल्या आहेत त्यांनीं आम्हीं त्यांस कसेंही वागविलें तरी, आम्हांस किंवा आमच्या मुलांस दोष देऊं नये ! जगांत काय जिकडे तिकडे देवाण घेवाण आहे ! कोणाचें कोणाकडे उसनें रहात नाहीं, व कोणी कोणास फुकट उसनें देत नाहीं ! मग त्याचा येवढा बभ्रा कशाला करायाला पाहिजे ! ' हा किंवा असल्या प्रकारचा इतर कोटिक्रम पुष्कळ सास्वांस व त्यांच्या पक्षपात्यांस त्यांच्या पक्षाकडून मोठा सबळ पुरावा आहे असें वाटेल; पण या नोटिशीच्या द्वारें त्यांस असें स्पष्टपणें कळविण्यांत येत आहे कीं, तो त्यांचा मिथ्या भ्रम होय ! पाश्चिमात्य ज्ञानरवीनें ध्वस्ताज्ञानतिमिर अशा आमच्या आधुनिक तरुणांस, तरुणींस, व न्यायकर्त्यांस वरील प्रकारच्या वाचालतेंत कांहीं एक अर्थ दिसत नाहीं ! सासरे व सास्वा ह्या सुलतान व सुलतानासारख्या असून त्या आपल्या सुनांना गुलामासारख्या वागवितात अशी त्यांची पक्की खातरी झाली आहे ! व ज्या इंग्रजांनीं गुलामांचा व्यापार बंद केल्याचें श्रेय आपल्याकडे घेतलें त्यांच्याच राज्याखालीं त्या असल्यानें पूर्वीच्या सास्वांचा जुलम त्या फार वर्षें सहन करतील असें दिसत नाहीं ! झारसासूबाईंचा जाच जसा एकद रशियन लोकांनीं झुगारून दिला, त्याप्रमाणें भारतीय गृहदास्यांतून मुक्तता करून घेण्याचा त्यांचा निग्रह झाला आहे ! व या सत्कामीं गंगाभागिर्थी पंडिताबाईंसारख्या विदुषींनीं, व ' लंडन आणि मुंबई टाइम्स ' सारख्या पत्रांनीं बारिष्टरीचें ब्रीफ किंवा वकीलपत्र घेतलें आहे ! स्वजातीविषयीं अत्यंत सानुकंप अशा बादशाही राणीचा अंमल आहे, व लेडी डफरिणीसारख्या अत्यंत चतुर आंग्ल स्त्रिया तिचें प्रतिनिधित्व पत्यनुरोधानें या देशांत करीत आहेत ! लार्ड रिपन यांनीं पुरुषांस ठिकठिकाणीं स्थानिकस्वराज्य देऊन टाकलें आहे; लार्ड डफरिन यांच्या कारकीर्दीत हिंदुगृहांत सुनांस पूर्ण स्वराज्य देण्याचें बिल लवकरच निघणार आहे ! तें बिल पास होण्यापूर्वी त्याचेबद्दल चांगली चर्चा व्हावी म्हणून आजच्या सामाजिक ग्याझेटांत तें आज छापिलें आहे. ज्यांच्या त्याला हरकती असतील त्यांनीं सरकारास त्या लवकर कळवाव्या. हें बिल कांहीं अडचणीमुळें बेंगाल टेनन्सी बिलाप्रमाणें

या कारकीर्दीत जरी पास झालें नाहीं तरी लवकरच पास करण्याचा समाजाचा निश्चय झाला आहे! तरी जमीनदाराप्रमाणें ज्या सास्वांना आपल्या कुळांविरुद्ध कांहीं कळवायाचें असेल त्यांनीं सभा भरवून आपल्या तक्रारींचें सविस्तर मेमोरिअल सरकारकडे त्वरित रवाना करावें! या नोटिशीपासून महाराष्ट्रांतील व विशेषतः पुण्यांतील लोकांना विशेष भ्यावयाला पाहिजे असें नाहीं. कारण रीतिप्रमाणें हें बिल जरी अद्यापि पसार झालें नाहीं तरी याचा अंमल या शहरांत होऊं लागल्यास बरींच वर्षें होऊन गेलीं आहेत, व त्याचें ज्या सास्वांनीं, सासऱ्यांनीं व नवऱ्यांनीं उल्लंघन करून सुनांस नाहीं नाहीं त्या ठिकाणीं उलटें टांगून डागिलें होतें त्यांस येरवड्याचें पाणी वर्ष सहा महिने परळांत प्यावें लागलें आहे! जे सासरे असा जुलूम करूनही कायद्याच्या पंजांत सांपडले नाहींत त्यांनीं आपल्या शेजाऱ्यांस व आप्तांस दुवा द्यावा!

[वर्ष ५, अंक ४९.]

वर्तमानपत्रें

वर्तमानपत्रांचा प्रघात पडल्यास आज वीस पंचवीस वर्षें जरी होऊन गेलीं, व गेल्या दहा पंधरा वर्षांत तर त्यांच्यांत जरी पुष्कळ सुधारणा झाली, तरी अद्याप वर्तमानपत्रकर्त्यांस आपणांवरची जबाबदारी पुरतेपणीं कळूं लागली आहे, किंवा लोकसुधारणेस आपल्या परिश्रमांनीं केवढें सहाय्य होणारें आहे याविषयीं त्यांचा पक्का समज झाला आहे, असें सामान्यतः पाहतां आढळणार नाहीं. दोन चार नामांकित वर्तमानपत्रांखेरीज बाकीच्यांची जर स्थिति पाहिली, तर वर्तमानपत्र म्हणजे जागोजागच्या बातम्या प्रसिद्ध करण्याचें साधन—याच्या पलीकडे वरील शब्दाचा अर्थ पत्रकर्त्यांच्या मनांत कधींही येत असेलसें वाटत नाहीं. अलीकडे तर लहानसान गांवांतून सुद्धां वर्तमानपत्रें निघूं लागलीं आहेत. छापखाना घालणें व पत्र काढणें हा एक व्यापारच बनल्यानें ज्यास विद्येचा विशेष संस्कार नाहीं, अशा मंडळीच्या हातींच वरील दोन अमोलिक साधनें पडलेलीं बहुधा आढळतात. आतां येवढें खरें आहे कीं, कोणत्याही तऱ्हेनें कां होईना वरील दोन साधनांची वृद्धिही एकंदर देशास श्रेयस्करच आहे. निदान पक्षीं लोकांस वाचण्याचा प्रघात तरी होण्यास वरील साधनांचा उपयोग आहे. पण याच उद्योगांत वरच्यापेक्षां चांगली मंडळी पडली असतां लोककल्याणाचा मार्ग ज्यास्त खुला होणार आहे हें उघड आहे.

वर्तमानपत्रांचा मुख्यतः दोन प्रकारांनीं मोठा उपयोग आहे. एक हा कीं, त्यांनीं आपलें काम निःपक्षपातानें व निर्भीडपणानें बजावलें असतां सरकारी अधिकाऱ्यांवर मोठा दबदबा राहतो. रस्तोरस्तीं रात्रीं दिवे लागलेले असल्यानें व पोलिसांची गस्त सारखी फिरत असल्यानें जो उपयोग होत असतो, तोच ज्या त्यां जागीं वर्तमानपत्रकर्त्यांची लेखणी सदोदित चालू असल्यानें होत असतो. सरकारी अधिकाऱ्यांनीं आपापलीं कामें चोख रीतीनें चालविलीं असतां त्यांत प्रजेचें किती कल्याण असतें हें कोणास सांगावयास नको च. पण वरील चोखपणा राहण्यास त्यांचा सर्व कारभार जेव्हां लोकांच्या नजरेसमोर वरचेवर येत जाईल तेव्हां राहणार. सर्व गोष्टी सर्वांच्या समक्ष होत असल्या म्हणजे

अर्थातच लांचलुचपत वगैरे जे अन्यायाचे प्रकार एरव्हीं होण्याचा संभव असतो तो पुष्कळ अंशीं नाहींसा होतो. जुन्या एतद्देशीय संस्थानांतून वरील प्रकार किती चालत असे, व अद्याप किती चालतो, हें क्षणभर लक्षांत आणलें असतां पत्रकर्त्यांची गस्त लोकांस किती हितावह आहे हें कोणाच्याही लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. विलायतेंत खुद्द महाराणीसाहेबांपासून व मुख्य प्रधानांपासून तो अगदीं छोट्या सरकारी कामगारापर्यंत सर्वांच्या कारभाराकडे लोकांची नजर वर्तमानपत्रांच्या द्वारें सारखी लागून राहिलेली असते; त्यामुळें कोणताही अन्याय प्रायः छपला जात नाहीं, व यामुळें तेथील लोक युरोपांतील इतर राष्ट्रांहून सुखी आहेत ही गोष्ट सर्वप्रसिद्धच आहे.

वर्तमानपत्रांचा मोठा उपयोग लोकस्थितीच्या संबंधानें आहे. तिची सुधारणा होण्यास वर्तमानपत्रासारखें दुसरें साधन नाहीं. कोणकोणत्या गोष्टी लोकांस हितकारक आहेत व कोणकोणत्या अहितकारक आहेत, जुन्या चाली टाकून देण्यासारख्या कोणत्या आहेत व नव्या घेण्यासारख्या कोणत्या आहेत, वगैरे गोष्टींचा वर्तमानपत्रांच्या द्वारें उहापोह चालला असतां किती फायदा होणार आहे! पण या गोष्टीकडे आजपर्यंत हवें तसें लक्ष कोणीच दिलें नाहीं म्हटलें असतां चालेल. विलायतचीं कारस्थानें कुटण्याखालीं व नवे धर्म तयार करण्याच्या खटपटीखालचिं आजपर्यंत मंडळी बेजार झाली. लोकांचे वास्तविक हक्क काय आहेत, ते संपादन करण्यास काय काय केलें पाहिजे, लोकांचा चरितार्थ चालण्यास पुढें मार्ग कोणता, आजपर्यंत लोक-कल्याणार्थ उभारलेल्या कामांची काय वाट झाली, व ती कशानें झाली, लोकांत कोणकोणते गुण येणें अवश्य होय, ते कसे यावेत, वगैरे विषयांवर लिहूं गेलें असतां मोठमोठे ग्रंथ सुद्धां होतील. पण आजपर्यंतची आमच्या पुढारी मंडळीची प्रवृत्ति पाहिली तर कांहीं निराळ्याच तऱ्हेची. पार्लमेंट सभेंत एतद्देशीयांचा रिघाव होण्याची तजवीज करणें, सर्व धर्मांचें सार काढून नव धर्म बनविणें, ज्ञातिभेदाचा एका तडाक्यासरसा विध्वंस करून टाकणें, विलायतच्या व्यापाराशीं टक्कर मारणें, शेर अस्वलीकडे जाऊन त्यास नीतिशास्त्राचा उपदेश करणें, असल्या अकटोविकट कृत्यांत पडल्यामुळें आजपर्यंत आमचा पुष्कळ अमोलिक वेळ व्यर्थ गेला, तर वरील चुकींची दुरुस्ती करण्याचाही आमचा विचार आहे.

वर्तमानपत्रकर्त्यांनीं आजपर्यंत बहुधा मुळींच वगळलेला तिसरा मोठा विषय म्हटला म्हणजे विद्याखातें व देशभाषेंतील ग्रंथ हा होय. विद्याखात्याची स्थिति

दिवसेंदिवस किती विलक्षण होत चालली आहे हें बहुधा सर्वांना माहीत आहेच व प्रस्तुतचे अधिकारी कामावर आल्यापासून तर या खात्याची किती खराबी झाली आहे हेंही कोणास सांगायाला पाहिजे असें नाहीं. पण ही मोठी चमत्काराची गोष्ट आहे कीं, लोकशिक्षण हा विषय देशस्थितीच्या संबंधानें पाहतां येवढ्या महत्त्वाचा असतां, व विद्याखात्याकडे देशांतील उत्पन्नाची येवढी मोठी रक्कम दरवर्षी खर्चीं पडत असतां, तिचा विनियोग कसा काय होत असतो या गोष्टीकडे कोणी फारसें लक्षही देत नाहीं. जें आंधळें गारुड आज कित्येक वर्षें चाललें आहे तेंच पुढेंहि चालू आहे. पहिली लोकास्थिति आज बिलकुल राहिली नाहीं. गेल्या दहा वीस वर्षांत विद्येचा प्रसार इकडे पुष्कळ झाल्यानें लोकांच्या समजुती आज पुष्कळ बदलल्या आहेत. पण लिहिण्यास अत्यंत खेद होतो कीं, लोकशिक्षणाची जी पद्धति एकदां कधीं काळीं घालून ठेवलेली आहे, व ग्रंथकारांचीही स्थिति गेल्या वीस वर्षांपूर्वी जी होती तीच अद्याप कायम आहे. आम्ही मोठे झालों तरी आमचें जुनें आंगडेंटोपडें आम्हांस अद्याप सुटत नाहीं. असो; तर या दोन विषयांच्या संबंधानेंही आमच्या केसरीची गर्जना वरचेवर होत जाईल.

[वर्ष १, अंक १]

शेक्सपिअर, भवभूति, कालिदास



प्रथम ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, शेक्सपिअर, कालिदास आणि भवभूति यांची तुलना आम्ही जी करीत आहों, ती त्यांच्या उपलब्ध ग्रंथांवरून. कालिदासाची बुद्धि कदाचित् शेक्सपिअरच्या पेक्षांही विशाल असेल, पण त्यानें लिहिलेल्या तीन नाटकांत तिचा प्रभाव जितका दृष्टीस पडत आहे, तेवढाच मात्र आमच्या कामाचा. कारण असें न मानिलें तर वाद कधींच संपावयाचा नाहीं. दरवर्षीं कोट्यावधि प्राणी जन्मास येताहेत, व मरण पावताहेत; यांच्यांत कित्येक कालिदास आणि शेक्सपिअर होऊन जात असतील, पण ते आम्हांस काय होत! एखाद्याच्या गुणांची पारख त्याच्या कृतींवरून करावयाची. पुनः कालिदास शेक्सापिअरच्या पूर्वी किती वर्षें होऊन गेला, तो, शेक्सपिअरच्या वेळेस असता तर त्यानें त्यास हटविलेंच असतें, वगैरे सांकेतिक "जरतरां"चीही आम्हांस गरज नाहीं. या तिन्ही कवींचे आहेत तसे ग्रंथ घेऊन व त्यांचें चित्त देऊन मनन करून त्यांवर मत दिलें पाहिजे.

नाटकगुणांत कालिदासापेक्षां भवभूति श्रेष्ठ आणि भवभूतीपेक्षां शेक्सापिअर वरच, हें ठरविण्यास वास्तविक म्हटलें म्हणजे अगोदर उत्तम नाटक म्हणजे काय व त्याला कोणत्या गोष्टींची अवश्यकता आहे, हें सांगणें जरूर दिसतें. कारण दोनही पक्षांचें म्हणणें येथेंच भिन्न पडल्यास कधींच तंटा तुटण्याचा संभव नाहीं. असें जरी आहे तरी वर्तमानपत्रांत अशा वादग्रस्त विषयाचा यथास्थितपणें उहापोह करितां येत नाहीं, यास पहिलें कारण स्थलसंकोच; व दुसरें कारण बहुतेक वाचकांस या वादापासून आनंद न होण्याचा बळकट संभव. या वादाचें स्वरूप व मर्म कळण्यास इंग्रजी व संस्कृत या दोन भाषांची चांगली माहिती असून त्यांनीं वरील कवींचे ग्रंथ वाचलेले पाहिजेत; नाहीं तर असल्या लेखापासून कंटाळा मात्र यावयाचा. तथापि ज्याअर्थीं प्रश्न निघाला आहे, त्याअर्थीं त्या संबंधानें थोडें-बहुत लिहिल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं.

या जगांत नानातऱ्हेचे लोक आहेत. कोणी स्वार्थांसाठीं दुसऱ्याच्या माना कापितात. कोणी परोपकारासाठीं तनमनधन यांचा व्यय करण्यास निरंतर सिद्ध

असतात. कित्येक कामुक होऊन झुरत असतात. कित्येकांवर द्रव्याभिलाषार्चे मोठें प्राबल्य असतें. कोणाचा रागच फार अनिवार असतो. दुसऱ्यांचा घात, विपत्ति, दुःख–यांतच कोणाला संतोष वाटतो. कोणी अभिमानार्ची माहेरघरें असतात. अशा निरनिराळ्या स्वभावांच्या लोकांनीं भरलेली आपली पृथ्वी आहे. जो तो आपापले हेतु सिद्धीस नेण्याच्या कामांत गुंतलेला असतो. यामुळें कित्येकदां विलक्षण प्रसंग घडून येतात. ही बाह्य सृष्टि जशी बहुविध आहे, तशीच आमची अन्तःसृष्टि किंवा स्वभावसृष्टिही बहुविध आहे. या दोनही सृष्टींची यथास्थित माहिती करून घेऊन सांगितल्याप्रमाणें घडलेल्या एकाद्या प्रसंगाचें कवीनें आपण आड राहून केलेलें जें गद्यात्मक, पद्यात्मक, किंवा गद्यपद्यात्मक हुबेहुब वर्णन त्याला नाटक म्हणावयाचें. नाटकांत कवींची खरी करामत निरनिराळ्या प्रकृतींची हुबेहुब तसबीर काढण्यांत आहे. पुनः, या तसबिरींची सांगड लावण्यासही मोठें चातुर्य लागतें. हें बहुतकरून प्रासादिक असतें. हें ज्यास असेल तोच नांव घेण्यासारखा कवि होतो. येथेंप्रमाणें "नाटक" शब्दाची व्याख्या आम्हीं करितों; व या व्याख्येस जो कवि उतरेल त्यास आम्हीं चांगला कवि असें म्हणतों. ही व्याख्या ज्यांस सम्मत असेल त्यांना शेक्सपियरच्या बरोबरीचा कालिदास होतां, असें कधींही म्हणतां येणार नाहीं. नाटक हें खरोखर होणाऱ्या गोष्टींचें अनुकरण होय; आणि त्या जशा अनेकविध आहेत, त्याप्रमाणें नाटकांतील पात्रेंही अनेक स्वभावांचीं पाहिजेत. कालिदासानें अनेक प्रकृतींचें वर्णन केलेंच नाहीं. त्याची सारी ऐट शृंगार रसांत; कोठें कोठें करुणा रसाची झांक त्याच्या ग्रंथांत दृष्टीस पडते; पण तिच्यापुढें मागें शृंगाराचें लपेटणें असावयाचेंच! कालिदासाची कल्पनाशक्ति ही फार आकुंचित असावीसें वाटतें. मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय आणि शाकुंतला या तिन नाटकांत विचारवैचित्र्य कितीसें आहे! त्याप्रमाणेंच रघुवंश आणि कुमारसंभव यांत इतकें विचारसाम्य आहे कीं, यांपैकीं एक ग्रंथ वाचून दुसरा हातीं घेतला तर तो वाचण्याचा कंटाळा येतो. लिंहिण्याचीं साधनें, इतिहासाचा अभाव, अन्य राष्ट्रांशीं व्यवहार चालू नसणें वगैरे अनेक कारणांनीं कालिदासाची नाटकें शेक्सपिअरच्यापेक्षां कमी प्रतीचीं उतरलीं असावीं. पण कसें झालें तरी तीं तशीं आहेत हें कबूल केलेंच पाहिजे. भवभूतीचा तर थाटच निराळा! त्याचें शब्दगांभीर्य, त्याचें कल्पनागाढत्व, बाह्यसृष्टीचें जसेंच्या तसें चित्र काढण्याची त्याची शैली वगैरे गोष्टीत कालिदासाच्या नाटकांत साधल्या नाहींत.

शिवाय कालिदास शृंगाराचा आद्यगुरु असें जरी म्हणतात, तरी मालतीविषयीं माधवाचें जें विलक्षण प्रेम भवभूतीनें वर्णिलें आहे, त्यापुढें दुष्यन्ताच्या प्रेमाचें आम्हांस कांहींच वाटत नाहीं. भवभूतीनें "उत्तर रामचरितांत" करुणारसाचा जो पूर उत्पन्न केला आहे, यापुढें रघुवंशांतील अजाच्या शोकाचा ओघ बिलकूल टिकाव धरीत नाहीं. शृंगार आणि करुणा या दोन रसांत कालिदासावर ताण करून शिवाय कालिदासांत न सांपडणारेही अद्भुतभयानकादि रस भवभूतीनें फार उत्तम रीतीने साधले आहेत. दुसरा एक भवभूतींत विशेष गुण असा आहे कीं अर्थानुपंगानें त्याची शब्दरचना फिरते. इंग्रजी पोप कवीनें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, कवितेचा ध्वनि कवितेच्या अर्थांचा प्रतिध्वनि भासावा, म्हणजे अर्थाप्रमाणें भाषा चढत उतरत जावी. मालतीसाठीं वेडा होऊन गेलेला माधव किती कोमल, मधूर, आणि कर्णमनोहर शब्दांनीं आपले कामोद्गार व्यक्त करितो ! सीतेच्या विरहाने रामाची झालेली दुर्दशा व तिच्यासाठीं रामानें केलेला शोक हीं अवर्णनीय आणि अप्रतिम आहेत, असें आम्हांस वाटतें. आतां शेक्सपिअरच्या संबंधानें येथें आम्ही किती लिहिणार ! ज्या बहादरानें एक नाहीं, दोन नाहीं, छत्तीस नाटकें लिहिलीं, व त्यांत अनेक स्वभावांच्या पात्रांची योजना करून शृंगारवीरादि नवही रसांची जागोजाग रेलचेल करून दिली, व ज्याच्या कवितामृतपानानें सगळें युरोपखण्ड झुलत राहिलें आहे, त्या शेक्सपिअरची काय गोष्ट सांगावी ! शेक्सपिअरमध्यें दोष नाहींत असें नाहीं, व ते कोणी काढले नाहींत असेंही नाहीं. परंतु चंद्रावरील लक्ष्य जसें त्याच्या प्रकाशांत लपून जातें, त्याप्रमाणें शेक्सपिअरच्या गुणांपुढें त्याच्या दोषाचद्दल कांहींएक वाटेनासें होतें. "कालिदास हिंदुस्थानचा शेक्सापिअर" म्हणजे हिंदुस्थानच्या कवींपैकीं शेक्सपिअरशीं तुलना करण्याजोगा कालिदास होय. यावरून शेक्सपिअरचे सगळे गुण कालिदासांत आहेत असा अर्थ मुळींच निघत नाहीं.

[वर्ष १, अंक १०]

नाटकें करावीं कीं करूं नये ?

उत्सवप्रियाः खलु मनुष्याः ।—शाकुंतल ६ (सानुमती)

अलीकडे संगीत शाकुंतलाचे प्रयोग झाल्यापासून वर्तमानपत्रांतून एक माठा वाद माजला आहे. एक पक्ष वरील प्रयोगाच्याविरुद्ध आहे, व दुसरा त्यास अनुकूल आहे. हाच वाद यापूर्वीही अनेक वेळां उपस्थित झालेला असून पुढेंही तो अनेक प्रसंगीं होणारच आहे; यास्तव त्यांत तथ्य कितपतसें आहे याविषयीं उहापोह करणें उचित होय. आजपर्यंत यांत आम्ही मुद्दींच मिळालों नाहीं, तरी एके प्रसंगीं एका पत्रकारास उत्तर देतांना आपलें मत थोडक्यांत प्रदर्शित केलें होतें. हल्लीं तें आमच्या वाचकांस सामग्र्यानें सादर करतों.

नाटकें करणें बरोबर आहे कीं नाहीं ! हा जर आम्हांस कोणीं प्रश्न केला, तर त्यावर आमचें असें उत्तर आहे कीं अगदीं बरोबर आहे. तें कां ! तर त्यापासून लोकरंजन होतें म्हणून. लोकरंजनाचा जो जो मार्ग असेल तो तो अवश्य लोकांत प्रवृत्त झाला पाहिजे; इतकेंच कीं, त्यापासून शरीरास किंवा मनास साक्षात् किंवा परंपरेनें इजा मात्र होण्यासारखी नसावी. यास्तव अशा तऱ्हेचे करमणुकीचे जेवढे म्हणून प्रकार आहेत तेवढे सर्वांस अत्यंत ग्राह्य होत. मनुष्याच्या मनाचा असा धर्म आहे कीं, त्यास नेहेमीं कांहीं ना कांहीं तरी व्यापार लागत असतो. त्यास स्तब्धता ही बिलकुल आवडत नाहीं. यास्तव लोकनियमनाचें काम ज्यांनीं पत्करलें आहे, व जे आपल्या राष्ट्रानें निरंतर सुमार्गांत चालावें असें इच्छितात, त्यांनीं अत्यंत उच्छृंखल जें मन त्याच्या नियमनाची अवश्य तजवीज केली पाहिजे. या गोष्टीकडे आमच्या पूर्वजांनीं फार लक्ष्य दिलें होतें असें त्यांनीं लावून दिलेल्या नित्यक्रमावरून दिसून येतें. 'भगवद्गीतें'त एके ठिकाणीं मनास समुद्रावरील जहाजाची उपमा घेतली आहे, व ती कोणीही क्षणभर विचार केला असतां त्यास यथार्थ वाटणारी आहे. जहाज हें जसें समुद्रावर सर्वथा वाऱ्याच्या स्वाधीन असतें त्याप्रमाणेंच मनुष्याच्या मनाला जसजशा प्रेरणा होतील तसतसें त्याच्या हातून आचरण होणार आहे.

पहा कीं, रिकामपण हें दुराचरणाचें मोठें सहायभूत, असा मनुष्यमात्राचा अनुभव आहे. सकाळपासून संध्याकाळपावेतों काबाडकष्ट करणारा मजूर याचें वर्तन, आणि चारी ठाव चमचमीत भोजन करून ज्यानें काळ घालवायाचा व ज्यास काडीचेंही काम नाहीं, अशा खुशालचंद्राचें वर्तन, यांत किती फरक असतो बरें! दुसऱ्या वर्गांतील मनुष्यावर व्यसनांचीं किती पुटें बसलेलीं असतात म्हणून सांगावीं ! ज्यास मुळीं कांहीं कामच नाहीं त्यानें वेळ घालवावा तरी कसा ! तेव्हां अर्थातच जेवढे म्हणून ढंग मनुष्यास करावेसे वाटतात तेवढ्यांच्या स्वाधीन वरील राजश्री होतात. सहा पेशव्यांच्या डोईवर राज्यकारभार होता तेव्हां त्यांस ऐषआरामास कोठून वेळ फावणार ! व फावला तरी तो किती ! तेच शेवटले राजचिंडे पहा ! त्यांच्या वडिलोपार्जित दोस्तांनीं राज्य निष्कंटक करून त्यांस गादीवर झोंप घेण्याचें काम तेवढें ठेवल्याबरोबर पुण्यपत्तन लागलीच कसें रंगलें ! पंत प्रधानांची स्वारी शुक्रवारच्या वाड्यांत सुग्रास भोजन करून वामकुक्षीला बुधवारच्या वाड्याकडे निघाली कीं पहिल्या प्रथम सलामी बावन खिडक्यांतून ! तेच त्यांचे वडील राघो भरारी* यांचें खोगीर दोन दिवस घोड्यावरून निघत नसे मग जेवणाची वार्ता कशाला ? पारशी लोकांच्या एका राजाची गोष्ट अशी इतिहासांत प्रसिद्ध आहे कीं, जो कोणी नवीन करमणूक काढील त्यास त्याच्याकडून बक्षीस मिळत असे; इतकी त्याच्या मनाची अस्वस्थता होती. सारांश, मन हें मोठें चंचल आहे; यास्तव पाऱ्यास जसें स्थिर करतात त्याप्रमाणें त्यासही स्थिर करणें अवश्य होय. तें जर चांगल्या करमणुकीकडे गुंतवून ठेवलें नाहीं तर अर्थातच तें हवें तिकडे बहकणार. जसें सुकाणूं सुटलें कीं, जहाज कोणत्या खडकावर जाऊन आपटेल याचा नेम नाहीं; किंवा एंजिन भडकलें कीं कोणीकडे माडी नेऊन उलथील याचा नेम नाहीं; त्याप्रमाणें स्वभावतःच जें ' उत्सवप्रिय ' मनुष्याचें मन तें सत्कवींच्या कृतींकडे वगैरे जर वेधलें नाहीं, तर किती छक्कडींत गुंगून जाईल याचा नेम लागायाचा नाहीं !

तेव्हां एकंदर सिद्ध काय करावयाचें कीं, नाटक हें चांगल्या प्रकारची करमणूक आहे; यास्तव तें जसजसें सुधारत जाईल तसतसा आमच्या लोकांचा त्यांत फाय-

---

* वरील नांव रघुनाथरावास पडलें होतें. त्याची दौड अशी होती कीं, एकेक दिवशीं पन्नास पन्नास साठ साठ कोस त्यानें निघून जावें ! त्यानेंच गिलच्यांस अटकेची पैलथडी दाखविली ! पण या सर्व गुणांचें पुढें मोतेरें झालें !

दाच आहे. ही सुधारणा आज वीसपंचवीस वर्षांतही थोडी झाली आहे असें नाहीं. पंचवीस वर्षांपूर्वी आमच्या लोकांस नाटकाचे प्रकार म्हटले म्हणजे काय ते दोन माहीत होते. एक तमाशा, दुसरें लळीत. हे दोन्ही प्रकार किती हलकटपणाचे, किती विचकट व किती गांवढळ आहेत हें कोणासही सांगावयास नको. स्त्रियांची गोष्ट तर राहोच. पण पुरुषांसही वरील दोहोंतले बीभत्स प्रकार पाहून पराकाष्ठेची शरम वाटल्यावांचून कधीं राहणार नाहीं. जो निवळ ग्राम्य त्याच्याच जाड्याभरड्या अभिरुचीस वरील नाट्य व त्यांतलीं भाषणें हीं काय आवडतील तीं आवडोत ! तर आम्ही असें म्हणतों कीं, हल्लींची अगदीं रासवट नाटककार कंपनी आणि दगडया परटाचा तमाशा किंवा सरव्या गोंद्याचें लळीत यांत कोणास कांहींच अंतर दिसत नाहीं काय ? आम्हांस तर ही मोठीच सुधारणा वाटते. त्यांतून अलीकडे तर कांहीं मंडळ्यांनीं बऱ्याच प्रकारची आणखीही सुधारणा केलेली आढळते. इचलकरंजीकरांचा ' भ्रांतिकृत चमत्कार ', आळतेकरांचा ' नारायणराव ' आणि ' झांशीची राणी ' यांचे फार्स [!], तसेंच आर्योद्धारकांचें ' आथेलो ' आणि ' मल्हारराव ' हे खेळ पाहून शरमिंदा होण्याची मोठ्या पदकवाल्या उपपदधारीसही पाळी येईल असें आम्हांस वाटत नाहीं !

तेव्हां राष्ट्राच्या करमणुकी सुधारणें ही जर चांगली गोष्ट असेल, तर नाटकांची प्रवृत्ति जी आज इतके दिवस पडली आहे व आणखी पडत चालली आहे तींत आमच्या बुद्धीनें कांहीं गैर दिसत नाहीं. उलटें असें म्हणायास सुद्धां आम्हांस बिलकूल धास्ती वाटत नाहीं, कीं आमची विद्वान् मंडळी या कामांत परिश्रम करून कालिदासादि संस्कृत कवि आणि शेक्सपियरप्रभृति पाश्चात्य कवि यांच्या कृतींचा साक्षात् किंवा भाषांतरद्वारा लोकांस जितका जितका अधिक परिचय करून देतील तितके तितके सर्वांच्या धन्यवादास ते आपणास अधिकाधिक पात्र करून घेतील. वर्तमानपत्रें, मासिकपुस्तकें, ग्रंथ, व्याख्यानें इत्यादिकांचा प्रसार जसा सर्वथा इष्ट आहे, त्याप्रमाणें नाटकांचीही गोष्ट आहे. मिल्टन कवीच्या कीर्तीस आडिसन यानें आपल्या निबंधांनीं जसें परम उज्वल केलें, त्याप्रमाणेंच जॉन्सनचा मित्र ग्यारिक यानें आपल्या अप्रतिम नाट्यानें साऱ्या इंग्लंडास शेक्सापिअर, शेक्सपियर बोलायला लावलें. प्राचीन काळच्या व अर्वाचीन काळच्या सुधारलेल्या साऱ्या राष्ट्रांतून नाटक हा संप्रदाय विद्वन्मान्य होऊन राहिलेला आहे. येवढा महापंडित सॉक्रेटीस, आणि त्यांतून विरक्त स्थितींत राहणारा; पण तो सुद्धां

स्याचा मित्र युरिपैडीज यानें रचलेल्या शोकरसप्रधान नाटकांचा प्रयोग पहाण्यास आदरपूर्वक जात असे. तेव्हां अभिरुचि ही विद्वत्तेस लांछनास्पद होय अशांतला कांहीं एक प्रकार नाहीं. वर सांगितलेला ग्यारिक यानें साऱ्या जन्मभर रंगभूमीवरच निर्वाह करून श्री व कीर्ति यांचा लाभ करून घेतला. त्यांतून ज्या आमच्या विद्वज्जनांस साहेबी बूट खाण्याची व आपल्या गौरकाय प्रभूंचा मिथ्या स्तव करून जिव्हा विटाळण्याची चिलकुल शरम नाहीं, त्यांस नाटकगृहांत जाण्याची, किंबहुना रंगभूमीवर येऊन आपल्या देशबंधूंस रंजविल्याची येवढी मोठी लाज ती कशाला वाटायाला पाहिजे हें आम्हांस समजत नाहीं ! !

येथवर प्रस्तुत विषयाच्या संबंधानें सामान्यतः निरूपण केलें. आतां हा वाद ज्यावरून उपस्थित झाला त्या संगीत शाकुंतलाच्या संबंधानें चार शब्द लिहूं.

ही नवीन ट्यून रा. किर्लोस्कर यांनीं गेल्या (१८८०) सालीं काढली. हे गृहस्थ रेविन्यू कमिशनराच्या ऑफिसांत नौकर आहेत; यास्तव तें ऑफिस बरसातीकरितां पुण्यास आलें असतां त्या चातुर्मास्यांत रंगदेवतेची उपासना करून पुण्यजनमनोरंजन वर्षांतून एकदां करावें हा त्यांनीं संकल्प केलेला आहे. यांस नाट्याचा व काव्यरचनेचा पहिल्यापासून नाद आहे म्हणून ऐकतों. 'शांकर दिग्विजय' या नांवाचें एक नाटकही त्यांनीं महाराष्ट्र भाषेंत निर्माण केलें आहे. तेव्हां या सर्व गोष्टींवरून 'संगीता'चे कर्ते रसिकांत मोडण्यासारखे आहेत हें उघड दिसतें. यास्तव स्वतःची हौस फेडून लोकांस हा चार घटका उत्तम रीतीची कर्मणूक करण्याचा संकल्प नाट्याचार्यानें केला हें सहजच आहे. आतां जो सरकारी नोकर आहे त्यानें नित्याची स्ववृत्ति आटपल्यावर घरीं जाऊन हात जोडून स्वस्थ बसावें, कांहीं इतर कामधंदा त्यास करतां कामा नये, हें अलीकडे जें बादशाही सूत्र निघालें आहे त्यास नाट्यकर्म हें कितपतसें विरुद्ध येईल हा विचार निराळा; पण एरव्हीं सामान्य समजुतीस अनुसरून पाहतां आम्हांस तर असें वाटतें कीं, राजकार्यांच्या व्यतिरिक्त वेळांत वरिष्ठाच्या घराचे उंबरठे पुजणें किंवा रिकाम्या चकाट्या पिटीत बसणें यापेक्षां रा. किर्लोस्करांनीं केलेला कालक्षेप फार उत्तम होय. ख्रिस्ती धर्मांत जशी आदितवारीं कोणतेंही काम करण्याची सक्त मनाई आहे, त्याप्रमाणेंच राजसेवानिरतांस नेहेमींचा प्रतिबंध आहे खरा; व यासंबंधानें कांहीं परोपकारी मंडळीनें कमिशनरसाहेबापर्यंत वरील भरतपुत्राचा बोभाटा नेल्याचेंहि

ऐकिवांत आहे; तरी एकंदर लोकांच्या तर्फे वरील नवी टूम काढल्याबद्दल रा. किर्लोस्करांचे आभार मानल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. इंग्लंडांत 'ऑपरा' या नांवाचा एक नाट्य प्रकार आहे, त्याचाच नमुना हा वरील गृहस्थानें इकडे सुरू केला असें म्हणायास हरकत नाहीं. त्याचा मासला आजपर्यंत एका पारशी खेळांत मात्र दृष्टीस पडत असे. पण त्याहून हल्लीं सुरू झालेलें संगीत किती उत्तम आहे हें दोन्ही चिजा ज्यानें पाहिल्या असतील त्यास सांगावयास नकोच. एक तर पारशी मंडळीचा एकच एक सूर कंटाळवाणा, तसें इकडे नाहीं; शिवाय त्यांच्या संविधानकांत व नाट्यांत व इकडच्या दोहोंत तर अतिशयच फरक ! तेव्हां संगीत शाकुंतलाची पहिली जी तारीफ करावयाची ती येवढ्याकरितां कीं हा निराळा प्रघात आमच्यांत सुरू झाला. गायन हें मनुष्यमात्रास किंबहुना पशुकोटींतील कित्येकांसही स्वभावतःच अत्यंत प्रिय आहे; यास्तव त्याच्याद्वारें मनोरंजनाची प्रवृत्ति पडणें हें किती इष्ट होय हें सांगावयाला नकोच; दुराचार व ग्राम्यता यांच्या मूर्ति ज्या वेश्या त्यांच्याखेरीज वरील चित्तरंजनाचा प्रकार जर उपलब्ध होऊं लागला तर ही थोडी सुधारणा नव्हे. यास्तव येथें आज कित्येक वर्षें एक गायनसमाज निघाला असून त्याच्याद्वारें ज्या प्रकारची नवी गोष्ट अमलांत येणार आहे, त्यासारखेंच संगीताचेंही पर्यवसान असल्यामुळें त्याचें आम्ही अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतों.

रा. किर्लोस्कर यांच्या संगीतांतला* दुसरा गुण म्हटला म्हणजे त्यांतील गायनप्रकार. शाकुंतल नाटकाचीं यापूर्वी चार पांच भाषांतरें झालीं आहेत; पण सर्व संगीतपर प्रयोग करायाचा असल्यामुळें तीं प्रस्तुत प्रयोगकारास अर्थातच विशेष उपयोगीं पडलीं नसावीं. बहुतेक सर्व भाग त्यास स्वतःच्या कृतीचेच बनवावे लागले असावे. हें सर्व करून नंतर आपापल्या कामांत प्रत्येक पात्रास निपुण करायाचें व ज्याच्या त्याच्याकडून यथास्थित अभिनय उठवावयाचा. हें काम अशिक्षित नटांकडून करावयाचें म्हटलें म्हणजे बरेंच मेहेनतीचें आहे हें उघड आहे. रा० किर्लोस्कर यांनीं दोन गवय्ये मुख्य पात्रांत घेतल्यामुळें त्यांच्या प्रयोगांस फार यश आलें. पूर्वी कोणत्याही नाटकावर लोकांच्या इतक्या उड्या पडल्या नाहींत; व नवीन चाली लोकांस अत्यंत प्रियकर होऊन सदरील नाटकाची एक हजाराची

* वरील निर्देश करण्याचें कारण स्पष्टच आहे. येथील संगीताची नक्कल लवकरच मुंबईस झाली तिजविषयीं येथें कांहीं लिहितां येत नाहीं.

प्रत सुद्धां उडून गेली. तर पात्रांच्या यथायोग्य निवडणुकीमुळें प्रस्तुत प्रयोग हा लोकांस फार मनोहर होऊन गेला.

तिसरा गुण नाटकाचा यथास्थित अभिनय हा होय. हा अभिनय सर्व पात्रांचा यथोचित होणें हें मोठें काठिण असतें. तरी प्रकृत प्रयोगांत केवळ दोष ठेवण्यासारखें एकही पात्र नसून कांहीं तर चांगलींच होतीं. दुष्यंत, शकुंतला, भरत, कण्व, शार्ङ्गरव या पात्रांचीं कामें खरोखर वर्णनीय होत. तीं पाहूनही जो तटस्थ राहिला असेल, व ज्यास कांहींच आनंद झाला नसेल, त्या प्रेक्षकांची धन्य म्हटल्यावांचून राहवत नाहीं. 'स वै मुक्तोऽथवा पशुः' हा चरण वरील बहादरास लागू करण्यास आम्हांस बिलकुल हरकत दिसत नाहीं! आतां हें खरें आहे, कीं रा. किर्लोस्कर यांनीं केलेलें भाषांतर छापील पुस्तकावरूनच जर वाचलें, तर कितपत गोड लागेल हें आमच्यानें सांगवत नाहीं; व कांहीं ठिकाणीं तर शब्दसौष्ठवांत जी त्यांची उणीव आहे ती ऐकल्याबरोबरही उमगण्यासारखी आहे तरी त्यांच्या तर्फेनें येवढें खास म्हणतां येईल, कीं मूळ महाकवीच्या कृतीवरून होणारा जो आल्हाद तो सदरील प्रयोगावरूनही बऱ्याच प्रकारें होतो, व साऱ्या जगास मोहून टाकणारी जी कविकुलगुरूची करामत तिचें चीजही वरील प्रयोगकारांनीं बरेंच केलें!

याप्रमाणें सदरील नाट्यप्रकाराच्या संबंधानें जें आम्हांस लिहावयाचें होतें तें आम्ही लिहून चुकलों. आतां सरते शेवटीं त्यावरून घेण्यासारखी एक मोठी गोष्ट आहे ती सांगून हें विवरण पुरें करतों. ती गोष्ट ही कीं, जो कोणी एकाद्या कार्याविषयीं समंजसतेनें दृढ प्रयत्न करील त्यास किती लवकर व केवढें यश येण्यासारखें असतें हें प्रस्तुत प्रयोगकाराच्या उदाहरणावरून चांगलें शिकतां येण्यासारखें आहे. आपला जिकडे कल आहे तिकडेच मनुष्यानें आपली बुद्धि खर्चली असतां व दृढ निश्चयानें तिचा पिच्छा पुरवला असतां ती साध्य होणार नाहीं असें बहुधा घडणार नाहीं. कांहीं अकल्पितच अनर्थापात झाला नर निराळी गोष्ट, पण सामान्यतः पाहतां बुद्धीचें प्रावीण्य व सतत प्रयत्न हीं एकत्र झालीं असतां कालेंकरून तरी सिद्धि ही अवश्य व्हावयाचीच. पण या दोन्ही गोष्टींचीच मुळीं आमच्या ठिकाणीं पंचाईत! आमच्या हातून होण्यासारखें असतें कार्य एक, आणि भलतेंच आम्ही घेतों हातीं, मग तडसि जावें कसें-! आणि त्यांतून त्याविषयीं प्रयत्न व्हावयाचा तोही कोता; नेटानें म्हणजे कांहीं दिवस

कांहीं चाललें आहे ही गोष्टच बोलावयाला नको. तर जे 'नाटकशत्रु' अरसिक तेनें किंवा मात्सर्यानें प्रेरित होत्साते संगीतास नांव ठेवतात, व रा. किर्लोस्कर यांनीं कमावलेल्या तोडयांच्या राशी म्हणजे वासुदेव बळवंताचा दरवडा असें समजतात, ते जर अंमळ शांतपणें व शोधपूर्वक विचार करतील तर वरील तत्त्व त्यांच्याही लक्षांत उतरेल असें आम्हांस वाटतें.

आतां 'संगीता'चे व सामान्यतः सर्व नाटकांचे प्रतिपक्षी आपल्या तर्फेनें जो कोटिक्रम पुढें आणीत असतात त्यांत तथ्यांश कितपतसा असतो तो पाहूं.

नाटकांचे प्रतिपक्षी म्हटले म्हणजे तीन प्रकारचे लोक होतः--एक धार्मिक, दुसरे अरसिक व तिसरे कृपण. धार्मिक म्हणजे परमार्थपरायण लोक. परमार्थ म्हणजे परलोकसाधनाच्या मार्गाचें अवलंबन व इंद्रियनिग्रह; तेव्हां अर्थातच लोकव्यवहारास व ऐंद्रिय दृष्टीस जो आपणास पराङ्मुख करणारा, व इहलोकीं आपणास चार दिवस वाटसराप्रमाणें काढणें आहेत ते कसे तरी काढले म्हणजे झालें इतकाच ज्याचा हिशोब, त्यास प्रत्यक्ष भरतऋषीनें इंद्रसभेपुढें रंभादि पात्रांकरवीं केलेला प्रयोगही तुच्छ होय हें उघड आहे. इंग्लंडांत कांहीं दिवस असल्या विरक्त मंडळींची राशियत झाली होती, तेव्हां अर्थातच पहिल्या प्रथम साऱ्या नाटकगृहांस कुलपें बसलीं! ग्रीक लोकांतला प्रख्यात तत्त्ववेत्ता प्लेटो यानेंही आपल्या मनःकल्पित 'प्रजासत्ताक राज्यां'तून नाटक्यांस व सोंगाडयांस हांकून लाविलें आहे. आमच्या देशांतील धार्मिक मंडळींचाही नटाचें मुखावलोकन करण्यावर केवढा कटाक्ष आहे हें सांगण्यास नकोच; तर ऐहिक मोहांत गुंतविणारे जे नाटकादि प्रकार ते धार्मिक मंडळींच्या दृष्टीनें निषिद्ध होत हा पहिला प्रतिपक्षिवर्ग झाला. दुसरा वर्ग अरसिकांचा. ही मंडळीही जगांत थोडी आहे असें नाहीं. यांस खावें, प्यावें, ल्यावें, आणि सुखांत पडलेलें असावें यांखेरीज दुसरें कांहीं दिसत नाहीं. मोठा उत्तम वनाचा देखावा असूं द्या, मोठी उत्कृष्ट कादंबरी कोणी वाचीत असो, किंवा कोणच्याही प्रकारची मोठी मौजेची एकादी गोष्ट असो;--वरच्या मट्ठ मंडळीस कसची ही मजा म्हणा किंवा चमत्कार म्हणा, कसें तें बिलकूल भासायाचेंही नाहीं. असल्या खबरदार गडयांस अनुलक्षूनच एका संस्कृत कवीनें ब्रह्मदेवापाशीं प्रार्थना केली आहेः—

इतरपापफलानि यथेच्छया वितर तानि सहे चतुरानन ।
अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरसि मा लिख मा लिख मा लिख ॥

" हे चतुरानना ! माझ्या पातकांचद्दल मला आणखी काय पाहिजे तितकीं शासनें कर; पण बाबा, अरसिकाला कवित्व सांगत बसण्याची कटकट मात्र माझ्या कपाळीं नको नको नकोच लिहूं ! "

राहिला साहिला तिसरा वर्ग कृपण मंडळी. यांचें मुळीं व्रतच, कीं या लोकचा परमसखा म्हणजे काय तो पैसा; यास्तव त्याच्या यत्किंचित् अंशाचा जरी वियोग झाला तरी तो त्यांस प्राणहानीहूनही दुःसह ! तेव्हां रुपया किंवा आठ आणे गमावून नुसता तमाशा डोळ्यांनीं पहावयाचा या परतें त्यांच्या दृष्टीनें कोणतें मूर्खत्व असणार ? पण हें स्पष्टपणें बोलून कोणीं दाखवावें ? तेव्हां अर्थातच 'इसापनीतीं' तील आंबट द्राक्ष्या कोल्ह्याप्रमाणें कांहीं तरी खुसपटें काढीत बसायाचीं. नाटकांत फायदा काय आहे ? नाटकांनीं लोकनीति बिघडते; नाटकवाले म्हणजे दरवडेखोर होत; नाटकी लोक म्हणजे काय हलकट; इत्यादि. असो, तर आतां प्रतिपक्षी प्रस्तुत प्रघातावर काय काय दूषणें आणतात तीं पाहूं.

नाटकवाल्यांवर सर्वांत पहिला मोठा ठपका म्हटला म्हणजे हा कीं, ते लोकांचा पैसा बुचाडतात. संगीतवाल्यावर तर हा एक मोठाच गहजब आहे. किर्लोस्कर आणि को. म्हणजे सरासरी वासुदेव बळवंत आणि को. हिच्याच तोडीची कंपनी ! वाः, केवढें जबरदस्त दूषण हें ! संगीतवाल्यांनीं लोकांच्या हातावर गुळखोबरें ठेवून त्यांचें पागोटें हिरावून घेतलें काय ? किंवा आमच्या कायदेकौंसिलांत चार दाढ्या एके ठिकाणीं मिळाल्या कीं लोकांपासून लक्षावधि रुपये लुंगावण्याचें हत्यार जसें ताबडतोब तयार होतें, तसा तर दुष्यंत महाराजानीं एकादा आक्ट झोंकून दिला नाहीं ना ! या विलक्षण आरोपावरून आम्हांस आथेल्लोवर आणलेल्या आरोपाची आठवण होते. त्याच्या श्वशुरांनीं जसें त्याजवर बालंट घेतलें, कीं या दुष्टानें माझी पोर भारून टाकिली आणि त्यामुळें ती याच्या नादीं भरली आहे; त्यासारखाच प्रस्तुत भरतपुत्रांवर हा कांहीं अरसिक किंवा मत्सरी मंडळीचा टोला आहे. यावर समर्पक उत्तर म्हटलें म्हणजे शेक्सपिअरच्या नायकानें राजदरबारापुढें जें दिलें तेंच होय. आमचें तर या प्रकरणीं असें ठरीव मत आहे कीं, उत्तम नाट्य ही मनोरंजनाच्या उत्तम पद्धतीपैकींच एक होय; ती अत्यंत निर्दोष असून तींस इतर कलांप्रमाणें लोकाश्रय अवश्य पाहिजे. निदान इतकें तरी खरें

कीं, ज्याप्रमाणें उत्तम पेढेबर्फी तयार करून ती बाजारांत विकण्याचा हलवायास हक्क आहे व असल्या हलवायाच्या दुकानीं गिऱ्हाईकांची दाटी झाली असतां त्यानें लोकांस टोपी घातली असें होत नाहीं, त्याप्रमाणेंच ज्याच्या अंगीं गाण्याचें किंवा अभिनयाचें कसब आहे त्यानेंही आपल्या गुणावर द्रव्यप्राप्ति करून घेतली तर त्यांत त्यानें कांहीं गैर केलें असें आम्हांस वाटत नाहीं. जर आमच्या शहाण्या, सद्धर्मी व दयाळू सरकारानें बाटलाबाईचा पुरस्कार करून तिच्या जिवावर आम्हांपासून प्रतिवर्षीं लाखों रुपये काढण्याचा सपाटा चालवला आहे, किंबहुना वेशवाटाचेंही आपणाकडे आधिपत्य घेऊन अखंड सुवासिनींच्या सौभाग्यास स्वदस्तूरचें सर्टिफिकिट देऊन माणुक जनांच्या प्रीत्यर्थ 'राजा प्रकृतिरंजनात्' या महाकविवचनास सार्थकता आणण्याचें पत्करलें आहे, तर बिचारे डोंगरे किंवा किर्लोस्कर यांनीं येवढें कोणतें महापातक केलें आहे ? संगीतवाल्यांच्या पदरीं व्यर्थ पैसा पडतो म्हणून जी लोकहितेच्छु मंडळी मनापासून हळहळते तिनें कलालांच्या दुकानीं जाणारा पैसा, अगर इंग्रेजी ब्यांडबाजांची जी नवी फासन ऐनबाजाच्या वेळीं पडत चालली आहे तिच्याकडे वेंचणारा पैसा, अथवा विलायती बुटवाले, विलायती चाहाकाफीवाले वगैरे मंडळीस जो आम्ही आश्रय देत आहों तो, असे हजारों प्रवाह बंद करण्याचे जर प्रयत्न केले तर फार बरें होईल असें आम्हांस वाटतें. त्यांतून असेंही समजा कीं नाटकशाळांच्या ओरडण्यानें संगीतें वगैरे चट सारीं बंद झालीं तर लोकांच्या खिशांत राहिलेला पैसा एखाद्या सत्कार्याला लागणार आहे असें घडेल काय ? तर अर्थसंचयाच्या दृष्टीनें जरी पाहिलें तरी संगीताची अभिवृद्धिच आम्ही इच्छितों. लोकांच्या कानींकपाळीं कोरड्या आरोळ्या आजपर्यंत कितीकांनीं मारल्या आहेत बरें ? व त्यांपासून निष्पन्न तरी काय झालें आहे ? शेकडों सभा व मंडळ्या निघतात, आणि तेरड्याचा रंग तीन या म्हणीला पुष्टीकरण मिळतें. आम्ही उद्योग आरंभतों आकाशाला कवळायाचा, आणि खजिन्यांत पुरवठा पहावा तों जितक्यास तितका ! जेथें तेथें दामाजीपंतावांचून गति नाहीं. मग अशा स्थितींत लोकांचें मनोरंजन व हित करून अर्थ जोडण्याचा जर एकादा उपाय निघाला तर तो किती श्रेयस्कर होय बरें ! पुण्यग्रामस्थ संगीतवाल्यांनीं यापूर्वीही एक दोन लौकिक कृत्यांस द्रव्यद्वारा मदत केल्याचें ऐकतों; तर हाच क्रम त्यांनीं पुढेंही चालवून आपलें व आपल्या आश्रयदात्यांचेंही कल्याण करून घेण्याच्या कामांत बिलकूल कसूर करूं नये अशी त्यांस सूचना करून तूर्त पुरें करतों.

नाटकांवर कांहीं मंडळीचा असाही एक मोठा आरोप आहे कीं त्यापासून लोकनीति बिघडते. आतां या आरोपांत कितपतसें तथ्य आहे याचा विचार करूं.

वस्तुतः पाहिलें असतां वरील आरोप एका अर्थीं खरा आहे व दुसरे अर्थीं खोटा आहे. दुसऱ्या चार्लस् राजाच्या कारकीर्दीत ड्रायडन् वगैरे जे बीभत्स नाटककार इंग्लंडांत होऊन गेले त्यांच्या कृति व त्या कृतींचे प्रयोग हे दुराचारास कितपत उत्तेजक झाले असतील याची कल्पना कोणासहि सहज करतां येणार आहे. त्याप्रमाणेंच जो मनुष्य नांचतमाशांच्या नादीं लागला त्याची नीति कितपत सुधारणार आहे हेंही सांगायाला नकोच. मनुष्याचा नैसर्गिक धर्म म्हटला म्हणजे अनुकरण करणें हा होय; मग जें आचरण त्यास प्रयोगद्वारां रंगभूमिवर मोठ्या थाटामाटानिशीं दाखविलें जातें त्याचा त्याच्या मनावर कितपत ठसा उठेल हें सांगणें नलगे. त्यांतून लहान वयांत मन हें कोंवळें असतें; त्यामुळें त्यावर जो प्रथमतः संस्कार होतो तो अत्यंत दृढ होऊन बहुधा चिरकाल राहतो. यास्तव जपण्याची मोठी वेळ म्हटलीं म्हणजे पूर्ववय हेंच होय. त्या वेळेस बुद्धीला जें वळण मिळेल तेंच पुढें बळावत जाऊन कायम होतें. तेव्हां या रीतीनें विचार करतां हें स्पष्ट आहे कीं, बीभत्स नाटकें व त्यांचे प्रयोग हीं दोन्हीं विशेषतः अल्प वयस्कांस सर्वथा वर्ज्य होत. यास्तव तीं जेवढीं टाळवतील तेवढीं टाळण्याविषयीं अवश्य प्रयत्न झाला पाहिजे. तेव्हां या अर्थानें पाहतां नाटकांवरचा आरोप यथार्थ होय.

पण सर्व नाटकें अशीं असतात असें कोणता नाटकशत्रु प्रतिपादन करूं शकेल बरें ? संस्कृतांतलीं अद्याप दहावसि नाटकें तगून राहिलेलीं आहेत; पण त्यांपैकीं एकही वरील दोषास पात्र होईल असें आम्हांस वाटत नाहीं. त्याप्रमाणेंच अलिकडचे नाटकवाले पुराणांतील कथांचे प्रयोग करून दाखवितात; पण त्यांतही वरील दूषणास कितीसें स्थळ मिळेल कोण जाणें ? महाराष्ट्रदेशीय रंगभूमीवर अलीकडे पाश्चात्त्यांचे महानाट्याचार्यही चमकूं लागले आहेत; पण त्यांचे प्रयोग पाहिल्यानेंही कोणाची दुराचाराकडे प्रवृत्ति दृढ होईल हा त्यांवरही खोटाच चार्ज होणार आहे, हें तज्ज्ञास सांगायास नकोच. मग एतद्देशीय नाटकांवर ही एवढी कोल्हेकुई काय म्हणून ! आतां हें खरें आहे कीं, नाटकवाल्याची स्थिति हल्लीं जी आमच्या देशांत आढळते ती प्रतिष्ठितपणाची नाहीं; जो जातीनें उनाड तोच

नाटकांत शिरून स्त्री, देव, राक्षस या पुठ्ठ्यांतून पार जातां जातां अगदीं कुचकामाचा होऊन बाहेर पडतो. त्याप्रमाणें प्रयोगप्रेक्षणार्थ जी मंडळी जमते तीहि म्हणजे रसिकतोप्रेरित होत्साती तेथें येते हाही सामान्यतः प्रकार थोडाच. ज्यांस कोठें तरी बाहेर रात्र करमायाची, ज्यास काम ना धंदा, अशांनींच तंबाखूच्या फक्या मारीत व खिदळत थेटरांत प्रवेश करावा, एक बूच उडाला कीं दुसरा उडावा किंवा ऑपरा ग्लास डोळ्यास लावून निर्लज्जपणाचा प्रकार करावा,—हींच पुष्कळ अंशीं स्थिति ! हें सर्व खरें आहे; पण यावरून नाटकप्रयोग करण्याची प्रवृत्तिच मुळीं वाईट असें ठरतें काय ! वरील तर्कशास्त्र लढवायाचें म्हटलें म्हणजे मोठा अनर्थ होणार आहे. आमच्यांत तालीमबाज मंडळी म्हटली म्हणजे अक्षरशून्य व दांडगेश्वर अशी आढळते, यावरून जर कोणी प्रतिगदाधर अशी कोटी करूं लागला कीं, तालीम करणें हें निंद्य होय तर चालेल काय ? त्याप्रमाणेंच इंग्रजी शिकल्याचे परिणामही आजपर्यंत मद्यप्रत्यादि अनेक प्रकारांनीं प्रगट झाले आहेत, त्याबरूनही वरील कार्यकारणभाव जुळणें यथान्याय होईल काय ? वरील जन्यजनकभाव आजमित्तिलाही पुष्कळांच्या मनांत वागत असून तालीमबाजी दांडगाईपेक्षां प्रतिष्ठितपणाची लुंगेशाई व इंग्रजी छचोरीपेक्षां अज्ञानावस्थेंतला साळसूदपणा पतकरणारी मंडळी आमच्या देशांत थोडी निघेल असें नाहीं. पण हा सारा स्थूल अनुमानाचा व अतात्त्विक दृष्टीचा प्रकार ! जोडी पेलण्यांत व दांडगेपणांत कांहीं नित्यसंबंध आहे काय ? ए. बी. सी. प्रभृति पाश्चात्य मातृका आणि बाटलाबाई या परस्पर बहिणी बहिणी लागतात काय ? मग तत्त्वदृष्टि रंगभूमीकडे फेंकली असतां कोणाच्याही सहज लक्ष्यांत येईल कीं, भरताचार्यप्रणीत कलेचा आणि नीतिमत्तेचा कांहीं उभा दावा आहे अशांतला प्रकार नाहीं. नाट्य व अनीति यांचें जरी क्वचित् साहचर्य आढळलें, तरी तें केवळ आगंतुक होय. अग्नि व उष्णता यांचें जसें स्वभावसिद्ध सामानाधिकरण्य आहे तसा कांहीं वरचा प्रकार नाहीं. जेथें सामानाधिकरण्य केवळ आगंतुक आहे तेथें वैधिकरण्यही शक्य आहे हें सांगायाला नकोच.

तर वरील सर्व गोष्टी मनांत आणल्या असतां हें उघड दिसणारें आहे कीं, अलीकडे विद्वान् मंडळींचें नाट्यकर्मांकडे अधिकाधिक लक्ष लागत चाललें आहे ही गोष्ट शोचनीय नसतां अभिनंदनीयच होय. पूर्वोक्त वैधिकरण्य होण्यास म्हणजे रंगभूमि आणि अज्ञान व अनीति यांची सांगड जी लोकांच्या मनांत विनाकारण

पडली आहे तिची तोडातोड होण्यास, वरील लोकांचा जवनिकेंत प्रवेश होणें हेंच एक साधन होय. लोकशिक्षणाचें नाट्यकर्म हें केवढें जबरदस्त साधन आहे हें अद्याप आमच्या लोकांस कळूं लागलें नाहीं. शाळा, वर्तमानपत्रें, सभा वगैरे जशा एकेक जब्बर तर्फा आहेत, त्याप्रमाणेंच देशोन्नतीचें एक प्रचंड साधन वरील कला ही होय. आथेन्स् शहरांत नाटककारांचें इतकें प्राबल्य असें कीं मोठमोठे सरदारही त्यांस नमून असत. प्रत्यक्ष सॉक्रेटीस यांजवर आरिस्टॉफेनीज यानें प्रहसन रचून त्याच्या देशबांधवांची त्याजविषयींची पूज्यबुद्धि नष्ट करण्याचा यत्न केला, व त्या यत्नास कालांतरानें काय फळ आलें हें इतिहासज्ञांस विदित आहेच. हें नाटककारांच्या दुष्ट प्रभावाचें उदाहरण झालें. पण तेंच असें समजा कीं, हल्लीं जारीनें चालूं असणारें जें कोल्हापूर प्रकरण त्याचा कोणीं चतुर कवीनें रंगभूमीवर प्रयोग करविला, किंवा परवां लाखों माणसांची आहुति टेंपल-साहेबांनीं दामाजीशाही लढवून करून टाकली तिचें प्रयोगद्वारां जर लोकांस दर्शन करविलें, तर केवढें काम होणारें आहे बरें ! फार तर काय, पण वक्त्यां-सही नाट्याची आवश्यकता किती आहे हें जगांतील दोनतीन अप्रतिम वक्त्यांच्या उदाहरणांवरून ढळढळीत दिसतें. येवढा प्रचंड डिमॉस्थेनीस; पण त्यास कोणी एकानें एके समयीं विचारलें कीं, "महाराज, वक्त्याच्या अंगीं कोणता गुण प्रथमतः वसत असला पाहिजे ?" वरील महावक्त्यानें उत्तर दिलें, "नाट्य."– "बरें, दुसरा कोणता ?" "नाट्य."–"बरें, तिसरा ?" "नाट्य !" इंग्लंडां-तला प्रतिडिमॉस्थेनीस पिट्ट, उर्फ च्याथम, याच्याही भाषणांत बाह्य आविर्भाव किती असत, हें मेकॉलेनें सांगितलेंच आहे. तिसरी स्वारी शेरिडन्. हे तर बोलून चालून नाटकेच; वडिलांपासून तोच क्रम चालत आलेला ! जेव्हां वॉरन् हेस्टिंग्स् यास रामोशासारखा सभेपुढें उभा करून बर्क व फॉक्स् यांनीं आपापला ताशेरा त्याजवर झाडला आणि ते मोकळे झाले; तेव्हां पुढली पाळी आली वरील ऐर्लंडवासी वक्त्याची ! तेव्हां त्यानें भरतखंडाच्या माजी अधिपतींवर असा कांहीं तडाखा उडवून दिला कीं, विजापूरची जणूं काय मुलुखमैदानच ! सारे सभाजन असे क्षुब्ध होऊन गेले कीं, कोणास कांहीं सुचेना, व तावडतोब पार्लमेंट खल्लास करावें लागलें ! शेरिडन्नें बोलण्याचा भडिमार चालत असतां असा आविर्भाव आणला कीं, ऐन गर्दीत तो मूर्च्छित होऊन बर्कच्या आंगावर पडला, व बर्क यानें त्यास सांवरून धरलें. सर्व समारंभाचे व या शेवटल्या नाट्याचें मेकॉलेनें मनोवेधक वर्णन केलें आहे !

येथपर्यंत प्रस्तुत विषयाचे संबंधानें बराच उहापोह झाला. आतां चांगलीं नाटकें वाचल्यापासून व त्याचे प्रयोग पाहिल्यापासून काय काय फायदे आहेत तें सांगून हें प्रकरण आटपतों.

नाटक हें मानवी संसाराचें चित्र होय; म्हणजे जसा चित्रकार हा मनुष्याचा चेहेरा, वनप्रदेश वगैरे आपल्या कलमानें कागदावर किंवा कपड्यावर उतरून देतो, त्याप्रमाणेंच नाटककार हा मनुष्यावर येणाऱ्या नानाविध प्रसंगांचें व तज्जन्य विविध मनोवृत्तींचें यथावत् वर्णन करतो. यास्तव उत्तम नाटकाचें वाचन किंवा प्रेक्षण हें उत्कृष्ट तसबीर पाहण्याप्रमाणेंच अत्यंत आनंददायक होय. आतां तजबिरांतही चांगल्या वाईट हा जसा प्रकार आहे, त्याप्रमाणेंच नाटकांतही तो आहेच आहे. पण कोणीं चित्रकारानें बीभत्स तसबीर काढली म्हणून सारी चित्रकलाच जशी निंद्य होत नाहीं, त्याप्रमाणेंच नाटकांतही कांहीं कवींनीं दुराचार घुसडून दिला असल्यानें मुळीं नाटक वाचणें किंवा पहाणें हें निषिद्ध करणें बरोबर होणार नाहीं. या जगांत बहुतेक वस्तूंची अशीच स्थिति आहे, कीं सर्वथा निर्दोष असें कांहीं आढळणार नाहीं. गुण व दोष हे प्रायः सर्वत्र भिन्न भिन्न प्रमाणांनीं मिश्रितच आढळतात. तर शेक्सपिअरचीं वगैरे नाटकें वाचतांना ही गोष्ट चांगली ध्यानांत ठेविली पाहिजे. वरील महाकवींनें स्वतःच्या अभिरुचीनें म्हणा, अगर तत्कालीन लोकांच्या दांडग्या रुचीस अनुसरून म्हणा, आपल्या नाटकांत जागोजाग पुष्कळच पाचकळपणा आणलेला आहे. उदाहरणार्थ, आथेल्लो नाटकांतला पहिलाच प्रवेश पहा म्हणजे खात्री होईल; पण या बीभत्सत्वामुळें वाचकानें परावृत्त न होतां आपला मार्ग पुढें क्रमला पाहिजे; कां कीं असें तो न करील तर गुलाबाचे कांटे हाताला लागल्यानें फुलाचा वास घेण्यापासून जसें पराङ्मुख व्हावें, तसाच वरील प्रकार मुग्धत्वाचा होणार आहे. तर वरच्याप्रमाणें नीरक्षीरविवेचनरूप हंसव्रत जो पतकरील त्यास कोणत्याही नाटकांत बराच ग्राह्य अंश सांपडेल यांत संशय नाहीं. त्यांतून आमच्या शाकुंतलादि नाटकांची तर वरच्या प्रकारें कांहींच तरफदारी करायाला नको. आमच्या महाकवींच्या शाकुंतल, उत्तररामचरित, वेणीसंहार, इत्यादि कृति पाहून कोणी बिघडेल ही तर गोष्टच नको. वाचणारा किंवा पाहणारा निवळ धोंडा जर नसेल, तर त्यास वरील वाग्विलास मोहून टाकतील; व त्याची मनोवृत्तिही प्रसन्नतर झालेली त्यास आढळेल. भवभूतीनें आपल्या महानाटकांत म्हटलें आहेः—

अपि ग्रावा रोदित्यपि दलति वज्रस्य हृदयम् !

"प्रत्यक्ष पाषाणही रडूं लागतो व वज्राचेंही हृदय उकलतें!"—हाच प्रभाव आमच्या कविराजाचा कडेलोट जें शाकुंतल नाटक त्याचा आहे. येवढे मट्ठ व तत्त्वज्ञानजड थोरले मिल्ल बोवा, पण त्यांसही चवथ्या अंकांत हुंदका सांवरेना असें त्यांच्या इतिहासवाणीवरून स्पष्ट दिसतें. बाकी इतर पाश्चात्य पंडितजनांची तर गोष्टही बोलावयाला नको. येथील सुप्रीम कोर्टाचा जज्ज महाविद्वान् "सर वुइल्यन् जोन्स" यानें इ० सन १७८९ सालीं स्वतः संस्कृत शिकून शाकुंतलाचें इंग्रेजींत भाषांतर केलें मात्र, तों त्यानें साऱ्या युरोपांतले महापंडित हालवून सोडले! फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांतील रसिकवर्यांची दृष्टि आमच्या कविकुलगुरूच्या नायिकेनें दिपवून टाकली. आज टेम्स, ऱ्हाइन, मिसिसिपी वगैरे नद्यांच्या तीरीं वेदघोष जो चालू आहे, व साऱ्या जगभर संस्कृत विद्येची माहिती झाली आहे, या सर्वांस कारण म्हटलें म्हणजे शाकुंतलाचें पूर्वोक्त भाषांतर! तर म्लेंछांच्या मुलखांतून ज्या सरस्वतीचा येवढा प्रभाव गाजला तिचा मूळ जन्मभूमीचे ठिकाणीं मात्र ठणठणाट व्हावा हें शाकुंतलपुत्राचें अभिधान धारण करणाऱ्या भूमीस मोठें भूषणावह होणार आहे असें आम्हांस वाटत नाहीं!!

तर एतद्देशीय नाटकांच्या वाचनाचें किंवा प्रेक्षणाचें येवढें भय बाळगण्याची मुळींच जरूर नाहीं. त्यांपासून निदानपक्षीं मनोरंजन तरी होईल; आणि ज्यांच्या त्यांच्या रसिकतेच्या व ग्रहणशक्तीच्या मानानें त्याच्या हृदयवृत्ति व मनोवृत्ति उत्तम दशेला येऊन दृढतर होणार आहेत. तेव्हां हा फायदा का लहान आहे! आतां हें खरें आहे कीं, वरील फळ नाट्यकला जेव्हां उत्कृष्ट अवस्थेस येऊन पोहोंचेल तेव्हां विशेष होणार आहे. पण कोणतीही कला अशा स्थितीस येऊन पोहोंचण्यास किती प्रयत्न सारखे चालू असावे लागतात, व किती काळ लागत असतो, हें कोणालाही सांगायाला पाहिजे आहे असें नाहीं. सध्यां आमच्या देशांत वरील कला केवळ बाल्यावस्थेंत आहे; तीस परिपक्वता यावयाची म्हटली म्हणजे दीर्घ कालाची व विद्वत्परिश्रमाची अवश्यकता आहे हें उघडच आहे. तेव्हां या रीतीनें विचार करतां विद्याविशिष्ट मंडळीचें इकडे अधिकाधिक लक्ष लागण्याचीं जीं अलीकडे चिन्हें दिसूं लागलीं आहेत तीं दुश्चिन्हें नसून सुचिन्हेंच होत, असा आमचा मुकरर अभिप्राय आहे. एतद्देशीय लोकांत सद्भिरुचीचा प्रसार होण्यास, स्वतःच्या प्राचीन स्थितीचें ज्ञान होण्यास, आणि भाषांची

अभिवृद्धि होण्यास उत्तम नाटकांचे प्रयोग यांसारखें प्रबल साधन आम्हांस दुसरें दिसत नाहीं. यास्तव 'नाटकशत्रूं'चे जे प्रलाप पत्रोपत्रीं प्रगट होतात, ते केवळ अरसिकतेचे उद्गार समजावे.

प्रस्तुत विषय संपण्यापूर्वी प्रसंगोपात्त एक महत्त्वाची सूचना आमच्या देशबंधूंस केल्याशिवाय राहवत नाहीं. हिजाविषयीं यापूर्वीही क्वचित् उल्लेख केलेला आहेच. ती ही कीं, संस्कृत नाटकांपैकीं बहुतेकांचीं भांपातरें यापूर्वी केव्हांच होऊन छापून प्रसिद्ध झालीं आहेत. पण आमच्या दुर्दैवानें तीं हल्लीं लुप्तप्रायच झालेलीं आहेत 'शाकुंतल,' 'विक्रमोर्वशी,' 'मालविकाग्निमित्र,' 'महावीरचरित,' 'उत्तररामचरित,' 'मालतीमाधव,' 'मृच्छकटिक,' 'रत्नावली,' 'नागानंद,' 'प्रसन्नराघव,' हीं सर्व नाटकें एकवार छापून गेलीं आहेत खरीं, पण आतां त्यांपैकीं शोधांतींही कितीजणांपाशीं कितीक सांपडतील कोण जाणें! त्यांतून वरील भाषांतरांवर कै. कृष्णशास्त्री चिपळूकर, रा. ब. शंकर पांडुरंग, वे. शा. सं. कृष्णशास्त्री राजवाडे, गणेशशास्त्री लेले व माजी परशुरामपंत गोडबोले अशांसारख्या मंडळींचे परिश्रम झालेले असून एवढा सरस्वतीप्रवाह आजपर्यंत लुप्त होऊन बसला आहे ही केवढी खेद करण्यासारखी गोष्ट! आमच्यांत अलीकडे हें तत्त्वज्ञान माजून राहिलें आहे कीं काव्यें, नाटकें वगैरे केवळ मनोरंजकपर ग्रंथांची या देशास तूर्त जरूर नाहीं. तर जेणेंकरून घटकेंत या भरतखंडाची उन्नति होऊन तो प्रति इंग्लंड बनेल, तो उपाय योजावयाचा. याच धोरणावर आमच्या सुज्ञ व रसिक डायरेक्टर साहेबांनीं 'साएन्स सेरिज' म्हणजे भूगर्भशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिधर्मशास्त्र, वगैरे कपाटें शोभविणारे ग्रंथ तयार करविले आहेत, व आमच्या नाममात्रावशेष ग्रंथोत्तेजक मंडळीनें आपल्या छोटेखानी अमदानींत 'कृषिकर्म,' 'स्वाध्याय,' 'आश्वलायनसूत्र,' असले जाडे जाडे ग्रंथ पैदा करून तीं लोढणीं विचाऱ्या वर्गणीदारांच्या गळ्यांतून बांधलीं! इंग्लंडांत आडिसननें 'स्पेक्टेटरा 'सारखे मनोवेधकनिबंध न लिहितां मिल्टप्रमाणें 'तर्कशास्त्र' इत्यादि ग्रंथ निर्माण करून लोकांच्या डोक्यावर दिले असते तर किती मौज होती बरें! असो; तर सरतेशेवटीं येवढीच विज्ञापना करतों कीं वरील सूचनेचा आमच्या देशबंधूंनीं यथायोग्य विचार करावा. तो केला असतां ती अमलांत येण्यास म्हणजे मोठासा प्रयास पडणार आहे असें नाहीं.

[वर्ष १, अंक ४८।४९।५०।५१।५२.]

कवि, काव्य, काव्यरति.

अहोरात्र मोठमोठ्या राजकीय प्रकरणांनीं ज्यांचें मन व्यग्र केलें आहे, अवाढव्य व्यापारविस्ताराची व्यवस्था पहातां पहातां ज्यांना जेवणास सुद्धां पुरेशी फुरसत सांपडत नाहीं. शास्त्राभ्यासांत गढून गेल्यामुळें प्रपंचसुखाविषयीं ज्यांना वैराग्य उत्पन्न झालें आहे, अथवा प्रपंचाच्या काळजींत जे अगदीं चूर होऊन गेले आहेत अशांपैकीं प्रत्येकास केव्हां केव्हां सवडींत सवड करून घटकाभर एखादें नाटक किंवा काव्य हातांत घ्यावें, असें कां वाटतें ! आपल्या आयुष्याचीं पूर्ण पन्नास वर्षें ज्यानें इंग्लंडच्या राजकीय घडामोडींत घालविलीं, त्या ग्लाडस्टनाला अजूनही एखादे दिवशीं 'होमर' वाचण्याची इच्छा कां होते ! लढाईच्या सामानाबरोबर सफॉक्लीज वगैरेंचीं नाटकें आलेग्झांडर कां बाळगी ! तास दोन तास कथा श्रवण करण्यासाठीं शिवाजी आपला जीव वारंवार धोक्यांत कां घाली ! 'उत्तररामचरिता' च्या कर्त्याचें नांव संस्कृतज्ञ अद्यापि प्रेमानें कां स्मरतात ! किर्लोस्करकृत 'सौभद्रा' ला झुंडीच्या झुंडी कां लोटत ! 'नाटकें करावीं' असा अभिप्राय कै. विष्णुशास्त्र्यांनी कां दिला ! पाश्चिमात्य पाठशालांत, व इंग्रजांनीं या देशांत स्थापिलेल्या शाळांत प्राचीन व अर्वाचीन कवींचीं काव्यें विद्यार्थ्यांकडून वाचविण्याचा परिपाठ कां पडला आहे !

वरील प्रश्नांचें समाधान होण्यासारखें उत्तर ज्यास देतां येईल, त्यास काव्यरसांचें हृद्गत समजलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

कोणी असें म्हणतात कीं, काव्यांत जी पद्यरचना असते, ती कर्णमनोहर असते, म्हणून काव्यवाचनापासून मनुष्यास आनंद होतो. यावर कित्येकांचा असा आक्षेप आहे कीं, 'अमरा' सारख्या ग्रंथांत पद्यरचना असतांही, त्यास कोणी काव्य म्हणत नाहीं, तेव्हां पद्यरचनेंत काव्यात्मा नाहीं. कोणी असें म्हणतात कीं, काव्य हें मनुष्यस्वभावाचें आणि सृष्टीचें हुबेहुब चित्र आहे, म्हणून त्याचें वाचन मनुष्यास आल्हाद देतें. यावर कित्येकांचा असा आक्षेप आहे कीं, वैद्यकादि ग्रंथांत वनस्पत्यादिकांच्या गुणांचीं व धर्मांचीं जीं हुबेहुब वर्णनें आहेत, त्यांस कोणी काव्य म्हणत नाहीं, त्या अर्थीं मनुष्याच्या किंवा सृष्टीच्या यथार्थ वर्णनांत काव्यात्मा आहे, असें म्हणतां येत नाहीं. शिवाय काव्य हें मनु-

ह्याच्या स्वभावाचें यथार्थ वर्णन असेल, तर त्यांत पद्यरचना कधींच उपयोगाची नाहीं. कारण सुखदुःखादि कोणत्याही मनोविकारांचा कितीहि अतिरेक झाला तरी, तत्संबंधीं उद्गार वृत्तबद्ध निघत नाहीं; आणि काव्यांत तर गद्यापेक्षां पद्यरचनाच विशेष आढळते. तेव्हां काव्य हें आहे तरी काय ? कवींना इतकें मोठेपण येण्याचें कारण काय ? चांगल्या काव्यांच्या वाचनानें आनंद कां होतो ? हे प्रश्न पुन्हां निरुत्तर राहिल्यासारखे दिसतात.

आमच्या मतें जो कोणी क्षणभर अंतर्दृष्टि करून या प्रश्नांचा शांतपणें विचार करील, त्याला त्यांचें बरोबर उत्तर तेव्हांच देतां येईल. काव्यांत बहुशः पद्यरचना असते, तथापि कांहीं प्रकारच्या गद्यांतही काव्यगुण असतात; तसेंच 'काव्य' हें मनुष्याच्या स्वभावाचें आणि सृष्टीचें यथार्थ वर्णन आहे,—वगैरे 'काव्य' शब्दाच्या अर्थनिर्णायक प्रत्येक प्रयत्नांत थोडथोडें सत्य आहे. त्यांत समग्र सत्य नाहीं, म्हणून ते समाधानकारक होत नाहींत. त्यांत कांहीं तरी न्यूनता आहे असें वाटतें; पण ती कोठें आहे हें समजत नाहीं. काव्यवाचनापासून आनंद होतो, हें निर्विवाद आहे. तो ज्या कारणांनीं होतो, त्यांची मीमांसा मात्र संशयाकुल आहे.

काव्याचें खरें स्वरूप लक्षांत येण्यासाठीं मनुष्याच्या मनोधर्मांचा थोडासा विचार करणें जरूर आहे. जागृतावस्थेंत मन चंचल असतां, त्यांत जे व्यापार चालतात, त्यांचे 'संवेदना,' 'इच्छा,' व 'ज्ञान' असे तीन वर्ग करतां येतील. या तिन अनुभवांस 'मन' ही संज्ञा आहे. या तिहींपैकीं पहिल्याशीं काव्याचा विशेष संबंध आहे. संवेदना दोन प्रकारची आहे; प्रतिकूल व अनुकूल. प्रतिकूल संवेदनेस आपण दुःख म्हणतों; व अनुकूल संवेदनेस सुख म्हणतों. ज्यापासून प्रतिकूल संवेदना उत्पन्न होतात, तें आपणांस आवडत नाहीं; ज्याच्यापासून अनुकूल संवेदना होतात, तें आपणांस प्रिय होतें. कारण दुःखाचा कंटाळा आणि सुखाचा अभिलाष, या मनुष्याच्या मनाच्या स्वाभाविक वृत्ति आहेत. इतर सुखद वस्तूंप्रमाणें काव्यापासून आपणांस अनुकूल संवेदना होतात, म्हणून तें आपणांस आवडतें. ज्या लेखरचनेपासून वाचकांस ज्ञान करून देण्याचा हेतु असतो, तींत काव्य नसतें. जी रचना वाचकांच्या अंतःकरणांत अनुकूल संवेदना उत्पन्न करण्याकरितां केलेली असते, ती काव्य होय. वास्तविक पाहतां कोणतीही लेखरचना केवळ अनुकूल संवेदना उत्पन्न करण्यासाठीं,

किंवा केवळ ज्ञान करून देण्यासाठीं केलेली असत नाहीं. ज्ञान करून देण्यासाठीं लिहिलेलीं पुस्तकें मनोरंजक करण्याचा प्रयत्न केलेला असतो; मनोरंजक पुस्तकांत जातां जातां थोडेसें ज्ञान देण्याचा प्रयत्न असतो. मृदुता किंवा रमणीयता हा काव्याचा प्रधान गुण; काठिण्य किंवा कर्कशता हा शास्त्रीय ग्रंथांचा प्रधान गुण. शास्त्रीय ग्रंथांस थोडी मृदुता आणल्यानें त्यांचें अध्ययन कष्टावह होत नाहीं. काव्यांत कोठें काठिण्य येऊं दिलेलें असतें तें वाचकांस आनंदाबरोबर थोडें ज्ञानही करून देण्याच्या हेतूनें येऊं दिलेलें असतें.

पुढें जें सांगावयाचें आहे, त्यासंबंधानें गैरसमज होऊं नये म्हणून येथें इतकें स्पष्ट करणें जरूर आहे कीं, 'काव्य' शब्दांत आम्हीं नाटकादि सर्व सुखोत्पादक लेखांचा समावेश केला आहे, व 'कवि' शब्दांत असले लेख लिहिणाऱ्या नाटककारादि सर्व लोकांचा समावेश केला आहे. मनुष्यांच्या विचारांत, प्रत्यक्ष अनुभवांत, किंवा लेखांत–बाह्य सृष्टि किंवा अंतःसृष्टि याशिवाय दुसरा कोणता विषय असूं शकणें शक्य नाहीं. कारण, या दोन सृष्टि सांगितल्या म्हणजे कल्पनीय वस्तूंची परमावधि झाली. या दोन सृष्टींबाहेर आम्ही जाणार कोठें ! व विचार कशाचा करणार ! मनांतील अनंत व्यापार, यांपैकीं एक किंवा अनेक; हेच आमच्या सुखानुभवाचे आणि ज्ञानाचे विषय असले पाहिजेत. तसेंच ज्याप्रमाणें ज्ञान म्हणजे अंतर्बाह्य सृष्टींतील वस्तूंचा यथार्थ निर्णय, त्याप्रमाणें काव्यही अंतर्बाह्य सृष्टींतील वस्तूंचा यथार्थ निर्णयच आहे. ज्याप्रमाणें शास्त्रीय ग्रंथांत त्याप्रमाणें काव्यांतही वस्तूंचें हुबेहुबच वर्णन केलें पाहिजे. ज्याप्रमाणें शास्त्रीय ग्रंथांला, त्याप्रमाणेंच काव्यालाही याच गुणानें माहात्म्य, सारता, व महर्घता येते. ज्यांत सत्यनिरूपण नाहीं, तो शास्त्रीय ग्रंथ जसा कवडीच्या मोलाचा, त्याप्रमाणें ज्यांत सत्यनिरूपण नाहीं, असा काव्यग्रंथही कवडीच्या मोलाचा. दोघांचाही सत्यकथनावर, यथार्थ वर्णनावर, किंवा हुबेहुब चित्र काढण्यावर, सारा कटाक्ष आहे. भेद इतकाच आहे कीं शास्त्रीय ग्रंथांतील विषय व त्या संबंधानें सत्य सांगण्याची पद्धत, हीं काव्यांतील विषय आणि त्या संबंधानें सत्य सांगण्याची पद्धत, यांहून निराळीं असतात.

मनुष्यांच्या दुःखांचा परिहार व सुखांची वृद्धि करण्याचें सामर्थ्य ज्ञानाच्या अंगीं आहे, म्हणूनच मनुष्यें त्याच्या पाठीमागें लागलीं आहेत. तसें नसतें तर त्याचा नाद त्यांना कधींच न लागता. ज्ञान हें मनुष्याच्या सुखाचें प्रधान साधन आहे.

तथापि तें झाल्याबरोबर त्यापासून सर्वांस सुख होऊं लागेल असें नाहीं. सुखावह होण्यास त्यास अनुकूल संवेदनोत्पादक व्हावें लागतें. जोंपर्यंत त्याला हें नूतन स्वरूप आलें नाहीं, तोंपर्यंत तें काव्यविषय होऊं शकत नाहीं; कारण अनुकूल संवेदनोत्पादक असणें—हा काव्याचा प्रधान गुण आहे. आज ज्या कित्येक गोष्टींचें ज्ञान फक्त तत्त्ववेत्त्यांसच आनंद देत आहे, तें कालांतरानें सर्व जनांस आनंद-दायक होईल. परंतु तें तसें होऊं लागण्यापूर्वी बराच अवधि लोटला पाहिजे. तो लोटला कीं तें सुखोत्पादक होऊन कवीच्या मान्यांत सांपडणार! यावरून काय सिद्ध झालें कीं. आज ज्या गोष्टी शास्त्रीय ग्रंथांत कोंडून राहिल्या आहेत त्या, व तेथून पुढें ज्यांचा शोध शास्त्रवेत्ते करतील त्या, अवश्य काळ गेला म्हणजे काव्यविषय होऊं शकतील. आजपर्यंत असेंच होत आलें आहे. आंग्लभौम राजकवि लार्ड टेनिसन यांचें "प्रिन्सेस" नामक काव्य, (ज्याचें डा. कीर्तीकर यांनीं मराठींत भाषांतर करून तें "इंदिरा" या नांवानें प्रसिद्ध केलें आहे), या नियमाचें उदाहरण आहे; हा नियम खरा असेल तर 'ज्ञानप्रसार होऊं लागला म्हणजे कवित्वशक्तीस मांद्य येतें,' असा जो कित्येकांनीं साहसाचा अभिप्राय दिला आहे, तो खोटा ठरतो. इंग्लंडांतील प्रसिद्ध ग्रंथकार डाक्टर जॉनसन यानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं काव्य करण्याजोगे नामी नामी विषय जगांतील जुने कवि लाटून बसल्यामुळें, अर्वाचीन कवींस मनोरंजक काव्यें लिहिण्यासारखे विषयच राहिले नाहींत! शास्त्रप्रसार काव्यरचनेस घातक आहे, हें विलक्षण मत मेकालेनें कोठेंसें ठोकून दिलें आहे! काव्यास अलीकडे जें थोडेसें मांद्य आल्या-सारखें दिसतें, त्याचें कारण अर्वाचीन ज्ञानप्रसार नव्हे. तर अर्वाचीन ज्ञान-प्रसारामुळें काव्यवस्तु करण्याजोगे जे नवीन विषय उत्पन्न झाले आहेत, त्यांचा अर्वाचीन कवि काव्यरचनेंत उपयोग न करतां प्राचीन कवींच्या काव्य विषयां-वरच फिरून फिरून लिहितात. व त्यांच्या भाषेचें अनुकरण करतात, हें आहे. ज्यांनीं असें केलेलें नाहीं, त्यांचीं काव्यें वाचकांस प्रिय झालीं आहेत, व पुढें जे असें करणार नाहींत, त्यांचीं काव्यें वाचकांस प्रिय होतील, याबद्दल आम्हांस मुळींच संशय नाहीं. शिवाय, प्रत्येक शतकांत महातत्त्ववेत्ता निघणें जसें संभवत नाहीं, त्याप्रमाणें महाकवि निघणें हेंही संभवत नाहीं. जसा इंग्लंडांत आजपर्यंत एकच शेक्सपिअर होऊन गेला, त्याप्रमाणें बेकनही एकच होऊन गेला! हिंदु-

स्थानांतही अद्यापपावेतों भास्कराचार्यास किंवा कालिदासास प्रतिस्पर्धी भेटला नाहीं ! हाताचीं बोटेंच घालून महाकवींची संख्या मोजूं लागलों तर भरतखंडांत अनामिकेपुढें, व इतर देशांत तर करांगुलीपुढें, जातां येणार नाहीं, असें वाटतें !

वर जें सांगितलें आहे, त्यावरून शास्त्रीय ग्रंथाप्रमाणें काव्यांतही सत्यकथन असतें, हें वाचकांच्या ध्यानांत येईल, अशी आशा आहे. कवि जें सत्य सांगतो, तें शास्त्रीय सत्याप्रमाणें गूढ नसतें. शास्त्रीय सत्यांपैकीं कांहीं सत्यें इतकीं गूढ असतात कीं, तीं समजण्यास तपांच्या अध्ययनाची अवश्यकता असते. तसेंच शास्त्रांत कधीं कधीं विशेष कारणासाठीं अगदीं क्षुल्लक सत्यें सांगितलेलीं असतात. या दोन्हीहि सत्यांचा काव्यांत उपयोग होत नाहीं. "उष्णता, प्रकाश, व विद्युत्–हीं गतीचीं निरनिराळीं रूपें होत." हें सत्य काव्यविषय होण्यास आणखी शेंकडों वर्षें लोटलीं पाहिजेत. तसेंच, "बाभळीला काटे असतात," "मासे समुद्रांत राहतात," "पावट्याची उसळ फार खाल्ल्यानें अपचन होऊन वायु सरतो"–असलीं सत्यें ही काव्याच्या कामाचीं नाहींत ! काव्यांत जीं सत्यें गोंवायाचीं, त्यांची योग्य निवड करण्यास कवीस पराकाष्ठेचे श्रम पडतात. जीं समजण्यास मुळींच श्रम पडत नाहींत, अशीं उपयोगीं नाहींत; जीं समजण्यास फार श्रम पडतात, अशींही उपयोगी नाहींत. तीं या दोहोंच्या दरम्यान असून, अनुकूल संवेदनोत्पादक असलीं पाहिजेत. यावर कोणी अशी शंका घेतील कीं, काव्यांत वर्णिलेलीं सत्यें नेहमीं अनुकूल संवेदनोत्पादक असलीं पाहिजेत, हें मत खरें असेल, तर काव्यांत दुःखपर्यवसायी नाटकांचा, किंवा अवर्षणादि अरिष्टांच्या वर्णनांचा समावेश कधींच करतां येणार नाहीं. कारण दुःखपर्यवसायी नाटकें पाहिल्यानें व अरिष्टांचीं वर्णनें वाचल्यानें मनास आनंद न होतां उलट दुःख होतें. कांहीं अंशीं शंका बरोबर आहे; पण थोडया विचाराअंतीं तिचें निरसन होण्यासारखें आहे. दुष्काळांत अन्न न मिळाल्यामुळें होणाऱ्या यातनांचा प्रत्यक्ष अनुभव आणि त्या यातनांच्या वर्णनाचें वाचन किंवा श्रवण; कामिजनास होणाऱ्या क्लेशांचा प्रत्यक्ष अनुभव, आणि त्यांच्या क्लेशांच्या वर्णनाचें वाचन किंवा श्रवण, या आणि याप्रमाणें इतर सर्व गोष्टींपासून होणाऱ्या सुखदुःखांचा प्रत्यक्ष अनुभव आणि त्यांच्या वर्णनांचें वाचन किंवा श्रवण–यांत फार अंतर आहे. प्रत्यक्षानुभवाची तीव्रता वाचनांत किंवा श्रवणांत कधींही येऊं शकणार नाहीं;

आणि तसें होऊं लागलें तर प्रतिकूल संवेदनोत्पादक काव्यें कोणी हातीं धरणार नाहीं. उतार वयांत शेंकडों नवानवसांनीं झालेलें अपत्य मरण पावलें असतां मातापितरांस जें दुःख होतें, तेंच दुःख जर त्याच्या वर्णनापासून किंवा अभिनयापासून होऊं लागलें, तर तें वर्णन कोण हातांत घेईल ? किंवा तो अभिनय पहाण्यास कोण जाईल ! एखाद्या दुर्गम आणि निर्भय अशा उंच ठिकाणीं बसून खालीं चाललेली लढाई पाहण्यानें मनावर ज्या प्रकारचे विकार होण्याचा संभव आहे, त्या प्रकारचे विकार दुःखपर्यवसायी कथेच्या वाचनापासून होतात. सर्व मनुष्यांच्या मनोवृत्ति एकाच तऱ्हेच्या असल्यामुळें एकास झालेलें दुःख किंवा सुख त्याच्या बाह्य चिन्हांवरून, वर्णनावरून, किंवा अभिनयावरून दुसऱ्यास समजून येतें, हें खरें आहे. पण या समजून येण्यांत आणि प्रत्यक्षानुभवांत फार अंतर आहे. तरवारीसारख्या शस्त्राचें मर्मापर्यंत चरचर कापीत जाणें, आणि फक्त अंगाला चाटणें यांत जो फरक आहे, तो प्रत्यक्ष सुखदुःखांत आणि त्यांच्या चित्रांत आहे. कवींची सारी करामत हुबेहुब चित्र काढण्यांत आहे; मूळ उत्पन्न करण्यांत नाहीं. ते मूळ उत्पन्न करूं लागतील तर त्यांच्या दुःखोत्पादक कृतीकडे कोणी ढुंकूनही पहाणार नाहीं. असो; पण हा सगळा वाचकांच्या किंवा प्रेक्षकांच्या सुखदुःखाविषयीं विचार झाला. दुःखपर्यवसायी काव्य लिहितांना खुद्द कवींच्या मनाची काय स्थिति होते, हा प्रश्न अजून राहिलाच आहे. कोणत्याहि प्रकारचें काव्य रचतांना किंवा त्यांतील विषयांचा विचार करतांना कवीस जे आयास होतात, ते प्रत्यक्ष आयासाहून बरेच क्षीण असतात. सुखदुःखाचा प्रत्यक्ष अनुभव, आणि सुखदुःखावर पुनः पुनः विचार करून तीं आपणांसच होत आहेत, असा भास करून घेण्याचा प्रयत्न,—यांत पुष्कळ अंतर आहे. धनलोभ्याचें धन एकाएकीं नाहींसें झालें असतां, त्याला ज्या यातना होतात, त्या प्रत्यक्ष यातना कवि आपणांस धनलोभी समजून व आपलें सारें वित्त एकाएकीं नष्ट झालें आहे असें समजून, द्रव्यनाशानें खऱ्या धनलोभ्याला होणाऱ्या दुःखाचें प्रतिबिंब आपल्या मनावर उठवून घेण्यासाठीं त्या दुःखाचें एकसारखें चिंतन करतो, व त्यामुळें कांहीं वेळानें त्याच्या मनाची वृत्ति धनलोभ्याच्या वृत्तीसारखी होऊन धनलोभ्याला होणाऱ्या यातनांची बरीच छाया त्याच्या मनावरही पडूं लागते. अशा प्रकारें उत्पन्न केलेल्या दुःखाच्या छायेस अप्रत्यक्ष दुःख असें म्हणतां येईल. ज्याला ही छाया हवी तितकी दाट पाडून घेतां येत असेल, त्याच्या अंगीं कवित्वगुणां-

पैकीं श्रेष्ठ गुण आहे, असें म्हणतां येईल. विचारानें प्रत्यक्ष सुखदुःखाच्या तीव्रतेचें पूर्ण प्रतिबिंब आपल्यावर उठवून घेणें यांचेंच नांव तादात्म्य, तंद्री, किंवा एकतानता. ज्याला सुखदुःखाचा प्रत्यक्ष अनुभव होत आहे, त्याच्या मनाप्रमाणें कवीच्या मनाची स्थिति झाल्याशिवाय त्याच्या काव्यांत तो तो रस पूर्णपणें उतरणार नाहीं. रसाची परिपक्वता अगोदर कवीच्या मनांत आली पाहिजे. ती तशी झाली तरच त्याला ती काव्यांत आणण्याचा प्रयत्न करतां येईल; कारण, जर आडांतच पाणी नसलें, तर तें पोंहऱ्यांत कोठून येणार ? कवीला ज्या विषयाशीं आपल्या मनाची तंद्री लावून द्यावयाची असते, तो विषय अनुकूल संवेदनोत्पादक असो, कीं प्रतिकूल संवेदनोत्पादक असो, त्याला जे कष्ट पडतात, ते उभयपक्षीं सारखेच असतात. कवीचें मन फोटोग्राफ घेण्यासाठीं तयार केलेल्या भिंगाप्रमाणें असतें. ज्याप्रमाणें हवा तेवढा प्रकाश अनुकूल असला म्हणजे पाहिजे त्या पदार्थांचें हुबेहुब प्रतिबिंब त्या भिंगावर पाडतां येतें, त्याप्रमाणें ज्या कवीला आपली कल्पना हवी तितकी प्रज्वलित करतां येते, त्याला तिच्या रश्मींनीं आपल्या मनावर पाहिजे त्या विषयाची मुळाबरहुकूम छाया पाडतां येते. कल्पना प्रज्वलित होऊन कल्पनाविषयांशीं तादात्म्य होणें – यांतच कवींचा आणि काव्यवाचकांचा आनंद आहे. बीजगणितांतील किंवा भूमितींतील एखाद्या कूट प्रश्नांत बुद्धि व्यग्र होऊन गेली असतां तींत जें चांचल्य उत्पन्न होतें, तें तत्त्वशोधकास जसें अत्यंत आनंददायक असतें, त्याप्रमाणेंच सुखदुःखोत्पादक विषयांचें हुबेहुब आकलन करण्यासाठीं भरधांव सोडलेल्या कल्पनेच्या चांचल्यापासून कवींना व काव्यवाचकांना अत्यानंद होतो. असें जर नसतें, तर दुःखपर्यवसायी काव्यें कवि मुळींच न लिहिते, व वाचक तीं मुळींच न वाचते. तेव्हां सिद्ध काय झालें कीं, काव्य दुःखपर्यवसायी असो कीं सुखपर्यवसायी असो, त्यांतील रसापासून उत्पन्न होणारा आनंद सारखाच असतो; आणि याच कारणामुळें कॉमिडी आफ एरर्स (भ्रांतिकृतचमत्कार) इतकींच आथेल्लो वाचण्याला, किंवा त्याचा प्रयोग पहाण्याला आमचीं मनें उत्सुक असतात. तर मग दुःखपर्यवसायी आणि सुखपर्यवसायी काव्यांच्या वाचण्यांत किंवा प्रयोगदर्शनांत मुळींच भेद नाहीं कीं काय, असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. त्यास इतकेंच उत्तर आहे कीं, भेद आहे; मुळींच नाहीं असें नाहीं; पण तो फार थोडा आहे. काव्यवाचनांत किंवा त्यांचा

प्रयोग पहाण्यांत एकमेकांपासून अगदीं भिन्न असे दोन मानसिक व्यापार चालले असतात. एक कल्पनाशक्ति प्रज्वलित होऊन ती मनाचें काव्यवस्तूशीं तादात्म्य करण्यासाठीं झटत असते; दुसरा, इंद्रियांपुढें प्रत्यक्ष असणांऱ्या, किंवा कल्पनेनें निर्माण केलेल्या काव्यवस्तु आपापल्या स्वभावाप्रमाणें वाचकांच्या व प्रेक्षकांच्या अनुकूल व प्रतिकूल संवेदनांस अंशतः कारण होत असतात. यामुळें दुःखपर्यवसायी काव्य वाचीत असतां, किंवा त्याचा प्रयोग पहात असतां वृत्तीला थोडीशी खिन्नता उत्पन्न होते, आणि सुखपर्यवसायी काव्य वाचीत असतां वृत्तीला थोडासा आनंद होतो. अप्रबुद्ध लोकांना पहिल्या व्यापारापासून होणाऱ्या आनंदाची मुळींच कल्पना नसते. यामुळें दुःखपर्यवसायी नाटक पहाणें त्यांना आवडत नाहीं.

आतांपर्यंत जें सांगितलें आहे त्यावरून तत्त्वशोधकाप्रमाणें कवीचेंही, एका प्रकारच्या सत्यांचा निर्णय करणें; आणि तीं सांगणें, हें काम आहे; हें काम बजावण्यासाठीं कवीस आपली कल्पना प्रज्वलित करून काव्यवस्तूंशीं आपल्या मनाचें तादात्म्य करून घ्यावें लागतें; काव्यवस्तु कोणत्याही प्रकारची असो; या तादात्म्यापासून होणारा आनंद सारखाच असतो; कवींच्या यथार्थ वर्णनांनीं काव्य वस्तूंशीं वाचकांच्या आणि प्रेक्षकांच्या मनांचें तादात्म्य झालें तर त्यांनाही कवीसारखाच आनंद होईल. काव्यवस्तु कोणत्याही प्रकारची असो, तिच्या चिंतनांत व्यग्र झालेल्या कवीच्या किंवा वाचकांच्या कल्पनेस जें चांचल्य येतें, तें आनंदमय आहे; काव्य वाचीत असतां किंवा त्याचा प्रयोग पहात असतां वृत्तींत कधीं कधीं जी खिन्नता उत्पन्न होते ती, वृत्ति एकीकडे एकतानतानंदांत गढली असतां इंद्रियांपुढें प्रत्यक्ष असणाऱ्या, किंवा कल्पनेनें निर्माण केलेल्या, भयंकर काव्यवस्तु दुसरीकडून तींत प्रतिकूल संवेदना उत्पन्न करीत असतात, म्हणून होते; सारांश काव्य दुःखपर्यवसायी असो किंवा सुखपर्यवसायी असो, ते रचण्यांत कवीला आणि तें वाचण्यांत वाचकाला आनंदच आहे; या आनंदांत, काव्यवस्तूचें बाह्य स्वरूप रमणीय असल्यास थोडीशी भर पडते, व तें भयंकर असल्यास त्याला किंचित् छाट बसतो;—इत्यादि गोष्टी वाचकांच्या ध्यानांत येतील अशी आशा आहे.

काव्याच्या वाचनापासून राजापासून रंकास, तत्त्ववेत्त्यापासून अत्यंत अल्पशिक्षित मनुष्यास, सर्व स्थितींत आनंद होण्यास अनेक कारणें आहेत. एक तर

कवींच्या वाणींतून जे बोल निघत असतात, त्यांच्या सत्यतेविषयीं प्रत्येक अंतःकरण साक्ष देत असतें. जीं सत्यें देशकालादिकांनीं मर्यादित, किंवा जीं सत्यें बहुश्रुतांस मात्र समजणार, अशीं सत्यें कवि कधींच सांगत बसत नाहीं. ज्या मनुष्याची रानटी अवस्था सुटली आहे, ज्याला मानवी स्वभावाचें किंचित् ज्ञान प्राप्त झालें आहे, ज्याच्या मनावर बाह्य सृष्टीच्या सौंदर्याचा परिणाम होऊं लागला आहे, असा मनुष्य कोणत्याही देशांत रहात असो, किंवा कोणत्याही शतकांत जन्मास आला असो, महाकवींच्या सत्यमय रसाळ उद्गारामृताचें सेवन करण्यास तो योग्य असतो. काव्यापासून आनंद होण्याचें दुसरें कारण असें आहे कीं साधारण मनुष्यास ज्या गोष्टी अव्यक्त असतात, त्या कवि त्यास व्यक्त करून देतो. "जितक्या मूर्ति तितक्या प्रकृति" अशी आपल्या लोकांत म्हण आहे. या म्हणीचा अर्थ इतकाच कीं प्रत्येक मनुष्याचा स्वभाव निराळा असल्यामुळें सर्वांच्या स्वभावांचें ज्ञान होणें अशक्य आहे. नथापि ज्या अर्थीं सर्व मनुष्यांस आपण 'मनुष्य' या एका वर्गाखालीं मोडतों, त्या अर्थीं त्या सर्वांस साधारण असे कांहीं गुण असलेच पाहिजेत; या साधारण गुणांचें अति स्वल्प ज्ञान बहुतेकांस असतें; व तें असतें म्हणून काव्यवाचनापासून त्यांस आनंद होतो. कित्येक मनुष्य पराकाष्ठेचे रागीट असतात, कित्येक शांत असतात, कित्येक मायाळू असतात, कित्येक लोभी असतात, कित्येक क्रूर असतात, कित्येक कामातुर असतात. तथापि राग, शांति, ममता, लोभ, क्रौर्य, व काम इत्यादि सर्व मनोवृत्तींची प्रत्येकास थोडीबहुत ओळख असते. विशिष्ट व्यक्तींत एखादा गुण फार असला म्हणून बाकीच्या गुणांविषयीं तो अगदीं अज्ञान असतो असें नाहीं. प्रत्येक मनुष्य सर्व मनुष्यतेचें सूक्ष्म प्रतिबिंब आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. असें नसतें तर एकाचे मनोविकार दुसऱ्याला न समजते. साधारण मनुष्यांत आणि कवींत भेद इतकाच आहे कीं साधारण मनुष्यास ज्या प्रकृतिवैचित्र्याचें आणि विकारवैचित्र्याचें ज्ञान अगदीं मंद असतें, तें कवीस कल्पनासामर्थ्यानें स्वतःसच स्पष्टच करून घेतां येतें; इतकेंच नाहीं, तर काव्यद्वारां तें दुसऱ्यासही स्पष्ट करून देतां येतें. कवि हा कामरूपधारी पटाईत बहुरूपी आहे! तो क्षणांत राजा बनून सिंहासनस्थ पुरुषांच्या अंतःकरणांतील विचार बोलूं लागतो. राजवेश घेऊन अर्धघटिका झाली नाहीं तों, तो वेष टाकून देऊन तो काळा पोषाक करतो, तोंडाला काजळ फासतो, वस्त्राखालीं पाजळलेलीं शस्त्रें लपवून घेतो, आणि

मध्यरात्रींच्या निबिड काळोखांत जिकडे तिकडे सामसूम झालें असतां द्रव्यासाठीं कोणाचा तरी जीव घेण्याचा बेत करीत मारेकरी होऊन बाहेर पडतो ! या स्थितींत पांचपन्नास पळें गेलीं न गेलीं तों, ती टाकून देऊन अभिसारिका बनतो. व अभिसारिकेस योग्य असा पेहेराव चढवून मेघांच्या गडगडाटाची, विजांच्या लखलखाटांची किंवा तुफान वाऱ्यांच्या सोसाट्याची पर्वा न करितां, पावसाच्या मुसळधारेंतून एका चेटासह विहारोद्यानांतील नेमलेल्या लतामंडपांत प्रियाची भेट घेण्यास जातो ! आतां तो पर्वताच्या शिखरावर किंवा समुद्राच्या किनाऱ्यावर असला तर क्षणाभरानें धनगराच्या परशापाशीं शेकत बसलेला किंवा न्यायासनारूढ होऊन न्याय करीत असलेला दृष्टीस पडेल ! वायूप्रमाणें तो सर्वगामी आहे; मनाप्रमाणें तो चंचल आहे; हवी ती वस्तु उत्पन्न करणारा तो वस्ताद जादूगार आहे; कल्पनाशंकूच्या जिवावर कालोदधींत पाहिजे त्या दिशेस सुकाणूं लावण्यास न डगणारा तो जरठ झालेला तांडेल आहे; विश्वचक्षिांप्रमाणें त्याचे उद्गार अनंत व नित्य आहेत. कोणती वस्तु कितीही दूर असो, किंवा कितीही सूक्ष्म, असो, यानें तिच्यावर आपली दुर्बीण किंवा सूक्ष्मदर्शक यंत्र लाविलें की त्याला ती सन्निध आणि स्थूल होऊन हवीतशी पहातां येते, व दुसऱ्यांना तिचें यथातथ्य आकलन होईल अशा तऱ्हेचें तिचें चित्र काढतां येतें. जर तुम्हांला पातालांतील किंवा स्वर्गांतील वस्तुस्थिति पहावयाची इच्छा असेल तर मिल्टनाचा किंवा कालिदासाचा हात घट्ट धरून ते नेतील तिकडे जाण्यास तयार व्हा ! अनंत प्रकृतींच्या हृदयडोहांत बुड्या मारून त्यांच्या तळाशीं काय आहे, हें जर तुम्हांला पहावयाचें असेल तर मोलिअर, शेक्सपिअर, गेटी, किंवा भवभूति अशा जगत्प्रसिद्ध पानबुड्यांच्या कमरेला मिठी मारा ! सारांश, अंतर्बाह्य सृष्टींत अनुकूल किंवा प्रतिकूल संवेदना उत्पन्न करणारी अशी कोणतीही चीज नाहीं कीं, जिच्या सत्यस्वरूपाचें ज्ञान आनंद होईल अशा रीतीनें कवीस तुम्हांला करून देतां येणार नाहीं. समजातीयांस हें ज्ञान करून देणें हा कवींचा व्यवसाय होय. या व्यवसायांतच त्यांचा आनंद आहे. या व्यवसायामुळें त्यांचें अंतःकरण अतिशय कोमल व दयार्द्र झालेलें असतें. या व्यवसायामुळें यांची अनुकंपा इतकी वाढते कीं, तिच्या व्याप्तीस सकल मनुष्यवर्ग किंवा जीवकोटिसुद्धां पुरेशी न होऊन ती अखेरीस अचेतनसृष्टि व्यापूं लागते; व हा व्यवसाय वाचकांस सुखावह व्हावा म्हणून पद्यरचना, प्रास, वृत्तें, अलंकार इत्यादि उपकरणांचा उपयोग कवि आपल्या काव्यरचनेंत करतात.

[वर्ष ६, अंक ४६।४९.]

बडोद्याचे सयाजीरावमहाराज यांस दोन उपदेशपर शब्द

प्रजानामेव भूत्यर्थं सताभ्यो बलिमग्रहीत् ।
सहस्रगुणमुत्स्रष्टुमादत्ते हि रसं रविः ॥ *

येत्या बुधवारीं सयाजीरावमहाराज यांस राज्यवर्ग मिळून स्वतंत्र अधिकार प्राप्त होणार अशा प्रसंगीं दोन उपदेशपर शब्द लिहिले तर ते अनुचित होणार नाहींत, असें वाटल्यावरून तसें करीत आहों, इकडे महाराजांचें अवधान असेल अशी आशा आहे.

प्रपंचांत वागणाऱ्या प्रत्येक मनुष्यावर थोडीबहुत जबाबदारी असतेच. परंतु प्रजापालन हें ज्यांचें कर्तव्यकर्म होय, त्यांच्या माथीं या जबाबदारीचा जेवढा बोजा असतो, तेवढा कोणाच्याच शिरावर नसतो. सामान्य मनुष्यांच्या बऱ्या-वाईट वर्तनांचा संसर्ग दूरवर जाऊन पोहोंचत नाहीं. परंतु राजा हा राष्ट्रकुटुंबाचा अधिपति आणि चालकात्मा असल्यामुळें त्याच्या गुणावगुणांचा परिणाम सर्व प्रजेवर तत्काळ होतो. यासाठीं नृपतींचें वर्तन अत्यंत विचारशील असलें पाहिजे. सरकार, राजा, प्रजा, या सर्व मनुष्यकृत कृत्रिम संस्था होत. यांचीं उत्पत्ति मनुष्यांच्या ऐहिक, व तदन्तर्गत पारमार्थिक कल्याणासाठीं झाली आहे. व्यवहारांत व्यवस्था राहून प्रत्येक व्यक्तीला आपाआपल्या श्रमांचें अविच्छिन्न फळ भोगण्यास सांपडावें; जीवाचें, शरीराचें आणि संपत्तीचें पालन व्हावें; सुनीतीचा उत्कर्ष व प्रसार व्हावा; आणि संसारसुख सर्वांस मिळावें; यासाठींच प्रत्येक मनुष्य आपल्या प्राप्तीचा विवक्षित भाग राजपदीं अर्पण करितो. ज्याप्रमाणें चाकरास वेतन देऊन त्याबद्दल त्याच्याकडून आम्ही आपलीं कामें करून घेतों, त्याप्रमाणें राजालाही आम्ही आपल्या उत्पन्नाचा कांहीं भाग देऊन त्याच्याकडून एक प्रकारची चाकरी करून घेत असतों. राजा हा प्रजेचा चाकर होय. पूर्वी राजाला षष्ठांशवृत्ति असें म्हणत असत, याचें कारण असें कीं, राजानें प्रजापालन करावें व त्याबद्दल तिच्या उत्पन्नाचा सहावा वांटा घ्यावा, अशी

---

*तो राजा प्रजेच्या कल्याणासाठींच त्यांच्यापासून कर घेत असे, ज्याप्रमाणें रवि हा सहस्रपटींनें परत देण्यासाठींच उदकाचें शोषण करितो.

चाल असे. ज्या वेळेस राजाकडून आपलें कर्तव्यकर्म होईनासें होतें, त्या वेळेस तो प्रजेपासून कर घेण्यास अपात्र होतो. पौराणिक कालांत प्रजेचें पुत्रवत् संगोपन करणारे रामराजादि नृपति होऊन गेले. परंतु ऐतिहासिक कालांत प्रजापालनदक्ष असे नृपति फारच विरळा आढळतात. भागाभागांनीं एकत्र झालेल्या संपत्तीच्या बलावर राजे आपल्या कर्तव्यास पराङ्मुख होऊन निर्दय, द्रव्यलोभी, गर्वयुक्त, मदिराक्षीद्यूतादिविषयासक्त झाल्याचीं उदाहरणें फार. या व्यसनांचा अतिरेक झाल्यामुळें राज्यपदास मुकलेल्या राजांचीं उदाहरणें इतिहासांत अनेक आहेत्, व नित्यशः पाहण्यांत येतात. राज्यक्रांतीचें मुख्य कारण राजेलोकांचें दुर्वर्तन हेंच होय; ज्या वेळेस राजांचा जुलूम पराकाष्ठेचा दुःसह होतो, त्यावेळेस त्यांतून मुक्तता करून घेण्याचे उपाय प्रजेला तेव्हांच समजतात. राजा आणि प्रजा यांच्या हितामध्यें द्विधात्वाचा आविर्भाव होणें हें उभयतांच्याही कल्याणाचें नाशक असतें. या परस्परांच्या हिताहिताची एकात्मता असली पाहिजे. इचा जो नाश किंवा विध्वंस तो उभयतांना अपायकारक असतो. ही एकात्मता राखणें हें राजनीतीचें सारतत्त्व होय. मोठमोठाले वाडे, हत्ती, घोडे, मोलाचीं वस्त्राभरणें वगैरे ज्या खर्चाच्या गोष्टी आम्ही राजाकडे चालवितों, त्या त्यांनीं रंडीबाजी, दारूबाजी, जुगारबाजी यांत दंग असावें म्हणून नव्हेत तर त्यांमुळें त्यांचा सन्मान व वजन राहून लोककल्याणाचें काम त्यांच्या हातून चांगलें वठावें यासाठीं होय. देशाच्या स्थित्यनुमानाप्रमाणें त्यांत शुद्ध एकसत्ताक, अनेकसत्ताक किंवा मिश्रसत्ताक असें राज्य असतें. मनुष्यमात्राची स्वहितनिष्ठा बलवत्तर असल्यामुळें प्रजासत्ताक किंवा अनेकसत्ताक राज्याकडे जगाची प्रवृत्ति होत आहे हें सहाजिक आहे इच्या स्वाभाविक ओघास प्रतिरोध करणारे राजे असमंजस होत. तथापि योग्य काल आल्यावांचून कोणत्याही देशांत प्रजासत्ताक राज्याची स्थापना व्हावयाची नाहीं. राजे दुष्कर्मी किंवा जुलमी निघणें, हें एक हा काल समीप आल्याचें चिन्ह होय. आपल्या सदाचारानें लोकांस संतोषित ठेवून त्यांना त्याची अपेक्षा होऊं न देणें हें राजेलोकांचें परम भूषण होय. हें भूषण प्राप्त होण्यास अनेक उपाय आहेत, ते सगळे येथें निर्दिष्ट करतां येण्याची वार्ताच नको. पण उचित समय आल्यामुळें दोनतीन सांगून लेख आटपता घेतों. प्रथम राजेलोकांनीं आपल्या बुद्धीचें क्षालन केलें पाहिजे. त्यांच्या अंतःकरणांत मदमत्सरादि कुवृत्तींचा वारा अगदीं उपयोगीं नाहीं.

त्यांचीं मनें उदात्त, गंभीर, प्रगल्भ, धैर्यवान् आणि विचारी अशीं असलीं पाहिजेत. स्वतःच्या संबंधानें येवढी तयारी झाल्यावर दुसरी गोष्ट मंत्रिपरीक्षणाची. गादीचें कल्याण चिंतणारा व धन्याशीं दगलबाजी न करणारा असा मंत्री पाहिजे. सयाजीरावमहाराजांस सर टी. माधवराव आणि त्यांचे अनुयायी यांसारखी प्रधान मंडळी कामाची नाहीं. सर. टी. माधवरावांचे कल्याणदाते इंग्लिशलोक होत, व यासाठीं या राजकारणी पुरुषाचा ओढा त्यांच्याकडे. उत्तम मंत्री निवडतां येणें यांत काय तें राजाचें खरें चातुर्य. तिसरी गोष्ट अशी कीं, राजा ज्या मुलखावर राज्य करीत असेल, तेथील लोकांच्या चांगल्यासाठीं झटणें. सयाजीरावमहाराज यांनीं होईल तितकें करून, इंग्रजांनीं ज्याप्रमाणें विलायती लोकांची रेलचेल येथें केली आहे, त्याप्रमाणें दाक्षिणच्या लोकांकडून गुजराथदेश भरून न टाकतां, गुजराथी लोकांनाच चांगलें शिक्षण देऊन, त्यांच्या प्रांतांतील कामें त्यांच्याकडून करवावीं, हें श्लाघ्य होय. चवथी गोष्ट अशी कीं, लोकांना आपलीं खरीं दुःखें सरकारच्या कानावर घालतां यावीं. यासाठीं त्यांना सभा करण्याची व वर्तमानपत्रें काढण्याची पूर्ण स्वतंत्रता असावी. राजकारणासंबंधानें लोकांस अल्प आयासानें व अल्प द्रव्यानें ज्ञान होण्यास वर्तमानपत्रांसारखें दुसरें साधन नाहीं. पांचवी गोष्ट अशी कीं, प्रजेस विद्या देणें हें राजाचें मुख्य कर्तव्य होय. प्रजा सुशिक्षित नसली तर राजाला फार त्रास पडतो; कारण एक तर राज्यशकट ओढण्यास त्याला तिच्यापासून चांगलें साहाय्य होत नाहीं; इतकेंच नाहीं, तर उलट ती त्याच्या सदुद्देशास व सदुद्योगास प्रतिबंधक होते. सारांश, ऐहिक आणि पारमार्थिक सुखास जोड-ण्याचें मुख्य साधन विद्या होय. राज्याची बळकटी, राज्याची इभ्रत, राज्याचें स्वातंत्र्य, राज्याची भरभराटी हीं सर्व प्रजेच्या सुशिक्षिततेवर अवलंबून असतात. यासाठीं सयाजीरावमहाराज लोकशिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवितील अशी आशा आहे. याशिवाय लेखी कायदे असावे, खासगी आणि सरकारी खातीं अगदीं पृथक् असावीं, न्याय थोड्या खर्चानें व थोड्या कालांत सर्वांस मिळण्याची सोय असावी, करभार प्रजेवर जितका कमी पडेल तितका कमी पाडावा, घेतलेल्या करांचा प्रजेच्या कल्याणार्थ होईल तितका विनियोग होत जावा–वगैरे अनेक महत्त्वाच्या गोष्टी आमच्याकडून आजपर्यंत कित्येकदा सांगण्यांत आल्या आहेत व पुढेंहि येतील. तथापि वर जीं राज्यकारणाचीं ठोकळ

ठोकळ तत्त्वें सांगितलीं आहेत, तिकडे महाराजांनीं विशेष नजर पुरविली पाहिजे. यापेक्षां आज विशेष सांगावयाचें राहिलें नाहीं. अस्तु; जगन्नित्यंता परमेश्वरापाशीं येवढीच प्रार्थना आहे कीं, आमच्या भाग्यशाली सयाजीरावमहाराजांचें वास्तव्य इहलोकीं दीर्घकालपर्यंत होऊन त्यांच्या अमदानींत बडोद्याच्या गादीचें नांव जिकडे तिकडे जागो, गायकवाडी प्रजा निरंतर सुखी राहो, आणि हिंदुस्थानच्या सर्व लोकांकडून व महाराणीसरकारकडून त्यांस 'धन्य' असा किताब मिळो.

[वर्ष १, अंक ५२]

आपलें वैद्यक

गेले गुरुवारीं (१८८१ मे ता. २६) डाक्तर गणेश कृष्ण गर्दे यांनीं हिराबागेंत हिंदु वैद्यकावर व्याख्यान दिलें तें उपयुक्त असले कारणानें त्यांतील सारांश येथें घेतला आहे.

हिंदुस्थानदेश फार प्राचीन काळापासून वैद्य शास्त्राच्या उन्नतीविषयीं प्रसिद्धीस आला आहे. सुमारें २२०० वर्षांपूर्वी ग्रीस देशांतील आदि वैद्य जो हिप्पाक्रेटिस तो आमच्या वैद्यकाची कीर्ति ऐकून त्याचें ज्ञान संपादन करण्याकरितां येथें आला होता, असें एका ग्रीक इतिहासकारानेंच लिहिलें आहे. आपल्या प्राचीन वैद्यकाविषयीं जी मी आज आपणांस माहिती देणार आहें, ती मला अनेक साधनांनीं प्राप्त झाली आहे. तीं साधनें हीं; चरकसुश्रुतादिक आर्षग्रंथ, व रसरत्नसमुच्चयादिक रसक्रियेचे ग्रंथ, अनुभवीक व पढीक वैद्यांचा अनुभव, जटिलीक्रिया करणाऱ्या बैरागी व गोसावी लोकांचा अनुभव, व स्वतःच्या क्रियेंतील अनुभव. या विषयाच्या संबंधानें हल्लीं भिन्न भिन्न लोकांचे भिन्न भिन्न विचार आढळतात. ज्या लोकांना जेवढें इंग्रजाचें तेवढें चांगलें, असें म्हणण्याची खोड लागली आहे, त्यांच्या मतें व युरोपियन डाक्तर लोकांच्या व आपल्यापैकींहि पुष्कळ डाक्तरांच्या मतें आपलें वैद्यक म्हटलें म्हणजे कांहींच कामाचें नाहीं; त्यांतील औषधें केवळ काल्पनिक असून अगदीं निरर्थक आहेत. जे लोक अगदींच जुने आहेत व ज्यांस इंग्रजी विद्येचा संस्कार बिलकुल झाला नाहीं, त्यांचा समज असा झाला आहे, कीं, वैद्यकांत उत्तम असें काय तें आपलें वैद्यक, त्याजबरोबर दुसऱ्या कोणत्याही वैद्यकाच्यानें टक्कर मारवणार नाहीं, आपल्या शास्त्रामध्यें शस्त्रक्रिया नाहीं खरी; पण आपली नाडीपरीक्षा किती विलक्षण ! आपल्या एकेक मात्रा अशा आहेत कीं, त्या मेलेल्यास देखील उठवितात ! डाक्तरांचें काम काय तें फक्त कापणें व चिरणें; त्यांना नाडीपरीक्षा तर अवगत नाहींच, आणि औषध जर म्हणाल तर जोईल त्यास नुस्तें बाटलींतील पाणी ! त्यांत थोडासा क्षार किंवा अर्क टाकून दिला म्हणजे झालें ! कांहीं लोक असेही आढळतील कीं त्यांचें मत इतकें एकदेशीय व पक्षपाताचें नसतां वरील दोन मतांच्या मध्यभागीं आहे.

तथापि त्या तीनही प्रकारच्या लोकांस आपल्या प्राचीन वैद्यकाच्या वास्तवीक स्वरूपाचें सारखेंच अज्ञान आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्याप्रमाणें जर स्थिति आहे, तर ती लवकरच काढून टाकली पाहिजे. कारण अशा महत्त्वाच्या व व्यावहारिक विषयावर लोकांचें अज्ञान असणें हें फार अनर्थकारक आहे. आतां वरील अनेक साधनांनीं जी माहिती मला प्राप्त झाली आहे, तिच्या योगानें ह्या अज्ञानाचें निराकरण करण्याचा मी आजचे व्याख्यानांत प्रयत्न करितों.

या शास्त्रावर अगदीं प्राचीन उपलब्ध ग्रंथ चरक व सुश्रुत हे दोन आहेत. त्यानंतर व यांचाच सारांश काढून पुढें वाग्भटांनीं एक ग्रंथ लिहिला, तोही फार मान्य व मोठ्या योग्यतेचा आहे. त्यानंतर पुढें जे शेकडों ग्रंथ झाले त्यांच्यामध्यें एक लक्षांत ठेवण्याजोगा फरक आढळून येतो तो हा कीं, प्राचीन आर्षग्रंथांमध्यें पारा, सोमल, बचनाग, अफू वगैरे विषारी औषधांचा उपयोग केला नसून, अलीकडील ग्रंथांमध्यें त्यांचेंच माहात्म्य फार वाढलें आहे; तसेंच ह्या अलीकडील ग्रंथांत शस्त्रक्रियेचा अगदींच लोप झालेला आढळतो. प्राचीन ग्रंथांत शस्त्रक्रिया व शरीर यांची बरीच माहिती आढळते. आपल्या वैद्यकांत शस्त्रक्रिया नाहीं अशी जी हल्लींच्या वैद्यांची व लोकांची समजूत झाली आहे, ती मिथ्या आहे, व त्या समजुतीवरून असें सिद्ध होतें कीं, प्राचीन ग्रंथ शिकलेले वैद्य हल्लीं फारच विरळा. सर्जरी व मेडिसिन असे इंग्रजी वैद्यशास्त्राचे जसे दोन भाग हल्लीं आढळतात, तसे आपल्या वैद्यकांत देखील दोन भाग आहेत; येवढेंच नव्हे तर त्या दोन भागांवर निरनिराळ्या ऋषींचे स्वतंत्र दोन ग्रंथ आहेत. वर सुश्रुत म्हणून जो ग्रंथ सांगितला, तो मुख्यत्वेंकरून शस्त्रकलेसंबंधीं ग्रंथ आहे. शारीरज्ञान प्रेत फाडून पाहिल्यावांचून यथार्थ होणें नाहीं, तेव्हां अर्थात जर आपल्या वैद्यकांत शारीर सांगितलें आहे, तर त्यांणीं प्रेतें फाडून पाहिलीं असावींत. सुश्रुतामध्यें तर असें स्पष्ट सांगितलें आहे कीं, ज्यांस शारीर व शस्त्रकला शिकण्याची इच्छा असेल, त्यांनीं मढें फाडून त्यांतील निरनिराळ्या भागांची प्रत्यक्ष माहिती करून घ्यावी; नुसत्या शास्त्रावर कधींही अवलंबून राहूं नये. सुश्रुतांत मुतखडा काढण्याची जी रीती दिली आहे, ती हल्लीं डाक्तर लोक ज्या रीतीनें मुतखडा काढितात, त्यासारखीच आहे; शस्त्रामध्यें मात्र हल्लीं विशेष सुधारणा झाली आहे. याचप्रमाणें मूल आडवें आलें असतां बाळंतिणीची सुटका कशी करावी, इत्यादि गोष्टींविषयीं बरीच माहिती दिली आहे. प्राचीनकाळीं शस्त्रकला इतक्या उत्कर्षास पोहों-

चली असून तिचा हल्लीं इतका लोप झाला आहे, याचें कारण माझे बुद्धीस असें दिसतें कीं ऋषींच्या वेळीं ब्राह्मणलोक मांस खात असल्यामुळें, व नेहमीं यज्ञ करीत असल्यामुळें, त्यांस रक्ताचा किंवा मांसाचा कंटाळा येत नसे; व प्रेत फाडण्याचें त्यांस फारसें कठिण जात नसे; परंतु 'अहिंसा परमो धर्मः' असें मानणाऱ्या बौद्ध धर्माच्या प्रचारामुळें जेव्हां ही संवय ब्राह्मणांतून नाहींशी झाली, तेव्हां त्यांस हळूहळू रक्तमांसाचा किळस येऊं लागला, व या रीतीनें प्रेत फाडण्यापासून ते विमुख झाले, व हें शारीरज्ञानाचें साधन जेव्हां नाहींसें झालें तेव्हां अर्थात् शस्त्रकलेचेंही पाऊल मागें पडूं लागलें, व कांहीं दिवस तिचा समूळ ऱ्हास होऊन ती विद्या आपल्या लोकांत नव्हतीच असा सर्वांचा समज होऊन बसला. आतां वैद्यकाचा जो दुसरा भाग औषधीक्रिया किंवा ज्वरादिरोगांची चिकित्सा व ज्या भागांस कायचिकित्सा असें म्हटलें आहे, त्याजविषयीं विचार करूं. तो विचार करण्यापूर्वी आपल्यास अशी सूचना करणें जरूर आहे कीं, त्याच्या गुणदोषाविषयीं जें जें कांहीं मी येथें बोलणार आहें तें हल्लींच्या वैद्यक्रियेस लागूं आहे, असें मात्र कोणी समजूं नये. प्राचीन वैद्यशास्त्र व हल्लींची वैद्यक्रिया ह्या दोहोंमध्यें जमीनअस्मानाचें अंतर आहे. जसा प्राचीन शस्त्रक्रियेचा हल्लीं अगदीं लोप झाला आहे, तसाच शास्त्रोक्त औषधक्रियेचाही हल्लीं अनेक कारणांनीं पुष्कळ अंशीं लोप झाला आहे. अशी सूचना करून पुरातन वैद्यकाच्या गुणदोषांचें निरूपण करितों. वैद्यकाचे मुख्य भाग दोन आहेत– निदान व चिकित्सा. निदान म्हणजे रोगाच्या कारणांचा निर्णय करणें; व रोग झाला म्हणजे शरीरांत कोठें काय काय फेरफार होतात तें सांगणें. चिकित्सा म्हणजे रोगावर उपचार करून तो बरा करण्याचा प्रयत्न करणें. प्राचीन वैद्यकामध्यें ह्या दोहोंपैकीं पहिला भाग म्हणजे निदानभाग फार कच्चा आहे. तो अनुभवप्रत्यक्षप्रमाण किंवा अनुमान यांजवर रचिला नसून केवळ उपमानरचिततर्कावर अवलंबून आहे.

एखाद्या मनुष्यास अर्धांगवायु झाला म्हणजे त्याच्या शरीरांत कोणता बिघाड होतो हें समजण्यास बिनचूक मार्ग एकच आहे, तो हा कीं, अर्धांगवायूनें मेलेल्या मनुष्याचें शरीर कापून त्यांत कोणता भाग स्वाभाविक स्थितीपासून पालटला आहे हें पहाणें, व या रीतीनें शेंकडों वेळां पाहून एखादा भाग असा आढळून

येईल कीं तो प्रत्येक अर्धांगवायूच्या इसमामध्यें बिनचूक बिघडलेला असतोच, तो भाग या रोगाचें स्थान आहे असें ठरविणें. अशा रीतीनें केलेलें अनुमान यथाशास्त्र होतें व तें प्रत्यक्षाप्रमाणेंच समजावयाचें; कारण प्रत्यक्ष पाहिलेल्या हजारों उदाहरणांवर तें अवलंबून आहे. आजपर्यंत सकाळीं सूर्य उगवलेला पहात आलों म्हणून आपण म्हणतों, कीं उद्यां सकाळींही तो उगवेल. हें अनुमान प्रत्यक्षावर रचिल्यामुळें जसें निरपवादक होतें, तद्वतच आजपर्यंत जीं अर्धांगवायूचीं मनुष्यें आम्हीं फाडलीं, त्यांच्या मेंदूमध्यें एक प्रकारचा बिघाड झालेला नेहमीं बिनचूक पहात आलों, म्हणून अर्धांगवायूच्या रोग्यास आम्ही असें सांगूं शकतों कीं, त्याच्या मेंदूंत विवक्षित ठिकाणीं विकृति झाली आहे. याचप्रमाणें इतर रोगांविषयीं प्रत्यक्ष उदाहरणें पाहून त्यांजवरून सामान्य सिद्धान्त ठरविणें ही जी अनुमान करण्याची शास्त्रीय रीति, तिचा आपल्या निदानशास्त्रांत फारसा उपयोग केलेला आढळत नाहीं. त्यांत रोगाचीं कारणें किंवा त्यांत होणारे शरीरांतील विकार अशा तऱ्हेच्या अनुमानानें न काढतां सृष्टींत घडणाऱ्या बाह्य गोष्टींशीं शरीरांत घडणाऱ्या गोष्टीचें सादृश्य दाखवून बाह्य गोष्टींचीं कारणें आंतील गोष्टीसही लागूं आहेत असा एक त्यांणीं सिद्धांत ठरविला. तो सिद्धांत हाच कीं, बाह्य विश्वामध्यें ज्याप्रमाणें सूर्य, चंद्र व वायु हे प्राण्यांचें पोषण, वनस्पतींचें पोषण व जडपदार्थांचें विक्षेपण म्हणजे हालविणें इत्यादि क्रियेच्या योगानें एकमेक सर्व व्यवस्था ठेवतात, त्याप्रमाणेंच पित्त, कफ व वायु हे शरीराची व्यवस्था ठेवितात. आतां ज्या शक्तीच्या योगानें व्यवस्था होते, तीच विकृति झाली ! म्हणजे अव्यवस्था होते. सूर्याची उष्णता, चंद्राची शीतलता, व वायूची चंचलता (गति) ह्या परस्परांशीं नियमित प्रमाणानें राहतात तोंपर्यंत उजाडणें, पाऊस पडणें, वारा वाहणें, समुद्रास ओहोटी व भरती घेणें इत्यादि क्रिया यथास्थितपणें चालतात व जेव्हां ह्या त्यांच्या परस्पर प्रमाणांमध्यें फरक पडतो, तेव्हां जगाची व्यवस्था बिघडून जाते. अतोनात उन्हाळा किंवा अतोनात हिंवाळा, अवृष्टि किंवा अतिवृष्टि इत्यादि प्रकारच्या ज्या अव्यवस्था उत्पन्न होतात, त्या अव्यवस्था बाह्यसृष्टीचे एक प्रकारचे रोगच होत. सारांश हाच कीं, बाह्यसृष्टींत जसे वारा, सूर्य व चंद्र, त्याचप्रमाणें आपल्या शरीरांत वात, पित्त, कफ सर्व विकृत व अविकृत व्यापारांस कारणीभूत होतात, असा व्यापक सिद्धांत आपल्या पुरातन ऋषींनीं ठरवून टाकिला. ह्या ठिकाणीं वात, पित्त, कफाविषयीं आपल्या पुरातन

ऋषींची काय कल्पना होती, याचें बरेंच स्पष्टीकरण केलें पाहिजे. श्लेष्मा कफ म्हटला म्हणजे घशांतून जो खाकरा पडतो तो; पित्त म्हटलें म्हणजे उलटींतून हिरवें किंवा पिंवळें पडतें तें; व वात म्हटला म्हणजे पोट फुगणें, अंग सुटणें, कळा निघणें, भ्रम होणें इ० प्रकार. ऋषींचा अर्थ ह्यापेक्षां फारच व्यापक असे. उघडच आहे कीं, ज्याला त्यांणीं सूर्याची उपमा दिली एवढेंच नव्हे; पण जें सूर्याचें अंशभूत असें मानलें तें पित्त म्हणजे केवळ उलटींतून पडणारा पिंवळा पदार्थ, किंवा चंद्रतुल्य व चंद्रांशभूत जो कफ, तो केवळ घशांतून पडणारा बेडका असें कधींही होणार नाहीं; याहून त्यांत कांहीं तरी विशेष असलें पाहिजे असें विचाराअंतीं तुमच्या लक्षांत कदाचित् येईल. परंतु ह्याचा खरा अर्थ समजणारे वैद्य आपल्या देशांत आज शेंकडा दोन तरी निघतील किंवा नाहीं, याचा मला संशयच आहे. वात, पित्त, कफ हीं पुरातन ऋषींनीं शरीरांतील तीन तत्त्वेंच मानिलीं होतीं. वात हें तत्व वायुरूपी, अदृश्य, व चालकशक्ति, स्पर्शज्ञान देण्याची शक्ति, शरीरांतील रक्ताचा प्रवाह, मलादिकांचें उत्सर्जन व श्वासोच्छ्वास चालविण्याची रूक्षता व लघुता उत्पन्न करणें इत्यादिकांचें आदिस्थान होय. पित्त हें तत्त्व उष्णतामय व द्रवरूपी असून अन्नाचा रस करणें व मांसादिक धातूंनाही परिपक्वदशेस नेणें, ऊब राखणें, रूपज्ञान देणें, अन्नरसास रंगवून त्याचें रक्त बनविणें, शरीराची कांति राखणें व ऐच्छिक गति उत्पन्न करणें इ. गुणांनीं युक्त आहे. कफ हें तत्त्व जलमय व जलरूपी असून शरीराची आर्द्रता व स्निग्धता राखून त्यास पुष्ट करणें, सांधे बुळबुळीत राखणें, जिव्हेस रसज्ञान देणें, इ. गुणांनीं युक्त आहे; हे अविकृत वातपित्तकफांचे गुण झाले. तेच जेव्हां विकार पावतात, तेव्हां शरीरांत निरनिराळ्या तऱ्हेचे बिघाड व पीडा उत्पन्न करितात. म्हणून वात, पित्त, कफ हे अविकृत असतांना त्यांस धातु म्हणजे देहाचे धारण करणारे व विकृत झाले म्हणजे त्यांस देहास 'बिघडविणारे' अशी संज्ञा आहे. तिन्ही दोष किंवा धातू बिघडणें, ह्याचेंच नांव त्रिदोष होणें. शरीरांतील सर्व विकृताविकृत किंवा स्वस्थास्वस्थ व्यापार वातपित्तकफांच्याच योगें चालतात; त्यांच्यावांचून शरीरांत कांहींच घडामोड व्हावयाची नाहीं, असा सिद्धांत जेव्हां ऋषींनीं ठरविला तेव्हां कोणताही रोग होवो, शरीरांत कोणताही फेरफार होवो, त्यास कोणतीही पीडा होवो, ती या वातादि धातूंच्याच सामर्थ्यानें झाली पाहिजे, अशी त्यांची समजूत झाल्यामुळें त्यांची

वास्तविक उत्पत्ति कशी असते, हें पाहण्याच्या भरांसच ते पडले नाहींत. कांहीं असलें तरी त्यांचा वातपित्ताशीं कसातरी मेळ घालून दिला म्हणजे झालें; अंग पांढरें झालें, कफविकार. पिंवळें झालें, पित्तविकार. काळें झालें, वातविकार. आंगास सूज आली, कफविकार. अंगाची आग झाली, पित्तविकार. अंग ठणकूं लागलें, वातविकार. फार भूक लागली, पित्त वाढलें. कमी भूक लागली, कफ वाढला. एकदां भूक लागावी, असें होऊं लागलें, वातानें विषमाग्नि झाला. असो, याप्रमाणें कोणतेहि विकार घ्या, वातपित्तकफाच्या सदरांत त्यास टाकलें म्हणजे झालें. आतां विचाराअंतीं तुमच्या लक्षांत सहज येईल कीं, ही व्यवस्था केवळ काल्पनिक आहे. ह्यास प्रत्यक्षाचा आधार बिलकूल नाहीं. पहिल्यानें जो सिद्धांत ठरविला तो शरीरव्यापाराचें सूक्ष्म रीतीनें अवलोकन करून ठरविला नसून बाह्य सृष्टींतील व्यापारांच्या सादृश्यावर अवलंबून असल्यामुळें फारच लंगडा आहे, व म्हणूनच मीं त्यांस उपमानरचिततर्क म्हणजे Reasoning by analogy असें म्हटलें आहे. अशा प्रकारचे तर्क पुष्कळ वेळां फसतात. अनुभवलेल्या उदाहणांपासून जो सामान्य नियम ठरविणें तेंच खरें अनुमान; वैद्यशास्त्रांत त्याचाच उपयोग विशेष केला पाहिजे. त्यालाच इंग्रजींत इंडक्शन असें म्हणतात. याचें उदाहरण मीं नुकतेंच दिलें कीं, आजपर्यंत सकाळीं सूर्य उगवलेला आपण पहात आलों म्हणून तो उद्यां उगवेल असें आपण म्हणतों. केवळ सादृश्यावर रचलेले तर्क असे फसतात या विषयीं थोडक्यांत सांगतो म्हणजे अनुमान व उपमान या दोन प्रकारच्या प्रमाणामध्यें किती भेद आहे हें तुमच्या लक्षांत राहील. निर्जीव पदार्थामध्यें सजीव पदार्थांचे कांहीं विशेष गुण दृष्टीस पडले म्हणजे रानटी लोक किंवा लहान मुलें त्यांत जीवित्वारोप करितात हें तुम्हां सर्वांस ठाऊक आहेच. मेघगर्जना होऊन पर्जन्य पडूं लागला म्हणजे. कित्येक जिज्ञासू मुलांस त्याचें मोठें कौतुक वाटून तीं आपल्या आईस जेव्हां प्रश्न करितात कीं, " आई आई, पाऊस कोण पाडतो. " तेव्हां ती त्यास सांगते कीं, " बाळारे, आभाळांत ते मोठाले हत्ती (म्हणजे मेघ) दिसतात किं नाहीं, ते मोठ्यानें ओरतात व सोंडेंत पाणी घेऊन चहूंकडे फेंकतात व तें जें पाणी पडतें तोच पाऊस. " मीं एका पुस्तकांत असें वाचलें आहे कीं, आफ्रिकेच्या मध्य प्रदेशांत एक साहेब प्रवास करीत असतां तो एके दिवशीं थकून जंगलांतील एका झाडाखालीं निजला होता; इतक्यांत तेथिल एक क्रूर रानटी मनुष्य तेथें आला,

व त्यानें त्याच्या खिशांत हात घातला व त्यास बुचाडून घेण्याच्या व मारण्याच्या इराद्यानें त्यांत काय काय आहे तें पाहूं लागला; तों त्यास त्याचें घड्याळ दिसलें; तें कुट्कुट् वाजत होतें म्हणून त्यानें तें कानाशीं धरून पाहिलें तों त्यास असें वाटलें कीं, हा कांहीं तरी चमत्कारिक किडा असावा; म्हणून मोठ्या भीतीनें तें आपल्या हातांतून टाकून तो त्या साहेबासही भिऊन लांबच लांब पळाला!! घड्याळाचा सतत हालणारा कांटा व त्यांत एकसारखा चाललेला ठोका हें जेव्हां त्या रानटी मनुष्याच्या पहिल्यानेंच एका चमत्कारिक पदार्थांमध्यें अनुभवास आलें, तेव्हां सादृश्यावरून तो एका प्रकारचा किडा असावा असा त्यानें तर्क केला. असो; याप्रमाणें केवळ सादृश्यावर बांधलेले तर्क फसतात; व म्हणूनच रोगाच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान आपल्या वैद्यकांत फारच थोडें आढळतें. कांहीं कांहीं रोगांचीं स्थानें देखील पुरातन ऋषींला यथार्थ कळलीं नव्हतीं; मग त्यांच्या उपपत्ति, वगैरे गोष्टी कळणें तर लांबच आहे. उदाहरणार्थ नाळगुद, हलीमक, अर्धांगवायु इ० विकार घ्या. नाळगुद (सर्वांगांस सूज असणारा एक रोग.) हा रोग मूत्र-पिंडाच्या विकृतीपासून होतो. हलीमकाचीं जीं लक्षणें ऋषींनीं सांगितलीं आहेत तीं हृदयाच्या कांहीं रोगांच्या लक्षणाशीं जमतात, म्हणून हलीमक हा रोग हल्लीं ज्यास इंग्रजींत हार्टडिसीज म्हणतात तो होय. तसेंच अर्धांगवायु हा मेंदूंत बिघाड झाल्यानें उत्पन्न होतो असें मी कांहीं वेळापूर्वी सांगितलेंच आहे. ह्या रोगाचीं स्थानें आपल्या पुरातन ऋषींला अवगत नव्हतीं. प्रत्येक रोगामध्यें काय काय होतें हें प्रत्यक्ष पाहून शास्त्रीय रीतीनें अनुमान करण्याची पद्धत त्यांनीं ठेविली असती, तर ही सर्व माहिती त्यांस कालांतरानें मिळाली असती. परंतु तसें न करितां एकदम जी त्यांनीं वातपित्तकफावरच सर्व व्यवस्था लावून दिली त्या त्यांच्या घाईच्या व्यवस्थेमुळें आपल्या वैद्यकाचा निदानभाग फार कच्चा राहून त्याची सुधारणा करण्याविषयीं पुढें ऋषींच्या मागें कोणाचीच प्रवृत्ति झाली नाहीं.

आतां तुम्ही असें विचाराल कीं, हिंदु वैद्यकांतील निदानभाग केवळ काल्पनिक आहे व बाह्य सृष्टींत घडणाऱ्या गोष्टींशीं शरीरांतील गोष्टींचें सादृश्य दाखवून ह्या सादृश्याचे जोरावर ऋषींनीं आपली वातपित्तकफात्मक उपपत्ति रचिली, असें जें मी नुकतेंच सांगितलें ह्यास प्रमाण काय ? हें प्रमाण दाखविण्यास फार लांब जावयास नको; चरकांतील वातकलाकलीय अध्यायांतील कांहीं वाक्यें तुम्हांस वाचून दाखवून

त्यांतील भावार्थ सांगितला म्हणजे झालें. ह्या अध्यायांत पहिल्यानें कांहीं गोष्टींची प्रस्तावना करून पुढें असें म्हटलें आहेः—यानि तुख लुवायोः कुपिताकुपितस्य शरीराशरीरचरस्यशरीरेषुचरतः कर्माणि बहिः शरीरेभ्योवाभवन्ति, तेषामवयवान्प्रत्यक्षानुमानोपमानैः साधयित्वा नमस्कृत्यवायवे यथाशक्ति प्रवक्ष्यामः ॥ इ० असें म्हणून पुढें विकृत व अविकृत शरीर व बाह्य वायूंचीं कर्में सांगितलीं आहेत, त्याचा सारांश येणेंप्रमाणें आहेः—शरीरांतील अविकृत वायु सर्व चेष्टांचा प्रवर्तक, मलादिकांचें विसर्जन करणारा, शब्दस्पर्शाचें आदिकारण, हर्ष व उत्साह ह्यांचें उगमस्थान, मानसिकक्रियांचा उत्पादक असा आहे. तोच विकृत झाला म्हणजे बल, वर्ण, सुख व आयुष्य यांच्या उपघातास कारण होतो; मन उदासीन करितो; इंद्रियें विकल करितो; भय, शोक, मोह, दैन्य, अतिप्रलाप, इत्यादि उत्पन्न करितो. बाह्य वायु अविकृत असतांना पुढील कामें करितोः—पृथ्वीचें धारण, अग्नीचें प्रज्वालन, सूर्यादि नवग्रहांची संतत गति चालविणें, मेघ उत्पन्न करणें, पाऊस पाडणें, नद्या वाहविणें इ० तोच विकृत झाला म्हणजे समुद्राचा प्रचंड क्षोभ, नद्यांचे दुस्तर ओघ, भूमीचा आकस्मिक कंप, मेघांचें पलायन, पर्वतशिखरांचा विच्छेद, वृक्षांचा उच्छेद, सकल चराचर भूतांचा प्रलय, इत्यादि गोष्टींस कारणीभूत होतो. याप्रमाणें वायुस्तुति झाल्यानंतर पुढें अग्नीचा किंवा पित्ताचा कैवारी दुसरा एक ऋषि सर्व विकृताविकृत बाह्यांतर वस्तूंचें कारण अग्नि देवताच आहे, असें दाखवितो. व तदनंतर तिसरा एक चंद्राभिमानी ऋषि सकल शारीरिक गोष्टी कफांतर्गत जें सोमवीर्य त्याचे योगानें घडून येतात, असें आपलें मत प्रकट करितो. पुढें या तिन्ही मतांची एकवाक्यता करून आत्रेयऋषि असें ठरवितात कीं, जसें नुस्त्या सूर्यशक्तीनें, केवळ चंद्रशक्तीनें, किंवा फक्त वायुशक्तीनेंच कोणतीही सृष्टींतील गोष्ट घडून येत नाहीं, पर्जन्यादिकरून सृष्टींतील सर्व गोष्टी सिद्ध होण्यास ह्या तीन्ही शक्तींची जशी सारखीच अवश्यकता आहे, तद्वतच तदंशभूत व तत्प्रतिनिधीभूत जें वात, पित्त, कफ, ह्या तिन्ही तत्त्वांच्या युगपत्क्रियेनेंच शरीरांतील सर्व शुभाशुभ गोष्टी घडून येतात. सुश्रुतानें देखील ह्याचा सारांश पुढील श्लोकांत फार चांगल्या रीतीनें थोडक्यांत सांगितला आहे.

विसर्गादानविक्षेपैश्चंद्रसूर्यानिला यथा ।
धारयन्ति जगद्देहम् कफपित्तानिलास्तथा ॥ १ ॥

विसर्ग म्हणजे देणें; चंद्र पृथ्वीस काय देतो ? आपल्या शीतकिरणांचे योगानें तो औषधींचें पोषण करितो (म्हणजे त्यांस रस देतो.) आदान म्हणजे घेणें; उघडच आहे कीं, सूर्य आपल्या उष्णतेच्या योगानें पृथ्वीवरील पाण्याचें व वनस्पतीच्या रसाचें शोषण करितो [म्हणजे ते काढून घेतो]. ह्या दोन क्रिया परस्पर विरुद्ध आहेत. चंद्र देतो (विसर्ग करितो), व सूर्य घेतो (आदान करितो); चंद्राचे योगानें जग पुष्ट होतें, व सूर्याचें योगानें शुष्क होतें; चंद्र घडवितो, सूर्य मोडितो; ह्या दोन विरुद्ध शक्ति सर्व घडामोडींस कारणीभूत होतात.

वरील श्लोकांत विक्षेप ही वायूची क्रिया सांगितली आहे. विक्षेप म्हणजे गति देणें. वायु विक्षेप करितो म्हणजे जगांतील सर्व पदार्थांस गति देतो. याप्रमाणें पोषण, शोषण, व विक्षेपण ह्या तीन क्रियांच्यायोगें चंद्र, सूर्य व वायु हे जसे ह्या जगांतील सर्व गोष्टींची व्यवस्था करितात, तद्वतच देहामध्यें कफ, पित्त वात, हे सर्व गोष्टींची घडामोड करितात.

असो. ह्यावरून मीं जें सांगितलें तें सप्रमाण आहे अशी सर्वांची खात्री होईल. वातपित्तकफाची उपपत्ति केवळ सृष्टींतील गोष्टीच्या सादृश्यावर रचिली आहे; एवढ्यावरूनच मी तिला सदोष म्हणतों असें मात्र कोणीं समजूं नये. ह्या उपपत्तीवर जें प्रत्येक रोगाचें निदान आमच्या शास्त्रकर्त्यांनीं बांधलें आहे, त्या निदानांतील दोष जेव्हां धडधडीत माझे दृष्टीस पडले, (व ह्या दोषांचीं कांहीं उदाहरणें मीं नुक्तींच सांगितलीं) तेव्हांच मीं त्यांस सदोष ठरविलें. केवळ त्याचे बाह्यस्वरूपावरूनच मी त्यास दोष देत नाहीं, व हें वातपित्तकफात्मक निदानशास्त्र सर्वथैव चुकीचें आहे असेंही माझें म्हणणें नाहीं. त्यांत स्थूलदृष्टीनें पहातां खरा भाग बराच आहे. उघडच आहे कीं ज्या अर्थीं पृथ्वीवरील सर्व घडामोडी उष्णता, शैत्य, व गति ह्या तीन शक्तींच्या योगानेंच चालतात त्या अर्थीं देहांतीलही सर्व घडामोडी त्यांच्याच योगानें चालल्या पाहिजेत; परंतु हा स्थूल विचार झाला. शरीरांत घडणाऱ्या गोष्टींचें सूक्ष्म ज्ञान होण्यास या स्थूल विचारांचा फारसा उपयोग होत नाहीं. शरीरांतील सर्व गतिविशिष्ट व्यापार गति उत्पन्न करणाऱ्या कांहीं एका शक्तीनें चालतात असें म्हटल्यानें व त्या शक्तीस वायु असें दुसरें नांव दिल्यानें त्या व्यापाराचें योग्य विवेचन किंवा स्पष्टीकरण केल्यासारखें होत नाहीं. शरीरांत गति कशी उत्पन्न होते, आपल्यास हात पाय इच्छेनुरूप कसे हालवितां येतात, ते हालवितां येण्याकरितां कळा, कमानी, टेक,

व तर्फा यांची कशी योजना केली आहे, रुधिराभिसरण कसें चालतें, श्वासोच्छ्वास कसा चालतो, मूत्रोत्पत्ति कशी होते, अंगांत जी नेहमीं उब राहते ती कशी उत्पन्न होते, मानसिक क्रियेचें स्थान कोणतें इ० गोष्टींचें यथार्थ ज्ञान अशा स्थूलदृष्टीनें कधींहि व्हावयाचें नाहीं; व तसें ज्ञान झाल्यावांचून शरीरांत निरानिराळे विकार कसे होतात याचेंही यथार्थ ज्ञान होणार नाहीं. हें ज्ञान होण्यास उष्णता, शैत्य, व वायु म्हणजे गत्युत्पादक शक्ति अशा स्थूल विचाराचा कांहीं उपयोग नाहीं. थोडक्यांतच सर्वांचा समावेश करावा असा जर आपल्या ऋषींचा उद्देश होता, तर याहूनहि स्थूल विचार वेदान्तवेत्त्यांनीं केलाच आहे, तो घेतला असता म्हणजे झालें. तो स्थूल विचार हाच कीं, जें जें विश्वांत घडून येतें त्या सर्वांचें कारण कांहींतरी एक अनिर्वचनीय शक्ति आहे, त्या शक्तीचें नांव माया. परंतु इतका स्थूल विचार केल्यानें वैद्यशास्त्रांत कांहीं चाललें नसतें म्हणून आपल्या ऋषींनीं तीन तरी मुख्य शक्ति गृहीत केल्या. त्या वेळच्या साधनांच्या मानानें पहातां ह्या तीन तत्त्वांचें ग्रहण करून, त्या प्रत्येकाचे पुनः पांच भाग करून, प्रथम दृष्टीस समाधान करणारी अशी आपल्या निदानशास्त्राची जी ऋषींनीं व्यवस्था लावून दिली ती त्यांना फारच भूषणास्पद आहे. इतकें बुद्धिकौशल्य, इतकें चातुर्य, इतकी व्यवस्था, आपल्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही प्राचीन वैद्यकांत आढळत नाहीं; व म्हणून जरी कालगतीनें वाढलेल्या ज्ञानाच्या साधनानें शरीरांत घडणाऱ्या गोष्टींचें वास्तविक स्वरूप अर्वाचीन वैद्यकवेत्त्यांना चांगलें कळूं लागल्यामुळें प्राचीन वैद्यकांतील निदानशास्त्राची व्यवस्था पुष्कळ अंशीं काल्पनिक ठरली जाऊन ती तूर्त आपल्यास फारशी उपयोगी पडण्याजोगी नाहीं, तथापि त्या निदानशास्त्राची रचना करण्याच्या चातुर्याबद्दल चरकसुश्रुतादिकांची प्रशंसा केल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं.

येथपर्यंत आपल्या वैद्यकाच्या निदानभागाविषयीं झालें. ह्यांत ज्या ज्या गोष्टी मीं येथें सांगितल्या त्या जितक्या होतील तितक्या स्पष्ट करण्याचा जरी मीं यत्न केला आहे, तथापि पुष्कळांच्या मनावर त्यांचा उठावा तसा ठसा उमटला नसेल असें मला वाटतें. कारण कितीही स्पष्ट करून सांगितल्या तरी, अशा गोष्टी चांगल्या रीतीनें समजण्यास अर्वाचीन पदार्थविज्ञान, रसायन, व शारीर ह्या शास्त्रांची थोडीबहुत तरी माहिती असली पाहिजे, व ही माहिती असणारे लोक

ह्या समाजांत फारच थोडे निघतील. शरीरांत घडणाऱ्या गोष्टींविषयीं आपल्या शास्त्रांतील उपपत्ति सदोष आहेत, हें समजण्यास खऱ्या उपपत्तींची माहिती असणें जरूर आहे. आतां ह्या खऱ्या शास्त्रार्थाची थोडीशी जरी माहिती द्यावी म्हटलें, तरी त्याचें एक स्वतंत्र व्याख्यानच होईल. यास्तव प्रस्तुत त्याविषयीं मी कांहींच सांगूं शकत नाहीं. असो, आतां आपल्या वैद्यकाच्या दुसऱ्या भागाचा म्हणजे चिकित्सेचा विचार करण्यापूर्वी ज्याविषयीं लोकांमध्यें अंधपरंपरेनें फारच भोळसर विचार फैलावले आहेत, अशा नाडीपरीक्षेच्या संबंधानें दोन शब्द सांगतों. आपल्या लोकांची अशी समजूत आहे कीं नाडीच्या योगानें शरीरांतील यत्किंचित् फेरफाराचें ज्ञान होतें; हें ज्ञान मोठ्या मोठ्या वैद्यांस इतकें असतें कीं ते नाडी पाहून मनुष्यानें काय खाल्लें आहे हें देखील सांगूं शकतात. अशा तऱ्हेची अतिशयोक्ति अज्ञजनांच्या मुखें सर्वांनीं ऐकली आहेच.

अशी जी ही नांवाजलेली नाडीपरीक्षा तिचा उल्लेख चरकसुश्रुतादि प्राचीन ग्रंथांत बिलकूल नाहीं. वाग्भटानें देखील तिजविषयीं कांहीं लिहिलें नाहीं. शार्ङ्गधर, भावप्रकाश वगैरे अर्वाचीन ग्रंथांत मात्र नाडीविषयीं कांहीं वर्णन आढळतें; व दुसऱ्या कित्येक अलीकडच्या ग्रंथांत नाडीपरीक्षेचें प्रकरण सुरू करतांना तें हारीत ऋषीच्या ग्रंथांतून घेतलें आहे, असें सांगितलें आहे. परंतु हा ग्रंथ उपलब्ध नसल्यामुळें हें म्हणणें सप्रमाण आहे अशी खातरी होत नाहीं. कारण एखादी गोष्ट जरी नवीन निघाली असली तरी तिचें महत्त्व वाढविण्याकरितां ती प्राचीन ऋषींना संमत आहे असा आधार दाखविण्याचा अलिकडच्या लोकांनीं प्रघात पाडला आहे. हारीत हा एक वैद्यकावरचा ऋषि आहे हें खरें, पण त्याचा ग्रंथ उपलब्ध नाहीं, व जो ग्रंथ उपलब्ध नाहीं त्याचाच दाखला नाडीपरीक्षेविषयीं देतात; ह्यामुळें त्याच्या खरेपणाविषयीं थोडासा अंदेशा आहे. ऋषींच्या वेळीं नाडीपरीक्षा प्रचारांत असो किंवा नसो, [ती नव्हती असें माझें मत आहे] ज्या अलिकडच्या ग्रंथांत तिचें वर्णन आढळतें त्यांणीं तरी तिची इतकी बढाई वर्णिली आहे असेंहि नाहीं. ग्रंथांत तिजविषयीं इतकेंच लिहिलें आहे, कीं नाडीमध्यें शक्ति व प्रकृति साधारणपणें समजते, व अग्निमांद्य, क्षय, अशक्तता, ज्वर ह्या स्थितींचें व त्यांच्या साध्यासाध्य प्रकाराचें ज्ञान होतें. ह्याहून अधिक कोठेंच सांगितलें नाहीं; उदरामध्यें अमूक प्रकारची नाडी असते, कृमि झाले असतां ती अमक्या प्रकारची असते, किंवा उपदंशांत अमक्या प्रकारची असते, असें कोठेंच सांगितलें

नाहीं. ह्यावरून नाडीपरीक्षांविषयीं आपल्या लोकांच्या ज्या भोळसर समजुती आहेत त्यांस वैद्यांच्या थापाच कारणीभूत असाव्या असें वाटतें. आतां आपल्या वद्यकाच्या चिकित्साप्रकरणाचें थोडेसें विवेचन करूं. चिकित्सा म्हणजे औषधानें किंवा शस्त्रानें रोग बरा करण्याविषयीं प्रयत्न करणें. निदानभागाचा विचार करितांना त्यांत मीं जे दोष दाखविले त्यांवरून तुम्हांस असें वाटेल कीं चिकित्सेच्या संबंधानें देखील माझें मत असेंच आहे, पण तें तसें नाहीं. हा भाग प्राचीन काळीं बऱ्याच परिपक्वदशेस येऊन पोंचला होता. ऋषींनीं हजारों वनस्पतींचे गुणदोष फार बारकाईनें पाहिले होते. ज्वर, अतिसार, कास, श्वास, मूळव्याध, कुष्ठ, मेह, उदर, कृमि इ. रोगांवर कोणकोणतीं औषधें कशीं उपयोगीं पडतात, ह्याचा त्यांणीं फार चांगला अनुभव घेतला होता. त्यांचे चिकित्सेसंबंधीं नियम व उपपत्ति अर्वाचीन सुधारलेल्या वैद्यकाशीं जमतात. प्राचीन ग्रंथांत सांगितलेल्या चिकित्सेचा हल्लीं आपल्या देशांत अगदीं लोप झाला आहे. हल्लींची चिकित्सा पुरातन शास्त्रास अनुसरून नाहीं. कारण वैद्यकाच्या शाळा नसल्यामुळें व गुरुपरंपरा बुडाल्यामुळें, जे लोक स्वतः शिकून वैद्य होतात त्यांचें द्रव्यसाधन व ज्ञानसाधन हीं दोन्हीं कमी असल्यामुळें, शास्त्रज्ञ वैद्य हल्लीं फारच थोडे आढळतात; व पुण्यासारख्या शहरामध्यें जर कदाचित् एखादा दुसरा वैद्य शास्त्राच्या उपपत्तींत प्रवीण असला तर त्यास शास्त्रोक्त चिकित्सा करण्याचीं साधनें नाहींत. कारण वनस्पतींच्या ज्ञानासंबंधानें भोपळ्याएवढें पूज्य. दशमुळें बाजारांत मिळतात. तीं खरीं खोटीं हें कशानें समजणार ! वर्धारा झाड आहे किंवा वेल आहे, पाहाडमूळ तांबडें असतें किंवा पिंवळें असतें, सहदेवी कशाला म्हणतात, वगैरे माहिती, गुरुपरंपरा बुडाल्यामुळें, एका देखील वैद्यास नाहीं. मी म्हणतों ह्याचें प्रमाण दाखविण्यास फार लांब जावयास नको. हल्लीं खऱ्या वनस्पतींचा लोप होऊन त्याजबद्दल जीं शेंकडों खोटीं औषधें दुकानांत मिळतात, त्या खोट्या औषधांपासूनच पुष्कळ वैद्य आपले कषाय, चूर्णें, गुटिका, पाक इ० तयार करितात ह्या गोष्टीवरूनच माझें म्हणणें सिद्ध होतें. सारांश, इतकाच कीं आपल्या वैद्यकांतील चिकित्सा प्रकरणाची जी मीं प्रशंसा केली ती सांप्रतच्या वैद्यक्रियेस लागूं नाहीं.

रसायन क्रिया

आपल्या देशांत प्राचीन काळापासून वैद्यकावर जे शेंकडों ग्रंथ झाले आहेत ते तपासून पाहिले म्हणजे त्या ग्रंथांचे (चिकित्सेच्या संबंधानें) दोन भाग करितां येतात. पहिल्या भागांत वाग्भटाच्या पूर्वीचे म्हणजे सुमारें २००० वर्षांपूर्वीचे ग्रंथ येतात. व दुसऱ्या भागांत त्याचे अलीकडील ग्रंथांचा समावेश होतो. वाग्भटाच्यापूर्वी बचनागादि विषांचा व पारदादि धातूंचा पोटांत घेण्याच्या औषधांत बिलकूल उपयोग करीत नसत. वाग्भटाचे वेळीं हीं औषधें नुकींच प्रचारांत येऊं लागलीं होतीं व पुढें त्यांचा इतका फैलाव झाला कीं त्यांणीं कांहीं दिवसांनीं वनस्पतींस मागें हटविलें. उत्तरोत्तर लोकांची त्यांजवर अधिकाधिक श्रद्धा व भक्ति उत्पन्न झाली. विषांची व पारदादि धातूंची औषधांत योजना करणें हा एक चिकित्सेचा निराळा पंथच झाला. धातूंचें शोधून व मारण, विषांचें शोधन व मारण—ह्यांचा स्वतंत्र धंदाच बनला, व ह्या धंद्यास रसक्रिया असें नांव पडलें. ह्या क्रिया जेथें चालत त्या ठिकाणाला रसशाला [प्राचीन केमिकल ल्याबोरेटरी] अशी संज्ञा असे. जे लोक अशा प्रकारच्या औषधांचा विशेषेंकरून उपयोग करीत असत, त्यांस रसवैद्य अशी संज्ञा दिलेली आढळते. सारांश इतकाच कीं, रसक्रियेची उत्पत्ति ही आर्यवैद्यकाच्या इतिहासांतील एक फारच महत्त्वाची गोष्ट आहे असें लक्षांत ठेवलें पाहिजे. ही उत्पत्ति ज्ञानोत्कर्षाची सूचक आहे. ऋषींच्या वेळेपेक्षां ह्या वेळच्या लोकांचें पदार्थविज्ञान वाढलेलें होतें ह्यांत कांहीं संशय नाहीं. पारा व गंधक हे दोन पदार्थ मिसळले म्हणजे कज्जली नामक एक काळी पूड तयार होते; ती पूड अग्नीवर ठेऊन ऊर्ध्वपातन यंत्रानें तिचें फूल पाडलें म्हणजे तांबडा लाल रससिंदूर तयार होतो; तांबें कांहीं विशेष रीतीनें जाळलें म्हणजे त्याचीं निरनिराळ्या रंगाचीं भस्में तयार होतात. मोरचूत, मोराचीं पिसें, गांडवळ इत्यादि पदार्थांपासून तांबें निघतें. नवसागर, कथील, व गंधक ह्यांच्या मिश्रणानें वालुकायंत्रामध्यें सोन्याच्या भुकटीसारखी एक चकचकीत पिवळी जरद पूड तयार होते. ह्या व दुसऱ्या अनेक गोष्टींचा शोध चरकसुश्रुतादिकांनंतर जे तत्त्ववेत्ते झाले त्यांणीं लाविला. त्या वेळच्या हिंदुस्थानांतील

रसशालांमध्यें आपल्या रसवैद्यांनीं अशा प्रकारचे जे अनेक महत्त्वाचे शोध केले ते युरोपियन लोकांच्या वैभवास कारणीभूत जें अर्वाचीन रसायन शास्त्र त्याच्या उत्पत्तीस पुष्कळ अंशीं कारणीभूत झाले. तसेंच हल्लीं होमिओप्याथी नामक जो चिकित्सेचा प्रकार प्रचारांत येत चालला आहे, त्याचें मूळ पाहूं गेल्यास तें आपल्या रसक्रियेंतच मिळेल ह्यांत संशय नाहीं. असो; ह्या अनेक कारणांवरून रसक्रियेचें महत्त्व फार आहे असें सिद्ध होतें. रस म्हणजे पारा. रसक्रियेमध्यें जरी सर्व धातूंवर व सर्व विषांवर शोधनमारण इत्यादि संस्कार केले जातात, तथापि पाऱ्याच्या कांहीं विचित्र गुणांवरून त्याचें महत्त्व पुरातन रसवैद्यांच्या मनांत इतकें ठसलें होतें कीं, त्याचें वर्णन त्यांनीं, फारच विलक्षण प्रकारचें केलें आहे एवढेंच नव्हे, तर धातुविषयक शास्त्रांस जें त्यांणीं नांव दिलें तें देखील रस [पारा] ह्या शब्दानेंच आरंभ पावतें.

पारदादि धातूंचे व बचनागादि विषांचे औषधीय गुण चरकसुश्रुतादिकांस फारसे माहीत नव्हते. त्यावेळीं बहुधा वनस्पतींचींच सर्व औषधें असत; धातूंपैकीं लोखंडाचा मात्र पोटांत देण्याच्या औषधांमध्यें ते उपयोग करीत असत; इतर धातूंचा किंवा ते ज्यांत आहेत अशा पदार्थांचा बाहेरून लावण्याच्या औषधांमध्यें मात्र केव्हां केव्हां उपयोग करीत असत. ऋषींच्या नंतर कांहीं शतकांनीं जेव्हां पदार्थविज्ञानशास्त्रांतील माहिती वाढली, देशांत कलाकौशल्याची वृद्धि झाली, कांचेच्या कुप्या, नळ्या वगैरे रसायनशास्त्रासंबंधीं यंत्रें लोकांना तयार करितां येऊं लागलीं, तेव्हां रसक्रिया हळु हळु प्रचारांत आली. हा उत्कर्षसूचक फेरफार वाग्भटाच्या वेळेस बऱ्याच अंशीं घडून आला होता असें वाटतें; कारण वाग्भटानें आपले ग्रंथांत पाऱ्याचा पौष्टिक प्रयोगामध्यें उपयोग केलेला आढळतो; शिवाय रसरत्नसमुच्चय नामक जो रसक्रियेवर उत्तम ग्रंथ आहे तो वाग्भटानेंच केला आहे (जरी ह्याविषयीं थोडासा मतभेद आहे). ह्यावरून असें दिसतें, कीं ही रसक्रिया झाली तरी बरीच जुनाट आहे. कोणतीही नवीन गोष्ट प्रचारांत येण्यास कांहीं दिवस लागतात, कारण तिजवर लोकांचा एकदम विश्वास बसत नाहीं. रसक्रियेच्या संबंधानें तर हा सिद्धांत अधिकच खरा आहे. कारण पहिल्यानेंच जेव्हां पारदादिकांचा उपयोग वैद्य लोक करूं लागले, तेव्हां त्यांचें शोधन वगैरे योग्य रीतीनें न झाल्यामुळें, किंवा त्यांच्या सर्व गुणधर्मांची माहिती नसल्यामुळें त्यांजपासून अनेक वेळां अपाय झालेले लोकांच्या दृष्टीस पडले असावे;

व म्हणून लोक अशा औषधांचा आरंभीं तिरस्कारच करीत असत. पुढें जसजसा वैद्यांचा अनुभव वाढत चालला तसतसे ते अशा औषधांत विशेष सुधारणा करून त्यांचा अधिकाधिक उपयोग करण्याविषयीं प्रयत्न करूं लागले. व कांहीं दिवसांनीं जरी त्यांचीं रसक्रियेचीं औषधें अगदीं निर्दोष झालीं, तथापि लोकांची त्यांजवर श्रद्धा उत्पन्न करण्यास त्यावेळच्या रसवैद्यांस बरेच प्रयास पडले असावे असें रसक्रियेवरील ग्रंथावरून स्पष्ट दिसून येतें. आपल्या लोकांची ही एक खोड आहेच कीं कोणतीही गोष्ट असो, तिला धर्माचें स्वरूप दिलें, व तिला श्रुतिस्मृतिपुराणांचा आधार दाखविला म्हणजे ती त्यांना मान्य झालीच. रसक्रियेच्या प्रवर्तकांनींही ह्याच युक्तीची योजना केली. पारा हें साक्षात् शिवाचें बीज, गंधक किंवा अभ्रक हें पार्वतीचें बीज; मग ह्या पदार्थांची योग्यता काय विचारावयाची!! पुराणांतील शेंकडों आधार काढून दाखवून पाऱ्याचें महात्म्य, त्याच्या दर्शनाचें फल, त्याच्या स्पर्शनाचें फल, त्याच्या भक्षणाचें अद्भुत फल, ह्यांची एक त्यांणीं मालिकेची मालिकाच लावून दिली, एवढेंच नव्हे पण जो पाऱ्याची निंदा करील तो रौरवनरकांत जातो असेंही सांगितलें. मग रसक्रियेचा प्रचार होण्यास काय उशीर? त्यावेळीं शिवपूजा सर्वत्र फार प्रचारांत आली होती. ह्या शैवपंथांतलिच कांहीं लोकांनीं हटयोग व रसक्रिया ह्यांचा चांगला अभ्यास करून रसेश्वरपंथ ह्या नांवाचें एक निराळें मतच स्थापित केलें. पाराच काय तें त्यांचें ब्रह्म. पाऱ्याचें लिंग करून त्याची ते पूजा करीत. पाऱ्यावर बंधन, मूर्च्छन, मारण, इत्यादि संस्कार करून अजरामर होण्याकरितां ते त्याचें सेवन करीत. कसलाही रोग कोणास झाला असला तरी, अशा तऱ्हेनें तयार केलेलें पारदभस्म देऊन ते तो बरा करीत. शरीर अत्यंत निरोगी व दृढ करणें; बल, वीर्य, स्मृति, मेधा इ. वाढविणें; अंतराळीं चालणें, अदृश्य होणें, त्रिकालज्ञानी होणें इ० ज्या योगशास्त्रांतील अद्भुतासिद्धि त्या सर्व पाऱ्याच्या यथाशास्त्र सेवनानें प्राप्त होतात असें त्यांचें मत असे. सारांश इतकाच कीं, हा पंथ सुरू झाल्यापासून पाऱ्याच्या महत्त्वाची कमालच झाली. त्याला त्यांणीं सर्व शक्तीचें अधिष्ठान, सर्वभूतांची प्रकृति, अनादि व अविनाशी असें केवळ परब्रह्मच मानलें याहून अधिक महत्त्व तें कोणतें. असो; अशा रीतीनें रसक्रियेचा प्रचार उत्तरोत्तर इतका वाढत गेला, कीं शेवटीं प्राचीन ग्रंथांतील वनस्पतींचा हळु हळु लोप होऊं लागला, त्यांतील चिकित्सेसंबंधीं नियमही बुडत चालले; पहिल्यानें सांगितल्याप्रमाणें शस्त्रक्रिये-

चाही नुक्ताच लोप झाला होता. हिंदु वैद्यकास एक प्रकारचें स्थित्यंतरच प्राप्त झालें ही त्याची दुसरी अवस्था म्हटलें तरी चालेल. ह्या अवस्थेंत कांहीं गोष्टींचा नाश झाला व कांहीं गोष्टींचा लाभ झाला. प्रस्तुत आपल्या वैद्यकास तिसरी स्थिति म्हणजे अगदीं निकृष्टदशा प्राप्त होऊन सर्वच गोष्टींचा लोप होत चालला आहे. ऋषींच्या वेळच्या वनस्पतीही गेल्या, व यथाशास्त्र रसक्रियाही करितां येत नाहीं. तेलही गेलें, तूपही गेलें व हातीं धुपाटणें राहिलें, अशी स्थिति झाली आहे.

रसक्रियेची प्रवृत्ति व वनस्पतींच्या ज्ञानाचा ऱ्हास ह्या दोहोंचा फार निकट संबंध आहे, किंबहुना तीं एकमेकांस कारणीभूत आहेत म्हटलें तरी चालेल. चरकसुश्रुतादिकांच्या वनस्पती बहुधां हिमालयाच्या आसपास उत्पन्न होणाऱ्या असल्यामुळें आर्य लोकांच्या वसाहती जेव्हां दक्षिणेकडे हळु हळु पसरत चालल्या तेव्हां त्यांस त्या हिमाचलीय वनस्पती चांगल्या व सहज रीतीनें मिळेनातशा झाल्या; शिवाय लोकसंख्येचा विस्तार जसजसा वाढत जातो, तसतसा वनस्पतींचा व चतुष्पादादि प्राण्यांचा ऱ्हास होत जातो, हा एक सृष्टीच्या इतिहासांतील नियमच आहे. कारण मनुष्य ह्या पृथ्वीवर आल्यापासून त्याणें आपल्या अन्नवस्त्राकरितां, शेतकीकरितां, वसाहतीकरितां, व बचावाकरितां इतर जीवसृष्टीचा वध सुरू केला आहे. जेथें जेथें झाडी दिसेल तेथें ती तोडून टाकून तो आपलीं घरें बांधीत आहे, शेतें पिकवीत आहे, व्याघ्रादि हिंसक पशूंचा संहार करीत आहे, शिकार करून मृगपक्ष्यादिकांना खाऊन टाकीत आहे, आपल्या उपयोगाकरितां व चैनीकरितां पशुपक्ष्यादिकांना व आपल्यापेक्षां कमजोर अशा स्वजातीय प्राण्यांना देखील माणसाळून नरम करीत आहे. असा जो ह्या मनुष्याचा इतर जीवसृष्टीशीं जीवितरक्षणार्थ घोर कलह चालला आहे, त्या कलहाच्या सपाट्यांत जर दंडकारण्यासारखीं अरण्यें नाहींशीं झालीं, अनेक जातीच्या जनावरांचें निसंतान होऊन त्यांचीं नांवें मात्र इतिहासांत उरलीं आहेत, सह्याद्रीसारख्या पर्वताचा देखील नाश होत चालला आहे, उत्तर अमेरिकेंतील राष्ट्रांचीं राष्ट्रें स्यानिअर्ड लोकांनीं धुळीस मिळवून टाकिलीं, तर प्राचीन काळच्या कांहीं वनस्पती दुर्मिळ होऊं लागल्या ह्यांत आश्चर्य काय ? सारांश हाच कीं, दक्षिणेकडे आर्यांचा विस्तार झाल्यावर त्यांना वनस्पती मिळविणें फार कठीण व गैर-

सोईचें झालें. जीवक, ऋषभ, मेदा, महामेदा, कापोती, श्वेतकापोती, सोमलता इ० औषधि हिमालयांतल्या हिमालयांतच राहिल्यामुळें त्यांचा त्यांना विसरच पडला. सुरवरी हिरड्याबद्दल रंगारी हिरड्याचा उपयोग करूं लागले, हिमालयांतील मोठाल्या आवळ्याबद्दल इकडील क्षुद्र आवळे मिळूं लागले, दशमुळांतील कांहीं औषधांत भेसळ होऊं लागली, शिलाजीत खरा मिळेनासा झाला, धर्मक्रांतीमुळें मांसरस व मद्य यांच्या उपयोगास तर ब्राह्मण लोक अगदींच मुकले होते. अशा स्थितीमध्यें त्रिफळेचा रसायनी किंवा सर्वव्याधिनाशक उपयोग कशानें होणार? दशमूलानें ते ते रोग कसे जावे? शिलाजितानें मधुमेह कसा बरा व्हावा? सन्निपातज्वारानें किंवा क्षयानें क्षीण झालेल्या रोग्याचें मांसरस व मद्य ह्यावांचून जीवितरक्षण कशानें होणार? वैद्यक्रियेमध्यें क्षणोक्षणीं अशा प्रकारच्या अडचणी येऊं लागल्या. ह्या स्थितींत कांहीं तरी सुधारणा झाली पाहिजे असें विचारी वैद्यांच्या मनांत येऊन चुकलें. गरज पडली म्हणजे मनुष्याला युक्ति सुचते. नवीन औषधांचा शोध करण्याकडे सर्व विद्वान् वैद्यांचें लक्ष लागलें, कोणी बचनागावरच अनुभव घेऊं लागला, कोणी सोमलाचा काय उपयोग होतो हें पाहूं लागला, कोणी मोरचूद देऊं लागला, कोणी कलखापरीचा प्रत्यय घेऊं लागला, ह्या प्रकारें अनेकांनीं अनेक नवीन जलाल औषधें शोधून काढलीं.

हे शोध करणारे लोक बहुतकरून योगपंथांतील असत. रसक्रियेवर जितके म्हणून प्राचीन ग्रंथ आहेत, ते सारे बहुधा ह्याच लोकांचे आहेत; उ० गोविंद भगवत्पादाचार्य नामक जे शंकराचार्यांचे गुरु होते, त्यांचा एक रसहृदय नामक ग्रंथ प्रसिद्ध आहे, त्याचप्रमाणें स्वच्छंदभैरव, मंथानभैरव, नित्यनाथ, सुरानंदकाकचंडीश्वर इ. योगी ग्रंथकर्ते होऊन गेले. योगाभ्यास करणारे लोक बचनाग, कुचला, मनशिळ, अफू, गांजा इ. विषांचें सेवन करितात हें सर्वांस ठाऊक आहेच. अशा विषारी पदार्थांची माहिती त्याच लोकांत विशेष आढळते. ते लोक संसारत्रासापासून सुटलेले अरण्यवासी, उद्योगी, विचारी व आपल्या जीवाविषयीं बेपर्वा असल्यामुळें हे शोध करण्यास ते फारच लायक असत. अरण्यांत ज्या हजारों वनस्पती नेहमीं त्यांच्या दृष्टीस पडत व डोंगरांत जे निरनिराळे खनिज पदार्थ त्यांना सांपडत, त्यांच्या गुणदोषांचें त्यांनीं फार बारकाईनें अवलोकन केलें; कोणत्या वनस्पतीच्या रसानें पारा घट्ट होतो, कोणत्या वनस्पतीनें लोखंडाचा द्रव होतो, कोणत्या वनस्पतीच्या योगानें हरताळ निर्दोष होते; बचनाग

कशाशीं खाल्ला म्हणजे जीभ रिवरिवत नाहीं, अफू कशाशीं खाल्ली ह्मणजे अवष्टंभ होत नाहीं, कोणत्या द्रव्याच्या संयोगानें भांगेचा वामक धर्म नाहींसा होतो, सोमल पोटांत गेल्यास त्यास उतारा काय द्यावा, एखाद्यास पाऱ्यापासून विकार झाल्यास त्यास प्रतिकार काय करावा, इत्यादि गोष्टींचा त्यांनीं शोध लावला. या त्यांच्या शोधापासून आर्यवैद्यकांत एक फार महत्त्वाची भर पडली. ऋषींच्या वेळच्या वनस्पतीच्या, शस्त्रक्रियेच्या व मद्यमांस खाण्याच्या चालीच्या वियोगापासूच जें त्यांचें नुकसान झालें होतें तें ह्या नवीन ज्ञानानें अंशतः भरून दिलें. सन्निपात-ज्वरांत किंवा महामारींत निचेतन झालेल्या प्राण्यास उठविण्याकरितां मद्यमांस रसाचे ऐवजीं, अनेक रामबाण मात्रा उत्पन्न झाल्या. पुष्कळ नेहमींच्या वनस्पतीं-बद्दल देखील खनिज पदार्थांचा उपयोग करितां येऊं लागला. रसक्रियेच्या औषधां-मध्यें वनस्पतीपेक्षां तीन गोष्टी विशेष आहेत; त्यांचा गुण तत्काळ अनुभवास येतो, त्यांचें घेण्याचें मान थोडकें असल्यामुळें व त्यांची चवही वाईट नसल्या-मुळें सहज घेतां घेतात. व तीं फार दिवस टिकणारीं असल्यामुळें त्यांचा सर्वत्र सर्व काळ पुरवठा करितां येतो. यास्तव रसक्रियेची उत्पत्ति ही एक आर्य-वैद्यकांतील सुधारणाच समजली पाहिजे. ह्या प्रकारच्या सोयीमुळें रसक्रियेचा प्रचार हळु हळु इतका वाढला, कीं कांहीं दिवसांनीं सर्व वैद्यक्रिया तिजवरच चालूं लागली. वनस्पतीच्या औषधांस कोणीच विचारीनासें झालें. ह्यामुळें वनस्पतींचें ज्ञानही हळूहळू नाहींसें होत चाललें. वाण्यांना हवी तशी भेसळ करण्यास सवड सांपडली. ह्याप्रमाणें वनस्पतींच्या कमताईमुळें उत्पन्न झालेली रसक्रिया थोडक्याच दिवसांत वनस्पतीविषयक ज्ञानाच्या ऱ्हासास कारणीभूत झाली. म्हणूनच मीं नुक्तें असें सांगितलें, कीं रसक्रियेची उत्पत्ति व वनस्प-तींच्या ज्ञानाचा ऱ्हास ह्यांचा परस्परांशीं निकट संबंध आहे, किंबहुना ह्या दोन्ही गोष्टी एकमेकांस कारणीभूत आहेत. आतां ज्या अर्थीं वनस्पतींस मागें हटवून रसक्रिया इतकी प्रचारांत आली, त्या अर्थीं तिजमध्यें कांहीं तरी विशेष असलें पाहिजे हें उघड आहे. बहुतेक डॉक्टर लोक ह्या रसक्रियेचा तिरस्कार करि-तात. परंतु ही त्यांची चूक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण आपल्या रसक्रियेचा इतिहास पाहूं गेल्यास असें दिसतें कीं, हा विषय विचाराहं आहे. एकदम त्याजविषयीं कांहीं मत देणें म्हणजे विचारशक्तीस विश्रांति देणें होय. ज्या विषयावर आपल्या भरतखंडांत निदान दीड हजार वर्षेपर्यंत विचारी लोकांचे

शोध चालले होते, ज्या विषयावर गोविंदपूज्यपादासारख्या सत्पुरुषांचे शेंकडों ग्रंथ आढळतात, ज्याचें महत्त्व आपल्या देशांत इतकें वाढलें होतें कीं, त्यामुळें पाऱ्याला ब्रह्माची उपमा देणारा रसेश्वरपंथ या नांवाचा एक स्वतंत्र पंथच उपस्थित झाला, तो विषय केवळ थोतांडच असेल असें विचारी लोक एकदम कधींही म्हणणार नाहींत. हल्लींच्या अज्ञवैद्यांच्या रसक्रियेपासून फायद्यापेक्षां तोटेच फार होतात हें मी कबूल करितों, पण म्हणून कांहीं पुरातन रसक्रियेस दोष द्यावा असें नाहीं. हल्लीं देखील कांहीं रसक्रियेचीं औषधें माझे पाहण्यांत अशीं आलीं आहेत, कीं उत्तम युरोपियन औषधांशीं तीं टक्कर मारूं शकतील एवढेंच नव्हे तर कांहीं प्रसंगीं त्यांना तीं मागें देखील हटवितील.

रसक्रियेच्या इतिहासावर जो मीं इतका विस्तार केला त्याचा उद्देश असा, कीं ज्या अर्थीं ह्या विषयावर फार प्राचीन काळापासून मोठमोठ्या लोकांनीं आपलीं आयुष्याचीं आयुष्यें खर्च करून शेंकडों ग्रंथ लिहून ठेविले आहेत त्या अर्थीं त्याचें खरें स्वरूप व खरी योग्यता सर्वांच्या लक्षांत यावी व त्यांत तथ्यातथ्य कितपत आहे याचा फार बारकाईनें व निःपक्षपातबुद्धीनें विचार करावा; केवळ हल्लींच्या अडाणी व अज्ञ वैद्यांनीं तयार केलेल्या रसायनांवरून प्राचीन शास्त्रास दोष देऊं नये. ज्याप्रमाणें आपल्या देशांत हल्लीं शस्त्रक्रिया व वनस्पतींचें ज्ञान बुडालें आहे, त्याचप्रमाणें खऱ्या रसक्रियेचाही हल्लीं लोप झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. असो, ह्याप्रमाणें आपल्या वैद्यकाविषयीं जे माझे विचार होते ते मीं आपल्या पुढें ठेविले आहेत. ह्यावरून आपल्या लक्षांत आलेंच असेल कीं, आपल्या वैद्यकाची प्राचीन काळीं बरीच सुधारणा झाली होती, व हल्लीं तें फार निकृष्ट दशेस येऊन पोंचलें आहे, व ज्या वेळीं तें फार उत्तम दशेस येऊन पोंचलें होतें त्यावेळीं देखील त्यांतील निदानभाग फारच अपूर्ण असून चिकित्सा मात्र तारीफ करण्याजोगी होती. एक भाग इतका कच्चा राहून दुसरा बऱ्याच पूर्णतेस कसा आला ह्याचें कारणही मीं पूर्वी सांगितलेंच आहे, कीं निदानशास्त्र केवळ तर्कावर अवलंबून आहे व चिकित्सा अनुभवसिद्ध आहे. आतां कोणी अशी शंका काढतील कीं जर आपल्या वैद्यकांतील निदानभागांत दोष आहेत, तर चिकित्सेंतही त्याच मानानें दोष असले पाहिजेत. कारण जर रोगाचें निदान

बरोबर समजलें नाहीं तर त्याजवर योग्य उपाय कसा करितां येईल ? ह्या शंकेचें समाधान असें आहे कीं कोणत्याही विषयांतील ज्ञानाचा क्रम असा आहे कीं पहिल्यानें क्रिया व उपपत्ति; पहिल्यानें भाषा व मग व्याकरण; पहिल्यानें विचार, तर्क, व अनुमान, व मग न्यायशास्त्र; त्याचप्रमाणें पहिल्यानें रोगांच्या उपायांचें ज्ञान होतें व मागाहून त्यांच्या निदानाचीं उपपत्ति शोधीत बसतात. सर्वांस माहीत आहे कीं धनगर, भिल्ल, कोळी, वगैरे गांवढळ व रानटी लोकांस देखील अमुक स्थिति झाली म्हणजे त्यावर अमुक उपाय करावा हें ठाऊक असतें. मनुष्याला रक्ताची हगवण लागली म्हणजे अमका पाला द्यावा, तो ओकूं लागला म्हणजे अमकें औषध द्यावें, बाळंतीण अडली म्हणजे अमुक उपाय करावा, साप चावला म्हणजे अमुक मुळी उगाळून द्यावी, ह्या गोष्टी त्यांना केव्हां केव्हां आपल्यापेक्षां देखील अधिक माहीत असतात. परंतु तांबडी हगवण कां लागते, उलटी कोणत्या कारणांनीं होते, बाळंतीण कां अडते, सर्पाच्या विषापासून शरीरावर असे विलक्षण परिणाम कसे उत्पन्न होतात इ. प्रश्नांचीं उत्तरें त्यांस देतां येणार नाहींत. फार कशास पाहिजे ! आम्ही डॉक्टर लोक क्विनीन देऊन हींव बरें करितों, परंतु आम्हांस जर कोणी विचारील कीं हींवताप कसा उत्पन्न होतो, तर त्याचें उत्तर आमच्यानें पूर्णपणें कधींही देववणार नाहीं. तसेंच धनुर्वात कसा उत्पन्न होतो, महामारीचें वास्तविक कारण काय, रक्तपित्तीचीं कारणें काय इ. गोष्टींची अर्वाचीन वैद्यकांत देखील फारच अपुरती माहिती आहे. पण म्हणून कांहीं ह्या रोगांवरील औषधें अगदींच माहीत नाहींत असें नाहीं. कांहीं दिवसांनीं ह्या असल्या रोगांवर देखील हिंवाप्रमाणें हटकून उत्तम गुण करणारीं औषधें मिळतील, हें खचित. पण हिंवाप्रमाणें त्यांचीं कारणें देखील पुष्कळ दिवस गूढ राहिलीं पाहिजेत, व त्यांचा पूर्ण शोध हजारों वर्षांनीं तरी लागेल किंवा नाहीं याची शंकाच आहे. सारांश हाच, कीं चिकित्सा व निदान ह्यांमध्यें फारसा संबंध नाहीं. इतकें खरें कीं, खरें निदान समजल्यावर चिकित्सेमध्यें कदाचित् कांहीं सुधारणा करतां येईल व रोग न होऊं देण्याबद्दल प्रयत्न करितां येईल; तथापि असें कोणीं समजूं नये कीं एखाद्या रोगाचीं कारणें समजलीं नाहींत म्हणून त्याजवर औषध नसेल किंवा ज्याचें निदान समजलें आहे त्याजवर हटकून इलाज करितांच येईल. ह्यावरून पाहतां मीं जें आपल्या निदानशास्त्रास सदोष व बहुतेक अंशीं त्याज्य असें ठरवून चिकित्सेचें अंग

अनुभवासिद्ध असल्यामुळें ग्राह्य आहे असें सांगितलें, ह्यांत बिलकुल विरोध नाहीं हें उघड आहे. जर रानटी लोकांमध्यें देखील केव्हां केव्हां कांहीं विलक्षण औषधाची माहिती आढळते, तर सुधारलेल्या उद्योगी व बुद्धिवान् अशा आपल्या ऋषींनीं प्रत्येक रोगावर जे हजारों वर्षांचे शेंकडों अनुभव लिहून ठेविले आहेत, त्यांत पुष्कळ गोष्टी घेण्याजोग्या असतील ह्यांत नवल काय ! असें असून ह्लींच्या सुशिक्षित डाक्टरांपैकीं किती थोडे लोक ह्या पुरातन अनुभवसमुद्राचा उपयोग करून घेत आहेत बरें ! एखाद्याला यःकश्चित् जुलाबाचें औषध द्यावयाचें असलें तरी अमेरिकेंतून आलेल्या व विलायतेंतील यंत्रांत पूड केलेल्या जालप् नामक वनस्पतीवर त्यांना अवलंबून राहावें लागतें. आपल्या एवढ्या मोठ्या हिंदुस्थान देशांत हगविण्याला देखील औषध मिळत नाहीं काय ? आपले ग्रंथ जर कोणीं शोधून पाहील तर त्याची अशी खातरी होईल कीं इंग्रजींत जितकीं एकंदर औषधें आहेत तितकीं आपल्या देशांत फक्त जुलाबाचीं औषधें निघतील. स्वानुभवावरून माझी खातरी आहे, कीं जितकीं म्हणून इंग्रजींत उत्तम उत्तम औषधें आहेत त्या सर्वांबद्दल प्रायः आपल्याला देशी औषधें उपयोगांत आणितां येतील, व कित्येक प्रसंगीं त्या त्या इंग्रजी औषधाहूनही तीं उत्तम ठरतील. इतकें मात्र लक्षांत ठेविलें पाहिजे कीं पुरातन औषधांचें पुनरुज्जीवन करितांना ह्ल्लींच्या वैद्यांवर व वाण्यांवर बिलकुल अवलंबून राहतां कामा नये. ज्याचें त्यानें ग्रंथावलोकन करून रानांतील व जाटिली लोकांच्या साहाय्यानें वनस्पतींची माहिती मिळवून शास्त्रांत सांगितलेल्या वनस्पतींच्या सर्व खुणा मिळाल्यावर मग तीं औषधें प्रचारांत आणावीं. ह्ल्लीं पुरातन वैद्यकाचें पुनरुज्जीवन करण्याकरितां मुंबई, बडोदें वगैरे ठिकाणीं कांहीं पुढारी लोकांनीं प्रयत्न चालविले आहेत. पण जरी त्यांचे उद्देश चांगले आहेत तरी आरंभ चुकीचा आहे. कोणी वैद्यक शिकविण्याची एखादी शाळाच घालितात; कोणी एखाद्या ग्रंथाच्या भाषांतराकरितां एक लहानसें बक्षीसच नेमितो; कोणी तिसरेंच कांहीं करितो; ह्याप्रमाणें चाललें आहे.

अशा तऱ्हेच्या उद्योगापासून फारसा फायदा होईल असें मला वाटत नाहीं. माझ्या मतें हिंदुवैद्यकांतील फक्त उपयोगाचा भाग म्हटला म्हणजे काय तीं चिकित्सा, म्हणजे त्यांत सांगितलेल्या वनस्पतींचें ज्ञान व त्यांच्या उपयोगाची माहिती. ह्या ज्ञानाचा तर सर्वत्र बहुधा लोपच झाला आहे. तर अशा प्रसंगीं मुख्य कर्तव्य म्हटलें म्हणजे सुशिक्षित डॉक्टरांनीं स्वतः पहिल्यानें आपल्या

शास्त्राचा अभ्यास करून पूर्वी सांगितलेल्या साधनांनीं वनस्पतींची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे, व जीं औषधें फार खातरीचीं वाटतील तीं प्रचारांत आणण्याविषयीं झटलें पाहिजे. असें केल्यानें पुरातन वैद्यकाचें पुनरुज्जीवन केल्यासारखें होऊन, हल्लीं औषधांनिमित्त जे लाखों रुपये विलायतेस व्यर्थ जात आहेत त्यांपैकीं बराच भाग येथें वांचविल्यासारखा होईल. असें न करितां यत्किंचित् चरकसुश्रुतांत प्रवेश होतांच, एखादी शाळा घालून चारपांच पोरें जमवून त्यांना लागलींच माधवनिदानाची संथा सुरू केल्यानें, किंवा त्या शाळेवर केवळ न्यायव्याकरणाची 'घटपटादि खटपट' करणारा एखादा शास्त्री नेमल्यानें कालाचा व द्रव्याचा व्यर्थ व्यय केल्यासारखा होणार आहे. हल्लीं आपणाला ही शिकविण्याची वेळ नाहीं. शिकण्याची वेळ आहे. प्राचीन व अर्वाचीन वैद्यकांतील सार एकीकडे काढून जेव्हां आपण आपल्या देशाकरितां एखादें कालानुरूप वैद्यक तयार करूं, तेव्हां हव्या तितक्या शाळा घाला व हवे तितके लोक तयार करा.

आपलें वैद्यक सारासार विचार न करितां जशाचें तसेंच शिकवीत बसणें म्हणजे व्यर्थ काल घालविणें होय; माधवनिदान किंवा सुश्रुतांतील शारीर शिकविणें म्हणजे रुद्र किंवा पवमान यांची संथा दिल्यासारखें किंवा हिंदुस्थानच्या इतिहासाबद्दल महाभारत किंवा विष्णुपुराण शिकविण्यासारखें होय. तर पुरातन वैद्यकाचें पुनरुज्जीवन करणें म्हणजे काय, त्यांतला कोणता भाग कायम ठेवण्याजोगा आहे, याचा चांगला विचार करून त्याप्रमाणें आपले सुशिक्षित लोक ह्या कामास प्रवृत्त होतील अशी सूचना करून मी हें व्याख्यान पुरें करितों.

[वर्ष १, अंक २२।२३।२४।२५।२६।२८।३०.]

मुद्रण-स्वातंत्र्य

मुद्रण म्हणजे छापणें, आणि स्वातंत्र्य म्हणजे मोकळीक; तेव्हां हवें तें छापून प्रसिद्ध करण्याची मोकळीक सरकार जें प्रजेस देतें त्यास आम्ही वरील नांव देतों. या स्वातंत्र्यावर सुमारें चार वर्षांपूर्वी एकाएकी धाड पडून मुद्रणयंत्राचें एकदम मुखस्तंभन जें झालें तें सर्वांस माहीत आहेच. त्याचप्रमाणें सध्यां छापखान्याच्या मुसक्या पुनः खुल्या करून टाकण्याबद्दल जें सरकारी कौन्सिलांत घाटत आहे तेंही सर्वांस महशूर आहेच. प्रतिबंध हा प्राणिमात्रास तर अनिष्टच, पण त्यांतही 'केसरी'स तो किती दुःसह होण्यासारखा आहे हें सांगणें नकोच. तर या भावी मुक्तीचें अगोदर अभिनंदन करून तिचा महिमा आमच्या देशबंधूंच्या कर्णविवरांत घुमवून देण्याचा आज यत्न करतों.

मुद्रणकला ही मानवी जातीच्या कल्याणास किती हेतुभूत झाली आहे हें सांगण्याची आज बिलकुल गरज उरली नाहीं. आज अगदीं गरीबगुरीबांसही मोठेमोठे ग्रंथ जे सुलभ होऊन गेले आहेत, व विद्यावृद्धि इतक्या झपाट्यानें चालली आहे, हें सर्व श्रेय वरील अत्यंत उपयुक्त कलेस आहे. इंग्लंडासारख्या देशांत तर दिवसा मोलमजुरी करावी व संध्याकाळच्या आरामाच्या वेळीं सान्या दुनियेची हालहवाल वर्तमानपत्रद्वारें पहावी, किंवा मनोरंजनपर अथवा बोधपर ग्रंथांनीं श्रमपरिहार करावा, अशी उत्कृष्ट रीतीची सोय वरील अमोलिक साधनाच्या योगानें झाली आहे. येथेंही अगदीं कुणब्यामाळ्यापर्यंत सुद्धां विद्येचा संस्कार अल्पस्वल्प तरी जाऊन पोंचण्याची अलीकडे तजवीज झालेली आहे. तर येवढा ज्याचा प्रभाव त्या मुद्रणाच्या तोंडावर सरकारची मुद्रा न बसतां 'अरबी गोष्टीं'तील कोळ्याच्या हातून प्रचंड राक्षसाच्या बंदीखान्यावरचें तकट जसें मोकळें झालें आणि त्यानें आपलें पूर्वरूप धारण करून तें पितळेचें भांडें लाथेनें समुद्रांत झुगारून दिलें, त्याप्रमाणेंच यमलोकवासी बीकन्स्फील्डबोवांनीं केसरी हिंदशाहीच्या पहिल्या अमदानीसच १८७८ च्या नवव्या आक्टानें जो कालिमा लावला, तो चंद्राच्या खग्रासाप्रमाणें पार निघून जाऊन श्वेतद्वीपाचें परम भूषण जें स्वातंत्र्य, त्याचा पुनः या भरतभूमीवर उज्ज्वलतर उदय व्हावा हें कोणास

बरें वाटणार नाहीं ? तर यहुदी राजश्रीरूप राहु अस्तंगत होऊन पातालवासी झाले असतां जी स्वतंत्रतारूप चंद्रिका पुनः आम्हांस लाभणार, तिचा पहिल्यापेक्षां चांगला व अधिक उपयोग करण्याविषयीं उमेद धरावी अशी आमची आमच्या देशबंधूंस सूचना आहे.

आतां प्रस्तुत विषयापैकीं वर्तमानपत्रांच्या संबंधाचा जेवढा भाग तेवढ्याविषयीं अगोदर विचार करून नंतर सामान्यतः ग्रंथरचनेच्या संबंधानें विवेचन करूं.

वर्तमानपत्रांचें स्वरूप काय व त्यांचें कर्तव्य कोणतें याविषयीं येथें फारसा मजकूर लिहावयास नकोच. अलीकडे त्यांचें महत्त्व लोकांस बरेंच कळूं लागलें आहे, व विलायतेंत तीं जशीं जड पारडीं होऊन बसलीं आहेत तसा प्रकार जरी अद्याप येथें कांहींच दृष्टीस पडत नाहीं; तरी निदान परवांच्या कोल्हापूर प्रकरणावरून सरकारासही येथील कोल्हेकुईं ऐकली न ऐकलीशी केवळ करतां येत नाहीं हें सर्वांच्या दृष्टोत्पत्तीस आलेंच आहे; तर वर्तमानपत्रें म्हणजे लोकांची वकिली करण्याचें मोठें साधन होय. वेदांत अग्नीचें जसें देवमुखत्व वर्णिलेलें आहे, म्हणजे अग्नीस हविर्भाग अर्पण केला असतां तो देवांस पोंचतो, त्याप्रमाणेंच लोकांचा अभिप्राय सरकारी अधिकाऱ्यांच्या कानावर जाऊन आदळण्याचें जबरदस्त साधन वर्तमानपत्र हें होय. मग अशा साधनाचा निष्प्रतिबंधतेनें उपयोग होत जाणें हें किती महत्त्वाचें होय हें सांगणें नलगे. सरकार म्हटलें म्हणजे वस्तुतः पाहतां लोकांच्या सुखाकरतां होय. कोणीच नियंता नसेल तर हवें त्यानें हवें तें करावें असें होईल; व अरण्यांत किंवा जलाशयांत जो प्रकार आढळतो, कीं मोठा प्रबळ असेल त्यानें आपणाहून लहान असेल त्यास खावें व उपद्रव द्यावा, तशी झोटिंग पाच्छाई सुरू होईल; म्हणून चार शहाण्या लोकांनीं एकत्र जमून आपणाला लावून घेतलेला जो कायदा तें सरकार होय. मग वरील कायद्याप्रमाणें नेमले गेलेले जे लोक त्यांनीं एकंदर राष्ट्राची हालहवाल नेहेमीं ऐकून घेतली पाहिजे, व कोणत्याही तऱ्हेची पीडा कोणास विनाकारण होणार नाहीं याबद्दल तजवीज ठेविली पाहिजे, हें उघड आहे. आपण करतों तेंच ठीक आहे, व तें तसेंच प्रजेस वाटलें पाहिजे, असा सरकारी अधिकाऱ्यांनीं आग्रह धरणें म्हणजे किती अप्रयोजकपणा आहे बरें ! अशा आग्रहाचा परिणाम येवढाच व्हावयाचा कीं, लोकांचे मनोव्यापार राजकर्त्यांस अज्ञात राहिले म्हणजे १८५७ सालीं जसा एकदम गहजब झाला, तसा एकदम उसळून पाण्याचा

बांधारा फुटला असतां मग तें जसें आवरेनासें होतें तशीच प्रजा ही अनावर व्हावयाची ! असा आक्रांत एकदम होऊं द्यावा, आणि मग धांवाधांव करीत बसावें, त्यापेक्षां वरील जलौघाला एका बाजूनें खुली वाट करून ठेवणें हा शहाणपणा नव्हे काय ? तर वर्तमानपत्रांस पाहिजे तो मजकूर बिनदिक्कत प्रसिद्ध करण्याची सदर परवानगी जे चतुर राजकर्ते देत असतात, त्यांतील बीज हेंच होय. पण बीकन्सफील्डसारखी ज्याला नेहमीं लटपट करायाची असेल, व स्ट्राची साहेबांप्रमाणें कोट्यावधि रुपयांची चूक दाबवून ठेवण्याची असेल त्याला वरील स्वातंत्र्य काय उपयोगी ? संस्कृतांत एक म्हण आहे, कीं "चोराणां चंद्रमा रिपुः" चंद्राचें चांदणें नको कोणाला ? तर चोराला ? तर माजी डिज्राएली साहेबांपासून तों बडोद्याच्या सरटींपर्यंत सर्व कारस्थानी मंडळीचा मुद्रण-व्यापारावर मोठा कटाक्ष. पण खऱ्या राजनीतीस वरील प्रतिबंध किती विरुद्ध आहे हें सांगायाला नकोच !

तर जें सरकार आपणास सूज्ञ व न्यायी म्हणवीत असेल त्यानें वर्तमानपत्रांस पूर्ण स्वातंत्र्य देऊन त्यांचे तडाखे खाण्यास नेहेमीं तयार असलें पाहिजे. खऱ्या कारकुनानें जमाखर्चाची चोपडी लपवून न ठेवतां भर चव्हाट्यावर हिशेब देण्यास जसें नेहेमीं सिद्ध असलें पाहिजे, त्याप्रमाणेंच राजकर्त्यांचीही गोष्ट होय. प्रजेपासून कर घेऊन सर्व प्रकारें पालन करण्याचा पतकर जर राजानें घेतला आहे, तर अर्थात् सर्व कामाचा झाडा त्यानें आपल्या यजमानास दिला पाहिजे, व यजमानासही वरील झडती घेण्यास पूर्ण अखत्यार आहे. त्यांतून ज्यांनीं राजदरबारीं अशी प्रतिज्ञा भोगलेली कीं आम्ही तुम्हांवर अंमल करतों तो फक्त तुमच्या कल्याणाकरितां, व तुम्ही कर्तेसवरते झालां कीं आमचें काम आटपलें, आम्ही गाशा गुंडाळून येथून निघालोंच समजा,—त्यांनीं तर या निःसीम निस्पृहतेच्या सोंगाची बतावणी किती चोख रीतीनें केली पाहिजे हें सांगायाला नकोच. तर या रीतीनें पाहतां गेल्या चार वर्षेपर्यंत आमच्या सरकारानें छापखान्यांवर जो दपटशा बसविला होता तो किती अन्यायाचा होता, व तो निघण्याचा जो आतां विचार चालला आहे तो किती रास्त आहे, व त्यापासून सरकारचें व लोकांचेंही किती कल्याण होणारें आहे, याचा आमच्या वाचकांनींच विचार करावा.

मागल्या खेपेस प्रस्तुत विषयाचा उपोद्घात करून सरकार व प्रजा यांचा परस्पर संबंध कोणत्या तऱ्हेचा आहे, व तो तसा असल्यामुळें वरील स्वातंत्र्य

सर्व राज्यांत असणें हें किती अवश्यकतेचें आहे, हें आम्हीं आपल्या वाचकांस दाखविलें. या अंकांत वरील स्वातंत्र्याचा उपयोग कोणत्या तऱ्हेनें झाला पाहिजे, व वर्तमानपत्रांनीं आपलें काम चोख रीतीनें बजाविलें असतां एकंदर देशाचा केवढा फायदा होण्यासारखा आहे, हें दर्शवितों.

मेंढ्यांच्या कळपाच्या भोंवतालीं जसा कुत्र्याचा पाहरा असतो, कीं लांडग्यांची वगैरे कोठें चाहूल झाली कीं त्यांनीं मोठ्यानें भुंकून सर्वांस इशारा करावा, व त्यांवर जाऊन तुटून पडावें, त्याप्रमाणेंच वर्तमानपत्रें हीं राष्ट्रांचीं रक्षक होत. त्यांतून वरील मेषसमुदायाची उपमा आमच्या राष्ट्रास तर किती समर्पक आहे हें कोणालाही सांगायाला नकोच. इंग्रेज लोकांस आपल्या स्वतःच्या राजाचा जुलूम सोसेनासा झाला, तों त्यांनीं त्याच्याशीं लढाईला उभें राहून त्याचें शासन केलें; तोच नमुना पुढें फ्रेंच लोकांनीं व इतर राष्ट्रांनींही उचलून आपापले अधिकार शाबीत केले. येवढा झार, रशियाचा बादशहा, पण त्यास आपल्याच लोकांचा धाक ! आतां आमच्या इकडे काय मौज आहे पहा; आमचे स्वतःचे राजेरजवाडे तर केव्हांच कोणीकडे धुळीचे दिवे खात गेले; आणि पोरक्या पोराप्रमाणें आम्ही आज साऱ्या जगांत उघडे पडलों आहों. ' पंचतंत्रांत'ल्या गोष्टीप्रमाणें 'नाभूज्जारो न भर्ता च ' याप्रमाणें आमचे मूळचे धनी गेले, व त्यांच्याच बरोबर चार दिवस येथें सत्ता बळावून बसलेले जे इमामभाई तेही पण गेले; आणि आमच्या वांट्यास राहिले कोण तर सातां समुद्रांपलीकडचे श्वेतद्वीपस्थ ! 'उंटावरून शेळ्या हाकायाच्या ' या म्हणप्रमाणें चार हजार कोसांवरून त्यांनीं येथली व्यवस्था करायाची; बरें, तिजकडे तरी लक्ष कितीसें पुरवायाचें म्हणाल, तर हिंदुस्थानचा मजकूर निघाला कीं उठली खाशी मंडळी चहाकाफी घ्यावयाला ! इकडे एखादें मोठें चंड होऊन बायकापोरांची जेव्हां कत्तल उडावी तेव्हां आमचे पाश्चात्य बंधू झोंपेंतून जरासे जागे होतात; किंवा लक्षावधि लोक यमसदनास जाऊन पोंचल्यानंतर कृतांतपुरींतली तार लंडनपुरींत जाऊन पोंचते ! ही सर्व स्थिति केवढी भयंकर आहे याची कल्पनाही करणें कठिण आहे. असो; तर अशा स्थितींत एतद्देशीय वर्तमानपत्रांवर केवढी जबरदस्त जोखीम राहते बरें !

वर्तमानपत्रकर्त्यांनीं राजाच्या व मंत्रिमंडळाच्या वागणुकीपासून तों अगदीं क्षुल्लक अधिकाऱ्याच्या वर्तनापर्यंत सुद्धां बारकाईनें नजर पुरविली पाहिजे. सत्ता म्हटली म्हणजे मोठी वाईट आहे; तिचा यथार्थरीत्या विनियोग करणारा दृष्टांत

एक, किंबहुना शंभरांत एक, सांपडला तर भाग्याचा ! पैसा मिळवण्याचें साधन, विषयवासनातृप्तीचें साधन, वगैरे अनुकूल असून त्या मोहांपासून दूर राहणारा मनुष्य विरळा ! तेव्हां जिकडे तिकडे अधिकाराच्या जोरावर मोठमोठीं अनन्वित कृत्यें केल्याचे बोभाटे जे वरचेवर ऐकूं येतात, त्यांत नवल काय ! त्यांतून आमच्या देशांत लोकनीति तर इतकी सुटलेली आढळते कीं, कोणाची मूठ दाबण्याचा प्रसंग आला आणि तो पाघळला नाहीं असें प्रायः घडायाचेंच नाहीं. होईल तितक्या रीतीनें अर्थसाधन करावें हा अलीकडे जीवितसाफल्याचा मार्ग निघाला आहे. मागें साध्याभोळ्या व पापभीरु लोकांत जो कांहीं मनाचा वचक असे, किंवा हल्लीं युरोपाकडे नेकीची योग्यता समजून लोक लांचलुचपतीस नीचपणाचें कर्म समजतात, तसें इकडे बहुधा थोडेंच आहे असें म्हटलें असतां चालेल. तर अशा समयीं वर्तमानपत्रकर्त्यांनीं निष्प्रांजलपणें सरकारी अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा तपास ठेवणें व लोकांत जागृति ठेवणें हें किती महत्त्वाचें आहे हें स्पष्टच आहे.

पण सर्वांत आमच्या सरकारच्या संबंधानेंच पहिल्या प्रतीचा बंदोबस्त ठेवणें जरूर आहे. आजमित्तीस खुद्द सरकारापासूनच जी आम्हांला पीडा होत आहे तिला कोटें तोडच नाहीं म्हटलें असतां चालेल. नेकनामदार सर जेम्स फर्ग्यूसन् साहेब किंवा कलकत्त्याचे सध्यांचे थोरले लाट साहेब हे जातीनें मोठे दयाळू, मोठे उदार, व पराकाष्ठेचे सज्जन आहेत, पण तसें असल्यानें आमच्या स्थितीत मोठासा फरक होणारा आहे असें नाहीं. ज्या कायद्यानें आम्ही बांधले गेलों आहों, व ज्याच्या चरकाखालीं ही सुवर्णभूमि पिळून निघून अस्थिपंजररूप राहिली आहे, त्याचें स्वरूप एकंदर लोकांस समजून वरील दुर्धर पीडेचा जेव्हां परिहार होईल तेव्हां उपयोग आहे. नाहीं तर शेकडों ठिकाणीं तिळगुळादाखल गोडगोड भाषणें झालीं, सभा झाल्या, दरबारें भरलीं, पुतळे उभे केले, तरी त्यांत कांहीं हांशील नाहीं. कोणत्याही देशाची स्थिति सुधारण्यास तेथील लोकांस अगोदर आपली विद्यमान स्थिति ओळखतां आली पाहिजे, आणि मग ती सुधारण्याविषयीं त्यांनीं एकनेटानें सारखें झटलें पाहिजे. आमच्या देशबंधूंची अवस्था पाहतां तींत वरच्यांतला अद्याप एकही प्रकार दृष्टीस पडूं लागला नाहीं. त्यांस एक समजतें, कीं आपलें सरकार जो जो कायदा करील त्यास निमूटपणें मान देत जावी. वस्तुतः पहातां सरकारानें आम्हांस जाणते करण्याकरतां आज

कितीएक वर्षें आपण होऊन किती खटपट केली, व सारी पृथ्वी खुली करून पाहिजे तिकडे संचार करण्याची आम्हांस सोय करून दिली आहे. पण आम्ही असले बहाद्दर आहों कीं कोणीं आमच्या हातांत शस्त्र आणून दिलें असतांही त्याचा उपयोग आमच्यानें करवत नाहीं. रडतराव घोडयावर बसवून त्याच्या हातानें जेव्हां दुसऱ्यानें तरवार मारवावी तेव्हां ते मारणार ! रसूडेन्सारख्यानें साता समुद्रांच्या पलीकडून जेव्हां आरोळी ठोकावी कीं, " अरे बेट्यांनों, तुमचीं चामडीं निघण्याची वेळ आली तरी अजून तुम्ही ढूं का चूं सुद्धां करीत नाहीं. तुम्हांस म्हणावें तरी काय ! " तेव्हां कदाचित् आम्ही डोळे चोळायाला लागलों तर कोण जाणें ! नाहीं तर आमची तयारी म्हटली म्हणजे ही कीं, आम्हांस टेंपलसाहेबांनीं चार रुपयांची कागद घासायाची नोकरी देऊन तोंडावर तुकडा टाकला ना,–आम्ही आपले त्यांच्या अश्वारूढ प्रतिमेपुढें साष्टांगनमस्कार घालायाला तयार ! लॉर्ड डलहौसी साहेबांनीं येवढालीं अवदानें मारून शेकडों राजेरजवाडयांच्या मुंडया मुरगाळल्या ना,–ते निजधामास निघाले कीं आम्ही त्यांस दीप ओवाळून त्यांच्या कपाळाला दृष्टीची तीट लावायाला उभेच ! ज्या कायद्याचा अंमल आमच्यावर चालतो त्याची आम्हांला इतकी चोख माहिती कीं, एखाद्या शिपुडर्यानें जरी आम्हांला दरडावलें तरी आम्ही मागें सरणार, किंवा म्युनिसिपालिटीच्या थ्रिव्ही इन्स्पेक्टरानें हुकूम फर्मावला तरी तो आम्हांस शिरसावंद्यच ! तर वर्तमानपत्रांनीं मुख्यतः हेंच अत्यंत लज्जास्पद व अत्यंत भयंकर लोकाज्ञान काढून टाकण्यास झटलें पाहिजे; व आमच्या दयाळू सरकारनें आम्हांस किती अधिकार दिलेले आहेत, व त्यांचा उपयोग केला असतां केवढालीं कार्यें होण्यासारखीं आहेत, याचा प्रत्यय त्यांस आणून दिला पाहिजे. या आमच्या उपदेशाची प्रचीति आमच्या देशबांधवांस रोकड आणून देण्याची हल्लीं आम्हांस कोणती अमोलिक संधी आली आहे हें आमचे वाचक जाणतच असतील! केवळ गिरिगुहांत गर्जना करणें किंवा गजभ्रमानें पाषाणराशिवर खरनखारांचा मोघप्रयोग करणें हा जो आजपर्यंतचा क्रम तो जाऊन एका मदांधाक्ष कुंजराची आम्हांवर चाल होत आहे, हें त्याचा बृंहितनाद सुचवीत आहे. तर आतां त्याच्या प्रदक्षिन्न गंडस्थलाचें विदारण करून त्यांतील यशोमौक्तिकांचें उद्धलन साऱ्या महाराष्ट्रभर करण्याकरितां झांप मारण्याच्या तयारीस लागतों.

मागल्या निबंधांत प्रस्तुत विषयाचा वर्तमानपत्रांच्या संबंधानें विचार केला. आतां सामान्यतः ग्रंथरचनेच्या संबंधानें पाहतां हवें तें छापण्याचीं मुभा किती उपयोगाची व किती अवश्यक आहे तें पाहूं.

मनुष्य हा प्राणी जन्मतः पशूप्रमाणेंच अज्ञान असतो हें सर्वप्रसिद्धच आहे. पशूंत व त्याच्यांत अंतर येवढेंच कीं ज्ञानग्रहणाची त्याचे ठायीं न्यूनाधिक प्रमाणानें योग्यता असते, व पशूस ती मुळींच नसते. पशूस उपजतबुद्धि जी एकदम प्राप्त होते तेवढीच काय ती. तिच्या पलीकडे त्याचें ज्ञान म्हणण्यासारखें जात नाहीं, व तें सर्वांस अनायासानें प्राप्त होऊन सर्वांस सारखेंच असतें. मनुष्याची गोष्ट याहून अगदीं वेगळी. त्याच्या ज्ञानग्रहणास तर बहुधा सीमाच नाहीं असें म्हटलें असतां चालेल. हल्लींची शतवर्षांची सीमा दशगुणित किंवा सहस्रगुणित जरी वाढविली तरी सृष्टींतील अपार ज्ञानभांडार खल्लास होईल असें नाहीं. न्यूटनसारख्यांनीं ज्ञानाच्या अपरंपार सागराविषयीं काय उक्ति प्रगट केल्या आहेत त्या सर्वप्रसिद्धच आहेत. आतां मनुष्याची बुद्धि येवढी थोर असतां व तींत सांठविण्याचा ज्ञानसमुच्चय येवढा अक्षय्य असतां वरील स्वल्पमात्र आयुर्दायांत त्याचा संग्रह कोणत्या रीतीनें होत असतो याविषयीं विचार करूं.

ज्ञान प्राप्त होण्याचें मुख्य साधन म्हटलें म्हणजे श्रवण हें होय. मनुष्यास वाणी ही एक मोठी अमोलिक वस्तु परमेश्वरानें दिलेली आहे; तिच्या योगानें त्यास आपलें हृद्गत दुसऱ्यास कळवितां येतें. तर मनुष्याचे ठायीं ज्ञानाचा संचय जो होत जातो, त्यास आद्य द्वार म्हटलें म्हणजे श्रवणव्यापार हा होय. विद्येंत प्रथम जो प्रवेश व्हावयाचा तो तरी गुरुमुखानेंच व्हावा लागतो, हें सुप्रसिद्धच आहे; व लेखनकला निघण्याच्या पूर्वी ज्ञानाचें साधन श्रोत्रेंद्रियच काय तें हवें होतें हें उघडच आहे. पुढें लिहिण्याची युक्ति निघाल्यावर ज्ञानाचा प्रसार होण्यास व तें चिरकाल राहण्यास किती अधिक साधन झालें हें कोणासहि सांगावयास नकोच. हजारों वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या लोकांचे विचार जसेचे तसे कळविण्यास वरील साधन अत्यंत उपयोगी झालें. सिसरोनें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, लेखनकला जर नसती तर मनुष्यें सदोदित अज्ञानावस्थेंतच राहतीं! पुढें लेखनकलेवरही ताण होऊन मुद्रणकला निघाली. हिनें तर ज्ञानाच्या प्रसारास किती वेग दिला, व मनुष्यजातीचें आजवर किती कल्याण

केलें व पुढें किती करील हें सांगण्याची सोयच नाहीं. चार पांच शतकांपूर्वी मोठमोठ्या राजांस जो ग्रंथसंग्रह दुर्लभ होता तो आतां एखाद्या लंगोट्यासहीं सहज पैदा होणार आहे. भगीरथानें महाप्रयत्न करून कैलास राजाच्या जटाजूटांत विहार करणाऱ्या स्वर्णदीस जसें खचाटून खालीं आणिलें, आणि भूलोकास शोभा व पावित्र्य हीं पैदा करून दिलीं, त्याप्रमाणेंच वरील महाकलेच्या तावडींत सांपडल्यानें सरस्वती ही केवळ सर्वजनगम्य होऊन राहिली आहे, व त्या योगें करून जगास अगणित लाभ झाले आहेत!

आतां ही गोष्ट सर्वांस सहज कळण्यासारखी आहे कीं, बोलण्यानें, लिहिण्यानें किंवा छापण्यानें जें ज्ञान लोकांस व्हावयाचें तें खरें असलें तर उपयोगी. अवास्तव ज्ञान कांहीं उपयोगाचें नाहीं, हें तर काय, पण असत्य ज्ञान हें अज्ञानापेक्षांहीं वाईट. जसा खोटा रस्ता हा रस्ता माहित नसल्यापेक्षां हजार दिश्शांनीं वाईट; किंवा खोटें औषध घेणें हें औषध न घेण्यापेक्षां शतपट भयंकर; त्याप्रमाणेंच एकवेळ निवळ अज्ञान पुरवेल, पण मिथ्या ज्ञान हें अत्यंत हानिप्रद होय! मग हें जर खरें आहे तर वरील सत्य निष्पन्न होण्यास एकच मार्ग आहे; तो हा कीं भाषण व मुद्रण (लेखन हें मुद्रणांतच आलें, यास्तव त्याचा निराळा उल्लेख नको) यांस कोणत्याही तऱ्हेचा अटकाव कामाचा नाहीं. ज्याच्या जें ध्यानास येईल, व जें त्यास सयुक्तिक वाटेल, तें त्यानें वाग्द्वारा किंवा मुद्रणद्वारा प्रगट केलें पाहिजे. कोणत्याही गोष्टीची खरी शहानिशा व्हावयाची म्हटली म्हणजे तिजवर दहाजणांचे दहा अभिप्राय जेव्हां पडतील तेव्हां ती होत असते. निवळ एकानेंच आग्रह धरून अमुक गोष्ट अमुकच प्रकारची आहे असें प्रतिपादन करणें हा केवळ अप्रयोजकपणाचा प्रकार आहे, व सत्याची निष्पत्ति अशानें कालत्रयींही व्हावयाची नाहीं हें उघड आहे.

आमच्यांत आंधळ्याची व हत्तीची एक गोष्ट आहे ती प्रस्तुत प्रकरणीं अत्यंत समर्पक होय. चार पांच आंधळ्यांस हत्तीच्या अंगावर सोडून देऊन नंतर त्यांस हत्तीचें वर्णन करावयास सांगितलें असतां एकेकानें आपापल्या परीनें जसें त्या प्रचंड पशूच्या सोंडेचें, पायांचें, कानांचें वगैरे पृथक् पृथक् निरूपण केलें, आणि एकाचें निरूपण एकाशीं न जमल्यानें तें जरी एकाशिवाय बाकीच्यांस अयथार्थ वाटलें, तरी तें एकंदरीनें पाहतां खरेंच होतें; तशीच गोष्ट सत्याची आहे. प्रत्येक मनुष्यास जरी आपल्या मताचा आग्रह असतो, व बाकीचीं त्यास खोटीं वाटतात, तरी 'इसापनीतीं'तल्या सरडयाच्या गोष्टीप्रमाणें विचारांतीं इतरांचाही स्वीकार

करणें त्यांस पुष्कळ वेळां जरूर पडतें. निदान इतकें तरी खरें, कीं कूपमंडूकन्यायानें जो मनाचा आकुंचित प्रदेश मनुष्यास प्रथमतः सारी पृथ्वी म्हणून भासत असतो तो 'इसापनीतीं'तील आकाशसंचारी कूर्मांप्रमाणें त्याची दृष्टि दूरवर फांकली असतां तसा भासेनासा होतो. मनुष्याची बुद्धि ही स्वभावतःच अल्पविषय असते; तिचा एकटीचा टप्पा कितीसा दूर जाणार! तेव्हां अर्थातच इतरांच्या विचारांशीं आपले विचार ताडून पाहून जेव्हां तारतम्य काढावें तेव्हां कोणत्याही गोष्टीचें खरें स्वरूप अधिकाधिक लक्षांत येऊं लागतें. हें महातत्त्व जाणूनच सूज्ञ आहेत ते कोणत्याही विषयावर घाईनें आपलें मत प्रदर्शित करीत नसतात; व एखाद्या गोष्टीचा सिद्धांत करावयाचा तर पूर्वपक्ष व उत्तरपक्ष या दोहोंचा यथास्थित रीत्या शांतपणानें विचार करून नंतर त्याचें निबंधन करावें लागतें. सारांश, संस्कृतांत म्हण आहे कीं, 'बुद्धेः फलमनाग्रहः'—बुद्धिमत्तेचें फल काय ? तर आग्रहाचा अभाव !

आतां वर सांगितलेल्या गोष्टी म्हणजे कोणास माहीत नसून त्या आम्हीं येथें नव्यानें सांगितल्या आहेत असें नाहीं. ज्यानें थोडाबहुत विचार केला आहे, व ज्यास सत्य म्हणजे काय व ज्यास असत्य म्हणजे काय हें कळतें आहे, त्याच्या त्या सहज लक्षांत येण्यासारख्या आहेत. पण असें असून जगांतील व्यवहाराकडे जर दृष्टि दिली तर इतर शेंकडों ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी जसें सर्व सांगतांना सांगतात, व 'पुराणांतलीं वांगीं पुराणांत' या लौकिकन्यायास प्रसंग पडला असतां अनुसरतात, त्याप्रमाणेंच वरील तत्त्वज्ञानाची वेळोवेळ हेळसांड झालेली आढळते. यास उदाहरण खुद्द आमच्या सरकाराचेंच नुकतें घडलेलें होय. असो, तर आतां ग्रंथरचनेच्या कामास वरील दुराग्रह कसा आडवा येतो, व त्यापासून काय काय अनिष्टें घडतात, याविषयीं इतउत्तर विवेचन करूं.

वरील स्वातंत्र्याचे मुख्य प्रतिपक्षी म्हटले म्हणजे दोन, एक सरकारी अधिकारी व दुसरे धर्माधिकारी. आतां या दोघांकडून ग्रंथकारांच्या लेखणीला कसकसा धोका पोंचत असतो याविषयीं लिहितों.

जगांतील अधिकाराचीं मुख्य अंगें वरील दोन होत. ऐहिक प्रकरणांच्या संबंधानें लोकांची शेंडी व्यावहारिक प्रभूंच्या हातांत, आणि परमार्थिक प्रकरणांच्या संबंधानें धर्मप्रभूंच्या हातांत. तेव्हां जेथें वरील दोन्ही देवता सतत जागरूक असून

रांचा अंमल कडकडीत असेल तेथें बिचाऱ्या ग्रंथकारांनीं करद्वय जोडून खाविंद-रणारविंदीं मिलिंदायमान होऊन राहणें अशक्य होय. संस्कृतांत एक म्हण आहे कीं, 'शापादपि शरादपि,'—शस्त्राचा प्रतीकार शापेंकरून करावयाचा किंवा रेंकरून करावयाचा! वरील दोनही अस्त्रें वरील दोघां प्रभूंच्या हातांत सदोदित सायाचीं. एकानें राजनिष्ठाभंग कोणी करतो कीं काय म्हणून नेहमीं डोळ्यांत ल घालून लार्ड लिटनप्रणीत 'प्रेस आक्ट' पुढें मांडून बसायाचें, व दुसऱ्या वित्र मंडळीनें आकाशापितृप्रणीत श्रीशुभवर्तमानाचें सतत पुरश्चरण करून त्यांतील ध्यायाला किंवा ओवलिा कोणी सैतानप्रेरित कुमनुष्य धक्का लावतो कीं काय ्णून त्याला शाप देण्याकरितां व त्याचा नायनाट करण्याकरितां तिलोदकाची ंजलि जशी काय नेहमीं सिद्ध करून ठेवावयाची! आतां वरील दोनही प्रकार ाजपर्यंत किती जारीनें चालले आहेत, व आज वरील दोनही प्रकारचें स्वातंत्र्य गांत कितपतसें प्रगट झालें आहे हें पाहूं.

ज्यास राजकीय प्रकरणीं आज जो स्वातंत्र्याचा येवढा झेंडा साऱ्या पाश्चात्य ाष्ट्रांतून उभारलेला आढळतो त्याची हकीकत समजण्याची इच्छा असेल, व रील जयप्राप्ति केवढ्या दारुण व दीर्घकालिक युद्धप्रसंगानंतर झाली आहे हें यास पुरतेपणीं ध्यानांत आणावयाचें असेल, त्यास युरोपच्या राष्ट्रांचा व विशेषतः ामच्या राजकर्त्यांचा इतिहासच सारा ऐकून घेणें जरूर आहे. तसें केल्यासेरीज स्तुत विषयाच्या स्वरूपाचा बोधही एतद्देशीयांस होणें कठिण आहे. कां कीं वरील वातंत्र्याबद्दल युरोपांत जशा झटापटी झाल्या आहेत तशा इकडे झालेल्या आढ-ठत नाहींत. इकडील राजांनीं किंवा धर्माधिकाऱ्यांनीं ग्रंथकारांच्या भानगडींत ापण होऊन पडल्याचीं उदाहरणें मुळींच आढळत नाहींत. युरोपांत ग्यालि-लेयोनें पृथ्वीच्या दैनंदिन भ्रमणाची उपपत्ति काढली, तों लागलींच त्यास पोप-ाहेबांकडून पाचारण होऊन त्याला एखाद्या चोराप्रमाणें पिंजऱ्यांत उभा करून याची चौकशी केली; आणि सरते शेवटीं त्या बिचाऱ्याकडून वरील महापातका-द्दल प्रायश्चित्त करवून त्यास बिनभाड्याच्या घरांतही सोंपवून दिलें. इकडे रच्यासारखा प्रकार आर्यभट्ट किंवा भास्कराचार्य वगैरे कोणास घडलेला बिल-कूल ऐकण्यांत नाहीं. धर्मस्वातंत्र्याच्या संबंधानें पाहतां तरी या देशांत लोकांची ामान्यतः अशीच समजूत आढळते कीं, ज्याचा जो परंपरागत धर्म तो त्यानें वालवावा, व हेंच त्यास उचित होय. गिझनीच्या महंमदानें हिंदूंचीं देवालयें

करणें त्यांस पुष्कळ वेळां जरूर पडतें. निदान इतकें तरी खरें, कीं कूपमंडूकन्यायानें जो मनाचा आकुंचित प्रदेश मनुष्यास प्रथमतः सारी पृथ्वी म्हणून भासत असतो तो 'इसापनीतीं'तील आकाशसंचारी कूर्मांप्रमाणें त्याची दृष्टि दूरवर फांकली असतां तसा भासेनासा होतो. मनुष्याची बुद्धि ही स्वभावतःच अल्पविषय असते; तिचा एकटीचा टप्पा कितीसा दूर जाणार! तेव्हां अर्थातच इतरांच्या विचारांशीं आपले विचार ताडून पाहून जेव्हां तारतम्य काढावें तेव्हां कोणत्याही गोष्टीचें खरें स्वरूप अधिकाधिक लक्षांत येऊं लागतें. हें महातत्त्व जाणूनच सूज्ञ आहेत ते कोणत्याही विषयावर घाईनें आपलें मत प्रदर्शित करीत नसतात; व एखाद्या गोष्टीचा सिद्धांत करावयाचा तर पूर्वपक्ष व उत्तरपक्ष या दोहोंचा यथास्थित रीत्या शांतपणानें विचार करून नंतर त्याचें निबंधन करावें लागतें. सारांश, संस्कृतांत म्हण आहे कीं, 'बुद्धेः फलमनाग्रहः'—बुद्धिमत्तेचें फल काय? तर आग्रहाचा अभाव!

आतां वर सांगितलेल्या गोष्टी म्हणजे कोणास माहीत नसून त्या आम्हीं येथें नव्यानें सांगितल्या आहेत असें नाहीं. ज्यानें थोडाबहुत विचार केला आहे, व ज्यास सत्य म्हणजे काय व ज्यास असत्य म्हणजे काय हें कळतें आहे, त्याच्या त्या सहज लक्षांत येण्यासारख्या आहेत. पण असें असून जगांतील व्यवहाराकडे जर दृष्टि दिली तर इतर शेंकडों ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी जसें सर्व सांगतांना सांगतात, व 'पुराणांतलीं वांगीं पुराणांत' या लौकिकन्यायास प्रसंग पडला असतां अनुसरतात, त्याप्रमाणेंच वरील तत्त्वज्ञानाची वेळोवेळ हेळसांड झालेली आढळते. यास उदाहरण खुद्द आमच्या सरकाराचेंच नुकतें घडलेलें होय. असो, तर आतां ग्रंथरचनेच्या कामास वरील दुराग्रह कसा आडवा येतो, व त्यापासून काय काय अनिष्टें घडतात, याविषयीं इतउत्तर विवेचन करूं.

वरील स्वातंत्र्याचे मुख्य प्रतिपक्षी म्हटले म्हणजे दोन, एक सरकारी अधिकारी व दुसरे धर्माधिकारी. आतां या दोघांकडून ग्रंथकारांच्या लेखणीला कसकसा धोका पोंचत असतो याविषयीं लिहितों.

जगांतील अधिकाराचीं मुख्य अंगें वरील दोन होत. ऐहिक प्रकरणांच्या संबंधानें लोकांची शेंडी व्यावहारिक प्रभूंच्या हातांत, आणि परमार्थिक प्रकरणांच्या संबंधानें धर्मप्रभूंच्या हातांत. तेव्हां जेथें वरील दोन्ही देवता सतत जागरूक असून,

त्यांचा अंमल कडकडीत असेल तेथें बिचाऱ्या ग्रंथकारांनीं करद्वय जोडून खाविंद-चरणारविंदीं मिलिंदायमान होऊन राहणें अशक्य होय. संस्कृतांत एक म्हण आहे कीं, 'शापादपि शरादपि,'–शस्त्राचा प्रतीकार शापेंकरून करावयाचा किंवा शरेंकरून करावयाचा! वरील दोनही अस्त्रें वरील दोघां प्रभूंच्या हातांत सदोदित असायाचीं. एकानें राजनिष्ठाभंग कोणी करतो कीं काय म्हणून नेहमीं डोळ्यांत तेल घालून लार्ड लिटनप्रणीत 'प्रेस आक्ट' पुढें मांडून बसायाचें, व दुसऱ्या पवित्र मंडळीनें आकाशापितृप्रणीत श्रीशुभवर्तमानाचें सतत पुरश्चरण करून त्यांतील अध्यायाला किंवा ओवीला कोणी सैतानप्रेरित कुमनुष्य धक्का लावतो कीं काय म्हणून त्याला शाप देण्याकरितां व त्याचा नायनाट करण्याकरितां तिलोदकाची अंजलि जशी काय नेहमीं सिद्ध करून ठेवावयाची! आतां वरील दोनही प्रकार आजपर्यंत किती जारीनें चालले आहेत, व आज वरील दोनही प्रकारचें स्वातंत्र्य जगांत कितपतसें प्रगट झालें आहे हें पाहूं.

ज्यास राजकीय प्रकरणीं आज जो स्वातंत्र्याचा येवढा झेंडा साऱ्या पाश्चात्य राष्ट्रांतून उभारलेला आढळतो त्याची हकीकत समजण्याची इच्छा असेल, व वरील जयप्राप्ति केवढ्या दारुण व दीर्घकालिक युद्धप्रसंगानंतर झाली आहे हें ज्यास पुरतेपणीं ध्यानांत आणावयाचें असेल, त्यास युरोपच्या राष्ट्रांचा व विशेषतः आमच्या राजकर्त्यांचा इतिहासच सारा ऐकून घेणें जरूर आहे. तसें केल्यासेरीज प्रस्तुत विषयाच्या स्वरूपाचा बोधही एतद्देशीयांस होणें कठिण आहे. कां कीं वरील स्वातंत्र्याबद्दल युरोपांत जशा झटापटी झाल्या आहेत तशा इकडे झालेल्या आढळत नाहींत. इकडील राजांनीं किंवा धर्माधिकाऱ्यांनीं ग्रंथकारांच्या भानगडीत आपण होऊन पडल्याचीं उदाहरणें मुळींच आढळत नाहींत. युरोपांत ग्यालिलियोनें पृथ्वीच्या दैनंदिन भ्रमणाची उपपत्ति काढली, तों लागलींच त्यास पोपसाहेबांकडून पाचारण होऊन त्याला एखाद्या चोराप्रमाणें पिंजऱ्यांत उभा करून त्याची चौकशी केली; आणि सरते शेवटीं त्या बिचाऱ्याकडून वरील महापातकाबद्दल प्रायश्चित्त करवून त्यास चिनभाडयाच्या घरांतही सोंपवून दिलें. इकडे वरच्यासारखा प्रकार आर्यभट्ट किंवा भास्कराचार्य वगैरे कोणास घडलेला बिलकूल ऐकण्यांत नाहीं. धर्मस्वातंत्र्याच्या संबंधानें पाहतां तरी या देशांत लोकांची सामान्यतः अशीच समजूत आढळते कीं, ज्याचा जो परंपरागत धर्म तो त्यानें चालवावा, व हेंच त्यास उचित होय. गिझनीच्या महंमदानें हिंदूंचीं देवालयें

उध्वस्त केलीं, पण हिंदूंनीं मुसलमानांच्या मशिदी किंवा किरिस्तावांचीं देवळें मोडल्याचें कोठें आढळत नाहीं. औरंगजेबानें पशुवत् आचरण करून वेरूळच्या वगैरे लेण्यांसही होईल तेवढा उपद्रव देण्यांत कमी केलें नाहीं. पण शिंदा किंवा होळकर ताजमहालाच्या राशीस लागल्याचें इतिहासांत आढळत नाहीं. हें तर राहोच; पण उलट पेशवाईत असाही जेथें तेथें प्रकार झालेला अढळतो, कीं परधर्माच्या देवस्थानांस पूर्वीच्या नेमणुका जशाच्या तशा कायम ठेवल्या जात. तर धर्समंबंधीं स्वातंत्र्य जें येवढ्या लढाया व भवति न भवति करून आमच्या पाश्चात्य बंधूंस प्राप्त झालें तें आमच्या राष्ट्रांत तर केवळ अंगभूत असल्याप्रमाणेंच वास करतें आहे.

असो, आतां ग्रंथकारांस आपले विचार प्रगट करण्यास पूर्णपणें मोकळीक दिली असतां त्यापासून काय लाभ आहेत व तसें नसल्यानें कोणकोणते तोटे आहेत तें सांगतों. ग्रंथरचनेचा मुख्य उद्देश सत्याचें प्रकाशन हा होय हें उघडच आहे. वर्षानवर्षें एखाद्या विषयावर मनन करून आपल्या कल्पना व विचार ग्रंथरूपानें प्रगट करण्याचे प्रयास जो कोणी करतो तो वरील उद्देशानेंच करीत असतो. शिवाय सत्य ज्ञानाचा प्रसार होणें हें जगास किती हितावह होय हें स्पष्टच आहे. मग असें जर आहे, तर सरकारनें किंवा धर्मखात्यानें 'पंचतंत्रां' तील कीलोत्पाटी वानराप्रमाणें 'अव्यापारेषु व्यापार' करून आपलें जगांत हांसें करून घ्यावें हें किती वाईट आहे बरें! ग्यालिलियोच्या उदाहरणाहून हास्यास्पद गोष्ट आणखी ती कोणती हवी! पोपसाहेब व त्यांचें आचार्यमंडळ या बेट्यांस ज्योतिषशास्त्राची व गणिताची कितीशी माहिती असेल बरें! मग आपली तुट-पुंजी न ओळखतां ज्या प्रज्ञाशाली तत्त्ववेत्त्यानें स्वनिर्मित यंत्रादि साधनांच्या योगानें व आपली विशालबुद्धि लढवून वरील अद्भुत प्रमेय जगांत प्रगट केलें, व ज्याचे दासानुदास होण्यासहि वरील वृद्ध बटु योग्य नव्हते, त्याची त्यांनीं हाल-अपेष्टा करावी व आपल्या मौर्ख्याचा डंका दुनियेभर गाजवावा, हें किती विचित्र आहे! याचप्रमाणें फ्रान्स देशांतही व्हाल्टेरप्रभृति महाविख्यात ग्रंथकारांचा तेथील अधिकाऱ्यांकडून कोणत्या प्रकारें छळ झाला याचा वृत्तांत बकलनामक प्रख्यात इतिहासकारानें मोठ्या मनोवेधक रीतीनें दिलेला आहे. राजमंडळापैकीं एखाद्यास वरील महापंडिताच्या एखाद्या ग्रंथांत कांहीं गैर दिसलें कीं त्यांनीं ताबडतोब त्यांस पकडून आणावें, दंड करावा, तुरुंगांत टाकावें आणि सर्वां-

समक्ष वरील सबंध ग्रंथचे ग्रंथ फाशीं देणाऱ्या मनुष्याच्या हातून जाळून टाकवावे ! वरील हकीकती वाचल्या म्हणजे हसावें कां रडावें, कां दांत खावे हें कांहींच कळत नाहीं ! वरील प्रकार हे केवढ्या दांडगाईचे, केवढ्या अधमपणाचे, व केवढ्या बेवकुफीचे होते हें सांगतां पुरवत नाहीं ! एका संस्कृत कवीनें आपल्या पूर्वकालीन श्ववृत्तीचें खेदपूर्वक व लज्जापूर्वक स्मरण करून 'द्विचरणपशूनां क्षितिभुजाम् ' (दोन पायांचे पशु जे राजे यांचा) असा आपल्या माजी प्रभूंचा धिःकार केला आहे, त्याची सार्थकता आततायीपणाच्या घोर कृत्यांवरून पूर्णपणें मनास भासते !

आतां मागें जे कांहीं प्रकार सांगण्यांत आले ते आमच्या देशांत कांहीं दृष्टीस पडतात कीं काय हें पाहूं. म्हणजे सरकारापासून किंवा धर्मखात्याकडून ग्रंथकारांच्या स्वातंत्र्यास कांहीं धक्का पोंचतो कीं काय, याचा विचार करूं.

वस्तुतः पाहतां वरील सदराचा विचार फार विस्तारानें करण्यासारखी आमच्या देशाची अद्याप स्थितिच आली नाहीं. एरवीं सर्व गोष्टींत जशी आमची अजून बाल्यावस्था आहे तशीच ग्रंथरचनेच्या कामांतही आहे. जन्मचा जन्म विद्याभ्यासांत घालवायाचा, वर्षांचीं वर्षें खपून एखादा बडा ग्रंथ पैदा करायाचा, 'ब्रह्मानंदीं लागली टाळी' या न्यायानें तत्त्वविचारांस गढून जावयाचें, वगैरे गोष्टी ज्या पाश्चात्य ग्रंथकारांच्या चरित्रांतून आढळतात, त्यांचा लवलेशही अद्याप इकडे पडूं लागला नाहीं. इकडे ग्रंथकर्तृत्वाची मोठी सीमा झाली म्हटली म्हणजे एखाद्यानें एखादें इंग्रेजी पुस्तक घ्यावें, वर्ष सहामहिने खपून त्याचा तर्जुमा करावा, डायरेक्टरसाहेबांच्या चरणसंपुष्टापाशीं तो नेऊन हजर करावा, त्यांनीं ट्रान्सलेटरच्याकडे तो झोकून द्यावा, त्यांनीं कांहीं तरी कोंबडें वर करून त्याचा सोक्ष कीं मोक्ष एकदांचा ठरवावा, आणि मग कांहीं पांचपंचवीस प्रतींची रुपा, अगर निवळ अर्धचंद्र, अशी कांहीं तरी ग्रंथकाराची संभावना व्हावी ! बाकी स्वतंत्र रीतीनें ग्रंथकारांच्या लेखण्या चालल्या आहेत आणि लोकांकडूनच त्यांच्या श्रमाचें चीज होत आहे, असा प्रकार आजमित्तीला तर जितक्यास तितकाच आहे. तेव्हां अशा स्थितींत युरोपांतील देशांतून नजरेस येणारा प्रकार इकडे कितपतसा आढळण्याचा संभव आहे हें उघडच आहे. इकडचे ग्यालिलियो, व्हाल्टेर, मिल्ड, ब्राडलॉ अद्याप निपजावयाचेच आहेत; तेव्हां त्यांनीं स्वातंत्र्याप्रीत्यर्थ केलेल्या युद्धाची वार्ता याच्या पुढेंच आहे.

तथापि येथेंही पूर्वोक्त प्रकार अगदीं नाहींच असें म्हणतां येत नाहीं. सरकारचा व सरकारी धर्मखात्याचा थोडाबहुत डोळा एतद्देशीय ग्रंथकारांवर आहेच. तो याहूनहि अधिक असता; पण युरोपांतील देशांत व या देशांत प्रस्तुत विषयाच्या संबंधानें एक फारच मोठा फरक आहे. तिकडचीं सरकारें स्वराज्येंच असल्यामुळें ग्रंथकारांची भाषा व राज्यकर्त्यांची भाषा हीं एकच असत व आहेत. पण इकडचा प्रकार तसा नाहीं. इकडे जेव्हां कोणी ' इंटरप्रेटर ' म्हणजे दुभाष्या, ग्रंथकार व सरकार यांच्या दरम्यान उभा रहावा, व सरकारास किंवा ख्रिस्ती धर्मास दिलेल्या शिव्यांचें भाषांतर इंग्रजींत करून सांगावें, तेव्हां त्यांची दाद तेथपर्यंत पोंचणार ! नाहीं तर एखाद्या साहेब बहादुरांशीं ' गुड मार्निंग ' करून त्यांच्या देखत जरी ' जनांतिकम् ' त्यांच्यावर पुष्पवृत्ति केली तरी ती जशी उमगावयाची नाहीं, त्यासारखीच स्थिति देशभाषेंतील ग्रंथांची आहे. शेंकडों वेळां जरी त्यांच्या आवृत्ति निघाल्या, तरी कोणी होऊन जेव्हां भाषांतरांचें काम पतकरावें, तेव्हां सरकारास त्याची पुरतेपणीं खबर कळणार ! सरकारांतूत ट्रान्स्लेटर व रिपोर्टर हे दोन कामदार नेमलेले आहेत, खरे; पण या दोन द्वारांतूनही वरील वरदी वरपर्यंत पोंचण्यास चांगलासा मार्ग नाहीं, कां कीं, एका अधिकाऱ्याचें काम जे ग्रंथ हजर होतील त्यांवर अभिप्राय ठोकून देण्याचें होय, व दुसऱ्यांचा ताबा मुख्यतः वर्तमानपत्रांवरच आहे.

तरी अशांतही वरील प्रकारचा बंदोबस्त होण्याचा एक तिसराच मार्ग आमच्या देशांत उपलब्ध आहे. हा मार्ग अस्सल व बनावट ख्रिस्तपुत्र हे होत. त्यांच्या हातून वरील पोलिसतपासाचें काम नेहमीं जागरूकतेनें होत असतें. आमच्या पुणें शहरांत सुमारें तीस वर्षांपूर्वी ' विचारलहरी ' म्हणून एक पाक्षिक पत्र निघत असे, यांत ख्रिस्ती धर्माची फजिती उडवलेली असे. तें सरासरी सात आठ महिने निघून पुढें पवित्र मंडळीच्या उद्योगानें त्याचा लवकरच ग्रंथ आटपला म्हणून ऐकण्यांत आहे. त्याप्रमाणेंच हल्लींच्या ' निबंधमाले 'सही ख्रिस्तशिष्यांची कृपा पुष्कळ फळास आली असें ऐकतों. कांहीं पवित्र बाळांनीं तर सबंध अंकचे अंक भाषांतर करून खाविंदचरणारविंदाकडे रवाना केले होते म्हणून समजतें. तथापि सन १८५७ सालापासून शुभवर्तमानवाली मंडळी सरकारदरबारांत जराशी फिक्की पडली गेल्यामुळें मागले रे० मिचेलशाहीचे दिवस आतां पुनः उगवण्याची बिलकूल धास्ती उरली नाहीं !

येथें प्रसंगवशात् माजी क्यांडी साहेबांच्या कारकीर्दीतिल एकदोन चमत्कार सांगितल्यावांचून राहवत नाहीं. हे साहेब पहिल्या प्रतीचे सरकारानिष्ठ व खिस्तनिष्ठ होते. दोहों प्रकरणांत यत्किंचितही वावगें कोणीं लिहिलेलें त्यांस खपत नसे. चौथ्या किंवा पांचव्या पुस्तकांत कांहीं तुकारामाचे अभंग घातलेले आहेत. त्यांतील एक मासला पहा—

ज्याचा सखा हरी । त्यावरि विश्व कृपा करी ॥

हा आमच्या भोळ्या, अशिक्षित, व असद्धर्मी शूद्रकवीचा वाग्विलास. आतां यावर ट्रान्सलेटरी पेनाची सफाई कशी फिरली ती पहा—

ज्याचा सखा देव । त्यावरि कृपा करी विश्व ॥

याप्रमाणेंच सात आठ वर्षांपूर्वी साहेब बहादुरांच्याकडे 'प्रेमबंधन' नामें करून एक कादंबरी आली. ती साहेबांच्या कसास बरीच उतरली, व ग्रंथकाकाराची संभावनाही बरीच झाली. पण एका गोष्टीनें साहेबांच्या मस्तकास तिडिक गेली. ती ही कीं, कादंबरीकारानें आरंभीं 'ब्रह्मस्तुति' म्हणून एक ईश्वरस्वरूप वर्णनपर लहानसें पद्यात्मक प्रकरण जोडलें होतें, त्यावर साहेबांनीं नाक मुरडून रिपोर्टांत शेरा मारला कीं, हें असद्धर्मी प्रकरण ग्रंथकार जर काढून टाकील तर यास बक्षीस द्यावें. करतां काय ! साहेबांच्या मर्जीसाठीं तितक्या प्रतींतली. 'ब्रह्मस्तुति' कातरून काढावी लागली !

बिचारी मराठी भाषा ! असले करडे इमाम तिजवर प्रभुत्व करायाला असल्यावर मग तिची वाढ आजमित्तीला जी दृष्टीस पडत आहे तितकीच असल्यास नवल कसचें? सावटाखालीं झाड कितीसें वाढीला लागणार? एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे:—

नच बंधवहेन चुंबिता नच पीता मधुपेन मंजरी ।
पिहितैव कठोरशाखया परिणामस्य जगाम गोचरम् ॥ *

अशी अवस्था आमच्या देशभाषेची झाली नाहीं हेंच भाग्य !

[वर्ष २, अंक ३, ४, ५, ६, ८.]

---

* "या लतेस वायूचा स्पर्श झाला नाहीं, व भ्रमरानेंही हिच्या मंजरीचें सेवन केलें नाही; पण बिचारी कठोर शाखांच्या कचाटींत सांपडल्यामुळें परिणामदशेस जाऊन पोंचली !"

कै. विष्णु कृष्ण चिपळोणकर.

देह त्यागितां कीर्ति मागें उरावी ।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥

श्री रामदास.

गेल्या शुक्रवारीं सकाळीं सात आठ वाजण्याच्या सुमारास डोळकर आळींत एकच गर्दी झाली. शाळांतील लहान मोठीं मुलें, व त्याप्रमाणेंच गांवांतील तरुण आणि वृद्ध लोक यांचीं तोंडें म्लान होऊन त्यांवर विपरीत कळा आली. इतक्यांत चिपळोणकरांच्या वाड्यांतून स्त्रियांचा दीर्घरुदनस्वर बाहेर आला! त्याबरोबर घात झाला अशी खात्री होऊन सर्वजण तोंडाला पदर लावून रडूं लागले. या वेळीं शाळेंतील मुलांनीं रडून जो कल्होळ केला तो सांगतां पुरवत नाहीं. विष्णुशास्त्री एखाद्या रोगानें चार सहा महिने खितपत पडले होते असें नाहीं. पंधरा दिवसांपूर्वी क्यांपमध्यें पोटोग्राफ घेण्यासाठीं टेबलावर उभे राहिले असतां एकाएकीं पित्तप्रकोप होऊन जी चक्कर आली त्यासरशी ते धाडकन् जमिनीवर बेशुद्ध पडले. कांहीं वेळानें शुद्धीवर आल्यावर त्यांस घरीं आणिलें. नंतर थोडासा ज्वर भरला. पण तो अशा थराला जाईल असें कोणाच्या स्वप्नांत देखील आलें नाहीं. त्या ज्वरामुळें त्यांस क्षीणता आली होती हें खरें, पण तो अशा तीव्र वेगानें उलटून, बोलतां बोलतां पुण्यांतील मोहरा रातोरात घेऊन जाईल असें कोणासही वाटलें नाहीं. परंतु दैवाची परम विचित्र गति ! ! शास्त्रीबोवांस कलंगड खाऊन थंड पाणी पिण्याची बुद्धि झाली; त्यासरशी कुपथ्य झाल्याचें निमित्त होऊन तात्काळ सन्निपात झाला तो त्यांना घेऊनच गेला. शास्त्रीबोवांच्या अकालिक मृत्यूनें "केसरी"चा एक पाय लंगडा झाला यांत कांहींच नाहीं. आज महाराष्ट्रवाणीचा पति परलोकवासी झाल्यानें ती गतभर्तृका झाली व महाराष्ट्रीयांनीं अद्वितीय रत्न गमाविलें, अशी आमची समजूत आहे. " मरणं प्रकृतिः शरीरिणाम् " अशी कविकुलगुरूक्ति आहे ती आम्हांस अक्षरशः मान्य आहे. परंतु हा अबाधित सृष्टिनियम शास्त्रीबोवा वयातीत झाल्यावर त्यांस लागू पडता म्हणजे आम्हांस इतका खेद करण्यास जागा उरतीना. परंतु ज्याप्रमाणें एखादा प्रचंड वृक्ष फळास येतो आहे नाहीं तों विद्युत्पात होऊन तो जमीनदोस्त व्हावा,

त्याप्रमाणें आतां आतां कोठें शास्त्रीबोवांच्या बुद्धीचीं परिपक्वफलें हवीं तशीं लोकांस मिळूं लागलीं होतीं तों त्यांस करुणाविमुख मृत्यूनें हरून नेलें हा केवढा दुःखाचा प्रसंग!! गेल्या वर्षींच आम्हीं एकत्र होऊन एक दिलानें प्रस्तुत उद्योग आरंभिला. तेव्हांची वरिश्री कोणीकडे आणि केसरीराजाच्या नैसर्गिक उद्धत वृत्तीला अननुरूप अशी सांप्रतची खिन्नावस्था कोणीकडे! असो, धैर्य धरून आला दिवस कसा तरी घालविलाच पाहिजे. गतवर्षीं बाळाजी बापूजी साने व चिंतामण सखाराम चिटणीस यांची मृत्युवार्ता कळविण्याचें दुःखाचें काम केलें; आज आम्हांपैकींच एकाच्या संबंधानें मृत्युलेख लिहिण्याचें आमच्या कपाळीं आलें आहे, त्या कामासाठीं शोक क्षणभर एकीकडे ठेवून धैर्याचें अवलंबन करितों.

विष्णुशास्त्री हे प्रसिद्ध कृष्णशास्त्री यांचे चिरंजीव. यांचें जन्म १८५० त झालें. यांना लहानपणापासून वाचण्याचा जबरदस्त नाद असे. ज्याप्रमाणें डॉक्टर जान्सन बापाच्या दुकानावर बसून फावल्यावेळीं अनेक विषयांवरील व्हाल्मेंच्या व्हाल्में फडशा करी, त्याप्रमाणें "दक्षिणाप्रैज कमिटी" किंवा "नेटिव प्रेसचे रिपोर्टर" या नात्यानें कृष्णशास्त्र्यांकडे जीं पुस्तकें येत तीं हे भावी शास्त्री वाचून टाकीत. या रीतीनें माट्रिक्युलेशन होण्यापूर्वीच विष्णुपंताच्या नजरेखालून अनेक ग्रंथ जाऊन मराठी भाषेवर त्यांचें प्रेम जडलें, व तें उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेलें. १८६५ त विष्णुशास्त्री पहिली परीक्षा होऊन ते कॉलेजांत गेले. त्यांना गणिताचा मोठा कंटाळा असे. मेकालेप्रमाणें ते आपला सारा वेळ ऐतिहासिक ग्रंथ वाचण्यांत घालवीत. १८७२ त त्यांची बी. ए. ची परीक्षा पास झाली. १८७३ त कांहीं महिने बाबा गोखले यांच्या शाळेंत शिक्षकाचें काम केल्यानंतर येथील सरकारी हायस्कुलांत त्यांना नव्वदांची जागा मिळाली, व पुढें नव्वदांचे शंभर झाले. निबंधमालेचा पहिला अंक १८७४ त बाहेर आला. निबंधमाला जों जों मोठी होऊं लागली तों तों शास्त्रीबोवांचीं मतें बाहेर पडून स्वातंत्र्यशत्रु आणि स्तुतिप्रिय अशा अधिकाऱ्यांशीं त्यांचें तेढें पडूं लागलें. आपल्या कर्तव्यांत निरंतर तत्पर असल्यामुळें शास्त्रीबोवा कधीं कोणाची पर्वा ठेवीत नसत. याचा परिणाम असा झाला कीं, जात्या परप्रतिष्ठाअसहिष्णु असे आमचे डायरेक्टर चाटफील्ड साहेब यांच्या तापट प्रकृतीवर कित्येक निंदकांनीं तैलवृष्टि केल्यामुळें तिनें जो पेट घेतला त्यासरशी त्यांनीं शास्त्रीबोवांची 'परशुराम क्षेत्रास' गठडी वळली. कोंकणवास विष्णुशास्त्र्यांना पराकाष्ठेचा दुःसह होऊन राजसेवाशृंखलांतून आपला पाय काढून घेण्या-

विषयीं त्यांचा निश्चय झाला. १८७८ त रुष्णशास्त्री वारले. १८७९ च्या एप्रिलांत विष्णुशास्त्री चाकरी सोडण्याच्या बेतानें आपलें चंबूगवाळें आटोपून पुण्यास आले. चारपांच महिने काय करावें, कोणता धंदा काढावा अशा विचारांत गेले. या सुमारास डेक्कन कालेजांतील दोनतीन गृहस्थांचा सरकारी नोकरी न करितां स्वतंत्रपणें लोकोपयोगी एखादें काम करण्याचा निश्चय झाला. नोकरी सोडून गांवांत शास्त्रीबोवा येऊन बसले आहेत असें कळल्याबरोबर सदर्हू मंडळी त्यांस जाऊन भेटली, व उभयतांच्या विचारें एक शाळा काढण्याचा विचार झाला; त्याप्रमाणें १८८० च्या जानेवारी महिन्यांत 'न्यू इंग्लिश स्कूल' या नांवानें मोरोबादादा फडणीस यांच्या वाड्यांत शाळा घातली; ती आतां कोणत्या स्थितींत आहे हें सांगायला पाहिजे असें नाहीं. शाळेस पुरें वर्ष झालें न झालें तों तिला आणखी एक दोन गृहस्थ येऊन मिळाले. पांचसहा मंडळी एका हेतूनें व एका मतानें वागत असल्यामुळें शाळेचें काम आटोपून आणखीही कांहीं करितां येईल असें वाटल्यावरून शुद्ध इंग्रजी आणि शुद्ध मराठी अशीं दोन वर्तमानपत्रें काढण्याचा विचार झाला, व त्याप्रमाणें ८१ च्या जानेवारींत मराठा व केसरी हे बाहेर आले. या दोघांनीं मिळून एका वर्षांत महाराष्ट्र देशांत केवढी चळवळ करून सोडिली आहे, याचा वाचकांनींच विचार करावा. याखेरीज शास्त्रीबोवांचे खासगी धंदे जोरानें चालले होते. निबंधमाला, किताबखाना, चित्रशाळा, वगैरे गोष्टी नेटानें चालल्याच होत्या. येणेंप्रमाणें शास्त्रीबोवा ज्या उद्योगांत व्यग्र असत त्यांची थोडीशी हकीकत झाली. शास्त्रीबोवांचे बहुतेक विचार त्यांच्या मालेंतून आणि केसरींतून प्रसिद्ध आहेत, तेव्हां त्यासंबंधानें विशेष लिहावयाचें आहे असें नाहीं. पण ज्या गोष्टी अतिशय भिडस्त स्वभावामुळें शास्त्रीबोवा जिवलग मित्रांबरोबर कधींही काढीत नसत, त्यासंबंधानें येथें दोन शब्द लिहिण्याचा हेतु आहे.

आपल्या देशाचें पारतंत्र्य आणि दारिद्र्य हीं शास्त्रिबोवांच्या अंतःकरणाला जशीं खात तसें दुसरें कांहीं खात नसे. आपल्या लोकांची दैन्यावस्था पाहून त्यांचा जीव तिळतिळ तुटे. पारतंत्र्याला ज्ञान आणि दारिद्र्याला उद्योग हींच वस्ताद औषधें असें ते नेहमीं म्हणत. लोकांना खरें ऐहिक सुख होण्याला त्यांची राज्यव्यवस्था कशी पाहिजे याचा विचार त्यांच्या मनांत नेहमीं घोळत असे. लोकांत विद्याप्रसार होऊन त्यांना राजकारणांतील तत्त्वें कळावीं, व तदनुसार त्यांनीं वर्तन ठेऊन या हतभाग्य भरतखंडास त्यांनीं एकदां तरी सुदिन आणावा


ही त्यांची बळकट इच्छा असे. परकीय लोक राज्य करीत असल्यामुळें आमचे लोक सत्वहीन होत जाऊन अप्पलपोटे, भेकड, हांजीहांजीखोर, मट्ठ, निर्लज्ज, अभिमानशून्य असे झालेले पाहून त्यांच्या अंगाचा तिळपापड होई. परकीय या नात्यानें इंग्रेजांचा त्यांना अत्यंत कंटाळा असे, पण त्यांची करामत, दृढता, कौशल्य आणि उद्योग हीं पाहून त्यांस त्यांचें पराकाष्ठेचें आश्चर्य वाटत असे. हिंदुलोकांचा, हिंदुधर्माचा, हिंदुरिवाजांचा सारांश ज्याला ज्याला म्हणून 'हिंदु' हें विशेषण लावितां येईल त्याचा त्यांना मोठा अभिमान असे. सर्वांपेक्षां मराठी भाषेवर त्यांचें जें प्रेम असे तें कांहीं पुसूंच नये. एकसारखी सात वर्षें तिची उपासना करून त्यांनीं तिला अगदीं भारून टाकल्यासारखें केलें होतें. ज्याप्रमाणें प्रख्यात फ्रेंच ग्रंथकर्ता व्होल्टेर यानें एकदां कोरडा उचलला म्हणजे स्टाकहोम व रोम, आणि पीतर्सबर्ग व लिस्बन यांच्या दरम्यान चटसारी मंडळी चळवळ कांपत असे, त्याप्रमाणें शास्त्रीबोवांनीं लेखणी उचलली कीं रावसाहेब, रावबहादुरें, रेवरंडे, सरस्वती–यांची पांचावर धारण बसे. आपल्या मागें आपलें नांव चालविण्यास त्यांनीं एक सप्तसंवत्सरा निबंधमाला कन्येखेरीज दुसरें कांहीं ठेविलें नाहीं. त्यांच्या त्या गद्य कृतीला "स्फुरत्कलालाप विलास कोमला" हें बाण कवीचें वर्णन हुबेहुब लागतें. कोणीं एकदां शास्त्रीबोवांना असा प्रश्न केला होता कीं असे कडक लेख लिहिण्यास तुम्ही कसे धजतां! त्यावर त्यांनीं असें उत्तर केलें कीं अगोदर तुरुंगांत एक पाय ठेवून मग आम्हीं देशोन्नतीसाठीं आपली लेखणी हातीं घेतली. एखाद्या वेळेस त्यांचा कल्पनाविहंग पूर्ण पंख पसरून भराऱ्या मारूं लागला म्हणजे त्याला हिंदुस्थान देश स्वतंत्र होऊन प्रजासत्ताक राज्याखालीं सुखानें नांदत आहे असें दिसे. पुनर्विवाह, बालविवाह, स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, धर्मसंस्थापना, जातिभेद यांसंबंधानें त्यांचे विचार जुन्या मताचे दिसत, परंतु ते वास्तविक रीतीनें अगदीं पुढें सरसावलेल्या सुधारकाप्रमाणें होते. फार कशाला, गेल्या केसरींतील 'देशोन्नति' या सदराखालचा निबंध जो कोणी लक्ष लावून वाचील त्याला शास्त्रीबोवांचे जातिभेदासंबंधानें काय विचार होते हें सहज लक्षांत येईल. इतकें खरें आहे कीं ते या विषयासंबंधानें फारसें कधीं लिहीत नसत; पण लिहूं लागल्यास वृद्धपिढीचा रोष होईल म्हणून आपलीं खरीं मतें पुढें करण्यास ते कधींही भीत नसत. सारांश हिंदुस्थानचें पारतंत्र्य नष्ट होऊन तो स्वराज्याखालीं सुखी होण्याचें कोणतेंही साधन असल्यास त्याला ते अडथळा घेणारे नव्हते. अस्तु;

बरवेप्रकरण चालू असतां त्यांचा एकाएकीं अंत झाला हें पाहून कोणीं अधमांनीं अशी कंडी उठविली कीं, कारभाऱ्याला भिऊन जाऊन त्यांनीं आत्महत्या केली; असले नीच नरपुंगव कोण असतील ते असोत. शास्त्रीबोवांना तर आपल्या लेखणीच्या सामर्थ्याविषयीं अशी धमक होती कीं प्रसंग पडल्यास तुरुंगांतल्या तुरुंगांत "असल्या शेंपन्नास राजशत्रूंना सर्व महाराष्ट्राकडून मी 'छी थू' करून सोडीन."

येथवर शास्त्रीबोवांचीं ठळकठळक राजकीय व सामाजिक मतें सांगण्यांत आलीं. हिंदुस्थानच्या दारिद्र्याच्या संबंधानें त्यांची अशी खातरी झाली होती कीं येथें व्यापारवृद्धि झाल्याविना आमच्या देशाचें डोकें वर निघणार नाहीं. याच उद्देशानें त्यांनीं सरकारी दास्याची रुपेरी बिडी तोडून घेऊन पुणें येथें स्वतंत्रपणानें वास्तव्य करण्याचा विचार केला. व एकीकडे अध्ययन, अध्यापन आणि ग्रंथरचना यांत आपला कालक्रम करण्याचा निश्चय करून दुसरीकडे आपल्या नजरेखालीं छापखाना, चित्रशाळा, किताबखाना वगैरे कारखाने काढिले. लवकरच कांहीं खटपट करून कागदाचें एक यंत्रही आणविण्याचा त्यांचा विचार होता. हे धंदे त्यांनीं द्रव्यसंपादनेच्छेनें काढिले असें नाहीं, कारण द्रव्यसंबंधानें शास्त्रीबोवा जितके निरपेक्ष होते तितका दुसरा पुरुष सांपडणें कठिण. त्यांचा हेतु असा असे कीं देशांत कारखाने निघून लोकांस काम मिळावें व त्यांस भाकरीची वाण पडूं नये. शास्त्रीबोवांनीं वर जे कारखाने काढिले त्यांत तरी त्यांचा येवढाच हेतु होता. त्यांपासून स्वतःचा फायदा करून घेण्याची इच्छा त्यांनीं कधीं धरली नाहीं. त्यांचें असें म्हणणें असे कीं, बुद्धिवान् आणि चतुर लोकांनीं मोठमोठे धंदे अंगावर चालू करावे आणि मग ते साधारण लोकांच्या हातांत देऊन आपण त्यांपासून अलग रहावें. आम्हांस तर असें वाटतें कीं शास्त्रीबोवांसारखा हिम्मतवान, प्रशांत, गंभीर आणि निरपेक्ष मनुष्य अत्यंत विरळा असेल. कोणी हितचिंतक मित्र विनोदानें आमच्या गट्टीस ग्राज्वेट पंचायतन, ग्राज्वेट पांडव असें म्हणत. निष्ठुर मृत्यूनें आम्हांपैकीं आमचा भ्राता धर्मराज आज यमसदनास पाठविला, व आमच्या बंधाचा ग्रंथिमणि हिराविला ही गोष्ट खरी, तथापि आमची अशी उमेद आहे कीं आम्ही एकवार मनाचा निश्चय करून देशोन्नतीसाठीं झटण्याचा केलेला संकल्प होतां होईल तों ढळूं देणार नाहीं. प्रथम लोकांना आम्हांविषयीं अशी भीति होती कीं, द्रव्यसंबंधानें आमच्यांत आपआप-

सांत कलागती लागून आमची जूट फुटेल. पुढें बर्वेप्रकरण येऊन धडकलें तेव्हां तर कित्येकांना असें वाटलें कीं, या ग्राजुएटांची फटफजीती होते! आणि आतां तर आम्हांपैकीं एकानें परलोकास प्रयाण केलें; तेव्हां आम्हांविषयीं लोकांच्या मनांत नानातऱ्हेचे तरंग येऊं लागले आहेत यांत नवल नाहीं. पण सर्वांनीं एक गोष्ट लक्षांत धरावी ती ही कीं, आम्हीं जो उद्योग आरंभिला तो लोकांनीं घोड्यावर बसविलेल्या रडत रावाची मनोवृत्ति धारण करून आरंभिला नाहीं. हें काम आम्हीं आपल्या आपखुषीनें आणि आपसमजुतीनें आमचें आम्हीं आपल्या अंगावर घेतलें; तें तडीला लावण्यासाठीं आमच्याकडून होईल तितका प्रयत्न करण्यास आम्ही कधींही सोडणार नाहीं. देवाच्या किंवा दैवाच्या इच्छेपुढें इलाज नाहीं, अशा रीतीनें मनाची खोटी समजूत घालून अशा लोकहिताच्या कामांत प्रतिपक्षाची क्षमा मागण्याचें काम आमच्या हातून होणार नाहीं. अधिकार, धन, वजन यांपुढें टिकाव धरणें दुस्तर आहे हें आम्ही कबूल करितों. परंतु सत्याचा कैवार घेऊन शुद्ध अंतःकरणानें लोकहितासाठीं भांडणारांना कोणत्याही प्रकारची धास्ती बाळगण्याचें कारण आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आणि असें असूनही प्रसंग येऊन बेतलाच तर तो साहण्यास आम्ही कचरूं अशी कोणीही शंका घेऊं नये. आमचें धैर्य आणि कार्यनिष्ठा हीं कसास लागण्याची संधि आली आहे असें आम्ही समजतों. शास्त्रीबोवांचीच कथा काय, पण आम्हांपैकीं एक जरी तळावर असला तरी तो आम्हीं सर्वांनीं आरंभिलेले उद्योग अविच्छिन्न चालविण्यास होईल तितकी खटपट करील. 'निबंधमाला' मात्र पुढें चालविण्याचा आमचा विचार नाहीं, कारण शास्त्रीबोवांनींच ८४ व्या अंकांत तिची समाप्ति करून तिच्या जागीं 'ग्रंथमाला' प्रसिद्ध करण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे. तो अंक कारणांसह लोकांपुढें लवकरच येईल. देशोन्नति, देशकल्याण वगैरे गोष्टी थोडीबहुत अंगास झीज लाऊन घेतल्याखेरीज फुकाच्या पोकळ गप्पा मारून होत नाहींत हें आम्ही पक्कें समजत आहों. ती लाऊन घेण्यास आम्ही तयार आहों. प्रयत्न करणें आमचें काम आहे; यश येणें न येणें बाह्योपाधींवर अवलंबून आहे. त्याचा आम्ही विचार करीत नाहीं. येवढें सांगून व त्या महात्म्याला परलोकीं सर्वोत्कृष्ट शांति आणि कल्याण चिंतून हा लेख आटोपतों.

[वर्ष २, अंक १२.]



मन आणि मेंदू

वरील शिरोलेख पाहून आमचे वाचक कदाचित् एका प्रकारच्या बुचकळ्यांत पडतील कीं या सदराखालीं निबंध येणार आहे तरी कसल्या प्रकारचा. तथापि तसें होण्याची कांहीं गरज नाहीं. कारण या पत्रांत अनेक विषयांच्या माहितीचे लेख येत जातील असें आम्हीं पूर्वीच कळविलें आहे; त्या आमच्या आद्यसंकल्पाला अनुसरून प्रस्तुत विषय आम्हीं हातीं घेतला आहे. या विषयांत सध्यां फार खोल जाण्याची आमची इच्छा नाहीं. पारिभाषिक संज्ञांच्या खटाटोपांत न पडतां किंवा शरीरव्यवच्छेदनकर्त्यांच्या शारीरकाच्या बिकट जालाचे सूक्ष्म तंतू सोडवीत न बसतां; साधारण शिकलेल्या वाचकांस समजेल अशी वरवरची माहिती देण्याचा आमचा हेतु आहे. ती बरीच रुचली तर त्याहीपेक्षां खोल जाऊं. पण सांप्रत मन आणि मेंदू यांचा अन्योन्यसंबंध दाखविण्यापलीकडे जाण्याचा विचार नाहीं.

व्यवहारांत अशा अनेक गोष्टी असतात कीं ज्यांचा आपला नित्यसंबंध असूनही ज्यांच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान आपणास बिलकुल नसतें. उदाहरणार्थ सरकारी नोटी घ्या. दिसण्यांत शुद्ध कागदाचे कपटे! पण त्यांची पत केवढी कीं प्रसंग पडल्यास पांचपासून दहा हजार सुर्ती खजिनदारास खजिन्यांतून त्यांचद्वल काढून द्यावे लागतात! बाजारांत मुखोट्याच्या रुपेरी चातीला जी किंमत तिच्या भारंभार या कागदी कपट्यांची किंमत. आतां नोटींचें हें सामर्थ्य जरी प्रत्येकाच्या अनुभवांतलें आहे; तरी सरकार नोटी छापतें कशासाठीं, त्यांना येवढी किंमत येते कशानें, त्या देवघेवींत आल्यानें व्यापारावर कोणत्या प्रकारचा परिणाम होतो, वगैरे गोष्टींचें ज्यांस यथार्थ ज्ञान आहे असा हजारांत एक सांपडेल कीं नाहीं त्याची आम्हांस मुष्कील वाटते. त्याप्रमाणें या मनाची गोष्ट आहे. ज्याला त्याला आपापल्या मनाचा नित्य अनुभव आहे; त्याच्या अस्तित्वाविषयीं कोणास शंका नाहीं. असें असतां त्याचें खरें स्वरूप माहित असणारा असा लाखांत एखादा असेल तर असो. मन हें आहे तरी काय आणि तें राहतें कोठें! तें साकार आहे किंवा ईश्वराप्रमाणें निराकार आहे!

एकट्या मनांत कित्येक वर्षेंपर्यंत हजारों गोष्टी रहातात कशा? पाहिजे त्यावेळेस त्यांतून पाहिजे ती गोष्ट काढतां येते कशी? जड पदार्थाप्रमाणें त्याला लांबी, रुंदी, उंची, जाडी वगैरे गुण आहे कीं नाहीं? शरीराचे चलनवलनादि सर्व व्यापार त्याच्या कह्यांत चालतात हें कसें? वगैरे प्रश्न किती गंमतीचे आहेत आणि जिज्ञासा तृप्त होण्याजोगीं यांचीं उत्तरें मिळालीं तर किती समाधान होणार आहे! तसेंच मन, आत्मा, बुद्धि, इच्छा यांसंबंधानें आमच्या जुन्या वेदांत्यांनीं एकच परब्रह्म करून टाकिलें आहे. त्याची गुंतागुंत थोडीबहुत सोडवितां येणार आहे, असे या विषयाच्या ज्ञानानें अनेक लाभ होणार आहेत.

या जगांत ज्या मौल्यवान् वस्तु आहेत त्यांत अत्यंत मौल्यवान् वस्तु कोणती म्हणाल तर प्राण्यांच्या मस्तकांतील मेंदू. मोठ्या कष्टानें डोळ्यास दिसणाऱ्या कृमीपासून तों तहत मोठ्या काल्पनिक मनुष्यापर्यंत प्रत्येक प्राण्याच्या डोक्याच्या करटींत हा थोडाबहुत तरी असतोच. मन आणि मेंदू यांचा निकट संबंध आहे तो इतका कीं, जेथें मेंदू नाहीं तेथें मन नाहीं व जेथें मन नाहीं तेथें मेंदू नाहीं. मनाचें अस्तित्व मेंदूवर आणि मेंदूचें मनावर अवलंबून असतें. ज्याचा मेंदू मोठा त्याचें मन मोठें, ज्याचा मेंदू लहान त्याचें मन लहान; ज्याचा मेंदू बिघडलेला त्याचें मन बिघडलेलें. शरीराच्या मानानें मनुष्यापेक्षां जनावरांचे मेंदू लहान म्हणून त्यांचें शहाणपण कमी. थोर मनुष्यापेक्षां मुलांचें ज्ञान कोतें याला कारण तरी त्यांच्या मेंदूचा लहानपणाच. सरासरीनें बायकांना पुरुषांपेक्षां ग्राहकशक्ति कमी असते, याचें कारण असें कीं, त्यांचे मेंदू पुरुषांच्या मेंदूपेक्षां लहान असतात. वेड्याचें मन अस्थिर असतें; कारण त्याचा मेंदू बिघडलेला असतो. कोणत्याही कारणानें मेंदू थकला कीं मनाला क्षीणता आलीच म्हणून समजावें; ग्रहण करणें, आठवण ठेवणें, विचार खरणें, येवढ्याच गोष्टी मेंदूकडे आहेत असें नाहीं. मनांत जे असंख्य व्यापार चालतात त्या सर्वांची या विलक्षण मज्जागोलकांत वर्दी लागली पाहिजे. येथें हजिरी लागल्याशिवाय एक केस हालावयाचा नाहीं. कोणीं टांचणी टोंचली किंवा चिमटा घेतला तर वेदना टाळण्यासाठीं ज्या अवयवास त्रास होत असेल तो मागें घेणें याची देखील मेंदूपर्यंत वर्दी लागली पाहिजे. सारांश जें जें येतें किंवा होतें तें तें अगोदर मेंदूंत झालें पाहिजे. मन आणि मेंदू यांची इतकी गट्टी जमून गेली आहे कीं मन हें मेंदूचा गुण किंवा धर्म आहे कीं काय असा कधीं कधीं भास होतो.

कांचेचा एक तुकडा घेऊन त्याच्याकडे पहा. त्यांत पारदर्शकता आहे, स्पर्शनीयता आहे, काठिण्य आहे, विस्तृति आहे, परिणाम आहे व आणखी पुष्कळ गुण आहेत. हे एकाच कांचेच्या तुकड्यांत एका काळीं रहाणारे अनेक धर्म आहेत. त्याप्रमाणें एकाच मेंदूंत ग्रहणशक्ति, स्मरणशक्ति, विचारशक्ति वगैरे अनेक धर्म आहेत. या सर्व धर्मांना आपण मन असें म्हणतों. या धर्मांपैकीं एकेकाला मेंदूंत एकेक जागा नेमून दिली आहे असें शास्त्रज्ञांनीं अनुभवावरून काढिलें आहे. मेंदूच्या ज्या भागाशीं स्मृतीचा संबंध आहे तो वाढविला, कमी केला, बिघडविला, किंवा मुळींच नाहींसा केला म्हणजे मनाच्या बाकीच्या शक्ति साधारणपणें जशाच्या तशाच राहून त्याची स्मरणशक्ति मात्र वाढल्यासारखी, कमी झाल्यासारखी, बिघडल्यासारखी किंवा मुळींच नाहींशी झाल्यासारखी दिसते. शरीराप्रमाणें मेंदूचा एकच भाग इतरांपेक्षां व्यायामानें बळकट किंवा क्षीण करतां येतो. बैठकी काढणाऱ्याच्या पायांच्या शिरा बळकट झालेल्या असतात. त्याप्रमाणें अवधानी बोवांची स्मरणशक्ति मेंदूच्या ज्या भागांत राहते, तो भाग इतरांपेक्षां मोठा आणि बळकट झाला पाहिजे. सारांश मनाचे सर्व खेळ मेंदूवर अवलंबून आहेत. आतां बुद्धि ही केवळ शरीराच्या मानानें मेंदूच्या लहानमोठेपणावर आहे हें दाखविण्याकरितां दोन चार तत्त्ववेत्त्यांच्या मेंदूचीं ओळीनें वजनें देतों. क्युव्हीअर हा पहिल्या प्रतीचा बुद्धिवान्. याचा मेंदू पक्का दोन शेर होता. वेबस्टरचा पावणेदोन शेर जवळ जवळ होता. डी मारगनचा त्याच्यापेक्षां थोडा कमी. एकंदरीनें पुरुषांचा मेंदू दीड शेरावर असतो, व बायकांचा दीड शेराच्या आंत असतो. खुळ्यांचा मेंदू पाऊण शेरापासून पावशेरापर्यंत पाहण्यांत आला आहे. हत्तीचा मेंदू चार पासून पांच शेर भरतो. हत्तीपेक्षां मोठा मेंदू कोणाचा नाहीं. समुद्रांत कित्येक बडे मासे आहेत त्यांचे मेंदू जेमतेम साडेतीन शेरांपर्यंत पहाण्यांत आले आहेत. यावरून पाहतां रात्रीच्या रात्री बुकांचा कुट्टा केल्यानेंच सर्वांना रा. ब. रानडे किंवा रा. ब. छत्रे होतां येईल असें नाहीं !

हस्तपादादिक जशीं कर्मेंद्रियें व कर्णादिक जशीं ज्ञानेंद्रियें, तसेंच मेंदू हें मानस इंद्रिय. तें त्यांच्याप्रमाणेंच अन्नापासूनच उत्पन्न होतें, व अन्नापासूनच वाढतें. अन्न हेंच त्याचें उपादान कारण होय. मनाला अंतःकरण अशी एक संज्ञा आहे, त्याचा अर्थ हाच कीं, 'आंतील इंद्रिय.' कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें हीं बाह्य आहेत; मनाचें इंद्रिय आंत असल्यामुळें त्यास अंतःकरण अशी संज्ञा आहे.

हृदय हें मनाचें इंद्रिय आहे अशी आपल्या जुन्या शारीरवेत्त्यांची समजूत होती. मनाचा व मेंदूचा जो इतका निकट संबंध हल्लीं कळण्यांत आला आहे तो आपल्या शारीरवेत्त्यांस माहीत नव्हता. तथापि मन हा शरीराचाच एक भाग आहे; तो अन्नापासूनच उत्पन्न होतो; शारीरिक व्यापाराप्रमाणेंच त्याचे व्यापारही अन्नरूपी इंधनावरच अवलंबून आहेत; बाह्य उपाधीपासून जसे शरीरावर चांगले किंवा वाईट परिणाम होतात, तसेच मनावरहि होतात; मांसवर्धक व शरीरबलवर्धक जसे अनेक पदार्थ आहेत; तसे बुद्धिवर्धकही अनेक पदार्थ आहेत. इत्यादि पुष्कळ तत्त्वार्थ त्यांना अवगत होते. जुन्या शारीरवेत्त्यांनीं जरी मनाचें स्थान हृदय असें सांगितलें आहे, तरी उपनिषदादिक कित्येक तत्त्वशास्त्रांच्या ग्रंथांत मेंदूलाही मनाचें स्थान मानलेलें आढळण्यांत येतें. योगशास्त्राच्या मतें कांहीं एका विशेष स्थितीमध्यें मात्र मन मेंदूंत असतें; इतर प्रसंगीं हृदयांत असतें. मनालाच सूक्ष्म शरीर असें म्हटलें आहे. सारांश हाच कीं देहाच्याच एका अंतर्भागाला आपण मन म्हणतों, व बाहेरून दिसणारा जो स्थूल देह त्याला शरीर म्हणतों. दोनही एकाच तत्त्वापासून झालीं असून एकाच जातीचे पदार्थ आहेत व म्हणूनच त्यांचे एकमेकांवर परिणाम घडतात, व एकमेकांशीं इतक्या निकट व नित्यसंबंधानें बांधले गेले आहेत.

हा संबंध दाखविण्याकरितां शेंकडों उदाहरणें देतां येतील. मनास आनंद होतांच चेहरा हास्यमुख व प्रसन्न होतो; दुःखानें तो कोमेजून जातो; आश्चर्यानें तो चकित होतो; भयानें अंगाचा थरकांप होतो; दयेनें नेत्र आर्द्र होतात व स्वर कनवाळू होतो; रागानें कपाळास आठ्या येतात. मनाच्या वृत्ति व तज्जन्य शारीरिक स्थिति (म्हणजे कामक्रोधादिकांचे चेहेऱ्यावर उमटलेले आकार) यांचा इतका नित्यसंबंध आहे कीं, त्यांचे योगानें आपणांस लोकांच्या मनोवृत्ति जाणतां येतात. दुसरीं उदाहरणें अशीं कीं शरीरांत कांहीं एक फेरफार होतांच मनाची स्थिति पालटते, व मनोवृत्तीचे परिणाम शरीरावर घडतात. भूक फार लागली म्हणजे कोणत्याच गोष्टींत लक्ष जात नाहीं; आकंठ भोजनाचाही तोच परिणाम होतो; थकवा व विश्रांति, चांगली व वाईट हवा, थंडी व ऊन, उत्तेजक पदार्थ व औषधें, शारीरिक दुखापति, रोग, निद्रा, वार्धक्य इत्यादिकांचे जे चरे वाईट परिणाम मनावर घडतात ते लहानसहान नव्हेत. काम, क्रोध, मद, मोह, मात्सर्य, धर्म, नय, इत्यादि मोठाल्या मनोवृत्तींवर वरील गोष्टींचे परिणाम घडून

येतात. मनुष्याला शारीरिक संकटें भोगावीं लागलीं म्हणजे त्याच्या सात्विक वृत्तीमध्यें पुष्कळ फेरफार होतो असें अनेक वेळां पाहण्यांत येतें.

आपल्या दिनचर्येमध्यें जशी कांहीं शरीराची स्थिति असेल, तदनुरूपच मानसिक वृत्ति असते. एखादा निरोगी मनुष्य सकाळीं निजून उठतो तेव्हां त्याचीं इंद्रियें प्रसन्न होतात व त्याला फार तक्वा व हुशारी वाटते; कांहीं वेळानें थोडासा आहार होतांच त्याच स्थितीला अधिक जोर येतो. ह्यावेळीं सर्व मानसिक शक्ति सोळा आणे असतात; खाल्लेल्या अन्नाचें भस्म होऊन पुनः क्षुद्बोध होऊं लागला म्हणजे त्या शक्तिही हळु हळु कमी होऊं लागतात. पण जेवण होऊन थोडीशी वामकुक्षी झाली कीं त्या पुनः परत येऊं लागतात. संध्याकाळ होऊं लागला म्हणजे आळस येऊं लागतो व गाढ निद्रेमध्यें तो पर्यवसान पावतो.

शरीर जेव्हां खाऊन पिऊन ताजें झालें असतें तेव्हां स्मरण शक्ति जोराची असते, व थकवा आला म्हणजे ती कमजोर होते. ह्यासंबंधानें वर एक उद्दालक ऋषीचा प्रयोग सांगितलाच आहे. सर हेनरी हॉलंड नामक युरोपियन गृहस्थासही कांहीं दिवसांमागें उद्दालक ऋषींनीं सांगितलेल्या गोष्टीचा अनुभव आल्याचें त्याणें स्वतः एके ठिकाणीं लिहिलें आहे. हा गृहस्थ एके दिवशीं हार्झ पर्वतांतील दोन खोल खाणींत उतरून एकेका खाणींत बराच वेळ राहिला. दुसऱ्या खाणींत जाइं तोंपर्यंत तो उपासमाऱ्यानें व श्रमानें इतका थकून गेला कीं त्याची स्मरणशक्ति अजीबात नाहींशी झाली. त्याला जर्मन भाषेंतील एक शब्दही आठवेना. थोडीशी भाकर व दारू जेव्हां त्याच्या पोटांत गेली तेव्हां त्याची स्मरणशक्ति परत आली. म्हातारपणीं स्मरणशक्ति शंभरांमध्यें नव्याण्णवांची कमी होते हें प्रसिद्धच आहे. ज्वरांत भ्रम होतो तेव्हां कधीं कधीं कर्णेंद्रिय इतकें तीक्ष्ण होतें कीं त्याला शब्द अगदीं सोसत नाहीं. आतां मनोवृत्तीपासून शरीरावर जे परिणाम घडतात त्याचीं उदाहरणें थोडक्यांत सांगतों. एकाद्या गोष्टीपासून मनास एकदम एखादा धक्का बसला म्हणजे शरीरांतील व्यापार अगदीं बिघडून जातात. भय व शोक अग्नि मंद करितात; मनास फार खेद व औदासिन्य झालें म्हणजे सर्व इंद्रियें विकल होतात (केव्हां केव्हां केस देखील पिकतात किंवा चाई लागते)—फार वेळ फार मानसिक श्रम केल्यानें रोग उत्पन्न होतात. आतां ह्याच्या उलट, मनाची स्थिति संतुष्ट व समाहित असली म्हणजे आरोग्य व आयुष्य यांची वृद्धि होते.

असो, ह्याप्रमाणें मन व शरीर हे दोन्ही एकाच जातीचे पदार्थ असल्यामुळें त्यांचा एकमेकांशीं इतका निकट व नित्यसंबंध आहे. मन जर शरीराप्रमाणेंच जड नसतें, तर त्याची शरीरावर अशी नानाविध क्रिया घडली नसती. व जड शरीराचें व जड उपाधीचें त्याजवर कांहींच चाललें नसतें. सर्वांस माहीत आहे कीं शस्त्रक्रिया करावयाची असली म्हणजे डॉक्टर लोक रोग्यास क्लॉरोफॉर्म नांवाचा पदार्थ हुंगायास देतात. ह्या पदार्थांची मनावर अशी कांहीं क्रिया घडते कीं सुमारें १५ मिनिटांनीं मनाचे सर्व व्यापार बंद पडतात, सर्व इंद्रियाची शक्ति नष्ट होते, फक्त श्वासोच्छ्वास व नाडी चालू असते, तेवढ्यावरूनच रोगी अजून जीवंत आहे अशी खातरी होते. अशा स्थितींत त्याचें कोणतेंही मर्मस्थान जरी चरचरा चिरलें तरी तें त्यास कळत नाहीं! पहा एवढासा क्षुल्लक पदार्थ, पण त्याची मनोव्यापार बंद पाडण्याची केवढी ही जबरदस्त शक्ति! ज्याची उत्पत्ति अन्नापासून, ज्याचें अधिष्ठान अन्नमय, ज्याची शक्ति अन्नावलंबी, ज्याचे व्यापार भांगेसारख्या एखाद्या पदार्थानें कांहींसे वाढतात, दुसऱ्या एकाद्या पदार्थानें कमी होतात, व क्लॉरोफॉर्मासारख्या एखाद्या द्रव्यानें कांहीं वेळ मुळींच बंद पडतात, असें जें मन त्याला जड म्हणावें किंवा चिन्मय म्हणावें ह्याचा आतां कोणत्याही विचारी वाचकास संशय राहील असें आम्हांस वाटत नाहीं.

येथपर्यंत मनाचें वास्तविक स्वरूप, त्याचा व शरीराचा अन्योन्य संबंध, त्याचें अधिष्ठान किंवा इंद्रिय इ० गोष्टींविषयीं संक्षेपेंकरून सांगितलें. आतां मेंदूसारख्या जड पदार्थांमध्यें मानसिक व्यापारांचा प्रादुर्भाव होतो तरी कसा, असा साहजिकच प्रश्न निघतो. ह्या प्रश्नाचें समग्र उत्तर ह्या प्रसंगीं देणें फारच कठीण आहे; तथापि द्रव्यशक्ति अचिंत्य आहे हें लक्षांत आणून पुढें दिलेलें मनाचें पृथक्करण विचारपूर्वक पाहिलें म्हणजे ह्या प्रश्नाचा बराच उलगडा होईल असें वाटतें. शब्दस्पर्शादिक जाणणें, विचार करणें, कामक्रोधादिकांनीं मनोवृत्ति क्षुब्ध होणें, स्मरण होणें, सुखदुःखांचा अनुभव घेणें, इच्छा करणें, द्वेष करणें, इच्छेनुरूप क्रिया करणें इ० अनेक गोष्टी मनोव्यापार होत. ह्या सर्वांचा प्रयत्न, अनुभव, व विचार ह्या तीन सदराखालीं अंतर्भाव होतो. प्रयत्न म्हणजे ऐच्छिक गति उत्पन्न करण्याची जी आपल्यांत शक्ति आहे ती. आपल्या मनांत येतांच आपण बूक वाचतों, स्नान करितों, फिरायास जातों किंवा दुसरी कोणतीही क्रिया करितों. ही जी ऐच्छिक शक्ति त्याला प्रयत्न अशी आपल्या जुन्या तत्त्ववेत्त्यांनीं संज्ञा दिली आहे. ह्यालाच इंग्रजींत विल (Will) म्हणतात.

अनुभव म्हणजे शब्दस्पर्शादिकांचें व सुखदुःखाचें ज्ञान व क्रोधादिकांची प्राप्ति. शब्द ऐकूं येणें, रूप दिसणें, रुचि कळणें, स्पर्श होणें, वास येणें, भूक लागणें, काम उत्पन्न होणें, राग येणें, आनंद होणें हे सर्व मनाच्या निरनिराळ्या स्थित्यंतरांचे अनुभव होत. अनुभव ह्यालाच मनोवृत्ति असें दुसरें नांव देतां येईल. आपल्या कानांतील मज्जातंतूवर हवेच्या लहरीचे आघात झाले म्हणजे आपल्या मनोवृत्तीमध्यें जो कांहीं विशेष फेरफार होतो त्याला आपण शब्दज्ञान म्हणतों. डोळ्यांच्या मज्जातंतूवर तेजोलहरीचा आघात झाला म्हणजे जें कांहीं मनाचें स्थित्यंतर होतें त्यास आपण रूपज्ञान म्हणतों. अंगांतील अन्नरस संपल्यानें जें कांहीं मनाचें (मेंदूचें) स्थित्यंतर होतें त्यास आपण भूक लागणें म्हणतों. ह्याचप्रमाणें इतर मनोवृत्ति किंवा अनुभव निराळ्या बाह्य किंवा अंतर उपाधींनीं मनाच्या स्थितीमध्यें फेरफार झाल्यानें उत्पन्न होतात. बाकी राहिलेले सर्व मानसिक व्यापार विचार ह्या सदराखालीं येतात असें म्हणण्यास हरकत नाहीं.

[वर्ष २, अंक १५।१७.]

सृष्ट्यवलोकन.

वरील विषयाकडे सांप्रतच्या एकंदर शिक्षणपद्धतींत जें दुर्लक्ष दिसून येतें त्या योगानें आपल्या देशाचें बरेंच नुकसान होत आहे, असें सर्वांस विचाराअंतीं दिसून येईल. लहान मुलें मराठी शाळेंत जाऊं लागलीं कीं त्यांच्या मागें, हल्लींच्या शिक्षणक्रमाच्या योगानें, घोकीव विद्येचा इतका जाच लागतो कीं त्यास घर सोडून गांवांतल्या गांवांतही बाहेर हिंडण्याफिरण्यास फारसा वेळ सांपडत नाहीं. ह्या अत्यंत शोचनीय स्थितीचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे साधारण लोकांस सृष्ट्यवलोकनाचें महत्त्व कळत नाहीं, व हल्लींच्या स्थितीप्रमाणें शिक्षक लोकांची नजर आपल्या फायद्यांवर जशी असते त्याप्रमाणें मुलांच्या किंवा स्वदेशाच्या फायद्यावर बहुधा नसते. पहा कीं आजपर्यंत मराठीशाळामास्तरांनीं जीं पुस्तकें छापून प्रसिद्ध केलीं आहेत त्यांतील बहुतेक पाहिलीं तर घोकीव काम उत्कृष्ट होऊन आपला शिक्षणक्रम सुलभ कसा होईल व वार्षिक परीक्षेंत मुलांची बाह्यात्कारी हुशारी दाखवून परीक्षक इन्स्पेक्टरांची मर्जी खूष कशी राखितां येईल, या मुख्य हेतूस अनुसरून लिहिलेलीं आहेत. उदाहरणार्थ, हल्लीं पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या वगैरे मराठी क्रमिक पुस्तकांतील कवितांचे अर्थान्वय व कठिण शब्दांच्या परिभाषा मुलांस सुलभ रीतीनें पाठ करितां याव्या या हेतूनें प्रसिद्ध केलेलीं अनेक पुस्तकें बहुतेक शाळांतून सुरू आहेत. परंतु मुलांस बाह्यसृष्टि पहाण्याची हौस वाटावी आणि सृष्टिचमत्कार पाहून त्यांच्या भिन्न भिन्न मनोवृत्ति जागृत व्हाव्या अशा उद्देशानें लिहिलेलीं पुस्तकें अद्याप कोठेंहि दृष्टीस पडत नाहींत. व कोणी मास्तरानें आपल्या शाळेंत अशा प्रकारचे परिश्रम केल्याचेंही आमच्या ऐकिवांत नाहीं. त्याप्रमाणें मास्तरांची स्थिति; आणि मातापितरांचीही स्थिति त्यांस अनुकूल अशीच आहे. आपला मुलगा, पहिल्या इयत्तेंतून दुसरींत, दुसरींतून तिसरींत, तिसरींतून चवथींत, चवथींतून इंग्रजी शाळेंत केव्हां जाईल, अशा प्रकारची अतिशय घाई त्यांस सुटलेली असते; परंतु त्या घाईनें मुलांचें सर्व बाबतींत वास्तविक किती नुकसान होतें हें त्यांच्या बिलकूल नजरेस येत नाहीं; परंतु तें नुकसान होण्याचें प्रधान कारण काय म्हटलें तर या त्यांच्या घाईमुळें मुलांस सृष्टिचमत्कार

पहाण्यास मुळींच सवड सांपडत नाहीं, आणि त्या चमत्कारांविषयीं तीं बहुधां शेवटपर्यंत अज्ञानी राहतात.

या विषयाचें पूर्ण विवेचन करण्यापूर्वी सुधारलेल्या पाश्चिमात्य राष्ट्रांत या विषयाचे संबंधानें कशी स्थिति आहे हें पाहिलें असतां बरें पडेल; व आपण उदाहरणार्थ इंग्लंड देश घेऊं. हा देश फार लहान असल्याकारणानें आणि प्रवास करणारांस इकड़च्यापेक्षां तिकडे अधिक सोई असल्याकारणानें देशांतले देशांत या भागांतून त्या भागांत जाण्यास मुळींच प्रयास पडत नाहीं, असें म्हटल्यास चालेल. शिवाय हा देश सर्व बाजूंनीं समुद्रवेष्टित आहे; त्यांत म्हणण्यासारखे मोठे पर्वत किंवा नद्या नाहींत; आणि हिंवाळ्याखेरीज बाकी सर्व ऋतु तेथें सौम्य असतात. या सर्व कारणांमुळें सृष्टींतील मुख्य मुख्य चमत्कार तेथें थोड्याबहुत अंशानें, दृष्टीस पडण्यास हरकत पडत नाहीं; व त्या देशांत हे चमत्कार पाहण्यांत आबालवृद्धांस जी हौस वाटते ती येथें वर्णनही करितां येत नाहीं. तिकडील कोणतेंही लहान मोठें काव्य घेतलें तर त्यांत सृष्टिवैभवाचें हृदयंगम वर्णन नाहीं असें होत नाहीं. तिकडील कल्पित कथा पहा; तिकडील शाळांतून चालणारीं पुस्तकें पहा; तिकडील लहान मोठ्या पुरुषांचीं चरित्रें वाचा; सर्वत्र सृष्टीबद्दल पूज्यबुद्धि आपणांस दृष्टीस पडते. आणि सृष्टिचमत्काराबद्दल दिदृक्षा नसणें म्हणजे एक प्रकारचें पापच त्यांच्या लोकांत गणिलें आहे.

सृष्टीसंबंधानें ही पूज्यता त्या देशांत उत्पन्न होण्यास अनेक कारणें आहेत; तीं येथें सर्व सांगतां येत नाहींत; तथापि सांप्रतच्या काळांत लहान मुलांस तीं बाल्यापासून प्राप्त होण्यास कांहीं अंशीं तिकडील स्त्रिया कारण आहेत. तिकडे स्त्रियांस विद्या शिकविण्याचा जरी फार दिवस प्रघात आहे, तथापि स्त्रियांस जी आज काल विद्या शिकवितात ती पुरुषांच्या विद्येपासून बरीच भिन्न असते. स्त्रियांच्या अंगीं अवश्य असावे असे मानिलेले गुण म्हटले म्हणजे पुढें सांगितलेले होत. नाटकें, कविता, व कादंबऱ्या, इंग्रजी किंवा फ्रेंच उत्तम वाचतां येऊन आपलें व दुसऱ्यांचें मनोरंजन करितां येणें, समोर ठेविलेल्या पदार्थांचें अथवा देखाव्याचें, अथवा मनुष्याचें हुबेहुब चित्र काढणें, गाणें वजावणें आणि शिवणकाम जाणणें, बागेंतील मोठ्या झाडांचीं, फुलझाडांचीं, फुलांचीं, फळांचीं व पशुपक्ष्यांदिकांचीं नांवें व कांहीं गुण माहीत असणें, आणि अशाच प्रकारचे दुसऱ्या कांहीं सर्वांस आवडणाऱ्या विषयांची माहिती. हे गुण आपल्या मुलींच्या अंगीं येण्याविषयीं

बहुधां सर्व सभ्यगृहस्थ तिकडे काळजी घेतात. हे गुण स्त्रियांच्या साहजिक मनोहारित्वाचें किती सहाय्य करितात, आणि त्यास किती श्रेष्ठत्व आणितात ह्याची वाचकांनीं कल्पना केली असतां स्त्री म्हणजे कांहीं अंशीं अधिदेवताच तिकडे होऊन गेली आहे यांत त्यांस फारसें नवल वाटणार नाहीं. असो, ह्याचा प्रस्तुत विचार करणें नाहीं; तथापि वरती सांगितलेल्या गुणांचा साक्षात् सृष्टीशीं किती संबंध आहे व ते संपादन करणारास सृष्टीचें मन लावून कसें अवलोकन केलें पाहिजे, हें वाचकांस सांगायाला नको. मग पुढें अशा स्त्रियांस संतति झाली व ती बाल्यावस्थेंत असतां तिची सर्व काळजी त्यांच्यावर पडली म्हणजे त्या त्या पूर्वसंपादित गुणांचा आपल्या बालकांस, सुखांत व आनंदांत ठेविण्याकडे उपयोग करितात, हें साहजिकच आहे. व त्यांच्या या वर्तनामुळें, सृष्टिचमत्कार पाहण्याची, ते पाहून आपले मनोविकार मातापितरांजवळ प्रकट करण्याची, व ते पुन्हा केव्हां घडतील, ते कोण घडवितो, इत्यादि प्रश्न त्यांस विचारण्याची, मोठी उमेद व हौस अल्पवयांतच बालकांस वाटूं लागते. बालकांच्या अंगीं अशा कारणानें तिकडे किती अमोलिक गुण उत्पन्न होतात; त्यांचा धार्मिक, लौकिक, व प्रापंचिक सुख-संपादनास आणि आयुष्यांत किती उपयोग होतो; व अखेरीस समाजाचें उत्कर्ष व हित त्याच गुणांनीं कसें होतें हें या विषयाचे विवेचनांत पूर्णपणें दाखविलें जाईल.

उंच उंच पर्वत व त्यांतील दऱ्या, मोठमोठ्या नद्या व विस्तीर्ण सरोवरें, ज्यांमध्यें अनेक वृक्ष व वेली निबिड उगवलेल्या आहेत, आणि असंख्य वनपशु व पक्षी वास करीत आहेत अशीं अफाट अरण्यें, आणि, निरानिराळ्या ऋतूंत व निरनिराळ्या ठिकाणीं भिन्नभिन्न स्वरूप धारण करणारें असें आकाश व त्याचप्रमाणें समुद्र, हेच वास्तविकपणें सृष्टिसौंदर्य अवलोकन करण्याचे मुख्य प्रदेश होत. अशा प्रदेशांत प्रेक्षकांस जणूं काय मोहून टाकावें म्हणून सृष्टि आपला आवरणपट निर्भीडपणें एकीकडे करून आपल्या सर्वांगांचें सौंदर्य व सर्व संमतात चकाकणाऱ्या पदार्थरत्नांची शोभा प्रेक्षकांच्या दृष्टीस पाडते. परंतु असें सौंदर्य बहुधा मनुष्यांची जेथें दाट वस्ती असते, तेथें आविष्कृत केलेलें नसतें. तें पाहण्यास शहरापासून बहुधा दूर जावें लागतें. परंतु हें सौंदर्य पाहण्याची प्रथम अभिरुचि आणि इच्छा उत्पन्न होण्यास, सृष्टीनें आपल्या अव्याहत केलिक्रमांत सर्वत्र इतस्ततः विखुरलेलीं लहानमोठीं रत्नें मनुष्यानें लहानपणापासून वेंचिलीं पाहिजेत; आणि तीं वेंचण्यास शहरापासून फारसें लांब जावयास नको.

मनुष्यास सृष्टींतील नानाविध चमत्कार पाहण्याची गोडी लहानपणीं बहुधा साहजिकपणें लागत नाहीं; ती लावण्याचा प्रयत्न मातापितरांनीं केला पाहिजे; परंतु या विषयासंबंधानें सांप्रत मातापितरांसच खुद्द अज्ञान असल्यानें आपल्या संततीचे अंगीं वरील गुण आणणें त्यांच्यानें होत नाहीं; आणि आपले अन्य व्यवसाय टाकून आपलीं कोमल बुद्धीचीं बालकें बरोबर घेऊन हिंडावयास जाणें हेंही बहुतेकांस आवडत नाहीं. अशा स्थितींत साधारण स्वतंत्रपणें शहराचे आसपास फिरावयास जाण्याइतपत ज्यांचें वय झालें आहे, अशा लहान मुलांवरच वरील गुण संपादन करण्याचें काम पडावयाचें; आणि त्यांचे हातून तें सिद्धीस जाण्यास त्यांस अभ्यासाच्या कांचांतून थोडें सोडवून कांहीं स्वतंत्रताही त्यांस दिली पाहिजे.

सृष्टींतील चमत्कार पाहण्यास शहरापासून निदान मैल अर्धमैल तरी गेलें पाहिजे; कधीं एखाद्या सपाट मैदानांत, कधीं शेतांत किंवा बागेंत, कधीं एखादे उंच टेंकडीवर व कधीं नदीचे कांठीं अशा ठिकाणीं जाण्याचा नेहमीं प्रघात ठेविल्यानें होणारांपैकीं पहिला फायदा म्हटला म्हणजे आरोग्यरक्षण हा होय; आणि ह्या फायद्याकडे आजकाल बहुतेकांचें लक्ष लागत चाललें आहे आणि त्याचा अनुभवही बरेच लोक घेऊं लागले आहेत. शरीरांतील सर्व व्यापार उत्कृष्ट चालण्यास स्वच्छ हवेंत वागणें आणि शरीरास योग्य व्यायाम देणें अवश्य आहे. सृष्ट्यवलोकन करण्याची ज्यास एकवार गोडी लागली त्यास ह्या दोन्ही गोष्टी साहजिकपणेंच प्राप्त होतात. शहरांत राहून कालक्रमण करणारा जो मोठा प्राणिसमुदाय, त्याच्या निरंतर श्वासोच्छ्वासानें उच्छिष्ट झालेली, सर्वत्र घरभर पसरून त्याच्या प्रतिबंधानें चालना न पावणारी, आणि दुसऱ्या अनेक मनुष्यसंबंधीं दुर्गंधांनीं दूषित झालेली, हवा अनेक उपायांनीं शुद्ध करण्याचा सृष्टीचा थोरला कारखाना वरतीं सांगितल्या ठिकाणीं सदोदित सुरू आहे, हें बहुतेकांस माहीत आहेच. अशा ठिकाणीं मनुष्य गेला असतां त्यास बराच व्यायाम होऊन दिवसांच्या दगदगीनें कंटाळलेलें मन पुनः उल्हास पावतें, हें सर्वांच्या अनुभवास आलें आहे. जेथें फारशी मनुष्यांची वस्ती नाहीं व जेथें मनुष्यास हरवक्त शेतांत, कुरणांत किंवा नदीवर जावें लागतें, अशा खेड्यापाड्यांतील लोकांची प्रकृति बहुधा अरोगी व सुदृढ असते याचें कारण त्यांचा उघड्या हवेंतील व्यायाम हें स्पष्ट आहे. अशा लोकांत जे कधीं कधीं रोग किंवा वाखे

उत्पन्न होतात त्यांचीं मुख्य कारणें या लोकांचें अज्ञान व तज्जनित वेडेविद्रे आचार व घरांतील अस्वच्छता, हीं होत. त्यांच्या अंगचें हें अज्ञान जर कांहीं अंशीं दूर झालें व आरोग्यशास्त्राचीं व चांगल्या आचारांचीं जर थोडीं तत्त्वें त्यांस कळूं लागलीं तर या बाबतींत त्यांच्यासारखे सुखी लोक कोणीच असणार नाहींत. वर्षांतून एखादे वेळीं सवड करून खेडेगांवांत जाऊन राहण्याची, व शहरांतील अनेक व्यापारांनीं होणारी सर्व कटकट एकीकडे ठेवून, तेथील शांतता, साधेपणा वगैरे सौम्य सुखांचा अनुभव घेण्याची गोडी अद्याप युरोपियन लोकांप्रमाणें आम्हांस लागली नाहीं. तथापि अशी गोडी असणें सर्वांशीं इष्ट आहे. कारण तिच्या योगानें अज्ञान आणि सज्ञान लोकांचें थोडेंबहुत संघट्टन होऊन परस्परांचेंही हित होतें. असो. यावर सांगितलेल्या फायद्याविषयीं अधिक लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

वरच्या सारख्या ठिकाणीं गेल्यावर सृष्टींतील लहानसानही गोष्टी कशा पहाव्या, त्याचे पाहिल्यानें मनोवृत्तीवर काय परिणाम होतात, आपली जिज्ञासा व कल्पनाशक्ति कशी जागृत होते वगैरे अनेक गोष्टींचा विचार करण्यास या निबंधांत जागा नाहीं, सबब तो येथेंच संपविणें अवश्य आहे.

सृष्टींतील जी जी वस्तु पहावी, तिच्या तिच्यामध्यें एक प्रकारची मनोहरता असतेच. अशा सर्व वस्तूंचें वर्णन करण्याचा आमचा उद्देश नाहीं. सृष्टींतील कांहीं मनोरम वस्तु उदाहरणार्थ घेऊन त्यांच्या अवलोकनानें अंतःकरणाचें स्वास्थ्य व समाधान कसें करून घ्यावें, व त्यांवर विचारशक्ति व कल्पना यांचा कसा प्रयोग करावा, याचा थोडक्यांत मासला दाखवून विचारी लोकांची तिकडे प्रवृत्ति करावी इतकेंच आम्ही आपलें कर्तव्य समजतों.

एखादे उंच टेंकडीवर बसून, प्रातःकाळचे किंवा सायंकाळचे वेळीं आकाशाकडे नजर फिरविली असतां, क्षणोक्षणीं भिन्न भिन्न आकृति धारण करणाऱ्या अशा ढगांचीं पटलें सूर्याचे आसपास व क्षितिजाचे दुसरे कांहीं भागांवर आपणास बहुधा दिसतात. अस्तोदय समयींच्या रक्तसूर्यकिरणांतही मेघपटलांचा वर्ण नेहमीं तांबडाच असतो असें नाहीं. कोठें पिंवळा, कोठें पारवा, कोठें निळा, कोठें काळा याप्रमाणें आकाशाच्या अल्प भागांतही एकांत एक मिसळून जाणाऱ्या व मानवी भाषेनें ज्यांचें वर्णन करणें अत्यंत दुर्घट व मानवी कृतीनें ज्यांचें यथावत् अनु-

करण करणें अत्यंत अशक्य; अशा असंख्य रंगाची प्रभा एकदम डोळ्यांवर पडून मनुष्याचें अंतःकरण अगदीं मोहून जातें. हें सृष्टीचें नैसर्गिक लावण्य पाहण्यासाठीं सांसारिक सर्व विवंचना विसरून घटकाभर निकडेच टक लावणारा कोण विचारी मनुष्य आपल्या नेत्रांचें सार्थक्य झालें असें मानणार नाहीं ? ज्यास थोडी बहुत शक्ति असेल, त्यास असा देखावा पाहून, तो वर्णन करण्याची स्फूर्ति खरोखर होईल. ज्यास चित्रकर्माचा व्यासंग असेल, त्यास अशा देखाव्याचें होईल तितकें करून हुबेहुब चित्र आपल्या संग्रहास ठेवण्याची मनीषा उत्पन्न होईल. ज्यानें सृष्टिशास्त्राचा अभ्यास केला आहे, त्याचीही बुद्धि हें वर्णवैचित्र्य पाहून चकित झाल्यावांचून रहाणार नाहीं. याप्रमाणें, ज्यास ज्या गोष्टीचें विशेष परिशीलन, त्याचे मनांत त्या त्या गोष्टीच्या कल्पना एकदम उभ्या राहून सर्वांचेंच एकदम समाधान झाल्यावांचून रहाणार नाहीं. असे देखावे कदाचित् वारंवार पाहिल्यानें कोणाच्या मनांतील त्यांविषयींची आश्चर्यबुद्धि नाहींशी होण्याचा संभव आहे. तथापि एक ढगच पहाण्याचा जर कोणीं निश्चय केला तर त्यास किती विचार करण्यास जागा आहे ! त्यांची बाष्परूपानें उत्पत्ति कोठें अफाट समुद्रांत; तेथून त्यांचें आकाशांत हिमालयाच्या अत्युच्च शिखराहूनही उंच आरोहण; त्यांचें वायुसाहाय्यानें सर्वतोगामित्व; व अखेरीस जलरूपानें सर्व भूमंडळावर कालभेदानें त्याची वृष्टि-या सर्व गोष्टींचा मनुष्यानें विचार केला असतां सृष्टिव्यापाराची अनुपम विशालता त्याचे मनावर पूर्णपणें बिंबल्यावांचून राहणार नाहीं; मग भूगर्भशास्त्राचे प्रमाणांवरून जेव्हां त्याचे लक्षांत येईल कीं असा क्रम मानवोत्पत्तीच्याही पूर्वीच्या अगणित कालापासून सृष्टीनें अव्याहत चालविला आहे, त्यावेळीं सृष्टीच्या भव्यपणानें त्याचें मन थक्क होईल यांत नवल काय! परंतु जर अशा मनुष्याचा ईश्वराचे अस्तित्वावर पूर्ण भरंवसा असेल तर त्यास या केवळ मेघावलोकनानेंही ईश्वराच्या अगाध चातुर्याची व कृपेची कल्पना झाल्यावांचून राहणार नाहीं. पहा कीं, सूर्याच्या कोट्यावधि कोसांवरून येणाऱ्या उष्णतेचा समुद्रांवर बाष्पीकरणाकडे विनियोग झाल्यामुळें, आज आम्हां प्राणिसमुदायाकरितां शेंकडोंशें कोस जमीन सुपीक होत आहे, सहस्रावधि वृक्षांचें योग्य प्रतिपालन होत आहे, लक्षावधि जलचर प्राण्यांस आश्रयभूत असे नद, नद्या, सरोवरें, तडाग व झरे प्रतिवर्षी भरत आहेत, व याप्रमाणें यच्चावत् भूमंडलावर सुख, समाधान, व सौंदर्य यांची समृद्धि होत आहे. या अद्भुत नियोगचातुर्याचा जर त्यानें विचार केला, तर या एका उदाहरणावरूनही

ईश्वराचे सर्वज्ञतेबद्दल व कृपाळूपणाबद्दल त्याला जितकी पूज्यबुद्धि व कृतज्ञता उत्पन्न होईल तितकी व्यवहारांतील राज्यप्राप्तीसारख्या महान् लाभांनींही कदापि उत्पन्न होणार नाहीं.

याप्रमाणें या उदाहरणावरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं, जर विचारी पुरुषानें सृष्टींतील साधारण पदार्थही प्रसंगविशेषीं पाहिले, आणि त्यांच्या उत्पत्तीचा, स्थितीचा, व विनियोगाचा शक्त्यनुसार विचार केला, तर प्रथम इंद्रियसुख, नंतर आश्चर्यवृत्ति, नंतर कल्पना व जिज्ञासा यांचा हृदयांत प्रादुर्भाव होतो व शेवटीं सृष्टीच्या प्रचंड व्यापारांपासून होणारा चकितपणा अथवा ईश्वराच्या अनुपम चातुर्यापासून होणारी दृढभक्ति, कृतज्ञता, व समाधान इतक्या मनोवृत्तींचा क्रमानें उदय होऊन त्याचे अंतःकरणास प्रसन्नता व उत्साह येतो; त्याची संसारविवंचनें-तून सुटका होऊन त्यास शांतता मिळते; आणि विचारशक्ति प्रगल्भ दशेस येऊन मनाची क्षुद्रता व आत्मपरता नाहींशी होते.

प्रत्येकानें वरील गोष्टीचा स्वतः प्रत्यय घेणें अवश्य आहे. सृष्टिशास्त्राचे साधारण अज्ञानामुळें कित्येकांच्या सर्वच गोष्टी अनुभवास येतील असें नाहीं; तथापि अव-लोकनांत आलेल्या गोष्टी समजून घेण्याचा जर प्रयत्न केला, तर तसें होण्यास हरकत दिसत नाहीं. जी गोष्ट आपणांस समजून आनंद झाला, ती इष्टमित्रांस व विशेषतः लहान मुलांस समजून देऊन, त्यांस सृष्ट्यवलोकनाची व शास्त्राभ्या-साची जर आपण अभिरुचि लावून दिली, तर आपले त्यांवर व देशावर खरोखर उपकार होतील. केवळ आळस व निरुद्योग हींच ज्याचीं सुखप्राप्तीचीं स्थानें, त्यास वरील गोष्टी खऱ्या वाटणार नाहींत. परंतु त्यांनीं आपल्या संततीस तरी आत्मानुरूपता न द्यावी व त्यांची बालजिज्ञासा वरील उपायांनीं वाढत असतां तिला विघ्न करूं नये.

सृष्ट्यवलोकनाचीं आणखी कांहीं उदाहरणें पुढील खेपेस देऊं. व नंतर या विषयाच्या दुसऱ्या कांहीं भागांचा विचार करूं.

ज्या वेळीं मनुष्यजाति आपल्या अत्यंत बाल्यावस्थेंत होती, व ज्या वेळचा इतिहास आतां परम दुरुपलब्ध झाला आहे, अशा अतिप्राचीन कालापासून अंतरीक्षांतील तारांगणांकडे पाहून मानवी प्राण्यांचें अंतःकरण आश्चर्यानें थक्क

होऊन एक प्रकारच्या आनंदानें भरून गेलें असावें, असें अनेक प्रमाणांवरून सिद्ध होतें. ज्या वेळीं भूमितीच्या अगदीं स्वल्प सिद्धांताचेंही मनुष्यास ज्ञान नव्हतें, जेव्हां यंत्रादि कृत्रिम साधनांचा पूर्ण अभाव होता, आणि जेव्हां उपजीविका मिळविण्याच्या, व क्रूर श्वापदापासून आपलें संरक्षण करण्याच्या विवंचनेंतच आयुष्याचा बहुतेक भाग मनुष्यास खर्चावा लागे, अशा काळींही वर्षेंचीं वर्षें गगनतलाचें सारखें अवलोकन करून सूर्यचंद्रांची आकाशांतील बाह्यगति व त्यांचा मार्ग प्राचीन लोकांनीं ठरविला. त्या मार्गांतील तारकापुंज निश्चित करून त्यावर आपल्या कल्पनेनें चित्रें काढिलीं, व तदनुसार त्यांस संज्ञा दिल्या; व अशा प्रकारें त्यांनीं एक चित्रमय राशिचक्र निर्माण केलें. आकाशाकडे नजर फेकतांच तेथें एकसारखे झळकणारे अगणित तारे पाहून जर त्यांचें अंतःकरण आश्चर्यानें चकित झालें नसतें, व त्यांच्या पुनः पुनः अवलोकनानें जर त्यांचें हृदय आनंद पावलें नसतें, तर अशा प्रकारचा महान् प्रयास त्यांनीं कदापि केला नसता. इतर सर्व शास्त्रांच्या पूर्वी ज्योतिःशास्त्राचा जगांत प्रादुर्भाव झाला; तो होण्यास वरती सांगितलेला आनंदच कारणभूत होय.

सृष्ट्यवलोकनापासून चित्तास समाधान व आनंद करून घेण्याचे जे अनेक मार्ग आहेत, त्यांतीलच अंतरीक्षाचें अवलोकन हा एक होय, हें वरील गोष्टिवरून सिद्ध होईल; आतां तो कोणत्या प्रकारचा आहे व तो कसा प्राप्त होतो, याचा थोडा विचार करूं. आकाशाच्या अवलोकनास आमची सध्यांची स्थिति जितकी अनुकूल आहे तितकीच प्रतिकूल आहे, असें म्हणण्यास चिंता नाहीं. सुधारणेचा जों जों अधिकाधिक उत्कर्ष होत चालला आहे, तों तों आमच्या अवश्यकताही साहजिकच वाढत आहेत. जेथें पूर्वी मृगयेनें किंवा कंदमूलांनीं किंवा थोड्या शेतकीनें लोकांचा निर्वाह होत असे, आणि वृक्षांच्या मृदुत्वचांपासून केलेल्या अथवा चर्ममय वस्त्रांनीं आणि लहानशा पर्णकुटिकेनें त्यांचें शीतोष्णनिवारण होत असे, तेथें आतां अनेक प्रकारचीं धान्यें, फळें व शाका उत्पन्न करून, नाना तऱ्हेचीं पेयें तयार करून, व वस्त्रें विणूनही मनुष्याचें समाधान होत नाहीं. याप्रमाणें इकडे जों जों अवश्यकता वाढत आहेत, तों तों कलाकौशल्यें वाढून श्रमविभागामुळें प्रत्येकाच्या हातीं एकादी दुसरी कला लागते, व तीवर त्यास आपल्या सर्व अवश्यकता भागवाव्या लागतात. अशा स्थितींत करावे तितके श्रम थोडेच; मग

अन्य व्यवसायांत घालविण्यास मनुष्यास वेळ कोठून मिळणार ? तसेंच सुधारणेमुळें सर्वत्र ज्ञानवृद्धि होऊन मनुष्यांत परस्पराबद्दल विशेष बंधुत्व व कळकळ वाटूं लागली आहे; व नित्य श्रमाव्यतिरिक्त कांहीं काळ उरलाच तर तो आप्तवर्गांत किंवा स्नेहीवर्गांत बसून तत्संबंधीं, किंवा ग्रामसंबंधीं, अथवा देशसंबंधीं किंवा जगासंबंधीं सुखदुःखाच्या किंवा घडामोडीच्या गोष्टी सांगण्यास व माहिती मिळविण्यांत जाणार. अशाच प्रकारच्या अनेक विघ्नांनीं सुधारणेपासून सृष्ट्यवलोकनासारख्या शांत, एकांतांतील आणि मनोवृत्ति सदोदित प्रफुल्लित राखणाऱ्या सुखाच्या संपादनास प्रतिबंध होतो.

आतां आमची स्थिति सृष्ट्यवलोकनास व मुख्यत्वेंकरून आकाशाच्या अवलोकनास अनुकूल कोणच्या प्रकारें आहे हें पुढील गोष्टीवरून ध्यानांत येईल. दुर्बीण वगैरे अनेक यंत्रें निघून सूर्य, ग्रह, तारे वगैरे सर्व मोठे करून आपणांस पहातां येतात; इतकेंच नव्हे तर कोट्यावधि नवीन तारे आपल्या दृष्टिगोचर होतात. दुसरें ज्योतिःशास्त्राची ज्यांस विशेष गोडी, अशा लोकांनीं परिश्रम करून काढिलेले आकाशाचे नकाशेही सध्यां सुलभ झाले आहेत; व त्यांनीं लाविलेले शोधही एकसारखे प्रसिद्धीस येत आहेत. या सर्व साधनांमुळें आकाशाची माहिती होण्यास पूर्वीइतके आतां प्रयास पडत नाहींत.

अंतरीक्षाचें ज्यांस अवलोकन करणें असेल त्यानें रात्रीच्या शांत वेळीं उंच गच्चीवर किंवा सपाट मैदानांत गेलें पाहिजे हें उघडच आहे. अशा ठिकाणीं बसलें असतां सर्व आकाश ताऱ्यांनीं खचलेलें दिसतें. अत्यंत नील अशा आकाशावर विखरलेलीं हीं तारकारत्नें व त्यांचा अस्खलित प्रकाश पाहून मनुष्याच्या नेत्रांस खचित आनंद होईल. जसा एखादा मोठा हिरा फुटून त्याचीं लक्षावधि शकलें व्हावीं व तीं उंच अधांतरीं लोंबत रहावीं, त्याप्रमाणें हे तारे कोणास भासतील; परंतु त्यांचा स्वयंप्रकाश व त्यांच्या प्रकाशाचें सदोदित भ्रमण हीं पाहून हिऱ्याची उपमा त्यांस शोभत नाहीं असें त्यास वाटेल व वास्तविकच तें अनुपमेय आहेत. ते किती दूर असतील याची तर त्यास कल्पनाच करितां येणार नाहीं. घटकोघटकीं पूर्वेस नवे तारे दिसूं लागतात, कित्येकांचा पश्चिमेकडे अस्त होतो व सर्वांचीच पश्चिमेकडे गति दिसते. असें दिसण्याचें कारण कांहीं असो, परंतु त्या गतीपासून आश्चर्य वाटेल. अशी गति या पृथ्वीवर त्यास कोठेंही आढळणार नाहीं. साधारण पदार्थांची गति पाहिली असतां तीपासून घरघर वगैरे शब्द निघतात; शांत

५५७२

आकाशांत तरळक ढग आपणांस निःशब्द हलतांना दिसतात, परंतु त्यांची आकृति स्थिर राहात नाहीं. तसेंच, आकाशांत लक्षावधि तारे निरंतर पश्चिमेकडे धाव घेत असून लेशमात्र शब्द नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्यांच्या परस्परांमधील अंतर कधींही बदललेलें दिसत नाहीं. जो कवि असेल त्यास तर ही गति पाहून फारच आनंद वाटेल. अशा प्रकारची गति लोकांच्या समाजास केव्हां येईल असें त्यास वाटेल. प्रत्येक आपआपल्या क्षितिजभागांत जन्म घेतो, पुढें अधिकाधिक प्रकाश पाडीत आपल्या अत्युच्च पदावर आरूढ होतो; परंतु इतरांस त्यापासून कधींही धक्का नाहीं, व त्यांच्या प्रकाशास याचेपासून कधींही न्यूनता नाहीं. कित्येक क्षितिजावर फार वेळ राहून आपला प्रकाश पृथ्वीस फार वेळ पुरवितात; कित्येक अल्पकाळपर्यंतच क्षितिजावर असतात; परंतु प्रत्येकाचा प्रकाश त्याच्या त्याच्या मोठेपणावर अवलंबून राहतो, क्षितिजांत कोठें जन्मला व किती वेळ वर राहिला, यावर नसतो. अखेरीस सर्व आपलें नियत मार्गक्रमण करून क्षितिजाखालीं अंतर्धान पावतात. लक्षावधींचा याप्रमाणें क्रम, तथापि त्यांच्या सर्व अस्तित्वांत परस्परांशीं घर्षण, किंवा बेबनाव किंवा अंतरभंग कोणाच्याही लक्षांत येत नाहीं. अशा प्रकारचे अनेक विचार आकाशांतील सृष्टीचें सौंदर्य पाहून त्यांचें मनन करणाराचे मनांत येतील; व त्यास शेवटीं अत्यंत हर्ष वाटेल. या प्रकारच्या सुखास विशेष महत्त्व दिलें पाहिजे. कारण नानाविध मनोवृत्ति त्यापासून जागृत होतात, मनास शांतता व समाधान राहातें, आणि इतरांस त्यापासून कधींही त्रास होत नाहीं, व त्यांच्या हृदयांत आपणाविषयीं मत्सरादि दुष्ट वृत्ति उत्पन्न होत नाहींत. या सुखाचा अनुभव दरिद्र्यास व श्रीमंतास सारखाच मिळूं शकतो.

समाप्त.

REFBK-0005572

This is a very good book.